बौद्ध काळात इंग्लिश महीने नव्हते.

बुध्द काळात इंग्लिश महीने नव्हते. संस्कृत मधेही नव्हते, पाली भाषेत महीने व वार होते. भारत देश जंबुद्विप म्हणून ओळखला जात होता आणि त्यावेळची मुख्य बोलिभाषा ही पाली होती. मराठी कॅलेंडर (दिनदर्शिका) हे बुद्धांच्या काळात बुद्ध समकालीन पाली भाषेत कॅलेंडर (दिनदर्शिका) होते. चक्रवर्ती सम्राट अशोक राजाच्या निर्वाणानंतर कालांतराने पाली भाषेतील कॅलेंडर (दिनदर्शिका) हे मराठी भाषेत रूपांतरीत करण्यात आले. हे पहा सम्राट अशोक यांचे साम्राज्य व धम्म प्रचार केलेला प्रदेश.... भारतासह... पाकिस्तान... नेपाळ... बांग्लादेश... म्यानमार... श्रीलंका... अफगाणिस्तान... भूतान... इराण... तुर्कमेनिस्तान... ताजिकिस्तान... उझबेकिस्तान, इजिप्त, अझरबैजान इराक, तुर्की इत्यादी.

जम्बुव्दिप/नागरी संस्कृती कालीन महिण्यांचे व दिवसांचे नावे पुढीलप्राने आहेत.

पाली	इंग्रजी	मराठी
पाली (Pali)	इंग्रजी (English)	मराठी (Marathi)
१) फुस्स मासो	जानेवारी (January)	पौष
२) माघ मासो	फेब्रुवारी (February)	माघ
३) फग्गुणो मासों	मार्च (March)	फाल्गुन
४) चेत मासो	एप्रिल (April)	चैत्र
५) वेसाख मासो	मे (May)	वैशाख
६) जेठ्ठ मासो	जुन (June)	जेष्ठ
७) आसाळ्ह मासो	जुलै (July)	आषाढ
८) सावणो मासो	आगष्ट (August)	श्रावण
९) पोठ्ठपाद मासो	सप्टेंबर (September)	भाद्रपद
१०) अस्सयुजो मासो	आक्टोबर (October)	आश्विन
११) कतिको मासो	नोव्हेंबर (November)	कार्तिक
१२) मग्गसिरो मासो	डिसेंबर (December)	मार्गशिस

१) चन्दवारो	मंडे (Monday)	सोमवार
२) कुंजवारो	चुसडे (Tuesday)	मंगळवार
३) बुधवारो	वेणसडे (Wednesday)	बुधवार
४) गरुवारो	थर्सडे (Thursday)	गुरुवार
५) सुक्कवारो	फ्रायडे (Friday)	शुक्रवार
६) सनिवारो	सॅटरडे (Saturday)	शनिवार
७) आदिच्चवारो	संडे (Sunday)	रविवार

☸☸🦚🦚🦚💎 *बौद्धांचे महत्वाचे दिनविशेष !* 💎🦚🦚🦚☸☸

१ जानेवारी १८१८ – भीमा कोरेगाव शौर्य दिन (१८१८).

३ जानेवारी १८३१ – सावित्रीमाई फुले जयंती (१८३१).

८ जानेवारी १८८० – बौध्द धम्म ध्वज दिन (१८८०).

१२ जानेवारी १५९८ – राष्ट्रमाता जिजाऊ जयंती (१५९८).

१४ जानेवारी १९९४ – डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन (१९९४).

२१ जानेवारी १६०८ – संत तुकाराम बोल्होबा अंबिले (मोरे) जयंती (१६०८).

२६ जानेवारी १९५० – प्रजासत्ताक (गणतंत्र) दिन (१९५०).

२ फेब्रुवारी १९१३ – सुभेदार रामजी आंबेडकर स्मृतिदिन (१९१३).

६ फेब्रुवारी १९३९ – सयाजीराव गायकवाड स्मृतिदिन (१९३९).

७ फेब्रुवारी १८९८ – माता रमाई आंबेडकर जयंती (१८९८).

१४ फेब्रुवारी १८५४ – भीमाबाई आंबेडकर जन्मदिन (१८५४). आंबेटेंभे, ता. मुरबाड.

१७ फेब्रुवारी १८८१ – लहुजी साळवे स्मृतिदिन (१८८१).

१९ फेब्रुवारी १४५० – संत गुरु रविदास जयंती (१४५०).

१९ फेब्रुवारी १६३० – छत्रपती शिवाजी महाराज जयंती (१६३०).

२३ फेब्रुवारी १८७६ – संत गाडगेबाबा डेबुजी झिंग्राजी जनोरकर जयंती (१८७६).

२४ फेब्रुवारी १३९८ – रोजी जागतिक मुद्रण दिन. योहान्स गुटेनबर्ग (Johannes Gutenberg) यांचा जन्मदिन (१३९८).

३ मार्च १९३० – काळाराम मंदिर सत्याग्रह दिन (१९३०).

८ मार्च १९१० – जागतिक महिला दिन (१९१०).

१० मार्च १८९७ – सावित्रीमाई फुले स्मृतिदिन (१८९७).

११ मार्च १६८९ – संभाजी महाराज स्मृतिदिन (१६८९).

११ मार्च १८६३ – छ. सयाजीराव गायकवाड जयंती (१८६३).

१५ मार्च १९३४ – मा. कांशीरामजी जयंती (१९३४).

१९ मार्च १६५० – संत तुकाराम बोल्होबा अंबिले (मोरे) स्मृतिदिन (१६५०).

२० मार्च १९२७ – महाड चवदार तळे क्रांतिदिन (१९२७).

२३ मार्च १९३१ – भगतसिंग स्मृतिदिन – शहिद दिन (१९३१).

४ एप्रिल १९०६ – डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांचा विवाह (१९०६).

७ एप्रिल १९४८ – जागतिक आरोग्य दिन (१९४८).

११ एप्रिल १८२७ – क्रांतिसूर्य राष्ट्रपिता महात्मा फुले (गोऱ्हे) जयंती (१८२७).

१४ एप्रिल १८९१ – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती (१८९१).

१४ एप्रिल १९९० – डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतरत्न बहाल (१९९०).

१५ एप्रिल १९४८ – डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा डॉ. शारदा कबीर यांच्याशी विवाह (१९४८).

१६ एप्रिल ई. स. पूर्व ३०४ – सम्राट अशोक जयंती (ई. स. पूर्व ३०४).

३० एप्रिल १९०९ – संत तुकडोजी महाराज जयंती (१९०९).

१ मे १९६० – महाराष्ट्र दिन (१९६०).

४ मे १९५५ – द बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया स्थापना दिन (१९५५).

५ मे १९३५ – रोजी आदरनिय मिराताई आंबेडकर यांची जयंती (१९३५).

६ मे १९२२ – छत्रपती शाहू महाराज स्मृतिदिन (१९२२).

८ मे १९६२ – महाहस्थविर चंद्रमणी निर्वाण (१९६२).

१० मे १९५४ – प्रकाश (बाळासाहेब) आंबेडकर यांचा जन्मदिन (१९५४).

१४ मे १६५७ – संभाजी महाराज जयंती (१६५७).

१५ मे २००४ – वामनदादा कर्डक स्मृतिदिन (२००४).

२७ मे १९३५ – माता रमाई आंबेडकर स्मृतिदिन (१९३५).

३१ मे १७२५ – अहिल्याबाई होळकर जयंती (१७२५).

६ जून १८७३ – माहस्थविर चंद्रमणी जयंती (१८७३).

९ जून १९०० – बिरसा मुंडा स्मृतिदिन (१९००).

१७ जून १६७४ – राजमाता जिजाऊ स्मृतिदिन (१६७४).

१९ जून १९५० – मिलिंद महाविद्यालयाची स्थापना (१९५०).

२० जून १९४६ – सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना (१९४६).

२२ जून १९८८ – भदंत आनंद कौसल्यायन स्मृतिदिन (१९८८).

२६ जून १८७४ – राजर्षी शाहू महाराज जयंती (१८७४).

२७ जून १३९८ – संत कबीर जयंती (१३९८) स्मृतिदिन (१५१८).

६ जुलै १९३५ – चौदावे (१४) दलाई लामा जन्मदिन (१९३५).

८ जुलै १९४५ – पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना (१९४५).

११ जुलै १९९७ – रमाबाई आबेडकर नगर घाटकोपर हत्याकांड स्मृतिदिन (१९९७).

१८ जुलै १९६९ – साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे स्मृतिदिन (१९६९).

२२ जुलाई १९४७ – भारतीय राष्ट्रीय ध्वज (चौरंगा; केशरी [नारंगी], पांढरा, निळा, हिरवा.) भारताच्या संविधानातकारी सभेद्वारे स्विकारला गेला (१९४७).

१ ऑगस्ट १९२० – साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती (१९२०).

१३ ऑगस्ट १७९५ – अहिल्याबाई होळकर स्मृतिदिन (१७९५).

१५ ऑगस्ट १९४७ – स्वातंत्र्य दिन (१९४७).

१५ ऑगस्ट १९२२ – वामनदादा कर्डक जयंती (१९२२).

१७ सप्टेंबर १८७९ – पेरियार ई. व्ही. रामासामी नायकर जयंती (१८७९).

१७ संप्टेंबर १९७७ – यशवंत (भैय्यासहेब) आंबेडकर स्मृतिदिन (१९७७).

१७ संप्टेंबर १९४८ – मराठवाडा मुक्ती संग्राम दिन (१९४८).

२४ संप्टेंबर १८७३ – सत्यशोधक समाज स्थापना दिन (१८७३).

२८ संप्टेंबर १९०७ – भगतसिंग जयंती (१९०७).

८ ऑक्टोबर – सम्राट अशोक धंम्मदीक्षा दिन.

९ ऑक्टोबर २००६ – मा. कांशीरामजी स्मृतिदिन (२००६).

११ ऑक्टोबर १९६८ – राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्मृतिदिन (१९६८).

१४ ऑक्टोबर १९५६ – धंम्मचक्र अनुप्रवर्तन दिन (१९५६).

१५ ऑक्टोबर १९०२ – कर्मवीर दादासाहेब गायकवाड जयंती (१९०२).

७ नोव्हेंबर १९०० – "विद्यार्थी दिवस" सातारा येथे इंग्रजी पहिल्या वर्गात प्रवेश (१९००).

१४ नोव्हेंबर १८३८ – सुभेदार रामजी आंबेडकर जयंती (१८३८).

१४ नोव्हेंबर १७९४ – वस्ताद लहुजी साळवे जयंती (१७९४).

१५ नोव्हेंबर १८७५ – बिरसा मुंडा जयंती (१८७५).

२६ नोव्हेंबर १९४९ – संविधान दिन (१९४९).

२८ नोव्हेंबर १८९० – क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले (गोऱ्हे) स्मृतिदिन (१८९०).

६ डिसेंबर १९५६ – विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन (१९५६).

१० डिसेंबर १९४८ – मानव हक्क दिन (१९४८).

१२ डिसेंबर १९१२ – यशवंत (भैय्यासाहेब) आंबेडकर जयंती (१९१२).

२० डिसेंबर १९५६ – संत गाडगेबाबा डेबुजी झिंग्राजी जानोरकर स्मृतिदिन (१९५६).

२० डिसेंबर १८९६ – भीमाबाई रामजी आंबेडकर स्मृतिदिन (१८९६).

२४ डिसेंबर १९७३ – पेरियार ई. व्ही. रामासामी नायकर स्मृतिदिन (१९७३).

२५ डिसेंबर १९२७ – मनुस्मृति दहन दिन भारतीय स्त्री मुक्तीदिन (१९२७).

२९ डिसेंबर १९७१ – कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्मृतिदिन (१९७१).

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १ जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, सोमवार, मग्गसिरो मासो, चंन्दवारो, मार्गसिश माहे.

१ जानेवारी १८१८, रोजी पुणे येथील भिमा कोरेगाव येथे पेशवे आणि इंग्रज यांच्यामधे झालेल्या युद्धामधे पाचशे (५००) महार सैनिकांनी पेशवाई संपवून इंग्रजांचा झेंडा फडकाविला.

१ जानेवारी १८४८, रोजी क्रांतिज्योती महात्मा फुले यांनी मुलींची पहिली शाळा सुरू केली.

१ जानेवारी १९१८, रोजी विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायी, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या शांताबाई दाणी यांचा जन्म.

१ जानेवारी १९१९, रोजी "अस्पृश्यांना समानतेने वागवावे" याबाबतचे आज्ञापत्र राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी काढले.

१ जानेवारी १९२७, रोजी विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुण्याजवळील भिमा कोरेगाव विजय स्तंभासमोर गेले आणि त्यांनी महार सैनिकांना श्रद्धांजली वाहिली. त्यांनी बहुजन समाजाच्या लढाईची आठवण पुन्हा जिवंत केली आणि ही अभिमानाची बाब आहे.

१ जानेवारी १९३७, रोजी नाशिक नगरपालिकेमधे पब्लिक वर्कसचे चेअरमन म्हणून कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली.

१ जानेवारी १९४८, रोजी विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित "द अंनटचेबल्स" हा ग्रंथ प्रकाशित झाला.

१ जानेवारी १९७९, रोजी मंडळ आयोग नेमले.

१ जानेवारी २००१, रोजी मान्यवर कांशिरामजिने पुणे येथील भिमा कोरेगावच्या क्रांतीस्तंभापासून "कहीं हम भूल न जाये" या राष्ट्रीय कार्यक्रमाची सुरुवात केली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

****

🦚🦚🦚*@ १ जानेवारी @* *मुलींची पहिली शाळा सुरू झाली*

****

महात्मा जोतीबा फुले यांनी १ जानेवारी १८४८ साली पुण्यामध्ये पहिली मुलींची शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपविली. महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची ही मुहूर्तमेढ ठरली. तसेच अस्पृश्य मुलांसाठी पुण्याच्या वेताळ पेठेत ३ जुलै १८५२ मध्ये त्यांनी शाळा स्थापन केली. त्यांच्या या कार्याला सनातन्यांकडून सतत विरोध होत असे. पण जोतीराव आपल्या भूमिकेवर ठाम असत.

समाज सुधारण्याच्या कार्याला गती देण्यासाठी व व्यापक करण्यासाठी १८७३ साली त्यांनी 'सत्यशोधक समाजा' ची स्थापना केली. 'कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वण्य व जातिभेद ही निर्मिती मानवाचीच आहे' असे रोखठोकपणे बोलताना मानवाने गुण्यागोविंदाने रहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या 'शेतकऱ्यांचा आसूड' या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्रयाची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचा क्रांतिकारक म्हणून ही जोतीरावांचे दर्शन होते.

'नीती हाच मानवी जीवनाचा आधार आहे' हा विचार मांडणारे जोतीराव एक तत्वचितक व्यक्तिमत्त्व म्हणूनही आपल्या समोर येतात.

****

☸☸🦚🦚🦚💎 *भीमाकोरेगाव शौर्यदिन*💎🦚🦚🦚☸☸

१ जानेवारी १८१८ स्वातंत्र्याचे बंड का झाले?

छत्रपती शिवाजी महाराजांच्या हत्येच्या कटात जे ब्राम्हण मंत्री सामील होते त्या बारा (१२) ब्राम्हण मंत्र्यांना छत्रपती संभाजी महाराज यांनी हत्तीच्या पायी देवून ठार मारले आणि शिवाजी महाराजांच्या हत्येचा बदला घेतला. या गोष्टीमुळे ब्राम्हण वर्ग हादरून गेला व त्यांनी संभाजी महाराजांचा बदला घेण्याचा जणू विडाच उचलला असावा, असे षडयंत्र ब्राम्हण रचत गेले. याचाच एक भाग म्हणून *समर्थ रामदासांचाच पट्टशिष्य रंगनाथ स्वामी* याने षडयंत्र करून संभाजी महाराजांना औरंगजेबाला पकडुन देण्यात मदत केली.

औरंगजेबाने संभाजी महाराजांना मनेपासून पायापर्यंत त्यांच्या वाजनापेक्षा जास्त वजनाच्या साखळदंडात जखडून ठेवले आणि संभाजी महाराजांना औरंगजेबाने दोन (२) प्रश्न विचारले की, माझ्या सरदारांपैकी तुला कोण फितूर (फसविले) झाले आणि तुझा खजिना कुठे आहे? परंतु संभाजी महाराजांनी या दोन्ही प्रश्नांची उत्तरे दिली नाहीत.

मग औरंगजेबाने संभाजी महाराजांना सोडून देण्याचे ठरविले. परंतु नंतर ब्राम्हण मंत्र्यांनी औरंगजेबाला सांगितले की, *"संभाजी आमच्या धर्माचा आहे, तेव्हा त्याला आमच्या हवाली (ताब्यात) करण्यात यावे."*

जवळजवळ सर्व प्रकारच्या मुघलांच्या – मुस्लिम सरदारांच्या दरबारात ३५% ब्राम्हणांची (RSS – आरएसएसचे पूर्वज) भागीदारी असते. औरंगजेबाने दरबारातील ब्राम्हणांचे ऐकून संभाजी महाराजांना ब्राम्हणांच्या ताब्यात दिले.

ब्राम्हण जातीने आपल्या जातभाईंच्या हत्येचा बदला घेऊन स्वराज्य बळकावयाचे होते आणि ब्राम्हणांसाठी हि शेवटची संधी होती व ब्राम्हण ती गमवू इच्छित नव्हते आणि जर का संभाजी महाराज सुटले असते तर ब्राम्हण जातीचा ते काळच (अंत) ठरले असते.

म्हणून ब्राम्हणांनी संभाजी महाराजांची हत्या मनुस्मृतिप्रमाणे शिक्षा देऊन केली. महाराजांचे डोळे काढले, त्यांची कातडी सोलली, हातांची बोटे छाटली, कानात शिश ओतलं, जिभ छाटली आणि शरीराचे तुकडे तुकडे करून भिमा नदीच्या पात्रात टाकले. नंतर ब्राम्हणांनी फर्मान (निर्देश) काढले की, *"जर संभाजी महाराजांच्या शरीराचे तुकडे कुणी गोळा केले तर त्याचेही हेच हाल केले जातील."*

वढु बुद्रुक गावातील कुणीही पुढे यायला तयार होईना. गावचे मातब्बर, सरंजामी गडी शांत झाले. *परंतु ही गोष्ट नदीवर धुणं धुत असलेल्या जरी परटिनीला कळली. ती गावभर फिरली. पाटील, देशमुख यांच्याकडे गेली आणि सांगितले की संभाजी महाराजांच्या प्रेताचे तुकडे नदीत फेकले आहेत, त्यांचा अंत्यसंस्कार करायचा आहे.* परंतु गावातला एकही माणूस पुढे येईना.

अशा वेळी त्याच गावातील एक गोविंद महार पुढे आला. त्याने आपल्या भावकितल्या पन्नास (५०) लोकांना जमा केले आणि शिंप्याकडून ते सर्व तुकडे शिवून (टाचून) घेतले व स्वतःच्या शेतात संभाजी महाराजांचा अंत्यसंस्कार केला.

पुढे पेशव्यांनी या लोकांना देहदंडाची शिक्षा दिली आणि पेशव्यांनी महार जातीला दिवसा गावातून फिरण्यावर बंदी घातली आणि गळ्यात मडके व कमरेला झाडू लावण्याचा नियम बनविला. अशा प्रकारे महार जातीवर गुलामगिरी वाढली, अंन्याय वाढला. तो इतका वाढला की, या व्यवस्थेत जगणे मुश्कील वाटू लागले.

अशावेळी इंग्रज भारतात साम्राज्य विस्तार करू इच्छित होते. परंतु इंग्रजांना ते शक्य होत नव्हते. पेशवाई विरोधात इंग्रजांनी युद्ध करण्याचा निर्णय घेतला. अशावेळी *शिदनाक महार* पेशव्यांकडे गेला आणि म्हणाला, *आम्ही तुमच्या बाजूने लढू परंतु आपण आम्हाला त्या बदल्यात काय द्याल?* पेशव्यांनी शिदनाकला सांगितले की, *तुम्हाला आणि तुमच्या समाजाला इथली टीचभर जागासुद्धा मिळणार नाही.* *शिदनाकची* एकच मागणी होती, *आमच्या गळ्यातील मडके आणि कमरेचे झाडू काढली जावी.* परंतु पेशव्यांनी ही मागणी नामंजूर केली आणि *शिदनाकने* इंग्रजांकडे जाऊन तीच मागणी केली आणि इंग्रजांनी ती मागणी मंजूर केली. *विशेष म्हणजे शिदनाकने बहुजन समाजातील पाचशे (५००) शूरवीर योध्यांना जमा केले आणि इंग्रजांच्या सैन्यात भरती केले व पेशव्यांच्या विरोधात युद्धाची घोषणा केली.*

१ जानेवारी १८१८ रोजी युद्ध होईल ही घोषणा केली गेली. इकडे शिदनाक महार आणि त्यांचे शूरवीर योद्धे *वढू बुद्रुक येथे संभाजी महाराजांच्या समाधीवर गेले.* तिथे सर्वांनी शपथ घेतली की, *महाराज आम्ही आपल्या हत्येचा बदला घ्यायचा निघालो आहोत, आम्हाला आशीर्वाद द्या.* आणि तेथून पाचशे (५००) विर भिमा नदीच्या पैलतीर इंग्रजी छावणीत जमले. नदीच्या एका काठावर पेशव्यांचे सैन्य, दुसऱ्या काठावर महार बटालियन.

समोर पेशव्यांची तीस हजारांची (३००००) फौज पाहून इंग्रजांनी घाबरून माघार घेण्याचे ठरविले. परंतु *शिदनाक महार आणि सैन्य काही माघार घ्यायला तयार नव्हते.* कारण बहुजन समाजाच्या अस्तित्वाचा प्रश्न होता. त्यांनी इंग्रज अधिकार्यांना ग्वाही दिली की; *"तुम्ही माघार घेऊ नका, आम्ही हे युद्ध आपणास जिंकून देऊ."* इकडे पेशव्यांचे सैन्य ३१ डिसेंबर १८१७ ला गाफील होते. मौज मस्तीत होते. कारण युद्ध १ एक तारखेला होणार होते. अशा परिस्थितीत ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री महार बटालियनच्या सैनिकांनी हल्ला चढविला आणि रात्रीचा फायदा घेऊन पेशव्यांच्या सैन्याला नामोहरम केले. *हे युद्ध ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री सुरू झाले आणि १ जानेवारी १८१८ ला दुपारी संपिले.* पेशवे हारले आणि इंग्रज जिंकीले. *यात पेशवे सैनिक ३०००० तीस हजार सैनिक होते यापैकी २००० दोन हजार सैन्य भितीने पळून गेले आणि २८००० अठ्ठावीस हजार सैन्याबरोबर ५०० पाचशे बहुजन सैनिक लढले.* एका बहुजन सैनिकांबरोबर पेशव्यांचे ५६–५६ छप्पन–छप्पन सैनिक लढले. तेंव्हापासून महाराष्ट्रामधे एक म्हण प्रचलित झाली की, *"तुझ्यासारखे ५६ छप्पन बघितलेत."*

कोरेगांवच्या या लढाईत धारातीर्थी पडलेले, व जखमी झालेले ते शूर वीर महार सैनिक, व त्यांचा सैन्यातील हुद्दा पुढील प्रमाणे :–

१) सोननाक कमलनाक – नाईक. २) रामनाक येसनाक – नाईक. ३) गोंदनाक कोढेनाक – शिपाई. ४) रामनाक यसनाक – शिपाई. ५) भागनाक हरनाक – शिपाई. ६) अंबरनाक काननाक – शिपाई. ७) रूपनाक लखनाक – शिपाई. ८) गणनाक बाळनाक – शिपाई. ९) काळनाक कोंडनाक – शिपाई. १०) वपनाक रामनाक – शिपाई. ११) विटनाक धामनाक – शिपाई. १२) राजनाक गणनाक – शिपाई. १३) वपनाक हरनाक – शिपाई. १४) रैनाक वाननाक – शिपाई. १५) गणनाक धरमनाक – शिपाई. १६) देवनाक आमनाक – शिपाई. १७) गोपाळनाक बाळनाक – शिपाई. १८) हरनाक हिरनाक – शिपाई. १९) जेठनाक दैनाक – शिपाई. २०) गणनाक लखनाक – शिपाई.

जखमी झालेले वीर सैनिक :–

१) जाननाक हिरनाक – शिपाई. २) भीकनाक रतननाक – शिपाई. ३) रतननाक धाकनाक – शिपाई.

या महार सैनिकांच्या पराक्रमाची गौरवगाथा संपूर्ण जगाला कळावी, म्हणून त्यांच्या या महान पराक्रमाबद्दल भीमा कोरेगांवच्या या विजयस्तंभावर इंग्रजीत पुढील प्रमाणे गौरववाक्य लिहिलेले आहे –

"One of the proudest triumphs of the British Army in the East."

अर्थात – "पूर्वेकडील देशांत ब्रिटीश सैन्याला जे अनेक विजय मिळालेले आहेत, त्यामध्ये अतिशय गर्व बाळगण्यासारखा हा विजय आहे.....!"

जुलमी, अन्यायकारक पेशवाई संपवून, जातीअंताची ही लढाई जिंकून, सन्मानाने गौरवान्वित होणाऱ्या त्या ५०० महार शूरवीर पूर्वजांना माझा स्वाभिमानाचा जय भीम.......!!!

या वीस (२०) शहिदांसोबत पाचशे (५००) महारांचे नेतृत्व करणाऱ्या स्वाभिमानी लढवय्या सोननाक कमलनाक महार यांना विनम्र अभिवादन.....!!!

म्हणजे जर छत्रपती संभाजी महाराजांच्या हत्येचा बदला म्हणून आणि बहुजनांवरील गुलामीचा विरोध म्हणून जर पेशव्यांची सत्ता नष्ट केली गेली असेल तर बहुजनांवरती गुलामी कुणी लादली होती? तर ती पेशवे ब्राम्हणांनी लादली होती.

मग आजच्या सध्यास्थितीत ३१ डिसेंबरला या दिवसी दारू, पार्ट्या, मौजमस्ती, रात्री उशिरापर्यंत नाचगाणे, करायचे आणि दुसऱ्या दिवशी उशिरापर्यंत म्हणजेच दुपारपर्यंत

झोपून राहायचे ही रीत कुणी आणि का का घालवून दिली? तर ती रीत ब्राम्हणी षडयंत्राद्वारे नोकरी–धंदा करणाऱ्या बहुजन समाजात प्रचलित केली गेली. कारण, *१ जानेवारीचा सत्य इतिहास दाबला जावा. कुणी जाणून घेऊ नये की, १ जानेवारी १८१८ ला काय घडलं होतं?*

हा इतिहास दडपण्याचा प्रयत्न का होतो तर विश्वरत्न परमपूज्य भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, *"जो समाज आपला इतिहास जाणतो आणि त्यापासून बोध घेतो तो समाज इतिहास घडविल्याशिवाय राहात नाही."*

बोल महामानवाचे !

"तुम्ही शूरवीरांची संतान आहात. ही गोष्ट काल्पनिक नव्हे ! भिमा कोरेगावला जाऊन बघा, तुमच्या पूर्वजांची नावे तेथील विजय स्तंभावर कोरलेली आहेत. तो पुरावा आहे की, तुम्ही मेंढी (भेड) बकरींची संतान नसून सिंहाचे छावे आहात." (महाड, २५ डिसेंबर १९२७.)

🌐🌐🌐🌐🌐🌐🌐

****

🦚🦚🦚*@ १ जानेवारी @* *मुलींची पहिली शाळा सुरू झाली*

****

महात्मा जोतीबा फुले यांनी १ जानेवारी १८४८ साली पुण्यामध्ये पहिली मुलींची शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपविली. महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची ही मुहूर्तमेढ ठरली. तसेच अस्पृश्य मुलांसाठी पुण्याच्या वेताळ पेठेत ३ जुलै १८५२ मध्ये त्यांनी शाळा स्थापन केली. त्यांच्या या कार्याला सनातन्यांकडून सतत विरोध होत असे. पण जोतीराव आपल्या भूमिकेवर ठाम असत.

समाज सुधारण्याच्या कार्याला गती देण्यासाठी व व्यापक करण्यासाठी १८७३ साली त्यांनी ‘सत्यशोधक समाजा’ ची स्थापना केली. ’कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वण्य व जातिभेद ही निर्मिती मानवाचीच आहे’ असे रोखठोकपणे बोलताना मानवाने गुण्यागोविंदाने रहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या 'शेतकऱ्यांचा आसूड’ या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचा क्रांतिकारक म्हणून ही जोतीरावांचे दर्शन होते.

‘नीती हाच मानवी जीवनाचा आधार आहे’ हा विचार मांडणारे जोतीराव एक तत्वचितक व्यक्तिमत्त्व म्हणूनही आपल्या समोर येतात.

****

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २ जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, मंगळवार, मग्गसिरो मासो, कुंजवारो, मार्गसिश माहे.

२ जानेवारी १५१८, रोजी संत कबीर स्मृतीदिन.

२ जानेवारी १९४०, रोजी कऱ्हाड म्यूनसिपालटीने विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानपत्र देण्याचे ठरविले. सातारहून कऱ्हाडला जाताना त्यांच्या मोटारीला भयंकर अपघात होवून बाबासाहेबांच्या डोक्याला, पायाला व हाताला मार बसला होता. दावाखण्यात थोडी विश्रांती घेतल्यानंतर ते कऱ्हाड येथे रवाना झाले.

२ जानेवारी १९४३, रोजी अखिल भारतीय दलित फेडरेशनची प्रांतिक शाखा नागपूर येथे स्थापन केली.

२ जानेवारी १९४४, महर्षि विठ्ठल रामजी शिंदे स्मृतीदिन.

२ जानेवारी १९४५, रोजी कलकत्ता येथे अखिल भारतीय दलित वर्ग विद्यार्थी संघाच्या सभेत राजकारण आज विद्यार्थी चळवळीचा हेतू होईल हा बऱ्याच पुढाऱ्यांचा दृष्टिकोन आपणास मान्य नसल्याचे सांगून राजकारणापासून अलिप्त राहण्यासाठी अस्पृश्य विद्यार्थ्यांनी आपली स्वतंत्र संघटना स्थापन करावी असा मोलाचा उपदेश विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला.

२ जानेवारी १९५०, रोजी विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या पत्नी सौ. सवितादेवी यांच्यासमवेत विमानमार्गे दिल्लीहून मुंबई सांताक्रुझ विमानतळावर आले.

२ जानेवारी १९५२, रोजी स्वतंत्र भारतातील पहिल्या निवडणुका झाल्या. विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्व मुंबईमधून शेड्युल्ड कास्ट पक्षातर्फे उमेद्वार होते. त्यांच्याविरुद्ध चांभार समाजातील नारायणराव काजरोळकर यांना काँग्रेसने उभे केले होते.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ३ जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, बुधवार, मग्गसिरो मासो, बुधवारो, मार्गसिश माहे.

३ जानेवारी १८३१, रोजी भारतातील पहिली शिक्षिका व मुख्याध्यापिका क्रांतिज्योती सावित्रीमाई ज्योतिबा फुले यांची जयंती. बालिका दिन/महिला मुक्ती दिन.

३ जानेवारी १९०८, रोजी भिमराव रामजी आंबेडकर यांचा मुंबईतील एलिफिस्टन कॉलेजमधे प्रवेश

३ जानेवारी १९४०, रोजी विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कऱ्हाड येथे मानपत्र देऊन सन्मानित केले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 सावित्रीमाई फुले मराठी भारतीय समाजसुधारक. 💎🦚🦚🦚☸☸

(जन्म :– ३ जानेवारी, इ. स. १८३१ मृत्यू :– १० मार्च, इ. स. १८९७)

सावित्रीमाई फुले :–

टोपणनाव :– ज्ञानज्योती, क्रांतिज्योती.

जन्म :– ३ जानेवारी, इ. स. १८३१ नायगाव, सातारा, महाराष्ट्र.

मृत्यू :– मार्च १०, इ. स. १८९७ पुणे, महाराष्ट्र.

चळवळ :– मुलींची पहिली शाळा सुरू करणे.

संघटना :– सत्यशोधक समाज.

पुरस्कार :– क्रांतीज्योती.

प्रमुख स्मारके :– जन्मभूमी नायगाव.

धर्म :– सत्यशोधक.

वडील :– खंडोजी नेवसे (पाटील).

आई :– सत्यवती नेवसे.

पती :– जोतीराव फुले.

अपत्ये :– यशवंत फुले.

सावित्रीमाई जोतीराव फुले (जन्म :– ३ जानेवारी, इ. स. १८३१ मृत्यू :– १० मार्च, इ. स. १८९७) या एक भारतीय समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ आणि कवयित्री होत्या. त्यांना भारतातील पहिल्या महिला शिक्षिका म्हणून ओळखले जाते. आपले पती महात्मा ज्योतिराव फुले यांच्यासोबत त्यांनी भारतातील महिलांचे अधिकार सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. सावित्रीमाईंना भारतीय स्त्रीवादाची जननी मानले जाते. सावित्रीमाई आणि त्यांचे पती यांनी १८४८ मध्ये पुणे येथील भिडेवाड्यात मुलींच्या शाळेची स्थापना केली. ही शाळा देशात स्थापन झालेल्या सुरुवातीच्या शाळांपैकी एक होती.

महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणा चळवळीतील एक महत्त्वाची व्यक्ती म्हणून सावित्रीमाई फुले ओळखल्या जातात. त्यांनी जात आणि लिंगावर आधारित भेदभाव आणि अन्यायकारक वागणूक नाहीशी करण्यासाठी काम केले. फुले यांनी विधवांचे होणारे केशवपन थांबवण्यासाठी पुण्यात न्हाव्यांचा संप घडवून आणला होता. सावित्रीमाई या लेखिका देखील होत्या. त्यांनी मराठी भाषेत विपुल लेखन केले.

१८९७ मध्ये प्लेगची भयंकर साथ आल्यावर त्यांनी लागण झालेल्या लोकांसाठी काम केले. या प्रक्रियेत सावित्रीमाई फुले यांना देखील प्लेगची लागण झाली. १० मार्च १८९७ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

३ जानेवारी हा सावित्रीमाईंचा जन्मदिवस संपूर्ण महाराष्ट्रात बालिका दिन व महिला मुक्तीदिन म्हणून साजरा केला जातो. २०१५ मध्ये, पुणे विद्यापीठाचे नामकरण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असे करण्यात आले. ३ जानेवारी, २०१७ रोजी सावित्रीमाई फुले यांच्या १८६ व्या जन्मदिनानिमित्त त्यांचे गूगल डूडल प्रसिद्ध करून गूगलने त्यांना अभिवादन केले.

चरित्र :–

सावित्रीबामाईंच्या आईचे नाव लक्ष्मीबाई तर गावचे पाटील असणाऱ्या वडिलांचे नाव खंडोजी नेवसे पाटील होते. इ. स. १८४० साली जोतीराव फुले यांचेशी सावित्रीमाईंचा विवाह झाला. लग्नाच्या वेळी सावित्रीमाईंचे वय नऊ, तर जोतीरावांचे वय तेरा वर्षांचे होते. सावित्रीमाईचे सासरे गोविंदराव फुले हे मुळचे फुरसुंगीचे गोरे, परंतु पेशव्यांनी त्यांना पुण्यातील फुलबागेची जमीन बक्षीस दिली म्हणून ते पुण्याला येऊन राहिले व फुलांच्या व्यवसायावरून त्यांना "फुले" हे आडनाव मिळाले.

औरंगाबाद येथे जोतीराव आणि सावित्रीमाई फुले यांचे भव्य पुतळे आहेत.

सावित्रीमाईंचे पती जोतीराव यांना लहानपणापासूनच मातृप्रेम लाभले नाही. त्यांची मावस आत्या सगुणाऊ यांनीच त्यांचा सांभाळ केला होता. सगुणाऊ एका इंग्रज अधिकाऱ्याच्या मुलाच्या दाई म्हणून काम करायच्या. त्यांना इंग्रजी कळायचे व बोलताही यायचे. त्यांनी आपल्या या ज्ञानाचा उपयोग जोतीरावांना प्रेरित करण्यासाठी केला. जोतीरावही शिक्षणाकडे आकर्षित झाले. सावित्रीमाईंना ख्रिश्चन मिशनऱ्यांनी लग्नापूर्वी दिलेले एक पुस्तक त्या सासरी घेऊन आल्या होत्या. त्यावरून जोतीरावांनाही एक नवा मार्ग सापडला. त्यांनी स्वतः शिकून सावित्रीमाईंना शिकवले. सगुणाऊ तर सोबत होतीच. दोघींनी रीतसर शिक्षण घेतले.

१ मे, इ. स. १८४७ रोजी सावित्रीमाईंनी सगुणाऊला मागासांच्या वस्तीत एक शाळा काढून दिली. ही त्यांची पहिली शाळा. गुणाऊंना त्या शाळेत बोलाविण्यात आले. सगुणाऊ तेथे आनंदाने व उत्साहाने शिकवू लागल्या. पुढे ही पहिली शाळा मध्येच बंद पडली. १ जानेवारी, इ. स. १८४८ रोजी पुण्यातील बुधवार पेठेतील भिडेवाड्यात जोतीराव आणि सावित्रीमाईंनी मुलींची शाळा काढली. साऱ्या कर्मठ मनुवादी समाजाच्या विरोधाला न जुमानता विवाहानंतर शिक्षण घेतले आणि शिक्षक, मुख्याध्यापक बनून शिक्षण दिले. केवळ चार वर्षांत १८ शाळा उघडल्या आणि चालवल्या. तत्कालीन ब्रिटिश भारतातली एतद्देशीय व्यक्तीने काढलेली ही पहिलीच मुलींची शाळा ठरली.

(यापूर्वी मिशनऱ्यांनी आणि अन्य लोकांनी काढलेल्या १४–१५ शाळा उत्तर भारतात होत्या.) या शाळेत सावित्रीमाई मुख्याध्यापिका म्हणून काम पाहू लागल्या. त्या काळात पुण्यातील अन्य भागांतही २–३ मुलींच्या शाळा त्यांनी सुरू केल्या व काही काळ चालवल्या. मुंबईतल्या गिरगावातही त्याच सुमारास स्टूडन्ट्स लिटररी ॲन्ड सायंटिफिक सोसायटीने 'कमळाबाई हायस्कूल' नावाची मुलींसाठीची शाळा सुरू केली, ती शाळा २०१६ सालीही चालू आहे. (मिशनरी नसलेले पिअरी चरण सरकार यांनी मुलींसाठी पहिली शाळा बारासात टाऊन येथे १८४७ मध्ये काढली. शाळेसाठी नवीन कृष्ण मित्र आणि काली कृष्ण मित्र या दोन भावांनी आर्थिक मदत केली. ही शाळा कालीकृष्ण हायस्कूल या नावाने चालू आहे. मुंबईत पारशी लोकांनी १८४९ मध्ये मुले आणि मुलींसाठी पहिली सहशिक्षण शाळा काढली, पण काही दिवसातच या शाळेच्या मुलांसाठी आणि मुलींसाठी अशा दोन शाखा झाल्या.)

सावित्रीमाईंच्या शाळेत सुरुवातीला शाळेत सहा मुली होत्या, पण १८४८ साल संपेपर्यंत ही संख्या ४०–४५ पर्यंत जाऊन पोहोचली. या यशस्वी शाळेचे स्वागत सनातनी उच्च वर्णीयांनी "धर्म बुडाला.... जग बुडणार.... कली आला...." असे सांगून केले. मनुवादी सनातन्यांनी विरोध केला. अंगावर शेण फेकले. काही उन्मत्तांनी तर अंगावर हात टाकण्याची भाषा केली. पण अनेक संघर्ष करत हा सावित्रीमाईंचा शिक्षणप्रसाराचा उपक्रम चालूच राहिला. त्यासाठी त्यांना घर सोडावे लागले. सगुणाऊ सोडून गेली. अनेक आघात होऊनही सावित्रीमाई डगमगल्या नाहीत.

शिक्षणाच्या प्रसारासाठी अन्य सामाजिक क्षेत्रांतही काम करणे गरजेचे आहे, स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे हे सावित्रीमाईंनी ओळखले. काही क्रूर रूढींनाही त्यांनी आळा घातला. बाल–जरठ विवाहप्रथेमुळे अनेक मुली वयाच्या बारा–तेराव्या वर्षी विधवा व्हायच्या. ब्राह्मण समाजात विधवा पुनर्विवाह अजिबात मान्य नव्हता. पतीच्या निधनानंतर अशा विधवांना सती जावे लागे किंवा मग त्यांचे केशवपन करून कुरूप बनविले जाई. विरोधाचा अधिकार नसलेल्या या विधवा मग कुणातरी नराधमाच्या शिकार बनत. गरोदर विधवा म्हणून समाज छळ करणार, जन्माला येणाऱ्या मुलाला यातनांशिवाय काहीच मिळणार नाही अशा विचारांनी या विधवा आत्महत्या करत किंवा भ्रूणहत्या करत.

जोतिरावांनी या समस्येवर उपाय म्हणून बालहत्या प्रतिबंधक गृह सुरू केले. सावित्रीमाईंनी ते समर्थपणे चालवले. फसलेल्या वा बलात्काराने गरोदर राहिलेल्या विधवांचे त्या बाळंतपण करत. या बालहत्या प्रतिबंधक गृहातील सर्व अनाथ बालकांना सावित्रीमाई आपलीच मुले मानत. याच ठिकाणी जन्मलेल्या काशीबाई या ब्राह्मण विधवेचे मूल त्यांनी दत्तक घेतले. त्याचे नाव यशवंत ठेवले.

केशवपन बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करणे व त्यांचा संप घडवून आणणे, पुनर्विवाहाचा कायदा व्हावा यासाठी प्रयत्न करणे अशी अनेक कामे सावित्रीमाईंनी कल्पकतेने पार पाडली. सत्यशोधक समाजाच्या कार्यातही सावित्रीमाईंचा मोठा सहभाग असे. महात्मा फुले यांच्या निधनानंतर (इ. स. १८९०) सावित्रीमाईंनी सत्यशोधक समाजाच्या कार्याची धुरा वाहिली. आपल्या विचारांचा प्रसार त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून केला. 'काव्यफुले' व 'बावनकशी सुबोध रत्नाकर' हे काव्यसंग्रह त्यांनी लिहिले. पुढील काळात त्यांची भाषणेही प्रकाशित करण्यात आली.

इ. स. १८९६ सालातल्या दुष्काळात सावित्रीमाईंनी समाजाला सत्कार्याचा आदर्श घालून दिला. पोटासाठी शरीरविक्रय करणाऱ्या बाया-बापड्यांना दुष्टांच्या तावडीतून सोडवून त्यांनी त्यांना सत्यशोधक कुटुंबांत आश्रयास पाठविले. त्यांच्या कार्याला हातभार म्हणून पंडिता रमाबाई, गायकवाड सरकार अशा लोकांनी मदतीचा हात पुढे केला.

इ. स. १८९६-९७ सालांदरम्यान पुणे परिसरात प्लेगच्या साथीने धुमाकूळ घातला. हा जीवघेणा आजार अनेकांचे जीव घेऊ लागला. हा रोग संसर्गजन्य आहे हे कळल्यावर ब्रिटिश शासनाने जबरदस्तीने संभाव्य रुग्णांना वेगळे काढून स्थानांतरित करण्याचा खबरदारीचा उपाय योजला. यातून उद्भवणारे हाल ओळखून सावित्रीमाईंनी प्लेगपीडितांसाठी पुण्याजवळ वसलेल्या ससाणे यांच्या माळावर दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना आधार देऊ लागल्या. प्लेगच्या रोग्यांची सेवा करताना सावित्रीमाईंनाही प्लेग झाला. त्यातून १० मार्च, इ. स. १८९७ रोजी त्यांचे निधन झाले.

सावित्रीमाईनी जोतिबांच्या सर्व कार्यात हिरीरीने भाग घेतला स्त्रियांनी शिकावे हे त्यांचे ब्रीद वाक्य होते. अनाथांना आश्रय मिळवा हेही त्याचे कार्यक्षेत्र होते. सामजिक कार्यात त्यांचा पुढाकार असे. त्यामुळेच १८७६-७७ च्या दुष्काळात त्यांनी खूप कष्ट केले. पुढे १८९७ मध्ये प्लेगची भयंकर साथ आली असताना त्यांनी आपल्या स्वतःच्या प्रकृतीचीही पर्वा न करता प्लेगची लागण झालेल्यांसाठी काम केले. दुर्दैवाने त्या स्वतःच प्लेगच्या भीषण रोगाच्या बळी ठरल्या. प्लेग मुळेच त्यांचे निधन झाले.

शिक्षण :-

लग्नाच्या वेळी सावित्रीमाई निरक्षर होत्या. ज्योतिरावांनी सावित्रीमाईंना त्यांच्या घरीच शिक्षण दिले. ज्योतिरावांकडे त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षणाची जबाबदारी ज्योतीरावांचे मित्र सखाराम यशवंत परांजपे आणि केशव शिवराम भवाळकर यांच्याकडे होती. त्यांनी स्वतःला दोन शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमातही सहभागी करून घेतले. पहिली अहमदनगरमधील अमेरिकन मिशनरी सिंथिया फरार यांनी चालवलेल्या संस्थेत होती. दुसरा अभ्यासक्रम पुण्यातील एका सामान्य शाळेत होता. त्यांचे प्रशिक्षण पाहता, सावित्रीमाई या पहिल्या भारतीय महिला शिक्षिका आणि मुख्याध्यापिका झाल्या असतील. सावित्रीमाईंची जन्मतारीख, म्हणजे ३ जानेवारी हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रात, विशेषतः मुलींच्या शाळांमध्ये बालिका दिन म्हणून साजरा केला जातो.

सावित्रीबाईंना "क्रांतीज्योती" म्हणूनही ओळखले जाते.

मृत्यू :-

सावित्रीमाई आणि त्यांचा दत्तक मुलगा यशवंत यांनी १८९७ मध्ये नालासोपारा परिसरात बुबोनिक प्लेगच्या जगभरातील तिसऱ्या साथीच्या रोगाने प्रभावित झालेल्यांवर उपचार करण्यासाठी एक क्लिनिक उघडले. क्लिनिकची स्थापना पुण्याच्या बाहेरील भागात, संसर्गमुक्त भागात करण्यात आली. पांडुरंग बाबाजी गायकवाड यांच्या मुलाला वाचवताना सावित्रीमाईंचा वीरतापूर्वक मृत्यू झाला. गायकवाड यांच्या मुलाला मुंढव्याबाहेरील महार वस्तीत प्लेग झाला हे कळताच सावित्रीमाई फुले त्यांच्या पाठीशी धावून गेल्या आणि त्यांना पाठीवर घेऊन रुग्णालयात नेले. या प्रक्रियेत, सावित्रीमाई फुले यांना प्लेगची लागण झाली आणि १० मार्च १८९७ रोजी रात्री ९.०० वाजता त्यांचा मृत्यू झाला.

साहित्य :-

सावित्रीमाई फुले या लेखिका आणि कवयित्रीसुद्धा होत्या. त्यांनी १८५४ मध्ये काव्यफुले आणि १८९२ मध्ये बावनकाशी सुबोध रत्नाकर प्रकाशित केले आणि "जा, शिक्षण मिळवा" नावाची कविता देखील प्रकाशित केली, ज्यामध्ये त्यांनी वंचित लोकांना शिक्षण घेऊन स्वतःला मुक्त करण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यांच्या अनुभवाचा आणि कामाचा परिणाम म्हणून त्या एक उत्कट स्त्रीवादी बनल्या. महिलांच्या हक्कांबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी त्यांनी महिला सेवा मंडळाची स्थापना केली. त्यांनी महिलांसाठी जातीय भेदभाव किंवा कोणत्याही प्रकारचा भेदभाव मुक्त असलेल्या मेळाव्याचे ठिकाण देखील बोलावले. याचे प्रतिक म्हणजे उपस्थित सर्व महिलांनी एकाच चटईवर बसायचे. त्या भ्रूणहत्या विरोधी कार्यकर्त्यासुद्धा होत्या.

त्यांनी महिलासांठी निवारास्थान उघडले, जेथे ब्राह्मण विधवा त्यांच्या मुलांची सुरक्षितपणे प्रसूती करू शकत होत्या आणि त्यांची इच्छा असल्यास त्यांना दत्तक घेण्यासाठी तेथे सोडू शकतात. त्यांनी बालविवाहाविरुद्धही मोहीम चालवली आणि विधवा पुनर्विवाहाचे समर्थन केले. सावित्रीमाई आणि ज्योतिरावांनी सतीप्रथेला कडाडून विरोध केला आणि त्यांनी विधवा आणि वंचित मुलांसाठी घर सुरू केले.

ज्योतिरावांना लिहिलेल्या पत्रात, सावित्रीमाईंनी मध्यस्थी केल्यावर खालच्या जातीतील एका महिलेशी संबंध ठेवल्याबद्दल एका मुलाची त्याच्या गावकऱ्यांनी मारहाण केल्याची कथा सांगितली. त्यांनी लिहिले, "मला त्यांच्या हत्येच्या योजनेबद्दल कळले. मी घटनास्थळी धाव घेतली आणि त्यांना भिती दाखवली आणि ब्रिटीश कायद्यानुसार प्रेमींना मारण्याचे गंभीर परिणाम दाखवून दिले. माझे ऐकून त्यांनी त्यांचे मत बदलले."

सावित्रीमाईंची प्रकाशित पुस्तके :-

काव्यफुले (काव्यसंग्रह), सावित्रीबाईंची गाणी (१८९१), सुबोध रत्नाकर बावनकशी, जोतिबांची भाषणे (संपादक सावित्रीबाई फुले १८५६), असावा.

सावित्रीमाई फुले यांचा वारसा फार मोठा आहे. त्यांनी स्त्री शिक्षणासाठी केलेले कार्य अत्यंत आदरणीय मानले जाते.

डॉ. बी. आर. आंबेडकर आणि अण्णाभाऊ साठे यांच्या सोबतच फुले या मागासवर्गीयांसाठी एक आयकॉन बनल्या आहेत. मानवी हक्क अभियान (मानवी हक्क अभियान, एक मांग-आंबेडकरी संस्था) च्या स्थानिक शाखांमधील महिला त्यांच्या जयंतीला (मराठी आणि इतर भारतीय भाषांमध्ये वाढदिवस) अनेक मिरवणुका काढतात.

पुणे महानगरपालिकेने १९८३ मध्ये त्यांचे स्मारक तयार केले.

१० मार्च १९९८ रोजी फुले यांच्या सन्मानार्थ भारतीय टपाल विभागाने टपाल तिकीट प्रसिद्ध केले.

३ जानेवारी हा सावित्रीमाईंचा जन्मदिवस बालिका दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी संपूर्ण महाराष्ट्रात विशेषतः मुलींच्या शाळांमध्ये अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

२०१५ मध्ये, पुणे विद्यापीठाचे नामकरण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असे करण्यात आले.

३ जानेवारी २०१७ रोजी, सर्च इंजिन गूगलने ने गूगल डूडलद्वारे सावित्रीमाई फुले यांच्या १८६ व्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली वाहिली.

सन्मान :–

१९९८ चे टपाल तिकीट

पुणे येथील हे शिक्षण कार्य पाहून १८५२ मध्ये ईस्ट इंडिया कंपनी सरकारने फुले पतिपत्नींचा मेजर कॅन्डी यांच्या हस्ते जाहीर सत्कार केला आणि शाळांना सरकारी अनुदानही देऊ केले. त्यानंतरही सावित्रीमाई फुल्यांनी, भारतातल्या त्या पहिल्या शिक्षिकेने आपले शिक्षण देण्याचे व्रत चालूच ठेवले. त्यांनी 'गृहिणी' नावाच्या मासिकात काही लेखही लिहिले आहेत. सावित्रीमाईंच्या सामजिक कार्याबद्दल कृतज्ञता म्हणून १९९५ पासुन ३ जानेवारी हा सावित्रीमाईंचा जन्मदिन हा "बालिकादिन" म्हणून साजरा केला जातो.

महात्मा फुलेंनी उघडलेल्या १८ अठरा शाळा पुढीलप्रमाणे :–

१. भिडेवाडा पुणे १ जानेवारी १८४८, २. महारवाडा पुणे १५ मे १८४८, ३. हडपसर पुणे १ सप्टेंबर १८४८, ४. ओतूर जि. पुणे ५ डिसेंबर १८४८, ५. सासवड जि. पुणे २० डिसेंबर १८४८, ६. अल्हाटांचेघर पुणे १ जुलै १८४९, ७. नायगाव ता. खंडाळा सातारा १५ जुलै १८४९, ८. शिरवळ ता. खंडाळा सातारा १८ जुलै १८४९, ९. तळेगाव ढमढेरे जि. पुणे १ सप्टेंबर १८४९, १०. शिरूर जि. पुणे ८ सप्टेंबर १८४९, ११. अंजिरवाडी माजगाव ३ मार्च १८५०, १२. करंजे जि. सातारा ६ मार्च १८५०, १३. भिंगार १९ मार्च १८५०, १४. मुंढवे जि. पुणे १ डिसेंबर १८५०, १५. अण्णासाहेबांचा वाडा पुणे ३ जुलै १८५१, १६. नाना पेठ पुणे १७ सप्टेंबर १८५१, १७. रास्ता पेठ पुणे १७ सप्टेंबर १८५१, १८. वेताळपेठ पुणे १५ मार्च १८५२.

१९३ व्या जयंतीला (बालिका/शिक्षिका दिवस) स्मरण ज्ञानज्योतीचे!!

....

जन्म: ३ जानेवारी, इ.स. १८३१ नायगाव, सातारा, महाराष्ट्र; मृत्यू: मार्च १०, इ.स. १८९७ पुणे, महाराष्ट्र

चळवळ: मुलींची पहिली शाळा सुरू करणे.

ज्ञानबंदीच्या साखळदंडांनी जेरबंद झालेल्या महिलांना ज्ञानसंवर्धनाची आशादायी पहाट प्रदान करणाऱ्या ज्ञानज्योती सावित्रीआई फुले यांची आज १९२ वी जयंती. या देशातील समस्त महिलांना शिक्षणाचा तिसरा डोळा प्रदान करणारी ही ज्ञानमाता अर्थात विद्येची खरी स्फूर्तीनायिका. धर्माच्या नावाखाली समस्त भारतीय स्त्रियांचे भावविश्व नाकारणाऱ्या व्यवस्थेविरुद्धचा बुलंद आवाज म्हणजे सावित्रीआई. सावित्रीआईने ज्ञानाची उपासना केली नसती तर आज महिलांची अवस्था कशी असती या कल्पनेनेच अंगावर शहारे येतात. मनुचा कायदा स्त्रियांच्या प्रगतीच्या साऱ्याच वाटा नाकारतो, तिला मानसिक गुलामगिरीत ठेवतो. स्त्री हे सृजन नसून ती केवळ उपभोग्य वस्तू आहे असं सांगणाऱ्या व्यवस्थेला धर्माची कवच-कुंडल लाभली होती. स्त्रियांच्या वाट्याला येणार दैन्य, दारिद्र्य, गुलामी पाहून कुणाच्याही काळजाला पाझर फुटला नाही. ही शोषण वादी व्यवस्था उलथून पाडण्यासाठी या देशाला सावित्रीआई फुले यांच्या जन्माची वाट पाहावी लागली. शिक्षणा मध्येच मानवी विकासाचे सूत्र दडले आहे हे ओळखलेल्या सावित्रीआईंनी या देशातील महिलांना ज्ञानाचे नवे आकाश आणि भरारी घेण्यासाठी मजबूत पंख दिलेत. ज्योतिरावांनी पेटविलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या ज्योतीची ज्वाला झाली सावित्री.

सावित्रीआई फुले आद्य शिक्षिका आहेत. या देशातील महिला शिकाव्यात म्हणून त्यांनी अंगावर दगड झेलली म्हणूनच आजच्या मुली स्कूटरवर बसून कॉलेजमध्ये जात आहेत. मात्र शिकून सवरून नोकरीवर लागलेल्या महिलांना त्यातही बहुतांश शिक्षिकांना या माऊलीच्या संघर्षाचा विसर पडलाय. सावित्रीच्या संघर्षामुळेच आपल्या जीवनामध्ये एक नवी पहाट उगवली याचं भान सुद्धा उच्चशिक्षित महिलांना असल्याचे दिसून येत नाही. "उच्च शिक्षित महिलांना सत्यवानाची सावित्री आपला आदर्श वाटतो." शाळेमध्ये शिकविणाऱ्या शिक्षिका विद्येच्या या महानायीकेच्या कार्यापासून मानसिक दृष्ट्या कोसोदूर आहेत. कृतघ्नतेची ही परिसीमा आहे. ज्या समाजाला त्याची प्रेरणा स्थाने माहीत नसतात तो समाज कायम मानसिक गुलामगिरीत असतो. तो समाज कायम चाचपडत असतो अंधारवाटेवरती. सावित्रीआई फुले यांनी दिलेल्या प्रकाश वाटेवरून चालणे हीच या काळाची गरज आहे.

सावित्रीबाई फुले यांचा संघर्ष डोळ्यासमोर आणला की ती माऊली काय ताकदीची होती याचा अंदाज येतो. ज्या व्यवस्थेशी लढायचे आहे ती व्यवस्था अत्यंत क्रूरपणे वागत होती. समाज, नातेवाईक कुणीही त्यांच्या पाठीशी नसताना त्यांनी ज्योतिराव फुले यांच्या खांद्याला खांदा लावून व्यवस्था परिवर्तनाची लढाई आयुष्याच्या अंतिम श्वासापर्यंत लढली. ही लढाई लढत असताना आलेली प्रत्येक वादळे त्यांनी यशस्वीपणे परतवून लावलीत. त्यांनी सुरू केलेले कार्य म्हणजे इथल्या प्रस्थापित यंत्रणेला भूकंपाचे धक्के होते. शिक्षणाशिवाय परिवर्तनाची चळवळ पुढे जाऊच शकत नाही हे सूत्र ज्योतिरावांनी सावित्रीच्या मनात पेरले होते. पशुत्वाकडून मनुष्यत्वाकडे नेणारी शिक्षण व्यवस्था निर्माण व्हावी हा ध्यास त्यांना स्वस्थ बसू देत नव्हता. खरंतर या अस्वस्थतेतूनच महाराष्ट्रात स्त्रीशिक्षणाच्या चळवळीचा जन्म झाला. सावित्रीआई फुले त्याच्या जनक झाल्यात. ज्या दिवशी सावित्रीआई फुले यांनी हातात खडू (लेखणी) घेऊन शाळा गाठली त्याच दिवशी इथल्या धर्मवादी व्यवस्थेला हादरे बसायला सुरुवात झाली. स्त्री जर शिकली तर ती विधवा होते, धर्म बुडतो, अक्षरांच्या अळ्या होऊन ताटात पडतात या कुरूप विचारधारेला सावित्रीआईंनी डागण्या देण्यास सुरुवात केली. जोतीरावांच्या मदतीने शेतातील मातीवर त्यांनी अक्षर गिरवली. ही साधीसुधी अक्षरं नव्हती तर मनूच्या कपटी यंत्रणेच्या मृत्यूचा हा जाहीरनामा होता. काळ्याआईच्या हृदयावर अक्षर कोरणारी सावित्री ही

महाराष्ट्रातील पहिली प्रशिक्षित शिक्षिका झाली.

स्त्री शिक्षणाचे काम त्यांनी हाती घेतल्याबरोबर धर्ममार्तंडांनी त्यांना प्रचंड विरोध केला. इतकच नव्हे तर सख्या भावाने सुद्धा हे काम सोडून देण्याची तंबी त्यांना दिली. मात्र त्यांनी भावाच्या धमकीला न जुमानता जे उत्तर पत्रातून भावाला दिलं त्यातून त्यांचा दृढनिश्चय स्पष्ट होतो. १ जानेवारी १८४८ रोजी पुणे येथील बुधवार पेठेत मुलींची पहिली शाळा काढून या दाम्पत्याने प्रथम स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. सन १८४४ ते १८५२ या चार वर्षात फुले दांपत्यांनी १८ शाळा काढून ज्ञान वंचितांच्या पदरात ज्ञान फुले टाकलीत. अन्नपूर्णा जोशी, सुमती मोकाशी, माधवी थत्ते, दुर्गा देशमुख, सोनू पवार, जनी कर्डिले या मुली सावित्रीआईच्या शाळेत क्रांतीची अक्षरं गिरवू लागल्यात. विशेष म्हणजे यातील चार मुली ब्राह्मण जातीतील आहे. फुले दाम्पत्यावर ब्राह्मण द्वेषाचा ठपका ठेवनाऱ्यानी ही बाब लक्षात घेणे गरजेचे आहे. समस्त स्त्रियांना ज्ञानाची वाट दाखवणाऱ्या सावित्रीआई फुले यांना अनेक जीवघेण्या आणि माणूसघाण्या प्रकाराचा सामना करावा लागला. मात्र प्रत्येक संकटांचा त्यांनी समर्थपणे सामना केल्यामुळेच स्त्रीमुक्तीची पहाट उगवली. ज्योतीरावांच्या सामाजिक आंदोलनात सावित्रीआईंचा सक्रिय सहभाग होता. समाजपरिवर्तनाच्या रथाची ही दोन चाके होती.

पेशवाईचा काळ हा सामाजिक अन्याय आणि अत्याचार यांनी भरलेला काळ होता. माणसापेक्षा धर्म आणि जाती श्रेष्ठ ठरत होत्या. स्त्री ही शोषणाचे आणि अत्याचाराचे माध्यम ठरले होते. पतीच्या निधनानंतर बालविधवांवर पेशवाईत अमानुष अत्याचार व्हायचे. अनेक वासनांधांच्या शिकार ठरत या विधवा. ब्राह्मण समाजातील काशीबाई नावाच्या विधवेच्या जीवनातील त्या प्रसंगाने तर जोतिरावांच्या काळजाचा ठोका चुकविला. जीव द्यायला निघालेल्या काशीबाईंचे पालकत्व ज्योतिरावांनी स्वीकारले. एवढेच नव्हे तर तिच्या पोटी जन्माला आलेल्या मुलाला दत्तक घेऊन त्याला डॉक्टर केले. डॉक्टर यशवंत हे त्यांचे नाव. बालविधवाना आपलं निरागस आयुष्य जगता यावे म्हणून फुले दांपत्यांनी बालहत्या प्रतिबंधक गृह तथा प्रसूती गृहाची स्थापना करून एका नव्या क्रांतीकारी चळवळीला जन्म दिला. यावरच ते थांबले नाहीत तर ८ मार्च १८६४ ला विधवा विधुर यांचा पुनर्विवाह लावून मनूच्या व्यवस्थेला आग लावली. देशाच्या सामाजिक इतिहासातील हा क्रांतीक्षण आहे. माणुसकीची विटंबना करणाऱ्या केशवपन सारख्या प्रथेच्या निर्मूलनार्थ फुले दांपत्यांनी पुण्यामध्ये न्हाव्यांचा संप घडवून आणला. आमची रोजीरोटी गेली तरी चालेल पण आमच्या माय बहिणीच्या डोक्यावरून वस्तरा फिरवणार नाही हा न्हावी बांधवांचा निर्णय मानवतेच्या प्रतिष्ठापनेतील महत्त्वाचे पाऊल आहे.

सावित्रीआई फुले यांच्या मनात जाती व्यवस्थेविरुद्ध प्रचंड चीड होती. या जाती व्यवस्थेचे चटके ही त्यांना बसले होते. मात्र इंग्रजी राजवटीमुळे जाती काही प्रमाणात गळून पडत होत्या. आपला अस्पृश्य बांधवांसाठी पाण्याचा हौद खुला करून त्यांनी जातीय विषमतेविरुद्ध बंड केले होते. महिला सेवा मंडळाच्या माध्यमातून १४ जानेवारी १८५२ रोजी सर्व जाती धर्मातील स्त्रियांसाठी सार्वजनिक तिळगुळ व स्नेहसंमेलनाचे आयोजन करून सावित्रीआई फुले यांनी जातीव्यवस्थेला जबर धक्का दिला. १८७६ च्या दुष्काळात माणसं मृत्यूच्या कराल दाढेत सापडली असताना त्यांच्यासाठी त्यांनी जीवाचा आटापिटा केला. ५२ ठिकाणी अन्नछत्रे उघडून मानवी संवेदनेचा परिचय दिला. प्लेगच्या साथीत माणसं वाचवण्याच्या धडपडीत सावित्रीआईना आपला जीव गमवावा लागला. अखेरच्या क्षणापर्यंतची ही धडपड म्हणजे या देशाचा सोनेरी इतिहास आहे.

सावित्रीआई फुले संवेदनशील मनाच्या कवयित्री होत्या. परिवर्तनाची चळवळ गतिमान व्हावी म्हणून त्यांनी प्रभावी काव्यलेखन केले. आधुनिक मराठी कवितेला एक वेगळा आयाम देणाऱ्या त्यांच्या कविता आहेत. "काव्यफुले" आणि "बावन्नकशी सुबोध रत्नाकर" या काव्यसंग्रहातून त्यांचे हळवे आणि तितकेच कठोर कविमन पुढे येते.

दूर फेकूनी रुढी द्या रे, परंपरेची मोडूनी दारे !

हा परिवर्तनाचा संदेश त्यांनी आपल्या काव्यामधून दिला आहे. जोतीरावांच्या सडेतोड लिखाणाची किनार सावित्रीआईंच्या प्रतिभेला लाभली होती. जोतीरावांच्या निधनानंतर सत्यशोधक समाजाची धुरा त्यांनी समर्थपणे आपल्या खांद्यावर पेलली. सत्यशोधक समाजाच्या सासवड येथील अधिवेशनात त्यांनी जे विचार मांडले त्या विचाराने परिवर्तनाचे एक नवे वादळ या महाराष्ट्रामध्ये निर्माण झाले. सावित्रीआई खऱ्या अर्थाने सत्यशोधक होत्यात. ज्योतीरावांच्या कलेवरास अग्नी देऊन त्यांनी आपल्यातील सत्यशोधक जिवंत असल्याची साक्ष या महाराष्ट्राला दिली. महाराष्ट्राच्या इतिहासातील या क्रांतिकारी घटनेची नोंद साऱ्या देशाने घेतली. दीन, हतबल, बहुजन समाजाला अज्ञानाच्या गर्तेतून बाहेर काढणाऱ्या सावित्रीआई फुले यांचे स्वप्न साकार करण्याची जबाबदारी आजच्या शिकलेल्या व खास करून शिक्षकी पेशातील महिलांवर आहे. शिक्षिकांनी आता विद्येची देवता म्हणून कुणा पुढे नतमस्तक व्हावे एवढे जरी भान सावित्रीआई फुले यांचे स्मरण करताना आलं तरी समाजातील चित्र बदललेले दिसेल.

स्त्रीयांच्या शिक्षणासाठी व उध्दारासाठी सावित्रीआईंनी केलेले कार्य लाखमोलाचे आहे. हे त्यांचे ऋुण फेडणे कठीण आहे. पण सावित्रीआईंच्या या कार्याची आजच्या स्त्रीयांना जाणीव किती? सावित्रीआईंच्या कार्याची व त्यांच्या उपकाराची जाणीव आज जर सर्व वर्गातील स्त्रीयांना असती तर, आज एखाद्या देवीचा जन्मोत्सव जसा गल्लोगल्ली साजरा केला जातो तसा सावित्रीआईंच्या जन्माचा उत्सव समस्त स्त्री वर्गाकडून साजरा केला गेला असता. ही खुप मोठी शोकांतिका आहे.

याचे कारण म्हणजे, आपल्याकडे समाजसुधारकांना येथील प्रस्थापित समाजव्यवस्थेने जातीच्या व धर्माच्या कक्षेत बंदिस्त केले आहे. असो.... सावित्रीआईंच्या महान कार्याचे उपकार व उत्तरदायित्त्व समजून घेऊन एक ना एक दिवस सावित्रीआईंची जयंती समस्त स्त्री वर्ग मोठ्या प्रमाणावर उत्साहाने साजरी करेल हाच आशावाद.

भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका, स्त्रीयांच्या उध्दारकर्त्या क्रांतीज्योती सावित्रीआई फुले यांच्या १९२ व्या जयंती दिनी त्यांच्या महान कार्याला व विचारांना शतशा नमन!!

सर्व भारतीयांना क्रांतीज्योती सावित्रीआई फुले यांच्या जयंतीच्या मंगलमय शुभेच्छा!!💐

💎 सावित्रीआई फुले यांचे शैक्षणिक कार्य 💎

३ जानेवारी हा सावित्रीआईंचा जन्मदिवस संपूर्ण महाराष्ट्रात बालिका दिन व महिला मुक्तीदिन म्हणून साजरा केला जातो. सावित्रीआई फुले यांच्या १९२ व्या जन्मदिनानिमित्त...

१. मुलींसाठी पहिली शाळा :–

सावित्रीआई फुले यांचे पती महात्मा ज्योतिबा फुले एक थोर समाज सुधारक होते. महात्मा फुले यांनी समाज सुधारण्यासाठी अनेक सामाजिक कार्य केली ही सामाजिक कार्य करत असताना मुलींना देखील शिक्षण मिळाले पाहिजे. परंतु हे कार्य पुढे नेण्यासाठी त्यांना एका महिलेची गरज होती म्हणूनच महात्मा फुले यांनी सर्वप्रथम सावित्रिआई फुले

यांना आपल्या घरामध्ये शिक्षण दिले. त्यानंतर सावित्रीआई फुले यांनी पुणे या ठिकाणी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली.

२. भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका :–

महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी योगदान दिले आणि समाजाचा प्रचंड करून सावित्रीआई फुले यांनी मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली. एक प्रकारे भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका म्हणून सावित्रीआई फुले यांचे योगदान खरोखरच खूप उल्लेखनीय आहे.

३. पहिल्या महिला मुख्याध्यापिका :–

सावित्रीआई फुले या भारतातील पहिल्या महिला स्त्री शिक्षिका म्हणून जशा ओळखल्या जातात. अगदी त्याच पद्धतीने पहिल्या महिला मुख्याध्यापिका म्हणून देखील त्यांना ओळखले जाते.

४. भारतातील पहिल्या महिला स्त्री शिक्षण तज्ञ :–

शाळेमध्ये अभ्यासक्रम सुनियोजित रित्या शिकवला गेला पाहिजे तर तो विद्यार्थ्यांपर्यंत अतिशय चांगल्या पद्धतीने पोहोचतो असा विचार सावित्रीआई फुले यांनी मांडला या त्यांच्या विचारावरून भारतामधल्या पहिल्या महिला स्त्री शिक्षण तज्ञ याचा मान देखील सावित्रीआई फुले यांनाच द्यावा लागतो.

५. आनंददायी शिक्षणाची सुरुवात :–

सावित्रीआई फुले यांनी मुलींना अध्यापण करत असतांना वर्गातील वातावरणाने नेहमी आनंददाई असले पाहिजे. ज्या काळामधे आनंददाई शिक्षण ही संकल्पना स्वीकारली गेली आहे. परंतु सावित्रीआई फुले यांनी आपल्या शिक्षण प्रक्रियेमध्ये आनंददाई शिक्षणाला अग्रक्रम दिला आहे.

६. गणवेश वाटपाची सोय करणाऱ्या पहिल्या शिक्षिका :–

विद्यार्थ्यांचा गणवेश एकसारखा असला पाहिजे अशी भूमिका मांडून एकसारखा गणवेश विद्यार्थ्यांना असावा म्हणून शाळेमधेच गणवेशाचे वाटप करणाऱ्या पहिल्या शिक्षिका म्हणून सावित्रीआई फुले यांना ओळखले जाते. ईकडे शासनाने मोफत गणवेश वाटप योजना सुरु केली आहे. या योजनेचे मूळ आपल्याला सावित्रीआई फुले यांच्या गणवेश वाटपाच्या योजनेमधे सापडतो. यावरूनच सावित्रीआई फुले यांचा दूरदृष्टीपणा आपल्याला दिसून येतो.

७. सहशिक्षणाच्या पुरस्कर्त्या :–

सावित्रीआई फुले यांनी मुलींसाठी शाळा सुरु करीत असतांना पुण्यामधे मुले आणि मुली यांची एकत्र शाळादेखील सुरु करण्याचा प्रयोग केला होता परंतु त्याला पुरोगामी विचारांच्या काही लोकांनी विरोध केला. म्हणून मुला मुलींसाठी स्वतंत्र शाळा सुरु करण्यात आल्या. परंतु त्यांनी जी सुरुवात केली होती यावरून सहशिक्षणाच्या सावित्रीआई या पुरस्कार करित होत्या जे आपल्याला विसरून चालणार नाही.

८. गोरगरीबांसाठी नेटिव्ह वाचनालयाची स्थापना :–

सावित्रीआई फुले यांनी गोरगरीब विद्यार्थ्यांचा जर आपल्याला खऱ्या अर्थाने विकास करावयाचा असेल तर त्यांना शिक्षणाबरोबर शिक्षणासाठी लागणारे सर्व साहित्य मिळाले पाहिजे म्हणून अशा नेटिव्ह वाचनालयाची त्यांनी स्थापना केली.

९. मुलींच्या उपस्थितीसाठी शैक्षणिक भत्ता :–

पूर्वीच्या काळामध्ये महिलांना शिक्षण दिले जात नव्हते. महात्मा फुले आणि सावित्रीआई फुले यांनी महिलांसाठी शाळा सुरु केल्या, परंतु या मुलींना दररोज शाळेत येण्यासाठी भत्ता सुरु करण्याचे काम सावित्रीआई फुले यांनी केले सहाजिकच मुलींचे आई-वडील मुलींना भत्ता मिळतो म्हटल्यावर शाळेमधे पाठवू लागले.

१०. शेतकरी आणि मजूर वर्गाच्या मुलांसाठी रात्रशाळा :–

जी मुले किंवा मुली दिवसभर शेतामधे मोलमजुरी करतात. त्या मुलांना किंवा मुलींना शाळेमधे दिवसा उपस्थित राहणे शक्य नसते अशा मुलांसाठी रात्रशाळेचा प्रयोग सावित्रीआई फुले यांनी केला.

११. प्राथमिक शाळेपासूनच इंग्रजी विषय अध्यापण :–

सावित्रीआई फुले यांच्यामते मुलांना मातृभाषेतून शिक्षण मिळाले पाहिजे. परंतु त्याच्या जोडीला जर विद्यार्थ्यांना इंग्रजीवरती प्रभुत्व मिळवायचे असेल तर प्राथमिक स्थरापासूनच त्यांना इंग्रजी विषय शिकविला गेला पाहिजे अशी भूमिका मांडली. मधल्या काळामध्ये विद्यार्थ्यांना इयत्ता पाचवीपासून इंग्रजी विषय शिकविला जात होता. सावित्रीआई फुले यांनी त्याकाळी मांडलेला विचार हा शासनाला लागू करावा लागत आहे, कारण कोणती भाषा शिकत असतांना ती लहान वयामधेच विद्यार्थी अतिशय चांगल्या पद्धतीने ग्रास्पिंग करू शकतात म्हणूनच आता इंग्रजी विषयांचे महत्व वाढलेले आहे.

अशी कितीतरी शैक्षणिक कार्ये सावित्रीआई फुले यांनी केली. सावित्रीआई फुले यांना ही कार्ये पुढे घेऊन जात असतांना त्यांचे पति थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांनी अतिशय मोलाचे सहकार्ये केले.

जय ज्योती !! जय सावित्री !!

आपला धम्मबंधू :- आयु. राज जाधव.

पंख कवी : शिलचंद्र

उद्धरला 'बाई' जन्म,	'ज्योत' शिक्षणाची झाली...	ज्योतीरावाची संगिनी,	सोडला ना 'वसा' तरी
'माय' जन्माला गे आली...	सत्यवानाची सावित्री,	सखे 'पंख' तुझे झाली...	आज 'सावित्रीच्या लेकी',
वसा 'ज्ञानाचा' घेतला,	जशी पायातली 'बेडी',	मारा शेणाचा सोसला,	घेई आकाशी भरारी...

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ४ जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, गुरूवार, मग्गसिरो मासो, गुरूवारो, मार्गसिश माहे.

४ जानेवारी, रोजी जागतिक दृष्टिदान दिन.

४ जानेवारी १९२५, रोजी बहिष्कृत हितकारिणी सभेच्या विद्यमाने विश्वरत्न बोधिसत्त्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सोलापूर येथे अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी पाहिले मोफत वस्तिगृह सुरू केले.

४ जानेवारी १९३१, रोजी विश्वरत्न बोधिसत्त्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गोलमेज परिषदेला विशेष "दलित वर्गाच्या दाव्यांवरील प्रतिनिधित्व" साठी पूरक निवेदन सादर केले.

४ जानेवारी १९३८, रोजी सोलापूर नगरपालिकेतर्फे विश्वरत्न बोधिसत्त्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मानपत्र प्रदान.

४ जानेवारी १९४६, रोजी क्रांतिवीर रामचंद्र कांबळे स्मृतिदिन

४ जानेवारी १९५४, रोजी क्रांतिवीर महात्मा ज्योतिबा फुले यांच्यावरील बोलपटाच्या मुहूर्ताप्रसंगी विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ५ जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, शुक्रवार, मग्गसिरो मासो, सुक्कवारो, मार्गसिश माहे.

५ जानेवारी १९०५, रोजी डॉ. आनंद कौसल्यायन जयंती.

५ जानेवारी १९१८, रोजी राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्य व मागासवर्गीयांना स्वतंत्र मतदार संघ देण्याबाबत भारताचे व्हाइसरॉय आणि गव्हर्नर जनरल चेम्सफर्ड यांच्याशी भेट घेतली.

५ जानेवारी १९३१, रोजी गोलमेज परिषदेचे प्रतिनिधी मौलाना मोहोम्मंद अली जोहर यांचे लंडनमधे निधन झाले तेव्हा पेंटोगोन हॉलमध्ये विश्वरत्न बोधिसत्त्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांचे अंत्यदर्शन घेऊन श्रद्धांजली वाहिली.

५ जानेवारी १९५२, रोजी स्वतंत्र भारतातील पहिल्या निवडणुकीमधे विश्वरत्न बोधिसत्त्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर पराभूत झाले व काँगेसचे काजोळकर निवडूण आले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

🦚🦚🦚*☸🎉🎉पूज्य भदंत डॉ. आनंद कौसल्यायन यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन 🙌🙌🙌*☸

जन्म :– ५ जानेवारी १९०५. मृत्यू :– २२ जुन १९८८.

🌸🏵*५ जानेवारी हा स्वातंत्र्य संग्राम सेनानी, राष्ट्रभाषा प्रचार समितीचे प्रथम प्रमुख, प्रसिद्ध हिंदी लेखक आणि साहित्यिक, पालीचे प्रकांड पंडित अ. भा. भिक्खू संघाचे उद्गाते, बौद्ध प्रशिक्षण संस्थानचे शिल्पकार पू. भदंत आनंद कौसल्यायन यांच्या जयंती निमित्ताने विशेष लेख*...

*आभाळाच्या उंचीचं व्यक्तिमत्त्व, आधुनिक अग्रणी धम्मगुरु म्हणून आधुनिक भिक्खुंच्या गौरवगाथेच्या इतिहासाची सुवर्णपाने चाळतांना पू. भदंत आनंद कौसल्यायन यांचे नाव आपसूकच येते. ते पालीचे एक चतुरस्त्र साहित्यिक व बहुप्रसव लेखक म्हणून विश्व प्रसिद्धीस पावले. त्यांची तेजपूर्णचर्या आणि संयतवाणी जाणून शब्दांनी त्यांच्या ओठावर सतत खेळावे अशी सहजता होती. मला त्यांच्या समग्र साहित्याचा सापेक्षाने अभ्यास करता आला. पर्यायाने त्यांचे लौकिक जीवनही जवळून न्याहाळता आले. एकदाचा प्रसंग आकाशवाणी केंद्र पुणे येथे त्यांचे भाषण होते. भंतेंनी काहीच हस्तलिखीत लिहून न आणता रेकॉर्डिंग रुममध्ये प्रवेश करून अगदी दिलेल्या वेळेतच ते थांबले. तेव्हा अक्षरश: आकाशवाणी अधिकाऱ्यांना आश्चर्यचकित वाटले. शब्दांच्या विचारांचे धनीच नव्हे तर ते कोणत्याही विषयांवर तासनतास आपले मत मुक्तपणे मांडत. डॉ. आंबेडकरांच्या जीवनचर्येविषयी भदंतजी म्हणायचे, 'एका बोधिसत्त्वाची त्यांची चर्या होती. केवळ स्वत:च नाही तर ते मानवीय जाती कल्याणाचे साधन मानतं'. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'दी बुद्धा अँड हिज धम्मा' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथावर भाष्य करतांना भंते म्हणायचे, 'बुद्ध धम्म आणि बौद्ध समाजाच्या दृष्टीने नागपूरची ती दीक्षा झाली. तेवढेच किंबहुना त्यापेक्षा अधिक अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य डॉ. आंबेडकरांच्या ह्या ग्रंथरत्नाच्या रचनेने केले आहे. ग्रंथ लहान–मोठा कोणता तर ते म्हणायचे. कोणताही ग्रंथ पृष्ठसंख्येनी लहान मोठा मानला जाऊ शकत नाही. प्रज्ञाचक्षुच्या यंत्राद्वारे पाहिले वा जनहिताच्या मपदंडाणे जर मोजले तर जो ग्रंथ जेवढा खरा ठरेल, तो तेवढांच लहान किंवा मोठा होत असतो.

बाबासाहेबांनी त्यांना एकदा विचारले, 'भंतेजी, सध्या आपल्यासारखी किती भिक्षु विद्यमान आहेत?' तर भदंतांच्या शब्दात, 'बाबासाहब, भारतीय भिक्खूओंके नाम पर हम सिर्फ ढाई टोटल है.' पं. जवाहरलाल नेहरूंच्या हस्ते १७ मे १९५७ ला श्रीलंकेत बौद्ध पौर्णिमेला समारंभ झाला. भाषणानंतर भंतेजींना मोठ्या उत्सुकतेने विचारले, 'भंते, आपण भिक्खू का झालात...?' तर भदंत म्हणाले, 'मी ईश्वर, आत्मा, परमात्मा आणि स्वर्ग–नरकादींच्या मुकत्तेसाठी भिक्षु झालो.' भंतेजींची वाणी, लेखणी अशी वैशिट्यपूर्ण अशीच होती. आज देखील त्यांची वैश्विक विचारधारा जिवंतपणाची साक्ष देते. ते धम्मविचार गुंफत असत की, व्यक्ती वर्तमानात स्वाभाविकरित्या जगत नाही. तो भूतकाळ आणि भविष्यात सतत विचरण करून निर्जीव असे जीवनयान करतो. खरच त्यांची विचारदृष्टी व्यापक, सार्थक व समर्पकच वाटते. ज्योतिषाविषयी भंते म्हणायचे, 'जो ज्योतिष्य दुसऱ्याचे भविष्य सांगतो परंतु त्याला स्वतःच्या भविष्यासंबंधी निश्चितीची कल्पना, जाणीव व माहिती तसुभरही नसते.' ते स्वभावता म्हणत असत, 'ही केवढी विचित्र गोष्ट आहे की, पाश्चिमात्य लोक बौद्ध धम्माला भारताच्या उगमस्थांनी मानतात आणि ओळखतात. परंतु कित्येक अनभिज्ञ भारतीय अज्ञानी अनुयाई बौद्ध धम्माला श्रीलंका, थायलंड व म्यानमार या देशाचा धम्म समजून त्याविषयीं अभारतीयत्वाचा धम्म असल्याची भावना मनात बाळगतात.' त्यांच्या शब्दात, ग्रंथरचनेचे हवे तसे कौशल्य मुळीच नाहीत. या प्रयत्नामुळे काही मोठा परोपकार सिद्ध होईल, असाही अहंकार मात्र नाही. केवळ मनाला सुसंस्कारित करण्यासाठी अल्प प्रयत्न करतो आहे. एवढा सिद्धहस्त प्रसिद्ध पाली विद्वान, हिंदीचा प्रकांड लेखक, समीक्षक आणि साहित्यिक स्वत:विषयी किंचितही त्यांच्या मनात गर्व, अहंभाव, ना अभिमान इतर तत्सम बाबींचा लवलेश दिसून येत नाही. किती निरागसपणा, त्याग, सेवा, समर्पण आणि निस्पृहता याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे आचार्य भदंत आनंद कौसल्यायन हे होत. इहलोक, परलोक याबद्दल ते मत प्रदर्शित कररायचे की, ज्याचा इहलोक ठिक, त्याचा परलोक छान आणि ज्याचे लोकीही काही स्थैर्य नाही, त्याच्या परलोकीचा काय विश्वास. चित्त आणि प्रज्ञेचा अभ्यास म्हणजे बौद्ध साधनेचा मार्ग आहे. केवळ ध्यानाला प्राप्त होने बौद्ध साधनेचा उद्देश नाही. बौद्ध साधनेचा मुख्य उद्देश चित्ताची अनुपम मुक्ती होय. भारतीय संस्कृतीला बौद्ध धम्माची देण यावर विचार व्यक्त करतांना ते म्हणायचे, 'भारतीय संस्कृतीला बौद्ध धम्माची प्रथम महान देण 'कालामसूत्रात क्षत्रियांना दिलेला अनुत्तर उपदेश' तोच जगाच्या साहित्यात मानवी स्वातंत्र्याचा श्रेष्ठ असा महान जाहीरनामा होय.' मानव मात्रांना एकसमान लेखणे आणि प्रत्येक व्यक्तीला समानतेने वागविणे ही दुसरी देण आहे, आपण दुसऱ्यांना उगीच दोष देऊ नये. त्याविषयीं मर्मग्राही त्यांचे विचार, 'दुसऱ्यांना दोष देणे हे अकुशल कर्म आहे. अश्या गुन्ह्याला पद्धतशीरपणे लपविण्याचे सर्वोत्तम साधन व माध्यम आहे. सध्यास्थितीत आधुनिक समाजाकडे द्रिष्टीक्षेप टाकला तर गुन्ह्यांना लपविण्यासाठी दुसऱ्यांना दोष देत रजरोष सुटत असतात.' आपल्या आई–वडिलांबाबत ते म्हणत की, माझे आई-बाबा दरिद्री नव्हते. त्याच्याकडे संतोष या धनाची संपदा होती.' कुणीतरी त्यांना विचारले, तुम्ही बनियागिरी करीत असता म्हणजे, कार्यक्रम संपला की, आपण ग्रंथ विकता. तेव्हा भंतेजी उत्तर द्यायचे, बघा, मी काय वाईट काम करतो, जे बोलतो ते लिहितो. पुस्तक प्रकाशनार्थ पैसे लागतात, मी पैस्यासाठी काही कुणाचा गुलाम नाही. कुणावर विसंबून नाही. अगदी खरच पुस्तक प्रसिद्ध करायच म्हटले तर एक प्रकारे तारेवरची कसरतच आहे. त्यासाठी रुपयांची गरज भासते. भदंतजींनी बाबासाहेब यांचे रचित 'दी बुद्धा अँड हिज धम्मा' या ग्रंथाला ६९२ संदर्भ देऊन अनुवाद केला. पी. इ. सोसायटीचे अध्यक्ष न्यायमूर्ती आर. आर. भोळेनां म्हणाले, साहेब मी हिंदीत अनुवाद केलेला ग्रंथ प्रकाशित करावा. तर भोळे म्हणाले या अनुवादाला आधी चाळाव लागेल. भंते मनातल्या मनात पुटपुटले, 'बाबासाहेबांचा अमूल्य ग्रंथ आणि आनंद कौसल्यायन ज्याचा अनुवादक येथे आहे, त्याला तिसरा कोण बघू शकतो?' भंतेजींनी १९२८ ते १९८८ या प्रदीर्घ काळखंडात शेकडो असी मौलीक ग्रंथसंपदा निर्माण केली आहे. भगवान बुद्धांच्या शिकवणुकीचा आरंभबिंदू सांगतांना ते भावोद्गार काढत. बुद्धवाणीचा प्रारंभ, मानसिक दास्यतेच्या बंधनातून मुक्ती. आत्मा यावर ते सांगत, मनुष्यांनी निरंतर जिवंत असण्याची उगीचच आशा धरून लहानसहान सत्यतेची कल्पना केलेली आहे. त्याला ते आपल्या अज्ञानतेमुळे समजतो की, सतत आपल्यात विद्यमान असते, त्या काल्पनिक सत्तेचे नाव 'आत्मा' आहे. मी बौद्ध प्रशिक्षण संस्थान, बुद्धाभूमी महाविहाराच्या सानिध्यात महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना ते धम्मचर्येमध्ये सांगत की, बघा, या जगात कोणत्या दोन व्यक्ती महाण होतात. जो दुसऱ्यासाठी लिहित असतो आणि त्यांचेसाठी दुसरे लिहित असतात. दीक्षाभूमीला ते आधुनिक सरनाथ मानीत.* *श्रीलंकेचा बोधिवृक्ष

स्वतः आणून बौद्ध पर्णिमेनिमित्त १३ मे १९६८ रोजी त्यांनी दीक्षाभूमीवर रोपण केले. 'यदी बाबा न होते' ही प्रथम आवृत्ती १९६९ ला प्रकाशित झाली. ऐकता सीताबर्डीच्या धनवटे रंगमंदिरात सुगंधा शेंडेच्या उपस्थितीत 'धम्मदीप' या नियतकालिकाचा प्रकाशन सोहळ्याप्रसंगी ते म्हणाले, 'जर साहित्य आहे तर दलित कसे? जर दलित आहे तर साहित्य कसे?' त्यांची पुतणी शिक्षिका इंदिरा वर्मा हिने एकदा सहज भिक्षुणी होण्याचा मनोदय व्यक्त केला. तेव्हा भदंत म्हणाले, शरीराने योगी होऊन काय करशील? मनाने योगी बना. खरच बघा, किती मोजून मापून शब्दांची किमया त्यांच्यात होती. जागतिक बौद्धांचा पवित्र धम्म ग्रंथ त्रिपिटकाविषयीं ते उद्गारायचे समग्र त्रिपिटकात संसाराचे वर्णन आहेत. जीवन विमुक्तीच्या दृष्टीने आणि सर्व व्यावहारीक सामान्य व्यक्तीच्या दृष्टीने संसारात फुलेच नाहीत तर काटेदेखील आहेत. सुख दु:ख देखील आहेत. परंतु अरहंतांच्या दृष्टिकोनातून हा संसाररुपी भवसागर असंख्य दु:खांनी व्यापला आहे. ऐकदा भंतेंना उद्योगपती बिर्ला, मंदिरमार्ग दिल्लीमध्ये म्हणाले, स्वामीजी, चिनमध्ये बौद्ध मुसलमान होत आहेत तर त्यांना थोपविण्यासाठी आपण जावे. मी हवी ती पूर्ण व्यवस्था करुन देतो. त्यावर भंतेजी गांभीर्याने म्हणाले, सेठजी जर मी तेथे गेलो तर भारतातील हिंदूंना बौद्ध कोण करील? खरच भदंत डॉ. आनंद कौसल्यायन ऐवढे विचारांचे पक्के होते की, त्यांच्या हयातीत त्यांना पैशाने कुणीच खरेदी करू शकले नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वानानंतर खरंच समाजाची चिंता वाहणारे एकमेव ठरले.

एक खूपच सुंदर परिदृश्य इतिहासातून निघून आपल्याशी वार्तालाप करू इच्छिते. एक वेळ बाबासाहेब डॉ. आंबेडकरांशी भदंत आनंद कौसल्यायन यांनी विचारले, "बनासाहेब तुम्हाला तथागत भगवान बुद्धांची कोणती मुद्रा पसंत आहे?" "मला चालत असतांना बुद्ध पसंत आहे!" बाबासाहेबांनी सांगितले. "पण बाबासाहेब भगवान बुद्धांची असी तर कोणतीही मुद्रा आहेच नाही. भगवान बुद्धांची तर दहाच मुद्रा आहेत. १. धम्मचक्र मुद्रा, २. ध्यान मुद्रा, ३. भूमिस्पर्श मुद्रा, ४. वरद मुद्रा, ५. कर्ण मुद्रा, ६. वज्र मुद्रा, ७. वितर्क मुद्रा, ८. अभय मुद्रा, ९. उत्तरबोधी मुद्रा आणि १०. अंजली मुद्रा." भदंत आनंद कौसल्यायन यांनी आश्चर्य व्यक्त केले.

तेव्हा बाबासाहेबांनी विनयपिटकातील महावग्गातील धम्मचक्कपबत्तनसुत्त याला संबोधित करतांना भदंत आनंद कौसल्यायन यांना सांगितले की, भगवान बुद्धांचा प्रथम उपदेश आहे, "चरथ भिक्खवे चारिकं बहुजन हिताय बहुजन सुखाय लोकाणूकंपाय अत्थाय हिताय सुखाय देव मनुस्सांनं| देसेथ भिक्खवे धम्मं आदिकल्याणं मज्झे कल्याणं परियोसान कल्याणं सात्थं सव्यंजनं केवलं परिपून्नं परिसुद्धं ब्रम्हचरीयं पकासेथ||" अर्थ: भिक्खूंनो, बहुजन हितासाठी, बहुजन सुखासाठी, लोकांना सुख पोहोचवि ण्यासाठी निरंतर भ्रमन करित राहा. आदी, मध्यात आणि अंतात, सर्व अवस्थांत कल्याणमय धम्माचा भाव आणि आचरण प्रकाशीत करीत राहा.

बाबासाहेब आंबेडकर त्यांना बोलले की, ज्या करुणासागर सम्यक संबुद्धांनी मनुष्यांच्या कल्याणासाठी विना थांबून, विना थकूण निरंतर पैदल चालत दु:ख मुक्तीचे संदेश दिले होते, तर मलाही कारुणिक चालत असतांना भगवान बुद्ध पसंत आहेत. हेच कारण आहे की वर्तमान भारतामधे सम्यक संबुद्धांची दहा मुद्रांच्या बरोबरीने चालणाऱ्या बुद्धांची मुद्रापण लोकप्रिय आहे.

बाबासाहेब आंबेडकरांच्याप्रती आपला स्नेह अभिव्यक्त करतांना आपल्या एका वक्तव्यामध्ये भदंत आनंद कौसल्यायन यांनी सांगितले होते की, जगात (विश्वात) सर्वात सुखी जीवन बौद्ध भिक्खूंचे असते. जेव्हा मी मरून जाणार तर माझ्या थडग्यावर लिहा की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा हा चिंवरधारी सेनानी बाबासाहेबांच्या स्वप्नांतील भारत बनविण्याच्या युद्धात लढता लढता शहीद झाला.

कार्यकर्त्यांशी औपचारिक वार्तालाप करतांना ते म्हणायचे, 'धम्मांतरित लोक अजूनही अनेक जाती पोटजातिमध्ये विभागले गेले आहेत. मतभेदामुळे आजही सारा समाज दुभंगला आहे. बौद्ध लोक आनंदित एकसंघ दिसतील तेव्हाच मला कायमचा मनस्वी आनंद वाटेल.' जगातील अनेक देश पादाक्रांत करणाऱ्या त्या महान धम्मगुरूला विदर्भाबद्दल प्रेम वाटले. या ओसाड भूमीवर ते स्थिरावले. अखेरच्या श्वासापर्यंत ते विदर्भातच होते. भंतेजींची वैश्विक विचारधारा आणि तत्वप्रणाली केवळ धम्माशीच बंदिस्त नव्हती. तर धम्म अनुयायांच्या आपुलकीविषयी हुदय, मनाचा ठाव घेणारी अशी वैचारिक जीवनदृष्टी होती. खरच त्या पार्श्वभूमीवर भंतेजींच्या विचारांचे सद्यस्थितीत चिंतन, मनन आणि अभिसरण होने आज काळाची गरज आहे.

२२ जुन १९८८ ला भदंत आनंद कौसल्यायनजी यांचा नागपुरमध्ये परिणीर्वाण झाले. महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा ने त्यांच्या योगदानाला रेखांकित करून आपल्या बौद्ध अध्ययन विभागाचे नाव त्यांच्या नावावर ठेवले आहे.

आज त्यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांना विनम्र अभिवादन.*

💐साभार :– डॉ. भदंत चिंचाल मेत्तानंद, विद्योदय परिवेन महाविहार, जुनी सोमवारपेठ, नागपूर–०९, महाराष्ट्र.

🌐🌐🌐🌐🌐🌐🌐🌐

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ६ जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, शनिवार, मग्गसिरो मासो, सनिवारो, मार्गसिश माहे.

६ जानेवारी १९०४, रोजी स्वातंत्र्यपूर्व भारतातील समाज सुधारक, कामगारांचे नेते आणि "जय भिम" शब्द रूढ करणारे हरदास लक्ष्मणराव नगराळे (बाबू हरदास) यांची जयंती.

६ जानेवारी १९२९, रोजी महार वतन बिलास पाठिंबा देण्यासाठी वतनदार महारांची सभा मुक्काम गोवले येथे भरली.

६ जानेवारी १९३५, रोजी स्वातंत्र्यपूर्व भारतातील समाज सुधारक, कामगारांचे नेते आणि "जय भिम" शब्द रूढ करणारे हरदास लक्ष्मणराव नगराळे (बाबू हरदास) यांनी समता सैनिक दळाला लिहिलेल्या पत्राद्वारे "जय भिम" या अभिवादनास सुरुवात केली.

६ जानेवारी १९३९, रोजी महाड येथे शेतकऱ्यांच्या सभेत विश्वरत्न बोधिसत्त्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण.

६ जानेवारी १९४०, रोजी पेरियार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भेट घेतली. आज सकाळी दहा (१०) वाजता पेरियार आपल्या साथीदारांसह दादर स्टेशनला पोहोचले. संध्याकाळी ते डॉ. आंबेडकरांना भेटले आणि नंतर त्यांना त्यांच्या घरी घेऊन गेले. दोघांनीही सकाळी ९ ते सकाळी १०.३० या कालावधीत विविध सामाजिक आणि राजकीय विषयांवर चर्चा केली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 हरदास लक्ष्मणराव नगराळे उपाख्य बाबू हरदास "जय भीम" चे जनक. 💎🦚🦚🦚☸☸

(जन्म :– ६ जानेवारी १९०४ मृत्यू :– १२ जानेवारी १९३९.)

हे स्वातंत्र्यपूर्व भारतातील एक बहुजनांचे पुढारी, राजकारणी व समाजसुधारक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कट्टर अनुयायी असलेल्या बाबू हरदास यांना "जय भीम" ६ जानेवारी १९३५ या अभिवादानाचे जनक मानले जाते. ते कामगारांचे नेते म्हणूनही प्रसिद्ध होते. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र मजूर पक्षाचे मध्य प्रांताचे सरचिटणीस होते.

जीवन :–

बाबू हरदास यांचा जन्म नागपूरमधील रामटेक (कामठी) येथे ६ जानेवारी, १९०४ रोजी एका महार कुटुंबात झाला. त्यांचे वडील लक्ष्मणराव नगराळे हे रेल्वे खात्यात कारकून होते. बाबू हरदास यांची मॅट्रिकपर्यंतचे (१० वी) शिक्षण नागपूर येथील पटवर्धन विद्यालयात झाले. त्यांनी नागपूर येथे आर्य समाजाच्या स्वामी ब्रह्मानंद यांच्याकडून संस्कृतचाही अभ्यास केला.

त्या काळच्या प्रथांनुसार, वयाच्या सोळाव्या वर्षी, १९२० मध्ये बाबू हरदास यांचा विवाह साहूबाई यांच्याबरोबर झाला. बाबू हरदासांचे आयुष्य त्यांच्या समाजबांधवांमध्ये जागृती करण्याच्या कार्यामुळे बरेच धावपळीत गेले. पुढे सामाजिक चळवळीत ते सक्रिय झाले. बाबासाहेबांचा त्यांच्यावर प्रचंड प्रभाव होता, लांबून शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन त्यांनी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे स्थापन केले, तर मजुरांच्या मुलांना शिक्षण घेता यावे म्हणून रात्र शाळा चालू केल्या.

विदर्भातील दलित आणि आदिवासी समाजातील लोक तेंदू पत्ते गोळा करत, बिडी कारखान्यांमध्ये काम करत तसेच घरोघरी बिडी वळण्याचे काम देखील चालत असे. बिडी कारखानदार आणि कंत्राटदार अशा लोकांची पिळवणूक करत असत. १९२५ साली बाबू हरदास यांनी ते लक्षात घेऊन त्यांच्या न्याय व हक्कासाठी बिडी कामगार संघटना उभी करून त्यांना त्यांचे न्याय व हक्क मिळवून दिले. बिडी मजुरांच्या संघटनेचे काम केवळ विदर्भापुरतेच मर्यादित राहिले नाही. १९३० साली त्यांनी मध्यप्रदेश बिडी मजूर संघाची स्थापना केली.

वयाच्या ३५ व्या वर्षी त्यांना क्षयरोगाने बाधले व त्यातच १२ जानेवारी, १९३९ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

जय भीम या उद्घोषणेचे जनक बाबू हरदास :–

बाबू हरदास हे एक उत्तम कवी व लेखक होते, १९३२ साली त्यांनी 'महारठ्ठा' नावाचे पत्रक काढले. त्याच साली झालेल्या 'डिप्रेस्ड क्लास मिशनचं दुसरं अधिवेशन कामठी येथे झाले त्यात बाबू हरदास यांनी या अधिवेशनाचे स्वागत समितीचे अध्यक्षपद भूषविले, या अधिवेशनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे त्यांनी अतिशय भव्य स्वागत केले.

बाबासाहेबांच्या या भेटीनंतर त्यांच्यावर त्यांचा आणखीन प्रभाव झाला व चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी त्यांचा उत्साह अधिक कैक पटीने वाढला. १९३७ सालच्या विधानसभा निवडणुकीत 'स्वतंत्र मजूर पक्ष' पक्षातर्फे त्यांना उमेदवारी देण्यात आली, समोर धनाढ्य व्यक्ती, पाहिजे तितक्या पैशांचे आमिष, जिवे मारण्याची धमकी मिळून देखील त्यांनी उमेदवारी मागे नाही घेतली व ते म्हणाले "मी आंबेडकरांच्या पक्षातर्फे उभा आहे, आम्ही भीक मागणे केव्हाच सोडून दिले आहे. आता आमच्या हक्काचं आम्ही मिळवून राहू व पुढे काय होईल ते पुढचे पुढे बघू." विरोधकाकडे पैसा आणि ताकद असून देखील बाबू हरदास ही निवडणूक जिंकले आणि सेंट्रल प्रोव्हिन्स–बेरारच्या काउन्सिलवर गेले.

अतिशय कमी वेळात चळवळीसाठी प्रचंड मोठे कार्य करणाऱ्या जय भीम प्रवर्तक बाबू हरदास यांना जयंती दिनी त्रिवार अभिवादन !

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ७ जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, रविवार, मग्गसिरो मासो, आदिच्चवारो, मार्गसिश माहे.

७ जानेवारी १९४६, रोजी रामचंद्र गुड्डू कांबळे स्मृतिदिन.

७ जानेवारी १९३१, गोलमेज परिषद (दुसरी बैठक) – या दिवसी विश्वरत्न बोधिसत्त्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, 'मला वाटते की या ऊपसमितीने एक गोष्ट विचारात घेणे आवश्यक आहे. भारतीयतेच्या या प्रक्रियेने वेतन, पेंशन आणि भारतीयांच्या इतर सुविधांच्या बाबतीत काही फरक नसावा, जसे की नागरी सेवेत युरोपियन लोकांच्या विरोधात आहेत. भविष्यामध्ये मला वाटते हा एक बिंदू आहे ज्यावर उपसमितीने विचार करणे आवश्यक आहे. म्हणून मी या परिच्छेदात जोडत आहे, "कार्य वेतन, पेंशन आणि इतर सुविधांचे भारतीय घटक युरोपियन घटकांशी समतुल्य आहे." '

७ जानेवारी १९५०, रोजी मनमाड येथे इंडियन रेल्वे वर्कर्स युनियनची जंगी जाहीर सभा.

७ जानेवारी १९५२, रोजी वरळी येथील बुद्ध विहारामध्ये बौद्ध मेळावा संपंन्न झाला.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸️☸️🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸️☸️

🌷🔵☸️ *रोजच धम्म प्रसार*☸️🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ८ जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, सोमवार, मग्गसिरो मासो, चंन्दवारो, मार्गसिश माहे.

*८ जानेवारी १८८०, रोजी जागतिक बौद्ध धंम्म ध्वज दिन.

धंम्माच्या प्रचार व प्रसारासाठी संपूर्ण जगातील बौद्धांचे एकच प्रतिक असावे, या विचाराने सन १८८० मध्ये श्रीलंकेचे अनागारिक देवमित्त धंम्मपाल, महस्थविर गुणानंद, सुमंगल, बौद्ध विद्वान जी. आर. डिसिल्वा इत्यादिंनी मिळून निळा, पिवळा, लाल, पांढरा आणि केशरी (नारिंगी) अशा पाच रंगांच्या उभ्या व आडव्या पट्ट्यामध्ये "विश्व बौद्ध धंम्म ध्वज" याची निर्मिती केली आहे. कालांतराने त्याला विश्व मान्यता प्राप्त झाली. याला पाली भाषेत "षडरोशनी ध्वज" तसेच "धंम्म ध्वज" असे म्हणतात.*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

🎉☸️८ जानेवारी हा ‘विश्व बौद्ध धम्म ध्वज दिन’ म्हणून जगभरात साजरा केला जातो.🎉☸️

बौद्ध धम्माचा प्रचार व प्रसारासाठी संपूर्ण जगातील बौद्धांचे एकच प्रतिक असावे. यासाठी ८ जानेवारी सन १८८० मध्ये श्रीलंकेचे अनागरिक देवमित्त धम्मपाल, महास्थवीर गुणानंद सुमंगल, बौद्ध विद्वान जी. आर. डिसिल्वा इत्यादींनी मिळून निळा, पिवळा, लाल, पांढरा व केशरी अशा पाच रंगाच्या उभ्या व आडव्या पट्ट्यामध्ये ‘विश्व बौद्ध धम्म ध्वजाची’ निर्मिती केली.

कालांतराने त्याला वैश्विक मान्यता प्राप्त झाली. या ध्वजाला पाली भाषेत ‘षडरोशनी ध्वज’ किंवा ‘धम्म ध्वज’ असे म्हणतात.

याला ‘षड ध्वज’ असेही संबोधले जाते. या ध्वजाचे आंतरराष्ट्रीय परिमाण/मोजमाप आडवा ७० सें. मी. आणि उभा ५० सें. मी. असे आहे.

कोलंबो समितीची स्थापना :–

१८८४ मध्ये बौद्धांनी ब्रिटिश शासकांकडून वैशाख/वेसक पौर्णिमा दिन हा बुद्ध जयंतीचा दिवस मे १८८५ पासून सार्वजनिक सुट्टी म्हणून साजरा करण्यास परवाना मिळवला. याचवेळी बौद्धांनी 'कोलंबो समितीची' स्थापना केली. या समितीचे प्रमुख वॉल्कॉट, लिटी आणि संघा हे होते. या समितीने २८ मे १८८५ रोजीच्या वैशाख पौर्णिमेरोजी धम्म ध्वज फडकवून पहिल्यांदा सार्वजनिक सुट्टी जाहीररित्या साजरी केली. दहा सदस्यीय कोलंबो समितीने हा ध्वज १७ एप्रिल १८८५ रोजी धम्मध्वज म्हणून समस्त जनतेसमोर आणला.

बौद्ध ध्वज हा सर्वप्रथम २८ मे १८८५ रोजी वैशाख पौर्णिमा (बुद्ध जयंती) या सणाच्या ब्रिटीश साम्राज्याखालील सुट्टीचा दिवशी फडकवण्यात आला. हा ध्वज श्रद्धा आणि शांततेचे प्रतिक म्हणून जगभरात स्वीकारला गेला. धम्म ध्वजाच्या रचनेबाबत अनेक मतांतरे दिसून येतात. अमेरिकेतील निवृत्त आर्मी कर्नल हेनरी स्टील वॉल्कॉट आणि जे. आर. डिसिल्वा यांनी श्रीलंकेमध्ये १८८० च्या मे महिन्यात धम्म ध्वजाची संकल्पना आणि संरचना मांडली असे मानले जाते. वॉल्कॉट यांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन धम्म चळवळ आणि बौद्ध शिक्षण पद्धतीचे मूलभूत कार्य सुरू केले होते. श्रीलंकेमध्ये त्यांनी बौद्ध धम्माचे शिक्षण देणाऱ्या ४०० शाळा आणि महाविद्यालयांची निर्मिती केली, त्यापैकी आनंदा, नालंदा, महिंदा आणि धर्मराजा ह्या शिक्षणसंस्था मूलभूत मानल्या जातात.

१८८६ पासून वॉल्कॉट यांनी ध्वजामध्ये केलेल्या सुधारणेनुसार श्रीलंकेतील सर्व शाळा-महाविद्यालयांमध्ये आणि इतर बौद्ध राष्ट्रांमध्ये राष्ट्रीय ध्वज म्हणून फडकविण्याचे आवाहन केले.

नंतरच्या काळात प्रा. जी. पी. मालालाशेखर यांनी परंपरेने संरचित केलेल्या ध्वजाचा प्रस्ताव २५ मे १९५० रोजी कँडी येथे झालेल्या 'वर्ल्ड फेडरेशन ऑफ बुद्धिस्ट' च्या बैठकीत मांडला आणि बौद्धांचा अधिकृत ध्वज म्हणून स्वीकारण्याचे आवाहन केले.

आंतरराष्ट्रीय विश्व धम्म ध्वज :–

१९५२ मध्ये 'वर्ल्ड बुद्धिस्ट काँग्रेसनेही' या ध्वजाला 'आंतरराष्ट्रीय विश्व धम्म ध्वज' म्हणून मान्यता दिली.

इ. स. १८८९ मध्ये सुधारित ध्वज सुरू करण्यात आला व अनागरिक धम्मपाल आणि कर्नल वॉल्कॉट यांनी तो म्यानमारच्या सम्राटाकडे सुपूर्द केला.

इ. स. १९५२ मध्ये जागतिक बौद्ध परिषदेने हा ध्वज आंतरराष्ट्रीय बौद्ध ध्वज म्हणून स्वीकारला.

पुढे इ. स. १९८५ मध्ये कोलंबो समितीने कोलंबो, श्रीलंका येथे ध्वजाची मूलत: रचना केली गेली. या समितीत पूज्य हिक्कादुवे, सुमंगल थेरा (अध्यक्ष), पूज्य मिगेत्तूवेत्ते, गुणानंद थेरो, डोनाल्ड डॉन, कारोलीस हेवावीथारणा, अंद्रीस बायर धम्मगुणवर्धना, चार्ल्स ए. डिसिल्वा, पीटर डी. अब्रेऊ, विलियम डि. अब्रेऊ, विलियम फर्नांडोसा, एन. एस. फर्नांडोसा आणि कार्लीस पूजिथा गुणवर्धना (सचिव) यांचा समावेश होता.

विविध देशातील ध्वजांचे रंग, प्रकार :–

सांप्रदायिक बौद्ध ध्वज जगातील वेगवेगळ्या भागातील विहारांमध्ये फडकतात, तथापि अनेक देशातील बौद्धांची स्वतःच्या काही विशिष्ट शिकवणीमुळे बौद्ध ध्वजातील रंगांमध्ये काही बदल करण्यात आलेला आहे. जपानी जुडो शिंशू ध्वजात केशरी रंगाऐवजी गुलाबी रंग आहे. थायलंडचा बौद्ध ध्वज पूर्णपणे मूळ बौद्ध ध्वज आहे पण त्यात धम्मचक्र समाविष्ट केले आहे. नेपाळमधील तिबेटी बौद्ध ध्वजात नारंगी रंगाऐवजी भुरकट रंग वापरण्यात आला आहे. म्यानमारमध्ये थेरवादी बौद्ध ध्वजात नारंगी रंगाच्या स्थानावर गुलाबी रंगाचा उपयोग केला गेला आहे, हा रंग देशातील समस्त भिक्खूनींच्या वस्त्राचा रंग आहे हे अधोरेखित करण्यासारखे आहे. थायलंडमध्ये थेरवादी बौद्ध लाल धम्मचक्र असणाऱ्या पिवळ्या बौद्ध ध्वजाचा उपयोग करतात.

अनेकदा आंतरराष्ट्रीय पंचशील बौद्ध ध्वजासोबत या ध्वजाची परेड केली जाते. गोशीमीकामाकु जपानी ध्वजात नारंगी रंगाऐवजी गडद निळ्या रंगाचा उपयोग झाला आहे.अशोकचक्र असलेला निळा भीम ध्वज भारतीय बौद्ध अनुयायांचा ध्वज आहे, हा ध्वज बहुतांशवेळा पंचशील ध्वजासोबतच फडकवला जातो, हा निळा बौद्ध ध्वज आंबेडकरी चळवळ आणि आंदोलनाचे प्रतीक मानले जाते. कोरियन बौद्ध पांढऱ्या बौद्ध ध्वजाचा उपयोग करतात, ज्यात लाल रंगाचे स्वस्तिक आहे. याचा अर्थ स्वस्तिक हे बौद्ध परंपरेचे प्रतीक आहे असे म्हटले पाहिजे. सोका गकाई तिरंगा बौद्ध ध्वजाचा उपयोग करतात, ज्यामध्ये निळा पिवळा आणि लाल रंग आहे.

आता षड ध्वजाच्या भावार्थासंदर्भात बोलूया:

१) निळा (Blue) रंग :– या रंगाचा भावार्थ समानता आणि व्यापकता असा आहे. अर्थात या निळ्या आकाशाखाली सर्व प्राणी, जीवजंतू, पक्षी, व्यक्ती समान आहेत. तसेच हा रंग सार्वभौम करुणेचे प्रतिक आहे. सर्व प्राणीमात्रांप्रति कल्याणाची भावना ठेवण्याचा उपदेश हा रंग देत राहतो.

२) पिवळा (Yellow) रंग :– हा रंग तथागत बुद्धांनी दिलेला 'मध्यम मार्ग' सांगतो. मध्यम मार्गाच्या अवलंबासाठी 'अष्टांगिक मार्गावरून' चालण्याचा मार्ग तथागतांनी दिला आहे. या मार्गानेच उत्तम, चरित्रसंपन्न जीवन जगून निर्वाण प्राप्त करता येते. हाच प्रगतीचा सरळ आणि सुस्पष्ट मार्ग आहे याची शिकवण हा रंग देतो.

३) लाल (Red) रंग :– हा रंग जीवनातील सम्यक गतिशीलता आणि दृढ निश्चयाचे प्रतिक आहे. शक्तिमान, ऊर्जावान आणि कष्टाळू बनणे, प्रत्येक व्यक्तीने धम्माचरण करणे, जनकल्याणासाठी कठोर परिश्रम करणे, धम्माच्या रक्षणासाठी वेळप्रसंगी बलिदानही पत्करण्याची शिकवण हा रंग देतो.

४) पांढरा (White) रंग :– या रंगाचा भावार्थ शांती आणि पवित्रता आहे. माणूस मन आणि कर्माने शुद्ध आणि पवित्र असावा, शीलवान आणि चरित्रसंपन्न व्यक्ती बनण्यासाठी शक्य तो प्रयत्न त्याने केला पाहिजे याची शिकवण हा रंग देतो. हा रंग तथागतांच्या विचारांची पवित्रता आणि शुद्धता याचे द्योतक आहे.

५) केशरी/नारंगी (Orange) रंग :– हा रंग त्याग, सेवा यांचे प्रतीक आहे. प्रज्ञा, बुद्धिवाद आणि उच्च विद्यांची प्राप्ती करणे, प्रत्येक व्यक्तीने उच्च शिक्षण घेतले पाहिजे, ज्ञानार्जन केले पाहिजे. शिक्षण घेणे ज्ञान प्राप्त करणे हे बुद्धधम्माचे मूलभूत तत्त्व आहे. मनाला सुसंस्कृत आणि नियंत्रित करण्यासाठी ज्ञानाची, शिक्षणाची आवश्यकता असते. ज्ञान मिळविल्याने व्यक्ती प्रज्ञावंत बनू शकतो आणि तो सेवा आणि त्यागासाठी तत्पर राहतो याची शिकवण केशरी रंग देतो. हा रंग तथागत बुद्धांच्या चिवर/काशाय वस्त्राचा

रंग आहे जो शक्ती आणि धाडस दर्शवितो.

६) ध्वजातील आडव्या पट्ट्यातील पाच रंग हे विश्वातील जैविक ऐक्याचे तर उभे पाच रंग हे विश्व शांततेचे प्रतीक मानले जाते. हा ध्वज बुद्ध धम्मातील परिपूर्णतेचे प्रतिक आहे. एकूणच हा ध्वज वंश, नागरिकत्व, वर्ग, जात, रंग, नानाविध परंपरा यांमधील भेद मानत नाही.

म्हणून याला 'विश्व बौद्ध धम्म ध्वज' तसेच 'षड ध्वज' असे म्हणतात. सहावा पट्टा पाच रंगांच्या पट्यांनी बनला आहे म्हणून 'षड ध्वज' असेही म्हणतात, पंचशील नाही.

☸☸🌿🌿🌿💎 विश्व (जागतिक) बौद्ध धंम्म ध्वज दिन. 💎🌿🌿🌿☸☸

धंनम्माच्या प्रचार व प्रसारासाठी संपूर्ण जगातील बौद्धांचे एकच प्रतिक असावे, या विचाराने सन ८ जानेवारी १८८० मध्ये श्रीलंकेचे अनागारीक देवमित्त धंम्मपाल, महास्थविर गुणानंद, सुमंगल, बौद्ध विद्वान जी. आर. डिसिल्वा इत्यादींनी विश्व बौद्ध धंम्म ध्वजाची निर्मिती केली. यामधे सर्व मिळून निळा, पिवळा, लाल, पांढरा व केशरी (नारंगी) अशा पाच (५) रंगांच्या उभ्या व आडव्या पट्यांमधे विश्व बौद्ध धंम्म ध्वजाची निर्मिती केली.

कालांतराने त्याला विश्व मान्यता प्राप्त झाली. ८ जानेवारी १८८० रोजी जागतिक बौद्ध धंम्म ध्वज दिवस म्हणून साजरा केला जातो. याला पाली भाषेत "षडरोशनी ध्वज" किंवा "धंम्म ध्वज" असे म्हणतात.

धंम्म ध्वजामधील पाच रंगांचे अर्थ :–

१. निळा :– शांति व प्रेमाचे प्रतिक.

२. पिवळा :– तेज व उत्साहाचे प्रतिक.

३. लाल :– शौर्य व धर्याचे प्रतिक.

४. पांढरा :– शुद्धता व निर्मळतेचे प्रतिक.

५. केशरी (नारंगी) :– त्याग दया व करूणेचे प्रतिक.

६. उभे पाच रंग :– समता, करुणा, शिलाता, शांति, त्याग याचे प्रतीक आहे.

ध्वजातील आडव्या पट्ट्यातील पाच रंग हे विश्वातील जैविक ऐक्याचे तर उभे पाच रंग हे विश्व शांततेचे प्रतीक मानले जाते. हा ध्वज बुद्ध धम्मातील परिपूर्णतेचे प्रतिक आहे. एकूणच हा ध्वज वंश, नागरिकत्व, वर्ग, जात, रंग, नानाविध परंपरा यांमधील भेद मानत नाही.

धंम्म ध्वज फडकविण्याचे नियम :–

याचे प्रमाण उभे ५० सेमी. व आडवे ७० सेमी. आहे.

हा "धंम्म ध्वज" बौद्ध जणांनी आपले घर, विहार, स्मारक, भवन, धंम्म परिषद, धंम्म सभेचा मंच, धंम्म उत्साहाचे स्थळ इत्यादी ठिकाणी सर्वांत उंच असेल असा फडकवावा.

हा "धंम्म ध्वज" बुद्ध पौर्णिमा, धंम्मचक्रप्रवर्तन दिन, धंम्म परिषदांचे वेळी ध्वजस्तंभावर फडकवून वंदना करावी.

धम्मध्वज वंदना (पाली)

_*वजीर संघास कायस्स अन्गिरस्स तादिनो | केस मस्सु ही अक्खिनं निलठ्ठाने ही रस्सीयो ||

निलवन्ना नीच्छरंती अनंत काल भुदके || १ ||

वजीर संघात कायस्स अन्गिरस्स तादिनो | छबी तो चेब्ब अक्खिनं पितठ्ठाने ही रस्सीयो ||

पितवन्ना नीच्छरंती अनंत काल भुदके || २ ||

वजीर संघात कायस्स अन्गिरस्स तादिनो | मस्स लोहित अक्खिनं रत्तठ्ठाने ही रस्सीयो ||

रत्तवन्ना नीच्छरंती अनंत काल भुदके || ३ ||

वजीर संघात कायस्स अन्गिरस्स तादिनो | अट्टदंते ही अक्खिनं सेतठ्ठाने ही रस्सीयो ||

सेतवन्ना नीच्छरंती अनंत काल भुदके || ४ ||

वजीर संघात कायस्स अन्गिरस्स तादिनो | तेसं तेसं सरीरत्नम नानाठ्ठाने ही रस्सीयो ||

प्रभस्सरा नीच्छरंती अनंत काल भुदके || ५ ||

वजीर संघात कायस्स अन्गिरस्स तादिनो | एवं सब्बनं रस्सीही नीच्छरंती दिसे दिसं ||

अनंत अथो उद्ध च अम तवं मनोहरं | काया वाचा चित्तेन अन्गिरस्स नमामहं || ६ ||*_

धम्मध्वज वंदना (मराठी)

_*वज्रासारखा अभेद्य देह धारण करणाऱ्या भगवान बुद्धांच्या डोक्यावरील व दाढी मधल्या केसातून आणि डोळ्यांच्या निल

स्थानातून प्रभावित होणारा निळा रंग समुद्र, धरती व आकाशात व्यापून राहिला आहे. || १ ||

वज्रासारखा अभेद्य देह धारण करणाऱ्या भगवान बुद्धांच्या पिवळसर त्वचेतून व डोळ्यातील पिवळ्या स्थानातून प्रभावित

होणारा पिवळा रंग समुद्र, धरती व आकाशात व्यापून राहिला आहे. || २ ||

वज्रासारखा अभेद्य देह धारण करणाऱ्या भगवान बुद्धांच्या मासातील व डोळ्यातील रक्तवर्ण स्थानातील आणि रक्तातून

प्रभावित होणारा लाल रंग समुद्र, धरती व आकाशात व्यापून राहिला आहे. || ३ ||

वज्रासारखा अभेद्य देह धारण करणाऱ्या भगवान बुद्धांच्या दातातून, अस्थीतून व डोळ्यातील पांढऱ्या बुब्बूळातून प्रभावित

होणारा शुभ्र रंग समुद्र, धरती व आकाशात व्यापून राहिला आहे. || ४ ||

वज्रासारखा अभेद्य देह धारण करणाऱ्या भगवान बुद्धांच्या निरनिराळ्या अवयवातून प्रभावित होणारा तपकिरी रंग समुद्र,

धरती व आकाशात व्यापून राहिला आहे. || ५ ||

वज्रासारखा अभेद्य देह धारण करणाऱ्या भगवान बुद्धांच्या सर्वांगाने प्रभावित होणारे वरील पाच रंग प्रखरतेने समुद्र, धरती व

आकाशात व्यापून राहिले आहेत. अमृताप्रमाणे संतोष देणाऱ्या भगवान बुद्धांच्या पंचरंगी धम्मध्वजाला मी कायेने, वाचेने

आणि मनाने वंदन करतो/करते || ६ ||*_

प्रतिके जपली आणि मनोमन रुजवली तर क्रांतिकारक ठरतात आणि ती नाकारली तर व्यापक क्रांतीला आपण मुकुन जाऊ हा संदेश जनमानसात जावा यासाठी हा लेखप्रपंच....!

🌐🌐🌐🌐🌐🌐🌐🌐

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ९ जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, मंगळवार, मग्गसिरो मासो, कुंजवारो, मार्गसिश माहे.

९ जानेवारी १८३१, रोजी महात्मा ज्योतिराव फुले व सावित्रीमाई फुले यांच्या सहकारी तसेच भारतातील मुस्लिम पहिल्या महिला शिक्षिका व समाजसुधारक फातिमा शेख यांची जयंती.

९ जानेवारी १९२९, रोजी मौजे अर्नाळा, ता. दर्यापूर, जि. अमरावती येथे अस्पृश्य समाजासाठी विहिरीवर पाणी भरण्याचा कार्यक्रम.

९ जानेवारी १९३१, रोजी लंडनमध्ये गोलमेज परिषदेच्या चौथ्या बैठकीत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आणीबाणीच्या वेळी पोलीस अधिकाऱ्यांना मंत्री ते राज्यपाल यांच्याकडे बदली करण्यास सांगितले गेले.

९ जानेवारी १९४०, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पेरियार यांच्यासाठी मुंबई येथे रात्री ९ वाजता खास जेवणाची (डिनरची) व्यवस्था केली.

९ जानेवारी १९४२, रोजी गव्हर्नर जनरल कौन्सिलमध्ये विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मजूरमंत्री म्हणून नेमणूक.

९ जानेवारी १९४५, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बनारसहून बोरीबंदर येथे आगमन झाले, तेथे त्यांचे प्रचंड स्वागत करण्यात आले. त्यांचा तीन दिवस मुक्काम होता नंतर ते दिल्लीला रवाना झाले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १० जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, बुधवार, मग्गसिरो मासो, बुधवारो, मार्गसिश माहे.

१० जानेवारी १९३८, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार शेतकरी नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबई विधिमंडळावरील शेतकऱ्यांच्या मोर्चास आझाद मैदान येथे मार्गदर्शन.

१० जानेवारी १९४६, रोजी ब्रिटिश लोकसभेचे दहा (१०) सदस्यांचे एक शिष्टमंडळ दिल्लीत आले असता त्यांनी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना निमंत्रित करून अस्पृश्यांच्या प्रश्नांवर दिड तास चर्चा केली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ११ जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, गुरूवार, मग्गसिरो मासो, गुरूवारो, मार्गसिश माहे.

११ जानेवारी १९११, रोजी राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापुरमध्ये परशुराम घोसरवाडकर इनामदार यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधक समाजाची स्थापना केली आणि अध्यक्ष भास्करराव जाधव होते.

११ जानेवारी १९३६, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुणे येथे अहील्याश्रमाच्या भव्य पटांगणामध्ये उभारलेल्या मंडपामधे अखिल महाराष्ट्रीय अस्पृश्य तरुण परिषदेमध्ये "धर्मांतराने सर्व अल्पसंख्यांकाचे कल्याण होईल." असे सांगितले.

११ जानेवारी १९५०, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार शेतकरी नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सुंदराबाई हॉल (गृह) मुंबई येथे हिंदू कोड बिलावर भाषण.

*११ जानेवारी १९५०, रोजी नरेपार्क येथे मुंबई शहर उपनगर दलित फेडरेशनच्या वतीने विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार शेतकरी नेते डॉ. बाबासाहेब

आंबेडकर यांचे भाषण.*

११ जानेवारी १९५०, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार शेतकरी नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुंदराबाई हॉल (गृह), मुंबई येथे सिद्धार्थ कॉलेजच्या विद्यार्थी पार्लमेंट समोर भाषण केले. त्यामधे आंबेडकर यांनी हिंदू कोड विधेयकाचे नेतृत्व करण्याचा लढा सुरू केला. भारतीय राज्यघटनेच्या तयारीच्या नेतृत्त्वात संविधान सभेमध्ये त्यांचा मोठा विजय झाल्यानंतर डॉ. आंबेडकर मुंबईला परतले. पण त्यांनी आपल्याबरोबर एक नवीन युद्ध आणले, हिंदू कोड बिल.

११ जानेवारी १९५०, रोजी शेतकरी कामगार फेडरेशन मुंबई तर्फे परळ येथे झालेल्या सभेत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार शेतकरी नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १२ जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, सुक्कवारो, फुस्स मासो, शुक्रवार, पौष माहे.

१२ जानेवारी १५९८, रोजी राष्ट्रमाता जिजाऊ भोसले जयंती (युवक दिन).

१२ जानेवारी १८६३, रोजी स्वामी विवेकानंद जयंती.

१२ जानेवारी १९३६, रोजी पुणे येथे धर्मांतराच्या प्रश्नावर निर्णय घेण्यासाठी भरविण्यात आलेल्या परिषदेमध्ये विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धर्मांतराची त्रिवार घोषणा.

१२ जानेवारी १९३९, रोजी हरदास लक्ष्मणराव नगराळे उपाख्य बाबू हरदास "जय भीम" चे जनक स्मृतिदिन.

१२ जानेवारी १९५३, रोजी हैद्राबाद उस्मानिया विद्यापीठाने विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार शेतकरी नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना डॉक्टर ऑफ लिटलेचर Doctor of Literature (d. Lit.) ही पदवी दिली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

💎💎🦚🦚🦚*❀ १२ जानेवारी १५९८ राजमाता जिजाऊ जयंती ❀* 🦚🦚🦚💎💎

राजमाता जिजाऊ जयंती

जन्म – १२ जानेवारी १५९८ (बुलढाणा)

स्मृती – १७ जून १६७४ (पाचड, रायगडचा पायथा)

राजमाता जिजाऊ यांचा जन्म बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा येथे झाला. त्या मराठा (मराठी) साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या आई होत्या. सिंदखेडचे लखुजी जाधव हे जिजाबाईंचे वडील व आईचे नाव म्हाळसाबाई होते. जाधव हे देवगिरीच्या यादव घराण्याचे वंशज होते. डिसेंबर १६०५ मध्ये जिजाबाईंचा शहाजी राजांशी दौलताबाद येथे विवाह झाला. जिजाबाईंना एकूण आठ अपत्ये होती. त्यापैकी सहा मुली व दोन मुले होते. त्यांचा थोरला मुलगा संभाजी हा शहाजी राजांजवळ वाढला तर शिवाजी राजांची संपूर्ण जबाबदारी जिजाबाईंवर होती. जिजाबाईंना पहिले अपत्य झाले त्याचे नाव तो सहा महिन्याचा झाल्या नंतर संभाजी ठेवले. त्यानंतर त्यांना ४ मुले झाली; चारही दगावली. ७ वर्षांचा काळ निघून गेला. १९ फेब्रुवारी १६३० या दिवशी सूर्यास्ताच्या वेळी शिवनेरी येथे जिजाबाई यांना मुलगा झाला, मुलाचे नाव शिवाजी ठेवले. शिवाजी १४ वर्षांचा असताना शहाजीराजांनी त्यांच्या हाती पुण्याची जहागीर सुपूर्त केली. अर्थातच जहागीरीची वहिवाट लावण्याची जबाबदारी जिजाबाईंवर येऊन पडली. कुशल अधिकार्यांसमवेत जिजाबाई आणि शिवाजी पुण्यात येऊन दाखल झाले. निजामशाही, आदिलशाही आणि मुघलांच्या सततच्या स्वार्यांमुळे पुण्याची अवस्था अतिशय भीषण होती. अशा प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी दादोजी कोंडदेव यांच्या सोबत नेटाने पुणे शहराचा पुनर्विकास केला. सोन्याचा नांगर घडवून त्यांनी शेतजमीन

नांगरली, स्थानिक लोकांना अभय दिले. शिवाजीच्या राजांच्या शिक्षणाची जबाबदारी पेलली. जिजाबाईंनी दिलेल्या संस्कारांमुळेच शिवाजीराजे घडले. शिवरायांच्या मनात कर्तृत्वाची ठिणगी टाकतानाच जिजाबाईंनी त्यांना राजनीतीही शिकविली. समान न्याय देण्याची वृत्ती आणि अन्याय करणाऱ्याला कठोरात कठोर शिक्षा देण्याचे धाडस दिले. शस्त्रास्त्रांच्या प्रशिक्षणावर स्वतः बारकाईने लक्ष ठेवले. शहाजीराजांची कैद व सुटका, अफझलखानाचे संकट, आग्रा येथून सुटका अशा अनेक प्रसंगांत शिवरायांना जिजाबाईंचे मार्गदर्शन लाभले. शिवराय मोठ्या मोहिमांवर असताना, खुद्द जिजाबाई राज्यकारभारावर बारीक लक्ष ठेवत असत. आपल्या जहागिरीत त्या जातीने लक्ष घालत.

शहाजी राजे बंगळूरात वास्तव्यास असतांना शिवाजी राजांच्या आई–वडिलांची चोख जबाबदारी जिजाबाईंनी मोठया कौशल्याने पेलली. सईबाईंच्या पश्चात संभाजी राजांचीही संपूर्ण जबाबदारी त्यांनी उचलली. राजांच्या प्रथम पत्नी, सईबाईंचे भाऊ बजाजी निंबाळकर यांना जुलमाने बाटवण्यात आले होते. त्यांची मुळ (बौद्ध) धंम्मात परत येण्याची इच्छा होती, राजांचाही त्याला पाठिंबा होता. या धर्मराजकारणात जिजाबाई राजांच्या पाठीशी ठाम उभ्या राहिल्या. एवढेच नव्हे तर राजांची कन्या सखुबाईंना, बजाजी निंबाळकरांच्या मुलाला देऊन त्यांनी राज–सोयरीक साधली आणि बजाजींना पूर्णपणे धंम्मात परत घेतले. या संपूर्ण प्रकरणात त्यांचा द्रष्टेपणा व सहिष्णूता दिसून येते. राजांच्या सर्व स्वार्यांचा, लढायांचा तपशील त्या ठेवत. त्यांच्या खलबतांत, सल्ला मसलतीत भाग घेत. राजांच्या गैरहजेरीत स्वतः राज्याची धुरा वहात. शिवाजी राजे आग्र्याच्या कैदेत असताना राज्याची पूर्णत: जबाबदारी उतारवयातही जिजाबाईंनी कौशल्याने निभावून नेली. शिवाजी राजांचा राज्याभिषेक व मराठी (भारतीय/जंबुद्विप) स्वराज्याची स्थापना पाहून राज्याभिषेकानंतर बारा दिवसांनी १७ जून १६७४ ला त्यांनी स्वतंत्र मराठी स्वराज्यात शेवटचा श्वास घेतला, आपल्या वयाच्या ८० व्या वर्षी जिजाबाईंचे रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या पाचड गावी वृद्धापकाळाने निधन झाले, या गावी राजमाता जिजाबाईंची समाधी आहे. जिजाबाई ही आपल्या मनात तयार असलेली मराठी स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात साकार करण्यासाठी छत्रपती शिवरायांना ज्ञान, चारित्र्य, चातुर्य, संघटन व पराक्रम अशा राजस व सत्त्वगुणांचे बाळकडू देणार्या राजमाता होय. राजमाता जिजाऊ यांच्या थोर कार्यास कोटी कोटी प्रणाम.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १३ जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, सनिवारो, फुस्स मासो, शनिवार, पौष माहे.

१३ जानेवारी १९३६, रोजी पुणे येथे धर्मांतराच्या प्रश्नावर निर्णय घेण्यासाठी आयोजित केलेल्या युवकांच्या (वंचित वर्ग) परिषदेमध्ये विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्म सोडण्यासाठी येवला येथे आपल्या धर्मांतराच्या घोषणेचा पुनरुच्चार करून आपले मत मांडले. राव बहादुर एन. शीना राज हे या परिषदेचे अध्यक्ष होते.

१३ जानेवारी १९३६, रोजी शिखांच्या भजन कार्यक्रमास विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित.

१३ जानेवारी १९३७, रोजी चाळिसगाव जिल्हा जळगाव येथे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण.

१३ जानेवारी १९४६, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर रेल्वेने दिल्लीहून मुंबईला परतले आणि त्याच दिवशी सोलापूरला रवाना झाले आणि त्यांनी तेथे जाहीर सभांना संबोधित केले.

१३ जानेवारी १९५७, भारतातील सर्वात मोठे धरण 'हिराकुड धरण' याचे उद्घाटन तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते करण्यात आले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

💎💎🦚🦚🦚🦚१३ जानेवारी १९५७, भारतातील सर्वात मोठे धरण 'हिराकुड धरण' याचे उद्घाटन तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते करण्यात आले.

भारतातील सर्वात मोठे धरण 'हिराकुड धरण' याचे उद्घाटन तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते करण्यात आले.

थोडक्यात इतिहास...!

(जगातील सर्वात लांब मातीचे धरण)

ओरीसा राज्यातील सर्वात मोठी नदी म्हणजे 'महानदी' होय. ओरीसा राज्यात सतत येणाऱ्या पावसामुळे मोठी हानी होत असे. १९३७ साली आलेल्या भयंकर पुराने फार मोठी

हानी झाली होती.

या संकटावर मात करण्यासाठी ओरिसा सरकारने दिनांक ८ नोव्हेंबर १९४५ रोजी एक परिषद घेतली आणि त्या परिषदेचे अध्यक्ष तत्कालीन मंजूर मंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. त्या अध्यक्षीय भाषणात बाबासाहेब म्हणतात, "ओरिसातील पाण्याचा प्रश्न हा प्रामुख्याने पुर नियंत्रणाचा प्रश्न आहे, यामुळे ओरिसातील जनतेला त्यामुळे अनेक संकटांना सामोरे जावे लागते आणि अनेक नैसर्गिक आपत्तीला तोंड द्यावे लागते." यामुळे नदीच्या पुराची तिव्रता कमी करण्यासाठी त्यावेळी केंद्रीय जलमार्ग, सींचन व जल वाहतूक आयोगाचे अध्यक्ष डॉ. कोसला यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी चर्चा करून हिराकुड धरणाची कार्यवाही सुरू केली. हिराकूड धरणाची कोनशिला त्यावेळचे ओरिसा राज्याचे गव्हर्नर सर हॉथरॉन लेव्हिस यांच्या हस्ते १५ मार्च १९४६ रोजी बसवण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते या धरणाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

या बहुउद्देशीय प्रकल्पाचे श्रेय अर्थातच स्वातंत्र्यपूर्व काळात देशाच्या विकासासाठी कार्य करणारे व्हाईसरॉय यांच्या मंत्रिमंडळात मंजूर मंत्री असलेले, दुरदृष्टी असलेले नेते भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनाच दिले पाहिजे...!

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १४ जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, फुस्स मासो, रविवार, पौष माहे.

१४ जानेवारी, बौद्ध राजा संख्यासुर स्मृतिदिन.

१४ जानेवारी १९३७, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर लंडनहून भारतात परत आले. टाइम्स ऑफ इंडियाच्या पत्रकाराने डॉ. आंबेडकर यांची मुलाखत घेतली, तेव्हा डॉ. आंबेकर म्हणालेत की, "आरोग्याच्या कारणास्तव युरोपला गेलो आणि बहुतेक वेळा व्हिएन्ना आणि बर्लिनमध्ये राहिलो." ते एक (१) आठवडा लंडनमध्ये होते. डॉ. आंबेडकर म्हणाले की, "माझी तातडीची चिंता म्हणजे मुंबई विधानसभेच्या आगामी निवडणुका असून त्या प्रचारासाठी स्वतःला झोकून द्यावे. मी सुरू केलेल्या स्वतंत्र कामगार पार्टी विधिमंडळातील निराश वर्गाच्या राजकीय व सामाजिक प्रतिष्ठेच्या दृष्टीने काम करेल आणि माझ्या पक्षाच्या वतीने सर्व उमेदवार यशस्वी होतील यासाठी मी तयार आहे."

१४ जानेवारी १९४६, रोजी सोलापूर नगरपालिका व जिल्हा लोकल बोर्ड या या संस्थेच्या वतीने विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मानपत्र.

१४ जानेवारी १९५१, रोजी वरळी मुंबई येथील बौद्ध विहारामध्ये विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण.

१४ जानेवारी १९५२, रोजी पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मुंबई लोकसभा मतदार संघामधून विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निवडणूक लढविली.

१४ जानेवारी १९५५, रोजी बौद्ध धंम्म समितीच्या सभेमध्ये विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण.

१४ जानेवारी १९९४, रोजी औरंगाबादमधील (आता संभाजीनगर) मराठवाडा विद्यापीठाचे "डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (संभाजीनगर)." असा नामविस्तार करण्यात आला.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १५ जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, चंन्दवारो, फुस्स मासो, सोमवार, पौष माहे.

१५ जानेवारी १९१३, रोजी बडोदा सरकारच्या शिष्यवृत्ती करारानुसार विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर बडोदा सरकारच्या मिलिटरी डिपार्टमेंटच्या अकाऊंट जनरलच्या कार्यालयामधे प्रोबेशनर म्हणून रुजू झाले.

१५ जानेवारी १९१९, रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा बंद करून सर्वांना समान शिक्षण दिले.

१५ जानेवारी १९३०, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर दुसऱ्या गोलमेज परिषदेस हजर.

१५ जानेवारी १९४८, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सिद्धार्थ कॉलेजला भेट दिली.

१५ जानेवारी १९४९, रोजी भारतीय लष्कर दिन.

१५ जानेवारी १९४९, रोजी मनमाड येथे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना चळवळीसाठी हजारो रुपयांची थैली अर्पण करण्यात आली.

१५ जानेवारी १९५६, रोजी बाबू हरदास स्मृती मेळावा, कंन्हान.

१५ जानेवारी १९५६, रोजी मायावती जन्मदिन.

१५ जानेवारी १९९५, रोजी सुजात प्रकाश (बाळासाहेब) आंबेडकर जन्मदिन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १६ जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, कुंजवारो, फुस्स मासो, मंगळवार, पौष माहे.

१६ जानेवारी १६८१, रोजी छत्रपती संभाजी महाराज राज्याभिषेक दिन (रायगड किल्ला). १६ जानेवारी १६८१ – ११ मार्च १६८९.

*१६ जानेवारी १९३१, रोजी गोलमेज परिषेदेमध्ये विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण. "भारताचे संरक्षण विशिष्ट जातीपूर्ते नव्हे तर सर्व जनतेशी संबंधित असते."

१६ जानेवारी १९३७, रोजी इगतपुरी जिल्हा नाशिक येथे विधानसभा निवडणुकीमध्ये दादासाहेब गायकवाड यांच्या प्रचार सभेत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण.

१६ जानेवारी १९३७, रोजी इगतपुरी मंडळ आणि स्ववलंबन मंडळातर्फे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पुष्पहार देऊन स्वागत केले.

१६ जानेवारी १९३८, रोजी वाशिम येथे सी पी आणि मातंग परिषद.

१६ जानेवारी १९४६, रोजी स्पृश्य नागपूर येथे जातीय दंगल.

१६ जानेवारी १९४९, रोजी मनमाड जिल्हा नाशिक येथे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान कार्य पूर्ण केल्याबद्दल डॉ. आंबेडकर आणि माईसाहेब आंबेडकर यांच्या स्वागतार्थ प्रचंड जाहीर सभा.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १७ जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, बुधवारो, फुस्स मासो, बुधवार, पौष माहे.

१७ जानेवारी १९३४, रोजी चांदुर बाजार येथे अमरावती जिल्हा अस्पृश्य परिषद अधिवेशन संपन्न झाले.

१७ जानेवारी १९३७, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वतंत्र मजूर पक्षाने सार्वत्रिक निवडणुकीत १८ उमेदवार उभे केले. त्यापैकी १४ उमेदवार निवडून आले.

१७ जानेवारी १९३८, रोजी पु. भ. धंम्मशिल जयंती.

१७ जानेवारी १९३७, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायदेमंडळाच्या निवडणुकीबाबत नाशिक जिल्ह्यातून दौरा काढला असता देवळाली, विदगाव, ढकांबे, तळेगाव, दिंडोरी, आंबेवणी, वरखेडा, जऊळके, बसवंत पिंपळगाव, ओझर, तांबट, खेरवाडी, सायखेडा, चाटोरी, नायगाव, सिन्नर ते शिंदे पळसे येथे भेट दिली.

१७ जानेवारी १९४६, रोजी वसंत गजभिये व संपत वासनिक स्मृतिदिन.

१७ जानेवारी १९४८, रोजी मुंबईला परतल्यानंतर विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी "धोबी तलाव नाईट स्कूल" च्या पुरस्कार वितरण समारंभास संबोधित केले.

१७ जानेवारी १९४९, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व मित्रमंडळीसह संभाजी नगर (औरंगाबाद) येथे स्थापिल्या जाणाऱ्या सिद्धार्थ कॉलेजच्या जागेची पाहणी केली त्यानंतर संभाजी नगर (औरंगाबाद) शहरातील ऐतिहासिक प्रेक्षणीय स्थळे त्यांनी पाहिली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १८ जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, गुरूवारो, फुस्स मासो, गुरूवार, पौष माहे.

१८ जानेवारी १९२९, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत भारत या वृत्तपत्रात नेहरुं कमिषनची योजना व भारताचे भवितव्य हा लेख लिहिला.

१८ जानेवारी १९३८, रोजी लोकल बोर्ड दुरुस्ती बिलावर असेंबलीमध्ये (सभेमध्ये) विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण.

१८ जानेवारी १९४३, रोजी न्यायमूर्ती रानडे यांच्या १०१ व्या जयंती प्रीत्यर्थ विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण.

१८ जानेवारी १९५६, रोजी "मुंबई शहर केंद्रशासित ठेवणे हे अती किळसवाणे कृत्य." असे मत दिल्ली येथे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १९ जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, सुक्कवारो, फुस्स मासो, शुक्रवार, पौष माहे.

१९ जानेवारी १९३१, रोजी पहिल्या गोलमेज परिषदेचे समारोपाचे अधिवेशन. आठव्या गोलमेज परिषदेच्या बैठकीत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भावि घटनेत अस्पृश्यांच्या संरक्षणासाठी विशेष व ठोस व्यवस्था करण्याचे आवाहन केले.

१९ जानेवारी १९५०, रोजी हिंदु कोडबिलास पाठिंबा देण्यासाठी अस्पृश्यांची मुंबई येथे सभा संपंन्न झाली.

१९ जानेवारी १९७१, रोजी पु. सयाजी ऊ. बा. खिन स्मृतिदिन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २० जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, सनिवारो, फुस्स मासो, शनिवार, पौष माहे.

२० जानेवारी १९२०, रोजी माणगाव येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली 'जातिभेदावर तोडगा' या विषयावर विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण.

२० जानेवारी १९२९, रोजी रत्नागिरी जिल्हा अस्पृश्य परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनाच्या नियोजनासाठी मुंबई येथे भाऊच्या धक्क्यावर जाहीर सभा.

२० जानेवारी १९३८, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मुंबई विधानसभेमध्ये On probation of offenders बिल यावर बोलले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २१ जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, फुस्स मासो, रविवार, पौष माहे.

२१ जानेवारी १६०८, रोजी संत तुकाराम बोल्होबा अंबिले (मोरे) जयंती.

२१ जानेवारी १९३१, रोजी पहिली गोलमेज परिषद समाप्त झाली.

२१ जानेवारी १९४०, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मुलाखत आशाप्रमोद साप्ताहिकात प्रसिद्ध डॉ. आंबेडकरांचे पत्र लंडन सोडण्यापूर्वी डॉ. आंबेडकरांनी गोलमेज परिषदेच्या कामावर आपले सचिव शिवचरकर यांना लिहिलेल्या पत्रात मत व्यक्त केले, जरी परिषदेच्या परिणामी ते दोन विचारांचे होते. त्यांना विश्वास होता की त्यांनी भारताच्या स्वराज्य संस्थांचा पाया घातला. या दृष्टिकोनातून पाहात असता त्यांना आढळले की, पायामध्ये मोर्टारपेक्षा वाळू जास्त आहे. म्हणून पाया इतका मजबूत नव्हता. ते म्हणाले की, "पीडित वर्गाच्या हक्काची बाब म्हणून ते कमालीचे यश होते."

२१ जानेवारी १९४९, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संभाजी नगर (औरंगाबाद) येथील मराठा विद्यालयास भेट दिली. त्यानंतर एक लाखाच्या विराट सभेत भाषण.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २२ जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, चन्दवारो, फुस्स मासो, सोमवार, पौष माहे.

२२ जानेवारी, १८०८, रोजी जेम्स फर्ग्युसन (वास्तुकार) जयंती.

२२ जानेवारी १९३८, रोजी विधानसभेत ग्रामपंचायत बिलावर चर्चा करतांना काँग्रेस पक्षाने अस्पृश्यांचा हरिजन उल्लेख केल्यामुळे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सभात्याग केला.

२२ जानेवारी १९३९, रोजी बाबु हरदासांच्या उत्तर क्रियेच्या झालेल्या कार्यक्रम प्रसंगी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित.

२२ जानेवारी १९४६, रोजी मजूर खाते व रेल्वे विवाद या विषयावर दिल्ली येथे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण.

२२ जानेवारी १९४७, रोजी मुंबई विधिमंडळातर्फे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची घटना समितीवर फेरनिवड.

२२ जानेवारी २०२२, रोजी विश्वातील सर्वात प्रभावशाली आध्यात्मिक गुरुमधील एक, महायान (ज़ेन बौद्ध) भिक्खु थिच नहत हान यांचे ९५ वर्षाच्या आयुश्यात निधण झाले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

जेम्स फर्ग्युसन (वास्तुकार) :–

जेम्स फर्ग्युसन यांचा जन्म स्कॉटीश, ऐतिहासिक व आर्चीटेक्ट फॅमिलीत दिनांक २२ जानेवारी, १८०८ ला लंडन येथे झाला व मृत्यू दिनांक ९ जानेवारी १८८६ मध्ये झाला.

त्यांचे वडील विल्यम फर्ग्युसन हे ब्रिटिश आर्मीत सर्जन होते, त्यानंतर ते मेडिकल च्या संबंधित लेखक झाले व त्यानंतर ते हॉस्पिटल चे इन्स्पेक्टर झाले.

जेम्स फर्ग्युसन भारतात आले त्या वेळी ते २२ वर्षाचे होते. त्यांची कलकत्ता येथे फर्गुसन अँड कंपनी, फॅमिली अर्चिटेक्ट कंपनी होती, त्या मध्ये ते मॅनेजर म्हणून दाखल झाले. परंतु कंपनी लॉस मध्ये गेली आणि ते परत इंग्लंडला गेले आणि १० वर्षानंतर भारतात आले तेंव्हा त्यांनी भारतात (इंडिगो प्लांटेशन) म्हणजे निरनिराळ्या कलर चे प्लांटेशन व फ्लॉवरचा बिसिनेस चालू केला, या व्यवसायात त्यांना भरपूर पैसा मिळाला. बिसिनेस मध्ये भरपूर पैसा मिळून सुद्धा त्यांनी आपले करियर अर्चिटेक्ट मध्ये करण्याचा निर्णय घेतला.

बुद्धिस्ट आर्चीयॉलॉजि वर काम करीत असलेले जेम्स प्रिंसेप, सर अलेक्झांन्डर कंनींघम, चार्ल मेशन आणि जेम्स बर्जेस व इतर. यांच्या कार्याने ते प्रभावित झाले. त्यांनी कोणत्याही प्रकारचे अर्चिटेक्ट चे शिक्षण किंवा प्रशिक्षण घेतले न्हवते, त्यांनी जगात अनेक ठिकाणी भेटी दिल्या. १८४५ ला भारतात आल्या नंतर येथील प्राचीन बुद्ध लेणीने त्यांना आकर्षित केले. प्राचीन लेणीचे डिझाईन तयार केले, व अश्या प्रकारे पहिल्यांदा १९४९ मध्ये (Rock–Cut Temples of India an observation of Indian Architecture metaphysical study.) हा पहिला वोलूम पब्लिश केला त्यावेळी त्यांचे वय ३५ वर्षे होते, प्रचंड मेहनत करून ते इंग्लंडचे मुख्य अर्चिटेक्स्ट तर झाले परंतु ते जगात प्रख्यात अर्चिटेक्चर म्हणून नावा रुपाला आले.

फ्रांस ने इंग्लंड वर आक्रमक केले असता यांनी एक प्रबंध प्रकाशित केला (Preparedness to resist a french invasion need systems of Fortification with hints, its application of our national defence.)

या प्रबंधा वरून त्याची १८५९ ला रॉयल कमीशन ऑफ डिफेन्स ऑफ द युनाइटेड किंगडम मध्ये सदस्य म्हणून निवड झाली. हा त्यांचा करिता बहुमान होता की, एका सिव्हिलियनला प्रथमच देशाच्या सुरक्षा समिती मध्ये सामील करून घेण्यात आल्या बरोबर कोस्टल फोर्टिफिकेशनचा प्रोग्राम हाती घेतला. त्याच बरोबर ३१st जुलै, १८८५ मध्ये केव्ह कमिशन स्थापन करून भारतात प्राचीन बुद्ध लेणी चे उतखनन करण्यात आले, ते डिफेन्सचे सदस्य असल्यामुळे प्रचंड प्रमाणात केव्ह कमिशनला निधी उपलब्ध करून देत असत.

सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडियाने १८७० ला ऑर्डर पास केली की आर्चटेक्टरल अँटीक्वीटीसचा वेस्टर्न इंडियाचा सर्वे करण्यात यावा, परंतु १८७३ पर्यंत त्यावर काहीच काम झाले नाही. जेम्स फर्ग्युसनने त्यावर मिनिट्स तयार करून ते जे. ग्बिब्स कंपनी सेक्रेटरीला सादर केले.

ते ऑस्टीन हेनरी लायार्डच्या क्रिस्टल प्यालेस डेकोरेशन स्कीम चे प्रमुख सल्लागार होते. ओमरची मस्जिद, जेरुसलेमचे चर्च, इत्यादीचे डिसाईन तयार केले.

१८७१ मध्ये त्यांना रॉयल इन्स्टिटयूट ऑफ ब्रिटिश अर्चिटेक्टने गोल्ड मेडलने सन्मानित केले.

मॅक्स मुल्लर यांनी जेंव्हा रिगवेदचे इंग्रजीत भाषांतर केले आणि संदर्भ काल्पनिक दिले त्यावेळी जेम्स फर्ग्युसनने ७० पेजचे मेमोरंडम सादर केले की, हे सर्व फेक आहे, प्राचीन आर्चीओलॉजीकल साहित्य हे फक्त बुद्धांचेच आहे. आणि त्याचा भक्कम पुरावा म्हणजे सम्राट अशोक, सम्राट सातवाहन यांनी निर्माण केलेल्या बुद्ध लेणी. १८८० मध्ये त्यांनी केव्ह टेम्पल ऑफ इंडिया हा अत्यन्त महत्वपूर्ण ग्रंथ लिहिला.

अश्या या महान व्यक्तीला त्यांच्या २१६ व्या जन्मदिनाच्या निमित्ताने विनम्र अभिवादन.

– शामराव सोमकुवर.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🙏💐💐🙏 श्रद्धांजलि महायान (ज़ेन बौद्ध) भिक्खु थिच नहत हान 🙏💐💐🙏

दुनिया के सबसे प्रभावशाली आध्यात्मिक गुरुओं में से एक, महायान (ज़ेन बौद्ध) भिक्खु थिच नहत हान का ९५ वर्ष की आयु में निर्वाण हो गया था। (२२ जनवरी २०२२)

थिच नहत हान ने १६ साल की उम्र में एक भिक्खु के रूप में अपनी यात्रा शुरू कि, वियतनाम में एक ज़ेन मठ में १९४९ मेंअपने आधिकारिक समन्वय से पहले शामिल हो गए।

लेखक, कवि और शिक्षकने "संलग्न बौद्ध धम्म" में अपने विश्वास के साथ, धम्म के सिद्धांतों को लेते हुए और उन्हें सामाजिक मुद्दों और सुधारों पर लागू करने के लिए प्रमुखता प्राप्त की।

दिवंगत रेवरेंड डॉ. मार्टिन लूथर किंग जूनियरने नोबेल पुरस्कार के लिए थिच नहत हान को नामांकित किया, उन्होंने लिखा कि "शांति के लिए उनके विचार, यदि लागू किए जाते हैं, तो विश्व बंधुत्व, मानवता के लिए विश्व बंधुत्व के लिए एक स्मारक का निर्माण होगा।"

"जन्म और मृत्यु केवल एक द्वार है जिसके माध्यम से हम अंदर और बाहर जाते हैं... तो मुस्कुराओ और मेरा हाथ थाम लो और अलविदा कहो।" – बौद्ध भिक्खु और शांति कार्यकर्ता थिच नहत हंह, २९२६–२०२२|

महान ज़ेन बौद्ध भिकखु को भावभीन श्रद्धांजलि|

💐🙏💐🙏💐🙏💐🙏💐💐💐💐💐

☸☸🌺🌺🌺💎 *सविनय जयभीम* 💎🌺🌺🌺☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २३ जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, कुंजवारो, फुस्स मासो, मंगळवार, पौष माहे.

२३ जानेवारी १८१४, रोजी सर अलेक्झांडर कंन्निंघम जयंती.

२३ जानेवारी १८९७, रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती.

२३ जानेवारी १९०२, रोजी कोल्हापूर संस्थानातील शेतजमिनींना पाणीपुरवठा करण्याच्या हेतूने सर्वेक्षण करण्याचा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा आदेश.

२३ जानेवारी १९३३, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर गंगा आगबोटिने मुंबईत परतले असतांना समता सैनिक दळातर्फे मुंबई येथे भव्य स्वागत.

२३ जानेवारी १९३३, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुंबई येथे तिसऱ्या गोलमेज परिषदेहून परत आले. त्यांच्यासमवेत सरपुरुषोत्तम दास ठाकूरदासही तेथे होते. लँडिंग केल्यावर त्यांचे समता सैनिक दळाने जोरदार स्वागत केले. प्रमुख नेत्यांपैकी फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच तीनही गोलमेज परिषदांना उपस्थित होते आणि त्यांनी अस्पृश्य लोक (ज्याला आता वंचित म्हंटले जाते.) यांच्या हक्कासाठी लढा दिला. गांधी आणि मालवियांनी पहिल्या आणि तिसऱ्या फेरीच्या कॉन्फरन्स मध्ये भाग घेतला नव्हता. तर जिना दुसऱ्या फेरीच्या टेबल कॉन्फरन्सच्या सत्राला उपस्थित नव्हते. केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच तीनही गोलमेज परिषदांना उपस्थित होते.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🌺🌺🌺💎 सर अले अलेक्झांडर कंनीगंहम 💎🌺🌺🌺☸☸

(जन्म :– २३ जानेवारी १८१४; मृत्यू :– २८ नोव्हेंबर १८९३.)

(Father of Archaeology.)

सर अलेझानंडर कंनीगंहम यांचा जन्म २३ जानेवारी, १८१४ मध्ये लंडन येथे स्कॉटीश फॅमिली मध्ये झाला. वडिलांचे नाव ऑलन आणि आईचे नाव जीन नी. त्यांना ईस्ट इंडिया कंपनी कडून रॉयल इंजिनिअर ऑफ इस्टेट करिता स्कॉलरशिप मिळाली व टेक्निकल प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांची नियुक्ती बेंगाल इंजिनिअर मध्ये सेकंड लेफ्टनंट म्हणून भरती करण्यात आली, त्यावेळी त्यांचे वय केवळ १९ वर्षे होते. ९ जून १८३३ ला ते भारतात आले.

१८३७ मध्ये जेम्स प्रिन्सेपनी सम्राट अशोकांचे शिलालेख शोधून काढले व त्याचें वाचन केले व धम्मलिपीचा शोध लावला ही बातमी संपूर्ण जगभर पसरली म्हणून अनेक लोक जेम्स प्रिन्सेपला भेटायला येत असे. अशीच उत्सुकता सर अलेक्झांडर कंनीगंहमला सुद्धा वाटली, जेंव्हा ते जेम्स प्रिन्सेसला भेटले तेंव्हा त्यांचे रूपांतर गाढ मैत्रीत झाले व त्यांना असे वाटू लागले की आपण फार पूर्वी पासून मित्र घनिष्ठ मित्र आहोत, कारण या दोघांनी जे बुद्धीझम वर काम केले ते या पूर्वी कोणीही केले नाही.

१८३६ ते १८४० या कालावधी मध्ये त्यांची नियुक्ती लॉर्ड औकलंड, गव्हर्नर जनरल ऑफ इंडियाचे पर्सनल सेक्रेटरी म्हणून करण्यात आली. १८४१ मध्ये त्यांची नियुक्ती औंध (Awadh) चे राजे नवाब सादत खानचे चिफ एक्सयूकुटीव इंजिनिअर म्हणून करण्यात आली, १८४२ मध्ये बुंदेलखंड मध्ये काम केले तर नौगांव मध्य प्रदेश येथे डिसेंबर १८४३ येथे काम केले.

१८४४–४५ मध्ये ग्वालीयरचे मुख्य इंजिनिअर म्हणून तर मोरार नदीवर आर्च ब्रिज निर्माण करण्याची जबाबदारी सोपविली. १८४५–४६ मध्ये पंजाब येथे बियास नदीवर दोन

ब्रिज निर्माण करण्याची जबाबदारी सोपविली. १८४६ मध्ये ब्रिटिश सिव्हिल सर्वंट वान्स आग्नेव यांनी कमिशनर म्हणून नियुक्ती केली व लेह लडाख व तिबेटच्या सीमेचा सर्वे कारणे व सीमा निश्चित करण्याची जबाबदारी त्यांचे वर सोपविण्यात आली, ते काम १८४७ ला पूर्ण केले, याच कालावधी मध्ये खालसा सीख व इस्ट इंडिया कंपनी मध्ये वॉर झाले त्याचें नेतृत्व यांनी केले व विजय मिळवून दिला. त्यांनी १८४८ ला ऑर्डर ऑफ आयर्न आर्किटेकचर हा प्रबंध लिहिला.

१८५६ मध्ये बर्माचे चिफ इंजिनिअर म्हणून नियुक्ती करण्यात आली व इथे त्यांनी पब्लिक वर्क्स डिपार्टमेंट ऑफ इंडियाची स्थापना केली, १८६० मध्ये त्यांची रॉयल इंजिनिअर चे कर्नल म्हणून नियुक्ती करण्यात आली, व ३० जून १८६१ ला मेजर जनरल (सर्वोच्च रँक) म्हणून रिटायर झाले आणि इथूनच त्यांची बुद्धीझम वर काम करण्याची सुरुवात झाली.

१८३४ मध्ये येसीयाटीक सोसायटी ऑफ बेंगालच्या जर्नल मध्ये जेम्स प्रिन्सेपचे मंकीयाला बुद्ध स्तूप मधील रिलीक्स वर आर्टिकलं वाचून सर अलेक्झांडर फार प्रभावित झाले. (सध्या हा स्तूप पंजाब प्रोविन्स पाकिस्तान मध्ये आहे.)

१८३७ मध्ये जेंव्हा ते सारनाथ येथे असताना एका संध्याकाळी सहज फिरायला गेले असता एक टोम्ब (थडगे) त्यांच्या नजरेत पडले, त्यांना असे वाटले की हे कोणत्यातरी महाराजांचे थडगे असेल म्हणून त्यांनी ते थडगे ऊत्खनन करन्याची परवानगी मागितली व त्याच बरोबर निधीची मागणी केली, त्यांना उत्खनन करण्याची परवानगी मिळाली परंतु निधी मात्र मिळाला नाही. निधी मिळाला नाही म्हणून ते स्तब्ध बसले नाही तर स्वतःच्या पगारातून त्यांनी त्या थडग्याचे उत्खनन केले व (ब्रिटिश आर्मी ऑफिसर फ्रेडरिक चार्लला सोबत घेतले हा पैंटिंग, वाटर कलर करण्यात पटाईट होता.) तिथे त्यांना एक दगडावर काही तरी लिहिलेला एक शिलालेख सापडला तो त्यांनी जेम्स प्रिन्सेपकडे पाठवीला. जेम्स प्रिन्सेपने वाचन करून सांगितले की याच ठिकाणी बुध्दांनी आपल्या प्रथम पांच अनुयायाना धम्मोपदेश केला तो दिवस होता आषाढी पौर्णिमा त्याला धंम्मचक्र प्रवर्तन पौर्णिमा असे म्हणतात. ते पाच भिक्खु या प्रमाणे कौडीन्य, वप्प, भद्दीय, अस्सजीत आणि महानाम होते, यालाच बुद्धांचे प्रथम धम्मचक्र प्रवर्तन असे संभोधल्या जाते.

१८४२ ला संकीसा स्तूपाचे उत्खनन केले. हा स्तूप श्रावस्ती मध्ये आहे, संकीसा एक प्राचीन बुद्धिस्ट सेंटर होते.

१८५०–५१ मध्ये सांची स्तूपाचे उतखनन केले त्याकरिता निधी शाह बेगम ऑफ नवाब ऑफ भोपाळ यांनी उपलब्ध करून दिला. येथे सारीपुत्त आणि महामोगलायनच्या अस्थी शोधून काढल्या, व त्याच्या आजू बाजूचा परिसर यांचे उत्खनन केले व १८५४ ला भिलसा टोप्स म्हणून पुस्तक लिहिले, (या पुस्तकात एकूण चार धम्म संगितीचे वर्णन आहे तसेच पहिल्या धम्म संगीती मध्ये बुध्दा करिता उत्तर दिशेला एक आसन राखीव ठेवण्यात आले होते, कारण राजा अजातशत्रूने बुद्धांना धंम्मराजा म्हणून घोषित केले होते, तसेच पायथ्यागोरस यांचा सिद्धांत मांडला बुद्ध म्हणजे माईंड, धम्म म्हणजे मॅटर आणि संघ म्हणजे मार्केट प्लेस.) याच ठिकाणी सोनारी स्तूप शोधून काढला की ज्या ठिकाणी सम्राट अशोक यांनी ८४००० बुध्द अस्थी कलश चे वितरण केले व संपूर्ण देशात ८४००० स्तूप निर्माण करण्यात आले.

१८६१ मध्ये डिपार्टमेंट ऑफ ऑरकोलॉजिची स्थापना केली व त्यांची पहिले सर्वेअर जनरल ऑफ इंडिया म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर महाराणी येलिझाबेदने त्यांची गवर्नल जनरल ऑफ इंडिया म्हणून नेमणूक केली व या माध्यमातून त्यांचे भारतात बुद्ध स्तूप, बुद्ध लेणी यांचे सर्वे करणे, संवर्धन करणे व रीस्टोर करने इत्यादी महत्वपूर्ण कार्य सुरु होते, परंतु १८६६ मध्ये हा डिपार्टमेंट निधीच्या अभावी अचानक बंद करन्यात आला. म्हणून ते इंग्लंडला गेले व महाराणी एलीझाबेदची भेट घेतली व या डिपार्टमेंटची भारतात किती गरज आहे, हे डिपार्टमेंट भारतात बुद्धीझम पुणरस्थापित करण्याकरिता किती महत्वाचा आहे हे पटवून दिले आणि जर का तुम्ही हे डिपार्टमेंट चालू करीत नसाल तर तुम्ही दिलेली सर्वोच्च पदवी "सर" मी परत करेन. यावर महाराणीने हे डिपार्टमेंट पुन्हा चालू करण्यात येईल असे सांगितले.

परंतु ते स्वस्थ न बसता पाठपुरावा चालूच होता त्याच बरोबर लेणीवर, स्तूपावर संशोधन ग्रंथ लिहिणे चालू होते व विविध ठिकाणी बुध्दाच्या संबंधित भेटी देने चालू होते. शेवटी त्यांच्या प्रयत्नाला यश आले आणि १८७० मध्ये लॉर्ड मेयो यांनी हा डिपार्टमेंट पुन्हा चालू केला व त्यांची आर्किओलॉजि सर्वेअर जनरल ऑफ इंडिया म्हणून नियुक्ती केली व त्या डिपार्टमेंटला डायरेक्ट राजघराण्यातुन निधी उपलब्ध करून देण्यात आला.

कुशीनारा बुध्दा स्तुपाचे ऊतखनन केले आणि बुध्दाची महापरीनिर्वाण मूर्ती शोधून काढली, या करिता ते तीन दिवस संपूर्ण जंगल फिरत होते. अन्न नाही किंवा पाणि नाही किंवा जंगलात कोणी नाही आणि जे असतील त्याला भाषा येत नाही. परंतु त्यांना दृढ विस्वास होता की मी ज्या ठिकाणी बुध्दाचे महापरिनिर्वाण झाले ते मी शोधून काढणार.

१८१२ मध्ये फ्रांचीच बुचानन यांनी नालंदा चा शोध लावला परंतु हेच प्राचीन नालंदा बौद्ध विद्यापीठ आहे ते यांनी सिद्ध केले. त्याच प्रमाणे तक्षशिला बुद्ध विदयापीठाचा शोध लावला.

त्यांनी दोन वेळा अयोध्याला (कुशिणारा) भेट दिली परंतु उतखनन करू शकले नाही कारण त्या ठिकाणी मस्जिद आणि मंदिर होते.

१८५३–१८५६ आणि १८७३–७४ मध्ये हरप्पा आणि मोहोनजडो यांचे ऊतखनन केले व इंडस शील शोधून काढले व १८७५ मध्ये जागतिक नकाशावर आणले. तसेच वैशालीचा स्तूप व केसरिया स्तूप १८७५ ला शोधून काढला.

१८८० ला महाबोधि विहारला भेट दिली त्याची दुर्दैशा बघून त्यांना फार वाईत वाटले, बुध्दाच्या मूर्ती, पिल्लर्स व अनेक शिल्प महंतानि आपल्या मठात अस्त व्यस्त ठेवले होते, त्याची मागणी केली असता त्यांनी नकार दिला. ज्या ठिकाणी बुद्ध पद्मासन अवस्थेत बसले होते ते ठिकाण म्हणजे वज्रांसन व बुध्दाच्या अस्थी फेब्रुवारी १८८१ ला शोधून काढले व १८८५ मध्ये त्यावर पुस्तक लिहिले.

१८७७ मध्ये सम्राट अशोकाचे शिळालेख फोटोसहीत प्रसिद्ध केले.

१८७९ ला भहरूत स्तुपाचे उतखनन केले की जो स्तूप पुष्यमित्र शुन्गने जीर्णोद्धार केला होता.

मिगारमाता विशाखाने बुध्दाकडे पाच प्रॉमिस मागितले होते, परंतु अलेक्झांडर कंनींघम आपल्या भिलसा टोप्स मध्ये नमूद करतात की मिगारमाता विशाखाने बुध्दाकडे एकूण सात प्रॉमिस मागितले, ६ वे प्रॉमिस चैत्य स्तुपाची पूजा करणे व दिवा बत्ती करणे, ७ वे प्रॉमिस चैत्य स्तूपाची देखभाल करणे व दुरुस्ती करणे. (भिलसा टोप्स पेज न. ३६ to ४० पायथ्यागोरस हे भूमितीय शास्त्रज्ञ होते A चा वर्ग + B चा वर्ग = C चा वर्ग हा त्यांचा जगप्रसिद्ध सिद्धांत आहे, परंतु त्यांनी पायथ्यागोरियन नावाचा बुद्धिस्ट संघ स्थापन

केला होता. त्यांचा प्राचीन सिद्धांत A = बुद्ध म्हणजे माईंड, B = धम्म म्हणजे मॅटर आणि C = संघ म्हणजे मार्केट प्लेस.)

जेम्स प्रिन्सेप, अलेक्झांडर कँनिंगहम, जेम्स फर्ग्युशन आणि चार्ल मेशन यांनी संपूर्ण भारतात फिरून फक्त बुद्धिझमचाच इतिहास शोधून काढला व जगासमोर आणला, सम्राट अशोकचा इतिहास जगासमोर आणला, त्यांना भारत भ्रमन करीत असताना इतरही काही धार्मिक स्थळें दिसली असतील परंतु त्यांच्या संदर्भ ग्रंथामध्ये जरापण उल्लेख नाही. कारण त्याचे व्हिजन होते, ध्येय होते फक्त बुद्ध आणि बुद्धच. जन्माने जरी ते स्कॉटीश असले परंतु मनाने, विचाराने आणि कृतीने श्रेष्ठ बुद्ध उपासक होते, चायनीस प्रवासी हुयानत्संगने जसे भारताचा बुद्धिझमचा इतिहास लिहून ठेवला मात्र जेम्स प्रिन्सेप आणि अलेक्झांडर यांनी हजारो वर्षाचा बुद्धीझमचा इतिहास उतखनन करून एकूण ३३ वोलूम्स लिहिले, परंतु जेम्स प्रिन्सेपचे अचानक निधन झाल्यामुळे यांनी हे सर्व वोलूम्स पब्लिश केले.

अश्या या महान व्यक्तीला बुद्ध धम्माचे महान कार्य आर्चीऑलोजिकल दृष्टीकोनातुन पुनरस्थापीत केल्या बद्दल त्यांच्या २१० व्या जन्मदिनाच्या निमित्ताने विनम्र अभिवादन.

–शामराव सोमकुवर

🌐🌐🌐🌐🌐🌐🌐🌐

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २४ जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, बुधवारो, फुस्स मासो, बुधवार, पौष माहे.

२४ जानेवारी १९३७, रोजी सोलापूर जिल्ह्यातील मंढूप, वळसंग, बार्शी, कुर्डुवाडी टेंभुर्णी, करमाळा येथे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या भाषणात "ज्यांना पक्ष नाही, धेय्य नाही, तत्त्व नाही अशा अधांतरी लोंबकळणाऱ्या उमेदवारांना निवडून देऊ नका." असे सांगितले.

२४ जानेवारी १९३८, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबई विधानसभेत (Small Holder's Bill) लघुधारकांच्या विधेयकावर भाष्य केले.

२४ जानेवारी १९३९, रोजी स्वतंत्र मजूर पक्षाची सोलापूर येथे सभा संपंन्न झाली.

२४ जानेवारी १९४२, रोजी आंबेडकरी चळवळीच्या कार्यकर्त्यांनी नागपूर येथे महात्मा गांधींना काळी निशाणे दाखवून आपला विरोध दर्शविला.

२४ जानेवारी १९५०, रोजी संविधानसभा बैठक झाली आणि सर्व २४४ सदस्यांनी भारतीय राज्यघटनेवर सही केली. भारतीय संविधनावर हस्ताक्षर करण्यास इंग्रजी व हिंदी मधील हस्तलिखित प्रत व इंग्रजी छापिल प्रत अशा संविधानाच्या तीन प्रती सभेच्या पटलावर ठेवण्यात आल्या.

२४ जानेवारी १९५४, रोजी अखिल भारतीय साई भक्त संमेलणाचे मुंबई झेवियर कॉलेजच्या मैदानावर उद्घाटन प्रसंगी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात "खऱ्या आणि श्रेष्ठ धर्माची पुनर्स्थापना करण्याचे बिकट कार्य भावि पिढीवर येऊन पडले आहे." असे सांगितले.

२४ जानेवारी २००८, रोजी "राष्ट्रीय बालिका दिवस" महिला तसेच बालविकास भारत सरकारने २००८ मध्ये याची सुरुवात केली. यामधे मुलींना वाचवा, मुलांचा सेक्स रेशियों आणि बालिकांसाठी स्वस्थ आणि सुरक्षित वातावरण बनविण्यासोबतच जागरूकता कार्यक्रम आयोजित करणे संमिलित आहे.

*२४ जानेवारी २०१९, "आतंरराष्ट्रीय शिक्षक दिन" २४ जानेवारी हा आंतरराष्ट्रीय शिक्षण दिन म्हणून तो शिक्षणाला समर्पित आहे. ३ डिसेंबर २०१८ रोजी संयुक्त राष्ट्र महासभेने जागतिक शांतता आणि शाश्वत विकासासाठी शिक्षणाच्या भूमिकेचा उत्सव म्हणून २४ जानेवारी हा "आंतरराष्ट्रीय शिक्षण दिन" म्हणून घोषित करणारा ठराव मंजूर केला. *

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

💎💎🦚🦚🦚🦚राष्ट्रीय बालिका दिवस 🦚🦚🦚🦚💎💎

😘🌹❤️🎂🥳🍰🎉🍫🎊

राष्ट्रीय बालिका दिवस भारत में हर साल २४ जनवरी को मनाया जाता है..। इसकी शुरुआत महिला एवं बाल विकास, भारत सरकार ने २००८ में की थी। इस दिन को विभिन्न कार्यक्रमों का आयोजन किया जाता है, जिसमें सेव द गर्ल चाइल्ड, चाइल्ड सेक्स रेशियो, और बालिकाओ के लिए स्वास्थ्य और सुरक्षित वातावरण बनाने सहित जागरूकता कार्यक्रम आयोजित करना शामिल है.

२४ जनवरी के दिन पूर्व प्रधानमंत्री इंदिरा गांधी को नारी शक्ति के रूप में याद किया जाता है..। इस दिन इंदिरा गांधी पहली बार प्रधानमंत्री के रूप में कर्यभाल संभाला था। इसलिए इस दिन को राष्ट्रीय बालिका दिवस के रूप में मनाया जाता है। २०१९ में, इसे 'एम्पॉवरिंग गर्ल्स फॉर ए ब्राइटर टुमॉरो' की थीम के साथ मनाया गया|

उद्देश...

देश में लड़कियोंद्वारा सामना की जाने वाली सभी असमानताओं के बारे में लोगों में जागरूकता फैलाना.

बालिकाओं के अधिकारों के बारे में जागरूकता को बढ़ावा देना.

बालिका शिक्षा, स्वास्थ्य और पोषण के महत्व पर जागरूकता बढ़ाना.

❄❄❄❄❄🏵❄❄❄❄❄

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २५ जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, गुरूवारो, फुस्स मासो, गुरूवार, पौष माहे.

२५ जानेवारी १९३७, रोजी जळगाव येथे राजकीय हक्कासंबंधी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण.

२५ जानेवारी १९३७, रोजी जळगाव जामनेर येथे झालेल्या जंगी सभेत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या भाषणात "भूलथापास बळी न पडता सावधगिरीने वागले पाहिजे." असे सांगितले.

२५ जानेवारी १९३८, रोजी अहमदनगर जिल्ह्यातील कंप सदर शनिच्या देवळामागील भव्य मंडपात अस्पृश्य समाजाची जंगी सभेत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अध्यक्षीय भाषणात "खोटे दस्तऐवज करणारे गरीब, शेतकरी, कामकरी लोकांचे कल्याण करील काय?" असे सांगितले.

२५ जानेवारी १९४८, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लखनौ येथे शेतकरी कामगार फेडरेशनची बैठक संपंन्न.

२५ जानेवारी १९४८, रोजी भारताच्या स्वातंत्र्याच्या पुढल्या वर्षी म्हणजे १९४८ पासून भारत देशात "राष्ट्रीय पर्यटन दिन" साजरा करण्यास सुरुवात झाली.

२५ जानेवारी १९५०, रोजी राष्ट्रीय मतदार दिन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

💎💎🦚🦚🦚🦚राष्ट्रीय मतदार दिन. 🦚🦚🦚🦚💎💎

राष्ट्रीय मतदार दिवस दरवर्षी २५ जानेवारी रोजी भारतभर साजरा केला जातो. हा दिवस प्रत्येक भारतीय मतदारांसाठी, नागरिकांसाठी अतिशय महत्त्वाचा आहे. या दिवशी भारतातील प्रत्येक नागरिकाने आपल्या देशाच्या प्रत्येक निवडणुकीत सहभागी होऊन आपली जबाबदारी पार पाडण्याची शपथ घ्यावी. कारण भारतातील प्रत्येक मतदाराचे मत देशाच्या भविष्याचा पाया घालते. म्हणून प्रत्येक व्यक्तीचे मत राष्ट्रनिर्मितीत अमूल्य आहे.

जगातील भारतासारख्या सर्वात मोठ्या लोकशाही मध्ये मतदानासंदर्भात घसरणारा कल पाहता मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी राष्ट्रीय मतदार दिन साजरा केला जातो. भारतात होणारी प्रत्येक निवडणूक चांगल्या पद्धतीने पार पाडण्याची जबाबदारी भारतीय निवडणूक आयोगाची आहे. भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी झाली.

दिवसेंदिवस मतदानाविषयी वाढणारी उदासीनता व मतदानाची घसरणारी शेकडेवारी यामुळे निवडणुकीत लोकांचा सक्रिय सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने सन २०११ पासून

भारत सरकारने भारत निवडणूक आयोगाचा स्थापना दिन २५ जानेवारी हा दिवस "राष्ट्रीय मतदार दिन" म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली.

देशाच्या राजकीय प्रक्रियेत जास्तीत जास्त लोकांनी सहभाग घ्यावा व मतदारांना आपल्या मतदानाच्या कर्तव्याची जाणीव व्हावी यासाठी शासनाकडून व विविध सामाजिक संस्थांकडून या दिवशी मतदार जनजागृती साठी अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. मतदार जनजागृती रॅली काढली जाते. त्यातून नागरिकांना राष्ट्राप्रती असलेल्या त्यांच्या कर्तव्याची आठवण करून दिली जाते. देशाची लोकशाही मजबूत करण्यासाठी सर्वच मतदारांना मतदान प्रक्रियेत सहभागी होणे आवश्यक आहे. त्यामुळे खरे प्रतिनिधित्व देशापुढे येईल. कारण अनेकांनी मतदान न केल्यामुळे त्यांचा देशाला मिळालेला प्रतीनिधित्वाबद्दलचा कल लक्षातच येत नाही. त्याचप्रमाणे मतदारांचे केवळ एक मत सुद्धा प्रतिनिधित्व बदलू शकते.

म्हणून देशाचा कारभार सांभाळणारे प्रतिनिधित्व निवडतांना योग्य व्यक्तीची निवड करण्यासाठी भारतातील प्रत्येक मतदाराने मतदानाच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेणे निकडीचे आहे. भारतीय संविधानाने मतदारांना दिलेला मतदानाचा हक्क खुप अनमोल आहे. त्यामुळे आपल्या मतदानाचा हक्क सुज्ञपणे वापरून देशाला विकासाच्या मार्गावर घेऊन जाण्यासाठी आणि देशाची प्रगती साधण्यासाठी प्रत्येक मतदारांनी जागृत झाले पाहिजे. देशाच्या मतदारांच्या एकूण संख्येत तरुण वर्गाची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे तरुणांनी देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी अधिकाधिक सहभागी होऊन स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या लोकशाहीच्या मूल्यांना अधिक बळकट करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न होणे गरजेचे आहे. त्यातूनच भारताची लोकशाही अखंड राहील. मतदान प्रक्रियेत मतदारांचा जास्तीत जास्त सहभाग नोंदवणे, तसेच देशासाठी योग्य प्रतिनिधी निवडण्यासाठी मतदारांना मतदानाबद्दल जागृत करणे हे राष्ट्रीय मतदार दिनाचे उद्दिष्ट आहे.

या उद्दिष्टपूर्तीसाठी तसेच देशात निष्पक्ष निवडणुका घडवून आणून भारतीय लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाचे ही महत्त्वपूर्ण योगदान आहे. आज राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने देशातील प्रत्येक मतदाराने आपल्या सक्रीय सहभागाच्या आधारे व आपली सांविधानिक जबाबदारी पार पाडून लोकशाही मजबूत करण्याचा प्रयत्न संकल्प केला पाहिजे. शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते, "मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो.

❄❄❄❄❄🏵❄❄❄❄❄

☸☸🔵🔵🔵 पौष पौर्मिमा (फुस्स मासो पुंन्नमि) 🔵🔵🔵☸☸

पौष पौर्णिमेला पाली भाषेत 'फुस्समासो' म्हणतात. ही पौर्णिमा साधारणतः जानेवारी महिन्यात येते. या पौर्णिमेला भगवान बुद्धाच्या जीवनातील काही घटना घडल्यात. उदा. भगवान बुद्धाची राजगृहाला भेट, राजा बिंबिसाराची धम्मदीक्षा, श्रीलंकेत पौर्णिमेचे महत्त्व, चैत्यपूजेचे महत्त्व. या पौर्णिमेला ज्या घटना घडल्यात, त्यांचा संक्षिप्तपणे परिचय असा.

१) भगवान बुद्धाची राजगृहाला भेट २) राजा बिंबिसाराची धम्मदीक्षा ३) महाराणी खेमा यांची धम्मदीक्षा ४) स्तूपाची पूजा.

१) भगवान बुद्धांची राजगृहाला भेट:

यो च वंतकसावस्स, सिलेसू सुसमाहितो| उपेतो दमसच्चेन, स वे कासावमरहित|| (धम्मपद: १०)

अर्थ: ज्याने स्वतःच्या मनाच्या मळाला दूर केले आहे, जो सदाचारी आहे, असा सत्य आणि संयमयुक्त व्यक्ती काषाय वस्त्राचा अधिकारी बनतो.

सिद्धार्थ गौतमाने कपिलवस्तू सोडल्यावर मगध देशाची राजधानी येथे जाण्याचा विचार केला. राजा बिंबीसार हा तेथे राज्य करित होता. मोठमोठे तत्वज्ञ आणि विचारवंत यांनी 'राजगृह' हे आपले मुख्य निवासस्थान बनविले होते. हा विचार मनात ठेवून गंगेच्या वेगवान प्रवाहाची तमा न बाळगता सिद्धार्थ हा नदीचे पात्र ओलांडून पुढे गेला.

राजगृह दीर्घ आणि खडतर प्रवास केल्यानंतर पाच टेकड्यांनी वेढलेल्या पर्वतराजींनी रक्षिलेल्या व सुशोभीत केलेल्या आणि मंगल व पवित्र अशा स्थळांत झालेल्या राजगृह नगरीत गौतम येऊन पोहोचला.

पुनीत राजगृहास आल्यावर पांडव टेकडीच्या पायथ्याशी एक जागा त्याने निवडली. तेथे तात्पुरती वस्ती करण्यासाठी एक लहानसी पर्णकुटी त्याने तयार केली. कपिलवस्तू ते राजगृह हे ४०० मैलांचे अंतर आहे. एवढा लांबचा पल्ला गौतमाने पायीचं गाठला.

दुसऱ्या दिवशी सिद्धार्थ गौतम उठला आणि भिक्षेकरिता शहरात जाण्यासाठी निघाला. तेव्हा त्याच्या भोवती प्रचंड जनसमुदाय होता. त्यावेळी मगधापती श्रेणीय बिंबिसार राजाने हा प्रचंड जनसमुदाय पाहिला.

सिद्धार्थ मिळेल ती भिक्षा स्वीकारून तो पर्वताच्या एका निवांत कोपऱ्यात जाऊन बसला आणि तेथे अन्नसेवन करून तो पांडव टेकडीवर चढून गेला. राजसेवकांनी राजाला सर्व हकीकत सांगितली. लवाजमा घेऊन टेकडी चढून गेला. त्यानुसार बिंबिसार राजा मोजकाच शारीरिक सौंदर्य आणि पूर्ण मनशांती यामुळे वैशिट्यपूर्ण दिसणाऱ्या गौतमाला राजाने पाहिले आणि आश्चर्यचकित होऊन प्रेमपूर्वक आदरभावाने तो त्याच्याजवळ गेला. राजा खडकाच्या स्वच्छ पृष्ठभागावर बसला आणि आपल्या मनस्थितीची कल्पना देण्याच्या हेतूने म्हणाला;

"धर्म, संपत्ती आणि सुख यांच्या नियमांना अनुसरून तु वाग. प्रेम आणि इतर गुणांना तु अनुसर. जीवनाची ही तीन उद्दिष्टे आहेत. जेव्हा मानसे मरतात, तेव्हा केवळ या जगपूर्तीच त्यांचा अंत होतो."

याप्रमाणे मगध राजाने गौतमाला योग्य आणि खंबीर शब्दात उपदेश केला. तो ऐकल्यावर राज्पुत्र डळमळला नाही. तो पर्वताप्रमाने अचल राहिला आणि म्हणाला;

"जगातील कलहामुळे मी घायाळ झालो आहे आणि शांतता मिळविण्याच्या इच्छेने मी बाहेर पडलो आहे. या दुःखाचा अंत करण्याऐवजी या पृथ्वीचेच राज्य काय पण स्वर्गलोकाच्याही राज्याची मी अपेक्षा करनार नाही." शेवटी बिंबिसार राजाने हात जोडून उत्तर दिले, "तुझी पूर्ण तु पूर्ण करण्यास माझी हरकत नाही. तुला जे जे काही

करावयाचे आहे ते ते सिद्धिस गेल्यानंतर मला भेटण्याची कृपा कर." पुन्हा भेटण्याचे निश्चित आश्वासन गौतमाकडून घेतल्यावर राजा आपल्या सेवकांसह राजवाड्याकडे परतला.

राजगृह सुखिसमृद्ध हे मगध साम्राज्याची शेकडो वर्षे राजधानी राहिलेले वैभवशाली, असे महानगर व मुख्य बाजारपेठ होते. इ. स. पू. ५४३ ते ४९९ या काळखंडात राजगृह नगरी बिंबिसार राजाची राजधानी होती.

बिंबिसार राजाच्यावेळी तथागताच्या धम्माचा प्रभाव संपूर्ण मगध राज्यात वाढला होता. त्यावेळी अनेक राज्यांचे राजे भगवान बुद्धांचे निष्ठावंत उपासक झाले होते. राजगृह हे भगवान बुद्धांच्या धम्मप्रचाराचे प्रमुख केंद्र होते. राजगृह व त्याच्या आसपास बौद्ध धम्माची १८ साधना केंद्रे होती. राजगृह हे बौद्ध धम्माचे प्रमुख केंद्र होते. भगवान बुद्ध हे राजगृहाला एकूण २४ वेळा गेले होते. असा उल्लेख आहे.

तथागतांनी 'राजगृहातील सर्व स्थळे फार रामणीय व सुंदर आहेत.' अशी प्रशंसा केली होती. ही सर्वच ठिकाणे तथागतांना आवडत असत.

भगवान बुद्धांचे महापरिनिब्बाण झाल्यानंतर कुशीनाराहून भगवंतांच्या पावन अस्थींचा एक भाग राजगृहाला आणण्यात आला आणि त्यावर नवीन राजगृहाच्या वेशीच्या दरवाजाच्या बाहेर एक भव्य अस्थिस्तूप बांधला गेला. त्यावेळी महाकाश्यापांनी त्याचे धातूनिदान केले होते. त्यांनी स्वर्णपत्रावर लिहिले होते, "पुढे भविष्यात प्रियंदर्शी नावाचा राजकुमार राजछत्र धारण करून तो धर्मराजा होईल आणि तोच भगवंतांच्या पवित्र धातूंचा जंबुद्वीपात सर्वत्र विस्तार करेल."

अशाप्रकारे, सुरुवातीला बिंबिसार राजाचा अर्ध राज्य देण्याचा प्रस्ताव सिद्धार्थने नाकारला होता आणि सम्यक संबुद्ध झाल्यानंतर पुन्हा राजगृहाला भेट देण्याचे वचन दिले होते. तो दिवस इ. स. पू. ५३४ मार्गशीर्ष पौर्णिमेचा होता आणि ज्ञानप्राप्तीनंतर जेव्हा सम्यक संबोधी बनून तथागत वचनपूर्तीसाठी राजगृहास आले, तो दिवस पौष पौर्णिमा इ. स. पू. ५२७ चा होता.

२) राजा बिंबिसाराची धम्मदिक्षा:

अक्कोच्छि मं अवधी मं, अजिनि मं अहासि मे| ये च तं उपनहंति, वेरं तेसं न संमति|| (धम्मपद: ३)

अर्थ: मला शिवी दिली, मला मारले, मला हरविले, मला लुबाडले या गोष्टींचा जो विचार करीत असतो, त्याचे वैर कधीच शमन पावत नाही.

राजगृह ही मगधराज श्रेणीय बिंबिसाराची राजधानी होती. त्या राजधानीत फार मोठ्या संख्येने जटीलांनी धम्माची दिक्षा घेतली. त्यामुळे प्रत्येकजण भगवान बुद्धांविषयी चर्चा करू लागला.

राजा बिंबिसाराला भगवान बुद्ध शहरात आल्याचे कळले. अत्यंत सनातनी आणि दुराग्रही जटीलांना धम्मांतर करण्यास लावणारा माणूस निश्चितच अरहंत किंवा सम्यक संबुद्ध असला पाहिजे, असा विचार राजाने आपल्या मनाशीच केला.

राजा बिंबिसार मगधातील दशसहस्त्र ब्राम्हण आणि गृहस्थ यांच्यासह भगवान बुद्धांकडे गेला. भगवंतांच्या समोर जाऊन त्यांना अभिवादन केले आणि हात जोडून तथागतासमोर बसले. बुद्धांच्या बरोबर असलेल्या भिक्खुंमध्ये उरुवेला काश्यपदेखील होता.

त्यावेळी उरुवेला काश्यप आपल्या असणावरून उठला. आपले उत्तरीय वस्त्र त्याने एका खांद्यावर नीट ठेवले. भगवंतांच्या चरणी नतमस्तक झाला आणि म्हणाला, "तथागत माझे गुरु आहेत. मी त्यांचा शिष्य आहे."

याचा परिणाम तेथील उपस्थित द्वादश दशसहस्त्र ब्राम्हणांच्या आणि गृहस्थांच्या मनावर झाला. भगवंतांनी त्या सर्वांना धम्माचा उपदेश दिला. त्यावेळी एक हजार लोकांनी बुद्धांचे उपासक असल्याचे जाहीर केले.

भगवान बुद्धांनी प्रतिपादान केलेला धम्म समजल्यावर मगधराज श्रेणीय बिंबिसार भगवंतांना म्हणाला, "भगवान, पूर्वी मी राजपुत्र असतांना माझ्या ज्या पाच इच्छा होत्या त्या आता पूर्ण झाल्या आहेत." त्या पाच इच्छा अशा आहेत;

भगवान, मी पूर्वी राजपुत्र असतांना माझ्या मनात विचार आला, माझा राज्याभिषेक झाला तर किती छान होईल. एखादा अरहंत सम्यक संबुद्ध माझ्या राज्यात आला तर किती चांगली गोष्ट होईल. भगवंतांची सेवा करणे मला शक्य झाले तर किती चांगली गोष्ट होईल. भगवंताने मला आपला धम्म शिकवावा आणि शेवटी भगवंतांचा धम्म मला कळावा. या पाचही इच्छा माझ्या पूर्ण झाल्या आहेत.

या पाचही इच्छा पूर्ण झाल्यावर मगधराज श्रेणीय बिंबिसार म्हणाला, "आश्चर्य, हे भगवान, आश्चर्य! जे विस्कळीत झाले आहे त्याची घडी नीट बसवावी. जे गुप्त होते ते प्रकट करावे. वाट चुकलेल्याला मार्ग दाखवाव. ज्यांना डोळे आहेत त्यांना पाहता यावे. त्याप्रमाणे भगवंतांनी अनेक मार्गांनी धम्माची शिकवण दिली. हे केवढे आश्चर्य!"

असे म्हणून राजा बिंबिसार म्हणाला, "भगवण, मी भगवान बुद्धाला, धम्माला आणि संघाला शरण यवत आहे. भावंतांनी आजपासून मला आपला उपासक शरणागत उपासक म्हणून माझा स्वीकार करावा."

असे म्हणून राजा बिंबिसाराणे तेथेच धम्माची दिक्षा घेतली. तेथे उपस्थित सर्व नागरिकांनीही धम्मदिक्षा घेतली. तो जनतेचा धम्म झाला. राजासह सर्व नागरिक बौद्धधम्माचे उपासक झाले, तो दिवस पौष पौर्णिमेचा होता. इ. स. पू. ५२७.

३) महाराणी खेमा यांची धम्मदिक्षा:

ये रागरत्तानुपतंती सोतं, संयक्तं सयंकतं मक्कटकोव जालं| एतंपी छेत्वान वजंती धीरा अनपेक्खींनो सब्बदुःखं पहाय|| (धम्मपद : ३४७)

अर्थ: जे लोक रागात रत आहेत, जे स्वतः निर्माण केलेल्या जाळ्यात कातीन जशी सापडते तसे सापडतात, पण धीर पुरुष याला छेदून, अपेक्षारहित होऊन, सर्व दुःखांचा त्याग करून वाटचाल करतात.

मगधराज श्रेणीय राजा बिंबिसाराणे भगवान बुद्धांना त्यांच्या भिक्खूसंघासह दुसऱ्या दिवसी भोजनाचे निमंत्रण दिले. भगवंतांनी ते मुक संमती देऊन स्वीकारले. भोजनानंतर राजा बिंबिसाराणे राज्य परिवारातील सदस्यांना धम्मदिक्षा देऊन उपासक करावे, अशी विनंती केली.

भगवंतांच्या सानिध्यात येऊन आणि त्यांच्या मार्गनिदर्शणामुळे महाराजा बिंबिसारचे जीवनच बदलून गेले होते. राजा बिंबिसारावर एवढा परिणाम झाला होता की, राजा बिंबिसारास श्रोतापन्न अवस्था प्राप्त झाली.

परंतु राजा बिंबिसारास एकच चिंता होती की, त्याची राणी खेमा ही भगवान बुद्धांना आदर देत नव्हती. ती अत्यंत देखणी होती. तिचा जन्म महाराष्ट्रात सागल नावाच्या नगरात राजकुळात झाला होता. तिचे लग्न मगध देशाच्या बिंबिसार राजाबरोबर झाले होते.

राजगृहाजवळ वेळुवनात भगवान बुद्ध राहत असता बिंबिसार ताजा वारंवार त्यांच्या दर्शनास जात असे. रूपावर आसक्त होऊ नका, असे वैराग्यावर उपदेश भगवान करित असतो, असे खेमाच्या ऐकण्यात आल्यामुळे ती वेळुवनात जाऊ इच्छित नव्हती.

राजाने आपल्या पदरच्या कविकडून वेळुवनातील वनश्रीवर काव्य रचून ते तिच्या समोर म्हणावयास लाविले. उद्यानश्रींचे ते रसभरीत वर्णन एकूण खेमाला तिकडे जाण्याची उत्कट इच्छा झाली. राजाची तीने परवानगी मागितली. राजा म्हणाला, "वेळुवनात जाऊन भगवंतांचे दर्शन घेतल्याशिवाय येता कामा नये."

खेमा वेळुवणाची शोभा पाहून बुद्धदर्शन घेतल्यावाचून माघारी येऊ लागली. तेव्हा तिला दिलेल्या राजाज्ञेची आठवण आली. त्यामुळेच नाखुशीनेच तिला भगवंताचे दर्शन घेणे भाग पडले.

भगवंताजवळ येऊन पाहते, तर त्यांच्या मागे एक अत्यंत लावण्यवती स्त्री वारा घालीत उभी होती. तिला पाहून खेमा आपल्या मनात म्हणाली, 'अशा दिव्य स्त्रिया ज्या महर्षींच्या सेवेला तत्पर असतात, त्याच्या दर्शनाची मला लाज वाटाविना? धिक्कार असो मला आणि माझ्या आढ्यतेला! ह्या अप्सरेची मी दासीदेखील शोभणार नाही.'

हे विचार खेमेच्या मनात चालले असतांना ती सुंदर स्त्री क्रमाक्रमाणे पालटत चालली. ती प्रौढ, म्हातारी व मरून पडलेली दिसली. हे पाहून आपल्या रूपाविषयी खेमेचा अभिमान नाहीसा झाला.

तेव्हा भगवान म्हणाले, "कोळ्याच्या जाळ्याप्रमाणे आपल्याभोवती जाळे विनून त्यात कामासक्त मनुष्य बद्ध होतात. परंतु हेही तोडून आणि कामसुखाचा त्याग करून (सत्पुरुष) निरपेक्षपने परिव्राजक होतात."

हा उपदेश कानी पडल्याबरोबर खेमा तिथल्या तिथे अरहंतपदाला पावली. पुढे राजा बिंबिसाराच्या परवानगिने ती भिक्षुणि झाली. ती केवळ भिक्षुणिच झाली नाही तर प्रज्ञावती भिक्षुणित तिला अग्रस्थान मिळाले.

४) स्तुपाची पूजा:

सद्धो सिलेन संपन्नो, यसोभोगसमप्पितो| यं यं पदेस भजति, तत्थ तत्थेव पूजति|| (धम्मपद : ३०३)

अर्थ: जो श्रद्धावान आहे, जो सदाचारी आहे, जो यशस्वी आहे, जो संपत्तिशाली आहे, तो जिथेजिथे जातो तिथेतिथे तो पूजीत होतो.

श्रीलंकेच्या इतिहासात पौष पौर्णिमेला अतिशय महत्वाचे स्थान आहे. या दिवसी भगवान बुद्धांचे श्रीलंकेत आगमन झाले होते. असी त्यांची मान्यता आहे.

श्रीलंकेच्या 'उवा' भागातील 'महियांगण' या परिसराला बुद्धांच्या प्रथम पादस्पर्शाचे भाग्य लाभले. भगवान बुद्धांच्या केशधातुवर भव्य स्तूपाची निर्मिती झाली. भगवान बुद्धांच्या शारीरिक अवशेषांना अतिशय पवित्र मानले जाते. त्या प्रति पूज्य आदरभाव व्यक्त केला जातो.

दिघनिकायातील 'महापरीनिब्बाण सुत्तात' असा उल्लेख आहे की, भगवान बुद्धांच्या अंत्यसंस्कारानंतर मल्ल राजाने एका स्वर्णपात्रात बुद्धावशेष गोळा करून सन्मानाने अत्यंत आदरपूर्वक कुसीणारा येथे सात दिवस ठेवले. त्यानंतर त्याचे आठ भागात विभाजन करून आठ विभिन्न राज्यांत पाठविले. त्यावर भव्य स्तूप उभारण्यात आले. सम्राट अशोकाने त्यांच्या राज्याभीषकाच्या आठव्या वर्षी या स्तुपांचे उत्खणन करविले आणि त्यात सापडलेल्या बुद्धावशेषांवर चौऱ्यांशी हजार स्तूपांची निर्मिती केली.

सम्राट अशोकपुत्र अरहंत महेंद्र थेरो यांच्या श्रीलंका भेटीने आणि श्रीलंकेतील धार्मिक राजांच्या सहयोगाने बुद्धांचे जवळजवळ सर्व प्रकारचे अवशेष श्रीलंकेने जतन करून ठेवले आहेत.

भगवान बुद्धांच्या पश्चात बौद्धजगत तीन प्रकारच्या चैत्यांची पूजा करते. १) बुद्धांचे शारीरिक अवशेष, २) पारिभोगिका (भगवान बुद्धांनी) वापरलेल्या वस्तू, ३) उद्देशिका, बुद्धावशेष ज्या चैत्यात, स्तूपात ठेवले जातात अशा चैत्याची वा स्तुपाची पूजा केली जाते. बुद्ध प्रतिमास पाहून प्रसिद्ध तत्ववेत्ता काउंट केसलिंग लिहितो;

"बुद्धरूपापेक्षा जगात आणखी काही भव्य असेल असे मला वाटत नाही. डोळ्यांनी पाहता आलेले आध्यात्मिकतेचे ते परिपूर्ण मुर्त्तरुप आहे."

पौष पौर्णिमेला श्रीलंकेत जशी स्तूपांची पूजा करतात तद्वत भारतात देखी स्तूपाची वा प्रतिमेची पूजा केली जाते.

सर्वांचे मंगल होवो!!!

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २६ जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, सुक्कवारो, फुस्स मासो, शुक्रवार, पौष माहे.

२६ जानेवारी १९२२, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लंडनहून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना पत्र.

२६ जानेवारी १९४४, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, मजूर मंत्री प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली लखनौ येथे कामगार स्थायी समितीची बैठक संपंन्न झाली.

२६ जानेवारी १९५०, रोजी "प्रजासत्ताक गणतंत्र दिवस" भारतीय राज्य घटनेनुसार प्रजासत्ताक शासन प्रणाली प्रारंभ. सार्वभौम लोकशाही गणराज्य घोषित झाले. अशोक स्तंभावरील सिंहसिर्षाच्या आधारे भारताची राजमुद्रा स्वीकारण्यात आली.

२६ जानेवारी १९६२, रोजी मुंबईत जुन्या सचिवालायाच्या बाजूच्या प्रांगणात विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा उभारण्यात आला.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 देशाची राज्यघटना आणि प्रजेची सत्ता 💎🦚🦚🦚☸☸

भारत १५ ऑगस्ट १९४७ रोजी इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला आणि २६ जानेवारी १९५० ला आपली राज्यघटना अंमलात आली. म्हणजेच भारत देश प्रजासत्ताक गणराज्य झाला. याच राज्यघटनेनुसार आजही आपले सरकार, आपली राज्यव्यवस्था आणि एकूणच राज्यकारभार चालतो.

पण ही राज्यघटना कशी तयार झाली याबद्दल बरेच जण अनभिज्ञ आहेत. चला जाणून घेऊयात स्वातंत्र्यानंतर प्रजासत्ताक दिनापर्यंतची परिस्थिती आणि राज्यघटनेसाठीचे प्रयत्न....

घटनेचा पहिला मसुदा : देश स्वतंत्र झाला असला, तरी देश चालविण्यासाठी घटना अजून तयार नव्हती. ९ डिसेंबर १९४६ पासून घटना समितीच्या बैठका सुरू झाल्या होत्या.

🔹 १४१ दिवसांच्या परिश्रमानंतर घटना समितीने पहिला मसुदा तयार केला. तो दिवस होता ३ नोव्हेंबर १९४७. पण हा काही अंतिम असुदा नव्हता.

🔹 डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्त्वाखाली पुढच्या अडीच वर्षांत घटना समितीची एकूण १२ सत्र पार पडलीत. घटनेतील प्रत्येक शब्द तोलून–मापून आणि सर्व विचारांती लिहिण्यात आला.

🔹 २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय राज्यघटना स्वीकारण्यात आली, म्हणून तो दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो.

🔹 आणि २६ जानेवारी १९५० ला ती देशात अमलात आणली गेली. तेव्हापासून आजपर्यंत आपण एक प्रजासत्ताक, सार्वभौम राष्ट्र म्हणून ओळखिले जातो.

📖 भारतीय संविधानाची निर्मिती :

🔹 भारतात अनेक जाती आणि धर्मांचे, वेगवेगळ्या संस्कृतीचे, वर्गाचे लोक एकत्र राहतात. भारतीय लोकशाहीमुळेचं वेगवेगळ्या गटांना संसदेमध्ये प्रतिनिधित्त्व मिळाले आहे.

🔹 भारतीय लोकशाही बळकट करण्याचे श्रेय हे भारतीय स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेच्या निर्मिती प्रक्रियेलाच द्यावे लागेल.

🔹 डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ड्राफ्टींग कमिटीचे म्हणजेच घटनेच्या मसुदा समितीचे प्रमुख होते.

🔹 भारतीय संविधानाचे स्वरूप कसे असावे, त्याची चौकट त्यांनी आखली होती. विविध विषयांवरील तज्ज्ञांकडून मिळणारी माहिती, त्यांच्या सूचना ध्यानात घेऊन त्या

राज्यघटनेत कशा येतील याचा विचार बाबासाहेबांनी केला.

🔹 राज्यघटनेच्या निर्मितीमध्ये त्यांनी जो मोठा वाटा उचलला आहे त्यामुळे त्यांना राज्यघटनेचा शिल्पकार म्हंटले जाते.

🔹 राज्यघटना तयार करण्याची प्रक्रिया ही प्रदीर्घ होती. ९ डिसेंबर १९४६ रोजी भारताची घटना समिती पहिल्यांदा एकत्र आली आणि त्यांनी भविष्यातल्या भारताची दिशा ठरविली.

🔹 डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची घटनेच्या मसुदा समितीवर नियुक्ती २८ ऑगस्ट १९४७ रोजी झाली. १४१ दिवसांच्या परिश्रमानंतर घटना समितीने पहिला मसुदा तयार केला. तो दिवस होता ३ नोव्हेंबर १९४७.

🔹 भारताच्या स्वातंत्र्यानंतर पुढील अडीच वर्षांत संसदेमध्ये घटना समितीची एकूण १२ सत्र पार पडलीत. घटनेतील प्रत्येक शब्द तोलून–मापून आणि पूर्ण विचारांती लिहिण्यात आला.

🔹 ९ डिसेंबर १९४६ रोजी घटना समितीच्या सदस्यांची पहिली बैठक झाली होती. त्यानंतर २ वर्षे ११ महिने आणि १८ दिवसांच्या परिश्रमानंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी राज्यघटनेचा मसुदा तयार झाला.

🔹 २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय राज्यघटना स्वीकारण्यात आली आणि २६ जानेवारी १९५० ला ती अंमलात आणली गेली. तेव्हापासून आजपर्यंत आपण एक प्रजासत्ताक, सार्वभौम राष्ट्र म्हणून ओळखिले जातो.

☸☸🦚🦚🦚💎 भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त वैशिष्ट्यपूर्ण माहिती. 💎🦚🦚🦚☸☸

दरवर्षी २६ जानेवारी रोजी साजरा होणारा भारतीय लोकशाहीचा राष्ट्रीय उत्सव म्हणजे प्रजासत्ताक दिन. प्रजासत्ताक दिनाबद्दल काही महत्त्वपूर्ण माहिती जाणून घ्या.

🔹 डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्त्वाखाली भारतीय घटना समितीने २६ नोव्हेंबर १९४९ या दिवसी स्वतंत्र देशाच्या राज्यघटनेला मान्यता दिली.

🔹 या राज्यघटनेची प्रत्येक्ष अमंलबजावणी २६ जानेवारी १९५० या दिवसापासून सुरू झाली.

🔹 भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी २६ जानेवारी १९५० रोजी २१ तोफांच्या सलामिसह ध्वजारोहन केले व भारताला "प्रजासत्ताक राष्ट्र" म्हणून घोषित केले.

🔹 राज्यघटना लागू झाल्यानंतर डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी संसद भवनाच्या दरबार सभागृहामध्ये राष्ट्रपतीपदाची शपथ घेतली होती आणि त्यानंतर संचालन सोहळा पार पडला.

🔹 स्वातंत्र्यदिनाच्या दिवसी लाल किल्ल्यावर पंतप्रधान ध्वजारोहण करतात तर प्रजासत्ताकदिनी देशाचे राष्ट्रपती हे ध्वजारोहण करतात.

🔹 राज्यांच्या राजधानीत राज्यपाल हे प्रजासत्ताकदिनी झेंडा फडकवितात.

🔹 प्रजासत्ताक दिनाचा मुख्य कार्यक्रम हा स्वातंत्र्य दिनाप्रमाणे लाल किल्ल्यावर न होता राजपथावर होतो.

🔹 प्रजासत्ताक दिनी राजपथावर होणाऱ्या परेड कार्यक्रमाची मानवंदना राष्ट्रपती स्विकारतात.

🔹 प्रजासत्ताक दिनानंतर तिसऱ्या दिवशी म्हणजे २९ जानेवारीच्या संध्याकाळी बीटिंग रीट्रीटचा सोहळा आयोजित केल्या जातो.

🔹 बीटिंग रीट्रीटचे आयोजन रायसिना हिल्सवर राष्ट्रपती भवनासमोर केले जाते. या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे राष्ट्रपतीच असतात.

🔹 बीटिंग रीट्रीट सोहळ्याला प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याचा समारोपही म्हंटले जाते.

🔹 बीटिंग रीट्रीटमध्ये लष्कराचे तिन्ही दळ पारंपारिक वाद्य वाजवीत मार्च संचालन करतात.

🔹 प्रजासत्ताक दिनाच्या दिवसी Abide with me हे ख्रिश्चन धार्मिक गीत वाजविले जाते.

🔹 प्रजासत्ताक दिनाचे संचालन राष्ट्रपती भवनापासून सुरू होते आणि इंडिया गेटच्या इथे संपिते.

🔹 राष्ट्रीय शौर्य पुरस्कार दरवर्षी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला देशातील शूर मुला–मुलींना दिले जातात. या पुरस्काराची सुरुवात १९५७ साली झाली.

🔹 पदक, प्रमाणपत्र आणि रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कार मिळालेल्या मुलांच्या शालेय शिक्षणासाठी आर्थिक साहाय्यसुद्धा केले जाते.

🔹 घटनासभेने जवळपास तीन वर्षात (२ वर्षे ११ महिने १८ दिवस) भारताची राज्यघटना तयार केली होती. या दरम्यान १६५ दिवसांमध्ये १३ सत्रांचे आयोजन केले होते.

🔹 यासोबतच, भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना आहे. ही राज्यघटना तयार झाली तेव्हा त्यामधे ३९५ कलम, २२ भाग आणि ८ परिशिष्ट होती. आता वेगवेगळ्या घटनादुरुस्तीनंतर राज्यघटनेमध्ये ४४८ कलम आणि १२ परिशिष्ट आहेत.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸ २६ जानेवारी म्हणजे काय? ☸

२६ जानेवारी पासून भारतात संविधान लागू करण्यात आले. संविधान लिहिले कुणी? भारतात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २ वर्षे ११ महिने १७ दिवस सतत सखोल अभ्यास करून भारतीय संविधानाची निर्मिती केली. संविधान लिहितांना डॉ. बाबासाहेबांनी आपल्या स्वतःच्या तब्येतीचीसुद्धा काळजी केली नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दादासाहेब गायकवाड यांना पत्र लिहिले आणि स्वतःच्या तब्बेतीबद्दल ते ह्या पत्रात म्हणतात कि, "माझी प्रकृती कोसळणार नाही अशा तऱ्हेने मी तग धरत आहे." बाबासाहेब आंबेडकरांचे आयुष्य समाजसेवेशी कसे निगडीत आहे हे अत्यंत कळकळीने व्यक्त करतांना ते पुढे लिहितात :–

"माझी खात्री आहे कि, आपल्या लोकांचे कार्य पार पाडण्यासाठी जेवढा काळ लागेल तेवढ्या काळ पर्यंत मला आयुष्य लाभेल. माझ्या खालावलेल्या प्रकृतीबद्दलची निराशा दूर करून हा निश्चय मला जीवनदान देत आहे."

डॉ.बाबासाहेबांनी जगातील सर्व प्रगत राष्ट्रांच्या घटनांचा अभ्यास करून भारताची राज्यघटना बनविली. त्या घटनेप्रमाणे २६ जानेवारी १९५० ला भारत प्रजासत्ताक राष्ट्र बनले. स्वातंत्र्य, समता व बंधुता या त्रयींवर आधारलेले लोकशाही राज्य म्हणून भारत हे राष्ट्र जगाच्या पाठीवर उभे राहिले.

सर्व देशातील लोकांचा समान दर्जा असला पाहिजे आणि स्वतःची सर्वांगीण प्रगती घडवून आणण्यासाठी त्यांना समान संधी मिळाली पाहिजे, यासाठी बाबासाहेबांनी कमितीटील सभासदांबरोबर खूप चर्चा करून कलमे तयार केली. अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा व्हावा, म्हणून घटनेत एक कलम घालणे त्यांनी सभासदांना पटवून दिले. मागासलेल्या वर्गांना, विशेषतः अस्पृश्य व वन्य जाती यांना घटनात्मक हक्क मिळणे हे जरूरी आहे आणि त्याबद्दलची देखील कलमे त्यांनी लिहून काढली. हजारो वर्षे बहुजनांचे शेकडो जीवनमरणांचे प्रश्न जे होते त्यांना देशाच्या राज्यघटनेत स्थान मिळवून देण्याचे अजरामर कार्य बाबासाहेबांनी केले.

भारताची राज्यघटना इतर देशातील राज्यघटनेपेक्षा आकाराने मोठी असूनहि फार कमी काळात ती तयार करण्यात आली आहे.

१) अमेरिकेच्या घटनेला (४) महिने लागले.

२) कॅनडाच्या घटनेला (२) वर्षे ५ महिने लागले.

३) ओस्ट्रेलियेच्या घटनेला (९) वर्षे लागले.

४) दक्षिण आफ्रिकेच्या घटनेला (१) वर्ष लागले.

भारताची राज्यघटना २ वर्षे ११ महिने १७ दिवसात लिहिल्या गेली. तिच्यामध्ये ३९५ कलमे, ७ परिशिष्टे आहेत त्याचप्रमाणे घटनेच्या कामकाजासाठी ११ सत्रे झाली. १४१ बैठका झाल्या. ७६३५ दुरुस्त्या सुचविल्या. त्यापैकी २४७६ मंजूर केल्या गेल्या. ११४ दिवस घटनेवर चर्चा चालली. १६५ दिवस कामकाज चालले. त्यासाठी ६३ लाख ९६ हजार ७२९ रुपये इतका खर्च झाला. घटनेचे प्रथम प्रकाशन १९५२ साली झाले. तिच्या १००० प्रती छापण्यात आल्या होत्या. मुळ प्रती इंग्रजीत आहेत इतर १४ भाषेत त्यांचे भाषांतर केले आहे. त्यावर ४४२ सदस्यांच्या सह्या असून ३१ व्या क्रमांकावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भीमराव आंबेडकर अशी मराठी सही आहे.

२६ जानेवारी १९५० पासून 'भारत देश प्रजासत्ताक झाला.' म्हणजेच डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील प्रत्येकाला एक मत देण्याचा अधिकार देऊन त्या मताच्या आधारेच 'प्रजेची सत्ता' निर्माण केली.

एवढ्या मोठ्या परिवर्तनाच्या जनकाचे आपण २६ जानेवारीच्या दिवशी 'जयघोष' करीत नाही हे खेदजनक आहे.

परिवर्तनवादी जबाबदार शिक्षकाने, अधिकाऱ्याने प्रत्येक २६ जानेवारीला राष्ट्रध्वजाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा घेऊनच ध्वजारोहण करावे.

☸ "२६ जानेवारी संविधान दिन चिरायू होवो." ☸

! जय भीम ! !! जय भारत !! !!! नमो बुद्धाय !!!

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २७ जानेवारी २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, सनिवारो, फुस्स मासो, शनिवार, पौष माहे.

२७ जानेवारी १९०९, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दुसऱ्या (द्वितीय) पत्नी डॉ. माईसाहेब आंबेडकर याची जयंती.

२७ जानेवारी १९१९, रोजी साऊथ ब्यूरो कमिशनपुढे (Southborough Committee) विश्वरत्न, बोधिसत्त्व, मजूर मंत्री प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची साक्ष. फ्रांचिसे आणि फ्रेमिंग (Franchise and Framing Constituency) मतदार संघाबद्दल पुरावा सादर केला.

२७ जानेवारी १९५०, रोजी दिल्लीतील सर्व महाराष्ट्रीय संस्थांमार्फत बृहन महाराष्ट्र भवनामध्ये झालेल्या लोकराज्य दिन कार्यक्रमामध्ये विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या अध्यक्षीय भाषणामध्ये "प्रामाणिकपणा, कर्तव्याची जाणीव व राष्ट्रीय हिताची दृष्टी ही महाराष्ट्राची परंपरा." सांगितली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 त्यागमुर्ती डॉ. माईसाहेब आंबेडकर ! 💎🦚🦚🦚☸☸

१५ एप्रिल इ. स. १९४८ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी शारदा कबीर अर्थात माई यांचा नोंदणी पद्धतीने विवाह झाला व त्या शारदा कबिराच्या सविता आंबेडकर झाल्या. परंतु त्या महामानवाच्या सहचारिणी म्हणून एका सर्वसामान्य मुलीचा विवाह कसा झाला, याबद्दल सखोलपणे माहिती जाणून घेऊया.

कोण होत्या शारदा कबीर?

🔹 सविता आंबेडकर यांचा जन्म २७ जानेवारी इ. स. १९०९ रोजी मुंबईत झाला. त्यांचे माहेरचे नाव शारदा कबीर होते.

🔹 त्यांचे घराणे रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील दोरला गावचे होते.

🔹 त्यांचे वडील कृष्णराव कबीऱ इंडीयन मेडिकल कौन्सिलचे रजिस्ट्रार होते.

🔹 कृष्णरावांना एकूण पाच (५) मुली व तीन (३) मुले होती. या एकूण ८ मुलांपैकी ६ भावंडांचा विवाह हा आंतर्जातिय झाला होता.

🔹 शारदा कबीर यांनी आपले शालेय शिक्षण पुण्यात घेतले व नंतर मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमधून डॉक्ट्रीसाठीची एम. बी. बी. एस. ही पद्वी मिळविली.

🔹 शारदा कबीर यांनी गुजरातमध्ये काही काळ चीफ मेडिकल ऑफिसर म्हणून एका हॉस्पिटलमध्ये काम केले, नंतर त्या मुंबईत आल्या.

माई व बाबासाहेबांची प्रथम भेट :–

डॉ. शारदा कबीर ह्या मुंबईत आल्यानंतर निष्णात फिजिओथेरपिस्ट, नामवंत सल्लागार व तज्ज्ञ डॉक्टर अशा मालवणकरांबरोबर काम करू लागल्या. तेथे इ. स. १९४७ साली त्यांची आणि रक्तदाबाच्या व मधुमेहाच्या विकाराने ग्रस्त असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भेट झाली. त्यापूर्वी डॉ. राव यांच्या घरी त्यांची भेट झाली होती. मुंबईच्या विलेपार्लेमध्ये राहणारे डॉ. एस. राव आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे घनिष्ठ संबंध होते.

डॉ. शारदा कबीर यादेखील डॉ. राव यांच्या घरी येत–जात असत. कारण त्यांच्या मुली आणि शारदा मैत्रिणी होत्या. त्यांच्याच घरी इ. स. १९४७ मध्ये शारदा कबीर आणि बाबासाहेब आंबेडकर यांची पहिली भेट झाली. त्यावेळी राव यांनी त्या दोघांची एकमेकांशी ओळख करून दिली.

बाबासाहेबांची पेशंट म्हणून सेवा :–

🩺 डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेंव्हा–जेंव्हा मुंबईला येत तेंव्हा ते डॉ. मालवणकरांच्या कन्सल्टिंग रुमवर प्रकृतीच्या तपासणीसाठी जात. मालवणकरांनी बाबासाहेबांना अनेक पथ्य आणि औषधांबाबत अनेक सूचना दिल्या होत्या. बाबासाहेबांना ह्या गोष्टी जमण्यासारख्या नसल्याने डॉ. कबीर यांनी 'एखादी नर्स ठेवा किंवा मी तुमच्याकडे काही दिवस राहून बाईंना (रमाई आंबेडकर यांना) सर्व समजाऊन सांगेन.' असा सल्ला दिला.

डॉ. शारदा कबीर यांना तेव्हा रमाईच्या निधनाबाबत माहिती नव्हती. पुढे बाबासाहेब आंबेडकर एकदा डॉ. मालवणकरांच्या कन्सल्टिंग रूमवर आले असतांना डॉ. कबीर त्यांना पथ्याबांबत सांगू लागल्या. अखेर त्यांना बाबासाहेब म्हणाले, "अहो पण माझ्या घरात बईमानुस नाही, मी अगदी एकटा आहे, हे सर्व कुणाला सांगू?" त्यावेळी डॉ. शारदा यांना बाबासाहेबांच्या एकाकीपणाबाबत समजले. त्यानंतर दोघांची पुन्हा–पुन्हा भेट होऊ लागली. डॉक्टर आणि पेशंट म्हणून डॉ. आंबेडकरांशी त्यांचे नाते घट्ट झाले होते. माईंच्या मनात बाबासाहेबांविषयी आत्यंतिक आदर आणि सहानुभूती होती.

विवाहासाठी मागणी :–

अनेकदा बाबासाहेब आंबेडकर आणि शारदा कबीर एकत्र बसून बोलायचे. अनेक विषयांवर त्यांच्या चर्चा व्हायच्या. या भेटीमुळे बाबासाहेबांबद्दल सविता यांना बरीच सखोल माहिती मिळाली होती. त्यातून त्यांच्या मनातील आदर अधिकच वाढला होता. एक दिवस बाबासाहेब डॉ. सविता यांना म्हणाले, "माझे सहकारी मला पुन्हा लग्न करायचा

आग्रह करीत आहेत. पण मला माझ्या आवडीची, योग्यतेची स्त्री मिळणे फार कठीण आहे. तरीही माझ्या कोट्यवधी बांधवांसाठी मला जगायला हवे. त्यामुळे माझी काळजी घ्यायला कुणीतरी असायला हवे. माझ्यासाठी सुयोग्य स्त्रीचा शोध मी तुमच्यापासून सुरू करतो." अशा प्रकारे बाबासाहेबांनी त्यांना लग्नाची मागणी घातली.

पण त्यावर तेव्हा काय उत्तर द्यायचे हे न समजल्याने डॉ. कबीर गप्पच राहिल्या. त्यानंतर डॉ. आंबेडकर दिल्लीला निघून गेले आणि शारदाही त्यांच्या कामात गुंतल्या. त्या दिवसाबाबतही त्या विसरून गेल्या.

विवाहाबद्दल माईंचा विचार आणि निर्णय :–

एक दिवस अचानक शारदा यांना एक पार्सल मिळाले. पार्सलसोबतच्या पत्रात बाबासाहेबांनी डॉ. शारदा यांना मागणी घातली होती. पत्रात लिहिले होते, "अर्थात तू तयार असशील तरच. तरी तू विचार करून मला कळव. तुझ्या आणि माझ्या वयातील फरक आणि माझी प्रकृती या कारणांनी तू मला नकार दिलास तरी मला बिलकुल दु:ख होणार नाही."

हे पत्र वाचल्यानंतर मात्र डॉ. सविता यांना बाबासाहेबांच्या मनातील भावना समजल्या. त्या बाबासाहेबांच्या मोठेपणाने दिपून गेल्या. त्यांच्याबाबत आदर असला तरी त्यांची जिवनसाथी होण्याचा विचार त्यांच्या मनात नक्कीच नव्हता. त्यामुळे या विषयावर त्यांच्या मनात बराच खल झाला. एवढ्यामोठ्या महापुरुषाला नकार कसा द्यायचा आणि होकार तरी कसा द्यायचा असे द्वंद त्यांच्या मनात सुरू होते. अखेर डॉक्टर मालवणकरांचा सल्ला घेण्याचा निर्णय त्यांनी घेतला.

दुसऱ्या दिवशी डॉ. सविता डॉ. मालवणकरांशी या विषयावर बोलण्यासाठी गेल्या. धैर्य एकवटून त्यांनी मालवणकरांना बाबासाहेबांनी लिहिलेले ते पत्र दाखविले. त्यावर क्षणभर विचार करत मालवणकर म्हणाले, "डॉ. आंबेडकरांनी प्रस्ताव ठेवला आहे. त्यांनी काही जबरदस्ती केलेली नाही. त्यामुळे सर्व गोष्टींचा शांतपणे विचार करा आणि योग्य काय तो निर्णय तुम्हीच घ्या."

डॉ. मालवणकरांच्या सल्यानंतर डॉ. सविता अत्यंत गोंधळलेल्या अवस्थेत घरी आल्या. त्यांनी त्यांच्या मोठ्या भावांना विश्वासात घेऊन काय करावे असे विचारले. त्यांना मोठा भाऊ म्हणाला, "म्हणजे तू भारताची कायदेमंत्रिण होणार. अजिबात नकार देऊ नकोस." एक भाऊ तर त्यांना चिडवू लागला. "डॉ. आंबेडकरांचे अनुयायी आंबेडकरांवर जीवापाड प्रेम करतात. ही डॉक्टरीणबाई नकार देते आहे, हे कळलं तर तुझी खैर नाही." असे तो गमतीने बोलला.

अखेर रात्रभर विचार करून डॉ. सविता यांनीही होकारच द्यायचा निर्णय घेतला. डॉक्टर असल्याने त्यांच्या प्रकृतीची काळजी घेणे व सेवा करण्यासाठी त्या प्रवृत्त झाल्या. एवढ्या मोठ्या माणसाला त्यांना नकार देताच आला नाही. त्यांनी पत्र लिहून बाबासाहेबांना होकार कळविला. कोणत्याही परिस्थितीत बाबासाहेबांची प्रकृती सुधरावयाची म्हणजे त्यांना देशाची राज्यघटना लिहिण्याचे ऐतिहासिक काम करता येईल असे त्यांनी ठरविले होते.

असा झाला दोघांचा विवाह... :–

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ. शारदा कबीर यांच्या लग्नासाठी १५ एप्रिल १९४८ ही तारीख ठरविली. हा विवाह दिल्लीला उरकणार होता. त्यानंतर मधल्या काळात बाबासाहेब आणि सविता यांच्यात बराच पत्रव्यवहार झाला. त्यातून त्यांचे नाते अधिकच खुलत गेले.

बाबासाहेबांनी विवाहासाठी डॉ. मालवणकरांसह अगदी मोजक्या लोकांना आमंत्रित केले होते. कारण तेव्हा देशात दंगली, तणावाचे वातावरण होते. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर दिल्लीच्या १ हार्डिंग्ज ॲव्हेण्यू या सरकारी बंगल्यात राहातं होते. १५ एप्रिलला विमानतळावरून डॉ. शारदा कुटुंबीयांसह बाबासाहेबांच्या बंगल्यावर गेल्या. बंगल्यावर जाताच बाबासाहेबांनी सर्वांची विचारपूस केली. सर्वांच्या ओळख भेटीचा कार्यक्रमही झाला.

त्यानंतर त्याठिकाणी असलेल्या श्री. चित्रे यांच्या सुनबाई शारदा यांना आत घेऊन गेल्या. त्यांनी शारदा यांना साजशृंगार करण्यास मदत केली. रजिस्ट्रार ऑफ मेरेजेसचे अधिकारीही त्याठिकाणी उपस्थित होते. मोजक्या आप्तेष्टांच्या उपस्थितीत बाबासाहेब आणि डॉ. शारदा यांच्या वतीने त्यांचा भाऊ वसंत कबीर आणि कमलाकांत चित्रे यांनी तर डॉक्टर साहेबांच्या वतीने नागपूरचे रावसाहेब मेश्राम यांच्यासह आणखी एकाने सही केली.

१५ एप्रिल इ. स. १९४८ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी नोंदणी पद्धतीने विवाहबद्ध होऊन त्या शारदा कबिरच्या सविता आंबेडकर झाल्या. लग्नानंतरच त्यांचे नाव 'शारदा' चे 'सविता' झाले, परंतु बाबासाहेब आंबेडकर त्यांना 'शारू' (शारदा) असेच म्हणत असत.

जगात अनेक संशोधक होउन गेले त्याना नोबेल पुरस्कार मिळाले कारण त्याच्या संशोधना मुळे मानवी जीवनात अमुलाग्र बद्ल झाला. सर जेम्स प्रिन्सेप यानी सम्राट अशोक आणि त्यांची धम्मलिपी यांचा शोध लावला की त्यांच्या शोधा मुळे मानवी जीवनात सामाजीक व धर्मीक बाबतीत अमुलाग्र बदल घडून आले. सर जेम्स प्रिन्सेप यांचा जन्म २० ऑगस्ट, १७९९ इंग्लंड येथे झाला. त्यांच्या आइचे नाव सोफिया व वडिलांचे नाव जॉन होते, ते आपल्या आई वडिलांचे दहावे अपत्य होते. त्यांचे वडील भारतात १७७१ ला मर्चेंट म्हणून आले व अमाप पैसा कमविला कारण ते व्यवसायिक होते, तसेच त्यांची भारताच्या पार्लिमेंट मधे उच्च अधिकारी म्हणून काम केले, म्हणून त्यांना असे वाटायचे की, माझ्या मुलाने सुद्धा भारतात जावे व अमाप पैसा कमवावा. परंतु जेम्सला इंजीनियरिंग व आर्किटेक्चर मधे रुची होती. त्यांची ट्रेनिंग पुर्ण झाल्यानंतर त्यांना कोलकत्ताच्या मिंट मधे १५ सप्टेंबर, १८१९ ला अच्छे मास्तर म्हणून नोकरी मिळाली, त्या वेळी त्यांचे वय केवळ २० वर्षे होते. त्यांचे काम बघून त्यांची बदली वाराणसी येथे करण्यात आली. त्यांचे काम नाणेवर नवनवीन डिझाइन्स करणे व त्या निर्माण करणे. ते जेंव्हा फावल्या वेळात वाराणसी शहरात फिरत असतेवेळी त्यांना अनेक प्राचीन वास्तू दिसल्या त्यांचा उपयोग ते नाणेवर डिझाईन म्हणून वापर करायचे. वाराणसीतिल मिंटची इमारत व चर्चची ईमारतिचे डिझाईन त्यांनी तयार केली, तसेच त्यांनी वाराणसी शहराचा मैप तयार केला व त्याचे स्केल १ मैल: ८ इन्च अचूक असे होते, तसेच ते वस्तुवर एखाद्या विशिस्ठ तापमानावर वितळऊन त्याचे वर डिझाईन काढण्यात निपुण होते. तसेच त्यांनी भारतात वजन व मापे यांच्यात सुधारणा करुन अचूक वजन मापन पद्धती शोधून काढली. तसेच त्यांनी इस्ट इंडिया कंपनीला सुचविले की सिल्वर कॉइन हा एक सारखाच असायला पाहिजे, तसेच त्यांनी एक डिवाइस तयार केले की त्यांच्या साहाय्याने ते वातावरणातील हवामान बदलाचे अचूक निदान करायचे, त्यांनी ब्यारोमीटर मधे सुधारणा करुन वातावरणातील तापमाण ऑटोमेटिक अंकुचंन व प्रसरण होत होते. तसेच वातावरणातील हवामान व दाब आणि आर्द्रता यावर अचूक निदान करायचे.

तसेच ते एक उत्कृस्ट आर्टीस्ट, ड्राफ्टमन होते, आणि ते प्राचीन मोनुमेन्टचे स्केच तयार करायचे. त्यांनी वाराणसी शहरातील अंडरग्राउंड ड्रेनेज सिस्टम व सानिटेशन या मधे सुधारणा केल्या तसेच त्यांनी कर्मनसा नदीवर आर्च स्टोन ब्रिज निर्माण केला. त्यांनी अतिशय चांगल्या प्रमाणे कामे केलीत म्हणून त्यांच्या कामाची दखल घेत त्यांची बदली परत कोलकाताला करण्यात आली.

१८३२ साली एसियाटिक सोसायटी ऑफ़ बंगालची स्थपना केली व त्यांची नियुक्ती एशियाटीक सोसायटी ऑफ़ बंगालचे सेक्रेटरी पदावर करण्यात आली. तसेच त्यांनी अभियान चालविले क्लीनिंग ऑफ़ साइंस व एक जर्नल काढले व त्या जर्नलच्या माध्यमातून ते रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, मिनरल आणि इंडियन antiquities वर लेखन करायचे.

कॉईन हा त्यांचा आवडीचा विषय होता तसेच ते कूशानकालीन नाणे व bactria व गुप्त कालीन नाणे चे लिप्यंतर करणे, खरोष्टी स्क्रिप्ट या मधे त्यांचा जास्त इंटरेस्ट होता, तसेच निरनिराळे स्क्रिप्टचे (लिपी) लिप्यंतर करन्यात त्यांची अधिक रुची होती. एकदा अलाहाबादला असताना रस्त्याच्या कडेला त्यांना एका खडकावर काही तरी लिहिलेले दिसले, सुरुवातीला त्यांना वाट्ले की हे नैसर्गिक आहे. परंतु जेंव्हा त्यांनी निरीक्षण केले तेंवा असे आढळले की हे नैसर्गिक नसुन त्यावर अक्षरे कोरन्यात आली आहे. परंतु ती अक्षरे त्यांना वाचता येत न्हवती, त्या अक्षराबदद्ल त्यांनी अनेक लोकाकडे विचारणा केली परंतु कोणिही त्यांना त्यावर काय लिहिले आहे हे वाचून सांगू शकले नाही. नंतर त्यांना माहित पडले की संस्कृत ही आद्य भाषा आहे म्हणून ते संस्कृतचे जाणकार याना घेऊन ते त्या खडकावर काय लिहिले आहे हे वाचून दाखविण्या करिता घेऊन गेले,

परंतु ते संस्कृतचे जाणकार सुद्धा काही वाचू शकले नाही. परन्तु त्यांनी हिंमत सोडली नाही व त्यावर विचार करु लागले. आणि असाच एक रॉक कट एडिक्ट ओरिसा मधे आढळून आला, त्यांचे खरोष्टी वरिल लेख जर्नल मधून प्रसारित होत होते, नन्तर त्यांना असे आढळून आले की अनेक ठिकाणी अश्या प्रकारचे रॉक एडिक्ट मिळत आहे, त्यांची उत्सुकता वाढली की अस्या प्रकारचे शिलालेख सर्वत्र मिळत आहे तर नक्किच कोनी तरी लिहिले असेल व ते कोनी लिहिले व काय लिहिले याबद्दल ते जाणून घेण्यास उताविळ झाले व हे काय लिहिले आहे याबद्दल इतर कोणि वाचू शकत नाही म्हणून त्यांना वाटले की हे काय लिहिले आहे ते आपणच वाचले पाहिजे, कारण हे जे लिहिले ते कोणीतरी महान व्यक्ती असले पाहिजे आणि त्यावर जे लिहिले ते लोकांच्या हिताचे असले पाहिजे, किन्वा महत्वाचे असले पाहिजे, म्हणून त्यांनी आव्हान केले की जिथे कुठे असे रॉक एडिक्ट मिळाले तर ते माझ्या कडे पाठवा, तर त्यावेळी एक वेगळीच क्रांती निर्माण झाली, ज्यांना अश्याप्रकारचे लेख दिसले की त्यांचे चित्र काढून त्यांचे कडे पाठवायचे व जिथे शक्य होईल तिथे प्रत्यक्ष जात असे, अशाच प्रकारचे रॉक एडिक्ट श्रीलंका, चाइना, बंगलादेश, अफगाणिस्तान व पाकिस्तान इत्यादी ठिकाणी मिळू लागले, प्रत्येक स्क्रिप्टचा त्यांनी तौलणिक अभ्यास केल्यानन्तर त्यांना काही अक्षरामधे बरेच साम्य दिसले. त्यापैकी शेवटचे अक्षर हे एक सारखे होते एकदा बाप्तीस वेन्चू रा फ्रेंच जनरल, महाराज रणजितसिंहच्या दरबारात राव्लपिन्डी येथे उत्खनन करित असतेवेळी त्यांना एक शिलालेख मिळाला तो त्यांनी जेम्स प्रिन्सेपकडे पाठविला, अशाच प्रकारचा शिलालेख बहरुत येथे मिळाला, सहा महिन्याच्या दिर्घ प्रयत्नानन्तर आणि प्रत्येक शब्दाचा एनालीसीस करुन शेवटचे अक्षर सारखेच दिसत असल्यामूळे ते अक्षर दानम किन्वा दान आहे हे (देय धम्म) वाचण्यात त्यांना यश मिळाले, व त्या अधारावर त्यांनी सर्व शिलालेखाचे वाचन केले ते वर्ष होते १८३७. बहुतेक सर्व शिलालेखाच्या सुरुवातीला देवाणपीय पिय्यद्सी राजा लेखा पिता असे लिहिलेले असायचे, तर सुरुवातीला असे वाट्ले की हा श्रीलंकेचा राजा असेल, परंतु संनती येथे एका शिल्पा मधे राया असोका असा शिलालेख आढळून आला. त्यामूळे जेम्स प्रिन्सेपची खात्री पटली की हे सर्व शिलालेख महान चक्रवर्ती सम्राट अशोक राजानेच लिहिले आहे. अशा प्रकारे महान सम्राटाचा शोध १८३७ मधे लावला व ते सर्व साहित्य त्यांनी एसियटिक सोसायटी ऑफ़ बंगालच्या मिटींग मधे पेश केले व अश्या प्रकारे महान सम्राट अशोकाचे साहित्य जगासमोर आणले. एक दूरदर्शी प्रजा हितदक्ष, दयाळू, प्रजेला आपली संतांन मानणारा राजा, बुद्ध शासंन execute करणारा राजा जगासमोर आणला. हा जगातील मानवी इतिहासातील सर्वात मोठा शोध होता. त्यांचे हे अदभूत कार्य बघून अनेक students व schollars त्यांच्याकडे आकर्षीत झाले. देश विदेशतील विविध भागातून त्यांचेकडे अनेक शिलालेख किन्वा त्यांचे ठसे प्रत्यक्ष आनून देत किन्वा पोस्टाने पाठवित होते. ते वाचन करणे व भाषांतर करणे या करिता ते दिवसांचे अठरा–अठरा तास काम करित असे. C.Beadon इंजीनियर गोल्ड माईन मधे काम करुन घरी परत येते वेळी मास्कि, जिल्हा रायचूर karnataka येथे त्यांना एका दगडावर काही तरी कोरले आहे, त्याची माहिती लगेच जेम्सला देण्यात आली. जेम्सने त्याचे वाचन केले व तो सम्राट अशोकचा चवथा शिलालेख म्हणून घोषित केले व २२०० वर्षापूर्वी सम्राट अशोकचे राज्य व त्यांची moral writings जेम्स प्रिन्सेपने जगाला माहित करुन दिली.

त्यांना प्रश्न पडला की एवढा मोठा महान सम्राट पृथी वरुन कसाकाय गायप झाला, लोकांच्या कसाकाय विस्मरणात गेला. त्यानन्तर बरेच भारतीय लेखकानी सम्राट अशोकचे चरित्र त्यांच्या पुढे ठेवले व म्हणाले की सम्राट अशोक किती महान होते, परंतु त्यांनी त्यांचेकडे जरासुद्धा लक्ष दिले नाही उलट त्यांनी त्या लेखकाला प्रश्न केला की तुमच्याकडे जर सम्राट अशोकबद्द्ल एवढी माहिती होती तर मग तुम्ही अगोदर का जगाला सांगितली नाही, तर जेम्सला त्या लेखकांच्या सम्राट अशोकच्या इतिहासाबद्दल शन्का निर्माण झाली, म्हणून जेम्सला वाट्ले की आपणच सम्राट अशोकचा खरा इतिहास लिहावा. परंतु अगदी कमी वयात म्हणजे २२ एप्रिल, १८४० ला त्यांचा मृत्यू झाला.

त्यांच्या या महान कार्याबद्दल १९३९ मधे महान botanist जॉन फोर्बेस रॉयल यानी एका palnt ला prensepia हे नाव दिले.

१८६१ मधे Archaeological Survey of India ची स्थापना झाली व सर Alexander Cunningham हे प्रथम डायरेक्टर जनरल म्हणून नियुक्त केले. त्या दोघानी अनेक ठिकाणी उत्खनन केले व बौद्ध इतिहास जगसमोर आणला. सर जेम्स प्रिंसेपला वाटत होते की आपन जे साहित्य जगासमोर आणले ते Corpus Inscriptonium Indicarium म्हणून पब्लिश व्हावे असे वाटत होते परंतु त्यांचा अल्पावधित मृत्यू झाल्यामूळे ते सर Alexander Cunningham ने १८७७ मधे पब्लिश केले. त्यानी अफगाणिस्थान, पाकिस्तानमधे सुद्धा उत्खनन केले, १८४३ ला एसियटिक सोसायटी औफ़ कोलकत्ता आणि Citizen औफ़ कलकत्ता या सर्वानी मिळुन हुगली नदीवर प्रिन्सेप घाट बांधला व त्याची design W. Fitzgerald ने केली.

सर जेम्स प्रिन्सेप व सर alexander Cunningham हे खास मित्र होते ते दोघे ही क्रिस्चियन धर्माचे असुन त्यानी भारतात उत्खनन करुन बौद्ध धंम्माचा इतिहास जगासमोर आणला. अश्या या महान व्यक्तीना संपूर्ण जग नमन करते. ते दोघेही स्वत:ला बुद्धांचे अनुयायी समजत होते.

याच बरोबर त्यांचे लेखनसाहित्य सुद्धा आहे, Banaras Illustrated, Coins Weights Measure British India, History of Punjab and Essay on Indian Antiquities.

सर जेम्स प्रिन्सेप यांच्या १८४ व्या स्मृती दिनाच्या निमित्ताने विनम्र अभिवादन.

– शामराव सोमकुवर.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २३ एप्रिल २०२५, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२९, भीमाब्द १३३, बुधवारो, चेत मासो, बुधवार, चैत्र माहे.

२३ एप्रिल १८७३ – रोजी विक्रल रामजी शिंदे जयंती.

२३ एप्रिल १९२३ – "जागतिक पुस्तक दिवस (World Book Day)." विल्यम शेक्सपिअर, इंका गार्सिलोसा यासारख्या काही जगप्रसिद्ध व्यक्तींचं निधन २३ एप्रिल याच दिवशी झालं. त्यामुळे या दिग्गजांना श्रद्धांजली वाहण्यासाठी युनेस्कोने २३ एप्रिल रोजी जागतिक पुस्तक दिन साजरा करण्याची घोषणा केली. हा दिवस प्रथम २३ एप्रिल १९२३ मध्ये स्पेनमधील पुस्तक विक्रेत्यांनी साजरा केला होता. त्यानंतर १९९५ मध्ये पॅरिसमध्ये घेण्यात आलेल्या युनेस्कोच्या सर्वसाधारण सभेमध्ये जगभरातील लेखकांप्रती आदर व्यक्त करण्यासाठी व नागरिकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी हा दिवस साजरा केला जाईल असा निर्णय घेण्यात आला.

२३ एप्रिल १९३३ – रोजी मुंबईच्या दामोदर गृहामागील भव्य पटांगणात पी. एल. लोखंडे यांनी, नाशिक जिल्ह्यातर्फे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना रौप्य करंडकातून मानपत्र आणि ५०१ रुपयांची थैली अर्पण. हरिभाऊ हनुमंत रोकडे यांनी पुणे जिल्ह्यातर्फे सोनेरी फ्रेममधून एक अशा सोनेरी अक्षरांनी लिहिलेल्या मांनपत्रच्या दोन प्रती व २०० रुपये अर्पण. नायगाव चाळीतील रहीवाशांतर्फे ९१ रुपयांची थैली अर्पण. ट्राम कंपनीची चाळ चौथा मांळा परळ येथील पंच मंडळी तर्फे ५० रुपयांची थैली अर्पण. भोर संस्थानच्या मंडळींनी १७ रुपयांची देणगी दिली.

२३ एप्रिल १९३३ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर–गांधी यांची येरवडा तुरुंगात तिसरी भेट.

२३ एप्रिल १९३३ – रोजी इंग्रजांच्या हातातून सत्ता काढून घेणार विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची घोषणा मुंबई.

२३ एप्रिल १९३९ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे फलटणला पोहोचले. फलटण संस्थाधिपतींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना यांना चहा घेण्याचे आमंत्रण देऊन आधीच पत्र पाठविले होते. श्री. गायकवाड यांनी डॉ. बाबासाहेब व इतर उपस्थितांचे स्वागत केले. बाबासाहेब जेव्हा सभापतींच्या खुर्चीवर बसले तेव्हा तेथे टाळ्यांचा कडकडाट झाला. फलटण व आसपासच्या भागात दहा ते बारा हजार लोक उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या भाषणात म्हणाले की, "रियासत (संस्थानात) राहणाऱ्या लोकांची स्थिती वॉर्डात (गोठ्यात) बंदिस्त असलेल्या प्राण्यांपेक्षा वेगळी नाही.

२३ एप्रिल १९५३ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेला Need for checks and balances हा ग्रंथ प्रकाशित झाला.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 जागतिक पुस्तक दिवस (World Book Day) 💎🦚🦚🦚☸☸

२३ एप्रिल याच तारखेची निवड का?

विल्यम शेक्सपिअर, इंका गार्सिलोसा यासारख्या काही जगप्रसिद्ध व्यक्तींचं निधन २३ एप्रिल याच दिवशी झालं. त्यामुळे या दिग्गजांना श्रद्धांजली वाहण्यासाठी युनेस्कोने २३ एप्रिल रोजी जागतिक पुस्तक दिन साजरा करण्याची घोषणा केली. हा दिवस प्रथम २३ एप्रिल १९२३ मध्ये स्पेनमधील पुस्तक विक्रेत्यांनी साजरा केला होता. त्यानंतर १९९५ मध्ये पॅरिसमध्ये घेण्यात आलेल्या युनेस्कोच्या सर्वसाधारण सभेमध्ये जगभरातील लेखकांप्रती आदर व्यक्त करण्यासाठी व नागरिकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी हा दिवस साजरा केला जाईल असा निर्णय घेण्यात आला.

जागतिक पुस्तक दिवस म्हणून दरवर्षी २३ एप्रिल हा दिवस साजरा केला जातो. जागतिक पुस्तक दिन, ज्याला जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिवस किंवा आंतरराष्ट्रीय पुस्तक दिवस म्हणूनही ओळखले जाते, हा वाचन, प्रकाशन आणि कॉपीराइटला प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना (UNESCO) द्वारे आयोजित केलेला वार्षिक कार्यक्रम आहे. पहिला जागतिक पुस्तक दिन २३ एप्रिल १९९५ रोजी साजरा करण्यात आला आणि त्या दिवशी ओळखला जातो. युनायटेड किंग्डम आणि आयर्लंडमध्ये संबंधित कार्यक्रम मार्चमध्ये साजरा केला जातो. जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिनानिमित्त, युनेस्को पुस्तक उद्योगातील प्रमुख क्षेत्रांतील सल्लागार समितीसह, एका वर्षासाठी वर्ल्ड बुक कॅपिटलची निवड करते. प्रत्येक नियुक्त वर्ल्ड बुक कॅपिटल सिटी पुस्तक आणि वाचन साजरे करण्यासाठी आणि प्रोत्साहन देण्यासाठी उपक्रमांचा कार्यक्रम राबवते. २०२३ मध्ये, घानाची राजधानी अक्राला जागतिक पुस्तक राजधानी म्हणून नियुक्त करण्यात आले.

दरवर्षी २३ एप्रिल रोजी जागतिक पुस्तक दिन भारतातही साजरा केला जातो. लोकांना पुस्तके वाचण्यासाठी आणि प्रकाशित करण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी आणि जागृत करण्यासाठी भारतातील अनेक भागांमध्ये त्याचे स्मरण केले जाते.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🔵🔵🔵🌕 **चैत्र पौर्णिमा. (चेत मासो पुंन्नमि)** 🌕🔵🔵🔵☸☸

चैत्र पौर्णिमेच्या दिवशी भगवान बुद्धांच्या जीवनात ५ महत्वपूर्ण घटना घडल्या.

🔹 १. भृगु ऋषींच्या आश्रमात प्रवेश तसेच निरोप. 🔹 २. उद्रक रामपुत्त यांच्या आश्रमात प्रवेश तसेच निरोप. 🔹 ३. कपिल मुनींच्या 'सांख्य दर्शन' तत्वज्ञानाचा अभ्यास. 🔹 ४. एक शूद्र व्यक्तीने धन दान म्हणून दिले. 🔹 ५. सुजाताचे खीर दान.

१. भृगु ऋषींच्या आश्रमात प्रवेश तसेच निरोप.

भारद्वाजांचे गुरु 'आलारकालाम' हे योग साधनेत निपुण असे अभ्यासक होते. त्यावेळी ते वैशाली येते राहत होते. आणि सिद्धार्थ गौतम राजगृहाजवळील गुहाकुटपर्वत

टेकडीवर पर्णकुटीत राहत होते. आलारकालाम यांना भेटण्यासाठी सिद्धार्थ गौतम तेथून निघाले. जाता–जाता भृग ऋषींचा आश्रम लागला.

भृग ऋषींचे तत्वज्ञान आणि उपासना जाणून घेण्यासाठी आश्रमात प्रवेश केला. शाररिक कष्ट करून तपस्वी जीवन जगणे हे त्यांचे तत्वज्ञान होते. सिद्धार्थ गौतमांना हे आवडले नाही आणि त्यांनी निरोप घेतला.

दोन्ही हि घटना वेगवेगळ्या चैत्र पौर्णिमेला घडल्या. म्हणजे १ वर्ष सिद्धार्थ गौतम हे भृग ऋषींकडे होते.

२. उद्दक रामपुत्त यांच्या आश्रमात प्रवेश तसेच निरोप.

उद्दक रामपुत्त हे समाधी योग साधनेत निपुण होते. सिद्धार्थ गौतमांनी तेथे 'अकियन्या यतन' नावाची समाधी पर्यंत अभ्यास केला. त्यांच्या कडूनहि निरोप घेतला तो दिवस चैत्र पौर्णिमेचा होता. म्हणजे इथे ही १ वर्ष सिद्धार्थ गौतम राहिले होते.

३. कपिल मुनींच्या 'सांख्य दर्शन' तत्वज्ञानाचा अभ्यास.

त्याकाळी कपिल मुनी हे सर्व तत्वज्ञानी लोकांमध्ये प्रमुख होते. त्यांचा सांख्य दर्शन तत्वज्ञान/सिद्धांत हा सत्यावर आधारित होता. कुठली वस्तू/गोष्ट सत्य असण्यासाठी तिला प्रमाण असणे अत्यावश्यक आहे.

ह्या तत्वज्ञानाचा अभ्यास करून सिद्धार्थाने ३ गोष्टी ग्रहण केल्या.

१. सत्य प्रमाणावर म्हणजेच पाहिलेले किंवा अनुभवलेले असावे. २. ईश्वर अस्तित्वाचे कुठलेहि प्रमाण नाही म्हणून ईश्वर आणि आत्मा अस्तित्वाविषयीची चर्चा व्यर्थ आहे. ३. जीवनात दुःख आहे.

४. एक शूद्र व्यक्तीने धन दान म्हणून दिले.

एक शूद्र जातीतील व्यक्ती जो धनगर होता त्याने तथागताना खूप सारे धन दान म्हणून दिले.

५. सुजाताचे खीर दान.

इतके सारे ध्यान साधना करूनहि ज्ञान प्राप्ती होत नव्हती. मग सिद्धार्थ गौतम फक्त एक फळ खाऊन राहू लागले.

प्राचीन निरंजना नदीवरील उरुवेला अर्वाचीन बुद्धगयाच्या शेजारी सेनानी गाव होते. सुजाताचे हे जन्म गाव. सध्या त्या गावाचे नाव बकरौर आहे. सुजाता हिला जसा हवा तसा सुशील, सुंदर आणि कमाई करणारा वर मिळाला आणि प्रथम पुत्रप्राप्त झाल्यावर निर्जल दुधाची खीर नैवेद्य म्हणून त्या वटवृक्षाला अर्पण करेल असे मनोगत व्यक्त केले होते.

चैत्र पौर्णिमेच्या दिवशी तिची दासी पन्ना तिथे साफसफाई साठी जाता तिला सिद्धार्थ गौतम दिसले. तिने हि घटना सुजाताला सांगितली तर स्वतः सुजाता तिथे सोन्याच्या पात्रात खीर घेऊन आली व सिद्धार्थ गौतमाने ती स्वीकारली.

सुजातकडे १००० गायी होत्या. तिने त्या सर्वांना गोड वालमी खायला घालत. त्यामुळे त्या गायींचे दूध अधिक गोड आणि पौष्टिक येत. त्या १००० गायींचे दूध ५०० गायींना, ५०० चे २५० गायींना असे करून शेवटी ८ गायींना ते दूध पाजले. आणि ती खीर ह्या ८ गायींच्या दुधापासून बनवली गेलेली होती.

तिने प्रथम वंदन केले. बरेच दिवस अन्न न घेतल्यामुळे बोधीसत्वाचे मन स्थिर नव्हते. आपण जर अन्न घेतलेच नाही तर मृत्युचे संकट येईल. आपण जगण्यासाठी अन्नंग्रहण केलेच पाहिजे असे मनी ठरविले होते. आणि त्याच दिवशी सुजाता आपला नवस पूर्ण करण्यासाठी आली होती. ती बोधिसत्वासमोर आपण आणलेल्या खिरीचे सुवर्णपात्र घेऊन बसलि आणि म्हणाली, "हे वनदेवते, माझे मनोरथ पूर्ण झाले आहे. मला आपल्या कृपेनें पुत्र प्राप्ती झाली आहे. त्यामुळे माझे जीवन सार्थकी लागले आहे. ही सारी तुझी कृपा आहे. तेव्हा आपणांस मी बोलल्याप्रमाणे गाईच्या दुधाची खीर नैवेद्य म्हणून आणली आहे. आपण तिचा स्वीकार करावा. अशी विनंती करते." हे सुजाताचे शब्द ऐकून तथागत म्हणाले –

"माते, मी कोणी देव नाही. देवाचा दूत नाही. तुझ्यासारखाच मानवाचा राजा शुद्धोधन आणि महामाया यांचा पुत्र आहे. मी सत्याचा शोध घेण्यासाठी, दुःखांच्या कारणाचा शोध घेण्यासाठी, वैरभावाचा शोध घेण्यासाठी हे तपाचरण करीत आहे. माते, खरोखरचं मला ज्ञानप्राप्ती व्हावी अशी शुभेच्छा व आशीर्वाद दे आणि तुझे खिरीचे भोजन सुखदायक ठरो अशी मला अपेक्षा आहे. तुझे कल्याण होवो. मंगल होवो अशी अपेक्षा करतो." सुजाताने हातातील खिरीचे पात्र बोधीसत्वाच्या हाती दिले आणि म्हणाली, "माझे मनोरथ जसे पूर्ण झाले, तसे आपलेही मनोरथ पूर्ण होवोत. आपण शोध घेत आहात त्या ज्ञानाची आपणास प्राप्ती होवो." अशी शुभकामना व्यक्त केली. सिद्धार्थ गौतम सुजातास म्हणाले, "माते, मला सत्याचा शोध घेण्यासाठी तुझी खीर लाभदायक ठरो." असे शुभचिंतन करून त्या खिरीचा स्वीकार केला. निरंजना नदीकाठी जाऊन स्नान केले. आणि सुप्पतिठ्ठ नावाच्या घाटावर बसून त्या खिरीचे सेवन केले. तो दिवस चैत्र पौर्णिमेचा होता. तेव्हाच मनात एक संकल्प केला की, मला ज्ञान प्राप्त होणार असेल तर हे पात्र प्रवाहाच्या विरुद्ध वाहत जाईल. असे बोलून खिरीचे पात्र नदीत फेकले. ते पात्र बोधिसत्व बोलल्याप्रमाणे प्रवाहाच्या विरुद्ध दिशेला जाऊ लागले आणि काही अंतरावर गेल्यावर ते पात्र पाण्यात बुडाले. सिद्धार्थ गौतमाला तो घडलेला प्रसंग पाहून खूप आनंद झाला. त्या दिवशी चैत्र पौर्णिमा होती. या स्थळी आपणांस भगवान बुद्धांची मूर्ती बसविलेली आहे व सुजाता खिरीचे पात्र हातात घेऊन समोर बसलेली आहे अशी पाहावयास मिळते. या गावाला सुजाताचे गाव किंवा "बकरोल" असे म्हणतात. सुजाताची खीर सेवन केल्यावर सिद्धार्थ गौतम नदीतून गया प्रांतात जात असतांना स्वाथीय नावाच्या शेतकऱ्याने गवताची पेंढी दिली. त्या प्रसंगाचे पुतळे नदीकाठी आहेत. बोधिसत्व गयेत येतात आणि पिंपळाच्या झाडाखाली पूर्वेला मुख करून ध्यानसाधना करण्यास बसतात. तिथे एक संकल्प करतात की, माझे रक्त आटले, शरिरही सुकले तरी मी ज्ञानप्राप्ती झाल्याशिवाय या असणावरून उठणार नाही. चार आठवड्यांनी म्हणजे वैशाखी पौर्णिमेला त्यांना संबोधी प्राप्त झाली. असे या चैत्र पौर्णिमेचे महत्व आहे.

सिद्धार्थ गौतमाचे हे शेवटचे अन्न ग्रहण होते ज्ञान प्राप्ती पूर्वीचे. हा दिवस चैत्र पौर्णिमा इ. स. पू. ५२८ चा होता. संबोधी प्राप्ती नंतर स्वतः भगवान बुद्ध सुजाताला भेटण्यासाठी

सेनानी गावी आले आणि तिला दिक्षा दिली.

बौद्ध इतिहासात सुजाताला व तिच्या खीरीला अनन्य साधारण महत्व आहे.

या पौर्णिमेला भगवान बुद्धाने श्रीलंके मध्ये दुसऱ्यांदा भेट दिली.

श्री लंके मधील नागदीपाचे नागराजा महोदरा आणि चुलोदरा या दोघांमध्ये रत्नजळीत राजसिंहासनावरून युद्ध होणार होते. दोन्ही पक्षानी लढाईची तयारी केली होती. तेव्हा भगवान बुध्दानी त्या ठिकाणी जाऊन तेथे शांतता प्रस्थापित केली आणि दोन्ही पक्षात मैत्री प्रस्थापित केली व मंगल मैत्रीच्या भावने बद्धल शिकवण देऊन त्याचे महत्व सांगितले. म्हणून या पौर्णिमेचे महत्व आहे. प्रत्येक महिन्यात येणाऱ्या पौर्णिमेला बौद्ध धम्मात महत्वाचे स्थान आहे. म्हणून आपण सर्व पौर्णिमा अत्यंत आंनद आणि उत्साहानी साजरी करावी. पौर्णिमेच्या दिवशी सकाळी लवकर उठून आंघोड करून सफेद वस्त्र परिधान करावे. बुद्ध विहारात जाऊन बुद्धाची पूजा करावी. त्रिवार अभिवादन करावे. भन्तेजी चे प्रवचन श्रवण करून दु:ख मुक्ती चा मार्ग समजून घ्यावा.

चेतमासो पुन्नमि चैत्र पौर्णिमेच्या सर्व–सर्व उपासक/उपासिकाना, सभासदांना मंगलमय हार्दिक शुभेच्छा 💐💐💐💐💐

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २४ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, चेत मासो, बुधवार, चैत्र माहे.

२४ एप्रिल १९३३ – रोजी कुर्ला येथे सत्कार प्रसंगी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण.

२४ एप्रिल १९३३ – रोजी संयुक्त समितीच्या कामासाठी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडनला प्रयाण.

२४ एप्रिल १९३७ – रोजी पावन भूमी वळसंग भीमनगर, सोलापूर येथे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विहिरीचे उद्घाटन केले.

२४ एप्रिल १९४४ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुंबईहून धनबादला रवाना झाले.

२४ एप्रिल १९४८ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी एलन कॉम्पबेलला गव्हर्मेंट हाऊस, नवी दिल्ली येथे मुलाखती दरम्यान सांगितले, "कायद्यानुसार भारतातील नागरिकांचे हक्क समान आहेत."

२४ एप्रिल १९४८ – रोजी लखनौ येथे संयुक्त प्रांत शे. खा. फे. क्या अधिवेशनात विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २५ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, चेत मासो, गुरूवार, चैत्र माहे.

२५ एप्रिल १९४७ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी डॉ. राजेंद्र प्रसाद यांना महत्त्वाचे पत्र लिहिले.

२५ एप्रिल १९४८ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लखनौ येथे शेड्युल्ड कास्टस फेडरेशनच्या पाचव्या परिषदेत आपल्या भाषणात म्हणाले की, "राजकीय शक्ती ही सर्व प्रकारच्या सामाजिक प्रगतीची गुरुकिल्ली आहे आणि अनुसूचित जातीचे लोक यावर अधिकार सांगून त्यांची मुक्ती मिळवू शकतात. दगडासारखे कठोर असल्याने मला पाण्यात वितळण्याची भीती वाटत नाही. म्हणून काँग्रेस सरकारमध्ये रुजू झाल्यानंतरही मला त्रास होणार नाही, परंतु तुमची परिस्थिती वेगळी आहे. तुम्ही पाण्यातील गुंडाळ्यासारखे विलीन व्हाल. मी तेथून बाहेर पडू शकतो जेव्हा मला असं वाटतं किं तेथे राहणे कठीण आहे."

२५ एप्रिल १९५४ – रोजी वर्धा जिल्ह्यामधील पुलगाव येथे मध्यप्रदेश इलेक्ट्रिसिटी बोर्डाच्या विस्तीर्ण पटांगणावर झालेल्या प्रचंड सभेत शेड्युल्ड कास्टस फेडरेशनचे कार्यकर्त्यांनी ५००० रुपयांची थैली विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अर्पण केली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २६ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, चेत मासो, शुक्रवार, चैत्र माहे.

२६ एप्रिल १९२९ – रोजी कापड गिरण्यांतील पाऊण लाख कामगारांचा ४३ त्रेचाळीस दिवस संप.

२६ एप्रिल १९३७ – रोजी अस्पृश्य महिला सुधारक मंडळाची नागपूर येथे स्थापना झाली.

२६ एप्रिल १९४२ – रोजी मुंबई येथे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "आपला उद्धार इतर कुणी करणार नाहीत, त्यासाठी आपणांस स्वतः कंबर कसली पाहिजे."

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २७ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, चेत मासो, शनिवार, चैत्र माहे.

२७ एप्रिल १९३६ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हर भगवान यांस त्यांनी पाठविलेल्या पत्राचे उत्तर पाठविले.

२७ एप्रिल १९३८ – रोजी मुंबईच्या गुंडांना दंग्याच्या वेळी पकडून हद्दपार करण्याचा अधिकार पोलीस कमिषणरला देणारे बिल असेंबलिमध्ये आले असता, मुंबई पोलीस ॲक्ट विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सदर बिलासंबंधी विशेष उपसूचना मांडली व उपसुचनेवर भाषण केले.

२७ एप्रिल १९४८ – रोजी पंडित नेहरू यांचे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पत्र.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २८ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, चेत मासो, रविवार, चैत्र माहे.

२८ एप्रिल १८१९ – रोजी जॉन स्मिथ युरोपियन सैनिकाने अजिंठा लेणीचा शोध लावला.

२८ एप्रिल १९१७ – रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची दिल्ली येथे आयोजित बुद्ध परिषदेला उपस्थिती.

२८ एप्रिल १९२८ – रोजी मुक्काम उंब्रज तालुका कराड जिल्हा सातारा येथे महार सेवा संघाची बैठक संपन्न झाली.

२८ एप्रिल १९२९ – रोजी मुंबई प्रांताच्या महार वतनदारांची परिषद संपन्न झाली.

२८ एप्रिल १९४४ – रोजी भारताचे मजुरमंत्री विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बिहार मधील कोडमा परिसरातील खाणीत प्रत्यक्ष उतरून खणीची पाहणी केली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

२८ एप्रिल १८१९ ला अजिंठा लेणीचा शोध

ब्रिटिश सैन्याची एक तुकडी अजिंठ्याच्या जंगलात भटकत होती. शिकारीच्या मागावर असलेल्या जॉन स्मिथ या ब्रिटिश अधिकाऱ्याने वाघाला गुंफे मध्ये जाताना पाहिले. त्याच्या पाठोपाठ या गुंफेमध्ये पोहोचलेल्या जॉन स्मिथला आतील सौंदर्य पाहून आश्चर्याचा धक्का बसला. २८ एप्रिल १८१९ रोजी जॉन स्मिथ नावाचा युरोपियन सैनिक शिकारीच्या मागावर या परिसरात आला आणि लेणी क्र. १० ची दर्शनीभागाची सूर्यकमान त्याच्या दृष्टीस पडली. ही अजिंठा लेणीच्या शोधाची सुरुवात. तोपर्यंत हा अमूल्य ठेवा जगाच्या दृष्टीने अज्ञात होता. जवळपास दीड हजार वर्षे तो अज्ञात राहिला; परंतु स्थानिकांना या लेण्यांची माहिती होती; पण महत्त्व कळले नव्हते. शेजारचे माथ्यावरचे लेणापूर हे गाव, तर लेण्यांच्या निर्मिकांची वस्तीच; पण कालौघात बुद्ध धंम्माची पीछेहाट झाली आणि हा ठेवा अज्ञातात ढकलला गेला. अजिंठा हे गाव लेणी पासून १० किमी अंतरावर. या नावाचाही एक इतिहास असावा. 'महामायुरी' या चौथ्या शतकातील ग्रंथामध्ये बौद्ध तीर्थस्थळांच्या यादीत 'अजिंत जय' या गावाचा उल्लेख आहे. दुसरा अंदाज या लेणीला 'अचित्य' या बौद्ध भिक्खूचा विहार म्हणतात. यावरून अजिंठा नाव असावे, असा अंदाज केला जातो. इतकी वर्षे ही लेणी अज्ञात राहिली. कारण बौद्ध धंम्माची पीछेहाट झाल्यानंतर येथे वस्ती नव्हती. घनदाट जंगलामुळे ती लेणी झाकली गेली आणि पुढे मुस्लिम राजवटीतही अज्ञात राहिली. देशातील १२०० पैकी तब्बल हजार लेण्या एकट्या महाराष्ट्रात आहेत. खऱ्या अर्थाने 'बुद्धिस्ट सर्किट' येथेच पूर्ण होते. नाशिक, पितळखोरा, घटोत्कच, भोगवर्धन (भोकरदन), तेर, प्रतिष्ठान (पैठण), जुन्नर, नालासोपारा हा त्या काळचा व्यापारी मार्ग त्यावर ठायी–ठायी असलेल्या लेण्या, बुद्धविहार असा हा क्रम. या सगळ्या लेण्यांचा काळही वेगळा.

भाजे पासून लेणी खोदण्याची सुरू झालेली परंपरा पुढे, तर वेरूळ मध्ये हिंदू, जैन, बौद्ध अशा सगळ्याच धर्माच्या लेण्यांचा समूह दिसतो. जॉन स्मिथने लेणीचा शोध लावल्या नंतर पुढे २४ वर्षे तेथे काही काम झाले नाही; पण ब्रिटिशांच्या शिरस्त्या प्रमाणे अहवाल तयार झाले. त्यावर अभ्यास झाला. पुढे १८४४ साली ईस्ट इंडिया कंपनीने कॅप्टन रॉबर्ट गिलची नियुक्ती अजिंठ्यावर केली. गिल हा सैनिकगडी असला तरी मोठा चित्रकार होता. एका अर्थाने अजिंठ्याच्या कलेला पारखी मिळाला. त्याने लेणीची अवस्था पाहिली. झाडे–झुडुपे, वटवाघळांची वस्ती, वानरांचा वावर. त्याने एक–एक गुफा स्वच्छ करायला सुरुवात केली, एक–एक खजिना त्याच्यापुढे उघडायला लागला आणि त्याने त्या चित्रांची प्रतिकृती काढायला सुरुवात केली. रॉबर्ट गिल आणि पारू यांची प्रेमकहाणी अजिंठ्याच्या अविभाज्य भाग झाली. गिलने काढलेल्या चित्रांचे प्रदर्शन इंग्लंडमध्ये आयोजित केले; पण त्यापूर्वीच ही चित्रे भस्मसात झाली; परंतु तो पर्यंत आधुनिक कला जगतात अजिंठ्याचे नाव पसरले होते. शेकडो वर्षांचा अज्ञातवास संपला होता. अजिंठ्याला जागतिक पटलावर नेणारा कॅप्टन गिल आजही भुसावळच्या ख्रिस्त स्मशानभूमीत चिरनिद्रा घेत आहे. १८५७ च्या बंडानंतर ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार संपुष्टात येऊन इंग्रजी अंमल सुरू झाला आणि अजिंठ्याचे भाग्य उजळले. एशियाटिक सोसायटीने यासाठी पुढाकार घेतला. १८७२ साली. जे. जे. स्कूलचे प्राचार्य जॉन ग्रिफिथ्स यांनी विद्यार्थ्यांकडून येथे चित्रे काढून घेतली. त्यांचा अजिंठ्यावरचा दुर्मिळ चित्रग्रंथ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ग्रंथालयात आहे. जगभरात केवळ तीन प्रती या ग्रंथाच्या असल्याने त्याचे मोल कळते. परंतु त्यांनी काढलेली चित्रे १८८४ साली लंडनच्या आगीत भस्मसात झाली होती. यापूर्वी रॉबर्ट गिलने काढलेली पेटिंग्ज सुद्धा आगीत नष्ट झाल्या. पुढचा इतिहास सगळा ज्ञात आहे.

आज अजिंठा जागतिक वारसा म्हणून जाहीर झालेला आहे. तत्कालीन संस्कृती जशीच्या तशी डोळ्यासमोर उभी करणारी अजिंठा लेण्यांमध्ये स्त्रीसौंदर्य आणि

स्त्रीप्रसाधनातील वास्तवता, विविधता आणि कलात्मकता आहे. यासोबतच अप्सरा, राण्या, दासी, सामान्य स्त्रिया यांच्या वैशिष्ट्यांचे चित्रण आढळते. राजा, गरीब, संन्यासी, बाल, वद्ध, यक्ष–किन्नर, पशुपक्षी, वृक्ष–लता–फळे, वस्त्राभूषणे, चौरस्ते, राजदरबार, वाहने, वापरातील वस्तू यांचे दर्शनही या लेणीत होते. त्यामुळे तत्कालीन संस्कृती जशीच्या तशी प्रत्यक्ष डोळ्यासमोर उभी राहते. इ. स.पूर्व २०० च्या सुमारास लेणी खोदण्यास सुरुवात झाली. पैठणच्या सातवाहन घराण्यातील सम्राटांनी ही सुरुवात केली. सातवाहन काळात लेणी क्रमांक ८, ९, १०, १२, १३, १५ चे खोदकाम झाले. पुढे पाचशे वर्षे काम बंद पडले. पुन्हा पाचव्या शतकात गुप्त, वाकाटक आणि बदामीच्या चालुक्यांनी तेथील लेणींचे खोदकाम केले. वाकाटक काळात लेणी क्रमांक १, २, १६, १७, १९ चे खोदकाम झाले. इ. स.पूर्व दोनशे ते इ. स. सातशे म्हणजे सुमारे नऊशे वर्षांच्या कालखंडात सिद्धहस्त कलाकारांच्या किमान ३० पिढ्या अखंड राबल्या असतील. त्यातील एकाचेही नाव इतिहासात सापडत नाही. देशात साधारण १२०० लेण्या आहेत.

१८२४ साली जनरल सर जेम्स ॲलेक्झांडर यांनी अजिंठ्यास भेट दिली आणि १८२९ साली रॉयल एशियाटिक सोसायटीत आपला अहवाल सादर केला. १८४४ साली कोर्ट ऑफ डायरेक्टर्स ऑफ ईस्ट इंडिया कंपनी तर्फे कॅप्टन रॉबर्ट गिलची अजिंठ्याच्या या खजिन्यावर नेमणूक झाली. अजिंठ्याच्या या निसर्ग सौंदर्यात रॉबर्ट रमला. ‘पारू’ नावाच्या भिल्ल स्त्रीवर रॉबर्ट मोहित झाला. त्याने तिच्याशी लग्नही केले. १८५६ साली पारू मरण पावली. पुढे या दोघांची प्रेमकहाणी अजिंठ्याचा अविभाज्य भाग झाली. पारूच्या समाधीवर गिलने लिहीलेला ‘टू द मेमरी ऑफ पारू व्हू डाईड ऑन २३ मे १८५६’ हा संदेश आजही आढळतो. 'पारू' गेली आणि रॉबर्टच्या हातातील ब्रशही गेला. पारूच्या मृत्यू नंतर रॉबर्ट गिलने ब्रश खाली ठेवून हाती बंदूक घेतली. १८५७ च्या बंडाच्या वेळी गिल पुन्हा फौजेत दाखल झाला, लढला; पण तिथेही त्याचे मन रमेना, म्हणून बंड मोडल्या नंतर पुन्हा १८६१ साली त्याने चित्रकलेला वाहून घेतले. १८६४ मध्ये भुसावळ येथे रॉबर्टने अखेरचा श्वास घेतला. २८ एप्रिल १८१९ रोजी शोध लागलेल्या लेणीला रॉबर्ट गिलच्या रुपातून पारखी मिळाला.

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २९ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, चेत मासो, सोमवार, चैत्र माहे.

२९ एप्रिल १९२९ – रोजी दामोदर गृह परळ येथे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरविण्यात येऊन "कामगारांनी संपावर जाणे योग्य नाही." असा ठराव संमत करण्यात आला.

२९ एप्रिल १९३३ – रोजी अनागरिक धंम्मपाल स्मृतिदिन.

२९ एप्रिल १९३३ – रोजी जनता वृत्तपत्रात विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सोपारा, वसई येथील झालेल्या भाषणाचा वृत्तान्त प्रसिद्ध. त्यांनी सांगितले होते की, "बुद्धीचा उपयोग भाकर, शिक्षण व राज्यसत्ता मिळविण्यासाठी करायला हवा."

२९ एप्रिल १९४४ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'दी शेड्युल्ड कास्टस इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट' ची मुंबईत स्थापना केली. या संस्थेचे खुद्द डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यक्ष होते.

२९ एप्रिल १९४४ – रोजी कोडमा येथे खाण अभ्रक परिषदेचे अध्यक्ष म्हणून विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भाषण करतांना, अभ्रक उद्योगाला भक्कम पायावर उभे करण्याचा मानस व्यक्त केला.

२९ एप्रिल १९४७ – रोजी भारतीय संसदेने भारतीय राज्यघटनेचे अस्पृश्यता निवारण विषयीचे सतरावे कलम संमत केले.

२९ एप्रिल १९५४ – रोजी चंद्रपूर जिल्हा येथील वडसा येथे भंडारा संसद पोटनिवडणुकीच्या प्रसारासाठी आयोजित सभेला संबोधित करताना विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, "आदिवासी असूनही रानटी युगातच आहेत. स्वातंत्र्याने त्यांच्या जीवनात बदल घडवून आणलेला नाही."

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ३० एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, चेत मासो, मंगळवार, चैत्र माहे.

३० एप्रिल १९०९ – रोजी अंधश्रद्धा निर्मुलन आणि जातीभेद निर्मुलनसाठी अखंड काम करणारे ग्रामगीताकार माणिक बंडोजी इंगळे तथा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती.

३० एप्रिल १९२७ – रोजी मुंबई कामाठीपुरा येथे मुंसिपल शाळेतील मुलांच्या बक्षीस समारंभात महाड चवदार तळे प्रकरणावर परिसंवाद आयोजित करण्यात आला.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १ मे २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, चेत मासो, बुधवार, चैत्र माहे.

१ मे १९३२ – रोजी लोथियन समितीचे कामकाज संपले. लोथियन समितीने 'डिप्रेस्ड क्लास म्हणजे अस्पृश्य वर्ग' हा अर्थ केला. हा विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मोठा विजय होता.

१ मे १९३६ – रोजी वर्धा येथे सेठ जमनालाल बजाज, म. गांधी यांनी सेठ वालचंद हिराचंद यांच्यासह विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट घेऊन धर्मांतराबद्दल चर्चा केली.

१ मे १९५३ – रोजी भारतीय संविधान दुसरे घटनादुरुस्ती करण्यात आली. या घटना दुरुस्तिद्वारे लोकसभेतील प्रतिनिधींची पुनर्रचना करण्यात आली.

१ मे १९५६ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यसभेच्या सभागृहात भाषिक प्रांतरचनेच्या प्रश्नाविषयी आवेशपूर्ण भाषण केले.

१ मे १९६० – रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिनानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा.

१ मे १९६६ – रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे दिल्ली येथे पाचवे अधिवेशन कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

१ मे १९७७ – रोजी सुर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते महाड मधील क्रांती स्तंभाचे उद्घाटन झाले.

१ मे १९७७ – रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यास सहमती दर्शविली व रितसर करण्याची सूचना दिली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २ मे २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, चेत मासो, गुरूवार, चैत्र माहे.

२ मे १९०८ – रोजी पु. भ. डॉ. जगदीश काश्यप महाथेरो जयंती.

२ मे १९५० – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी माईंनी बिर्ला मंदिर बुद्ध विहार येथे भंते आर्य वंश कडून त्रिशरण व पंचशिल ग्रहण केले.

२ मे १९५० – रोजी दिल्ली येथे भगवान बुद्धांच्या २४९४ व्यां जयंतीनिमित्त विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्ध धंम्माचां उघडपणे पुरस्कार केला.

२ मे १९५४ – रोजी मुंबईच्या सिद्धार्थ महाविद्यालयामध्ये युथ असेंबलीचे उद्घाटन प्रसंगी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "तत्त्व आणि व्यवहाराची सांगड घातली नाही तर वरिष्ठ वर्गाचा निःपात होण्यास वेळ लागणार नाही."

२ मे १९५४ – रोजी भंडारा येथे पोटनिवडणूक झाली. शेड्युल्ड कास्टस फेडरेशनतर्फे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर व काँग्रेस पक्षातर्फे बोरकर उभे होते. या निवडणुकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पराभव झाला. या निवडणुकीत मात्र बाबासाहेब विरोधी पक्षांना पुरून उरले.

२ मे १९५४ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विदर्भ साहित्य संघ नागपूरला भेट.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ३ मे २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, चेत मासो, शुक्रवार, चैत्र माहे.

३ मे १९२० – रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी अस्पृश्य लोकांची वेठबिगारी बंद करण्याची राजाज्ञा दिली.

३ मे १९२७ – रोजी बदलापूर जिल्हा ठाणे येथील त्रिशत सांवत्सरिक श्री शिवाजी उत्सव मध्ये विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, "राज्याचा अभिमान नसेल तर राज्य टिकत नाही."

३ मे १९२८ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबई विधिमंडळात 'मुंबई नगरपालिका कायदा' बीलावर भाषण केले.

३ मे १९३६ – रोजी टाऊन हॉलमध्ये नागपूर म्युनिसिपालटी तर्फे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानपत्र अर्पण. मांनपत्रास उत्तर देतांना त्यांनी सांगितले की, "राजकीय सत्तेचा वापर न्याय व उदार बुद्धीने करावा लागेल."

३ मे १९३६ – रोजी नागपूर कस्तुरचंद पार्क येथे अस्पृश्य बांधवांच्या जाहीर सभेत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "शेकडो वर्षे थांबूनसुद्धा जे कार्य झाले नसते तर या दहा (१०) वर्षांच्या अल्पावधित झाले आहे."

३ मे १९९३ – विश्व (जागतिक) प्रेस (पत्रकारिता) स्वतंत्रता दिवस.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *विश्व (जागतिक) प्रेस (पत्रकारिता) स्वतंत्रता दिवस.* 💎🦚🦚🦚☸☸

जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिनाविषयी

१९९३ पासून दरवर्षी ३ मे रोजी साजरा केला जातो, जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिन हा प्रेस स्वातंत्र्याचे सार्वत्रिक महत्त्व आणि लोकशाही, पारदर्शकता आणि मानवी हक्कांच्या संरक्षणात पत्रकारितेच्या भूमिकेची आठवण करून देतो.

संयुक्त राष्ट्र महासभाभेने ३ मेंला विश्व प्रेस स्वतंत्रता दिवस अथवा विश्व प्रेस दिवस घोषित केले. ज्याला पत्रकारितेच्या स्वातंत्र्याचे महत्त्वाबद्दल जागरूकता वाढविणे आणि सरकारला १९४८ च्या मानवाधिकारांच्या सार्वभौमिक घोषणेचे अनुच्छेद १९ याअंतर्गत अभिव्यक्तिच्या अधिकाराचा सन्मान करणे आणि त्याला बनवून ठेवण्याच्या कर्तव्याची आठवण देण्यासाठी मनविल्या जातो. तसेच विंडहोक घोषणेच्या वर्षगाठीला चिह्नित करतो, जे १९९१ मध्ये विंडहोक मध्ये अफ्रीकी समाचार पात्रांच्या (वृत्तपत्र) पत्रकारांद्वारे मुक्त पत्रकार सिद्धांताची एक (१) साक्ष आहे.

जागतिक पत्रकारिता स्वातंत्र्य दिनाचा इतिहास काय?

युनेस्को आणि संयुक्त राष्ट्रांच्या सार्वजनिक माहिती विभागाने १९९१ मध्ये संयुक्तपणे ३ मे रोजी जागतिक पत्रकारिता स्वातंत्र्य दिन साजरा करण्याचा एकमताने निर्णय घेतला. त्यानंतर, १९९३ मध्ये युनेस्को जनरल कॉन्फरन्सच्या २६ व्या अधिवेशनात या संदर्भातला प्रस्ताव स्विकारण्यात आला. खरे तर तेव्हापासून आजतागायत हा दिवस ३ मे रोजी सर्वत्र उत्साहात साजरा केला जातो.

इतिहास आणि उद्देश:

१९९३ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने युनेस्कोच्या शिफारशीनुसार जागतिक प्रेस स्वातंत्र्य दिनाची अधिकृत स्थापना केली. त्यामागे १९९१ मध्ये स्वीकारलेली विंडहोक घोषणा ही प्रेरणा होती. ही घोषणा सांगते की लोकशाहीसाठी स्वतंत्र, मुक्त आणि व्यावसायिक पत्रकारिता अत्यावश्यक आहे. या दिवशी, जगभरातील पत्रकारांनी माहितीच्या अधिकारासाठी लढताना दिलेल्या बलिदानाची आठवण केली जाते. सत्य मांडण्यासाठी आणि सत्ता टिकवण्यासाठी संघर्ष करणाऱ्यांच्या कर्तृत्वाला या दिवशी मान्यता दिली जाते.

महत्त्व आणि आजचे वास्तव:

सद्यस्थितीत माध्यमांनी माहितीचा सच्चा आरसा होणे गरजेचे आहे. मात्र आज पत्रकारितेवर अनेक पातळ्यांवर दबाव आहे. राजकीय हस्तक्षेप, आर्थिक अडचणी, फेक न्यूजचा सुळसुळाट आणि डिजिटल तंत्रज्ञानातून उद्धवलेली अविश्वासाची भावना. यामुळेच प्रेस स्वातंत्र्याचा जागर ही काळाची गरज ठरली आहे. हा दिवस माध्यमकर्मींना त्यांच्या अधिकारांची आठवण करून देतो आणि जनतेलाही माध्यम स्वातंत्र्याचे सामाजिक मूल्य समजावतो. सरकारे, संस्था आणि नागरिक यांना या क्षेत्राचे संरक्षण करण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहनही यातून केले जाते.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ४ मे २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, चेत मासो, शनिवार, चैत्र माहे.

४ मे १९२९ – रोजी यवतमाळ येथे संत चोखामेळा मोफत वसतिगृहातर्फे बहिष्कृत विद्यार्थ्यांचे संम्मेलन.

४ मे १९३२ – रोजी लोथियन समितीचे कामकाज संमपल्यानंतर विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिमला येथून मुंबईस परत आले.

४ मे १९३६ – रोजी अमरावती येथील श्री. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जाहीर सभेत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, "ज्या धर्मात समता, प्रेम व आपुलकी नाही तो धर्म, धर्म नव्हे."

४ मे १९५५ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबईत 'भारतीय बौद्ध महासभा (The Buddhist Society of India)' या संस्थेची स्थापना केली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ५ मे २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, चेत मासो, रविवार, चैत्र माहे.

५ मे १८१८ – रोजी कार्ल मार्क्स जयंती.

५ मे १९२३ – रोजी मध्यप्रांत वऱ्हाड महार परिषदेचे १२ वे अधिवेशन धुगाव जिल्हा अमरावती येथे.

५ मे १९३५ – रोजी आदरनिय मिराताई आंबेडकर यांची जयंती.

५ मे १९४५ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दिल्लीहून मुंबईला दुपारी आगमन झाले.

५ मे १९४५ – रोजी अखिल भारतीय दलित फेडरेशनचे तिसरे अधिवेशन. एन. शिवराज यांच्या अध्यक्षतेखाली परळ येथिल नरेपार्क मैदानात झालेल्या जंगी सभेत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "आम्ही आमच्या कर्तुत्वाने आणि हिमतीने देशाकरिता जे करावयाचे ते स्वतंत्रपणे करू." त्यांनी या परिषदेत केलेले भाषण पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इंग्रजीत 'कम्यूनल डेडलॉक अँड वे टू सॉल्व इट' या नावाने प्रकाशित केले.

५ मे १९५० – रोजी नवी दिल्ली येथील बौद्ध धंम्मावरील व्याख्यानानंतर विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुंबईला परतल्या नंतर, जनता पत्राच्या प्रतिनिधींना त्यांनी सांगितले की, "बौद्ध धंम्माकडे माझ्या मनाचा कल निश्चित झाला आहे. कारण बौद्ध धंम्मातील तत्त्वं टिकाऊ आहेत आणि समानतेवर आधारलेली आहेत."

५ मे १९५६ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सिद्धार्थ महाविद्यालयाचे ग्रंथपाल शां. शं. रेगे यांना "बुद्ध आणि त्यांचा धम्म" या ग्रंथाचे प्रकाशन बाबत पत्र लिहिले.

*५ मे १९९८ – रोजी जागतिक हास्य दिन. जागतिक हास्य दिनाची स्थापना १९९८ मध्ये करण्यात आली आणि पहिला उत्सव १० मे १९९८ रोजी मुंबई, भारत येथे साजरा करण्यात आला, ज्याची व्यवस्था जगभरातील हास्य योग चळवळीचे संस्थापक डॉ. मदन कटारिया यांनी केली होती. हा दिवस आता जगभरात मे महिन्याच्या पहिल्या रविवारी साजरा केला जातो.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

🎂🎂🎂 महाउपासिका मीराताई आंबेडकर 🎂🎂🎂

आज ५ मे अर्थात आदरनिय मिराताई आंबेडकर यांचा ८९ वा वाढदिवस...!

ज्या आंबेडकर घराण्याने त्यागाची नवी परिभाषा समाजातं रुजविली, आपल्या पोटची पोरं औषधा अभावी मातीआड जातं होती त्याची तमा न बाळगता समाजाच्या कोटी लेकरांच भविष्य उज्ज्वल व्हावे म्हणून आयुष्यभर कणा– कणाने झिजले आणि ज्ञानासाठी क्षण अन क्षण कामी लावला आणि दलित, उपेक्षित तथा समस्त समाजाला खुप मोठी देणगी दिली, त्या आंबेडकर कुटुंबाच्या मिराताई पुढिल पिढिच्या वारसदार आहेत...!

मिराताई यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्याची माहिती आपणा सर्वांना व्हावी म्हणून सदर लेख दिलेला आहे.

🔹 जन्म – रावडुळ ता. महाड जिल्हा – रायगड.

🔹 वडिलांचे नाव – विठ्ठल साळवे.

🔹 आईचे नाव – कमलाबाई.

🔹 लग्नापूर्वीचे नाव – नीरा.

🔹 नीरा, सिंधू, निर्मला, उर्मिला व विमल हया पाच मुली व पांडुरंग भाऊ.

आई–वडील व मिराताई मुंबईला सुशीला जाधव या त्यांच्या चुलत बहिणीकडे आले असताना यशवंतराव तथा भैय्यासाहेबांनी त्यांना पहिल्यांदा पाहिले.

🔹 मीराताई व भैय्यासाहेब यांचा विवाह १९ एप्रिल १९५३ रोजी परळ येथील R. M. भट हायस्कूल मध्ये बौद्ध पद्धतीने झाला.

🔹 कार्य 🔹

•भारतीय बौद्ध महासभा संस्थेच्या वतीने धंम्म प्रसार व प्रचार करण्यासाठी धंम्मयान मासिक सुरू केले.

•माता रमाई यांच्या जन्म गावी वणद या ठिकाणी माता रमाई यांचे स्मारक मीराताई यांनी ७/२/२०१५ रोजी बांधले.

•१८ फेब्रुवारी ते २७ फेब्रु.१९९५ चैत्यभूमी, मुंबई येथे पहिले केंद्रीय शिक्षक प्रशिक्षण शिबिर भरवले.

•१४ एप्रिल १९८२ भिमजयंती पासून मीराताई यांनी भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने श्रामनेर शिबिरांची सुरवात.

•१७/७/२००० – चैत्यभूमी, मुंबई भारतीय बौद्ध महासभेच्या प्रत्येक शाखा व कार्यकर्त्यांने कसे कामकाज करावे यासाठीचे बायलॉज (उपविधी) प्रकाशित.

•१६/५/१९८६ – भिक्खूसंघाचे संघनायक व भिक्खु परिषदेचे उद्घाटक महाथेरो आनंदमित्र यांच्या हस्ते महाउपासिका पदवी प्रदान.

•८/५/२००१ – महिला दिनाचे औचित्य साधून माता रमाई यांच्या कार्याचे चिरंतर स्मरण व्हावे म्हणून भारतीय बौद्ध महासभेच्या अंतर्गत माता रमाई स्वयं सहाय्यता बचत गट सुरू केले.

•१९/३/१९८९ – मीराताई यांनी देशभरात एकसूत्रता आणण्यासाठी बौद्ध जीवन संस्कार पाठ हिंदी भाषेत छापला.

🔹 भारतीय बौद्ध महासभा अधिवेशन 🔹

•२ ऑक्टोबर १९७७ च्या राष्ट्रीय बैठकीत मीराताई यांना भारतीय बौद्ध महासभेचे तिसरे अध्यक्ष म्हणून निवड.

•२६ ते २८ डिसेंबर १९८० आंबाझरी मैदान, नागपूर येथील अधिवेशनाचे अध्यक्षस्थान, दुसरे अधिवेशन.

•१८ व १९ मार्च १९८९ – डॉ. आंबेडकर भवन, झाशी मार्ग, दिल्ली येथे भारतीय बौद्ध महासभेचे तिसरे अधिवेशन, अधक्षस्थान.

•२६ व २७ ऑक्टो. १९९२ – चैत्यभूमी, मुंबई, चौथे अधिवेशन. अध्यक्षस्थान.

•१२ ते १४ मार्च १९९९ – खुर्जा, बंदरशहर, उत्तर प्रदेश येथे पाचवे अधिवेशन, अध्यक्षस्थान.

•३० ते ३१ ऑक्टो. २००४ – परळ, मुंबई येथे ६ वे अधिवेशन, अध्यक्षस्थान.

•२२ ते २४ एप्रिल २०११ – सायन, मुंबई येथे सातवे अधिवेशन, अध्यक्षस्थान. क्रांतिकारी निर्णय–विधी संस्कारातील पूजा साहित्यातून पाच प्रकारची फळे, पाणी, मातीचा कुंभ, पिंपळाची पाने व पांढरा धागा काढण्यात आला. तरीपण बरेच बौद्धाचार्य आजही त्याचा वापर करतात.

•१६ व १७ मे २०१५ – सायन, मुंबई येथे आठवे अधिवेशन, अध्यक्षस्थान.

•१६/१/२००० – केंद्रीय महिला विभाग स्थापन.

त्यागमुर्ती मिराताई आंबेडकर यांच्या जन्मदिनानिमित्त ताईंना हार्दिक शुभेच्छा...! ताईंना निरोगी आयुष्य लाभो अशी मंगल कामना...!

जयभीम.

* 🔹 संकलन – आयु. प्रशांत चव्हाण सर. 🔹 * केंद्रीय शिक्षक, भारतीय बौद्ध महासभा, तालुका – श्रीगोंदा, जिल्हा – अहमनगर.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ६ मे २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, चेत मासो, सोमवार, चैत्र माहे.

६ मे १९२२ – रोजी कोल्हापूर संस्थांनाचे राजे, कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५०% जागा आरक्षण देणारे आरक्षणाचे जनक, संगीत, चित्रपट, चित्रकला, लोककला आणि कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना राजाश्रय देणारे सुधारणांचे कृतिशील पुरस्कर्ते, लोककल्याणकारी राजे, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना विनम्र भावपूर्ण श्रद्धांजली.

६ मे १९२९ – रोजी महाबळेश्वर येथे प्राथमिक शिक्षण प्रसारसंबंधी परिषदेत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात प्राथमिक शिक्षणाचा प्रसार राष्ट्रीयदृष्ट्या किती महत्त्वाचा आहे? याचे महत्त्व सांगितले.

६ मे १९३२ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर कामठी येथील अखिल भारतीय डिप्रेस्ड क्लास परिषदेला जाण्यासाठी मुंबई येथून नागपूर मेलने कामठीला रवाना झाले.

६ मे १९३३ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त समितीच्या कामासाठी लंडनला पोहोचले.

६ मे १९४५ – रोजी एन. शिवराज यांच्या पत्नी मिनांबल यांच्या अध्यक्षतेखाली दलित वर्ग महिला परिषद संप्पंन्न झाली.

६ मे १९५५ – रोजी मुंबईतील बोरिवली जवळील कान्हेरी येथे वैशाख पौर्णिमेस आम्रवृक्षाखाली चौथऱ्यावर आसन मांडून विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी, "मानवाच्या विवेकबुद्धीला केवळ बुध्दांनी आवाहन केले आहे." असे विचार मांडले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ७ मे २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, चेत मासो, मंगळवार, चैत्र माहे.

७ मे १९३२ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा नागपूरच्या (कामठी) अखिल भारतीय दलित काँग्रेसच्या अधिवेशनात सहभाग.

७ मे १९३६ – रोजी कामठी येथे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदानावर अस्पृश्यांची जाहीर सभा.

७ मे १९३८ – रोजी जाधव गांधी व धीरज लाल या दोन अट्टल सटोडियांना मुंबई हायकोर्टाने जुगारीच्या आरोपावरून दिलेल्या कैदेच्या शिक्षा आपल्या अधिकारात तहकूब केल्याने असेंबलीत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विस्तृत भाषण केले.

७ मे १९४३ – रोजी कामगार समितीच्या अस्थायी समितीची मजूर मंत्री विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक.

७ मे १९४९ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे घनिष्ठ ज्येष्ठ सहकारी संभाजी तुकाराम गायकवाड यांचे निधन.

७ मे १९७७ – रोजी राजा ढाले यांनी नाशिक येथे आपल्या गटाचे स्वतंत्र अधिवेशन घेऊन तेथे पँथर बरखास्तीचा निर्णय घेतला व मास मुव्हमेंट या संघटनेची स्थापना केली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ८ मे २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, चेत मासो, बुधवार, चैत्र माहे.

८ मे १९३३ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लंडन येथील वृत्तपत्रात गांधिजीने नव्याने सुरुवात केलेल्या आत्मशुद्धीच्या उपोषणासंबंधी वाचले.

८ मे १९५० – रोजी स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी राष्ट्रपती भवनात स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री म्हणून विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पदाची व गोपनीयतेची शपथ दिली.

८ मे १९५४ – रोजी देहू रोड, जिल्हा पुणे येथे संत चोखोबाराय मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यासाठी मंदिर समिती सदस्यांनी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट लोणावळा येथे घेतली असता त्यांना, "तुम्ही बांधलेल्या देवळात बुद्धांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करा." असे सांगून बौद्ध धंम्माचे मार्गदर्शन केले.

८ मे १९५५ – रोजी मुंबई नरेपार्क येथे भारतीय बौद्धजन समितीच्या विद्यमाने भगवान गौतम बुद्ध जयंती उत्सव श्री. मंगलदास पक्वासा, माजी राज्यपाल, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या भाषणात सांगितले की, "बुद्ध धंम्म आणि हिंदू धर्म यात जमीन आसमांनाचे अंतर आहे."

८ मे १९७२ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना बौद्ध धंम्माची दीक्षा देणारे थोर बौद्ध भिक्षू चंद्रमणी यांस परिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

भिक्षू चंद्रमणी परिनिर्वाण दिन

भंते चंद्रमणी यांनी १४ ऑक्टोबर १९५६ ला विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना बौद्ध धंम्माची दीक्षा दिली.

१९०१ मध्ये महापरिनिर्वाण स्तुपामध्ये बौद्धांना पूजा करण्याचा अधिकार नव्हता त्यासाठी त्यांनी इंग्रज सरकारला विनंती केली.

बुद्धगयेचे महविहार बौद्धांना पूजा करण्यासाठी खुले व्हावे यासाठी प्राणाची बाजी लावून त्यांनी संघर्ष केला.

कुशिणारा या ठिकाणी बुद्ध विहार पूजा विधीसाठी खुले नव्हते, त्यासाठी त्यांनी सुप्रीम कोर्ट पर्यंत संघर्ष केला.

कुशिणारा या ठिकाणी त्यांनी गरीब विद्यार्थ्यांसाठी शाळा व महाविद्यालये सुरू केले.

त्यांनी भारतीय नागरिकत्व मिळविले व भारतातील बौद्धांसाठी मरेपर्यंत संघर्ष केला.

वयाच्या ९७ व्या वर्षी त्यांचे परिनिर्वाण झाले.

🌐🌐🌐🌐🌐🌐🌐🌐

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ९ मे २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, वेसाख मासो, गुरूवार, वैशाख माहे.

९ मे १९१६ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी "कास्टस इन इंडिया: देयर मेकनिझम, जेनिसिस अँड डेव्हलपमेंट" हा शोधनिबंध लिहून कोलंबिया विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ. ए. ए. गोल्डनवेअर यांनी आयोजित केलेल्या परिसंवादात मानववंशशास्त्राच्या विद्यार्थ्यांसमोर वाचला.

९ मे १९३८ – रोजी संत चोखामेळा स्मृति दिन.

९ मे १९४१ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चार मिनार इमारतीची विक्री झाली.

९ मे १९४३ – रोजी गांधी आणि जीना यांनी निवृत्त व्हावे असे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबई येथे पाकिस्तान प्रश्नावर मत प्रदर्शित केले.

९ मे १९५९ – रोजी रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, सत्यशोधक समाजाचे सदस्य, समाजसुधारक, शिक्षणप्रसारक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १० मे २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, वेसाख मासो, शुक्रवार, वैशाख माहे.

१० मे १९२२ – रोजी छत्रपती शाहू महाराजांच्या निर्वाणाने विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शोकाकुल होऊन त्यांनी राजाराम महाराजांना पत्र लिहिले. आपल्या पत्रात ते म्हणतात की, "महाराजांच्या निधनाची बातमी इंग्रजी वर्तमानपत्रात वाचली व मला धक्का बसला या दु:खद घटनेमुळे मला दु:ख झाले. त्यांच्या निधनाने मी माझ्या एका खास मित्रास आचवलो आहे. अस्पृश्य वर्ग तर आपल्या एका मोठ्या हितचिंतकांना मुकला आहे. त्यांच्या काळजाचा सर्वात महान कैवारी हरपला आहे. मी दु:खाने विव्हळत असता आपल्या नि गतधवां महाराणीच्या दु:ख प्रसंगी मी मनपूर्वक सहानुभूती व्यक्त करण्याची त्वरा करीत आहे."

१० मे १९३८ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एका क्रिमिनल (फौजदारी) खटल्याच्या निमित्ताने नागपूर येथे आले असता इंदोराला त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात बाबासाहेब म्हणाले की, "निवडलेल्या लोकांनी आपली कामे पूर्ण करावीत याची काळजी घ्यावी."

१० मे १९४३ – रोजी इंडियन फेडरेशन ऑफ लेबर या संस्थेच्या मुंबई शाखेतर्फे मजूरमंत्री विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन्मानार्थ समारंभ.

१० मे १९४३ – रोजी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स मुंबई या संस्थेत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण झाले. त्यात ते म्हणाले की, "साम्राज्य विस्तार, वर्णविद्वेष आणि दारिद्र्य या तीन रोगांची जगाला बाधा झालेली आहे. भारताची आर्थिक आणि औद्योगिक शक्ती वाढेल, तेव्हा साम्राज्यवाद आणि काळ्या गोऱ्यांचा वाद मिटेल."

१० मे १९५४ – रोजी प्रकाश (बाळासाहेब) आंबेडकर यांचा जन्मदिन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ११ मे २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, वेसाख मासो, शनिवार, वैशाख माहे.

११ मे १८८८ – रोजी मुंबईतील कोळीवाडा (मांडवी) या समारंभामध्ये जनतेच्या वतीने थोर समाजसुधारक ज्योतिबा फुले (गोऱ्हे) यांना रावबहादर बडेकर यांनी "महात्मा" ही पदवी दिली.

११ मे १९३८ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आज सकाळी ८ वांजता नागपुरात विद्यार्थ्यांनी स्वागत केले. त्यावेळी डॉ. आंबेडकरांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, "शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी सामाजिक कार्ये केली पाहिजेत, समाजाची सेवा केली पाहिजे." सकाळी १० ते सायंकाळी ४:३० पर्यंत ते कार्यालयात गेले. ते संध्याकाळी ६ वाजता कामठीला निघाले. तेथे मुक्कामी श्री. हरदास एल. एन. यांच्याबरोबर विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जाहीर स्वागत करण्यात आले.

११ मे १९४१ – रोजी आर. एम. भट हायस्कूल, परळ, मुंबई येथे झालेल्या मुंबई अस्पृश्य विद्यार्थी संमेलन (तिसरे) प्रिन्सिपॉल दोदेसाहेब यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. त्यावेळी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "विश्वानवृत्ती (कुत्र्याच्या) नव्हे तर मनुष्याच्या मानसिकतेचे अनुसरण करा."

११ मे १९५२ – रोजी हैद्राबाद येथे झालेल्या एका कार्यक्रमात विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "सरकारने आर्थिक बोझा सहन करून धान्याच्या किमती माफक ठेवाव्यात."

*११ मे १९९३ – रोजी जागतिक स्थलांतरित पक्षी दिन. हा दिन मे महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी साजरा करण्यात येतो.

१९९३ मध्ये, यूएस फिश अँड वाइल्डलाइफ सर्व्हिस, स्मिथसोनियन मायग्रेटरी बर्ड सेंटर आणि कॉर्नेल लॅबोरेटरी ऑफ ऑर्निथॉलॉजी यांनी आंतरराष्ट्रीय स्थलांतरित पक्षी दिवस (IMBD) साजरा करण्यास सुरुवात केली. त्यानंतर, प्रथम जागतिक स्थलांतरित पक्षी दिन एप्रिल २००६ मध्ये AEWA आणि CMS द्वारे केनियातील लैकिपिया येथील सुश्री कुकी गॅलमन यांच्या मालकीच्या 'ओल एरी न्इरो' नावाच्या प्रसिद्ध वन्यजीव अभयारण्यात सुरू करण्यात आला.*

*११ मे १९९८ – रोजी दरवर्षी ११ मे हा दिवस राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. ११ मे १९९८ रोजी भारतीय लष्कराच्या पोखरण रेंजवर अण्वस्त्र क्षेपणास्त्र चाचणी यशस्वीपणे पार पाडण्याची भारताला अभिमानास्पद कामगिरी होती. १९९८ च्या या स्मरणीय घटनेनंतर आपले भारताचे माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी यांनी भारताला पूर्ण अण्वस्त्र देश घोषित केले. १९९९ पासून, ११ मे हा दिवस राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस म्हणून साजरा केला जातो, ज्याचा उद्देश शास्त्रज्ञ, संशोधक, अभियंते आणि विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील इतर सर्वांच्या कामगिरीचे स्मरण व्हावे.

विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालय हे देशातील उत्सवांसाठी अँकरिंग संस्था आहे.*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

*स्थलांतरित पक्ष्यांबद्दल तथ्य : *

१. जागतिक स्तरावर, पक्ष्यांच्या किमान ४,००० प्रजाती नियमित स्थलांतरित आहेत, जे जगातील एकूण पक्ष्यांपैकी ४० टक्के आहे.

२. आर्क्टिक टर्नमध्ये सर्वात लांब स्थलांतर आहे. ते एका वर्षात ५०,००० मैल उडू शकतात.

३. बार-हेडेड गुस हे सर्वाधिक उडणारे स्थलांतरित पक्षी आहेत, विशेषत: भारतातील हिमालयावरून उड्डाण करताना.

४. नॉर्दर्न व्हीटियर, एक हलका वजनाचा पक्षी, आर्क्टिक आणि आफ्रिकेदरम्यान प्रत्येक मार्गाने ९,००० मैलांपर्यंत प्रवास करू शकतो, ज्यामुळे तो कोणत्याही सॉन्गबर्डसाठी सर्वात मोठ्या श्रेणींपैकी एक बनतो.

५. स्निप्स ६० मैल प्रतितास वेगाने ४,२०० मैल उडतात.

६. बार-टेलेड गॉडविट ७,००० मैल न थांबता उडू शकते.

७. स्थलांतरादरम्यान त्यांच्या लांब उड्डाणांची तयारी करण्यासाठी, पक्षी हायपरफॅगिया नावाच्या अवस्थेत प्रवेश करतात, अन्न मोठ्या प्रमाणात गोळा करतात आणि त्यांच्या लांब प्रवासात वापरण्यासाठी चरबी साठवतात.

८. ऑस्ट्रेलियन पक्षी इमू स्थलांतरादरम्यान अन्न शोधण्यासाठी मैल पायी प्रवास करतात.

९. काही पेंग्विन पोहण्याद्वारे स्थलांतर करण्यासाठी ओळखले जातात.

१०. वेगवेगळ्या पक्ष्यांच्या प्रजाती वर्षाच्या विशिष्ट वेळी आणि दिवसाच्या वेळी स्थलांतर करतात.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १२ मे २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, वेसाख मासो, रविवार, वैशाख माहे.

१२ मे १९३३ – रोजी महार सेवा संघातर्फे चिपळूण येथे पाचवे अधिवेशन संप्पंन्न झाले.

१२ मे १९४३ – रोजी भारतीय राजकारणातील पेचप्रसंग कसा सोडवावा या विषयावर विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची टाईम्स ऑफ इंडियाला मुलाखत.

१२ मे १९५६ – रोजी 'ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन' लंडनच्या नभोवाणी केंद्रावरून (बीबीसी) विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 'मला बौद्ध धंम्म का प्रिय आहे?' हे भाषण प्रसारित झाले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १३ मे २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, वेसाख मासो, सोमवार, वैशाख माहे.

१३ मे १९२० – रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पत्र.

१३ मे १९३८ – दिनांक १३ मे ते २१ मेच्या दरम्यान विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोकण प्रांताचा दौरा करून ठीक ठिकाणी आयोजित सभेत भाषणे केलीत. खोती पद्धत नष्ट करण्यात अस्पृश्य वर्गांचे कसे हित आहे हे पटवून सांगितले.

१३ मे १९५२ – रोजी राज्यसभेचे सदस्य म्हणून विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शपथविधी संप्पंन्न झाला. तसेच प्रिव्हीलेज कमिटीत निवड.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १४ मे २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, वेसाख मासो, मंगळवार, वैशाख माहे.

१४ मे १६५७ – रोजी संभाजी महाराज जयंती.

१४ मे १९३८ – रोजी कोंकण पंचमहल महार परिषद मुक्काम कणकवली येथे महार अस्पृश्यांच्या झालेल्या प्रचंड सभेत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "न्याय्य हक्कांसाठी तरुणांनी मरणही पत्करले पाहिजे."

१४ मे १९४५ – रोजी शेड्युल्ड कास्टस फेडरेशन मुंबई शहर शाखेतर्फे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीत दामोदर गृहाच्या पाठीमागील बगीच्यात चहापार्टी आयोजित केली. या निमित्ताने सर्व मंडळाचे सभासद आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे गट छायाचित्र घेण्यात आले.

१४ मे १९५९ – रोजी नागपूर येथे आपल्या विचारांच्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन पक्षाचे अधिवेशन बी. सी. कांबळे यांनी भरविले. यावेळी त्यांनी रिपब्लिकन पक्ष दुरुस्त गट तयार केला. या गटात बी. सी. कांबळे यांच्यासोबत बाबू हरदास आवळे, दादासाहेब रूपवते, ए. जी. पवार आले. त्यामुळे दुरुस्त व नादुरुस्त असे दोन गट पक्षात पडले. नादुरुस्त गटाचे नेतृत्व एन. शिवराज यांनी केले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १५ मे २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, वेसाख मासो, बुधवार, वैशाख माहे.

१५ मे १८४७ – रोजी क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले आणि महात्मा ज्योतिराव फुले या दांपत्याने पुण्यातील महारवाड्यात अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केली.

१५ मे १९१५ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दररोज अठरा (१८) तास अभ्यास करून ॲडमिनिस्ट्रेशन ॲंड फायनान्स ऑफ ईस्ट इंडिया कंपनी या विषयावर प्रबंध लिहून कोलंबिया विद्यापीठाला एम. ए. च्या पदवीसाठी सादर केला.

१५ मे १९३६ – रोजी लाहोरच्या जातपात तोडक मंडळाच्या परिषदेसाठी तयार केलेले भाषण, त्यातील वेद व हिंदू धर्मावर टीका असल्याने नामंजूर करत मंडळाने परिषदच रद्द केली, ॲनिहीलेशन ऑफ कास्टस हे न झालेले भाषण विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुस्तक रुपाने प्रकाशित केले.

१५ मे १९३७ – रोजी अमरावती येथे विद्यार्थी संमेलनाचे अध्यक्षपद कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी भूषविले.

१५ मे १९३८ – रोजी देवरूख येथे शेतकऱ्यांच्या सभेत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "बहुसंख्यांक असा शेतकरी व कामकरी वर्ग या देशाचा खरा सत्ताधारी वर्ग बनला पाहिजे."

१५ मे १९४५ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी टाईम्स ऑफ इंडिया पत्रातील अग्रलेख आणि ठक्कर बाप्पांच्या पत्राला उत्तर लिहिले. त्याचा वृत्तांत २६ मे १९४५ च्या जनता वृत्तपत्रात प्रकाशित झाला.

१५ मे २००४ – रोजी अनेक पुरस्कार संन्मानित आंबेडकरी चळवळीचे निष्ठावंत कार्यकर्ते, शाहीर, महाकवी वामन तबाजी कर्डक उर्फ वामनदादा कर्डक यांच्या स्मृतिदिना निमित्त त्यांना विनम्र अभिवादन. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर दहा हजार पेक्षाही जास्त गीते रचली आहेत.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १६ मे २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, वेसाख मासो, गुरूवार, वैशाख माहे.

१६ मे १९३८ – रोजी चिपळूण मुक्कामी 'खोतांच्या जुलूम' विषयी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "जीवनात सर्वोच्च स्थानप्राप्तीची महत्त्वाकांक्षा जोपासा."

१६ मे १९४३ – रोजी इंडीयन फेडरेशन ऑफ लेबरपुढे झालेल्या भाषणात विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले की, "नुसते स्वराज्य मिळून फायदा नाही, ते कोणाच्या हातात राहणार हा प्रश्न महत्त्वाचा आहे."

१६ मे १९४६ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना परिषद व हंगामी राष्ट्रीय सरकार स्थापनेची घोषणा केली.

१६ मे १९५४ – रोजी रंगुन, ब्रह्मदेश येथे भरणाऱ्या जागतिक बौद्ध परिषदेसाठी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर विमानाने पोहोचले. रंगुनमध्ये जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत ते उपस्थित होते.

*१६ मे १९८५ – रोजी "World Agri Tourism Day जागतिक कृषी पर्यटन दिन" महाराष्ट्रात सर्वप्रथम बारामतीतील प्रगतिशील शेतकरी स्व. आप्पासाहेब पवार यांचा यात खूप मोठा वाटा आहे. मात्र त्याला व्यावसायिक स्वरूप देऊन राज्यात कृषी पर्यटन व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवण्याचे श्रेय चंद्रशेखर भडसावळे यांना जाते.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

*ऑस्ट्रेलियात जन्म :– *

कृषी पर्यटनाचा जन्म कुठे झाला? बाबत अनेक दावे–प्रतिदावे केले जातात. मात्र साधारणपणे सुमारे ७० वर्षांपूर्वी ऑस्ट्रेलियामध्ये कृषी पर्यटन या संकल्पनेची व्यावसायिक पातळीवर सुरुवात झाली असे मानले जाते. ऑस्ट्रेलियासह ब्राझील, न्यूझीलंड, कॅनडा, इटली या देशांमध्येही कृषी पर्यटन पूर्वीपासून मोठ्या प्रमाणात होते. युरोपीय देशांनी तर कृषी पर्यटनाला चालना देऊन त्याला शेतीपूरक व्यवसाय म्हणून मान्यताही दिली आहे. अलीकडच्या काही वर्षांमध्ये या क्षेत्राला एका उद्योग क्षेत्राचा दर्जा मिळाला आहे.

भारतात महाराष्ट्राने सर्वात आधी केली सुरुवात :–

भारतात कृषी पर्यटनाची सुरुवात करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. महाराष्ट्रात सर्वप्रथम बारामतीतील प्रगतशील शेतकरी स्व. आप्पासाहेब पवार यांचा यात खूप मोठा वाटा आहे. मात्र त्याला व्यावसायिक स्वरुप देवून राज्यात कृषी पर्यटन व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवण्याचे श्रेय चंद्रशेखर भडसावळे यांना जाते. चंद्रशेखर भडसावळे यांनी कृषीविषयक शिक्षण घेऊन १९८५ साली कृषी पर्यटन केंद्राच्या धर्तीवर सगुना बागेची स्थापना केली. भातशेती शेततळ्यांमधील मत्स्यपालन, नारळ, आंबा, चिकूसारखी फळपिके आणि शेतीविषयक विविध भाजीपाला व इतर पिकांची लागवड केली. त्यानंतर त्याला ॲग्रो टुरिझमचे स्वरुप दिले. आता ही संकल्पना सर्वत्र रुजली आहे. सध्यस्थितीत महाराष्ट्रात ३५० पेक्षा जास्त कृषी पर्यटन केंद्र कार्यरत आहेत. आणि आज महाराष्ट्राच्या २९ जिल्ह्यांमध्ये ही विस्तारलेली कृषी आणि ग्रामीण पर्यटन चळवळ ५२८ कृषी पर्यटन केंद्रापर्यंत गेली आहे. महाराष्ट्रात एकूण कृषी पर्यटन केंद्रावर ती ४,१६७ विदेशी पर्यटकांनी भेट दिलेली आहे. छोट्यातला छोटा शेतकरी असेल किंवा मोठ्यातला मोठा कृषी विद्यापीठ असेल या सर्वांना आता कृषी आणि ग्रामीण पर्यटन केंद्र सुरू करता येऊ शकतात.

*विकेंड टुरिझमचा नवा फंडा :– *

कृषी पर्यटन केंद्रावर संपूर्ण नैसर्गिक वातावरण, चुलीवरचे जेवण, जेवणात शेतातील भाजीपाला, बैलगाडीवरती रपेट, शिवार फेरी इत्यादी आनंददायी गोष्टींचा समावेश असतो. शिवार फेरीमध्ये शेतकरी आपल्या शेतावरील पिकांची, विविध वनस्पतींची माहिती पर्यटकांना देत असतो. तसेच पर्यटक हातात नांगर धरून शेतीची नांगरणी, कुळवणी, भात लावणी ते काढणी अशा निरनिराळ्या शेतीकामात सहभाग घेऊन स्वत: आनंद घेत असतात. अलीकडच्या काही दिवसांमध्ये फेसबूक, इन्स्ट्राग्राम, ट्विटरसारख्या अन्य सोशल मीडिया साईट्सवर शेतात काम करणार्या तरुण–तरुणींचे फोटो पहायला मिळत आहेत. हे केवळ ॲग्रो टुरिझममुळेच शक्य झाले आहे. शेतावर मुक्काम करून पर्यटक निसर्गाचा अनुभव घेतात. यासाठी ग्रामीण भागातील शैलीची कौलारु घरे, मातीच्या भिंती अशा घरांची निर्मिती केलेली असते. विकेंड टूर म्हणून याला मोठी पसंती मिळतांना दिसत आहे.

*कृषी पर्यटनातून आर्थिक विकास :– *

कृषी पर्यटनामुळे ग्रामीण भागातील अर्थकारणाला मोठी चालना मिळू शकते. अनेक ठिकाणी हे सिध्द देखील झाले आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकर्याला ठराविक कालावधीतच उत्पन्न मिळते, ते देखील निसर्ग व बाजारपेठेच्या मर्जीवर अवलंबून असते. यामुळे कृषी पर्यटन हा नियमित उत्पन्न देणारा मार्ग आहे. अनेक शेतकरी शेतीतून उत्पादित झालेला सेंद्रिय शेतमाल जागेवरच थेट पर्यटकांना विकून उत्पन्न मिळवत आहेत. याशिवाय ग्रामीण लोककला शहरात पोचवण्याचे हे माध्यम असून गावातच रोजगार मिळवून देण्याचे मुख्य साधन देखील झाले आहे. कृषी पर्यटनाच्या माध्यमातून शेतमाल विक्रीची थेट बाजारपेठ निर्माण करणे शक्य आहे.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १७ मे २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, वेसाख मासो, शुक्रवार, वैशाख माहे.

१७ मे १८७७ – रोजी 'दुष्काळग्रस्त लोकांना मदत करा' महात्मा ज्योतिबा फुले यांनी सरकारला विनंती पत्र लिहिले.

१७ मे १९२९ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेला Constitution of the Government of Bombay Presidency हा ग्रंथ प्रकाशित झाला.

१७ मे १९२९ – रोजी सायमन मंडळाच्या वृत्तांतावर विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समितीच्या प्रतिवृत्तावर स्वाक्षरी न करता आपली स्वत:ची मते नि शिफारसी यांची एक भिन्न मतपत्रिका समितीस सादर केली.

१७ मे १९३६ – रोजी कल्याण येथे धंम्मांतराच्या जाहीर घोषणेस पाठिंबा देण्याकरिता ठाणे जिल्ह्यातील पूर्व व दक्षिण भागातील अस्पृश्य मानलेल्या समाजाच्या जंगी जाहीर परिषदेत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "आपल्या मातीमोल आयुष्याला सोन्याचे दिवस प्राप्त होण्यासाठीच धंम्मांतराची आवश्यकता आहे."

१७ मे १९३८ – रोजी खोती आंदोलनासंबंधी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा खेड, फुरुस व दापोली (रत्नागिरी) येथे दौरा झाला.

१७ मे १९४१ – रोजी परळ, मुंबई येथे लाल चाळ पंचातर्फे इमारत फंडास थैली अर्पण समारंभ विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला.

१७ मे १९४१ – रोजी "बुद्ध जयंती आणि तिचे राजकीय महत्त्व" हा अग्रलेख विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जनता वृत्तपत्रात लिहिला.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १८ मे २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, वेसाख मासो, शनिवार, वैशाख माहे.

१८ मे १९२९ – रोजी मु. उंबरोळ, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथे बहिष्कृत हितचिंतन सेवासंघातर्फे पाण्यासाठी सत्याग्रह.

१८ मे १९३८ – रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील कार्यक्रम आटोपल्यानंतर विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर विश्रांतीसाठी महाड येथे आले.

१८ मे १९४९ – रोजी संविधान सभा चर्चेत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी, अनुच्छेद ६७–ए, ६८, ६८–ए, ६९, ७०, ७१, ७२ वर चर्चा केली.

१८ मे १९७४ – रोजी भारताने राजस्थानमधील पोखरण येथे आण्विक अस्त्राची पहिली यशस्वी चाचणी केली. त्याचे नाव स्मायलिंग बुध्दा असे ठेवण्यात आले. स्मायलिंग बुद्धाने भारताला जगातील सहावा परमाणू शक्तीसंपन्न राष्ट्र बनविले.

१८ मे १९७७ – रोजी International Museum Day आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिन साजरा केला जातो. संग्रहालयांच्या सर्जनशील प्रयत्नांना एकत्र आणण्यासाठी आणि त्यांच्या ॲक्टिव्हिटीबद्दल जागतिक जागरूकता वाढविण्यासाठी वार्षिक कार्यक्रम तयार करण्याच्या उद्देशाने एक ठराव मंजूर केल्यानंतर आयकॉमने १९७७ मध्ये पहिला आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिवस आयोजित केला होता. तेव्हापासून जगभरातील संग्रहालयांना दरवर्षी आयएमडीमध्ये सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले गेले. वार्षिक थीमशी सुसंगत कार्यक्रम आणि क्रियाकलापांद्वारे त्यांच्या भूमिकेचा प्रचार केला जातो. वार्षिक थीम स्वीकारण्याची परंपरा १९९२ मध्ये सुरू झाली. १९९७ मध्ये आयसीओएमने एक आंतरराष्ट्रीय पोस्टर सादर केले, जे त्या वर्षी २८ देशांनी स्वीकारले.

१८ मे १९९७ – रोजी जागतिक एड्स लस दिन. जागतिक एड्स लस दिनाची संकल्पना १८ मे १९९७ रोजी तत्कालीन राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांनी केलेल्या मॉर्गन स्टेट युनिव्हर्सिटीच्या प्रारंभी भाषणात रुजलेली आहे. क्लिंटन यांनी जगाला विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या उदयोन्मुख युगात नवीन उद्दिष्टे निश्चित करण्याचे आणि पुढील दशकात एड्सची लस विकसित करण्याचे आव्हान दिले, "केवळ खरोखर प्रभावी, प्रतिबंधात्मक एचआयव्ही लस एड्सचा धोका मर्यादित करू शकते आणि शेवटी दूर करू शकते."

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

International Museum Day 2024 Theme:

संग्रहालयांविषयी जनजागृती करण्यासाठी आणि त्यांची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करण्यासाठी दरवर्षी आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिन साजरा केला जातो. या दिवसाचा

इतिहास, महत्त्व आणि थीम विषयी जाणून घ्या.

*International Museum Day History and Significance :– * आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिन हा एक वार्षिक कार्यक्रम आहे, ज्याचा उद्देश संग्रहालयांबद्दल जनजागृती करणे आहे. कलात्मक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, पारंपारिक आणि आकर्षक कलाकृतींचे अमूल्य भांडार म्हणून, संग्रहालये ज्ञान आणि अंतर्दृष्टीचा खजिना प्रदान करतात. आपल्या देशाची कला, स्थापत्य, संस्कृती, इतिहास आणि सभ्यता याबद्दल लोकांना शिक्षित करण्यात ते महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. संग्रहालयांमध्ये ठेवलेल्या बऱ्याच कलाकृती लोकांसाठी खुल्या आहेत, प्राचीन संस्कृतींची जीवनशैली, साधने आणि निर्मितीबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी प्रदान करतात. परिणामी, संग्रहालयांकडे अनेकदा इतिहासाचे भांडार म्हणून पाहिले जाते. आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिनानिमित्त अन्वेषण आणि नाविन्यपूर्ण कल्पनांची देवाणघेवाण करण्यासाठी मंचक प्रदान करून विज्ञानाप्रती त्यांचे समर्पण साजरे केले जाते. या दिवसाचा इतिहास, महत्त्व आणि यावर्षीची थीम जाणून घ्या.

*आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिन २०२४ ची थीम :– *

आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिन दरवर्षी १८ मे रोजी साजरा केला जातो. हा कार्यक्रम दरवर्षी वेगळ्या विषयावर केंद्रित असतो, ज्यात जगभरातील संग्रहालयांना भेडसावणारे संबंधित विषय किंवा आव्हाने प्रतिबिंबित होतात. 'म्युझियम फॉर एज्युकेशन अँड रिसर्च' (Museums for Education and Research) ही यंदाची थीम असून, सर्वसमावेशक शैक्षणिक अनुभव देण्यासाठी सांस्कृतिक संस्थांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर भर देण्यात आला आहे.

*आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिनाचा इतिहास :– *

संग्रहालयांच्या सर्जनशील प्रयत्नांना एकत्र आणण्यासाठी आणि त्यांच्या ॲक्टिव्हिटीबद्दल जागतिक जागरूकता वाढविण्यासाठी वार्षिक कार्यक्रम तयार करण्याच्या उद्देशाने एक ठराव मंजूर केल्यानंतर आयकॉमने १९७७ मध्ये पहिला आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिवस आयोजित केला होता. तेव्हापासून जगभरातील संग्रहालयांना दरवर्षी आयएमडीमध्ये सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले गेले. वार्षिक थीमशी सुसंगत कार्यक्रम आणि क्रियाकलापांद्वारे त्यांच्या भूमिकेचा प्रचार केला जातो. वार्षिक थीम स्वीकारण्याची परंपरा १९९२ मध्ये सुरू झाली. १९९७ मध्ये आयसीओएमने एक आंतरराष्ट्रीय पोस्टर सादर केले, जे त्या वर्षी २८ देशांनी स्वीकारले.

गेल्या काही वर्षांत, आयएमडीच्या सहभागात लक्षणीय वाढ झाली आहे, २००९ मध्ये ९० पेक्षा जास्त देशांमधील २०,००० संग्रहालये, त्यानंतर २०१० मध्ये ९८ देश, २०११ मध्ये १०० देश आणि २०१२ मध्ये १२९ देशांमध्ये उल्लेखनीय ३०,००० संग्रहालये सहभागी झाली आहेत. २०११ पर्यंत आयएमडीच्या अधिकृत पोस्टरचे ३७ भाषांमध्ये भाषांतर केले गेले होते आणि २०१४ पर्यंत १४० देशांमधील ३५,००० संग्रहालयांमध्ये सहभाग वाढला होता.

*आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिनाचे महत्त्व :– *

आंतरराष्ट्रीय संग्रहालय परिषदेने आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिनाच्या स्थापनेचा उद्देश जागतिक स्तरावर संग्रहालयांना एकत्र करणे आणि जागरूकता वाढविणे, समजूतदारपणा वाढविणे आणि विविध संस्कृतींचे कौतुक वाढविण्यासाठी त्यांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर जोर देणे आहे. या निमित्ताने आपण आपल्या परिसरातील संग्रहालयांना भेट देऊ शकता आणि या संस्थांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी होऊ शकता.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

*जागतिक एड्स लस दिन :– *

जागतिक एड्स लस दिवस, ज्याला एचआयव्ही लस जागरूकता दिवस देखील म्हणतात, दरवर्षी १८ मे रोजी साजरा केला जातो. एचआयव्ही संसर्ग आणि एड्स रोखण्यासाठी लसीच्या सतत आवश्यकतेचा प्रचार करून एचआयव्ही लसीचे वकील हा दिवस साजरा करतात . ते स्वीकारतात आणि हजारो स्वयंसेवक, समुदाय सदस्य, आरोग्य व्यावसायिक, समर्थक आणि वैज्ञानिकांचे आभार मानतात जे सुरक्षित आणि प्रभावी एड्स लस शोधण्यासाठी एकत्रितपणे काम करत आहेत आणि आंतरराष्ट्रीय समुदायाला नवीन तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक करण्याचे महत्त्व ओळखण्याचे आवाहन करतात. एचआयव्ही/एड्स महामारीला व्यापक प्रतिसाद.

*एचआयव्ही संसर्गाची लक्षणे :– *

जागतिक एड्स लस दिनाची संकल्पना १८ मे १९९७ रोजी तत्कालीन राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांनी केलेल्या मॉर्गन स्टेट युनिव्हर्सिटीच्या प्रारंभी भाषणात रुजलेली आहे. क्लिंटन यांनी जगाला विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या उदयोन्मुख युगात नवीन उद्दिष्टे निश्चित करण्याचे आणि पुढील दशकात एड्सची लस विकसित करण्याचे आव्हान दिले, "केवळ खरोखर प्रभावी, प्रतिबंधात्मक एचआयव्ही लस एड्सचा धोका मर्यादित करू शकते आणि शेवटी दूर करू शकते."

क्लिंटन यांच्या भाषणाच्या वर्धापन दिनानिमित्त १८ मे १९९८ रोजी पहिला जागतिक एड्स लस दिन साजरा करण्यात आला आणि आजही ही परंपरा सुरू आहे. दरवर्षी जगभरातील समुदाय जागतिक एड्स लस दिनानिमित्त एड्सच्या लसींबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी, एचआयव्ही प्रतिबंध आणि एड्सच्या लसीसाठी संशोधनाविषयी समुदायांना शिक्षित करण्यासाठी आणि सामान्य लोक कोणत्या मार्गांचा भाग बनू शकतात याकडे लक्ष वेधण्यासाठी विविध उपक्रम आयोजित करतात. साथीच्या रोगाला रोखण्यासाठी आंतरराष्ट्रीय प्रयत्न.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १९ मे २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, वेसाख मासो, रविवार, वैशाख माहे.

१९ मे १९२९ – रोजी मालवण येथे कोकणप्रांत पूर्वास्पृष्य शिक्षण परिषद.

१९ मे १९३५ – रोजी नागपूर येथील कामठीमध्ये मध्य प्रांत अस्पृश्य विद्यार्थी संमेलनाचे चौथे अधिवेशन पार पडले.

१९ मे १९५० – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हैद्राबाद येथील बोट क्लब मध्ये भाषण.

१९ मे १९५१ – रोजी शेड्युल्ड कास्टस वेलफेअर असोशियशन आणि भारतीय महाबोधी सोसायटी यांच्या विद्यमाने नवी दिल्ली येथे बुद्ध जयंती मिरवणूक रिडिंग रोड वरील बुद्ध विहाराजवळून निघून आंबेडकर भवनाजवळील मैदानात विसर्जन पावली.

१९ मे १९५१ – रोजी संविधानसभा चर्चेत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी, "लोक प्रतिनिधित्त्व (संशोधन) विधेयक Representaction of People (Amendment) Bill" यावर चर्चा केली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २० मे २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, वेसाख मासो, सोमवार, वैशाख माहे.

२० मे १९३८ – रोजी "खोती नष्ट करण्याचे मी हाती कंकण बांधले आहे." महाड येथील प्रसिद्ध गाडीतळात झालेल्या जाहीर सभेत, "मुंबई प्रांतातील काँग्रेसचे राजकारण" व "खोती बिले" या दोन विषयावर विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण.

२० मे १९४५ – रोजी मुंबई येथे मजूरमंत्री विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन्मानार्थ आयोजित समारंभात डॉ. आंबेडकरांनी सांगितले की, "औद्योगिकिकरण आणि संरक्षण ह्या दोन महत्त्वाच्या प्रश्नांवर स्वतंत्र भारताला झेप घ्यावी लागेल."

२० मे १९५० – रोजी सिकंदराबाद येथे हैद्राबाद राज्य शेड्युल्ड कास्टस फेडरेशनच्या सभेत कायदेमंत्री विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण.

२० मे १९५१ – रोजी महाबोधी सोसायटी नवी दिल्ली येथे बुद्ध जयंती निमित्ताने विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण.

२० मे १९५६ – रोजी व्हॉईस ऑफ अमेरिका मध्ये "भारतीय लोकशाहीचे भवितव्य काय." या विषयावर विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण.

२० मे १९७५ – रोजी गोपाळराव लोखंडे स्मृतिदिन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २१ मे २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, वेसाख मासो, मंगळवार, वैशाख माहे.

२१ मे १९३२ – रोजी बहिष्कृत समाज व अखिल भारतीय अस्पृश्यता निवारक संघ पुणे द्वारे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानपत्र देण्यात आले.

२१ मे १९३२ – रोजी पुण्यातील अहिल्याश्रमात नामदार लठ्ठयांच्या अध्यक्षतेखाली विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानपत्र देण्यात आले.

२१ मे १९३८ – रोजी जावळी तालुका स्वतंत्र मजूर पक्ष परिषदेचे आमदार भाई चित्रे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दुसऱ्या अधिवेशनात विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले की, "आपल्या पक्षाचे सभासद व्हा, आपल्या पक्षाचे बळ वाढवा."

२१ मे १९३८ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सहाशे मैल कोकण प्रांताचा दौरा करून ठिकठिकाणी आयोजित सभेत भाषणे करून मुंबईला परतले.

२१ मे १९९१ – रोजी राष्ट्रीय दहशतवाद विरोधी दिन. भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त दरवर्षी २१ मे १९९१ रोजी मद्रास (आताचे चेन्नई) जवळील श्रीपेरंबुदुर या गावी ज्यांची हत्या करण्यात आली, त्या भारताचे सहावे पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त राष्ट्रीय दहशतवाद विरोधी दिन भारतात साजरा केला जातो. LTTE च्या (लिबरेशन टायगर्स ऑफ तमिळ इलम) आत्मघाती बॉम्बरने. इंदिरा गांधींच्या हत्येनंतर ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी वयाच्या ४० व्या वर्षी गांधींनी भारताचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली; ते भारताचे सर्वात तरुण पंतप्रधान झाले. भारतातील दहशतवाद विरोधी दिन व्हीपी सिंग सरकारने राजीव गांधी यांच्या स्मरणार्थ पाळला होता आणि दहशतवाद आणि हिंसाचाराच्या समाजावर आणि राष्ट्रावर होणाऱ्या दुष्परिणामांबद्दल लोकांना शिक्षित करण्याचा उद्देश होता.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २२ मे २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, वेसाख मासो, बुधवार, वैशाख माहे.

२२ मे १९३२ – रोजी पुणे येथे महार स्वयंसेवकांनी समाज सेवेसाठी तन–मन–धन देण्याचा प्रयत्न करण्याची शपथ घेतली.

२२ मे १९३८ – रोजी पुणे जिल्हा वतनदार महार परिषदेचे दुसरे अधिवेशन घोडे येथे मुक्कामी संप्पंन्न झाले. सदर अधिवेशनात विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, "दुहिमुळे कार्यभाग साधत नाही.

२२ मे १९४७ – रोजी पंडित नेहरूंचे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पत्र. काही महत्त्वाच्या निवडक उद्योग धंद्याच्या रास्ट्रीयकरणाची कल्पना मान्य.

२२ मे १९७२ – रोजी श्रीलंका येथे दहाव्या जागतिक परिषदेला बौद्धांचे प्रतिनिधित्त्व भैय्यासाहेब आंबेडकर यांनी केले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २३ मे २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, वेसाख मासो, गुरूवार, वैशाख माहे.

२३ मे १९३० – रोजी पुणे जिल्हा बहिष्कृत परिषदेचे मुक्काम नारायणराव, ता. जुन्नर येथे अधिवेशन.

२३ मे १९३२ – रोजी कोल्हापूर येथे कर्नाटकातील दिवाण बहादुर अण्णा आबाजी लठ्ठे यांच्या अध्यक्षतेखाली विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानपत्र व सत्कार.

२३ मे १९३३ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर गंगा आगबोटिने मुंबईत परतले.

२३ मे १९४२ – रोजी "अस्पृश्यांना (बहुजनांना) स्वतंत्र मतदार संघ का पाहिजे." या विषयावर कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे नाशिक येथे व्याख्यान.

२३ मे १९४९ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभा चर्चेत आर्टिकल १००, १०१, १०२, १०३ यावर चर्चा केली.

२३ मे १९५३ – रोजी सामुदायिक प्रार्थना कशी करावी? याचे मार्गदर्शन विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर करणार असल्या बाबतचे जनता वृत्तपत्रात बौद्ध धंम्म प्रचार समितीचे सेक्रेटरी श्री. आर. डी. भंडारे यांनी जाहीर केले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🔵🔵🔵 वैशाख पौर्णिमा (बुद्ध पौर्णिमा) (वेसाख मासो पुंन्नमि) 🔵🔵🔵☸☸

आज दिनांक २३ मे २०२४ रोजी, बुद्धाब्द २५६८ वी वैशाख पौर्णिमा आहे.

१. ही पौर्णिमा मे महिन्यात येते. बुद्ध धम्माच्या संपूर्ण अनुयायांसाठी ही सर्वात महत्वाची पौर्णिमा आहे. या पौर्णिमेला त्रिगुणी पौर्णिमा असे म्हणतात. याच पौर्णिमेला सिद्धार्थ गौतमाचा महामाया व शुद्धोदन यांचा पुत्र म्हणून लुंबिनी वनातील शाल वृक्षाखाली जन्म झाला.

२. महामाया ही मोठ्या लवाजम्यासह बाळंतपणासाठी आपल्या पित्याच्या घरी पालखीतून जात होती. सुंदर व मनोरम अशा लुंबिनी वनात जाताना महामायेच्या मनात तेथे काही वेळ थांबण्याची इच्छा निर्माण झाली.

३. महामाया या वनात थांबली असताना व शाल वृक्षाची फांदी हातात धरली असताना तिने उभ्यानेच मुलाला जन्म दिला.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सिद्धार्थ गौतमाच्या जन्माचे अत्यंत सुंदर असे वर्णन भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथात केले आहे. ते लिहितात:

५. "पात्रातील तेलाप्रमाणे महामायेने दहा महिने बोधिसत्त्वाला आपल्या गर्भात धारण केले. तिचा प्रसूतीकाळ जवळ येऊ लागताच प्रसूतीसाठी आपल्या माहेरी जाण्याची तिने इच्छा व्यक्त केली. आपल्या पतीला ती म्हणाली, "माझ्या पित्याच्या देवदहनगरीला मी जाऊ इच्छिते."

६. "तुझ्या इच्छेप्रमाणे होईल." राजाने उत्तर दिले. सोन्याच्या पालखीत बसवून शुद्धोदनाने मोठ्या लवाजम्यासहित तिला तिच्या पित्याच्या घरी पाठविले.

७. देवदहला जात असतांना मार्गात फुलांनी बहरलेल्या तसेच पुष्पविरहित अशा वृक्षांच्या आल्हाददायक गर्द वनराईतून महामायेला जावे लागणार होते. तेच लुंबिनी वन होय.

८. लुंबिनी वनातून पालखी नेली जात असताना ते वन स्वर्गीय अशा चित्रलता वनाप्रमाणे किंवा एखाद्या महाप्रतापी राजाच्या स्वागतासाठी सुशोभित केलेल्या मंडपासारखे भासत होते.

९. बुंध्यापासून फांद्यांच्या शेंड्यांपर्यंत तेथील वृक्ष फळाफुलांनी ओथंबलेले होते. त्यावर नानारंगांचे असंख्य भ्रमर चित्रविचित्र आवाजात गुंजारव करीत होते आणि निरनिराळ्या प्रकारचे पक्षीगण मंजुळ स्वरालाप काढीत होते.

१०. तेथील मनोरम दृश्य पाहून महामायेच्या मनात तेथे थांबून काही काळ क्रीडाविहार करण्याची इच्छा उत्पन्न झाली. म्हणून तिने पालखी वाहणाऱ्या सेवकास आपली पालखी शालवृक्षाच्या कुंजात नेऊन उतरविण्यास व तेथे उभे राहण्यास सांगितले.

११. महामाया पालखीतून उतरली व तेथील एका सुंदर शालवृक्षाच्या बुंध्याशी चालत गेली. त्या शालवृक्षाच्या फांद्या वाऱ्याच्या झुळुकीने वर खाली हेलावत असलेल्या पाहून महामायाला त्यांपैकी एक फांदी हाताने धरावी असे वाटले.

१२. सुदैवाने एक फांदी सहजगत्या तिला धरता येईल एवढी खाली आली. इतक्यात ती आपल्या पायाच्या चवड्यावर उभी राहिली व तिने ती फांदी हाताने धरली. तेवढ्यात फांदी वर गेल्यामुळे झटक्याने महामाया वर उचलली गेली. आणि अशाप्रकारे हालल्यामुळे तिला प्रसूतीच्या वेदना होऊ लागल्या. शालवृक्षाची फांदी हातात धरली असताना उभ्यानेच तिने मुलाला जन्म दिला.

१३. त्या मुलाचा जन्म ख्रिस्तपूर्व ५६३ व्या वर्षी वैशाखी पौर्णिमेला झाला.

१४. शुद्धोदन व महामाया यांचा विवाह होऊन पुष्कळ वर्षे झाली होती. परंतु त्यांच्या पोटी संतान नव्हते. आणि म्हणून पुत्रप्राप्ती झाली तेव्हा शुद्धोदनाने व त्याच्या परिवाराने आणि सर्व शाक्यांनी पुत्रजन्माचा तो उत्सव मोठ्या हर्षोल्हासाने थाटामाटात साजरा केला.

१५. पुत्रजन्माच्या यावेळी कपिलवस्तूचे राजपद भूषविण्याची पाळी शुद्धोदनाची होती. अर्थातच त्यामुळे त्या बालकाला युवराज म्हणून संबोधण्यात येऊ लागले."

१६. याच वैशाख पौर्णिमेला सिद्धार्थ गौतम हा वयाच्या ३५ व्या वर्षी गया येथे निरंजना नदीच्या काठी असलेल्या उरूवेला वनामध्ये पिंपळवृक्षाखाली बसला असताना बुद्ध झाला.

१७. सिद्धार्थ गौतमास वैशाख पौर्णिमेच्या रात्री तिसऱ्या प्रहरी दु:ख मुक्तीचे ज्ञान प्राप्त झाले. त्याच्या मनातील अंधकार पूर्णपणे दूर झाला व तो सम्यक संबुद्ध झाला.

१८. याच दिवशी सिद्धार्थ गौतमाला चार आर्यसत्यांची अनुभूती झाली. भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सिद्धार्थ गौतमाच्या बुद्ध बनण्याच्या प्रक्रियेचे सविस्तर विवेचन केलेले आहे. या ग्रंथात प्रकरण तीन मध्ये यावर प्रकाश टाकला आहे.

१९. याच पौर्णिमेच्या दिवशी ख्रिस्तपूर्व ४८३ मध्ये वयाच्या ८० व्या वर्षी सिद्धार्थ गौतम बुद्धांचे मल्ल गणराज्याची राजधानी कुशीनारा येथील शाल वाटीकेत महापरिनिर्वाण झाले.

२०. या पौर्णिमेच्या रात्री तिसऱ्या प्रहरी मनाच्या जागरूक अवस्थेत समाधीचा अभ्यास करताना गौतम बुद्धांचा मृत्यू झाला.

२१. गौतम बुद्धांच्या जीवनात जन्म, बुद्धत्व प्राप्ती व महापरिनिर्वाण या तिन्ही घटना वैशाख पौर्णिमेच्या दिवशी घडल्या आहेत. निसर्गात दुर्मिळ अशाच या घटना आहेत.

२२. या तिन्ही घटना वैशाख पौर्णिमेला घडल्यामुळे या पौर्णिमेस त्रिगुणी पौर्णिमा असे म्हणतात.

२३. हा अत्यंत महत्त्वाचा सण आहे. तो आनंदाने व उत्साहाने साजरा केला पाहिजे, प्रत्येकाने आपले घर स्वच्छ केले पाहिजे, सजविले पाहिजे, गोडधोड करून इतरांना वाटले पाहिजे, मित्रांना व नातेवाईकांना आपल्या घरी आमंत्रित केले पाहिजे. मुलांसाठी नवीन कपडे खरेदी केले पाहिजेत.

२४. अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे या त्रिगुणी पौर्णिमेच्या दिवशी अष्टशीलाचे पालन केले पाहिजे.

२५. संपूर्ण बुद्ध विहारे व धम्म प्रशिक्षण संस्था यांनी धम्म कार्यक्रम आयोजित केले पाहिजेत, विहारे सजविली पाहिजेत, धम्म प्रवचने आयोजित केली पाहिजेत व मने उल्हासाने व आनंदाने ओतप्रोत भरलेली असली पाहिजेत.

🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼

_बुध्दांनी वर्णाश्रम धर्म नाकारला_

_!! ॐ मणी पद्मे हूँ !!_

🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼

*दिल्ली शेडयूल्ड कास्ट्स वेलफेअर असोसिएशन आणि भारतीय महाबोधी सोसायटी यांच्या विद्यमाने नवी दिल्ली येथे दिनांक १९, २० व २१ मे १९५१ रोजी 'बुद्ध जयंती' मोठ्या स्वरूपात साजरी झाली.*

_शनिवार दिनांक १९ रोजी दिल्लीत फार मोठी मिरवणूक निघाली होती. रिडींग रोड वरील बुद्धमंदिराजवळून मिरवणूक निघून आयर्विन रोड. कॅनॉट सर्कल,

पुंचकिन रोड वगैरे रस्त्याने जाऊन दिल्ली शेडयूल्ड कास्ट्स वेलफेअर असोसिएशनच्या आंबेडकर भवनाजवळील मैदानात विसर्जन पावली._

*रविवार तारीख २० ला एक टोलेजंग सभा झाली. या सभेचे अध्यक्षस्थान फ्रान्सचे भारतातील वकिलांच्याकडे होते. या सभेत फिनलँडचे भारतातील प्रतिनिधी ने. ना. ह्यागो वॉलव्हन, बर्माचे कीन्सल जनरल ने. ना. टिन माँग गीः सिलोनचे हायकमिश्नर ने. ना. कुमारस्वामी, नागपूरचे प्रो. कुलकर्णी उपस्थित होते.* डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या भाषणात म्हणाले, अध्यक्ष महाराज, बंधु आणि भगिनींनो.

आपल्याला इथे आल्यास दोन तीन तास झाले असतील आणि साहजिकच आपल्याला घरी जाण्याची ओढ लागली असेल, हे जाणून मी अधिक वेळ घेणार नाही. तशात माझ्याआधी पाच सहा वक्त्यांनी भगवान गौतम बुद्धाच्या चरित्रावर बरेचसे सांगितले आहे. मला जे काही सांगावयाचे आहे ते सर्व आजच सांगितले पाहिजे असे नाही. कारण आजच्यानंतर पुन्हा आपण भेटणार नाही, असे काही नाही. आपण पुनःपुनः भेटणार आहोतच. तरीही मी काहीतरी सांगावे असा बहुतेकांचा आग्रह असल्यामुळे थोडेसे का होईना पण बोलले हे पाहिजेच.

*माझी अशी इच्छा आहे की, भारतातील साऱ्या अस्पृश्यांनी बुद्धाची शिकवण आत्मसात करून त्याप्रमाणे आचरण ठेवायला पाहिजे.* गेल्या वर्षी बुद्ध जयंतीकरता आपण इथे गोळा झालो होतो. त्यावेळी इतका मोठा जमाव नव्हताः पण आजचा हा अफाट जनसमुदाय पाहून एक वर्षात लोकांमध्ये एवढी गोडी निर्माण झाली याबद्दल मला समाधान वाटते. शिवाय अस्पृश्यांच्या बातम्यांना विशेष जागा न देणाऱ्या वर्तमानपत्रात कालच्या टोलेजंग मिरवणुकीबद्दलची बातमीही मला वाचायला मिळाली. आपण केलेली प्रगती ही प्रशंसनीय आहे.

*बुद्ध जयंती साजरी करणे ही काही फार मोठी बाब नाही. कारण थोरामोठ्यांच्या कर्तबगारीबद्दल आदर बाळगणे योग्यच असते. परंतु आपण बुद्ध जयंती साजरी करतो ती एवढ्याचसाठी की. भारतातील सामाजिक अधःपतन नाहिसे व्हावे. म्हणून बुद्धांच्या शिकवणुकीचा अंगीकार करण्यास लोकांना सांगण्यापूर्वी बौद्ध धंम्म आणि हिंदू धर्म यातील फरक नीट समजावून सांगायला हवा. चातुर्वर्ण्य, मूर्तिपूजा व आध्यात्मिक तत्त्वे या स्वरूपात सामाजिक भेदभावावर हिंदू धर्म आधारलेला आहे. लोकांच्या सामाजिक अधःपातास व राष्ट्राच्या ऱ्हासास कारणीभूत झालेल्या ब्राह्मणशाहीत व सध्याच्या हिंदू धर्मात मला तरी काहीच फरक दिसत नाही. हिंदू धर्मात शांती, एकी नाही आणि याचे कारण चातुर्वर्ण्यवर आधारभूत झालेली हिंदू धर्माची इमारत, ही गोष्ट आज बहुतेक हिंदू मान्य करीत आहेत. परंतु ही चातुर्वर्ण्यची चौकट मोडायची कशी, हिंदू धर्मात शांती आणि एकीची प्रस्थापना करायची कशी, हा मार्ग कुणीच जाणत नाही. योग्य–अयोग्याचा विचार करून अयोग्याचा त्याग न करण्यास कारण एकच की, या अयोग्यामुळे–चातुर्वर्ण्यमुळे हिंदुंचा दर्शनी फायदा होतो.*

मला सर्व हिंदुंना हेच सांगायचे आहे की, त्यांनी ही वर्णाश्रमपद्धती झुगारून जुन्या कोत्या (अयोग्य) समजुती समूळ उडवून टाकल्या पाहिजेत. पण हे व्हावं कसं? कारण ते वेदाची आज्ञा प्रमाण मानतात आणि वेदात ही वर्णाश्रम पद्धती उचलून धरण्यात आली आहे. *धर्म सुधारला पाहिजे, अशी नुसती भाषा बोलून भागायचं नाही. त्याकरिता आचार–विचारातील आमूलाग्र फरक प्रत्यक्षात उतरला पाहिजे. त्याशिवाय सुधारणेची आशाच करावयाला नको.*

*बुद्ध धंम्माचा द्वेष करणाऱ्या ब्राह्मणांना मला असे विचारायचे आहे की, बुद्धांना सुरवातीला जे भिक्खू शिष्य मिळाले ते कोण होते? यातील शेकडा नव्वद टक्के ब्राह्मण होते. काही हिंदुंचे म्हणणे असे की, बुद्ध धंम्माचा स्वीकार करावयाचा असला तर करावा पण असे करताना ब्राह्मणशाहीला शिव्या का? याचे उत्तर सोपे आहे. वर्णाश्रमावर आधारभूत असलेल्या ब्राह्मणशाहीवर, हिंदू धर्मावर प्रहार केला नाही, त्याचे खरे स्वरूप उघड केले नाही तर बुद्ध धंम्माच्या प्रसारात, प्रगतीच्या मार्गात ती एक मोठी धोंड होऊन बसेल. स्वच्छ पाणी आणि घाण पाणी या दोन प्रवाहांना एकत्र वाहू दिले तर स्वच्छ पाणी घाण होऊन जाईल. तद्वत बौद्ध धंम्माच्या शुद्ध तत्त्वाच्या बरोबरच हिंदू धर्माचे घाण पाणी वाहू देता कामा नये.*

बुद्ध धंम्माप्रमाणे हिंदू धर्मातही अहिंसेवर भर देण्यात आला आहे ही गोष्ट खरी, परंतु वर्णाश्रम पद्धती हा हिंदू धर्माचा पाया बनविला गेल्यामुळे ती एकच बाब हिंदू धर्माचा धिक्कार करण्यास पुरेशी आहे. हिंदू धर्मात आज जिकडेतिकडे ढोंग भाजून राहिले आहे. ब्राह्मण लोक देवळात राहतात. कारण तेथे त्यांना ऐषआरामी जीवन व्यतीत करायला मिळते म्हणून, देवाची भक्ती करायला नव्हे. *गेल्या वर्षी सिलोनवरून परत येताना मी मद्रासला (चेंन्नईला) गेलो होतो. त्यावेळी तिथल्या बऱ्याचशा हिंदुंनी मला देवळे पाहाण्याची विनंती केली. मला आश्चर्य वाटले; मी गेलो. मी देवळे हिंडून पाहिली. तिथे हे ब्राह्मण लोक मूर्तिपूजा करायचे आणि धूप कापूर जाळायचे. या पलिकडे दुसरा कसलाच उद्योग करीत नाहीत असे कळले. हा त्यांचा एक महत्त्वाचा उद्योग झाला! दुसरा उद्योग मला कळला तो हा की त्यांना फार 'भोजन' खावं लागतं. सकाळचे भोजन, दुपारचे भोजन, संध्याकाळचे भोजन! या भोजनाचा मात्र फार मोठा उद्योग ते लोक करतात. मी त्यांना विचारले की त्यांचे हे सगळे चालते कसे? त्यावर मला उत्तर मिळाले की मद्रास (चेंन्नई) सरकारकडून त्यांना दीड लाख रुपयांची वार्षिक ग्रँट मिळते. काही देवळातून सोन्याचांदीच्या मूर्ती आढळल्या. काहींच्या किंमती तर कोटी रुपयांनीच करता येतील. एकीकडे देशात अन्नान्नदशा, लोक पैशाला महाग झाले आहेत आणि दुसरीकडे अन्नाची लयलूट आणि पैशाची खैरात! आणि हे सर्व हिंदू धर्माच्या या अध्वर्युकरिता! का नाही हे लोक हिंदू धर्माचा उदोउदो करतील!*

*धर्म शुद्ध तत्त्वावर आधारित असला पाहिजे. बुद्धांचा वर्णाश्रम पद्धतीवर कधीच विश्वास नव्हता. 'आपण सर्व सारखेच आहोत' ही गोष्ट आपण कधीच विसरता कामा नये. माणसा–माणसात कसलाच भेदभाव नाही. जन्माने उच्चनीच कोणीच असू शकत नाही. उच्चनीचता करणीने प्राप्त होते. या गोष्टी बुद्धांनी सांगितल्या आहेत. जर लोक पुन्हा बौद्ध धंम्माचा अंगीकार करतील तर हा देश पुन्हा वैभवाप्रत गेल्यावाचून राहाणार नाही. एरव्ही दुसऱ्या कोणत्याही मार्गाने जातीभेद जाणे शक्य नाही. परंतु खरोखरच कोणाला जाती मोडायच्या असतील तर त्यांनी बौद्ध धंम्माचा स्वीकार करावा हाच एक उपाय आहे.*

*परंतु आपण कसलीही घाई न करता हळूहळू आपले साध्य साधू, जुनी माणसे ज्यांच्या हाडीमासी हिंदू धर्म भिनून राहिला अशांना हिंदू धर्म ताबडतोब सोडा, असे आपण म्हटले तर त्यांना ते जमणार नाही आणि मीही त्यांना तसे काही सांगणार नाही, परंतु तरुणांच्याबद्दल मात्र मला दांडगा आत्मविश्वास आहे. योग्य त्या मार्गाने जाऊन आपला, समाजाचा व राष्ट्राचा उत्कर्ष ते खचित साधतील.*

_मंगल होवो! कल्याण होवो! भले होवो!_

_!!ॐ मणी पद्मे हूँ !!_

🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼

संकलन – महेश कांबळे

_संदर्भ :–_ _*१) डॉ बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८ भाग ३, पान नं २३३–२३५*_

*_२) जनता :– २६ मे १९५१_*

🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २४ मे २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, वेसाख मासो, शुक्रवार, वैशाख माहे.

२४ मे १९३२ – रोजी दक्षिणेतील अस्पृश्य वर्गाने बेलगाम मधे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सन्मान पत्र भेट दिले. आंबेडकर यांनी सादर केलेल्या सन्मान पत्राला उत्तर देताना म्हणाले की, "समाज सुधारण्यापूर्वी राजकीय सुधारणांना प्राधान्य दिले पाहिजे कारण राजकीय सुधारणांशिवाय आपल्या बहुजन वर्गाच्या पातळीत सुधारणा होण्याचा वाव नाही.

२४ मे १९४१ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबईतील खार येथे "महार ज्ञाती पंचायत समिती" ची स्थापना केली.

२४ मे १९५० – रोजी हैद्राबाद येथे कायदेमंत्री विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण.

२४ मे १९५६ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नरे पार्क मुंबई येथे बुद्ध जयंतीच्या समारंभा प्रसंगी आपण ऑक्टोबर महिन्यात बौद्ध धंम्माची दीक्षा घेणार आहोत अशी घोषणा केली. तसेच भाषण करतांना सावरकरांवर टीका करून बौद्ध धंम्मावर चर्चा करण्याचे जाहीर आव्हान दिले. त्यांचे मुंबईतील हे शेवटचे भाषण होय.

२४ मे १९५६ – रोजी भारतीय बौद्धजन समितीकडे धंम्मांतर संबंधी लोकांची शेकडो पत्रे आले असता विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकांच्या माहितीसाठी बौद्ध धंम्म व धंम्मांतर आशयाचे पत्र लिहिले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २५ मे २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, वेसाख मासो, शनिवार, वैशाख माहे.

२५ मे १९२९ – रोजी वऱ्हाडातील बुलढाणा जिल्ह्यातील पातुर्डा येथे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मध्य प्रांत आणि वऱ्हाड अस्पृश्य परिषदेचे अधिवेशन पार पडले.

*२५ मे १९५० – रोजी श्रीलंकेत बौद्ध धंम्म कसा पाळला जातो? याचे निरीक्षण करण्यासाठी सिलोन बुद्धिस्ट कॉंग्रेसने आयोजित केलेल्या सिलोनची राजधानी कँडी येथे

झालेल्या जागतिक बौद्ध परिषदेत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांची पत्नी डॉ. सवितामाई अनेडकर उपस्थित राहिले.*

२५ मे १९५१ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी "लोकप्रतिनिधी (क्रमांक २) विधेयक Representaction of People (No. 2) Bill" यावर चर्चा सुरू ठेवली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २६ मे २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, वेसाख मासो, रविवार, वैशाख माहे.

२६ मे १९२८ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जळगांव येथील अस्पृश्य वर्गाच्या सभेत हिंदू महासभेच्या कामापेक्षा समाज समता संघाचा कार्यक्रम कसा परिणामकारक आहे हे सोदाहरण पटवून दिले.

२६ मे १९२९ – रोजी स्वाभिमान संरक्षक परिषदेचे अधिवेशन नाशिक जिल्ह्यातर्फे मुक्कामी चितेगाव येथे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, "माणुसकीच्या हक्कांसाठी जुलुमांविरुद्ध बंड पुकारा."

२६ मे १९३२ – रोजी ब्रिटिश पंतप्रधानांना भेटण्यासाठी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंग्लंडला प्रयाण.

२६ मे १९४५ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिनांक १५ मे १९४५ रोजी टाइम्स ऑफ इंडिया पत्रातील अग्रलेख आणि ठक्कर बाप्पांच्या पत्राला उत्तर लिहिले. त्याचा वृत्तांत जनता वृत्तपत्रात प्रकाशित झाला.

२६ मे १९४९ – रोजी घटना समितीचे कामकाज सुरू होऊन १० जून १९४९ रोजी स्थगित झाले.

१ जुलै १९५६ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राजकारणात प्रवेश करण्यासाठी "प्रशिक्षण शाळा Training School for entrance to Politics" याची स्थापना केली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

आंबेडकरी आंदोलन के सरसेनानी कर्मवीर एँड. बाबू हरीदास आवळे!

नागपूर : बोधिसत्व परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरने दलित, शोषित, पीडित अस्पृश्य समाज के उत्थान और विकास के लिये विषमतावादी सामाजिक धार्मिक

आर्थिक व्यवस्था के खिलाफ आरंभ किये हुए मानव मुक्ती के आंदोलन मे जीन–जीन महाभागोने योगदान दिया उनमे कर्मवीर बाबूजी हरिदास आवळे का योगदान एंव भूमिका अनन्यसाधारण है.

नागपूर नजदीक के कामठी छावनी मे दिनांक १ जुलैं १९१६ को बाबूजी हरिदास आवळे का जन्म हुआ. उन्होंने शालेय शिक्षा रायपूर मे तथा महाविद्यालयीन शिक्षा नागपूर मे हासिल की. नागपूर विश्वविद्यालय के वे विज्ञान और कानून के स्नातक थे. विद्यार्थी जीवन से ही उनका सामाजिक कार्य के प्रति झुकाव था. दुसरो के दर्द से उनका अंतकरण द्रवित हो जाता था. डॉक्टर बाबासाहेब के मानवमुक्ती के आंदोलनसे प्रभावित व प्रेरीत होकर सामाजिक कार्य करने लगे उन्होने आंबेडकरी विचारधारा का प्रचार और प्रसार करनेके लिये खुद को समर्पित कर दिया. समता सैनिक दल के माध्यम से वे युवकों मे अनुशासन वह समाज सेवा की भावना जागृत करने लगे. उनके चारित्र और कठोर अनुशासन की वजह से वे लोकप्रिय हुए. और सक्रिय सामाजिक कार्य करते हुए समता सैनिक दल के प्रांतीक अध्यक्ष बने.

उन्होंने छत्तीसगढ़ के सतनामी समुदाय को मानव मुक्ति के अंबेडकरी विचारधारा से अवगत करा कर अंबेडकरी आंदोलन में उतारा. मौजूदा विषमतावादी व्यवस्था के विरुद्ध उनको जागृत करके स्वाभिमान से जीने के लिए प्रेरित किया. राष्ट्रभाषा हिंदी पर उनका प्रभुत्व था, उनकी वकृत्वशैली अनुपम थी व उनका संघटन कौशल्य अप्रतिम था.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरने शोषित पीड़ित समाज के हित के लिए तथा उनके मानवी अधिकार हासिल करने के लिए २० जुलाई १९४२ को नागपुर में शेड्यूल कास्ट फेडरेशन की स्थापना की. तब बाबूजी आवळे को उनकी संगटन कुशलता ध्यान में रखते हुए सी. पी. अँड बेरार के लिए एस. सी. एफ. का सेक्रेटरी नियुक्त किया गया.

१९४६ में नागपुर में उभरे जातीय दंगे के वक्त उन्होंने अन्य नेताओं के सहयोग से अन्यायग्रस्त जमाव को सांत्वना देकर उनकी भरपूर मदद की उन्होंने लोभ और लालच को अपने पास भटकने नहीं दिया. तत्कालीन सी पी अँड बेरार के प्रधानमंत्री पंडित रविशंकर शुक्ला के मंत्रिमंडल में शामिल करने के प्रलोभन भी उन्हे बाबासाहेब के प्रति उनकी अटुटनिष्ठा से अलग नहीं कर सका. वैसे आज मंत्री बनने के लिए लोग क्या–क्या नहीं करते. वे गांव खेड़े में जाकर अन्याय अत्याचार के विरुद्ध संघर्ष करके अन्याय ग्रस्त पिडीत लोगो को न्याय दिलवाते रहे बिडी मजदूरों का संघटन तैयार कर उनके हक के लिए यशस्वी आंदोलन चलाते रहे सहकारी संस्थाओं का निर्माण कर उन्होंने नालंदा शिक्षण संस्था और वसतिगृह की स्थापना कर गरीब होनहार विद्यार्थियों के भविष्य की नीव डाली.

१४ अक्टूबर १९५६ को डॉ. बाबासाहेब आंबेडकर द्वारा किए गए ऐतिहासिक धंम्मांतर धम्मचक्र प्रवर्तन के समय वे विशिष्ट सुरक्षा दल के प्रधान थे. उन्होंने डॉ. बाबासाहेब आंबेडकर से बुद्ध धंम्म दीक्षा ग्रहण की और मैं सारा भारत बुद्धमय करूंगा बाबासाहेब के इस संकल्प के अनुसार बुद्ध धंम्म का प्रचार व प्रसार के कार्यों में जुटे रहे. उनका खुद का आचरण धंम्म नुसार था. वे मध्य प्रदेश के छत्तीसगढ़ इलाके में सुदूर जंगलों में सतनामी लोगों में बुद्ध धंम्म प्रसार करने हेतु व्यस्त रहे.

बोधिसत्व डॉ. बाबासाहेब अंबेडकर के महापरिनिर्वाण के बाद उन्होंने जिस स्थान पर बाबासाहेब ने बुद्ध धंम्मदीक्षा लेकर धंम्म क्रांति की, ठीक उसी जगह बुद्ध मूर्ति के प्रति स्थापना की वे महाराष्ट्र की विधान परिषद के सदस्य थे. विधान परिषद में प्रस्ताव लाकर उन्होंने तत्कालीन मुख्यमंत्री से बोद्धो को पवित्रा दीक्षाभूमि दिलवाई. और बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर का पुतला तैयार करके स्मारक समिति को दान दिया.

बाबासाहेब के अतुलनीय नेतृत्व के पश्चात संगटन का भार वाहन करने के उद्देश्य से प्रेसीडियम गठित कर दी गई. जिसके सेक्रेटरी पद का भार बाबूजी आवळेने संभाला फिर ३ अक्टूबर १९५७ को बाबासाहेब आंबेडकरने तैयार की हुई रूपरेखा के अनुसार रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया की स्थापना की गई. बाबूजी आवळे इस पक्ष के उपाध्यक्ष बनाए गए. वे ऑल इंडिया समता सैनिक दल के अध्यक्ष भी चुने गए. फिर यह आश्चर्य युक्त घटना घटी एक केस के संदर्भ में नागपुर उच्च न्यायालय ने डॉ. बाबासाहेब आंबेडकर ने किया हुआ ऐतिहासिक धंम्मांतर वह धम्मदीक्षा को अवैध घोषित किया. यह बाबा साहेब के बेमिसाल कर्तृत्व पर कठोर आघात था. बोद्ध जनता क्षुब्ध हुई कर्मवीर बाबूजी आवळेने नागपुर उच्च न्यायालय के निर्णय को लेकर भारत के सुप्रीम कोर्ट में अपील दायर की सुप्रीम कोर्ट के आदरणीय मुख्य न्यायधीश जस्टिस पी. बी. गजेंद्र गड़करने डॉ. बाबासाहेब आंबेडकर का धंम्मांतर और उन्होंने दी हुई बोद्ध धम्म दीक्षा कानूनन वैध है ऐसा सुप्रीम निर्णय दिया.

बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर के उच्चतम जीवन पर कर्तृत्व को वैद्य सिद्ध करवाने की ऐतिहासिक भूमिका कर्मवीर बाबूजी हरिदास आवळेने अदा की. इसके लिए उनको धम्मरक्षक की उपाधी से नवाजा गया. हम सभी बोद्ध बांधव उनके प्रति कृतज्ञ है.

रिपब्लिकन नेतृत्व के अंतर्गत बाबासाहेब की विचारधारा का सही Interpretation स्पष्टीकरण न करने की वजह से आर. पी. आय मे दरार पड़ी. बाबासाहब की "Thoughts on linguistic states" भाषावाद प्रांत रचना की मीमांसा का अर्थ के आकलन में मतभेद और राजनीतिक हित संबंध होने के कारण रिपब्लिकन पक्ष विभाजित हुआ. बाबूजी आवले पक्ष की एकता के लिए प्रयत्न करते रहे, शीर्ष नेतागण को आगाह करते रहे, अन्य नेताओं को समझाने की बाबूजी की कोशिशें उन पर असर न कर पाई, बाबूजी रिपब्लिकन नेताओं को कांग्रेस के साथ यूती करने के निर्णय का पूरा जोर विरोध करते रहे. बाबासाहब की नीति अनुसार आचरण करने का अनुरोध करते रहे पर शीर्ष नेता खुद के हित संबंधों को त्याग न सके. बाबासाहब की संघटना टुकड़ों में बटं गई.

फिर आम आदमी को बाबासाहब के विचारों से अवगत करके उनको जागृत कर प्रबोधन करने के उद्देश्य से बाबूजी ने भीम शक्ति साप्ताहिक शुरू किया उसमें कोई राष्ट्रीय प्रश्नों के संदर्भ में बाबा साहब के विचार प्रकाशित करते रहे. अंबेडकरी संगठन का महत्व बताते रहे. उचित दिशा दर्शन का कार्य अविरत करते रहे. और तब एक दिन दिनांक २–३–१९७१ को एक संगठित सभा को संबोधित करते वक्त एक अतुलनीय मूर्तिमंत संघर्ष अनुपम का वकृत्व शैली एक वीस्मरणीय समर्पण बोधिसत्व डॉ. बाबासाहेब प्रति एक अटूट निष्ठा को पूर्ण विराम मिला.

आज बाबा साहब का नाम लेकर आम अवाम को भ्रमित करके बेमालूम तरीके से संगठन को गिरवी रखकर तथाकथित नेताओं का निजी स्वार्थ सुललित हो रहा है. वर्तमान तिथि मे भी कर्मवीर बाबूजी हरिदास आवळे का समस्याओं का आकलन और समस्या निवारण के उनके विचार महत्वपूर्ण और प्रासंगिक महसूस होते हैं.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

१ जुलै हा दिवस 'महाराष्ट्र कृषी दिन Maharashtra Krushi Din' म्हणून साजरा केला जातो.

कृषीप्रधान भारत म्हणून ओळखले जाणाऱ्या देशात कृषीसंस्कृतीचे स्मरण आणि शेतकरी कृतज्ञतेचा प्रतिक म्हणून या दिवसाला अत्यंत महत्त्व आहे. भारतीय आधुनिक कृषी क्षेत्रात क्रांतिकारी योगदान असलेल्या आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कृषी तज्ज्ञ व पहिले शेतकरी मुख्यमंत्री, हरितक्रांतीचे जनक महानायक वसंतराव नाईक यांची जयंती 'कृषी दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय सन १९८९ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी घोषित केला होता. तेव्हापासून १ जुलैला शासकीय स्तरावर सर्वत्र हा दिवस 'कृषी दिन' म्हणून साजरा केला जातो.

काय आहे या मागचा इतिहास?

राज्याचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या स्मृतीदिनानिमित्त महाराष्ट्र कृषी दिन किंवा महाराष्ट्र कृषी दिवस साजरा केला जातो. वसंतराव नाईकांना महाराष्ट्रातील हरितक्रांतीचे जनकही म्हटले जाते.

त्यांच्या जन्मदिवस हा महाराष्ट्र कृषी दिवस म्हणून साजरा केला जातो. वसंतराव फुलसिंग नाईक यांचा जन्म १ जुलै १९१३ रोजी झाला. १९६३ ते १९७५ या काळात ते राज्याचे मुख्यमंत्रीही होते. जेव्हा पासुन वसंत नाईक हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले तेव्हापासुन त्यांनी कृषी क्षेत्राला चालना देण्यासाठी आणि राज्यातील शेतकऱ्यांच्या विकासासाठी सदैव योगदान दिले असे सांगितले जाते.

'शेती आणि माती'वर निस्सीम भक्ती असणारे जागतिक ख्यातीचे कृषी तज्ञ व प्रगतशील शेतकरी अशीही त्यांची ओळख आहे. वसंतराव नाईक यांचे भारतीय राजकारण, लोकशाही सक्षमीकरण व विशेषतः कृषी औदयोगिक क्षेत्रातील क्रांतिकारी योगदानामुळे त्यांना 'महानायक' म्हणूनही आदराने संबोधले जाते.

शिवाय भारताचे राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. प्रणव मुखर्जी यांनी "वसंतराव नाईक हे भारत मातेचे थोर सुपूत्र आहे." या शब्दात नाईकांचे गौरव केले आहे. तसेच 'थेट शेतकऱ्यांच्या बांधावर' मोहिमेचे प्रवर्तक, विचारवंत एकनाथराव पवार यांनी 'आधुनिक कृषीप्रधान भारताचे कृषीसंत' या शब्दात महानायक वसंतराव नाईक यांचे वर्णन केले आहे.

म्हणून, भारतीय आधुनिक कृषी क्षेत्रात क्रांतिकारी योगदान असलेल्या आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कृषी तज्ज्ञ व पहिले शेतकरी मुख्यमंत्री, हरितक्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांची जयंती 'कृषी दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय सन १९८९ मध्ये घोषित केला गेला.

थोडक्यात पण विशेष :–

भारत हा एक कृषीप्रधान देश आहे. महाराष्ट्राला देशातील प्रमुख उत्पादक राज्य म्हणून ओळखले जाते. कृषी दिवस हा नैसर्गिकरित्याच पेरणीच्या मुहूर्तावरील एक पावनपर्व आहे.

महानायक वसंतराव नाईक यांनी हरितक्रांती व श्वेतक्रांती घडवून आणली. याशिवाय पंचायत राज व रोजगार हमी योजनाचे देखील वसंतराव नाईक हे शिल्पकार मानले जातात. ते 'पहिले शेतकरी मुख्यमंत्री व शेतकऱ्यांचा राजा' म्हणूनही त्यांची ओळख आहे.

वसंतरावांनी, भूमिहिनांना लाखो एकर जमीन त्यांनी वाटप केली. शेतकऱ्यांच्या जीवनात स्वाभिमान आणि समृद्धी फुलवीण्याचे तसेच कृषीसंस्कृतीला नवसंजीवनी देण्याचे ऐतिहासिक कार्य महानायक वसंतराव नाईक यांनी केले. शिवाय, पहिल्यांदाच चार कृषी विदयापिठाची स्थापनाही त्यांनी केली.

१९७२ सारख्या भीषण दुष्काळातही महानायक वसंतराव नाईक यांच्या कारकिर्दीत कधी 'शेतकरी आत्महत्या' हा शब्द देखील गवसला नव्हता. शेतकऱ्यांवर त्यांचे जिवापाड प्रेम होते. शेती आणि मातीवरील त्यांची निस्सीम भक्ती ही भारतीय कृषीसंस्कृतीच्या इतिहासात एक प्रेरणा म्हणून ओळखली जाते.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, जेठ्ठ मासो, मंगळवार, जेष्ठ माहे.

२ जुलै १९३१ – रोजी पनवेल जवळील चिरनेर खेड्यातील झालेल्या खटल्याचा अभियोगाचा निकाल लागला. त्या खटल्यात माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चार आरोपींची बाजू मांडली होती.

*२ जुलै १९३९ – रोजी मुंबई येथील परळ, एम. भट्ट हायस्कूल येथे रोहिदास टीचिंग सोसायटीच्या सभेला संबोधित करताना माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय

घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, "दलित वर्गाच्या काही नेत्यांना चतुराईने त्यांच्या पक्षाविरुद्ध प्रोत्साहित करून काँग्रेसचे नेते दलित वर्गात फूट पाडण्यास गुंतले आहेत. त्यांनी काँग्रेसच्या चुकीच्या प्रचारप्रसंगावर न येन्याची विनंती केली. काँग्रेसचे नेते हरिजन नेत्यांना आनंदि करण्यात गुंतले आहेत. स्वतंत्र कामगार पक्षापासून स्वतंत्र राहिलेला चामार समूदाय विचार करतो की, काँग्रेस त्यांची स्थिती सुधारेल, परंतु त्यांचा विश्वास चुकीचा आहे."*

२ जुलै १९४२ – रोजी व्हॉईसरॉय लिनलिथगो यांनी आपल्या कार्यकारी मंडळाच्या सदस्यांची नावे जाहीर केली. त्यात माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समावेश होता. त्यांना १ जुलै १९४२ रोजी जारी केलेल्या राज्याच्या घोषणेनुसार मजूर खात्याचा (मजूरमंत्री), रोजगार, सार्वजनिक कामे, ऊर्जा आणि जल संसाधनांचा कार्यभार सोपविण्यात आला होता. डॉ. आंबेडकरांच्या रूपाने देशाच्या इतिहासात प्रथमत:च एका अस्पृश्य व्यक्तीचा सरकारच्या केंद्रीय मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ३ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, जेठ्ठ मासो, बुधवार, जेष्ठ माहे.

३ जुलै १८५१ – रोजी क्रांतिवीर महात्मा ज्योतिबा फुले यांनी बुधवार पेठेतील अण्णासाहेब चिपळूणकरांच्या वाड्यात मुलींची शाळा काढली. पहिल्या दिवशी आठ मुली दाखल झाल्या. मुलींसाठी ही भारतातील दुसरी औपचारिक शाल होती. यापूर्वी सावित्रीमाई फुले आणि ज्योतिबा फुले यांनीच पहिली शाळा स्थापन केली होती.

३ जुलै १९२७ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली सर कावसाजी जहांगीर गृहामध्ये मुंबई येथे महाडच्या अस्पृश्यांवरील अत्याचाराच्या निषेधासाठी सभा.

३ जुलै १९४७ – रोजी घटना समितीच्या ध्वज समितीचे सभासद माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लंडनहून मुंबईस परतले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ४ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, जेठ्ठ मासो, गुरूवार, जेष्ठ माहे.

४ जुलै १८२६ – रोजी थॉमस जेफरसन स्मृतिदिन.

४ जुलै १९२५ – रोजी क्रांतिवीर महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुतळ्याच्या ठराव जेधे यांनी पुणे नगर पालिकेकडे पाठविला.

४ जुलै १९३६ – रोजी कोलंबोवरून श्री. लोकनाथ यांचे माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पत्र.

४ जुलै १९४७ – रोजी संघ संविधान समितीचा अहवाल अध्यक्ष पंडित नेहरू यांनी सादर केला.

४ जुलै १९५३ – रोजी मुलाखतीत माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, "शाळा आणि महाविद्यालयांमध्ये इंग्रजीच्या जागी हिंदीसह इतर कोणतीही भारतीय भाषा वापरली जाऊ शकते असे मला वाटत नाही. संभाजी नगर (औरंगाबाद) महाविद्यालयात आपण हिंदी किंवा कोणतीही प्रादेशिक भाषा शिकविण्याचे माध्यम करणार नाही. इंग्रजी हेच शिक्षणाचे माध्यम असेल."

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

अमेरिकेचे तिसरे राष्ट्राध्यक्ष थॉमस जेफरसन.

थॉमस जेफरसन (इंग्लिश: Thomas Jefferson) (एप्रिल १३, इ.स. १७४३ – जुलै ४, इ.स. १८२६) हे एक अमेरिकन राजकारणी, मुत्सद्दी, वकील, वास्तुविशारद, तत्त्वज्ञ आणि संस्थापक पिता होते. ज्यांनी ४ मार्च, इ.स. १८०१ ते ४ मार्च, इ.स. १८०९ पर्यंत युनायटेड स्टेट्सचे तिसरे अध्यक्ष म्हणून काम केले होते. ते इ. स. १७७६ साली जाहीर झालेल्या अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा जाहीरनाम्याचाते प्रमुख लेखक होते. त्याच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या कारकिर्दीत लुइझियाना संस्थानाची खरेदी, लुइस आणि क्लार्क ह्यांची अमेरिकेतल्या तत्कालीन अपरिचित अश्या दक्षिण प्रदेशाच्या शोधाची साहसी मोहीम वगैरे महत्त्वाच्या घटना घडल्या. त्याआधी जॉन ॲडम्स याच्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत ४ मार्च, इ. स. १७९७ ते ४ मार्च, इ. स. १८०१ या कालखंडात त्यांनी अमेरिकेचे उपाध्यक्षपदही सांभाळले. अमेरिकन क्रांतिकारी युद्धानंतर आणि १८०१ मध्ये राष्ट्राध्यक्ष होण्यापूर्वी, जेफरसन जॉर्ज वॉशिंग्टनच्या नेतृत्वाखाली राष्ट्राचे पहिले यूएस परराष्ट्र सचिव होते आणि त्यानंतर जॉन ॲडम्स यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्राचे दुसरे उपाध्यक्ष होते. जेफरसन लोकशाही, प्रजासत्ताकता आणि वैयक्तिक हक्कांचे अग्रगण्य समर्थक होते आणि त्यांनी राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर रचनात्मक दस्तऐवज आणि निर्णय तयार केले. विचार, भाषण आणि धर्म स्वातंत्र्यासह मानवी हक्कांसाठी त्यांचे लेखन आणि वकिली, अमेरिकन क्रांती आणि त्यानंतरच्या क्रांतिकारी युद्धासाठी महत्त्वपूर्ण प्रेरणा म्हणून काम करते, ज्यामध्ये तेरा वसाहती ब्रिटिश अमेरिकेपासून तोडण्यात आणि युनायटेड स्टेट्सला सार्वभौम राष्ट्र म्हणून स्थापित करण्यात यशस्वी ठरल्या.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ५ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, जेठ्ठ मासो, शुक्रवार, जेष्ठ माहे.

५ जुलै १९२० – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपला बॅरिस्टरचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी सिटी ऑफ एक्झिटर या बोटीने लंडनला "लॉ अँड इकॉनॉमिक्स" मधील शिक्षण पूर्ण करण्यासाठी इंग्लंडला रवाना झाले. प्राध्यापक म्हणून काम करीत असताना त्यांनी काही पैशांची बचत केली, कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांच्या कडून काही मदत घेतली, मित्र नवल भटेनाकडून ५००० रुपयांचे कर्ज घेतले आणि पूर्ण अभ्यास पूर्ण करण्यासाठी इंग्लंडला रवाना झाले. पी. एन. बुटकर त्यांच्या अनुपस्थितीत मूकनायक वृत्तपत्राच्या प्रकाशनाची जबाबदारी घ्यायला सांगितले.

५ जुलै १९२३ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबई उच्च न्यायालयात वकिली व्यवसायासाठी नोंदणी केली.

५ जुलै १९४२ – रोजी राष्ट्रीय संरक्षण मंडळाच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुंबईहून दिल्लीला निघाले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ६ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, आसाळ्ह मासो, शनिवार, आषाढ माहे.

६ जुलै १९१३ – रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी धार्मिक शिक्षण देण्यास सत्यशोधक शाळेची स्थापना केली.

६ जुलै १९२० – रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी शिवाजी क्षत्रिय वैद्यकीय स्कूलचे उद्घाटन केले.

६ जुलै १९३५ – रोजी चौदावे (१४) दलाई लामा जन्मदिन.

६ जुलै १९३३ – रोजी भारतीय संवैधानिक सुधार समितीच्या संयुक्त समितीसमोर आलेल्या पुराव्यांचा पुनर्विचार करण्यात आला आणि माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही साक्षीदारांची तपासणी केली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ७ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, आसाळ्ह मासो, रविवार, आषाढ माहे.

७ जुलै १९३३ – रोजी विहिरगाव, जिल्हा भंडारा येथील अस्पृश्य समाजाने मृत जनावर ओढणे हे काम बंद केल्यामुळे अस्पृश्यांवर अत्याचार.

७ जुलै १९४६ – रोजी मुंबईच्या कासवजी जहांगीर गृहामध्ये भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या बैठकीत म. गांधी यांना कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी नऊ (९) प्रश्न विचारले.

७ जुलै १९४७ – रोजी भारताची विभागणी व दुफळी करणाऱ्या ब्रिटिशांच्या धोरणावर माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मुंबई येथे नव्या स्वातंत्र्य बिलावर जाहीर टीका. ते म्हणाले, "भारताला दोन वसाहतीत विभागून काही सवलती दिल्या जाऊ शकतात. परंतु या वसाहती रियासत्यांमधे फूट पाडण्याचे बीज पेरणे अजिबात व्यवहार्य ठरणार नाही. इंग्रजांना या जगाच्या कोर्टासमोर उत्तर द्यावे लागेल.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ८ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, आसाळह मासो, सोमवार, आषाढ माहे.

८ जुलै १९३० – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मुंबई विद्यापीठाच्या निवड समितीवर नियुक्ती झाली.

८ जुलै १९३६ – रोजी मोतीपुर येथे भरलेल्या राजनंदगाव अस्पृश्य परिषदेने माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धंम्मांतराच्या धोषणेस पाठिंबा देऊन साधुंनी दाढ्या जटा कापल्या व तुळशीमाळा होमकुंडात टाकल्या.

८ जुलै १९४५ – रोजी असपृश्य वर्गाच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता यावे म्हणून माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटी या शैक्षणिक संस्थेची स्थापना केली. यावेळी बरीच शाळा, महाविद्यालये आणि वसतिगृहे चालविले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ९ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, आसाळह मासो, मंगळवार, आषाढ माहे.

९ जुलै १९४२ – रोजी गव्हर्नर जनरलच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलवर माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची नेमणूक करण्यात आली.

९ जुलै १९४२ – रोजी अस्पृश्यांच्या विकासाच्या दृष्टीने बजेटमधील रक्कम खर्च करावी म्हणून मुंबई सचिवालयावर मोर्चा.

९ जुलै १९४५ – रोजी "पीपल्स एज्युकेशन सोसायटी" चे संस्थापक माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहकार्याच्या स्वाक्षर्यांवर आज स्वाक्षरी झाली.

९ जुलै १९७२ – रोजी दलित पँथरची पहिली बैठक मुंबईतील सिद्धार्थ नगर येथे भरली. पेरुमल समितीने आपल्या अहवालात १९७० च्या आसपास मागासवर्गीय जातीवरील अत्याचारांनी कळस गाठला. तत्कालीन भारतीय संसदपटु मधु लिमये यांनी दि. २४ मे १९७२ रोजी लोकसभेत त्याविरुद्ध आवाज उठविला. या सगळ्यांचा परिणाम म्हणून दलित समाजातील संतप्त युवकांनी पँथरची पहिली बैठक मुंबईतील सिद्धार्थ नगर येथे ९ जुलै १९७२ रोजी भरली. बैठकीत भारत स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या दलितांवरील वाढत्या अत्याचारास थांबविण्यास सरकार अपयशी ठरल्याचा ठपका ठेवण्यात आला. त्यासाठी सर्व दलित युवकांनी चळवळीच्या झेंड्याखाली एकत्र जमावे, असे आव्हान झाले. "माणूस म्हणून जगणे हा आमचा हक्क आहे आणि म्हणून आम्ही चित्याचा पवित्रा घेऊन त्या हक्कांसाठी लढू." हे सूचित करणारे नामाभिधान त्यांनी स्वीकारले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १० जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, आसाळह मासो, बुधवार, आषाढ माहे.

१० जुलै १८८७ – रोजी राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्वतःचे मृत्युपत्र तयार केले.

१० जुलै १९३२ – रोजी मुंबई येथे अखिल भारतीय अस्पृश्य परिषद.

१० जुलै १९४५ – रोजी बॉंबे म्युनिसिपल कामगार संघाच्या अध्यक्षपदी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १९४५–१९४६ या वर्षासाठी निवड करण्यात आली.

१० जुलै १९४७ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर घटना समितीच्या (ध्वज समिती) कामकाजासाठी दिल्लिस निघाले.

*१० जुलै २००५ – रोजी मातृ सुरक्षा दिन. २००५ सालापासून १० जुलै सर्वत्र मातृ सुरक्षा दिन साजरा केला जातो. माता आणि होणाऱ्या मातांच्या चांगल्या आरोग्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. मातांच्या आरोग्याबाबत जनजागृतीसाठी हा दिवस साजरा केला जातो. १० जुलै ही तारीख निवडण्यामागचे कारण म्हणजे दुसऱ्या दिवशी ११ जुलैला जगभरात जागतिक लोकसंख्या दिन साजरा केला होता.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ११ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, आसाळह मासो, गुरूवार, आषाढ माहे.

११ जुलै १९३३ – रोजी कालीचरन नंदा गवळी यांनी दलित फेडरेशनच्या आपल्या अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला.

११ जुलै १९४२ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर दिल्ली येथील राष्ट्रीय संरक्षण मंडळाच्या बैठकीस उपस्थित.

*११ जुलै १९८७ – रोजी "जागतिक जनसंख्या दिन." १९८७ पासून वार्षिक संयुक्त राष्ट्र कार्यक्रम लोकसंख्येच्या समस्यांवर केंद्रित आहे. जगभरात दरवर्षी ११ जुलै हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने लोकसंख्या वाढीमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांकडे लक्ष वेधले जाते आणि त्यावर विचारमंथन केले जाते. ११ जुलै १९८७ रोजी जगातील पाच अब्जावे बालक युगोस्लाव्हिया येथे जन्माला आले. यामुळे वाढणाऱ्या लोकसंख्येविषयी जनमानसात जागृती निर्माण झाली. अखेर युनोने पण याची दखल घेऊन १९८९ सालापासून हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून घोषित केला.

११ जुलै १९९७ – रोजी मुंबई (घाटकोपर) मधील रमाबाई आंबेडकर नगर येथे पोलिसांकडून बेछूट गोळीबारात झालेल्या अकरा (११) निरपराध भीमसैनिकांना भावपूर्ण आदरांजली. १. शहिद सुखदेव कापडणे, २. शहिद कौसल्याबाई पाठारे, ३. शहिद अमर धनावडे, ४. शहिद नंदू कटारे, ५. शहिद संजय निकम, ६. शहिद संजय कांबळे, ७. शहिद अनिल गरुड, ८. शहिद विलास दोडके, ९. शहिद मंगेश शिवशरण, १०. शहिद हितेश भालेराव, ११. शहिद बबलू वर्मा.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १२ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, आसाळह मासो, शुक्रवार, आषाढ माहे.

१२ जुलै १९३९ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबईतील सर कावसजी गृहामध्ये काँग्रेस सरकारच्या करवाढीच्या धोरणास विरोध करण्यासाठी भरलेल्या सभेत मुद्देसूद भाषण केले.

१२ जुलै १९४१ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे म्यूनसिपल कामगार संघाच्या अधिवेशनात भाषण.

१२ जुलै १९४२ – रोजी स्वतंत्र कामगार पक्ष आणि मुंबई महानगरपालिका कामगार संघटनेने त्यांचे नेते माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अभिनंदन करण्यासाठी एक बैठक आयोजित करण्यात आली होती. कोकण जिल्हा व राज्यातील शेतकरी मुंबईच्या एम. भट्ट हायस्कूलमध्ये झालेल्या दुसऱ्या बैठकीत डॉ. आंबेडकर यांनी जाहीर केले की, "या लढाईत कधीही आत्मसमर्पण करणार नाही आणि भारतातील कामगार वर्गाच्या हिताचे रक्षण करावे. त्यांना पुढे वाढविण्यासाठी लढा देत राहील.

१२ जुलै १९४९ – रोजी संत गाडगे बाबा डेबूजी झिंगराजी जानोरकर यांनी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची काळ मैदान येथे भेट घेतली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १३ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, आसाळह मासो, शनिवार, आषाढ माहे.

१३ जुलै १९३० – रोजी ऑल इंडिया डिस्प्रेस्ड क्लासेस असोशिएशनच्या कार्यकारी मंडळाची शिमला येथे बैठक.

१३ जुलै १९३१ – रोजी पू. अनागरिक धंम्मपाल प्रव्रज्जा दिवस.

१३ जुलै १९३७ – रोजी चाळीसगाव येथे माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण.

१३ जुलै १९४० – रोजी ठाणे बोर्डिंग, जनता वृत्तपत्र व भारत भूषण छापखाना या तीन संस्थांना प्राप्त झालेल्या बिकट स्थितीचा विचार करून तिच्यातून मार्ग काढण्याच्या हेतूने परळ येथे आर. एम. भट स्कूलच्या हॉलमध्ये स्वतंत्र मजूर पक्षाच्या मुंबई शाखेच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत, माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले की, "स्वतंत्र मजूर पक्षाच्या आश्रयाने चालणाऱ्या वृक्षाचे छापखाना व जनता वृतपत्र हे मूळ आहे."

१३ जुलै १९४१ – रोजी बाँबे येथील कोवासजी जहांगीर गृहामध्ये बाँबे म्युनिसिपल कामगार संघटनेच्या बैठकीत माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या भाषणात म्हणाले की, "असे दिसते आहे की आपल्या हातात किती शक्ती आहे हे आपल्याला समजत नाही. आपण केवळ काम करणे थांबवू शकता आणि आठवड्यात असे गोंधळ आणि नाश घडवू शकता की हिंदू मुस्लिम दंगली तीन महिन्यांत करू शकत नाहीत. एक गोष्ट अशी आहे की आपण आपल्या मुला–मुलींना शिकवा. जे काम तुम्ही करत आहात तेच काम त्यांनां पुन्हा करावं लागणार नाही यांची काळजी घ्या."

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १४ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, आसाळ्ह मासो, रविवार, आषाढ माहे.

१४ जुलै १९४७ – रोजी मुंबई विधिमंडळाचे सदस्य म्हणून माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान सभेत उपस्थित.

१४ जुलै १९४९ – रोजी संत गाडगे बाबा डेबूजी झिंगराजी जनोरकर, कर्मवीर भाऊराव पाटील आणि माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थित चोखामेळा धर्मशाळा पंढरपूर पीपल्स एज्युकेशन सोसायटीकडे सुपूर्द.

१४ जुलै १९५२ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दामोदर गृह परळ येथे इमारत फंड स्थापन करण्याबाबतची तसेच संपूर्ण जमाखर्च माहिती आपल्या भाषणात सांगितलीं.

१४ जुलै १९५८ – रोजी रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्याचा पहिला प्रयोग यशस्वी.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १५ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, आसाळ्ह मासो, सोमवार, आषाढ माहे.

१५ जुलै १९१९ – रोजी आदरणीय ॲड. बी. सी. कांबळे जन्मदिन.

१५ जुलै १९२१ – रोजी कोल्हापूरचे महाराज छत्रपती शाहू महाराजांनी महार वतनाची गुलामी संपविली.

१५ जुलै १९३३ – रोजी विलायतेला व्हाईट पेपरबद्दल विचारविनिमय करून या व्हाईट पेपरच्या योजनांचा फोलपणा ब्रिटिश जनतेच्या निदर्शनास आणण्यासाठी एक प्रचारक मंडळ नेमण्याकरीता हिंदू पुढाऱ्यांच्या सभेत माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "हिंदू समाजाने आपली शक्ती सामाजिक सुधारणेसाठी प्रामाणिकपणे खर्च करावी." सदर लेख जनता वृतपत्रात प्रकाशित करण्यात आला.

१५ जुलै १९४२ – रोजी मजूरमंत्री झाल्याबद्दल माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अभिनंदन.

१५ जुलै १९४४ – रोजी ब्रिटिश संसदेने भारताच्या स्वातंत्र्याचा ठराव संमत केला.

१५ जुलै १९४६ – रोजी मुंबई विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू झाले. त्या दिवशी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांनी पुणे कौन्सिल हॉलवर मोर्चा नेला.

१५ जुलै १९४६ – रोजी पुण्यात झालेल्या विधानपरिषदेच्या अधिवेशनात माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदेशाला अनुसरून अनुसूचित जाती महासंघाने (एससीएफ) आपल्या राजकीय हक्कांसाठी संघर्ष सुरू केला.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

आदरणीय ॲड. बी. सी. कांबळे जन्मदिन

जन्म – १५ जुलै १९१९ (तासगाव, सांगली). स्मृती – ६ नोव्हेंबर.

भारतीय संविधानाचे निर्माते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अत्यंत निष्ठावंत विश्वासू सहकारी, आंबेडकरी चळवळीतील एक प्रमुख नेते, प्रसिध्द कायदेतज्ञ, सुप्रीम व हायकोर्टाचे निष्णात वकील, जनता व रिपब्लिक साप्ताहिकाचे संपादक, उत्कृष्ठ लेखक, डॉ.बाबासाहेब यांचे चरित्रकार, माजी खासदार, माजी आमदार, अभ्यासू संसदपटू, प्रभावी व फर्डे वक्ते, गुणवान, कर्तृत्ववान, चारित्र्यवान आणि विद्वान नेते ॲड. बापूसाहेब तथा बापू चंद्रसेन कांबळे तथा बी. सी. कांबळे यांचा जन्म तासगाव, सांगली येथे झाला. बी. सी. कांबळे यांचा किर्लोस्कर मासिकात छापून आलेला लेख वाचून डॉ. बाबासाहेब आंबेडकर खूप खूष झाले व त्यांनी बी. सी. कांबळे या उमद्या युवकाला समाजाची सेवा करण्यासाठी बोलाविले व त्यांच्या चळवळीचे मुखपत्र 'जनता' साप्ताहिकाचे 'संपादकत्व' दिले. असे भाग्य त्यांना लाभले.

ॲड. बी. सी. कांबळे कारकीर्द

बी. ए. एल एल. बी.

मुंबई असेंब्लीचे आमदार (१९५२–१९५७).

भारताच्या लोकसभेचे खासदार (१९५७–६२ व १९७७–७९).

मूळ गाव सांगली जिल्ह्यातील पलूस.

पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजातून बी. ए.

पुणे लॉ कॉलेजातून एल. एल. बी.

प्रबुध्द भारत, रिपब्लिकन साप्ताहिकाचे संपादक. १९५४–५५ कॉन्स्टिट्यूशनल लॉचे प्रोफेसर. सुप्रिम कोर्टाचे व उच्च न्यायालयाचे निश्नात वकील.

वतन बीलाचा अर्थ व अनर्थ, बुध्द धम्माच्या टीकाकारांना उत्तर, आणीबाणी संबंधित ४४ व्या बिलावरील विचार, आंबेडकर निंदेमागील रहस्य, ऐक्याच्या टीकाकारांना उत्तर इत्यादी ग्रंथाचे लेखक.

अस्पृश्य मूळचे कोण?, राजा मिलिंदचे प्रश्न, मराठी भाषिकांचा महाराष्ट्र व त्रि–पिटक या ग्रंथाचे काही भागांचे अनुवादक.

भारतीय राज्य घटनेची मीमांसा, संसदपटू आंबेडकर व बाबासाहेबांचे अखेरचे संसदीय विचार या ग्रंथाचे संपादक.

रिपब्लिकन पक्ष व बुध्द सासन सभा यांचे एक संस्थापक सभासद, विविध विषयांवरील लेखक व बाबासाहेब आंबेडकरांनी एवढे तेजस्वी व्यक्तिमत्व कसे मिळविले व अशी अद्वितीय मानव उध्दारक चळवळ पुरेशी साधने नसतांनाही कशी चालविली, यावर खास व नवीन प्रकाश टाकणार्या 'समग्र आंबेडकर चरित्र' याचे लेखक.

असे त्यांचे समृध्द चतुरस्त्र व्यक्तिमत्व याची ओळख आहे. बापूसाहेबांना विनम्र अभिवादन नि कोटी कोटी प्रणाम.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १६ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, आसाळह मासो, मंगळवार, आषाढ माहे.

१६ जुलै १९१४ – रोजी कोल्हापूरचे महाराज छत्रपती शाहू महाराजांनी १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यातील स्वातंत्र्यवीर चिमासाहेब महाराज यांचे कराची येथे स्मारक उभे करण्यासाठी जमीन खरेदी केली.

१६ जुलै १९२७ – रोजी कुलाबा जिल्ह्यात महाड येथील उच्चवर्णियांकडून अस्पृश्यांवर केलेल्या अत्याचारांच्या निषेधार्थ कुलाबा जिल्ह्यातील १००० एक हजारहून अधिक लोकांच्या बैठकीचे अध्यक्ष माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. ज्यामध्ये त्यांनी आपल्या भावांबरोबर महाड मधील उच्च वर्गाच्या वर्तनाचा निषेध केला. या वर्तनाविरोधात शांततेत आंदोलन करण्यासाठी त्यांनी स्वयंसेवकांची यादी तयार करून निधी जमा करण्याचा निर्णय घेतला. सभापतींनी पैसे देण्याचे आव्हान केले आणि सुमारे ३५० रुपये जमा झाले.

१६ जुलै १९४२ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नागपूर येथे भाषण.

१६ जुलै २०१९ – रोजी राजा ढाले स्मृतिदिन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १७ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, आसाळह मासो, बुधवार, आषाढ माहे.

१७ जुलै १९४२ – रोजी अखिल भारतीय दलित वर्ग परिषद नागपूर येथे सुरू झाली.

१७ जुलै १९४६ – रोजी पश्चिम बंगाल मधून माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर निवडून आले.

१७ जुलै १९४६ – रोजी स्वतंत्र मतदार संघाच्या मागणीसाठी पुण्यामध्ये सत्याग्रह.

१७ जुलै १९४६ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ए. पी. ए. यांना दिलेल्या मुलाखतीत म्हणाले की, "इतर कोणत्याही देशाप्रमाणे या देशाने प्रगती करावी अशी आमची इच्छा आहे. आम्हाला त्यांचा मार्ग अडवायचा नाही. आम्हाला फक्त भविष्यातील भारतात आपले स्थान संरक्षित करायचे आहे."

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

#पंढरपूरचा_विठ्ठल_देव_आहे_का?

वास्तविक पाहता पंढरपूरचा विठ्ठल, विठोबा, पांडुरंग, पंढरीनाथ, विठाई इत्यादि नांव असणारा हा पंढरपूरचा विठ्ठल देव आहे का?

कारण विठ्ठल जर देव असता तर विठ्ठलाचा उल्लेख वैदिक ब्राम्हणाच्या धर्मसूत्रात म्हणजे रुग्वेद–यजुर्वेद–सामवेद व अथर्ववेदात असता परंतु यात उल्लेख नाही. स्मृती–श्रृती, वेद पुराण, उपनिषद–अरण्यक–मनूस्मृती या तमाम ब्राम्हणी वैदिक धर्म ग्रंथात विठ्ठलाचे नाव नाही. तसेच विठ्ठल हे नांव रामायणात नाही. विठ्ठल महाभारतात नाही. विठ्ठल साक्षात भगवान श्रीकृष्णाच्या गीतेतही नाही म्हणजे वैदिक धर्माचे स्वरूप जानणाऱ्या वेदांच्या सर्वश्रेष्ठ ब्राम्हणी ग्रंथात जर विठ्ठलाचे कोठे ही नांव नाही, तर ह्या सर्व पुराव्यावरुन हेच सिद्ध होते की पंढरपूरचा विठ्ठल हा देव नसून तो एक महामानव आहे.

विठ्ठलाच्या मूर्तीकडे नीट पाहिलेत तर काही गोष्टी लक्षात येतात कि, विठ्ठलाचे डोळे, त्याचे खांद्यावर रुळणारे लांब कान आणि कपाळ विशाल आहे. इतर वैदिक देव–देवता सारखे विठ्ठलाने हातात कोणतेही हिंसा करनारे शस्त्रे नाहीत, आयुधे धरलेले नाही की कोणतेही हत्यार नाही, विठ्ठलाला चार हात नाहीत, तो आपले दोन कमलहस्त आपल्या कमरेवर ठेऊन उभा आहे. तसे करून जणू तो जगाला आपल्या लेकरांना, उपासकांना म्हणजेच वारकऱ्यांना अहिंसेचा संदेश देत आहे अर्थात पंढरपूरचा विठ्ठल हा अहिंसेचा पुरस्कर्ता महामानव आहे देव नाही.

तसेच समतेने–ममतेने, बंधूभावाने, प्रेमाने, आपुलकीने वागवणारा असा पंढरीच्या विठ्ठलामध्ये कुठलाच भेदभाव नाही, उच्चनिचता नाही, गैरबराबरी नाही. विठ्ठलाला होमहवनअभिषेक करण्याची गरज लागत नाही, त्याला दक्षिणा वाहण्याची गरज नाही, त्याला भट–ब्राम्हणांचे मध्येस्थही लागत नाही आणि त्याच्या पूजेसाठी मंत्र–तंत्र

म्हणण्याची सुद्दा गरज नाही. फक्त मुखाने नामाचा गजर केला तरी चालतो. तो प्रसन्न हसतो आहे. विठ्ठलाची अहिंसक शांत मूर्तीच तो कोणी तरी महामानव असण्याचे प्रतिक आहे. अर्थात पंढरपूरचा विठ्ठल देव नाही.

संत नामदेव महाराज

....

वारकरी संप्रदायाचे संस्थापक मानले जातात ते आपल्या वारकरी संत सहकार्यांना पंढरपूरच्या विठ्ठलाची ओळख करून देताना सांगतात.....

"बौद्ध अवतारी आम्ही झालो संत | वर्णावया मात नामा म्हणे ||"

तुझा बुद्धावतार वर्णन करण्यासाठी म्हणजे बुद्धविचार लोकांना सांगण्यासाठी आणि बौद्धावतारात तु कशी वैदिकांवर मात केली होती ते वर्णन करण्यासाठी आम्ही संत झालो आहोत, अशा शब्दात नामदेव महाराज अवतारकार्य सांगतात.

पुढे जाऊन संत नामदेव महाराज विठ्ठला हा तथागत बुद्धच आहे असे आपल्या अभंगात सांगतात•••

गोकुळी अवतारू सोळा सहस्त्रावरू | आपण योगेश्वरु बौद्ध रुपी ||

व्रतभंगासाठी बौद्ध अवतार | झाला दिगंबर अवनिये |

ऐसा कष्टी होऊनी बौद्ध राहिलासी ||

"धर्म लोपला अधर्म जाहला हे तू न पाहसी |

या लागी बौद्ध रूपे पंढरी नांदसी ||"

....

संत तुकाराम महाराज

....

बौध्यअवतार माझिया अदृष्टा ।मौन्य मुखें निष्ठा धरियेली ।।१।।

आलें कलियुग माझिया संचिता । डोळां हाकलितां न पडेसी ।।२।।

म्यांच तुझें काय केलें नारायणा । कां नये करुणा तुका म्हणे ।।३।।

(अंभग २५६०)

मौन धारण केलेला हा बौद्धअवतार माझ्या वाट्याला आला आहे. लोकांसाठी शाम चतुर्भुज झाला आहे. संतांशी गुजगोष्टी करत आहे. माझ्या भाग्यात हे कलियुग आलं आहे, तुझं रुप डोळ्यापुढून हाकललं तरी जात नाही. तुकाराम महाराज म्हणतात, "मीच तुझं असं काय घोडं मारलं आहे की तुला माझी कींव येत नाही?"

संत तुकाराम महाराज म्हणतात बुद्ध अवतार मी पाहिलेला नाही. मुखाने मौन धरण्याची निष्ठा तू धारण केली पण प्रत्यक्षात आपल्याला बुद्ध पाहता आलेला नाही ही एक प्रकारची खंत व्यक्त केलेली आहे.

बुद्धावतारात, बुद्ध सतत भ्रमण करत. नीती–अनिती, धर्म, समजून सांगत. लोकांना उपदेश करत. पण विठ्ठलाने मात्र मौन धारण केलं आहे. दोन्ही हात कटीवर ठेऊन तो उभा आहे. त्याचं मौन हे सामान्य लोकांसाठी आहे, मात्र तो संतांशी गुजगोष्टी करतो असं तुकाराम महाराज सांगतात

"लोकांचियेसाठी शाम चतुर्भुज | *संतांसवें गुज बोलतसां ||*

चतुर्भुज होणं म्हणजे बंधनात बांधलं जाणं. सामान्य लोकांसाठी विठ्ठल बंधनात बांधलेला आहे, पण संतांशी मात्र तो गुजगोष्टी करतो

....

संत एकनाथ महाराज

....

बुद्धाला बोधाई माऊली म्हटलं आहे. *बोधोनि सकळही लोका |*

बोधे नेले त्रिविध तापवो || *बौद्धरुपें नांदसी | बोलेविना बोलणे एक वो ||*

साधक बाधक जेथे एकपणेच बोधविसी वो | *ऊदो म्हणो ऊदो बोधाई माऊली हो ||*

किंवा

"लोक देखोनि उन्मत्त | दारांनी आसक्त ||

न बोले बौद्धरुप | ठेविले जघनी हात ||"

"धर्म लोपला अधर्म जाहला |हे तु न पाहसी || या लागे *बौद्धरुपें पंढरी नांदसी ||*

....

संत जनाबाई

....

होऊनिया कृष्ण कंस वधियेला |

आता बुद्ध झाला सखा माझा ||

लोक देखोनी उन्मत | *दारांनी आसक्त*

न बोले बौद्धरुप *ठेविले जघनी हात ||*

....

संत बहिणाबाई

....

कलियुग हरी । बुद्ध रुप धरी । *तुकोबा शरीरी प्रवेशला ।।*

संत तुकारामाच्या तोंडून साक्षात तथागत बुद्धच बोलत आहेत, असे संत बहिणाबाई सूचित करतात

*तसेच,....संत संप्रदाय *बुध्दालाच विठ्ठल मानताना म्हणतात -*

संत तया दारी, तिष्ठताती निरंतरी |

पुंडलिकासाठी उभा । धन्य धन्य विठ्ठल शोभा ||

बौध्द अवतार घेऊन विटे समचरण ठेऊन |

लोक देखोनि उन्मत्त दारांनी आसक्ता |

न बोले बौध्द रूप ठेवीले जघनी हात ||

भक्तीविजय

....

कलियुगी प्रत्यक्षा पाषाण रूपी, *बौध्दरूपे असता श्रीपती |*

जनांसी दाखवूनी नाना प्रचिती, *वाढविली कीर्ती संताची ||*

संतविजय अध्दाय १० महिपतीबुवा ताहाराबादकर (कांबळे)

कलियुगामाजे साचार | असत्य भाषण झाले फार

यास्तव बौध्द अवतार | देवे सत्वर घेतला॥

स्वानुभव दिनकर

....

कळिचा प्रातुर्भव देखोनी, *बुध्दियोगे आवडे उगेपणी |*

बौध्दावताराचिया आयणी ||

....

संत चोखोबा महार

....

शुद्ध चोखामेळा । करी नामाचा सोहळा ।।१।।

मी यातिहीन महार । पूर्वी निळाचा अवतार ।।२।।

कृष्णनिंदा घडली होती । म्हणोनि महार जन्मप्राप्ती ।।३।।

चोखा म्हणे विटाळ । आम्हा पूर्वीचे हे फळ ।।४।।

(कदम ग्रंथ अभंग:पृ. ११)

चोखोबा महार "निळाचा अवतार" म्हणजे मूळ "नागवंश" होय. (तथागत बुद्ध नागवंशिय होते)

कृष्णाचा अंत नागवंशीयाकडून झाला. हीच कृष्णनिंदा झाली आणि म्हणून "महार" जन्म झाला असे चोखोबा या अभंगातून सांगतात

चोखोबा "महार" अर्थात् अस्पृश्य जातीचे असुनही त्यांचे संपुर्ण कुटुम्ब वारीकरी संप्रदायाचे निष्ठावान वारिकरी बनुनी अमानवतावादि वैदिक ब्राह्मणी व्यवस्थेच्या विरोधात संघर्ष करित होते

संत चोखोबा म्हणतात.....

कली माजी देव बुद्ध रुप जाला |

शरण शरणवाणी शरण तिवाचा विणवणी ||

कली युगातिल बुद्ध आमचे दैवात आहे. त्याला त्रिवार शरण जातो

संत चोखोबाची पत्नी संत सोयाराबाई

....

देहासी विटाळ म्हणती सकल | *आत्मा तो निर्मळ शुद्धबुद्ध*

देहीचा विटाळ देहिच जन्मला *सोवळा तो झाला कवण धर्म ||*

संत चोखोबाचा मुलगा संत कर्म मेळा

....

आमुची केली हीन याती | *तुज का न कळे श्रीपती*

जन्म गेला उष्टे खाता *लाज न ये तुमचे चित्ता ||*

संत चोखोबाचा मेव्हणा संत बंका महार आणि मुलगी संत निर्मला

....

हाती न घेता तलवार *बुद्ध राजकरी जगावर |*

ऐकोनी "बंका" करित उत्तर *बुद्ध अवतार पांडुरंग* ||

सामाजिक आणि सांस्कृतिक विषमता नष्ट करण्याची भुमिका संत चोखोबा व त्यांच्या कुटुंबियांनी घेतली खरी, पण शेवटी ते आपल्या नशिबाला किंवा प्रारब्धाला शरण का गेले? कारण या काळात आपेगाव पैठणच्या ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीच "कर्ममार्ग" तत्वज्ञानाचा समाज जीवनात मोठा प्रभाव होता

आपेगावच्या ज्ञानेश्वरीची ज्ञानेश्वरीतील ही ओवी•••••••

कर्म पराधिनपणे | निपजते प्रकृतिपूर्ण

म्हणून संग जंव प्रकृतीचा | तंव त्याग त घड़े कर्माचा (ज्ञा.३:६ ३)

कर्म अर्थात नशीब प्रकृतितुन म्हणजे पुनर्जन्मातुन निपजते, तेव्हा माणूस कर्माच्या बंधनातुन मुक्त नाही

संत चोखोबांचे अख्ख कुटूंब विठ्ठलमय अर्थात् बौद्धमय झालेले पाहुन वैदिक ब्राह्मणाने संत चोखोबाची भिंती खाली चिरडुन हत्या केली

वैदिक ब्राह्मणाचा ऐवढा दहशतवाद की संत चोखोबाचे प्रेत भिंती खालुन काढण्याची कोणाचिही हिम्मत नव्हती

"वैदिक ब्राम्हणी व्यवस्थेने संत चोखाबाची केलेली हत्या, संत कबीर व संत रोहिदासा नंतरची तिसरी हत्या आणि महाराष्ट्रात झालेली संताची पहली हत्या होती.

परंतु एक लक्षात असू द्या.........

मरण आहे या सकळा | *भेणे अवकळा अभयमोल* ||

मरणाच्या भिती पेक्षा मरणाची प्रतिष्ठा महत्वाची असते. जेव्हा संत चोखोबाच्या हत्या झाली तेंव्हा संत नामदेव उत्तरेत होते. संत नामदेवानी चोखोबाची हाडं एकत्र करून पंढरपूर येथील विठ्ठल मंदिराच्या पहिल्या पायरीवर चोखोबाची समाधी केली

अस्पृश्य जातीचे संत चोखोबा महार विठ्ठलाच्या पहिल्या पायरीचे तमाम संताचे प्रेरणा स्थान झाले.

संत मनोभावे म्हणू लागले•••

कलियुगी प्रत्यक्षा पाषाण रुपी । *बौद्धरुपी असता श्रीपती* ।।

जनांसी दाखवूनी नाना प्रचिती । *वाढविली किर्ती संताची* ।।

या सर्वांवरुन विठ्ठल हा बुद्धच आहे असं संत परोपरीने सांगताना दिसतात.......

पंढरपूरचा विठ्ठल हा तथागत बुद्ध आहे हे झालं संतांची गाथेतिल अभंगवाणीचे पुरावे. आता आपण तथागत बुद्ध हा विठ्ठल आहे त्याचे प्रत्यक्ष पुरावे पाहुया......

महाराष्ट्रात शीळाप्रेसवर पंचाग नवग्र जात असे, या पंचागाच्या मुखपृष्ठावर नवग्रह व दश अअवताराच्य चित्रात नवव्या अवताराच्या स्थानी विठ्ठलाचे चित्र छापत व त्या विठ्ठलाच्या खाली बुद् असे लिहिलेले असे......

विचारवंत डॉ. रा. चि. ढेरे दोन पुस्तकांचा ऊल्लेख करतात पहले पुस्तक श्री विठ्ठल एक महासमन्वय आणि दुसरे म्हणजे श्रीराम सहश्त्रनाम ह्या स्तोत्राच्या पुस्तकात गरुड, हनूमान विठ्ठलाचे चित्र छापलेले असून त्याच्या खाली बुद्ध असे लिहिले आहे

तसेच महाराष्ट्रात दोन मंदिर आहेत

महाराष्ट्र - तासगांव - सांगली विंचूरकरांनी बांधलेले दक्षिणी शैलीचे गणेश मंदिराच्या गोपूरावर बुद्धाची मूर्ति आहे.

कोल्हापूर महालक्ष्मी मंदिराच्या ओवारित बुद्ध मूर्ती दगडावर कोरलेल्या आहेत.

संत नामदेव महाराजा पासून ते संत तुकाराम महाराजा पर्यंतच्या संताच्या वाणीतून आणि महाराष्ट्रातील लिखीत व कोरीव शिल्पातिल पुराव्यावरून सिद्ध होतं की पंढरपूरचा विठ्ठल तथागत बुद्धच आहेत

आज जरी इतिहासतज्ञ, वैचारिक अभ्यासकांना संत आणि बुद्ध यांच्यातलं विचारधारेचं नातं माहिती असलं तरी सामान्य वारकरी म्हणवणाऱ्यांना हभप किर्तनकाराला बुद्धांविषयी प्रेम वाटत नाही.आपुलकी वाटत नाही. आदर वाटत नाही कारण वैदिकब्राह्मणी मनुवाद्यानी त्यांच्या मनात असं भरवलं आहे की बुद्ध आपला नाही, तो परका आहे, आपला बुद्धाशी काही संबंध नाही

*स्वतःला विठठलाचा वारकरी म्हणवणाऱ्या हभप किर्तनकाराच्या डोक्यात जातीयवादी, विषमतावादी, माणसामाणसात भेद करणाऱ्या वैदिकब्राह्मणी विचारांचीच पेरणी

झालेली असल्यामुळे, त्यांच्या मनात जातीयवादी विचारांचं तण माजलेलं आहे*

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लक्षावधी अनुयायांसह बौद्ध धर्म स्विकारल्यामुळे तर या अल्पबुद्धि लोकांच्या मनात बौद्ध धम्म आणि तथागत बुद्ध यांच्याविषयी अधिकच दुरावा निर्माण झाला आहे कारण वैदिक ब्राह्मणांनी त्याला खतपाणी घातले आहे.

अशा परिस्थितीत या मूढ लोकांना आपल्या मूळ विचारांचं, धर्माचं भान आणून देण्यासाठी संत नामदेवा पासून ते संत तुकाराम महाराजांचा हे अभंग अतिशय महत्त्वाचा आहे.

आपली परंपरा स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेची शिकवण देणारी परंपरा आहे. लोकांना शारीरिक, मानसिक, बौद्धिक गुलाम बनवणारी, उच्चनीचता पाळणारी, भेद पाळणारी, द्वेष पसरवणारी परंपरा आपली नाहीच ति वैदिक ब्राह्मणी मनुवादि परंपरा आहे तेव्हा......

(संदर्भ: - उल्हास पाटील, गाथा परिवार)

तुमचा गैरसमज दूर करा --------------

"तथागत भगवान बुद्ध" हे केवळ १९५६ ला धर्मांतरीत झालेल्याच लोकांचीच "विरासत" नाही तर तथागत भगवान बुद्धांचे तुम्ही-आम्ही तमाम बहुजन समाज "वारसदार" आहात तुमच्या वारसाहक्काचे पुरावे यथा योग्य पध्दतीने तुमच्या समोर मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. आशा आहे आणि विश्वास देखील आहे की ज्या दिवशी बहुजन समाजाला इतिहासिक सत्यतेचे जेव्हा भान येईल तेंव्हा संतविचारांच्या माध्यमातून तथागत भगवान बुद्धाचे विचार बहुजनां मध्ये रुजण्याला अनुकूल मनोभूमी तयार होईल. यासाठी वैचारिक मशागत करावी लागेल आणि ते केले तरच भविष्यात "बहुजनांचा बहुजनसमाज" निर्माण होऊ शकतो.....

....

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १८ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, आसाळ्ह मासो, गुरूवार, आषाढ माहे.

१८ जुलै १८८३ – रोजी महात्मा ज्योतिराव फुले यांनी "शेतकऱ्यांचा आसूड" हा ग्रंथ पूर्ण केला.

१८ जुलै १९४२ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेला "The Cripps Proposals on Constitutional Advancement" हा ग्रंथ प्रकाशित झाला.

१८ जुलै १९४२ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर सकाळी ९ वाजता नागपूरला पोहोचले. समितीचे अध्यक्ष व सदस्यांनी रेल्वे स्टेशनवर त्यांचे स्वागत केले. अखिल भारतीय दलित वर्ग परिषदेचे तिसरे सत्र ३:३० वाजता नागपूरच्या मोहन पार्क येथील खास तयार पंडाळात सुरू झाले. या परिषदेत डॉ. आंबेडकर म्हणाले होते की, "जर लोकशाही संपली तर आपला विनाश होईल."

१८ जुलै १९६९ – रोजी साहित्य सम्राट, कवि, समाज सुधारक आणि लोकशाहीर अंण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १९ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, शुक्रवारो, आसाळ्ह मासो, शुक्रवार, आषाढ माहे.

१९ जुलै १९२६ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुत्र राजरत्न यांचे न्युमोनियाने निधन झाले.

१९ जुलै १९३७ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मुंबई विधिमंडळ सदस्य गीता हातात घेऊन शपथविधी न करता डॉ. बाबासाहेबांनी शपथविधी उरकला.

१९ जुलै १९४२ – रोजी अखिल भारतीय शेड्युल्ड कास्टस फेडरेशन या राजकीय पक्षाची नागपूर येथे स्थापना करण्यात आली. अखिल भारतीय दलित वर्ग परिषदेला माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी "शिकवा, चेतवा, संघटित करा." असा संदेश दिला.

१९ जुलै १९४६ – रोजी घटना समितीसाठी बंगालमधील निकाल जाहीर झाले. २७ सामान्य जागांपैकी काँग्रेसने २५ व डॉ. आंबेडकर (शेड्युल्ड कास्टस फेडरेशन) आणि सोमनाथ लाहिरी (कम्युनिस्ट) यांनी प्रत्येकी एक एक जागा जिंकील्या.

१९ जुलै १९४६ – रोजी मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री खेर यांनी दलित वर्गाचा हा लढा कशासाठी पुकारलेला आहे हे आपणांस माहीत नाही? अशी आपल्या गांधी धर्माला जागून घोषणा केली.

१९ जुलै १९५४ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बर्मा (सध्याच्या म्यानमार) मधील बौद्ध सासन परिषदेत भारतातील बौद्ध धंम्माच्या प्रचारार्थ मोहिमेचा प्रस्ताव दिला.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २० जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, आसाळ्ह मासो, शनिवार, आषाढ माहे.

२० जुलै १९१३ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी न्यूयॉर्क येथील कोलंबिया विद्यापीठातील राज्यशास्त्र शाखेत प्रवेश घेतला.

२० जुलै १९२४ – रोजी अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी सामाजिक चळवळ उभी करण्याच्या दृष्टिने माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली 'बहिष्कृत हितकारणि सभा' याची दामोदर गृह, परळ, मुंबई येथे स्थापना झाली. "शिक्षित करा, संघटित व्हा आणि संघर्ष करा." हे या संस्थेचे ब्रीद वाक्य होते.

२० जुलै १९२७ – रोजी पुणे येथील मांगवाड्यात पुण्याच्या दीनबंधू पत्राचे संपादक डॉ. नवले यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्य लोकांच्या जाहीर सभेत माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "महार जातीवरील आप्पलपोटे पणाचां आरोप निराधार आहे.

२० जुलै १९३७ – रोजी स्वतंत्र मजूर पक्षातील मुंबई प्रांतिक असेंबलीच्या सभासदांची पहिली सभा पुणे येथे अहिल्याश्रमात माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली भरली.

२० जुलै १९४२ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथून मजूर मंत्र्याच्या खात्याचे काम स्वीकारले.

२० जुलै १९४२ – रोजी अखिल भारतीय दलित वर्गीय महिला परिषद आणि समता सैनिक दल परिषदेचे दुसरे अधिवेशन नागपुरातील मोहन पार्क येथे खास तयार केलेल्या पंडालमध्ये संप्पंन्न झाले. या परिषदेत माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या भाषणात म्हणाले की, "महिलांनी मिळविलेल्या प्रगतीच्या प्रमाणात मी समुदायाच्या प्रगतीचे मापन करतो. I measure the progress of a community by the degree of progress which women have achieved."

२० जुलै १९५० – रोजी सिद्धार्थ बोर्डिंग संगमनेर मधिल महार समाज सेवा संघाच्या इमारत फंड प्रसंगी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात प्रश्न केला की, "शिक्षित मुले समाजाच्या उन्नति प्रीत्यर्थ काही करणार आहेत काय?"

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

११ सप्टेंबर १९३८ – रोजी पुणे येथे अकरावे अस्पृश्य विद्यार्थी संमेलन झाले. माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, "दीर्घ उद्योग व कष्ट केल्यास यश प्राप्त होते."

११ सप्टेंबर १९३८ – रोजी मुंबई विधिमंडळात "औद्योगिक तंटा" या विधेयकावर बोलतांना कामगारांचा संप करण्याचा हक्क डावण्यास माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तीव्र विरोध केला.

११ सप्टेंबर १९४८ – रोजी कराची, पाकिस्तान येथे बॅरिस्टर महंमद अली जिना यांचे निधन झाले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १२ सप्टेंबर २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, पोठ्ठपाद मासो, गुरूवार, भाद्रपद माहे.

१२ सप्टेंबर १९२९ – रोजी स्पृश्यास्पृश्य विचार या विषयावर नाशिक रोड येथे संत गाडगे महाराज यांचे जाहीर व्याख्यान झाले.

१२ सप्टेंबर १९४९ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानसभा चर्चेमध्ये कलम ३०१ए, ३०१ब, ३०१क, ३०१ड, ३०१इ, ३०१F, ३०१ग, ३०१ह, ३०१ई जे सध्याच्या राज्यघटनेतील कलम ३४३, ३४४, ३४५, ३४६, ३४७, ३४८, ३४९, ३५०, ३५१ आहेत यावर चर्चा केली.

१२ सप्टेंबर १९५१ – रोजी संसदीय चर्चेत माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी "कायदा मंत्रालायातले अधिकारी Officers in the Ministry of Law" यावर चर्चा केली.

१२ सप्टेंबर १९५४ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यसभेत 'अस्पृश्यता विषयक गुन्हे' या बिलांवर अभ्यासपूर्वक प्रतिपादन केले. तसेच 'अस्पृश्यता विषयक गुन्हे' या बिलाला 'दि अंनटचेबल सिव्हील राईट बिल' संबोधावे असे राज्यसभेत सुचविले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १३ सप्टेंबर २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, पोठ्ठपाद मासो, शुक्रवार, भाद्रपद माहे.

*१३ सप्टेंबर १९२९ – रोजी नांदगाव येथे श्री. सोमवंशी मेळाव्यात माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण

झाले.*

१३ सप्टेंबर १९३९ – रोजी कोल्हापूर संस्थान दलित प्रजा परिषदेतील माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अध्यक्षीय भाषण 'जनता' वृत्तपत्रात प्रकाशित झाले.

१३ सप्टेंबर १९४५ – रोजी कनिष्ठ मध्यम वर्गीयांमध्ये आणि विशेषतः दलित वर्गामध्ये उच्च शिक्षणाचा प्रचार करण्याचा उद्देशाने आधुनिक साहित्य आणि उत्तम शिक्षकवर्ग यांनी संपन्न असे एक महाविद्यालय सुरू करावयाचे माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न साकार करण्यासाठी धडपड चालविली होती.

१३ सप्टेंबर १९४९ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभा चर्चेत घटनेच्या धारा ३०१ए ते ३०१इ वरील चर्चा चालू ठेवली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

धम्म

यो धम्मं पस्सति सो मं पस्सति। यो मं पस्सति सो धम्मं पस्सति।।

तथागत गौतम बुद्ध

तथागत बुद्ध ने स्वयं अनेक बार कहा है –

"जो धम्म को देखता है, वह मुझे देखता है।

जो मुझे देखता है, वह धम्म को देखता है।"

इसी को बौद्ध धंम्म में 'धर्मकायास्तथागता' कहते हैं। धम्म की अनुस्मृति वस्तुत: बुद्ध की स्मृति से कुछ कम महत्वपूर्ण नहीं है। परमार्थ रुप से बुद्ध और धम्म में भेद करना ही अज्ञानता है। बुद्ध और धम्म एक ही है।

महापरिनिर्वाण में प्रवेश करते समय भगवान ने कुशीनगर में भिक्खुओं से कहा था, "मेरे बाद मेरे द्वारा उपदेश किया हुआ धम्म विनय ही तुम्हारा शास्ता होगा।"

इस प्रकार 'धम्म' लोक में बुद्ध का प्रतिनिधि है। परंतु 'धम्म' अपने अस्तित्व के लिए बुद्धों के आविर्भाव पर निर्भर नहीं है। तथागत चाहे उत्पन्न हों, चाहे न हों, धम्म नियामता तो रहती ही है।

"उप्पादा वा तथागतानं अनुप्पादा वा तथागतानं ठिता व सा धातु धमामट्ठितता धम्मनियामता।"

अत: 'धम्म' व्यक्ति निरपेक्ष सत्य है, जो व्यक्ति के रुप में भगवान बुद्ध की भी अपेक्षा नही रखता। बुद्ध और संघ के बीच 'धम्म' मध्यस्थता करता है। तथागत गौतमबुद्ध ने धम्म का साक्षात्कार किया और अपने बाद 'धम्म' को अपना प्रतिनिधि बनाया। 'धम्म' के लिए बुद्ध ने अपने को विसर्जित कर दिया। 'धम्म' के प्रचार के लिए, ब्रह्मचर्य के प्रकाश के लिए, संघ का आयोजन हुआ। परन्तु बुद्ध के बाद उसका नियन्त्रण कर्ता भी 'धम्म' ही हुआ, कोई व्यक्ति नहीं। इस प्रकार हम देखते हैं कि बुद्ध और संघ के बीच में धम्म है।

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐

हर रविवार बुद्धविहार बुद्धगुफाऐ में जाना ही चाहिये – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐

सब्ब पापस्स अकरणं कुसलस्स उपसंपदा। *सचितपरियोदपनं में एतं बुद्धान सासनं।*

धन्यवाद, सविनय जयभिम *सर्वांचे मंगल हो, Be Happy*

☸☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १४ सप्टेंबर २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, पोठ्ठपाद मासो, शनिवार, भाद्रपद माहे.

१४ सप्टेंबर १९३९ – रोजी जागतिक युद्धाविषयी ब्रिटिश सरकारने आपले युद्धविषयक धोरण जाहीर करावे अशी विनंती काँग्रेस नेत्यांनी केली या धोरणाशी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहमत नव्हते.

१४ सप्टेंबर १९४९ – रोजी "राष्ट्रीय हिंदी भाषा दिन." १४ सप्टेंबर १९४९ लां पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या कार्यकाळात देवनागरी लिपीमध्ये लिहिलेल्या हिंदीला आधिकरिक भाषेच्या रूपात स्वीकृती मिळाली होती. हिंदीला राष्ट्र भाषेचा दर्जा १९५० ला मिळाला.

१४ सप्टेंबर १९५६ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांना "भगवान बुद्ध आणि त्यांचा धंम्म" या ग्रंथाची टंकलिखित प्रत भेट दिली.

१४ सप्टेंबर १९५६ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पंडित जवाहरलाल नेहरु यांना पात्र लिहिले की, " 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धंम्म' या ग्रंथाच्या छपाईसाठी २०,००० रुपये आवश्यक होते." डॉ. आंबेडकर यांनी नेहरू यांना पैशाची मदत मागितली पण नेहरूंनी कोणतीही मदत दिली नाही.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १५ सप्टेंबर २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, पोठ्ठपाद मासो, रविवार, भाद्रपद माहे.

१५ सप्टेंबर १८६१ – रोजी "राष्ट्रीय अभियंता दिन". मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या अभियंता. १९६२ मध्ये एम विश्वेश्वरय्या सरांच्या निधनानंतर, त्यांचा वारसा पुढे नेण्यासाठी आणि त्यांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी १५ सप्टेंबर हा अभियंता दिवस म्हणून घोषित करण्यात आला.

१५ सप्टेंबर १९२७ – रोजी महाड नगरपालिकेने चवदार तळे खुले झाल्याचा पूर्वीचा ठराव मागे घेतल्याने माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नेमलेल्या समितीने आंबेडकरांच्या कार्यालयात दोन दिवस दिवस सत्याग्रह करण्यासाठी बैठक निश्चित केली.

१५ सप्टेंबर २९३६ – रोजी अमृतसर येथे शिख धर्माचा अभ्यास करण्यासाठी सुमारे १६ महार मंडळी गेली.

१५ सप्टेंबर १९३८ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी काँग्रेस सरकारने मुंबई कायदेमंडळात आणलेल्या कामगारांच्या नागरिक स्वातंत्र्यास विघातक व्यापार विधी विधेयक अशा ट्रेंड डिस्पुट बिलावर बिलाच्या पहिल्या वाचन प्रसंगी मुद्देसूद तीन तास भाषण केले.

१५ सप्टेंबर १९५४ – रोजी वारंवार होणाऱ्या संविधान संशोधनाबाबत राज्यसभेत माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विस्तृत भाषण.

१५ सप्टेंबर २००२ – रोजी नानकचंद रत्तू स्मृतिदिन. माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे खाजगी सचिव.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

१५ सप्टेंबर १८६१ – रोजी "राष्ट्रीय अभियंता दिन". मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या अभियंता.

भारतात दरवर्षी १५ सप्टेंबर हा अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. तुम्हाला माहीत आहे का? अभियंता दिन किंवा अभियांत्रिकी दिवस १५ सप्टेंबरला का साजरा केला जातो? यामागे एक मोठे कारण आहे, सर एम. विश्वेश्वरय्या. पूर्ण नाव – मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या, ज्यांना सर ही पदवी देण्यात आली होती. भारतातील ते महान अभियंते ज्यांना भारतरत्न देण्यात आला. त्यांचा जन्म १५ सप्टेंबर १८६१ रोजी कर्नाटकात झाला. त्यांना अभियांत्रिकीचे जनक देखील म्हटले जाते. सर एम. विश्वेश्वरय्या यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रीय अभियांत्रिकी दिवस साजरा करण्यात येतो.

सर एम. विश्वेश्वरय्या कोण होते?

सर एम. विश्वेश्वरय्या हे भारतीय अभियांत्रिकी क्षेत्रातील त्यांच्या अभूतपूर्व कामगिरी आणि योगदानासाठी ओळखले जातात. ते एक प्रसिद्ध सिव्हिल इंजिनियर, विद्वान आणि राजकारणी होते ज्यांनी भारताच्या औद्योगिक विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

सर एम. विश्वेश्वरय्या यांनी काय केले?

कावेरी नदीवर बांधलेले कृष्णा राजा सागर धरण (KRS) हे एम. विश्वेश्वरायांच्या प्रसिद्ध योगदानांपैकी एक आहे. हे धरण त्या काळातील सर्वात मोठ्या जलाशयांपैकी एक होते आणि दक्षिण भारताच्या विकासात मोठी भूमिका बजावली. हा प्रकल्प आजही परिसरातील शेती आणि पाणीपुरवठ्यासाठी महत्त्वाचा आहे.

याशिवाय सर एम. विश्वेश्वरय्या यांनी सिंचन आणि पूरनियंत्रण क्षेत्रातही भरपूर काम केले. त्यांनी अनेक धरणे, पूल आणि पाणी वितरण प्रकल्पांची रचना केली, ज्यामुळे भारतातील कृषी आणि औद्योगिक विकासाला गती मिळाली. मुंबईच्या बंदर परिसरात पुराचा सामना करण्यासाठी त्यांनी ड्रेनेज सिस्टमची रचना केली. हे देखील त्यांच्या महान कामगिरीमध्ये गणले जाते. देशात तंत्रशिक्षणाचा प्रसार करण्यातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

तथापि, भारतातील अभियंता दिवस केवळ सर एम. विश्वेश्वरयांच्या योगदानाला श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी साजरा केला जात नाही. तर, देशाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सर्व अभियंत्यांचा सन्मान करण्याचा हा दिवस आहे. ते अभियंते जे विविध क्षेत्रात तांत्रिक सुधारणा आणि नावीन्यपूर्ण माध्यमातून देश आणि समाजाच्या विकासात मोठी भूमिका बजावतात.

अभियंता दिवस जगभरातील वेगवेगळ्या देशांमध्ये वेगवेगळ्या तारखांना साजरा केला जातो. युनेस्कोने घोषित केलेला जागतिक अभियांत्रिकी दिवस ४ मार्च रोजी साजरा केला जातो. भारतातील अभियांत्रिकी दिनाचा इतिहास सुमारे ५६ वर्षांचा आहे. १९६८ मध्ये प्रथमच अभियंता दिन साजरा करण्यात आला. १९६२ मध्ये एम विश्वेश्वरय्या सरांच्या निधनानंतर, त्यांचा वारसा पुढे नेण्यासाठी आणि त्यांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी १५ सप्टेंबर हा अभियंता दिवस म्हणून घोषित करण्यात आला.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १६ सप्टेंबर २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, पोठ्ठपाद मासो, सोमवार, भाद्रपद माहे.

१६ सप्टेंबर १९३१ – रोजी संघराज्य रचना समितीत माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण झाले.

१६ सप्टेंबर २९३८ – रोजी "भांडवलदारांच्या कृपेवर श्रमजीवी वर्गाचे कल्याण अशक्य." या विषयावर माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण, मुंबई.

१६ सप्टेंबर १९३९ – रोजी स्वतंत्र मजूर पक्षाचे युद्ध विषयक धोरण जाहीर.

१६ सप्टेंबर १९५४ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मागासवर्गीयांच्या हक्कांसाठी "अस्पृश्यता गुन्हे विधेयक १९५४ Untouchability Offences Bill 1954" यावर राज्यसभेत चर्चा केली.

१६ सप्टेंबर १९६९ – रोजी कामगार शिक्षण दिन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १७ सप्टेंबर २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, पोठ्ठपाद मासो, मंगळवार, भाद्रपद माहे.

१७ सप्टेंबर १८५१ – रोजी महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले यांनी पुण्यात रास्तापेठ येथे मुलींची दुसरी शाळा सुरू केली.

१७ सप्टेंबर १८६४ – रोजी अनागरिक धंम्मपाल जयंती. "विश्व पालि भाषा गौरव दिन."

१७ सप्टेंबर १८७९ – रोजी पेरियार ई. व्ही. रामासामी नायकर जयंती.

१७ सप्टेंबर १८८५ – केशव सीताराम ठाकरे (प्रबोधनकार ठाकरे) जयंती.

१७ सप्टेंबर १९२७ – रोजी एल्फिन्स्टन रोडवरील डेव्हिड मिलच्या चाळीच्या कंपौंडात (कुंपणात) माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जाहीर सभेत त्यांनी सांगितले की, "आपण कोणाहीपेक्षा कमी नाही." सदर भाषण दिनांक ३० सप्टेंबर १९२७ रोजी ग्रुप भारत येथे प्रकाशित झाले.

१७ सप्टेंबर १९३७ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोंकणातील खोती नष्ट करणारे विधेयक मुंबई विधीमंडळासमोर सादर केले.

१७ सप्टेंबर १९४३ – रोजी भारतीय कामगार संघटनेच्या वतीने ८ ते १७ सप्टेंबर १९४३ दरम्यान दिल्लीत अखिल भारतीय कामगार संघटना कामगार अभ्यास शिबिर आयोजित करण्यात आले. माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कार्यक्रमाच्या शेवटच्या अधिवेशनात म्हणाले की, "सरकार व्यापणे हे कामगारांचे धेय्य असले पाहिजे."

१७ संप्टेंबर १९४८ – रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन.

१७ संप्टेंबर १९७७ – रोजी यशवंत (भैय्यासहेब) आंबेडकर स्मृतिदिन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸💎🦚🦚🦚 अनागरिक धम्मपाल – एक चिंतन 🦚🦚🦚💎☸☸

जन्म :– १७ सप्टेंबर १८६४, मृत्यू :– २९ एप्रिल १९३३.

१७ सप्टेंबर हा अनागरिक धम्मपालांचा जन्मदिवस जो जगभर "विश्व पालि भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. धम्मपालांच्या १६० वी जयंती निमित्त....

अनागरिक धम्मपालांचा जन्म १७ सप्टेंबर १८६४ मध्ये श्रीलंकेतील एक अतिश्रीमंत बौद्ध कुटुंबात झाला. त्यांचे जन्म नाव डॉन डेविड ठेवण्यात आले होते. त्यांच्या वडिलांचे डॉन कॅरोलीस हेववितरणे हे श्रीलंकेतील एक प्रतिष्ठित व्यापारी होते व आईचे नाव मल्लिका गुणवर्धणे होते. अत्यंत कुशाग्र बुद्धीच्या डॉनने शाळेत उत्तम प्रगती केली. त्याचा धार्मिक ओढा पाहून, त्याच्या आईने त्याला बौद्ध धम्माचा सविस्तर अभ्यास करण्यास प्रोत्साहन दिले. वयाच्या १६व्या वर्षी डेविडची भेट कर्नल ऑलकॉट आणि मॅडम ब्लावातस्की यांच्याशी झाली. या दोघांनी त्यावेळेस श्रीलंकेमध्ये थिऑसॉफिकल सोसायटी स्थापन केली होती व स्थानिकांच्या प्रश्नावर झटत होते. त्यावेळी श्रीलंकेमध्ये ख्रिस्ती मिशनरी सामान्यजनांना अतिशय हीन वागणूक देत. सर ऑलकॉट आणि मॅडम ब्लावातस्की यांच्याबरोबर फिरताना डॉन डेविडला श्रीलंकेतील गरीब, कष्टाळू व अन्याय, अत्याचारग्रस्त लोकांचे लाचारीचे जीवन अगदी जवळून पाहता आले. या बद्दल त्याला प्रचंड यातना झाल्या. स्वावलंबी होण्यासाठी त्याने तेथील शिक्षण खात्यामध्ये नोकरी सुरु केली. त्याचबरोबर बौद्ध धम्माच्या साहित्याचा अभ्यास करण्यासाठी डेविड पालि भाषा शिकला.

श्रीलंकेतील लोक आपला मूळ बौद्ध धम्म विसरले आणि जो पर्यंत या धम्माचा प्रसार होणार नाही तो पर्यंत ते गुलामगिरीत राहणार हे जाणल्यामुळे डेव्हिडने श्रीलंकेत बौद्ध धम्माला पुनर्जीवित करण्याचे ठरविले.

वयाच्या १९व्या वर्षी, त्याने घराचा त्याग केला आणि अनागरिक झाले. अनागरिक म्हणजे जो चीवर धारण न करता, संसार न करता, आयुष्यभर धम्मासाठी गृहत्याग करतो. यात त्याच्या घरच्यांनी त्याला उत्स्फूर्त साथ दिली. त्याने स्वतःचे नाव बदलून धम्मपाल केले. अनागरिक धम्मपालांनी नंतर गावोगावी जाऊन लोकांमध्ये बौद्ध धम्माचे विचार पेरायला सुरुवात केली आणि त्याचबरोबर त्यांना पारतंत्र्याची जाणीव देखील करून दिली. इंग्रज सरकारने त्यावेळेस लोकांना दारूच्या व्यवसायात गुंतविले होते त्यामुळे गरीब जणतेवला पैशाच्या आमिषाबरोबरच दारूचे व्यसन देखील लागले. धम्मपालांनी सरकारच्या विरोधात आवाज उठवीला आणि अनेक दारूचे कारखाणे बंद पाडण्यास भाग पाडले. जेथे जुनी विहारे होती तेथे जाऊन त्यांची साफसफाई केली आणि तेथे बौद्ध धम्माचे तसेच पाळी भाषेच्या संवर्धनासाठी प्रयत्न केले. काही गावात नवीन विहारे बांधली. बौद्ध धम्माच्या पुनर्जीवितासाठी ते अहोरात्र झटत होते. त्याच दरम्यान त्यांना बुद्धभूमी भारत पाहण्याची ओढ लागलि होती.

१८९१ मधे ते प्रथम भारतात आले व काही महत्वाच्या बौद्ध स्थळांना भेट देण्यास सुरुवात केली. या स्थळांची दुरावस्था पाहून त्यांना खूप वाईट वाटले. त्यकाळी बुद्धगया येथील महाबोधी महाविहाराचा ताबा काही शैव पंथांच्या महंतांच्या हातात असलेला पाहून त्यांनी तो सोडवुन घेण्याचे ठरविले. बौद्ध धम्मात या महाविहाराचे महत्व त्यांनी तेथील महंतांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला पण महंतांनी त्यांना हाकलून लावले. हे काम अत्यंत कठीण आहे हे धम्मपालांना उमजले होते.

बुद्धगयेमध्ये वर्षभर राहून त्यांनी अनेकवेळा महाविहाराला भेटी दिल्या व तेथे वंदना करण्यास सुरुवात केली. अनेक वेळा तेथील महंत त्यांना हुसकावून लावीत व त्यांच्या बरोबर आलेल्या परदेशी पाहुण्यांना टाकून बोलत. एकदा तर चाळीस पन्नास महंतांचि माणसे त्यांच्या अंगावर धावून आली. त्यांच्या तिसऱ्या भेटीत ते बुद्धरूपासमोर मेणबत्ती पेटवीत असतांना महेंद्र गिर नावाच्या इस्माने बुद्धरूप काढण्याचा प्रयत्न केला. धम्मपालांनी स्थानिक पोलीस चौकीत तक्रार केल्यानंतर प्रकरण थोडे शांत झाले. येथे स्थानिक संस्था स्थापन करून महाविराच्या अधिकाराचा प्रस्ताव टाकणे गरजेचे आहे हे जाणून धम्मपालांनी महाबोधी सोसायटीची स्थापना बुद्धगया येथे केली. त्यानंतर श्रीलंकेतील काही मित्रांशी बोलनि करून, ते देणगीसाठी श्रीलंकेला गेले.

धम्मपाल श्रीलंकेत अनेक लोकांना भेटून भारतातील महाबोधी महावीहाराची सत्य परिस्थिती कथन केली. याच दरम्यान त्यांनी जगातील अनेक वृत्तपत्रात महाबोधी महाविहारांची दुरावस्था बाबत लेखन केले. त्यामुळे जागतिक स्तरावर बुद्धगया येथील महाविहाराच्या दुरावस्थेबद्दल चर्चा होऊ लागली. श्रीलंकेतील वास्तव्यात त्यांनी गरीब मुलामुलींसाठी शाळा सुरु केल्या. तेथील धम्म जागृती आपल्या विश्वासू सहकाऱ्यांकडे सुपूर्द करत पुनः भारतात आले. महाबोधी महाविहारात बुद्धरूपासमोर नटमस्तक होत असतांनाच त्यांनी दृढ निश्चय केला की जोपर्यंत महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात येत नाही तोपर्यंत ते मायदेशी परतणार नाहीत आणि शेवटच्या स्वासापर्यंत हा लढा चालू ठेवतील. अनागरिक धम्मपाल यांच्या कार्यांची दखल जागतिक पातळीवर घेण्यात आली. १८९३ साली शिकागो येथील जागतिक धम्म परिषदेत त्यांना बौद्ध धम्माचे प्रतिनिधित्व करण्याची विनंती करण्यात आली. याच प्रवासात आणि शिकागो मधे त्यांची स्वामी विवेकानदांशी भेट झाली आणि दोघांत बौद्ध धम्मात असलेल्या स्वातंत्र्य, समता आणि बंधुता याबद्दल चर्चा झाली. या चर्चेने विवेकानंद खूप प्रभावित झाले. शिकागो येथील परिषदेत अनागरिक धम्मपालांनी मांडलेले जागतिक सहिष्णूता, बंधुता आणि शांती बद्दलचे बौद्ध विचार प्रभावशाली होते आणि तेथील वृत्तपत्रांनी त्यांची दखल घेतली. बुद्धगयेत परतल्यावर त्यांचा महाविहार संबंधीचा लढा चालूच राहिला. एकीकडे तेथील पंडे त्यांना मज्जाव करीत असत तर दुसरीकडे स्थानिक इंग्रजी पोलिसांकडून बोटचेपे भूमिका होती. एका भेटीत त्यांच्या लक्षात आले की मूळ बुद्धरूप महाविहारातून हलवून बाहेरील पांचपांडव मंदिरात ठेवण्यात आले होते. बुद्धरूप झाकून चेहऱ्यावर कुंकू लावण्यात आले होते. धम्मपालांनी प्रचंड विरोध केला होता. त्याच दिवसी संध्याकाळी ते राहत असलेल्या गेस्ट हाऊस मधे त्यांच्यावर मारेकरी सोडण्यात आले. धम्मपाल आणि त्यांचे काही सहकारी यात जखमी झाले. दाद मिळत नसल्याचे पाहून, या घटनेकडे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी वृत्तपत्रे आणि महाबोधी मासिकामध्ये अनेक लेख लिहिले. याच सली त्यांनी महेंद्र गिर, महंत आणि त्याच्या सहकाऱ्या विरोधात न्यायालयात केस टाकली.

महाबोधी महाविहारावर लक्ष ठेवण्यासाठी त्यांनी बुद्धगया येथे एक जमीन विकत घेतली. तेथे मुलामुलींसाठी शाळा आणि धर्मादाय दवाखाना सुरु केला. कोलकत्ता आणि बुद्धगया येथे आजही महाबोधी सोसायटीच्या आठ शाळा व महाविद्यालय आणि अनेक दवाखाने सुरु आहेत.

याच दरम्यान भारतामध्ये पाळी भाषेचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी अनेक शाळा महाविद्यालयांना भेटी दिल्या आणि पाळी भाषेचे महत्व विषद केले. बौद्ध धम्म आणि त्या अनुषंगाने पाली भाषेच्या प्रसारासाठी त्यांनी जगभ्रमंती केली. या दौऱ्यातून त्यांनी महाबोधी महाविहार तसेच अनेक प्राचीन बौद्ध स्थळांच्या स्थिती बद्दल लोकांना सांगितले आणि त्यांना मदत करण्याचे व इंग्रज सरकारवर दबाव टाकण्याची विनंती केली. सरनाथ येथील भगवान बुद्धांची मुलगंधकुटी त्यांनी शोधून काढली व तेथे एक विहार बांधले. महाबोधी महाविहाराचा न्यायालयातील लढा त्यांनी चालूच ठेवला होता. न्यायालयात आपली बाजू मांडतांना त्यांनी निक्षुन सांगितले की जगाच्या पाठीवर कुठल्याही एका धर्माच्या ट्रष्टी मंडळावर दुसऱ्या धर्माचा अधिकार नाही मात्र बौद्धांच्या अतिशय पवित्र महाबोधी महाविहारावर हिंदू धर्मातील पंडे अधिकार सांगतात.

१८८२ साली अनागरिक धम्मपालांनी सुरु केलेला लढा आजही १३० वर्षानंतर चालू आहे. जेथे सिद्धार्थाला प्रचंड परिश्रमानंतर बुधत्व प्राप्त झाले आणि जेथून त्यांनी हे ज्ञान सर्व जगाच्या कल्याणासाठी प्रसार करण्याचे ठरविले ते पवित्र महाबोधी महाविहार आजही बौद्ध धम्मियांच्या ताब्यात नाही ही एक शोकांतिका आहे. बौद्ध धम्माबद्दल प्रचंड श्रद्धा असणारा एक परदेशी बौद्ध भारतात येतो आणि महाबोधी महाविहाराच्या मुक्तीसाठी, आपले घरदार, व्यवसाय सोडून सतत ४४ वर्षे, आपल्या आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत लढा देतो, त्याबद्दल जागृती निर्माण करतो, पाली भाषेच्या प्रसारासाठी भारतभर फिरतो, हे खरंच आदरणीय कार्यें होय. अशा या महान बौद्ध धम्म प्रसारकास त्यांच्या १५८ व्या जयंतीनिमित्त आदरांजली. २९ एप्रिल १९३३ मधे व्याच्या ६९ व्या वर्षी अनागरिक धम्मपालांचे निधन झाले.

बौद्ध धम्म आणि पाली भाषेसाठी घेतलेले प्रचंड कष्टाची आठवण राहावी म्हणून जगभर त्यांची जयंती "विश्व पाली भाषा गौरव दिवस" म्हणून साजरी करण्यात येते.

बुद्धगया येथील महाबोधी महाविहार संपूर्णपणे बौद्धांच्या ताब्यात आले तरच खऱ्या अर्थाने बौद्धांच्या अस्मिता जपली जाईल आणि अनागरिक धम्मपालांना आदरांजली अर्पण होईल.

अतुल भोसेकर ९५४५२७७४१०.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

💎☸☸☸ पेरियार ई. व्ही. रामासामी नायकर जयंती. ☸☸☸💎

जन्म : १७ सितम्बर १८७९ इरोड, मद्रास प्रेजिडेंसी, ब्रिटिश भारत (अब इरोड जिला, तमिलनाडु, भारत.)

मृत्यु : २४ दिसम्बर १९७३ (उम्र ९४) वेलोर, तमिलनाडु, भारत.

अन्य नाम : ई. वी. आर पेरियार, वैकम वीरारी,

व्यवसाय : सामाजिक कारकुन, राजनेता, सुधारक

राजनैतिक पार्टी : भारतीय राष्ट्रीय कांग्रेस जस्टिस पार्टी संस्थापक द्रविदर कड़गम

जीवनसाथी : नगममाई (निधन १९३३), मनिअमाई (१९४८–१९७३)

बचपन

इनका जन्म १७ सितम्बर १८७९ को पश्चिमी तमिलनाडु के इरोड में एक सम्पन्न, परम्परावादी हिन्दू धर्म की बलीजा जाति में हुआ था। १८८५ में उन्होंने एक स्थानीय प्राथमिक विद्यालय में दाखिला लिया। पर कोई पाँच साल से कम की औपचारिक शिक्षा मिलने के बाद ही उन्हें अपने पिता के व्यवसाय से जुड़ना पड़ा। उनके घर पर भजन तथा उपदेशों का सिलसिला चलता ही रहता था। बचपन से ही वे इन उपदशों में कही बातों की प्रामाणिकता पर सवाल उठाते रहते थे। हिन्दू महाकाव्यों तथा पुराणों में कही बातों की परस्पर विरोधी तथा बाल विवाह, देवदासी प्रथा, विधवा पुनर्विवाह के विरुद्ध अवधारणा, स्त्रियों तथा दलितों के शोषण के पूर्ण विरोधी थे। उन्होंने हिन्दू वर्ण व्यवस्था का भी बहिष्कार किया। १९ वर्ष की उम्र में उनकी शादी नगम्मल नाम की १३ वर्षीया स्त्री से हुई। उन्होंने अपना पत्नी को भी अपने विचारों से ओत प्रोत किया।

काशी यात्रा और परिणाम

१९०४ में पेरियार ने एक ब्राह्मण, जिसका कि उनके पिता बहुत आदर करते थे, के भाई को गिरफ़्तार किया जा सके, इस हेतु न्यायालय के अधिकारियों की मदद की। इसके लिए उनके पिता ने उन्हें लोगों के सामने पीटा। इसके कारण कुछ दिनों के लिए पेरियार को घर छोड़ना पड़ा। पेरियार काशी चले गए। वहां नि:शुल्क भोज में जाने की इच्छा होने के बाद उन्हें पता चला कि यह सिर्फ ब्राह्मणों के लिए था। ब्राह्मण नहीं होने के कारण उन्हे इस बात का बहुत दुःख हुआ और उन्होने हिन्दुत्व के विरोध की ठान ली। इसके लिए उन्होने किसी और धर्म को नहीं स्वीकारा और वे हमेशा नास्तिक रहे। इसके बाद उन्होने एक मन्दिर के न्यासी का पदभार संभाला तथा जल्द ही वे अपने शहर के नगरपालिका के प्रमुख बन गए। चक्रवर्ती राजगोपालाचारी के अनुरोध पर १९१९ में उन्होने कांग्रेस की सदस्यता ली। इसके कुछ दिनों के भीतर ही वे तमिलनाडु इकाई के प्रमुख भी बन गए। केरल के कांग्रेस नेताओं के निवेदन पर उन्होने वाईकॉम आन्दोलन का नेतृत्व भी स्वीकार किया जो मन्दिरों कि ओर जाने वाली सड़कों पर दलितों के चलने की मनाही को हटाने के लिए संघर्षरत था। उनकी पत्नी तथा दोस्तों ने भी इस आंदोलन में उनका साथ दिया।

कांग्रेस का परित्याग

युवाओं के लिए कांग्रेस द्वारा संचालित प्रशिक्षण शिविर में एक ब्राह्मण प्रशिक्षक द्वारा गैर-ब्राह्मण छात्रों के प्रति भेदभाव बरतते देख उनके मन में कांग्रेस के प्रति विरक्ति आ गई। उन्होने कांग्रेस के नेताओं के समक्ष दलितों तथा पीड़ितों के लिए आरक्षण का प्रस्ताव भा रखा जिसे मंजूरी नहीं मिल सकी। अंततः उन्होने कांग्रेस छोड़ दिया। दलितों के समर्थन में १९२५ में उन्होने एक आंदोलन भी चलाया। सोवियत रूस के दौरे पर जाने पर उन्हें साम्यवाद की सफलता ने बहुत प्रभावित किया। वापस आकर उन्होने आर्थिक नीति को साम्यवादी बनाने की घोषणा की। पर बाद में अपना विचार बदल लिया।

फिर इन्होने जस्टिस पार्टी, जिसकी स्थापना कुछ गैर ब्राह्मणों ने की थी, का नेतृत्व संभाला। १९४४ में जस्टिस पार्टी का नाम बदलकर द्रविदर कड़गम कर दिया गया। १९४० के दशक तक, ई वी रामासामी ने एक अलग पाकिस्तान के लिए मुस्लिम लीग के दावे का समर्थन किया, और बदले में इसके समर्थन की अपेक्षा की। मुस्लिम लीग के मुख्य नेता जिन्ना ने मद्रास के गवर्नर के साथ एक साक्षात्कार में कहा कि भारत को चार क्षेत्रों में विभाजित किया जाना चाहिए: द्रविड़स्तान, हिंदुस्तान, बंगिस्तान >और पाकिस्तान; द्रविड़स्तान लगभग मद्रास प्रेसीडेंसी क्षेत्र के अंतर्गत आता है। जिन्ना ने कहा, "मेरे पास हर सहानुभूति है और सभी मदद करने के लिए करेंगे और आप द्रविड़स्तान की स्थापना करेंगे जहां ७ प्रतिशत मुस्लिम आबादी अपनी दोस्ती का हाथ बढ़ाएगी और आपके साथ सुरक्षा, न्याय और निष्पक्षता की तर्ज पर रहेगी।

स्वतंत्रता के बाद उन्होने अपने से कोई २० साल छोटी स्त्री से शादी की जिससे उनके समर्थकों में दरार आ गई और इसके फलस्वरूप डी एम के (द्रविड़ मुनेत्र कळगम) पार्टी का उदय हुआ। १९३७ में राजाजी द्वारा तमिलनाडु में आरोपित हिन्दी के अनिवार्य शिक्षण का उन्होने घोर विरोध किया और बहुत लोकप्रिय हुए। उन्होंने अपने को सत्ता की राजनीति से अलग रखा तथा आजीवन दलितों तथा स्त्रियों की दशा सुधारने के लिए प्रयास किया।

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🌿🌿🌿💎 केशव सीताराम ठाकरे (प्रबोधनकार ठाकरे) 💎🌿🌿🌿☸☸

(जन्म :– १७ सप्टेंबर १८८५; मृत्यू :– २० नोव्हेंबर १९७३)

केशव सीताराम ठाकरे ऊर्फ प्रबोधनकार ठाकरे (जन्म :– १७ सप्टेंबर १८८५; मृत्यू :– २० नोव्हेंबर १९७३) हे मराठी पत्रकार, समाजसुधारक, वक्ते, संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे पुढारी होते. शिवसेनेचे संस्थापक बाळ ठाकरे हे केशव सीताराम ठाकरे यांचे पुत्र आहेत.

रायगड जिल्ह्यातील पनवेल येथे जन्मलेल्या केशव ठाकरे यांचे महात्मा फुले हे आदर्श होते. महात्मा फुलेंच्या क्रांतिकारी साहित्याचा अभ्यास केल्यानंतर समाजसुधारणांबाबतच्या त्यांच्या संकल्पना अधिक स्पष्ट झाल्या. म्हणूनच महात्मा फुले यांचा पुण्यातील कट्टर सनातन्यांकडून छळ झाल्यानंतरच्या काळात त्यांचा लढा पुढे

चालविण्यासाठीच प्रबोधनकार पुण्यात स्थायिक झाले. या कार्यात त्यांच्या विरोधकांनी आणलेले अडथळे पार करत त्यांनी साऱ्यांची दाणादाण उडवून दिली.

सामाजिक सुधारणा हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय होते. त्यांनी ध्येयप्राप्तीसाठी कधीच कोणतीही तडजोड केली नाही. मग भले बालविवाह व विधवांच्या केशवपनाची अभद्र रूढी असो, देवळांमधील ब्राह्मण पुजाऱ्यांची अरेरावी, हुकूमशाही असो, अस्पृश्यतेचा प्रश्न असो किंवा हुंडाप्रथेचा प्रश्न असो; ते या सर्व आघाड्यांवर अखेरपर्यंत त्वेषाने लढत राहिले. त्यांच्या लढ्यापासून, तत्त्वांपासून त्यांना परावृत्त करण्याचा अनेकांनी प्रयत्न केला, अनेक आमिषे दाखविली पण प्रबोधनकारांनी कशालाही दाद दिली नाही. अन्याय्य रूढी, जाति–व्यवस्था आणि अस्पृश्यता दूर करण्यासाठी वक्तृत्व, लेखन व प्रत्यक्ष कृती ही तीन शस्त्रे वापरून त्यांनी पुराणमतवाद्यांशी लढा दिला.

समाजातील सर्व विकारांचे मर्म ब्राह्मणी कर्मकांडांत आहे असे त्यांचे मत होते. धार्मिक पूजेचे विधी, उपासतापास, व्रतवैकल्ये आणि धर्म या नावाखाली सर्व जातींमध्ये जे रूढ परिपाठ आहेत, ते सर्व परिपाठ ब्राह्मणांनी आपल्या स्वतःच्या फायद्यासाठी प्रस्थापित केले आहेत. या दुष्ट रूढींमुळेच स्त्रियांवर अन्याय होतो. विशेष अधिकारांपासून वंचित अशा बहुजन समाजावर अन्याय होतो. सारांश सर्व अशिक्षित जनता या रूढींखाली भरडली जाते असे वाटल्याने त्यांनी या सर्व घटकांच्या मुळावर, म्हणजेच ब्राह्मणशाहीवर घाला घातला. पुरोगामी, उदारमतवादी, सुधारक विचारांच्या ब्राह्मणांविषयी त्यांच्या मनात द्वेषभावना नव्हती. पण धंदेवाईक भट–भिक्षुकशाही व्यवस्थेचे ते टीकाकार होते. संत एकनाथांच्या जीवनावरील 'खरा ब्राह्मण' या नाटकाच्या माध्यमातून त्यांनी खऱ्या ब्राह्मणांची भूमिका मांडली.

त्यांच्या कार्यख्यातीमुळे ते राजर्षी शाहू महाराजांच्या संपर्कात आले. शाहू महाराज हे स्वतः सुधारणावादी व महात्मा फुलेंच्या सत्यशोधक चळवळीचे पुरस्कर्ते होते. त्यामुळे ते प्रबोधनकारांचे चाहते झाले. त्यांनी प्रबोधनकारांची परीक्षाही घेतली व नंतर जाहीरपणे सांगितले की, लाच देऊन ज्याला वश करता येणार नाही किंवा विकत घेता येणार नाही अशी एकच व्यक्ती मी पाहिली आहे, ती म्हणजे प्रबोधनकार होय.

मुंबईत स्थायिक झाल्यानंतर त्यांनी हुंडाप्रतिबंधक चळवळ हाती घेतली. सर्व जातींची हुंडाप्रतिबंधक स्वयंसेवक सेना स्थापन करून अनेक वरपित्यांना त्यांनी घेतलेल्या हुंड्याच्या रकमा परत देण्यास भाग पाडले. त्या काळी विवाहाआधी प्रेम करणे हा गुन्हा, व्यभिचार समजला जाई. अशा काळात त्यांनी अनेक प्रेमी युगुलांचे विवाह लावून दिले. आजच्या काळात हे संदर्भ वाचताना आपणास या गोष्टी सहज वाटतात, या समस्यांची तीव्रता आपल्या लक्षात येत नाही. त्या काळच्या कर्मठ वातावरणात समाजसुधारणांचा केवळ उच्चार करणेही अवघड होते. आजही हुंड्याविरोधात अनेक कायदे आहेत, पण हुंडा घेण्याच्या प्रवृत्तीचा समूळ नाश झालेला नाही. स्त्रियांवर अत्याचार होतच आहेत. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात या समस्येची काय तीव्रता असेल याची केवळ कल्पनाच केलेली बरी! यावरून प्रबोधनकारांचे द्रष्टेपण सिद्ध होते.

प्रबोधनकार हे लेखक, पत्रकार व इतिहास संशोधकही होते. त्यांनी सारथी, लोकहितवादी व प्रबोधन या नियतकालिकांच्या माध्यमातून आधुनिक विचारांचा प्रसार केला. कोदंडाचा टणत्कार, भिक्षुकशाहीचे बंड, देवांचा धर्म की धर्माची देवळे, ग्रामधान्याचा इतिहास, कुमारिकांचे शाप, वक्तृत्वशास्त्र इत्यादी ग्रंथासह समर्थ रामदास, संत गाडगे महाराज, रंगो बापूजी, पंडिता रमाबाई, माझी जीवनगाथा (आत्मचरित्र) ही चरित्रे – अशा साहित्यसंपदेची त्यांनी निर्मिती केली. त्यांची 'खरा ब्राह्मण' आणि 'टाकलेले पोर' ही दोन्ही नाटके समाजसुधारणांसाठी क्रांतिकारकच ठरली. खरा ब्राम्हण या नाटकाच्या प्रयोगाला परवानगी देऊ नये अशी मागणी पुण्यातील ब्राम्हणांनी न्यायालयाकडे केली असता, न्यायाधीशांनी प्रबोधनकारांच्या बाजूने निकाल दिला होता.

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ हा त्यांच्या जीवनातील सर्वांत महत्त्वाचा लढा होता. या वेळी त्यांचे वयही बरेच झाले होते. अशा प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी या चळवळीला नेतृत्व दिले, काही काळ कारावासही भोगला. या चळवळीतील त्यांच्या योगदानाची बरोबरी फक्त प्रल्हाद केशव अत्रे आणि कॉम्रेड डांगे यांच्याशीच करता येईल. या चळवळीत त्यांनी वेगवेगळ्या विचारांच्या व्यक्ती आणि पक्ष यांना एकत्र बांधून ठेवण्यात यश मिळवले. ते कुशल संघटकही होते.

वृत्तपत्र क्षेत्रात आगमन

तत्त्वविवेचक या छापखान्यात इ. स. १९०८ च्या सुमारास असिस्टंट शास्त्री अर्थात मुद्रितशोधक या नात्याने ठाकरे यांचा वृत्तपत्राशी प्रथम संबंध आला. तेथे लक्ष्मण नारायण जोशी हेडशास्त्री होते. त्या काळात रोज निघणाऱ्या आणि सरकारी दडपशाहीने लगेच गायब होणाऱ्या हंगामी वृत्तपत्रांचे ते छुप्या रीतीने लेखन करत. अशा छुप्या लेखनाची दीक्षा त्यांनीच ठाकरे यांना दिली. त्याआधी विद्यार्थी असताना ठाकरे यांनी विद्यार्थी हे मासिक चालवण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर, दोन–तीन साप्ताहिके, विविध वृत्त व इंदुप्रकाश पत्रात ते लेखन करत असत. ठाण्याच्या जगत्समाचार साठीही ते लेख लिहित असत. जलशांच्या निमित्ताने ठाकरे जळगावला गेले. तेथे काव्यरत्नावलीकार नारायण नरसिंह फडणीस यांच्याशी त्यांचा परिचय झाला. ठाकरे यांनी तेथे सारथी हे मासिक सुरू केले. पत्रव्यवसायातील आपल्या या आगमनाचे श्रेय ठाकरे फडणिसांनाच देतात.

प्रबोधन

प्रबोधन पाक्षिक काढण्यापूर्वी ठाकरे यांच्या सार्वजनिक कार्यांची चर्चा सर्वत्र झाली होती. सामाजिक अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचा ठाकरे यांचा निर्णय अभ्यासपूर्ण होता. इतिहाससंशोधक वि. का. राजवाडे यांनी कायस्थ प्रभूंबाबत काही विधाने केली होती. त्यावर कोदण्डाचा टणत्कार (१९१८) हा ग्रंथ लिहून त्यांनी राजवाडे यांची विधाने ऐतिहासिक पुरावे देऊन खोडून काढली होती. या प्रकरणी जागृतीसाठी महाराष्ट्रभर ठाकरे यांनी दौराही केला होता. ब्राम्हणेतर चळवळीकडेही ते त्यानंतर वळले. चळवळी, प्रचार करायचा, इतरांच्या प्रचाराला उत्तर द्यायचे, तर हाती वृत्तपत्रासारखे साधन हवे. या जाणिवेतून वृत्तपत्र सुरू करण्याचा निर्णय ठाकरे यांनी घेतला. त्यावेळी ते सरकारच्या सार्वजनिक बांधकाम खात्यात नोकरी करत होते. सरकारी नोकरांना वृत्तपत्र चालविण्यास बंदी होती. पण ठाकरे यांनी तशी परवानगी मिळवली. त्यानंतर १६ ऑक्टोबर १९२१ रोजी केशव सीताराम ठाकरे यांच्या प्रबोधन पत्राचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. पत्र पाक्षिक होते. पत्राच्या नावाबरोबरच उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत असे संस्कृत वचन होते. त्याबरोबरच सामाजिक, धार्मिक आणि नैतिक गोष्टींना हे पत्र वाहिले असल्याचा उल्लेखही इंग्रजीत होता.

अधिक मूलभूत सुधारणा म्हणून सामाजिक सुधारणांना प्रबोधनने प्राधान्य दिले. प्रि. गो. चि. भाटे, गोपाळराव देवधर, गो. म. चिपळूणकर, भाऊराव पाटील आदींनी या पत्राला पाठिंबा दिला. त्यापैकी अनेकांचे लेखही पत्रात प्रसिद्ध होत.

या प्रबोधन मासिकामुळे के. सी. ठाकरे यांना प्रबोधनकार ठाकरे म्हणून ओळखले जाऊ लागले.

क्षात्रजगद्गुरूंचे पीठ शाहू महाराजांनी निर्माण केले. त्यावेळी ठाकरे यांनी मानसिक दास्याविरुद्ध बंड (१९९२) असा टीकात्मक लेख लिहिला. रोखठोक भाषेत लिहिणे, हे ठाकरे यांचे वैशिष्ट्य होते. त्यांचे विचार आजच्या काळालाही लागू पडतील असे आहेत. त्याच लेखात ते म्हणतात, मठ आला, की मठाधिपती आले, की संपद्राय सुरू झाला,

संप्रदायाच्या मागोमाग सांप्रदायिक गुलामगिरी ठेवलेलीच.

परप्रातीयांना विरोध

मुंबईत परप्रांतीय, विशेषत दाक्षिणात्य मंडळी मोठ्या संख्येने येऊ लागली. त्यामुळे मराठी माणसांची गैरसोय होऊ लागली. त्याला प्रबोधनने १९२२ मध्ये सर्वप्रथम तोंड फोडले. तसेच, पत्राच्या पहिल्या अंकापासूनच कवी वसंतविहार यांच्या समाजहितवादी कविता त्यात प्रसिद्ध होत असत. प्रबोधनचा अल्पावधीतच संपूर्ण महाराष्ट्रात प्रसार झाला. १९२३ मध्ये मुंबईत बसलेले बस्तान मोडून प्रबोधन साताऱ्यात स्थलांतरित झाले. तेथील काही कटु घटनानंतर ठाकरे पुण्यात आले. तेथे ब्राह्मण–ब्राह्मणेत्तर वादात तेही पडले. काही ब्राह्मण मंडळींनी डिवचल्यामुळे पुण्यात छापखाना उभारून ठाकरे यांनी प्रबोधन मासिक स्वरूपात आणि लोकहितवादी हे साप्ताहिक सुरू केले. साहजिकच, पुण्यातल्या वादात ठाकरेही उतरले. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याच्या प्रकरणात ठाकरे यांनी परखडपणे पुतळाविरोधकांचा समाचार घेतला. पण अखेर कंटाळून त्यांनी पुणे सोडले. मासिक व साप्ताहिकही १९२६ मध्ये बंद पडले. ते मुंबईला परतले. त्यानंतर त्यांनी स्वतः वर्तमानपत्र काढले नाही. पण अनेक वृत्तपत्रांत ते वेळोवेळी लिहीत राहिले.

साहित्य संमेलन

प्रबोधनकार ठाकरे विचार साहित्य संमेलन नावाचे एक संमेलन पुण्यात २३–२४ मार्च २०१३ रोजी झाले. संमेलनाध्यक्ष संपत जाधव होते. या संमेलनात उत्तम बंडू तुपे यांना साहित्यगौरव हा आणि मोहन अडसूळ यांना कलागौरव हा पुरस्कार देण्यात आला. या प्रकारचे २रे संमेलन २३–२–२०१४ ला पुणे शहरात झाले. साहित्यिक रा.रं. बोराडे अध्यक्षस्थानी होते.

समग्र वाङ्मय

प्रबोधनकार ठाकरे समग्र वाङ्मय (6 खंड) -प्रकाशक : महाराष्ट्र सरकार. संपादक : पंढरीनाथ सावंत

साहित्यकृती प्रकार

ऊठ मऱ्हाठ्या ऊठ	लेखसंग्रह

कुमारिकांचे शाप	वैचारिक

कोदंडाचा टणत्कार	इतिहास संशोधन

खरा ब्राह्मण	नाटक

ग्रामण्याचा साद्यंत इतिहास इतिहास संशोधन

जुन्या आठवणी	ललित

टाकलेले पोर	नाटक

दगलबाज	वैचारिक

देवळाचा धर्म आणि धर्माची देवळे	वैचारिक

देवांची परिषद	वैचारिक

प्रतापसिंह छत्रपती आणि रंगो बापूजी	इतिहास संशोधन

भिक्षुकशाहीचे बंड	इतिहास संशोधन

माझी जीवनगाथा	आत्मचरित्र

रंगो बापूजी	चरित्र

पं. रमाबाई सरस्वती	चरित्र

वक्तृत्वशास्त्र	माहितीपर

संगीत विधिनिषेध	नाटक

शनिमाहात्म्य	वैचारिक

शेतकऱ्यांचे स्वराज्य	वैचारिक

श्री. संत गाडगेबाबा चरित्र

संगीत सीताशुद्धी नाटक

लाईफ अँड मिशन ऑफ रामदास ग्रंथ

हिंदू जनांचा ऱ्हास आणि अधःपात अनुवाद

पुरस्कार

प्रबोधनकार ठाकरे यांच्या नावाने अनेक पुरस्कार दिले जातात, त्यांपैकी काही हे –

मारवाडी फाऊंडेशनचा प्रबोधनकार ठाकरे समाज प्रबोधन पुरस्कार –

हा पुरस्कार मिळालेल्या काही व्यक्ती – डॉ. आ. ह. साळुंखे (२०११), गिरीश कुबेर (२०१७), पन्नालाल सुराणा (२००९), बाबा आढाव (२०१०), भा. ल. भोळे, शरद जोशी (२०१४), सदानंद मोरे (२०१५).

☸☸🦚🦚🦚💎 🔹 यशवंत भीमराव आंबेडकर 🔹 💎🦚🦚🦚☸☸

🔸 यशवंत उर्फ भैय्यासाहेब (जन्म : १२ डिसेंबर इ. स. १९१२ – मृत्यू १७ सप्टेंबर इ. स. १९७७) 🔸

संघटना : भारतीय बौद्ध महासभा (द्वितीय अध्यक्ष)

प्रमुख स्मारक : चैत्यभूमी.

वडील : डॉ. बाबासाहेब आंबेडकर आई रमाई भीमराव आंबेडकर.

पत्नी : मीराबाई यशवंत आंबेडकर.

अपत्ये : प्रकाश आंबेडकर, रमाबाई तेलतुंबडे, आनंदराज आंबेडकर, भीमराव आंबेडकर.

*यशवंत (भैय्यासाहेब) यांचा अल्प परिचय*

यशवंतरावांना लहानपणापासूनच न्यूमॅनेटिक आणि पायाच्या पोलियोसारख्या आजाराने ग्रासले होते. गावठी औषधांच्या उपचाराने त्यांना बरे करण्यात आले. त्यांचे शिक्षण मॅट्रिकपर्यंतच झाले. त्यांचे लग्न (विवाह) १९ एप्रिल १९५३ रोजी मीराबाई सोबत झाले. भय्यासाहेबांनी कधीही बाबासाहेबांच्या नावाचा फायदा घेतला नाही. त्यांनी स्वत:चे आयुष्य स्वत:च घडविले, त्यांनी सिमेंटचा कारखाना काढला. त्यानंतर मुंबई विमानतळाच्या परिसरात बांधकाम करणे हा नवीन उद्योग सुरु केला आणि त्यात त्यांनी कोणालाच वाटेकरी घेतले नाही. हा व्यवसाय सुरळीतपणे चालला होता.

यशवंतरावांनी नंतर बाबासाहेबांच्या चळवळीत भाग घेण्यास सुरुवात केली. त्यांनी भारतभूषण प्रिंटिंग प्रेस हा छापखाना सुरू केला. पुढे ह्या प्रेसचे बुद्धभूषण प्रिटिंग प्रेस असे नाव झाले. १९४४ पासून बाबासाहेबांच्या 'जनता', 'प्रबुद्ध भारत' या मुखपत्रांचे व्यवस्थापन तेच पाहत होते. बुद्धभूषण प्रिंटिंग प्रेसमध्ये बाबासाहेबांचा Thoughts on Pakistan हा इंग्रजी ग्रंथ भय्यासाहेबांनीच छापला. बाबासाहेबांनी हा ग्रंथ भय्यासाहेब व मुकुंदराव यांना अर्पण केलेला आहे. बाबासाहेबांचे Federation versus Freedom आणि Thoughts on Linguistic States हे ग्रंथही भैय्यासाहेबांनी छापले. त्यानंतर बाबासाहेबांच्या आदेशानुसार आणि भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने त्यांनी वा. गो. आपटेलिखित 'बौद्धपर्व' हा ग्रंथही आपल्या छापखान्यात छापून प्रसिद्ध केला.

भैय्यासाहेबांचे लिखाण तर्कशुद्ध आणि विचारगर्भ असे. त्यांच्या लिखाणातील व भाषणातील विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे म्हणी आणि वाक्यप्रचार यांचा मोठया प्रमाणावर वापर.

भैय्यासाहेबांनी बाबासाहेबांची अनेक स्मारके उभारली. १ ले स्मारक त्यांनी मुंबई येथे बांधले. या डॉ. आंबेडकर सभागृहाचे भूमिपूजन दि. २–४–१९५८ ला व उद्घाटन २२–६–१९५८ ला झाले. मुंबई नागरिकांच्या वतीने कफ परेड येथे बाबासाहेबांचा पुतळा बसविण्याचे ठरले. भैय्यायासाहेबांनी आग्रह धरला की २६ जानेवारी १९६२ रोजीच पुतळ्याचे अनावरण झाले पाहिजे. म्हणून शेवटच्या क्षणी कमी पडत असलेली रक्कम महापौरांना दिली व ठरल्याप्रमाणे २६ जानेवारी १९६२ रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल प्रकाश यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण झाले. चवदार तळे क्रांतीचे स्मारक म्हणून जेथे मनुस्मृतीचे दहन करण्यात आले. त्या जागेवर अशोक स्तंभाच्या धर्तीवर क्रांतिस्तंभ उभारण्यासाठीही यशवंतरावांनी पुढाकार घेतला. चैत्यभूमीच्या रूपाने बाबासाहेबांचे स्मारक व्हावे म्हणून भारतीय बौद्ध महासभेने दि. २०–३–१९५७ रोजी BMS(?) कडे ४० बाय ४० ची जागा मागितली BMS ने ८ बाय ८ ची जागा मंजूर केली. परंतु मागणीपेक्षा एक इंचही कमी जागा घेणार नाही असा पवित्रा भैय्यासाहेबांनी घेतला. अखेर BMS improvement committee ने ४० बाय ४० ची जागा मान्य केली. जोपर्यंत शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन (शेकाफे) आणि भारतीय रिपब्लिकन पक्ष (RPI) हे एकसंघ होते तोपर्यंत या स्मारकांना गती येत होती. जनताही आपला पै पैसा देत होती. जनता स्टेट बँकेसमोर रांगा लावून पैसे भरत होती. स्टेट बँकेत भरणा करावा म्हणून भय्यासाहेब कुलाबा ते दहिसर व कल्याण पर्यंत फिरफिर फिरले १९६६ साली डॉ. बाबासाहेबांचा ७५ वा वाढदिवस येत असल्यामुळे हा जन्मदिवस 'अमृत महोत्सव' म्हणून भव्य प्रमाणात साजरा करण्याचे भय्यासाहेबांनी ठरविले. या अमृत महोत्सव प्रसंगी डॉ. बाबासाहेबांचे जीवन कार्याचे प्रतीक म्हणून एक 'भीमज्योत' महूहून मुंबईला आणण्याचे ठरविले.

२७–३–१९६६ रोजी ही भीम–ज्योत भारताचे तत्कालीन मजूर मंत्री जगजीवनराम यांच्या हस्ते प्रज्वलित करण्यात आली. ह्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार दादासाहेब गायकवाड होते. भीम–ज्योत महूहून इंदूर, भोपाळ, हुशंगाबाद, बैतूल, नागपूर, पुलगाव, औरंगाबाद, येवला, नाशिक, हरेगावनगर(?), संगमनेर, देहूरोड, पुणे, सातारा,

वणी(?), पाचगणी, महाबळेश्वर, खेड, मंडणगड, दापोली, महाड, पेण, पनवेल, कल्याण, ठाणे, मुलुंड, राजगृहवरून दादरच्या चैत्यभूमीला आली. ह्या भीमज्योतीदरम्यान मिळालेल्या धम्मदानातून चैत्यभूमी स्मारक उभारण्यात आले.

🔹 _*संदेश कार्य : धम्म कार्यसंपादन करा*_

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर भय्यासाहेब भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष झाले. 'भारत बौद्धमय करीन' हा बाबासाहेबांचा संकल्प उराशी घेऊन भय्यासाहेबांनी काम सुरु केले. त्यांनी धम्मदीक्षेचे अनेक कार्यक्रम घेतले, धम्म परिषदा भरविल्या, धम्म मेळावे सर्वत्र होत होते. प्रचार सर्वत्र जोरात सुरू केला भय्यासाहेब आमदार असतांना त्यांनी विधानपरिषदेत नवबौद्धांच्या हक्कांबद्दल हिरीरीने बाजू मांडली तसेच या नवीन बौद्धांच्या सवलतीविषयी ते पंतप्रधान मोरारजी देसाईंना भेटले होते. भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी श्रीलंका, थायलंड, म्यानमार, सारनाथ व दिल्ली येथे झालेल्या जागतिक बौद्ध परिषदांमध्ये भारतीय बौद्धांच्या समस्या मांडल्या. खेड्यापाड्यातील बौद्ध विहारांचे उद्‌घाटन केले. १९६८ साली मुंबई येथे धम्म परिषद भरविण्यात आली व प्रमुख पाहुणे म्हणून दलाई लामा यांना बोलविण्यात आले.

ह्या धम्म परिषदेमध्ये अनेक महत्त्वाचे ठराव पारित करण्यात आले. त्यात संस्कार विषयक आचार संहिता सर्वानुमते मान्य करण्यात आली. 'बौद्ध जीवन संस्कार पाठ' या नावाचे पुस्तक तयार करण्यात आले. धम्म प्रसार कार्याचा एक भाग म्हणून १९६७ मध्ये ११ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनी भय्यासाहेबांनी स्वतः श्रामणेरची दीक्षा घेतली व त्या काळावधीत ते चैत्यभूमीतच राहत होते. त्यांचे नाव 'महापंडित काश्यप' असे ठेवण्यात आले होते. १९५९ मध्ये महास्थविर संघरक्षित लंडनहून आले होते. त्यांनी भय्यासाहेबांची भेट घेतली होती. महापुरुषाच्या पोटी जन्म घेऊन स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी किती कठोर परिस्थितीचा सामना करावा लागतो याचा प्रत्यय भैय्यासाहेब आंबेडकरांना निश्चितच आला होता. नव्हे संपूर्ण आयुष्यात ते ओझे घेऊन जगावे लागले असावे. जगाने ज्या महानावाच्या क्रांतीचा, विचारांचा आणि बुद्धीचा गौरव केला ते महामानव व्यक्तिमत्त्वाच्या पडताळणीचा आधार बनत असेल. अश्या परिस्थितीत स्वतंत्र व्यक्तिमत्त्व कसे उभारायचे याचे दडपण निश्चितच भैय्यासाहेबांना होते. मोठ्या वृक्षाखाली पालव्या कोमेजून जातात तशीच परिस्थिती भैय्यासाहेबांवर ओढवली असेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वारस म्हणून किती दडपणाचा सामना भैय्यासाहेबांना करावा लागला. याचा विचार करून भैय्यासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वाकडे बघितले गेले नाही.

🔹 डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आदर्श व्यक्तिमत्त्व होते.

सामाजिक जाणीवेने त्यांच्या व्यक्तिमत्त्वात निर्माण केलेला वैचारिक हिमालय सामाजिक विषमता आणि अन्यायावर तुटून पडताना सहजच त्यांच्या स्वभावात काही वैशिष्ट्ये निर्माण होत गेली. त्यांचा स्वभाव तापट होता. पण तितकाच तो मृदूही होता. निश्चितच बाबासाहेबांना आपल्या मुलाकडूनही काही अपेक्षा होत्या. त्या लादलेल्या नसल्या तरी व्यावहारिकतेच्या परिप्रेक्षात परीस्थितिजन्य बदलाच्या होत्या. या अपेक्षांच्या दडपणामुळे बाबासाहेबांच्या तापटपणाचा सामना भैय्यासाहेबांना करावा लागला असेल हे निश्चितच. त्यामुळे भैय्यासाहेबांच्या व्यक्तीमत्त्वावर त्याचाही प्रभाव जाणवायचा. भैय्यासाहेब कधीही प्रखर नव्हते. भैय्यासाहेबांचा स्वभाव शांत होता. शिवाय शारीरिक व्याधीमुळेसुद्धा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव टाकला होता. संधिवाताचा सामना करतांना सोसावे लागलेले दुःख त्यांनी कधी सामाजिक जीवनात उतरू दिले नाही. परंतु काही समाजकंटकांनी त्यांच्या या आजाराचे भांडवल करून भैय्यासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाला बदनाम करण्याचा प्रयत्न केला.

🔹 हजारो शोषित–पिडीत–मागास वर्गाच्या उत्थानासाठी जगतांना बाबासाहेबांनी कधी मुलांच्या आजाराकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे बाबासाहेबांनी समाजासाठी दिलेल्या या बलिदानाचे बळी त्यांची इतर मुलेही ठरली. भैय्यासाहेब हे बाबासाहेबांचे एकमेव वारस होते जे जगले. हे दडपण पेलून धरतांना भैय्यासाहेबांनी एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व निर्माण केले. कदाचित ते असामान्य नसेलही परंतु शांत, चिंतनशील, सहनशील, वैचारिक असे गुणवैशिष्ट्य त्यांच्या व्यक्तिमत्त्वात निश्चितच होते. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पडतांना त्यांच्या शांत व्यक्तिमत्त्वाचा निश्चितच लाभ झाला. ज्यामुळे भारतीय बौद्ध महासभेचा त्यांच्या कार्यकाळात अनेक राज्यांमध्ये व्याप वाढू लागला. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर भैय्यासाहेब आंबेडकरांनी यासाठी कधी हट्ट धरला नाही. किंवा कुठलेही पद घेतले नाही. बाबासाहेबांचा राजकीय वारस म्हणून स्वतःला कधी समोर केले नाही. सदैव इतरांना पुढे करून त्यांना समर्थन देऊन स्वतः मात्र आयुष्यभर धम्माचे काम करीत राहिले. धम्म कार्यात स्वतःला वाहून घेतले. आजच्या आधुनिक पिढीला आणि जे स्वतःला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी म्हणवून घेतात त्यांच्यासाठी भैय्यासाहेबांचे व्यक्तिमत्व आदर्श ठरावे असेच होते.

🔹 भैय्यासाहेबांनी राजकीय स्वार्थाचा त्याग केला. धम्मकार्य केले तरीही काहींनी त्यांना बदनाम करण्याचे सोडले नाही. आज भारतात बौद्धांची संख्या वाढलेली आहे. ती भैय्यासाहेबांनी केलेल्या प्रयत्नांचाच परिपाक आहे. १९६२ ला भैय्यासाहेबांचा ५० वा वाढदिवस साजरा केला गेला होता. तेव्हा त्यांच्या सन्मानार्थ दादासाहेब गायकवाडांनी काढलेले गौरवोद्गार अतिशय बोलके आहे. दादासाहेब गायकवाड म्हणाले होते, 'भैय्यासाहेब माझ्यासारख्या आंधळ्यांची काठी आहेत.' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वारसत्व लाभलेले भैय्यासाहेब चळवळीत इतरांचे काठी बनले. चळवळीत इतरांना सहकार्य केले. चळवळीला दिशा देण्याचे काम केले. पण कधीही स्वतःचे नेतृत्व समाजावर लादले नाही. नेतृत्व संघर्षापासून सदैव स्वतःला अलिप्त ठेवले. भैय्यासाहेब हे दादासाहेब गायकवाडांच्या खांद्याला खांदा लावून सदैव त्यांच्या पाठीशी राहिले.

🔹 भैय्यासाहेब आंबेडकर हे बाबासाहेबानंतरचे एकमेव नेते होते, जे समाजासाठी व धम्मकार्यासाठी जगले. ज्यांनी स्वतःचा स्वार्थ कधीच बघितला नाही. राजकीय लालसा कधी बाळगली नाही. सत्तेच्या मोहजाळातून अलिप्त राहिले. टीकाकारांना उत्तरे न देता शांत राहून अप्रत्यक्ष उत्तरे देत राहिले. कुणाच्याही विरुद्ध भूमिका न घेता, कुणावर टीका करीत न बसता भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून धम्माची जबाबदारी पार पाडत राहिले. भैय्यासाहेबांनी स्वतःसोबत मीराताई आंबेडकरांनाही धम्मकार्यात वाहून घेतले. इतकेच नाही तर भैय्यासाहेबांनी त्यांच्या मुलांवर केलेल्या संस्काराचाच परिणाम म्हणून आजही त्यांची मुले बाळासाहेब उर्फ प्रकाश आंबेडकर, भीमराव आंबेडकर व आनंदराज आंबेडकर स्वतःच्या कर्तृत्वाने या समाजात स्वतःचे स्थान निर्माण करीत आहेत. पण कधीही त्यांनी बाबासाहेबांचे वारस म्हणून संपूर्ण समाजाचे आम्हीच नेते असा आव आणला नाही. हा भैय्यासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या मुलांवर केलेल्या संस्काराचाच परिणाम म्हणावा लागेल. भैय्यासाहेब हे समाजासाठी, आंबेडकरी चळवळीसाठी केलेले त्यागाचे प्रतीक आहेत.

बौद्धचार्याचे जनक, चैत्यभूमीचे शिल्पकार, सुर्यपूत्र यशवंत (भैय्यासाहेब) आंबेडकर यांच्या स्मृतिदिनी १७ सप्टेंबर विनम्र अभिवादन !!!

🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏

🏵🏵🏵🏵🏵🏵🏵🏵🏵🏵🏵🏵

! जयभीम !   !! जयभारत !!   !!! नमोबुद्धाय !!!

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १८ सप्टेंबर २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, पोठ्ठपाद मासो, बुधवार, भाद्रपद माहे.

१८ सप्टेंबर १९३१ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर व मोहनदास करमचंद गांधी यांची लंडनला दुसरी भेट.

१८ सप्टेंबर १९३६ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १३ सदस्यांना अमृतसर येथे शिख धर्माचा अभ्यास करण्यासाठी पाठविले.

१८ सप्टेंबर १९३६ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी "खोती विधेयक" मुंबई विधीमंडळात सादर केले.

१८ सप्टेंबर १९४४ – रोजी एम सी राजा मेमोरियल हॉस्टेलमध्ये माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सत्कार.

१८ संप्टेंबर १९५३ – रोजी स्थावर जंगम मालमत्तेवर कर बसविणाऱ्या विधेयकावर माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राज्यसभेत भाषण.

१८ सप्टेंबर २०२४ – रोजी "भाद्रपद पौर्णिमा" (पोठ्ठपाद मासो पुंन्नमि).

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🔵🔵🔵 "भाद्रपद पौर्णिमा" (पोठ्ठपाद मासो पुंन्नमि) 🔵🔵🔵☸☸

भाद्रपद पौर्णिमेला पाली भाषेत पोठ्ठपादो मासो म्हणतात. ही पौर्णिमा साधारणतः सप्टेंबर महिन्यात येते. या पौर्णिमेला बुद्धाच्या जीवनातील काही महत्वपुर्ण घटना घडल्यात.

१. भगवंताचा प्रसेनजीत राजास उपदेश; २. वर्षावासाची तिसरी पौर्णिमा; ३. भगवान बुद्धाचे वर्षावास; ४. राजा बिबींसार यांचे 'पहिले अष्टशिल व्रत'; ५. जगातील पहिले शल्यविशारद; ६. भिक्खु संघाचे क्षुल्लक कारणावरून कलह होऊन दोन समुह; ७. "त्रिपिटीका" स्थापना.

१. भगवंताचा प्रसेनजीत राजास उपदेश :

तथागत जेतवनात असतांना राजा प्रसेनजीत त्यांच्याकडे गेला व धम्मोपदेश देण्याची हात जोडून विनंती केली. भगवंताने राजाला पुढील प्रमाणे उपदेश दिला.

१. आपली चांगली किंवा वाईट कर्मे आपल्या छायेप्रमाणे पाठलाग करीत असतात. २. मैत्रीपूर्ण हृदयाची आवश्यकता सर्वाधिक आहे. ३. आपल्या प्रजेस आपल्या एकुलत्या एक अपत्यासारखे समजावे. ४. दुसऱ्यांना खाली पाडून स्वतः वर नेण्याचा प्रयत्न करू नये. ५. दु:खी लोकांना सांत्वना द्यावी. ६. राजकीय थाटामाटाला जास्त महत्व देऊ नये. ७. खुशामती लोकांच्या गोडगोड गोष्टी ऐकू नये. ८. कायाक्लेशाने स्वतःस त्रास देऊ नये. ९. धम्म आणि सुमार्ग याचा विचार करावा. १०. अन्याय करू नये. ११. कामाग्नीचे भय सर्वांसाठी समान आहे. १२. जो एकवेळ त्या भोवऱ्यात फसेल त्याचे बाहेर निघणे कठीण आहे. १३. धम्माची अशी मागणी आहे की मार रुपी शत्रूंपासून स्वतःला सुरक्षित ठेवावे. १४. स्वतःच्या विचारांवर नजर असू द्यावी. १५. भौतिक वस्तूंच्या तुच्छतेवर खोलवर विचार करायला पाहिजे. १६. जीवनाच्या अस्थिरतेला चांगल्या प्रकारे समजून घ्यावे. १७. राजधर्म नियमांचे उल्लंघन करू नये. १८. बाह्य पदार्थांना आपल्या प्रसन्नतेचा आधार न बनविता प्रीतीयुक्त मनासच प्रसन्नतेचा आधार बनवावे म्हणचे राजाचे यश भविष्यात अमर होईल.

२. वर्षावासाची तिसरी पौर्णिमा :

वर्षावासात एकूण चार पौर्णिमा येतात. भाद्रपद पौर्णिमा ही वर्षावासात येणारी तिसरी पौर्णिमा. या वर्षावासाची सुरवातही अहिंसेच्या पुरतेखातर, करूणा व मैत्रिभावणेच्या गरजेतुन झाली. पावसाळ्याच्या दिवसात भिक्खूगण एक ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पायी चालत जातांना गवतातील कीटक त्यांच्या पायाने मारले जायचे. अशा प्रकारेही आपणावर हिंसेचे पातक नको, म्हणून वरील तीन महिन्यांच्या कालावधीपूरती भिक्खुंची भ्रमंती स्थगित करून कोणा एका ठिकाणी मुक्काम करून धम्माची शिकवण भिक्खुंनी अनुयायांना द्यावी असे वचन भगवंतांनी घातले.

३. भगवान बुद्धाचे वर्षावास :

भगवान बुद्धाने संबोधी प्राप्त केल्यानंतर धम्म–प्रचाराच्या कालावधीत ४५ वर्षे सतत पायी प्रवास करून पवित्र असा धम्म जगास दिला. भगवंतांनी आपला वर्षावास सारनाथ येथे संपन्न केला. त्यांच्या सारनाथ येथील वर्षावासांसह एकूण ४६ वर्षावास झाले.

सारनाथ – १; राजगृह – ५; वैशाली – २; मुंकुल पर्वत – २; संसुमारगिरी – २; कौशम्बी – १; परिलेयक – १; नाला – १; वैरंजा – १; चालिय पर्वत – ३; श्रावस्ती – २५; आलवी – १; कपिलवस्तु – १.

४. राजा बिबींसार यांचे 'पहिले अष्टशिल व्रत' :

वर्षावासात तथागत भिक्खू संघासोबत मगध राज्यात वास्तव्य करत असताना उतरत्या वयात मगध नरेश *राजा बिबींसार* यांनी *उच्चासन, आभूषण आणि वैभवशाली दिनचर्येचा त्याग करून* तथागतांच्या उपदेशातून प्रेरणा घेत ऐश्चिक सुखाचा त्याग करून *'पहिले अष्टशिल व्रत'* धारण केले होते.

तो दिवस म्हणजे आजचा मंगल दिन म्हणजे *"भाद्रपद पौर्णिमा"* हा होय.

५. जगातील पहिले शल्यविशारद :

'जगातील पहिले शल्यविशारद' (सर्जन) *'जिवक'* यांच्याव्दारे मगध नरेश *राजा बिबींसार* यांचा पुत्र आणि राजगृह नगरीचा *राजा अजातशत्रू* यांची तथागतांबरोबर पहिली भेट झाली, तो महत्त्वाचा दिवस म्हणजे *"भाद्रपद पौर्णिमा".*

६. भिक्खु संघाचे क्षुल्लक कारणावरून कलह होऊन दोन समुह :

महाकारुणिक तथागत सम्यक संबुद्ध भगवान बुध्दांनी कोसंबी येथे वास्तव्यास असताना भिक्खु संघाचे क्षुल्लक कारणावरून कलह होऊन दोन समुह झाले होते. अनेक वेळा समजावुनही समजत नसल्याकारणाने शेवटी भगवान बुध्दांनी त्या सर्व भिक्खुंना शिक्षा म्हणुन वर्षावासाच्या कालखंडासाठी स्वतः *परिलेय्य वनात* निघुन गेले होते. तेव्हा तथागतांच्या करुणा मैत्रीने प्रभावित झालेले हत्ती, वानर असे अनेक वन्यप्राणी जंगलात तथागतांच्या सानिध्यात मोकळे वावरत होते. तेव्हा गावांमध्ये भिक्षाटन करतांना अनेक घटनाक्रमातून अनुभव घेत भिक्खु गणांस आपले चुक लक्षात आली व वनात जाऊन तथागतांची माफी मागितली व यापुढे असे कलह न करणेबाबत वचनबद्ध होऊन परस्पर *'एकता'* कायम केली. याची नोंद *त्रिरत्न वंदना* मधील *संघ वंदनेत* राखली गेली.

#मधु_पौर्णिमा

एकदा तथागतांच्या दोन शिष्यांना कुठल्या तरी कारणाने भांडण झाली परंतु ते दोन्ही गट ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. त्या दोन्ही गटात शांतता प्रस्थापित करण्यासाठी बुध्द काहीही न बोलता परिलेय वनात निघून गेले. आख्यायिकेनुसार बुध्द #परिलेय वनात गेल्यावर तेथे असलेल्या #परियेय्यक नावाच्या वानराने त्यांना मध दान म्हणून दिले बुध्दांनी ते दान स्विकारले, ते दान स्विकारल्याने वानराला अतिशय आनंद झाला, आनंदाच्याभरात तो वानर इकडून तिकडे व तिकडून इकडे झाडावर उड्या मारु लागला यात त्या वानराचा पाय घसरुन खाली पडला, झाडा वरून खाली पडुन त्याचा जागीच मृत्यू झाला. दानामुळे त्याचा जन्म तावतींस स्वर्गात झाला.

#पलीलायक नावाचा एक हत्ती देखील त्या वानरा सोबत बुध्दांना फळे दान देते असे, काही काळाने पाऊस कमी झाल्यावर स्थानिक सामान्य लोकांनी त्या दोन भिक्खूंच्या गटावर दबाव आणला व बुध्दांना पुन्हा आणण्यासाठी एक प्रतिनिधी गट धाडण्यात आले. बुध्दांना आमंत्रण देण्यात आले बुध्दांनी त्यावेळेस प्रवचन दिले त्या प्रवचनात त्यांनी हत्ती कडे बोट दाखवत बुध्द म्हणाले, "योग्य जोडीदारा अभावी हा हत्ती एकटाच वनात एकटाच विहार करतो, ज्ञानी आणि उच्च विचारी लोकांचा सहवास मिळाला नाही, तर या जगात एकटे रहाणे कधीही चांगले. कारण मुर्खांचे सहवास कधीही दु:खच वाढवतील."

बुध्द शहरा कडे निघाले तेव्हा हत्ती पलीलायक याचे मन खुप दुखावले तो बुध्दांच्या मागे मागे जाऊन लागला वनाची सीमा जवळ आल्यावर बुध्दांना पलीलायकला सांगितले तुझी सीमा संपली पुढे मानवी सीमा सुरू झाली आहे. मानवी प्रदेशात तुझ्या सारख्या प्राण्यांना खुप धोका आहे. तु माझ्यासोबत येऊ नकोस पलीलायक हत्ती तेथेच थांबला तो बुध्दांच्या पुढे जाऊ शकला नाही. बुध्द नजरेआड होताच, दु:ख पलीलायकचे ह्रदय फुटले तिथे त्याचा मृत्यू झाला. एकच वेळेस वानर व हत्तीचा मृत्यू झाला दोघेही तावतींस स्वर्गात उत्पन्न झाले.

बोध :- एकता, दान, एकांतवास, मुर्खांची संगत न करणे दान केल्यास सुगती प्राप्त होते.

७. "त्रिपिटीका" स्थापना :

तथागतांच्या महानिर्वाणानंतर भिक्खु संघातील वर्तनावर अंकुश म्हणून राजगृह नगरीचा राजा *अजातशत्रू* यांच्या सान्निध्यात *महास्थविर भदंन्त महाकाश्यप* यांच्या अधिपत्याखाली आखलेल्या भगवान तथागतांच्या बुद्धवचनांचा संग्रह गृधकुट पर्वत, *सप्तपर्णी गुफेत* राजगृहात सुरु असतांना *पहिल्या धम्मसंगिनी* मध्ये महाकाश्यापांनी भिक्षु आनंदाला सुत्तासंबंधी प्रश्न विचारले, तेव्हा आनंदाने सर्व प्रश्नांची उत्तरे सविस्तररीत्या दिली. त्यानंतर भाद्रपद पौर्णिमेला भिक्षु विनयासंबंधी महाकाश्यापांनी भिक्षु उपाली यांना प्रश्न विचारण्यास प्रारंभ केला. या पौर्णिमेच्या दिवशी उपालींनी अतिशय उत्साहाने उत्तर देणे मान्य करून सुरुवात केली. पुढे अभिधम्मा विषयी बुद्धावचनांचा संग्रह करण्यासाठी महाकाश्यपांनी भिक्षु आनंदाला प्रश्न विचारले. आनंदाने सुद्धा सर्व प्रश्नांची सविस्तर उत्तरे दिली. श्रावण, भाद्रपद आणि अश्विन या तीन महिन्यात बुद्धावाचनांचा

अचूक त्रिपिटक संग्रह तयार झाला.

वर्षावास कालखंडातील हि एक महत्वपूर्ण पौर्णिमा आहे. म्हणून सर्व बौद्धजन उपोसथ व्रत धारण करून हि पौर्णिमा साजरी करतात.

"सर्व उपासक/उपासिकांना पौर्णिमेच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा"

सर्वांचे मंगल होवो

! जय भीम !   !! जय भारत !!   !!! नमो बुद्धाय !!!

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १९ सप्टेंबर २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, पोठ्ठपाद मासो, गुरूवार, भाद्रपद माहे.

१९ सप्टेंबर १९३२ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मोहनदास करमचंद गांधी यांना वाचविण्यासाठी मर्चंट हॉल मुंबई येथे भाषणात म्हणाले की, "मिस्टर गांधींनी उपोषणावर जाण्याचा निर्धार व्यक्त केला आहे, गांधींनी असे मोठे पाऊल उचलले हे मला वाचून खूप आश्चर्य वाटले. गांधींनी जर देशाचे स्वातंत्र्य मिळविण्याच्या दिशेने इतके मोठे पाऊल उचलले असते तर ते उचित ठरले असते. मी जेव्हा गोलमेज परिषदेत मिस्टर गांधींचा विरोध केला तेव्हा देशात माझ्याविरुद्ध बरीच खळबळ उडाली होती. राष्ट्रीय पत्र म्हणणारी वर्तमानपत्रे मला देशद्रोही म्हणविण्याचा कट कट रचला होता. लाचखोरीचे आमिष दाखविले गेले. काही हिंसक घटनाही घडल्या. मिस्टर गांधींचे प्राण वाचविण्यासाठी मी माझ्या बांधवांच्या न्याय्य हक्कांना हरताळ फासण्यास कारणीभूत होणार नाही." हिंदू नेत्यांची सभा, इंडीयन मर्चंट हॉल, मुंबई.

१९ सप्टेंबर १९३४ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुणे कराराच्या स्मृती जागृत ठेवण्याकरिता पोयबावडी, परळ, मुंबई येथे एक सभा आयोजित केली होती. "गुलाम म्हणून आपण किती दिवस जाच सहन करणार?" असे बाबासाहेब आपल्या भाषणात म्हणाले.

१९ सप्टेंबर १९३७ – रोजी स्वतंत्र मजूर पक्ष कार्यकारि मंडळाची सभा झाली.

१९ सप्टेंबर १९५१ – रोजी संसदेत हिंदू कोड बिलावर बोलतांना "विवाह आणि घटस्फोट (काडीमोड)" हा भाग स्वतंत्र विधेयक मानण्यात यावे असे निवेदन माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २० सप्टेंबर २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, पोठ्ठपाद मासो, शुक्रवार, भाद्रपद माहे.

२० सप्टेंबर १९३२ – रोजी अस्पृश्यांना 'स्वतंत्र मतदार संघ' बहाल केल्याच्या निर्णयाविरुद्ध मोहनदास करमचंद गांधीचे येरवडा तुरुंगात आमरण उपोषण सुरू झाले.

२० सप्टेंबर १९३२ – रोजी अस्पृश्यांच्या हक्कासंबंधी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिज्ञा झाली की, "माझ्या लोकांच्या न्याय्य व हक्कांसाठी रस्त्यावरील कंदिलाच्या खांबावर मला फाशी दिली तरी पर्वा नाही." मुंबई.

२० सप्टेंबर १९४२ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची शेड्युल्ड कास्टस फेडरेशन पक्षाची घटना मंजूर झाली.

२० सप्टेंबर १९४४ – रोजी हैद्राबाद राज्य शेड्युल्ड कास्टस फेडरेशनच्या महिला व विद्यार्थी शाखांकडून मानपाली स्टेशनवर माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सत्कार करण्यात आला तसेच मानपत्र देण्यात आले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

शीलाचे महत्व काल, आज आणि उद्या

"वयाच्या २९ व्या वर्षी घरदार सोडून सहा वर्षे अरण्यात तपस्या करणार्या सिद्धार्थ गौतमाला जो बोध झाला तो आजवरचा सर्वश्रेष्ठ शोध आहे" *"जेव्हा सिद्धार्थ गौतमाने गृहत्याग केला तेव्हा दोन विचारधारा प्रमुख होत्या*

१) एक म्हणजे 'खा, प्या, मजा करा' असाटोकाचा भोगवाद. *२) दुसरा प्रकार म्हणजे शरीराला आत्यंतिक त्रास होईल अशी तपस्या सांगणारा वैराग्य मार्ग.*

"गौतम बुद्धांनी या दोन्ही मार्गांना त्यागून मध्यम मार्ग शोधला, ज्याला 'सम्यक संबोधी' असे म्हटले गेले." *सिद्धार्थ गौतमाला मानवी दु:खाचे मूळ कारण सापडले, त्या दु:खाच्या निवारणाचा मार्ग सापडला, ज्याला चार 'आर्यसत्य' असे म्हटले आहे.*

१) "पहिले सत्य म्हणजे जगात दु:ख आहे." *२) "दुसरे सत्य त्या दु:खाला काहीतरी कारण आहे."* *३) "तिसरे सत्य त्या कारणाचे निवारण करता येते."* *४) "आणि चौथे सत्य त्या दु:खाचे निवारण करण्याचा मार्ग आहे."*

त्या दु:ख निवारण करण्याच्या मार्गाला गौतम बुद्धांनी 'आर्य अष्टांगिक मार्ग' असे म्हटले आहे. आर्य अष्टांगिक मार्ग म्हणजे आठ अंग असलेला मार्ग होय, ज्याच्याप्रमाणे आचरण केले तर तुमचे दु:ख समूळ नष्ट होते. दु:ख आणि दु:खाचे निवारण यालाच गौतम बुद्धांनी प्राधान्यक्रम दिला. गौतम बुद्धांनी निरर्थक गोष्टीवर कधीच भाष्य केले नाही"

"बुद्धांनी दु:खाची व्याख्या केली आणि या दु:खापासून मुक्त होण्यासाठी त्यांनी आर्य अष्टांगिक मार्ग दिला. या मार्गाचे तीन भागात विभाजन केलेले आहे. १) "पहिला भाग आहे *'शील'* २) "दुसरा *'समाधी'* आणि ३) "तिसरा *'प्रज्ञा'.*

१) शील म्हणजे नियम. "समाजात कसे वागावे याचे नियम. समाजामध्ये अशी व्यवस्था निर्माण व्हावी जिचा मूळाधार हा_न्याय, समता, व्यक्तिस्वातंत्र्य, आणि समान संधी हा असेल. शील पालनाचा आणि मनाचा खूप जवळचा संबंध आहे कारण मनावर ताबा असला तरच शील पाळता येते. एखाद्या व्यसनाधीन माणसाला व्यसनाचे दुष्परिणाम चांगले ठाऊक असतात. व्यसनातून बाहेर पडावे असे त्याला वाटत असते, पण मनावर ताबा नसल्यामुळे तो परत–परत त्या चक्रात अडकत जातो.

२) मनावर संयम मिळविण्याकरिता गौतम बुद्धांनी समाधीचा पुरस्कार केला. अशी समाधी शिकवली जिचा मूळाधार निसर्गनियम आहे. श्वास आणि संवेदनेवर आधारित साधना शिकवली, जी साधना कोणताही माणूस सहज करू शकतो, त्याला कसलाही अडथळा येत नाही. श्वास आणि शरीरावर होणार्या संवेदनांचे निरीक्षण करायला कसली आलीय अडचण. त्यातून मन एकाग्र होते आणि मनावर ताबा येतो."

३) "शील आणि समाधीच्या अभ्यासातून प्रज्ञा विकसित होते. प्रज्ञा म्हणजे ज्ञान. *असे ज्ञान ज्यातून दु:खाच्या कारणाचा बोध होतो आणि दु:खाचे कारण दूर केले की दु:ख दूर होते. माझ्या दु:खाला मीच जबाबदार आहे, मीच ते निर्माण केले आहे आणि मलाच ते दूर करावे लागेल याचा बोध त्याला होतो आणि तो कार्यशील होतो. ज्या माणसाला हे तत्त्व समजले, ज्याने याचा अनुभव घेतला तो निरर्थक गोष्टीत रमत नाही. मी या मानव समाजाचा एक घटक आहे आणि हा समाज सुखी असला तरच मी सुखी राहीन ही भावना त्याच्यात वाढीस लागते. मग आपोआपच जातीची बंधने तुटू लागतात. वैरभाव दूर होऊ लागतो."*

"गौतम बुद्धांनी म्हटले आहे 'न हि वेरेन वेरानि, सम्मन्तीध कुदाचनं। अवेरेन च सम्मन्ति, एस धम्मो सनन्तनो"

"म्हणजे वैर वैराने शमत नाही ते अवैरानेच संपते. या अवैराच्या विचारातून सर्वांबद्दल प्रेम, मैत्री आणि सद्भाव वाढू लागतो. यातूनच करुणेचा उदय होतो. ही मैत्री करुणाच सामाजिक स्वास्थ्य वाढविते. मैत्री आणि करुणा हा बुद्धविचाराचा स्थायीभाव आहे, ते मानवी मनाचे टॉनिक आहे." विशेष म्हणजे ते सर्वत्र लागू होणारे आहे. त्याला स्थळ–काळाचे बंधन नाही. त्यात काळानुरूप बदल करण्याची गरज नाही.

"पंचशील २५६७ वर्षांपूर्वी आवश्यक होते, आजही ते तितकेच आवश्यक आहे, उद्याही ते तितकेच महत्त्वाचे राहणार आहे."

"बुद्धविचार काळाच्या कसोटीवर खरा ठरला आहे, म्हणून आजही तो तितकाच ताजातवाना आहे.

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐

प्रत्येक रविवारी बुद्धविहारात बुद्धलेणीस गेलेच पाहिजे –डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐

सब्ब पापस्स अकरणं कुसलस्स उपसंपदा। *सचितपरियोदपनं में एतं बुद्धान सासनं।*

धन्यवाद, सविनय जयभिम *सर्वांचे मंगल हो, Be Happy*

☸☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २१ सप्टेंबर २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, पोठ्ठपाद मासो, शनिवार, भाद्रपद माहे.

२१ सप्टेंबर १९३१ – रोजी अस्पृश्यांचे मलबार मधील पाठीराखे केलाप्पन यांनी गुरूवायुर मंदिरासमोर मंदिर प्रवेशाच्या बाजूने उपोषण सुरू केले. परंतु मोहनदास करमचंद गांधीनी त्यांना उपोषण सोडवायचे तारेने विनंती केल्यावरून व माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विनंती केल्यावर त्यांनी आपला उपवास स्थगित केला.

२१ सप्टेंबर १९३२ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुणे कराराचा मध्यवर्ती मानबिंदू ठरविण्यात आला.

२१ सप्टेंबर १९३२ – रोजी दुपारी मोहनदास करमचंद गांधीना येरवडा कारागृहाच्या प्रवेशद्वाराजवळ अंगणात नेण्यात आले. दुपारी सप्रूने माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना फोन केला आणि पुण्याला येण्यास सांगितले. २१ सप्टेंबर १९३२ रोजी पूना येथे रवाना होण्यापूर्वी टाइम्स ऑफ इंडियाला दिलेल्या मुलाखतीत डॉ. आंबेडकर म्हणाले की , "मला पुण्याकडून एक संदेश मिळाला आहे की गांधींनी मला आणि श्री राजा यांना काल रात्री झालेल्या परिषदेने नेमलेल्या समितीकडे मांडलेल्या प्रस्तावाबद्दल मला भेटायचे आहे. तर मी आज रात्री पुण्यासाठी निघत आहे.

२१ सप्टेंबर १९४२ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संघराज्याच्या ३६ व्या बैठकीत उपस्थिती केली व भाषण दिले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

🌷 *धम्म* 🌷

यो धम्मं पस्सति सो मं पस्सति। यो मं पस्सति सो धम्मं पस्सति।।

तथागत गौतमबुद्ध

तथागत बुद्ध ने स्वयं अनेक बार कहा है – *"जो धम्म को देखता है, वह मुझे देखता है।* *जो मुझे देखता है, वह धम्म को देखता है।"*

इसी को बौद्ध धंम्म में 'धंम्मकायास्तथागता' कहते हैं। धम्म की अनुस्मृति वस्तुत: बुद्ध की स्मृति से कुछ कम महत्वपूर्ण नहीं है। परमार्थ रुप से बुद्ध और धम्म में भेद करना ही अज्ञानता है। बुद्ध और धम्म एक ही है।

महापरिनिर्वाण में प्रवेश करते समय भगवान ने कुशीनगर में भिक्खुओं से कहा था, "मेरे बाद मेरे द्वारा उपदेश किया हुआ धम्म विनय ही तुम्हारा शास्ता होगा।"

इस प्रकार 'धम्म' लोक में बुद्ध का प्रतिनिधि है। परंतु 'धम्म' अपने अस्तित्व के लिए बुद्धों के आविर्भाव पर निर्भर नहीं है।' तथागत चाहे उत्पन्न हों, चाहे न हों, धम्म नियामता तो रहती ही है।

"उप्पादा वा तथागतानं अनुप्पादा वा तथागतानं ठिता व सा धातु धमामट्ठितता धम्मनियामता।"

अत: *'धम्म' व्यक्ति निरपेक्ष सत्य है, जो व्यक्ति के रुप में भगवान बुद्ध की भी अपेक्षा नही रखता। बुद्ध और संघ के बीच 'धम्म' मध्यस्थता करता है तथागत गौतमबुद्ध बुद्ध ने धम्म का साक्षात्कार किया और अपने बाद 'धम्म' को अपना प्रतिनिधि बनाया। 'धम्म' के लिए बुद्ध ने अपने को विसर्जित कर दिया। 'धम्म' के प्रचार के लिए, ब्रह्मचर्य के प्रकाश के लिए, संघ का आयोजन हुआ। परन्तु बुद्ध के बाद उसका नियन्त्रण कर्ता भी 'धम्म' ही हुआ, कोई व्यक्ति नहीं।*

इस प्रकार हम देखते हैं कि बुद्ध और संघ के बीच में धम्म है।

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐

हर रविवार बुद्धविहार बुद्धगुफाऐं में जाना ही चाहिये –डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐

सब्ब पापस्स अकरणं कुसलस्स उपसंपदा। *सचितपरियोदपनं में एतं बुद्धान सासनं।*

धन्यवाद, सविनय जयभिम *सर्वांचे मंगल हो, Be Happy*

☸☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २२ सप्टेंबर २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, पोठ्ठपाद मासो, रविवार, भाद्रपद माहे.

२२ सप्टेंबर १५३९ – रोजी गुरुनानक स्मृतिदिन.

२२ सप्टेंबर १८८७ – रोजी कर्मवीर भाऊराव पाटील जयंती.

२२ सप्टेंबर १९३२ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासोबत, सरतेजबहादुर सप्रू व बॅ. जयकर यांनी स्वतंत्र मतदार संघाबाबत नॅशनल हॉटेलमध्ये चर्चा केली.

२२ सप्टेंबर १९३२ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुणा येरवडा कारागृहात मोहनदास करमचंद गांधी यांना भेटायला गेले होते. ही बैठक बऱ्याच वेळपर्यंत चालली. डॉ. आंबेडकर बोलत असतांनाही गांधी अंथरुणावर होते. डॉ. आंबेडकर – मला माझी नुकसान भरपाई पाहिजे. गांधी – तुम्ही जे काही बोलता त्यास मी मान्य करतो, परंतु तुम्ही माझ्या आयुष्यात रस घेत आहात असे तुम्ही म्हणता. डॉ. आंबेडकर – होय, मला रस आहे. जर आपण मागासवर्गिय (दलित) लोकांच्या कल्याण आणि कल्याणासाठी स्वत:ला पूर्णपणे समर्पित केल्यास. बैठकीनंतर:– डॉ. आंबेडकरांना ठार मारण्याची धमकी देणारी पत्रे मिळाली. ज्यात असे लिहिले होते की, "जर त्यांनी गांधींचे म्हणणे ऐकले नाही तर ते त्यांना ठार मारतील." डॉ. आंबेडकरांना या धमक्यांपासून भीती वाटली नाही.

२२ सप्टेंबर १९४० – रोजी कोकणस्थ महार को ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, खार, मुंबई येथे माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भेट दिली.

२२ सप्टेंबर १९४४ – रोजी कुमारराज सर मुथिमा चेट्टीमार यांनी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मद्रास (चेन्नई) येथील आपल्या चेट्टीमाड हाऊस या राजवाड्याच्या विस्तीर्ण मैदानात चहापार्टी दिली.

२२ सप्टेंबर १९४४ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मद्रास (चेन्नई) महापालिकेकडून मेयरच्या हस्ते चांदीच्या करंड्यातून मानपत्र अर्पण करण्यात आले. आंध्र चेंबर्स ऑफ कॉमर्स, मद्रास (चेन्नई) तर्फे मानपत्र देण्यात आले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, "स्वातंत्र्यासाठी मी केव्हाही लढावयास तयार आहे." सदर भाषण जनता वृत्तपत्रात २५ नोव्हेंबर १९४४ रोजी प्रकाशित झाले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🌿🌿🌿💎 कर्मवीर भाऊराव पाटील जयंति 💎🌿🌿🌿☸☸

(जन्म :– २२ सप्टेंबर, १८८७, मृत्यू :– ९ मे, १९५९)

गोरगरिबांच्या मुलांना मोफत व चांगले शिक्षण मिळावे म्हणून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. त्याद्वारे खेडोपाडी शाळा व वसतिगृहे सुरू केली. कमवा, शिका ह्या योजना सुरू करून मुलांमध्ये स्वावलंबनाचा आदर्श त्यांनी निर्माण केला. अशा थोर शिक्षण महर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन व कोटी–कोटी प्रणाम.

! जयभीम! !! जयभारत !! !!! नमोबुद्धाय !!!

कर्मवीर भाऊराव पाटील–परिचय

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म २२ सप्टेंबर, १८८७ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव पायगोंडा पाटील व आईचे नाव गंगाबाई असे होते. पायगोंडा पाटील यांचे गाव सांगली जिल्ह्यातील ऐतवडे हे होय. ते सरकारी खात्यात कारकून म्हणून कामाला होते. त्यांना आपल्या नोकरीनिमित्त अनेक ठिकाणी फिरावे लागले; त्यामुळे भाऊरावांचे बालपण कुंभोज, तासगाव, दहिवडी, विटे यांसारख्या गावी गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षणही असेच निरनिराळ्या गावी झाले.

भाऊराव पाटील विट्याच्या शाळेतून मराठी पाचवी इयत्ता उत्तीर्ण झाल्यावर त्यांना पुढील शिक्षणासाठी कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये दाखल करण्यात आले. त्या ठिकाणी त्यांच्या राहण्याची सोय जैन बोर्डिंगमध्ये करण्यात आली होती. भाऊरावांच्या स्वभावात लहानपणापासूनच बंडखोर वृत्ती दिसून येत होती.

जैन बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांवर कर्मठ धार्मिक नियमांचे पालन करण्यासंबंधी सक्ती केली जात असे. पण भाऊरावांना हे नियम अनावश्यक वाटत; त्यामुळे बोर्डिंगच्या अशा नियमांचे त्यांनी अनेकदा उल्लंघन केले होते व त्याबद्दल वेळोवेळी शिक्षाही भोगली होती. अशाच एका प्रकरणातून त्या वेळचे जैन बोर्डिंगचे सुपरिटेंडेंट अण्णासाहेब लठ्ठे यांच्याशी त्यांचे भांडण झाले. परिणामी, लठ्ठयांनी भाऊरावांची बोर्डिंगमधून हकालपट्टी केली. कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये भाऊराव पाटलांनी इंग्रजी सहाव्या इयत्तेपर्यंत शिक्षण घेतले.

शिक्षणात त्यांची विशेष प्रगती दिसून आली नाही. मॅट्रिक होण्यापूर्वीच त्यांना शिक्षण सोडावे लागले. तथापि, कोल्हापूरमधील वास्तव्यात त्यांनी कुस्ती, व्यायाम यांसारख्या गोष्टींकडे भरपूर लक्ष पुरविले. त्या वेळी राजर्षी शाहू महाराज हे कोल्हापूरच्या गादीवर होते. भाऊरावांना काही दिवस महाराजांच्या सहवासात राहण्याची संधी मिळाली होती. त्यांच्या विचारांचा प्रभाव भाऊरावांवर पडला.

भाऊराव पाटील हे जन्माने जैन होते. मात्र जनतेमध्ये ते इतके मिसळून गेले की संपूर्ण बहुजन समाजाला ते आपले वाटले. पाटील हे आडनाव (पद) भाऊरावांच्या घराण्याला पूर्वीपासूनच प्राप्त झाले होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व जातीभेदाच्या पलीकडे होते. महात्मा फुले यांच्या सत्यशोधकी विचारांचा प्रभाव त्यांच्यावर होता. बहुजन समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार करताना विद्यार्थ्यांमध्ये बंधुता व समता रुजावी यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणातून समता व बंधुता याचे संस्कार विद्यार्थ्यांना देण्याचा प्रयत्न केला. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी चालवलेल्या वसतिगृहात विविध जाती–धर्माचे विद्यार्थी एकत्र राहत असत, ते सर्वजण स्वतःच्या हाताने सामुदायिकरित्या स्वयंपाक करत आणि एकत्रच जेवण करत.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षण प्रसारासाठी दिले. महाराष्ट्रातील एक प्रेरणादायी शिक्षणयात्री म्हणून ते ओळखले जातात. महाराष्ट्रातील जनतेने त्यांना कर्मवीर (कृतींचा राजा) ही उपाधी देऊन सन्मानित केले. भारत सरकारने १९५९ मध्ये पद्मभूषण हा भारताचा तिसरा सर्वोच्च नागरी सन्मान देऊन आणि १९८८ मध्ये त्यांच्या सन्मानार्थ टपाल तिकीट प्रकाशित करून भाऊराव पाटील यांचा सन्मान केला.

कर्मवीर भाऊराव यांचे पूर्ण नाव भाऊराव पायगौंडा पाटील असे होते. आईचे नाव गंगाबाई होते. त्यांचे मूळ गाव कर्नाटक राज्यात दक्षिण कन्नड जिल्यातील मूडब्रिदी गावचे.कर्मवीर यांचे पुर्वज नशीब अजमावण्यासाठी महाराष्ट्रात आले. पूर्वीचे त्यांचे आडनाव देसाई होते. पुढे ते एतवडे जि. सांगली येथे स्थिर झाले. पुढे त्यांच्या घराण्यात पाटीलकी आली त्यामुळे त्यांचे देसाई हे नाव जाऊन पाटील हे नाव रूढ झाले. कोल्हापूर जिल्यात हातकणंगले नावाचा तालुका आहे. या तालुक्यात बाहुबलीचा डोंगर आहे. या डोंगरावर पार्श्वनाथाचे सुंदर, भव्य स्मारक आहे. या डोंगराच्या कुशीत कुंभोज नावाचे छोटेशे गाव आहे. या गावी २२ सप्टेंबर १८८७ रोजी (आश्विन शुद्ध पंचमी, ललिता पंचमी) कर्मवीरांचा जन्म झाला. त्यांचे बालपण कुंभोज या गावी गेले. भाऊरावांच्या आईला इतर जातीचीच नव्हे तर ब्राह्मणाची शिवाशिवही चालत नसे, एवढे हे कर्मठ घराणे होते. असे असले तरी भाऊराव लहानपणापासूनच बंडखोर होते. अन्यायाची त्यांना प्रचंड चीड होती. त्यांचे बालपण कुंभोजमधील अस्पृश्य मुलांच्यात खेळण्यात गेले. अस्पृश्यतेबद्दल त्यांच्या मनात राग होता. अस्पृश्य समाजातील लोकांना पाणी दिले जात नाही म्हणून त्यांनी एका विहिरीचा रहाटच मोडून टाकला होता. त्यांचे प्राथमिक शिक्षण सांगली जिल्ह्यातील विटा आणि इतरही काही गावांत झाले. पुढील शिक्षणासाठी त्यांना कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये दाखल करण्यात आले. त्यांची राहण्याची सोय जैन बोर्डिंगमध्ये करण्यात आली होती. याच काळात त्यांच्यावर राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा व कार्याचा प्रभाव पडला. कर्मवीर लहानपणापासून बेडर वृत्तीचे होते. ते पट्टीचे पोहणारे होते. कर्मवीरांच्या गावी कुंभोज मध्ये 'सत्त्यापाचे बंड' हे प्रकरण खुप गाजले होते. कुंपणाच्या काट्या तोडणाऱ्या एका दलित गरोदर बाईला एका माणसाने जनावरासारखे मारले. सत्त्याप्पा भोसलेला त्याचा सात्त्विक संताप आला. रागाच्या भरात त्याने त्या माणसाला ठार केले व तो फारारी झाला. तो कर्मवीर अण्णाच्या आजोबाच्या उसाच्या फडात लपून बसला. छोट्या भाऊरावाना तो अंगाखांद्यावर खेळवी. तो कर्मवीरांना पराक्रमाच्या गोष्टी सांगे. बंडखोरी, 'अन्यायाविरुद्ध चीड हे सदगुण सत्त्याप्पाकडून कर्मवीरांना मिळाले. त्यांच्या बालपणी सार्वजनिक ठिकाणी पाणी भारता येत नसे.

इतरांकडून मागून पाणी घ्यावे लागे. पाण्यासाठी तासनतास विनवणी करावी लागे. एकदा ते दृष्यपाहून अण्णाचे हृदय पिळवटून निघाले मग कर्मवीरांनी राहाठ मोडून आडात टाकला. कार्मावीरांचे प्राथमिक शिक्षण दहिवडी विटा या वडिलांच्या बदलीच्या गावी झाले. विटा या गावी दत्तोपंत जोशी यांनी चालवलेल्या खाजगी इंग्रजी वर्गात पहिलीचे इंग्रगीचे शिक्षण झाले. तेथे पुढील शिक्षणाची सोय नसल्याने कोल्हापूरला शिक्षणासाठी त्यांना जावे लागले. कोल्हापूरला असताना कोल्हापूर संस्थानचे राजे राजर्षी शाहू दलितांना महाराज होते. भविष्यकाळाचा विचार करणारा राजा होता. त्यांनी महाराष्ट्रात समतेचा झेंडा लावला. सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू केले. समाज प्रबोधनाच्या चळवळीमध्ये एक सुधारक म्हणून महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. १९३२ मध्ये महात्मा गांधी व बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये पुणे करार झाला. या ऐक्याच्या स्मरणार्थ

'युनियन बोर्डींग' ची स्थापना भाऊरावांनी पुणे येथे केली. हे ऐक्य व्हावे या विषयीची तळमळ महर्षी शिंदे आणि भाऊराव पाटील यांना होती. पृथकतावादाने दलितांचे प्रश्न सुटणार नाहीत तर ते वाढतील असे त्यांचे मत होते. १९३५ मध्ये 'महात्मा फुले अध्यापक विद्यालय' त्यांनी सुरू केले. या मागे त्यांचा उद्देश शिक्षणाची चळवळ ग्रामीण भागापर्यंत पोहोचवणे त्यासाठी योग्य शिक्षक घडवणे हे होते.

एकदा कर्मवीर् सुट्टीत इस्लामपूरला आले. त्यावेळी कार्मावीरांचे आई वडील तिथे राहत होते. रिकाम्या वेळेतकर्मवीर शाळेकडे गेले. पावसाळ्याचे दिवस होते. हवेत गारवा होता. सर्व मुले वर्गात बसलेली होती. आणि एक मुलगा बाहेर कुडकुडत बसला होता. गुरुजीना विचारल्यानंतर तो इतर जातीचा असल्याने बाहेर बसवल्याचे कर्मवीरांना समजले. ते त्या मुलाला घरी घेऊन आले. घरात स्वताजवळ बसूनच जेऊ घातले. नंतर कोल्हापूरला नेऊन 'मिस क्लार्क होस्टेल' ला दाखल केले. तो पुढे तो विधीमंडळाचा सभासद झाला. भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांनी चालवलेल्या 'मूकनायक' वर्तमान पत्राचा तो काही काल तो संपादक होता. इतर जातीचा मुलगा घरात आणल्याने कर्मवीरांच्या आईने त्यांना फुंकनीने मारले. फुंकनीचा मार वाया गेला नाही. पुढे कर्मवीरांच्या शैक्षणिक कामाला समतेची गोड फळे मिळाली. अण्णा हायस्कुला असताना होते. पण त्यांना रस नव्हता.

विचारांचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. महात्मा फुले यांना गुरू मानूनच त्यांनी शैक्षणिक प्रसाराचे कार्य केले. 'प्रत्येक गावात शाळा'; 'बहुजन समाजातील शिक्षक' व 'शिक्षक प्रशिक्षण' – या सूत्रांचा त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला.

याच काळात त्यांचा सत्यशोधक समाजाच्या विचारसरणीशी परिचय झाला आणि ते सत्यशोधक समाजाचे अनुयायी बनले. म्हणजे कोल्हापूरच्या सात वर्षांच्या वास्तव्यात भाऊरावांना शालेय शिक्षणात विशेष प्रगती करता आली नसली तरी भावी जीवनात उपयोगी पडणारी वैचारिक पार्श्वभूमी त्यांना याच ठिकाणी लाभली. भाऊराव पाटलांना आपले शिक्षण अर्ध्यावरच सोडावे लागले. त्यानंतर त्यांनी वेगवेगळे व्यवसाय शोधण्याचा प्रयत्न केला. काही काळ त्यांनी खाजगी शिकवण्याही केल्या.

पुढे ओगले ग्लास वर्क्स व किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड या कंपन्यांचे फिरते विक्रेते म्हणून त्यांनी काम केले. आपल्या कामानिमित्ताने त्यांना महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात फिरावे लागले. त्यामुळे महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थितीचे अवलोकन करण्याची संधी त्यांना मिळाली. त्यातून त्यांच्यातील समाजसेवक जागा झाला. महाराष्ट्रातील बहुजन समाज अजूनही अज्ञान, अंधकारात खितपत पडला आहे, त्याला शिक्षणाचा साधा गंधही नाही म्हणूनच तो मागासलेला राहिला आहे. त्याचे सर्व बाजूंनी शोषण चालू आहे, या वास्तवाची भाऊरावांना जाणीव झाली.

त्यावरूनच ते अशा निष्कर्षाप्रत आले की, येथील बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार झाल्याखेरीज त्याची उन्नती होऊ शकणार नाही. सत्यशोधक समाजाच्या शिकवणुकीचा प्रभाव त्यांच्यावर होताच. त्यामुळे बहुजन समाजाच्या हितासाठी कार्य करण्याची तळमळ त्यांच्या ठिकाणी होती. ग्रामीण समाजाच्या अवलोकनातून भाऊरावांना आपल्या भावी कार्याची दिशा मिळाली. शिक्षण हाच बहुजन समाजाच्या उन्नतीचा खरा मार्ग होय, अशी त्यांची खात्री पटली. म्हणून त्यांनी स्वतःला शिक्षणप्रसाराच्या कार्याला वाहून घेण्याचे ठरविले.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपल्या सामाजिक कार्याची प्रेरणा महात्मा फुले व राजर्षी शाहू महाराज यांच्याकडून घेतली होती. बहुजन समाजाच्या हिताची उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून त्यांनी शिक्षणप्रसाराचे कार्य हाती घेतले होते. म्हणजेच शिक्षणाचा विचार त्यांनी एका व्यापक दृष्टिकोनातून केला होता. शाळा–महाविद्यालयांची स्थापना करणे आणि ती चालविणे, एवढ्यापुरताच शिक्षणाचा अर्थ त्यांना अभिप्रेत नव्हता. सामाजिक परिवर्तन ही त्यांच्या शैक्षणिक कार्याची मुख्य प्रेरणा होती. येथील बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार करून व्यापक सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याची आकांक्षा त्यांनी बाळगली होती.

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे महत्त्वाचे साधन होय, अशी त्यांची धारणा होती. त्या दृष्टीनेच ते शिक्षणप्रसाराच्या कार्याकडे वळले होते. भाऊराव पाटील यांनी आपल्या शैक्षणिक कार्याची सुरुवात सांगली जिल्ह्यातील दुधगाव या ठिकाणी केली. सन १९१० मध्ये त्यांनी दुधगाव येथे काही स्थानिक लोकांच्या मदतीने 'दुधगाव विद्याप्रसारक मंडळ' या नावाची संस्था स्थापन केली. तिच्यामार्फत 'दुधगाव विद्यार्थी आश्रम' हे वसतिगृह चालू केले. या वसतिगृहाचे एक वैशिष्ट्य म्हणजे तेथे सर्व जातिजमातींचे विद्यार्थी एकत्र राहत असत. पुढे दुधगावच्या धर्तीवर नेर्ले (१९२१) व काले या गावीही कर्मवीरांनी वसतिगृहे सुरू केली.

रयत शिक्षण संस्थेची स्थापना

कर्मवीर भाऊराव पाटील सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते होते. त्यांनी काही काळ सत्यशोधक समाजाच्या प्रचाराचे कार्य केले होते. सन १९९९ मध्ये सत्यशोधक समाजाच्या सातारा जिल्हा शाखेची एक परिषद काले या गावी भरविण्यात आली होती. भाऊराव पाटील हेदेखील या परिषदेला उपस्थित होते. या परिषदेच्या अखेरीस भाऊरावांनी सूचना केली की, जिल्ह्याच्या ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी एक संस्था स्थापन करावी. ही सूचना सर्वांनीच उचलून धरली.

त्यानुसार ४ ऑक्टोबर, १९१९ रोजी काले येथेच रयत शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली. तिची जबाबदारी भाऊराव पाटील यांनी स्वीकारली. पुढे भाऊराव सातारा येथे वास्तव्यास गेले; त्यामुळे १९२४ मध्ये रयत शिक्षण संस्थेचे मध्यवर्ती कार्यालय सातारा येथे नेण्यात आले. सन १९२४ मध्ये कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेच्या वतीने सातारा येथे छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस हे वसतिगृह सुरू केले. या वसतिगृहात सर्व जाति–धर्मांचे विद्यार्थी एकत्र राहत असत.

भाऊराव पाटील स्वतः खेड्यापाड्यांत फिरून बहुजन समाजातील गरीब व हुशार विद्यार्थ्यांना गोळा करीत आणि त्यांना शिक्षणासाठी साताऱ्यास घेऊन येत. या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची तसेच त्यांच्या राहण्या–जेवणाची सर्व जबाबदारी भाऊराव उचलीत. इतकेच नव्हे तर, आई–वडिलांपासून दूर राहिलेल्या या विद्यार्थ्यांवर ते मायेची पाखर घालीत, त्यांची सर्व प्रकारची काळजी घेत. वसतिगृहातील विविध जाति–धर्मांच्या विद्यार्थ्यांचे ते खरेखुरे पालक होते.

या विद्यार्थ्यांपैकी बहुसंख्य विद्यार्थी असे असत की, भाऊरावांचा भक्कम आधार त्यांना मिळाला नसता तर त्यांच्या शिक्षणाची द्वारे कधीच बंद झाली असती. आपल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांची सोय लावण्यासाठी व त्यांचे शिक्षण चालू ठेवण्यासाठी भाऊरावांनी अविश्रांत कष्ट उपसले. उन्हा–पावसात वणवण फिरून मिळेल त्या ठिकाणाहून त्यांनी मदत गोळा केली. कर्मवीरांच्या या कार्यात त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांचाही महत्त्वाचा वाटा होता.

युनियन बोर्डिंग हाऊस ची स्थापना

वसतिगृहातील विद्यार्थ्यांवर उपाशी राहण्याची वेळ येऊ नये म्हणून या माऊलीने आपले मंगळसूत्र विकण्यासही मागे–पुढे पाहिले नाही. वसतिगृहातील मुलांना त्यांनी आपल्या मुलांप्रमाणे मानले आणि त्यांना मातेचे प्रेम दिले. विद्यार्थ्यांच्या उच्चशिक्षणाची सोय व्हावी म्हणून सन १९३२ मध्ये त्यांनी पुणे येथे 'युनियन बोर्डिंग हाऊस' ची स्थापना केली; त्यास 'गांधी– आंबेडकर' यांच्यामधील 'पुणे करारा' चे निमित्त होते. युनियन बोर्डिंग हाऊसच्या रूपाने कर्मवीरांनी एक प्रकारे 'पुणे कराराची' स्मृतीच जतन केली होती.

१६ जुलै, १९३५ रोजी कर्मवीरांनी प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी सातारा येथेच 'सिल्व्हर ज्युबिली रुरल ट्रेनिंग कॉलेज' सुरू केले. तथापि, रयत शिक्षण संस्थेच्या कार्याचा व्याप वाढू लागला, तो १९३७ या वर्षापासून! १९३७ मध्ये देशात प्रांतिक कायदेमंडळासाठी निवडणुका घेण्यात आल्या. या निवडणुकीत मुंबई प्रांतासह अनेक प्रांतांत काँग्रेसची मंत्रिमंडळे अधिकारावर आली. मुंबई प्रांताच्या काँग्रेस सरकारने जनतेत साक्षरतेचा प्रसार करण्याची योजना आखली. त्यानुसार खाजगी शिक्षण संस्थांना प्राथमिक शाळा सुरू करण्यास प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला.

कर्मवीर भाऊराव पाटलांनी या योजनेअंतर्गत सातारा जिल्ह्यात खेडोपाडी प्राथमिक शाळांचे जाळेच निर्माण करण्याचे ठरविले. १९३८–३९ या वर्षात रयत शिक्षण संस्थेने ६१ प्राथमिक शाळा सुरू केल्या; तर त्याच्या पुढच्याच वर्षी ही संख्या १६८ वर गेली. इ. स. १९४९ –५० या वर्षी संस्थेच्या वतीने चालविण्यात आलेल्या प्राथमिक शाळांची संख्या ५७८ इतकी होती. नंतरच्या काळात सरकारने प्राथमिक शाळा स्वतःच चालविण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार महाराष्ट्रभर पसरलेल्या जवळजवळ ७०० प्राथमिक शाळा संस्थेने महाराष्ट्र शासनास सुपूर्त केल्या.

मध्यंतरीच्या काळात कर्मवीरांनी माध्यमिक शाळा उघडण्याची मोहीम हाती घेतली होती. रयत शिक्षण संस्थेची पहिली माध्यमिक शाळा साताऱ्यात 'महाराजा सयाजीराव हायस्कूल' या नावाने १९४० मध्ये सुरू झाली. पुढील काळात माध्यमिक शाळांची संख्याही वाढत गेली. सन १९५३–५४ या वर्षी संस्थेच्या माध्यमिक शाळांची संख्या ४४ इतकी होती. कर्मवीरांनी १०१ शाळा उघडण्याची घोषणा केली. पण हे लक्ष्य गाठण्यास संस्थेला फारसा विलंब लागला नाही. १९७७–७८ या वर्षी माध्यमिक शाळांची संख्या ३१२ वर जाऊन पोहोचली.

छत्रपती शिवाजी कॉलेज पहिले महाविद्यालय

माध्यमिक शाळा उघडण्याची मोहीम चालू असतानाच कर्मवीरांनी उच्च शिक्षणाकडेही आपले लक्ष वळविले. सन १९४७ मध्ये रयत शिक्षण संस्थेने सातारा येथे 'छत्रपती शिवाजी कॉलेज' या नावाने पहिले महाविद्यालय सुरू केले. त्यानंतर संस्थेच्या महाविद्यालयांच्या संख्येतही झपाट्याने वाढ झाली. १९५९ मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर रयत शिक्षण संस्थेचे काय होणार, अशी चिंता काही लोकांना लागली होती. परंतु कर्मवीरांच्या तालमीत तयार झालेल्या कार्यकर्त्यांनी कर्मवीरांचा वारसा समर्थपणे पुढे चालविला आणि संस्थेच्या कार्याची धुरा यशस्वीरीत्या सांभाळली.

अलीकडील माहितीनुसार सध्या रयत शिक्षण संस्थेच्या महाराष्ट्रात सुमारे ४३८ माध्यमिक शाळा असून या संस्थेच्या वतीने एक अभियांत्रिकी महाविद्यालय, एक विधी महाविद्यालय व २ अध्यापक महाविद्यालये यांच्यासह एकूण ४२ सामान्य शिक्षण महाविद्यालये, ८ अध्यापक विद्यालये, ८० वसतिगृहे, ४२ प्राथमिक शाळा, ३१ पूर्व प्राथमिक शाळा, ८ आश्रमशाळा व ६ औद्योगिक प्रशिक्षण संस्था चालविल्या जातात.

रयत शिक्षण संस्थेच्या शाखा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत पसरल्या असून त्यांपैकी बहुसंख्य शाखा ग्रामीण भागात आहेत. रयत शिक्षण संस्थेच्या वरील विविध शाखांमधून आज हजारो विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत. कर्मवीरांनी लावलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या सुरुवातीच्या इवल्याशा रोपट्याचे संस्थेच्या बोधचिन्हाप्रमाणे आज खरोखरीच एका विशाल वटवृक्षात रूपांतर झाले आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी महाराष्ट्रातील बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार करून त्यास जागृत बनविले, तथापि, शिक्षणासंबंधी त्यांच्या स्वतःच्या काही कल्पना होत्या व त्या प्रत्यक्षात उतरविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. कर्मवीरांना समाजात स्वाभिमानाने व ताठ मानेने जगणारे विद्यार्थी तयार करावयाचे होते. विद्यार्थ्यांनी मदतीसाठी दुसऱ्याकडे याचना करावी, ही गोष्ट त्यांना मान्य नव्हती.

म्हणून विद्यार्थ्यांनी स्वावलंबनाने शिक्षण घ्यावे यावर त्यांनी भर दिला. 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' हे रयत शिक्षण संस्थेचे घोषवाक्य आहे. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहून शिक्षण घ्यावे म्हणून त्यांनी 'कमवा व शिका' ही योजना सुरू केली आणि त्यामार्फत विद्यार्थ्यांना खडी फोडणे, शेती पिकविणे अशी विविध प्रकारची कामे उपलब्ध करून दिली.

कर्मवीरांनी स्वावलंबी शिक्षणावर भर देण्याचे आणखी एक कारण म्हणजे सामान्य परिस्थितीतील विद्यार्थ्यांना शिक्षणाची द्वारे खुली करून देणे, है त्यांचे उद्दिष्ट होते. या विद्यार्थ्यांचे पालक मुळातच अतिशय दारिद्र्यात जीवन जगत होते. तेव्हा विद्यार्थ्यांनी आपल्या गरीब पालकांवर स्वतःच्या शिक्षणाचा भार टाकू नये, अशी कर्मवीरांची इच्छा होती.

श्रमप्रतिष्ठेला अतिशय महत्त्वाचे स्थान

कर्मवीरांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानात श्रमप्रतिष्ठेला अतिशय महत्त्वाचे स्थान होते. विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारचे श्रम करण्यात कमीपणा मानू नये, अशी त्यांची शिकवण होती. आपण स्वतःच्या श्रमावर शिकत आहोत, असे सांगण्यात विद्यार्थ्यांना मोठेपणा वाटला पाहिजे; तसेच समाजात श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त झाली पाहिजे आणि श्रम करणाऱ्यांना महत्त्व प्राप्त झाले पाहिजे, असे त्यांना वाटत होते.

बंधुभाव व सामाजिक समता कर्मवीर भाऊराव पाटलांनी आपल्या शैक्षणिक कार्याद्वारे विद्यार्थ्यांना बंधुभाव व सामाजिक समता यांचा संदेश दिला. त्यांना जातिभेद मुळीच मान्य नव्हता. रयत शिक्षण संस्थेने चालविलेल्या वसतिगृहांमध्ये विविध जातिधर्मांचे विद्यार्थी एकत्र राहत असत. ते सर्व जण स्वतःच्या हाताने सामुदायिकरीत्या स्वयंपाक करीत असत व एकत्रच जेवण घेत असत. अशा प्रकारच्या सहजीवनातून विद्यार्थ्यांना बंधुभाव व सामाजिक समता यांचा संदेश मिळावा, हाच कर्मवीरांचा या प्रयोगामागील प्रमुख हेतू होता.

कार्याची महत्ता

कर्मवीर भाऊराव पाटील हे आधुनिक भगीरथ होते. त्यांनी शिक्षणाची गंगा महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांतील गरीब शेतकऱ्यांच्या व पददलित जनतेच्या झोपडीपर्यंत नेऊन पोहोचविली आणि अज्ञान–अंधकारात खितपत पडलेल्या गोरगरीब समाजाचा उद्धार घडवून आणला; यातच त्यांच्या मोठेपणाचे रहस्य सामावलेले आहे. कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळा प्रामुख्याने ग्रामीण भागातच उघडल्या; यापाठीमागे त्यांची एक विशिष्ट दृष्टी होती. आपल्या समाजातील जे घटक आतापर्यंत शिक्षणापासून वंचित राहिले होते अशा समाजघटकांना शिक्षणाचा लाभ मिळवून देणे, हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट होते.

कर्मवीरांच्या काळात महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात शिक्षणाचा विशेष प्रसार झाला नव्हता. बहुसंख्य ग्रामीण जनता अशिक्षित व अज्ञानी होती. म्हणून त्यांनी ग्रामीण जनतेच्या शिक्षणावरच आपले लक्ष केंद्रित केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रयत्नांमुळेच महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात शिक्षणाचा झपाट्याने प्रसार झाला आणि ग्रामीण जीवनाचे चित्र बदलण्यास मदत झाली, ही वस्तुस्थिती कोणालाही नाकारता येणार नाही.

ज्या अस्पृश्य समाजाला परंपरेने शिक्षणाचा अधिकार नाकारला होता, त्याच अस्पृश्य समाजातील एका विद्यार्थ्यांने संस्कृत विषयाचे पारितोषिक मिळवावे, हा भाऊरावांनी घडवून आणलेला चमत्कारच होता. त्यांनी आपल्या शैक्षणिक कार्याद्वारे बहुजन समाजाच्या उन्नतीचा मार्ग मोकळा करून दिला.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याची अनेक सामाजिक संस्थांनी दखल घेऊन त्यांना मानपत्रे बहाल केली. भारत सरकारने त्यांना 'पद्मभूषण' हा किताब दिला. पुणे विद्यापीठाने त्यांना डी. लिट. ही सन्मानदर्शक पदवी बहाल केली. त्यांच्या कार्याला प्रचंड लोकमान्यताही मिळाली. मृत्यू रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ज्ञानाची गंगा सामान्यातील सामान्य माणसाच्या दारी पोहोचविल्याच्या समाधानातच ९ मे, १९५९ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील यांचा मृत्यू झाला.

ह.रा. महाजनी यांनी 'महाराष्ट्राचे बुकर टी. वॉशिंग्टन' या यथार्थ शब्दांत कर्मवीरांचे वर्णन केले आहे. सातारा येथे कर्मवीरांचे समाधिस्थान व कर्मवीर स्मृतिभवन आहे. तेथे भाऊराव पाटलांच्या स्मृती जतन करण्यात आल्या आहेत.

रयतगीत –

रयते मधुनी नव्या युगाचा माणूस आता घडतो आहे. वटवृक्षाच्या विशालतेचा मोह नभाला पडतो आहे. || धृ ||

कर्मवीरांचे ज्ञान पीठ हे शक्तीपीठ हे ठरते आहे. शाहू–फुल्यांचे समानतेचे तत्त्व मानसी मुरते आहे. धर्म जातीच्या पार गांधींचे मूल्य मानवी जपतो आहे. रयते मधुनी नव्या युगाचा माणूस आता घडतो आहे.|| १ ||

गरिबांसाठी लेणी मोडून, लक्ष्मी वाहिनी झाली आई. कमवा आणि शिका मंत्र हा तरुणाईला प्रेरक होई. स्वावलंबी वृत्ती ठेवूनि, ज्ञानसाधना करतो आहे. रयते मधुनी नव्या युगाचा माणूस आता घडतो आहे. || २||

दिन–दलितांसाठी आण्णा तुमची झिजली चंदन काया अनाथ जीवा सदा लाभली मातृ हृदयी तुमची माया. शून्या मधुनी नवसृष्टीचा निर्मिक तोही ठरतो आहे. रयते मधुनी नव्या युगाचा माणूस आता घडतो आहे. ||३||

जीवनातला तिमिर जावा, प्रबोधनाची पहाट व्हावी, इथे लाभले पंख लेवुनी उंच भरारी नभात घ्यावी प्रतिभाशाली बहुजनांचा वेलू गगनी चढतो आहे. रयते मधुनी नव्या युगाचा माणूस आता घडतो आहे. ||४||

– गीतकार: – विठ्ठल वाघ.

महाराष्ट्रातील जनतेने त्यांना कर्मवीर (कृतींचा राजा) ही उपाधी देऊन सन्मानित केले.

भारत सरकारने १९५९ मध्ये पद्मभूषण हा भारताचा तिसरा सर्वोच्च नागरी सन्मान दिला.

१९८८ मध्ये त्यांच्या सन्मानार्थ टपाल तिकीट प्रकाशित करून भारत सरकारने भाऊराव पाटील यांचा सन्मान केला.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २३ सप्टेंबर २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, पोठ्ठपाद मासो, सोमवार, भाद्रपद माहे.

२३ सप्टेंबर १९१७ – रोजी "संकल्प दिवस." या दिवशी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांची, सामान्य जन्नांची परिस्थिती बदलण्याचा संकल्प केला. इंग्लंडहून परत आल्यावर डॉ. आंबेडकर वडोदरा येथे पोहोचले आणि तेथे पारसी गेस्ट हाऊसमध्ये राहिले व तेथे त्यांचा अपमान झाला तसेच त्यांचे सामान बाहेर फेकण्यात आले. त्याचं क्षणी त्यांनी वडोदराहून मुंबईला परत जाण्याचा संकल्प केला, परंतु दुर्दैवाने त्यांची गाडी सुमारे पाच तास उशिराने सुटणार होती. त्यामुळे त्यांना सयाजीबागमध्ये आपला वेळ घालवावा लागला, ज्याला आज संकल्प भूमी म्हणून ओळखल्या जाते. येथेच त्यांनी देशात अस्पृश्य (वंचित पीडित) व सामान्य जनांशी वागण्याचे प्रकार बदलण्याचा संकल्प केला.

२३ सप्टेंबर १९३१ – रोजी मुखेड सत्याग्रह मराठा विरुद्ध महार यांच्यात चकमक झाली.

२३ सप्टेंबर १९३२ – रोजी गोगटे पंथाच्या पुण्यातील काही विद्यार्थ्यांनी गुप्त सभा घेऊन माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा खूण करण्याचा कट रचला.

२३ सप्टेंबर १९३२ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व प्रांतातील विधिमंडळात १९७ जागा मागितल्या. तसेच प्राथमिक निवडणुकीची पद्धत दहा वर्षांनी रद्द करावी, परंतु पंधरा वर्षांनी राखीव जातीच्या पद्धतीविषयी अस्पृश्यांचे सार्वमत घ्यावे असा आग्रह धरला.

२३ सप्टेंबर १९४४ – रोजी पेरियार रामस्वामी नायकर आणि माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट झाली.

२३ सप्टेंबर १९४४ – रोजी मद्रास (चेन्नई) येथे शेड्युल्ड कास्टस फेडरेशनच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीला माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते.

२३ सप्टेंबर १९४४ – रोजी मद्रास (चेन्नई) रेल्वे अस्पृश्य वर्गीय कामगारांतर्फे मजूर मंत्री माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानपत्र देण्यात आले.

२३ सप्टेंबर १९५६ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपण विजयादशमीला १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरला सकाळी बौद्ध धंम्म स्विकारणार असल्याचे प्रसामाध्यमांतून जाहीर केले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २४ सप्टेंबर २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, पोठ्ठपाद मासो, मंगळवार, भाद्रपद माहे.

२४ सप्टेंबर १८७३ – रोजी महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

२४ सप्टेंबर १९३१ – रोजी लंडन येथे माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर व मोहनदास करमचंद गांधी यांची दुसरी भेट झाली.

२४ सप्टेंबर १९३२ – रोजी पुणे करार काँग्रेस नेत्यांशी वाटाघाटी झाली आणि शेवटी तडजोड मान्य होवून त्या करारावर उभय पक्षाच्या नेत्यांच्या सह्या झाल्या, ज्याला 'पुणे करार' म्हणून ओळखल्या जाते. माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मोहनदास करमचंद गांधीना जीवदान देऊन पुणे करारावर सह्या केल्या.

२४ सप्टेंबर १९४१ – रोजी परळी येथील सभेत "इंग्रजांना वाचविण्यासाठी नव्हे तर आपल्या घराची राख रांगोळी होऊ नये म्हणून सैन्यात सामील व्हा." असे माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांना आव्हाहन केले.

२४ सप्टेंबर १९४४ – रोजी मद्रास (चेन्नई) येथे बुद्धिवादी सभेने (रॅशन्यालिस्ट असोशियशन) आयोजित केलेल्या सभेत भाषण करताना माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वेदांवर व गीतेवर टीका करून कडाडून हल्ला केला होता.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २५ सप्टेंबर २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, पोठ्ठपाद मासो, बुधवार, भाद्रपद माहे.

२५ सप्टेंबर १९२८ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबईतील दादर गणेशोत्सवात 'अस्पृश्यता निवारणाची अस्पृश्यांनी चालविलेली चळवळ व तिच्यावर ब्राम्हणातील स्पृश्य जतिकडून घेण्यात येणाऱ्या आक्षेपांचा विचार' या विषयावर भाषण केले. सदर भाषण दिनांक ५ ऑक्टोबर १९२८ रोजी समता वृतपत्रात प्रकाशित झाले.

२५ सप्टेंबर १९३० – रोजी पनवेल जवळील चिरनेर खेड्यात जंगल सत्याग्रह सुरू झाला. त्यात काही सरकारी नोकरदार गद्दार झाले होते. ही केस माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतली.

२५ सप्टेंबर १९३२ – रोजी कोर्टातील इंडियन मर्चंटस असोशिएशनच्या हॉलमध्ये मुंबई नागरिक इमर्जन्सी कौन्सिल तर्फे पंडित मदन मोहन मालवीय यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी सभा भरवून पुणे कराराला सर्वानुमते संम्मती देण्यात आली.

२५ सप्टेंबर १९४७ – रोजी मुंबई येथे माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी "सिद्धार्थ महाविद्यालय संसद" याचे उद्घाटन केले.

२५ सप्टेंबर १९५१ – रोजी सरकारने हिंदू संहिता विधेयक (हिंदू कोड बिल) मंजूर करण्यास नकार दिल्यावर माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायदेमंत्री म्हणून नेहरूंच्या मंत्रिमंडळातून राजीनामा दिला.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २६ सप्टेंबर २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, पोठ्ठपाद मासो, गुरूवार, भाद्रपद माहे.

२६ सप्टेंबर १९३६ – रोजी सवर्ण हिंदूंनी अस्पृश्यांवर केलेल्या अत्याचाराची सरकारी अधिकाऱ्यांनी चौकशी करून आवश्यक ती कारवाइं करावी अशी विनंती पतितपावन मध्ये आर. जी. घोडियोर, भंडारा यांनी प्रसिद्ध केली.

२६ सप्टेंबर १९४४ – रोजी रामचंद्रपुरमला येथे माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्वागत करण्यात आले.

२६ सप्टेंबर १९४४ – रोजी वेलांगी या गावच्या अस्पृश्यांनी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानपत्र दिले.

२६ सप्टेंबर १९४४ – रोजी इस्ट गोदावरी डिस्ट्रिक्ट बोर्डतर्फे माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानपत्र दिले. मानपत्राला उत्तर देताना त्यांनी 'भारताची सध्याची परिस्थिती व तीत देशाचे हिताचे धोरण कोणते?' याबद्दल भाषण केले.

२६ सप्टेंबर १९४४ – रोजी आंध्र प्रदेशातील काकिनाडा येथील सभेत माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानपत्र अर्पण करण्यात आले. यावेळी ते म्हणाले, "ब्राम्हणेतर लोक ब्राम्हणी जातिभेदाच्या विषाने मानवी सद्‌गुणांना मुकले."

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २७ सप्टेंबर २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, पोठ्ठपाद मासो, शुक्रवार, भाद्रपद माहे.

२७ सप्टेंबर १९३२ – रोजी मोहनदास करमचंद गांधीनी उपोषण सोडले.

२७ सप्टेंबर १९५१ – रोजी हिंदू कोड बिल पास न झाल्याने माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या कायदेमंत्री पदाचा राजीनामा पंतप्रधान नेहरू यांना सोपविला. नेहरूंनी तो त्याच दिवशी स्विकारला पण १ ऑक्टोबर १९५१ रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नेहरूंना पत्र पाठवून अशी विनंती केली की, ६ ऑक्टोबर १९५१ रोजी लोकसभेत आपल्या राजीनाम्याविषयी निवेदन करेपर्यंत हा राजीनामा तहकूब समजावा. ४ ऑक्टोबर १९५१ रोजी नेहरूंनी आंबेडकरांना त्यांची विनंती मान्य केल्याचे कळविले. ६ ऑक्टोबर १९५१ रोजी सकाळी १० ते ११ वाजण्याच्या दरम्यान लोकसभेत डॉ. आंबेडकर आपले राजीनाम्याचे निवेदन वाचून दाखविणार होते. परंतु लोकसभेचे उपसभापती अनंतशयनंम अय्यंगार यांनी सायंकाळी ६ वाजता निवेदन वाचण्याचा आदेश दिला. वेळेतील हा बदल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अन्यायकारक वाटल्यामुळे ते रागातच लोकसभेतीतून बाहेर पडले. लोकसभेबाहेर त्यांनी आपले राजीनाम्यासंबंधीचे लिखित निवेदन वर्तमानपत्रांच्या प्रतिनिधींना दिले. त्या निवेदनात डॉ. आंबेडकरांनी आपल्या राजीनाम्यामार्गाची करणे दिली होती.

२७ सप्टेंबर १९७० – रोजी “जागतिक पर्यटन दिन” म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. १९८० पासून जागतिक पर्यटन दिन (World Tourism Day) याच दिवशी साजरा करण्यास सुरुवात झाली कारण संयुक्त राष्ट्राच्या जागतिक पर्यटन संस्थे (UNWTO) ची स्थापना १९७० मध्ये याच दिवशी झाली होती.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २८ सप्टेंबर २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, पोठ्ठपाद मासो, शनिवार, भाद्रपद माहे.

२८ संप्टेंबर १९०७ – भगतसिंग जयंती.

२८ सप्टेंबर १९३१ – रोजी अल्पसंख्यांक समितीच्या कार्यास प्रारंभ झाला.

२८ सप्टेंबर १९३२ – रोजी "देवालयात गेल्याने तुमचा उद्धार होणार नाही." हे पुणे करारानंतर केलेले पहिले जाहीर भाषण होय, जे माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबई येथे केले होते. ही बिडीडी चाळ, मुंबई, वरळी पटांगणात जाहीर झाली होती.

२८ सप्टेंबर १९४४ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना राजमहेंद्र येथे मानपत्र अर्पण करण्यात आले. उत्तरादाखल भाषणात, "गांधींना वर्णाश्रम धर्म नष्ट करावयाचा नाही. त्यांना दूरदृष्टी मुळीच नाही." असे उद्गार त्यांनी काढले.

२८ सप्टेंबर १९५२ – रोजी जनसंमेलन, नरे पार्क, मुंबई येथे "सार्वजनिक पैशांचा अपहार करण्यासारखे नीच कृत्य दुसरे नाही." असे उद्गार माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी काढले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २९ सप्टेंबर २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, पोठ्ठपाद मासो, रविवार, भाद्रपद माहे.

२९ संप्टेंबर १९३४ – रोजी मुंबईतील पोयबावडी वरील कामगार मैदानावर पुणे कराराची स्मृती जागृत ठेवण्यासाठी झालेल्या प्रचंड जाहीर सभेत माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "गुलाम म्हणून अपमान किती दिवस सहन करणार?" सदर भाषण जनता वृत्तपत्रात दिनांक २० ऑक्टोबर १९३४ रोजी प्रकाशित झाले.

२९ सप्टेंबर १९४४ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अखिल भारतीय दलित फेडरेशनचे जनरल सेक्रेटरी श्री. पी. एन. राजभोज यांनी पुणे येथे चाहापार्टी दिली. त्यावेळी त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "बुद्धांच्या वेदावरील हल्ल्यामुळेच शुद्रांचा सेवाधर्म जाऊन ते राज्यकर्ते झाली."

२९ सप्टेंबर १९५० – रोजी मुंबईतील वरळी येथील बुद्ध विहारात माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या हाल अपेष्टा थांबविण्यासाठी लोकांनी बौद्ध धंम्म स्विकारावा हा उपदेश दिला.

२९ सप्टेंबर १९५६ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय दलित फेडरेशनच्या वर्किंग कमेटीने दलित फेडरेशन बरखास्त करून रिपब्लिकेशन पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ३० सप्टेंबर २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, पोठ्ठपाद मासो, सोमवार, भाद्रपद माहे.

३० संप्टेंबर १९२० – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स' या संस्थेमध्ये एम. एस्सी. साठी पुन्हा प्रवेश घेतला. तसेच 'ग्रेज इन' या संस्थेत नाव दाखल करून कायद्याचासुद्धा अभ्यास पुन्हा सुरू केला.

३० सप्टेंबर १९५६ – रोजी शेड्युल्ड कास्टस फेडरेशनच्या कार्यकारिणीची बैठक माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दिल्ली निवासस्थानी संप्पंन्न झाली. एक पक्षीय हुकुमशाही पासून लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी बलवान विरोधी पक्ष स्थापन करण्याचे व त्या पक्षाला 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' हे नाव देण्याचे निश्चित करण्यात आले. तसेच त्यात 'शेड्युल्ड कास्टस फेडरेशन' चे विसर्जन करण्याचा ठराव सुद्धा संम्मत करण्यात आला.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

'धम्मपद' एक अनुपम श्रेष्ठ ग्रंथ

धम्मपद बुद्ध वचन है। इसमें गाथाएं मात्र है। धम्मपद बुद्ध धम्म का ही नहीं, बल्कि संपूर्ण श्रमण संस्कृति का एक महत्वपूर्ण ग्रंथ माना जाता है। *'धम्मपद' बौद्ध साहित्य का सर्वोत्कृष्ट लोकप्रिय श्रेष्ठ ग्रंथ है। इसमें तथागत बुद्ध के उपदेशों का संग्रह है। बुद्ध वचन यानी कल्याणकारी उपदेश। मनुष्य के कल्याण के लिए बुद्ध ने ४५ वर्ष तक जो उपदेश दिए उनमें से चुनकर 'धम्मपद' ग्रंथ बना है। मानो स्वास्थ्य वर्धक सुगंधित फुलों को एक टोकरी में भरा है।*

'धम्मपद' एक पालि शब्द है। जिसका अर्थ है – "सिद्धांत के शब्द" या "सत्य का मार्ग"। *'धम्मपद' मूल बौद्ध शिक्षाओं का संग्रह है, जो आसान सूक्तियों की शैली में हैं। सुत्तपिटक के खुद्दकनिकाय के दूसरे पाठ के रूप में 'धम्मपद' में २६ वग्ग में ४२३ गाथाएं हैं।*

'धम्मपद' ग्रंथ की शुरुआत मन – Mind के विषय से होती है।

जैसे प्रथम दो गाथाएं है –

"मनोपुब्बंगमा धम्मा मनोसेट्ठा मनोमया। मनसा चे पदुट्ठेन, भासति वा करोति वा। ततो नं दुक्खमन्वेति चक्कं व वहतो पदं ।।" (१)

दूसरी गाथा है –

"मनोपुब्बंगमा धम्मा मनोसेट्ठा मनोमया। मनसा चे पसन्नेन, भासति वा करोति वा, ततो नं सुखमन्वेति छाया व अनपायिनी ।।" (२)

इस महान ग्रंथ के प्राकृत, संस्कृत और चीनी भाषा में संस्करण और अन्य भाषाओं में अनुवाद भी उपलब्ध हैं। दुनिया की सभी भाषाओं में 'धम्मपद' ग्रंथ का अनुवाद हुआ है।

'धम्मपद' ग्रंथ थेरवाद और महायान, दोनों परंपराओं को मानने वाले बौद्ध देशों में लोकप्रिय है। *श्रीलंका में 'धम्मपद' को शताब्दियों से नवदीक्षित भिक्षुओं के मार्गदर्शन के लिए इस्तेमाल किया जा रहा है और कहा जाता है कि प्रत्येक भिक्षु को यह कंठस्थ है।*

संगीतकारों ने संकलन करते समय विषय क्रम को ध्यान में रखते हुए चार सौ तेईस (४२३) गाथाओं को छब्बीस वर्गों (पालि भाषा में वग्ग) में संकलित किया। संकलन बनाते हुए उन्होंने कालक्रम का कोई ध्यान नहीं रखा, सिर्फ विषय का ध्यान रखा।

बुद्ध धम्म को जानने और समझने के लिए और अपने कल्याण के लिए इस ग्रंथ पढ़ना चाहिए और उनमें बताए गए उपदेशों का अनुसरण करना चाहिए। ऐसे अनुसरण करने वाले का जीवन सुगंधित पुष्प की तरह हमेशा महकता रहता है और सुखमय जीवन बिताता है।

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐

हर रविवार बुद्धविहार, बुद्धगुफाऐं में जाना ही चाहिये – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐

सर्वांचे मंगल हो, सबका मंगल हो, Be Happy

☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

संपत्ती किंवा मालमत्ता हेच जीवनाचे सर्वस्व होऊ शकत नाही. मनाची शुद्धि आवश्यक आहे. माणसाने शील, करूणा, दया, शांती इत्यादी उच्च विचारांनी प्रेरित होऊन जगात प्रेमाचे व शांतीचे राज्य निर्माण करण्यास झटले पाहिजे. धंम्मप्रचारासाठी भिक्खूंची गरज आहे. पण हे भिक्खू नुसती पिवळी वस्त्रे धारण करणारी नसावीत, तर त्यांनी बौद्ध धंम्माच्या प्रसारासाठी खऱ्या अर्थाने भिक्खूंचे कार्य केले पाहिजे. लोकात हिंडून त्यांना खऱ्या अर्थाने बौद्ध धंम्माचे ज्ञान सांगितले पाहिजे. त्यांच्यात धंम्माबद्दलची आस्था निर्माण केली पाहिजे. स्वतःपुरते व स्वतःच्या ज्ञानापुरते त्यांनी आपले कार्यक्षेत्र मर्यादित न ठेवता जनतेच्या कल्याणासाठी झटले पाहिजे. त्यांना धंम्माची नीती, तत्त्वे शिकविली पाहिजेत व जुने वाईट संस्कार, जे अनादि कालापासून लोकांवर झाले आहेत व ज्यात ते गुरफटून गेले आहेत, त्यापासून त्यांची मुक्तता केली पाहिजे. पवित्र मनाने कार्य करून या देशातील अज्ञान, दुःख, पिळवणूक आणि गरिबी दूर करण्यासाठी झटले पाहिजे. सन्मार्गाने जाऊन या देशाचे भवितव्य उज्वल केले पाहिजे. भगवान बुद्धाच्या काळात ज्याप्रमाणे हा देश वैभवाच्या व ऐश्वर्याच्या शिखरावर आरूढ झाला होता, त्याचप्रमाणे आता हा देश त्याच वैभवाच्या शिखरावर नेण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे.

सर्व बौद्धजनहो आणि उपस्थित पाहुणे मंडळी, काल आणि आज सकाळी जो बौद्ध दीक्षा घेण्याचा व देण्याचा विधी समारंभ या ठिकाणी घडून आला त्याचे स्थान, विचारवंत लोकांना कदाचित अवघड वाटत असेल. त्यांच्या व माझ्याही मताने कालचा समारंभ आज व आजचा समारंभ काल व्हावयास पाहिजे होता. आपण हे कार्य अंगावर का घेतले, त्याची जरूरी काय व त्याने काय होईल, याची छाननी करून घेणे आवश्यक आहे. ते समजावून घेण्यानेच आपल्या कार्याचा पाया मजबूत होईल. हे समजावून घेण्याचे कार्य आधी व्हावयास हवे होते. परंतु काही गोष्टी अशा अनिश्चित असतात की त्या आपोआपच घडत असतात. आता या विधीबाबत व्हावयाचे तसे घडले आहे खरे, तथापि अशी दिवसांची अदलाबदल झाली तरी काही बिघडले नाही.

पुष्कळसे लोक मला प्रश्न करतात की या कार्याकरिता तुम्ही नागपूर हेच शहर का ठरविले? अन्य ठिकाणी हे कार्य का केले नाही? काही लोक असे म्हणतात की आर. एस. एस. ची राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची मोठी पलटण नागपूर येथे असल्यामुळे त्यांच्या उरावरती म्हणून आम्ही ही सभा या शहरात घेतली आहे. हे मुळीच खरे नाही. त्यासाठी नागपूर येथे हे कार्य घेतलेले नाही. आमचे कार्य इतके मोठे आहे की आयुष्यातील एक–एक मिनिट देखील कमी पडतो. आपले नाक खाजवून दुसऱ्याला अपशकूनकरण्यासाठी मजजवळ वेळ नाही.

हे ठिकाण निवडण्याचे कारण निराळे आहे. ज्यांनी बौद्ध इतिहासाचे वाचन केले असेल त्यांना हे कळून येईल की भारतात बौद्ध प्रसार जर कोणी केला असेल तर तो नाग लोकांनी केला. नाग लोक आर्याचे भयंकर शत्रू होते. आर्य व अनार्य यांच्यामध्ये लढाया व तुंबळ युद्धे झाली. आर्य लोकांनी नागाला जाळून टाकल्याचे दाखले पुराणात सापडतात. अगस्ती मुनीने त्यातून फक्त एक नाग मनुष्य वाचविला. त्याचेच आपण वंशज आहोत. ज्या नाग लोकांना एवढा छळ सोसावा लागला त्यांना वर येण्यास कोणी महापुरूष हवा होता; त्यांना तो महापुरूष गौतम बुद्ध भेटला. भगवान बुद्धाचा उपदेश नाग लोकांनी सर्व भारतामध्ये पसरविला. असे आपण नाग लोक आहोत. नाग लोकांची मुख्य वस्ती नागपूर येथे व आसपास होती असे दिसते. म्हणून या शहरास 'नाग–पूर' म्हणजे नागांचे गाव असे म्हणतात. येथून सुमारे २७ मैलावर नागार्जुनाची टेकडी आहे. नजिकच वाहणारी जी नदी आहे ती नाग नदी आहे. अर्थातच या नदीचे नाव येथे राहाणाऱ्या लोकांवरून पडले आहे. नागांच्या वस्तीमध्ये वाहणारी जी नदी ती नाग नदी आहे.

हे स्थळ निवडण्याचे हे मुख्य कारण आहे. नागपूर यामुळे निवडले आहे. यामध्ये कोणालाही खिजविण्याचा कोठेच प्रश्न नाही. तशी भावनाही नाही. आर. एस. एस. चे कारण माझ्या मनाला शिवलेही नाही. तसा कोणी अर्थ करून घेऊ नये.

इतर कारणावरून कदाचित विरोध वाटू शकेल. हे ठिकाण विरोधासाठी पसंत केलेले नाही हे आता मी सांगितलेच आहे. मी हे जे कार्य आरंभले आहे त्यासाठी माझ्यावर अनेक लोकांनी व वृत्तपत्रांनी टीका केलेली आहे. काहींची टीका कडक आहे. त्यांच्या मते मी माझ्या गरीब बिचाऱ्या व अस्पृश्य लोकांना भलतीकडेच नेत आहे. आज जे अस्पृश्य आहेत ते तसेच अस्पृश्य राहातील व जे हक्क अस्पृश्यांना मिळाले आहेत ते मात्र नष्ट होतील, असे सांगून आमच्यातील काही लोकांना ते बहकवीत (फूट) आहेत. आमच्यातील अज्ञ लोकांना पगदंडीने जा असे ते म्हणतात. आमच्यातील काही तरूण व वयोवृद्ध लोकांवर कदाचित त्याचा परिणाम होत असेल. त्यामुळे लोकांच्या मनामध्ये संशय निर्माण झाले असतील तर त्या संशयाची निवृत्ती करणे आपले कर्तव्य आहे आणि अशा संशयाची निवृत्ती करणे म्हणजे आपल्या या चळवळीचा पाया मजबूत करणे आहे.

मागे आपण लोकांनी मांस खाऊ नये म्हणून चळवळ केली होती. त्यामुळे स्पृश्य लोकांवर मोठी गदा आल्याप्रमाणे त्यांना वाटत होते. त्यांनी जिवंत म्हशीचे दूध प्यावयाचे आणि ती म्हैस मेल्यानंतर मात्र आम्ही मृत म्हशीला खांद्यावर घेऊन जावयाचे, हा प्रकार विचित्र नव्हे काय? आम्ही त्यांना म्हणतो की तुमची म्हातारी मेली तर तिला आम्हाला का नेऊ देत नाही? त्यांनी मेलेली म्हैस द्यावी तशी म्हातारीही द्यावी. त्यावेळी कोणीतरी मनुष्य 'केसरी' मधून पत्रव्यवहार करून, अमुक–अमुक गावी दर वर्षाला ५० ढोरे मरतात, त्यांच्या कातड्यांची, शिंगांची, हाडांची, मांसाची, शेपटीची, खुरांची मिळून ५०० रुपये इतकी किंमत होईल व मृत मांस सोडल्यामुळे एवढ्या प्राप्तीला हे लोक मुकतील, असा प्रचार त्यावेळी केसरी मधून होत असे. त्याच्या प्रचाराला उत्तर द्यावयाची आवश्यकता खरे म्हणजे काय होती? पण आमच्या लोकांना असे वाटे, या गोष्टीला आमचा साहेब उत्तर देत नाही, तर साहेब करतो तरी काय?

एकदा मी संगमनेरला सभेला गेलो होतो. सभा झाल्यानंतर संध्याकाळी जेवणाची व्यवस्था केली होती. त्यावेळी मजकडे एक चिठ्ठी केसरीच्या त्या बातमीदाराने पाठविली व मला विचारले, "अहो, तुम्ही तर तुमच्या लोकांना मेलेली ढोरे ओढू नका म्हणून सांगता. त्यांची हलाखी किती आहे? त्यांच्या बायकांना लुगडे चोळी नाही, त्यांना अन्न नाही, त्यांना शेतीवाडी नाही, अशी त्यांची अत्यंत बिकट परिस्थिती असता, दरवर्षी त्यांना मिळणारे कातड्यांचे, शिंगांचे, मांसाचे ५०० रुपयांचे उत्पन्न फेकून द्या म्हणून सांगता, यात तुमच्या लोकांचा तोटाच नाही काय?"

मी म्हणालो, तुम्हाला याचे उत्तर कोठे देऊ? ते येथे पडवीत देऊ की सभेत देऊ? लोकांच्या समोरच सवालपट्टी झालेली बरी. मी त्या गृहस्थांना विचारले तुमचे म्हणणे एवढेच की आणखी काही आहे? ते गृहस्थ म्हणाले, "एवढेच म्हणणे आहे व एवढ्याचेच उत्तर द्या." मी त्या गृहस्थास विचारले, तुम्हास मुले, तुमच्या घरात माणसे किती आहेत? त्यांनी सांगितले मला पाच मुलगे आहेत, भावालाही ५/७ मुले आहेत. मी म्हणालो तर तुमचे कुटुंब मोठे आहे. तेव्हा तुम्ही व तुमच्या नातेवाईकांनी त्या गावची मेलेली सर्व ढोरे ओढावीत आणि ५०० रुपयांचे उत्पन्न घ्यावे. हा फायदा तुम्ही अवश्य घ्यावा. शिवाय दरवर्षी मी स्वतः तुम्हाला ५०० रुपये वर देण्याची व्यवस्था करतो, माझ्या लोकांचे काय होईल, त्यांना अन्न, वस्त्र मिळेल की नाही ते माझे मी पाहीन, मग एवढी फायद्याची गोष्ट तुम्ही का सोडून देता? तुम्ही का हे करीत नाही? आम्ही हे काम केले म्हणजे फायदा होतो, आणि तुम्ही केले म्हणजे फायदा नाही? ओढा ना तुम्ही मेलेली ढोरे !

काल एक ब्राह्मणाचा मुलगा मजकडे येऊन म्हणाला, "पार्लमेंट, असेब्ल्यांमध्ये तुमच्या लोकांना राखीव जागा दिल्या आहेत, त्या तुम्ही का सोडता?" मी त्यास म्हणालो, तुम्ही महार व्हा व त्या जागा पार्लमेंट, असेब्ल्यांमध्ये भरा. नोकरी खाली असली की त्या जागा भरतात. त्यासाठी कोणा ब्राह्मणांचे, कोणा इतरांचे किती अर्ज येतात! मग नोकऱ्यांच्या जागा भरतात तशा या राखीव जागा तुम्ही ब्राह्मण लोक महार बनून का भरत नाही?

आमचे नुकसान झाले तर तुम्ही का रडता, असा माझा त्यांना सवाल आहे. खरे म्हणजे मनुष्यमात्राला इज्जत प्यारी असते. लाभ प्यारा नसतो. सद्गुणी व सदाचारी बाईला व्यभिचारामध्ये किती फायदा असतो हे माहीत असते; आमच्या मुंबईत, व्यभिचारी बायांची एक वस्ती आहे. त्या बाया सकाळी ८ ला उठल्या की न्याहारीसाठी शेजारच्या हॉटेलात वर्दी देतात आणि म्हणतात (डॉक्टरसाहेबांनी यावेळी आवाजात फरक करून नक्कल करून सांगितले) "सुलेमान, अरे खिम्याची प्लेट व पावरोटी घेऊन ये." तो सुलेमान ते घेऊन येतो, शिवाय चहा, पाव केक वगैरेही आणतो. पण माझ्या दलितवर्गीय भगिनींना साधी चटणीभाकरी देखील मिळत नाही; मात्र त्या इज्जतीने राहातात. त्या सदाचारानेच राहातात.

आम्ही झगडतो आहोत ते इज्जतीकरिता ! मनुष्यमात्राला पूर्णावस्थेस नेण्याकरिता आम्ही तयारी करीत आहोत, त्यासाठी वाटेल तो त्याग करण्याची आमची तयारी आहे. हे वृत्तपत्राचे लोक (त्यांच्याकडे वळून) माझ्या मागे गेली ४० वर्षे हात धुवून लागले आहेत. माझ्यावर केवढी टीका त्यांनी आजवर केली! मी त्यांना म्हणतो, अजून तरी विचार करा, आतातरी पोरकटपणाची भाषा सोडून काही प्रौढ भाषा वापरा.

आम्ही बौद्ध धंम्मिय झालो तरी राजकीय हक्क मी मिळवीन याची मला बालंबाल खात्री आहे. (डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जयघोष व प्रचंड टाळ्या) मी मेल्यावर काय होईल ते सांगता येणार नाही. या चळवळीसाठी फार मोठे काम करावे लागेल. आम्ही बौद्ध धंम्म स्वीकारल्यामुळे काय होईल, अडचणी आल्याच तर त्या कशा टाळता येतील, त्यासाठी काय युक्तिवाद व खटाटोप करावा लागेल, याचा मी पूर्ण विचार केला आहे. माझ्या पोतडीत सर्व काही भरलेले आहे. ते काय प्रकाराने भरले आहे ते मला पूर्ण माहीत आहे. हे जे हक्क मिळविले ते मीच माझ्या लोकांच्यासाठी मिळविले. ज्याने हे हक्क मिळविले ते तो पुन्हा मिळवून देईलच ! हे हक्क व सवलती मिळवून देणारा मीच आहे; आणि मी पुन्हा या सवलती मिळवून देईन अशी मला खात्री आहे. म्हणून सध्या तरी तुम्ही माझ्यावर विश्वास ठेऊनच चालले पाहिजे. विरोधी प्रचारात काही तथ्य नाही हे मी सिद्ध करून देईन.

मला एका गोष्टीचे मात्र आश्चर्य वाटते. एवढा वादविवाद सर्वत्र होतो आहे. पण एकाही माणसाने "मी बौद्ध धंम्मच का स्वीकारला" हा प्रश्न मला विचारला नाही. कोणताही दुसरा धर्म न स्वीकारता हाच धंम्म का स्वीकारला, हा कोणत्याही धर्मांतराच्या चळवळीतील मुख्य आणि महत्त्वाचा प्रश्न असतो. धर्मांतर करताना धर्म कोणता व का घ्यावयाचा हे तावून सुलाखून पाहिले पाहिजे. आम्ही हिंदू धर्मत्यागाची चळवळ १९३५ पासून येवले येथे एक ठराव करून हाती घेतली. "मी हिंदू धर्मात जन्मलो तरी हिंदू धर्मात मरणार नाही" अशी प्रतिज्ञा मी मागेच केली होती आणि काल मी ती खरी करून दाखविली. मला इतका आनंद झाला आहे, हर्षवायुच झाला आहे. नरकातून सुटलो असे मला वाटते. मला कोणी अंधभक्त नको आहेत. ज्यांना बौद्ध धंम्मात यावयाचे आहे त्यांनी जाणिवेने आले पाहिजे. त्यांना तो धंम्म पटला पाहिजे.

मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला धंम्म ही अत्यंत आवश्यक वस्तू आहे. मला माहीत आहे की कार्ल मार्क्सच्या वाचनामुळे एक पंथ निघाला आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणे धर्म म्हणजे काहीच नाही. त्यांना धर्माचे महत्व नाही. त्यांना सकाळी ब्रेकफास्ट (न्याहारी) मिळाली, त्यात पाव, मलई, लोणी, कोंबडीची टांग वगैरे असले, पोटभर जेवण मिळाले, निवांत

झोप मिळाली, सिनेमा पाहावयास मिळाला की सगळं संपलं. हे त्यांचं तत्त्वज्ञान ! मी त्या मताचा नाही. माझे वडील गरीब होते ! म्हणून मला या प्रकारचे सुख काही मिळालेले नाही. माझ्याइतके कष्टमय जीवन कोणीही आयुष्यात काढलेले नाही. म्हणून माणसाचे जीवन सुखसमाधानाच्या अभावी कसे कष्टमय होते याची मला जाणीव आहे. आर्थिक उन्नतीची चळवळ आवश्यक आहे असे मी मानतो. त्या चळवळीविरुद्ध मी नाही. माणासाची आर्थिक उन्नती व्हावयास पाहिजे.

पण मी याबाबत एक महत्त्वाचा फरक करतो. रेडा, बैल व माणूस यामध्ये फरक आहे. रेडा व बैल यांना रोज वैरण लागते. माणसासही अन्न लागते. मात्र दोहोत फरक आहे की रेडा व बैल यांना मन नाही; मनुष्याला शरीराबरोबर मनही आहे. म्हणून दोन्हीचाही विचार करावयास हवा. मनाचा विकास झाला पाहिजे. मन सुसंस्कृत झाले पाहिजे. ते सुसंस्कृत बनविले पाहिजे. ज्या देशातील लोक अन्नाशिवाय माणसाचा सुसंस्कृत मनाशी संबंध नाही असे म्हणतात त्या देशाशी अगर लोकांशी संबंध ठेवण्याचे मला काहीच प्रयोजन नाही. जनतेशी संबंध ठेवताना माणसाचे शरीर जसे निरोगी पाहिजे तसे शरीर सुदृढ होण्याबरोबर मनही सुसंस्कृत झाले पाहिजे. एरवी मानव जातीचा उत्कर्ष झाला असे म्हणता येणार नाही.

मनुष्याचे शरीर अथवा मन हे रोगी का असते? त्याची कारणे ही की त्यास एकतर शारीरिक पीडा असते किंवा मनाला उत्साह नसतो. मनात उत्साह नसेल तर अभ्युदयही नाही. हा उत्साह का राहात नाही? त्याचे पहिले कारण हे की मनुष्यास अशा रीतीने ठेवण्यात आले आहे की त्याला वर येण्याची संधी मिळत नाही; अगर आशा राहात नाही. त्यावेळी त्यास उत्साह कोठून असणार? तो रोगीच असतो. ज्या माणसाला आपल्या कृतीचे फळ मिळू शकते, त्यास उत्साह प्राप्त होतो. नाही तर शाळेत शिक्षक असे म्हणू लागला की कोण रे हा? हा तर महार! आणि महारडा पहिल्या वर्गात पास होणार? याला प्रथम श्रेणी कशाला पाहिजे? तू आपला तृतीय श्रेणीतच राहा–पहिल्या वर्गात येणे हे ब्राह्मणाचे काम ! अशा व्यवस्थेत त्या मुलाला काय उत्साह मिळणार? त्याची उन्नती ती काय होणार? उत्साह निर्माण करण्याचे मूळ मनात आहे. ज्याचं शरीर व मनही धडधाकट असेल, जो हिम्मतबाज असेल, मी कोणत्याही परिस्थितीतून झगडून बाहेर पडेल असा ज्यास विश्वास वाटतो, त्यांच्यामध्येच उत्साह निर्माण होतो व त्याचाच उत्कर्ष होतो. हिंदू धर्मात अशी काही विलक्षण तत्त्वप्रणाली ग्रंथित केलेली आहे की त्यापासून उत्साहच वाटत नाही. माणसाला निरूत्साही करून टाकणारी परिस्थिती हजारो वर्षे टिकली तर जास्तीत जास्त कारकुनी करून पोट भरणारे लोक होतील. या पलिकडे दुसरे काय होणार? या कारकुनांचे रक्षण करावयास मोठा कारकून पाहिजे.

मनुष्याच्या उत्साहाला काही कारण असेल तर मन, तुम्हाला मिलचे मालक माहीत आहेत. ते गिरण्यावर मॅनेजर नेमतात व त्यांच्याकरवी मिलमधील काम करवून घेतात. हे मिलचे मालक कसल्या ना कसल्या व्यसनात असतात, त्यांच्या मनाचा सुसंस्कृत असा विकास झालेला नसतो. आपल्या मनाला उत्साह वाटावा म्हणून आपण चळवळ केली, तेव्हा कोठे शिक्षण सुरू झाले. मी लंगोटी घालून शिक्षणाला सुरूवात केली. शाळेमध्ये मला प्यावयास पाणी सुद्धा मिळाले नाही. पाण्याशिवाय शाळेत मी किती तरी दिवस काढले ! मुंबईसारख्या एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये देखील अशीच परिस्थिती होती. अशी परिस्थिती असेल तर दुसरी काय अवस्था होणार? कारकुनीच निर्माण होईल !

मी दिल्लीच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलमध्ये असताना लॉर्ड लिन्लिथगो व्हाईसरॉय होते. मी त्यांना म्हणालो, तुम्ही सर्वसामान्य खर्च तर करताच, पण मुसलमानांकरता अलिगड युनिव्हर्सिटीस तीन लाख रूपये शिक्षणाकरता खर्च करता. त्याचप्रमाणे बनारसच्या हिंदू विद्यापीठासही तुम्ही तीन लाख रुपये देता. मात्र आम्ही हिंदू नाही की मुसलमान नाही. आमच्यासाठी काही करावयाचे म्हटले तर त्यांच्या हजारो पटीने जास्त करावयास हवे. निदान आमच्यासाठी मुसलमानाइतके तरी करा. तेव्हा लिन्लिन्थगोने सांगितले, तुम्हाला याबाबत काय लिहून आणावयाचे ते आणा, त्याप्रमाणे मी एक मेमोरॅंडम लिहिले. ते चोपडे अजून मजजवळ आहे. युरोपियन लोक मोठे सहानुभूतीचे होते. त्यांनी माझे म्हणणे मान्य केले. पण घोडे जे पेंड खाऊ लागले ते हे पैसे कोणत्या गोष्टीवर खर्च करावयाचे त्यावर त्यांना वाटत होते, आमच्यातील मुली शिकलेल्या नाहीत, त्यांना शिक्षण द्यावे, त्यांची बोर्डिंग काढावीत व त्यावर, ते पैसे खर्च करावेत. आमच्यातील मुलींना शिकविले व सुशिक्षित केले तरी त्यांना वेगवेगळ्या पक्वान्नांचे पदार्थ करावयास घरी सामान कोठे आहे? त्यांच्या शिक्षणाचा शेवटी परिणाम काय? इतर गोष्टीवरील रक्कम सरकारने खर्च केली व शिक्षणावरील अडवून ठेवली.

म्हणून एके दिवशी मी लिन्लिथगोकडे गेलो आणि या शिक्षणावरील खर्चाबाबत म्हणालो, तुम्हाला राग येणार नसेल तर एक प्रश्न विचारतो. मी एकटा ५० ग्रॅज्युएटच्या समान आहे की नाही? ते त्यांना मान्य करावे लागले. नंतर मी पुन्हा विचारले, याचे कारण काय? ते म्हणाले, 'ते कारण आम्हास माहीत नाही' मी म्हणालो की माझी विद्वता एवढी मोठी आहे की मी राजवाड्याच्या टोकावर जाऊन बसू शकतो. मला अशी माणसे हवी आहेत. कारण तेथून सर्वत्र टेहळणी करता येते. आमच्या लोकांचे संरक्षण करावयाचे असेल तर अशी पारध करणारी माणसे निर्माण झाली पाहिजेत. कारकून काय करणार? त्यासरशी लिन्लिथगोस माझे म्हणणे पटले, व त्या वर्षी १६ विद्यार्थ्यांना विलायतेत उच्च शिक्षण घेण्यासाठी पाठविण्यात आले. त्या १६ जणांपैकी काही मडकी जशी कच्ची काही पक्की असतात त्याप्रमाणे काही कच्ची काही पक्की निघाली. ही गोष्ट निराळी ! पुढे राजगोपालाचारी यांनी ही उच्च शिक्षणाची योजना रद्द करून टाकली.

या देशात आम्हाला हजारो वर्षे निरूत्साही करून ठेवील, अशी परिस्थिती आहे. ही परिस्थिती जोपर्यंत आहे तोपर्यंत आपल्या उन्नतीबद्दल उत्साह उत्पन्न होणे शक्य नाही. याबाबतीत या धर्मात राहून आम्ही काहीच करू शकत नाही. मनुस्मृतीमध्ये चातुर्वर्ण्य सांगितले आहे. चातुर्वर्ण्य व्यवस्था है मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला अत्यंत घातक आहे. मनुस्मृतीत लिहिले आहे की शुद्रांनी फक्त सेवा चाकरी करावी. त्यांना शिक्षण कशाला? ब्राह्मणाने शिक्षण घ्यावे, क्षत्रियाने शस्त्रे धारण करावीत, वैश्याने व्यापार उदीम करावा व शूद्राने चाकरी करावी. ही घडी कोण उलगडू शकेल? ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य वर्णाच्या लोकांना काही ना काही फायदा आहे, शुद्रांचे काय? तीन वर्ण सोडले तर इतर जातीत काही उत्साह उत्पन्न होईल काय? चातुर्वर्ण्यची व्यवस्था काही फुकाफुकी नाही; ही रूढी नाही; हा धर्म आहे.

हिंदू धर्मामध्ये समता नाही. गांधींना एकदा मी भेटावयास गेलो असता ते म्हणाले मी चातुर्वर्ण्य मानतो. मी म्हणालो, तुमच्यासारखे महात्मे चातुर्वर्ण्य मानतात ! पण हे चातुर्वर्ण्य कोणते व कसे? (हाताच्या पंजाची बोटे एकावर एक येतील असा हात करून) हे चातुर्वर्ण्य उलट की सुलट; चातुर्वर्ण्यची सुरूवात कोणीकडून व शेवट कोठे? गांधींनी या प्रश्नाचे उत्तर दिले नाही आणि देणार तरी काय? आमचा ज्या लोकांनी नाश केला त्यांचा देखील या धर्माने नाश होईल ! हा मी हिंदू धर्मावर उगीच आरोप करीत नाही. हिंदू धर्मामुळे कोणाचाही उद्धार होऊ शकणार नाही. तो धर्मच नष्टधर्म आहे. आपला देश परकीयांच्या ताब्यात का गेला? युरोपमध्ये १९४५ पर्यंत लढाया चालू होत्या. जेवढे सैन्य मरत असे तेवढे रिक्रुट भरतीमुळे पुढे येत असे. त्यावेळी कोणीही आम्ही लढाई जिंकली असे म्हणू शकले नाही. आमच्या देशाचे सगळे काही निराळे ! क्षत्रिय मेले की आम्ही खलास, आम्हाला जर शस्त्र धारण करण्याचा अधिकार असता तर हा देश पारतंत्र्यात गेला नसता. मग कोणीही हा देश जिंकू शकले नसते.

हिंदू धर्मामध्ये राहून कोणाचा काहीही उद्धार होणार नाही. हिंदू धर्म रचनेप्रमाणे वरिष्ठ वर्णांना व जातींना फायदे आहेत हे खरे आहे. पण इतरांचे काय? ब्राह्मण बाई बाळंतीण झाली की तिची नजर हायकोर्ट जज्जाची जागा कोठे रिकामी आहे त्याकडे असते. आमची झाडूवाली बाई बाळंतीण झाली तर तिची नजर कोठे झाडूवाल्याची जागा रिकामी आहे तिकडे असते. अशी विचित्र रचना हिंदू धर्माच्या वर्णव्यवस्थेने केलेली आहे. यातून सुधारणा ती काय होणार? उत्कर्ष हा फक्त बौद्ध धंम्मातच होऊ शकेल.

बौद्ध धंम्मात ७५ टक्के ब्राह्मण भिक्खू होते. २५ टक्के शूद्रादी होते. परंतु भगवंतांनी सांगितले. "भिक्खूहो, तुम्ही निरनिराळ्या देशातून व जातीतून आला आहात. आपल्या प्रदेशातून नद्या वाहतात तेव्हा त्या पृथक–पृथक असतात, मात्र त्या सागरास मिळाल्या की त्या पृथक राहात नाहीत. त्या एकजीव व समान होतात. बौद्ध संघ हा सागराप्रमाणे

आहे. या संघात सर्व सारखे व समान !" सागरात गेल्यावर हे गंगेचे पाणी किंवा हे महानदीचे पाणी असे ओळखणे अशक्य असते. त्याप्रमाणे बौद्ध संघात आले म्हणजे आपली जात जाते व सर्वजण समान असतात, अशी समता सांगणारा एकच महापुरूष आहे, आणि तो महापुरूष म्हणजे भगवान बुद्ध होय. (प्रचंड टाळ्या)

काही लोक असे म्हणतात, तुम्ही धर्मांतर करण्यास इतका अवधी का लावला? इतके दिवस काय करीत होता? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. धर्म पटवून देणे हे काम सोपे नाही. ते एका माणसाचे काम नाही. धर्माबाबत विचार करणाऱ्या कोणत्याही माणसास हे समजून येईल. माझ्यावर जेवढी जबाबदारी आहे, तेवढी जबाबदारी जगातील कोणत्याही माणसावर नाही. मला अधिक आयुष्य लाभल्यास मी योजलेले कार्य पूर्ण करीन. (डॉ. बाबासाहेब चिरायू होवोतच्या घोषणा व निनाद.)

महार बौद्ध झाले तर काय होईल, असे काही लोक म्हणतील. असे त्यांनी म्हणू नये, असे माझे त्यांना सांगणे आहे. ते त्यांना धोकादायक होईल. वरिष्ठ व संपत्तीवान वर्गाला धर्माची आवश्यकता वाटणार नाही. त्यांच्यामधील अधिकारावर असलेल्या साहेब लोकांना राहाण्यास बंगला आहे, त्यांची सेवा करावयास चाकर नोकर आहेत, त्यांना धन संपत्ती आहे, मानमरातब आहे, अशा माणसांना धर्माबद्दल विचार अगर चिंता करण्याचे कारण नाही.

धर्माची आवश्यकता गरिबांना आहे. पीडित लोकांना धर्माची आवश्यकता आहे. गरीब मनुष्य जगतो तो आशेवर. जीवनाचे मूळ आशेत आहे. आशाच नष्ट झाली तर जीवन कसे होईल? धर्म आशादायी बनवितो, व पीडितांना गरिबांना संदेश देतो; "काही घाबरू नकोस, होईल, जीवन आशादायी होईल." म्हणून गरीब पीडित मनुष्यमात्र धर्माला चिकटून राहातो.

जेव्हा युरोपमध्ये खिस्ती धर्म शिरला त्यावेळी रोमची व आसपासच्या देशांची परिस्थिती अतिशय हलाखीची होती. लोकांना पोटभर जेवणही मिळत नव्हते. त्यावेळी गरीब लोकांना खिचडी वाटण्यात येत असे. त्यावेळी खिस्ताचे अनुयायी कोण झाले? गरीब पिडलेले लोकच झाले. युरोपमधील सर्व गरीब व कनिष्ठ जनता खिस्ती बनली. हा खिश्चन धर्म भीक मागणाऱ्यांचा आहे, असे गिबनने म्हटले होते. खिस्ती धर्म हा युरोपमध्ये सर्वांचा धर्म कसा झाला, याचे उत्तर द्यावयास गिबन आज हयात नाही; नाहीतर याचेही उत्तर त्याला द्यावे लागले असते.

काही लोक असे म्हणतील, हा बौद्ध धंम्म महारड्या–मांगांचा धर्म आहे. ब्राह्मण लोक भगवंताला 'भो गौतम' म्हणजे 'अरे गौतम' असे म्हणत असत. ब्राह्मण बुद्धाला असे हिणवीत–चिडवीत असत. पण राम, कृष्ण, शंकर यांच्या मूर्ती परदेशात विकावयास ठेवल्या तर किती खपतील ते पाहावे. पण बुद्धाची मूर्ती ठेवली तर एकही मूर्ती शिल्लक राहाणार नाही. (टाळ्यांचा कडकडाट) आता घरातल्या घरात (भारतात) हे पुष्कळ झालं, बाहेर काही दाखवा ! जगात नाव जाहीर आहे ते फक्त बुद्धाचेच ! तेव्हा ह्या धंम्माचा प्रसार झाल्याशिवाय कसा राहील?

आमच्या वाटेने आम्ही जाऊ; तुमच्या वाटेने तुम्ही जावे. आम्हाला नवीन वाट मिळाली आहे. हा आशेचा दिवस आहे. हा अभ्युदयाचा, उत्कर्षाचा मार्ग आहे. हा मार्ग काही नवीन नाही. हा मार्ग कोठून आणलेला नाही. हा मार्ग येथलाच आहे, भारतातीलच आहे. या देशामध्ये २००० वर्षे बौद्ध धंम्म होता. खरे म्हणजे, या पूर्वीच आम्ही बौद्ध धंम्मात का गेलो नाही, याचीच आम्हाला खंत वाटते. भगवान बुद्धाने सांगितलेली तत्त्वे अजरामर आहेत. पण बुद्धाने मात्र तसा दावा केलेला नाही. कालानुरूप बदल करण्याची सोय त्यात आहे. एवढी उदारता कोणत्याही धर्मात नाही.

बौद्ध धंम्माचा नाश झाला याचे मुख्य कारण मुसलमानांच्या स्वाऱ्या हे होय. – मुसलमानांनी स्वाऱ्यांमध्ये मूर्ती फोडून टाकल्या. बौद्ध धंम्मावर यामुळे पहिले आक्रमण झाले. त्यांच्या स्वाऱ्यांना भिऊन बौद्ध भिक्खू नाहीसे झाले. कोणी तिबेटला गेले; कोणी चीनला गेले; कोणी कोठे गेले ! धंम्माचे संरक्षण करण्यासाठी उपासक लोक हवे असतात. वायव्य सरहद्द प्रांतात एक ग्रीक राजा होता. त्याचे नांव मिलिंद. हा राजा सदोदीत वादविवाद करीत असे. वादविवादाची त्यास मोठी आवड होती. तो हिंदूंना सांगे, जो कोणी वादविवादपटू असेल त्याने येऊन वादविवाद करावा. त्याने पुष्कळांना निरूत्तर केले होते.

एकदा त्याला बौद्ध लोकांबरोबर वादविवाद करावा असे वाटले व वादविवादपटू कोणी बौद्ध असल्यास त्यास घेऊन यावे असे त्याने सांगितले. तेव्हा बौद्ध लोकांनी नागसेनास विनंती केली की तुम्ही या वादविवादात बौद्ध जनांची बाजू मांडावी. नागसेन विद्वान होता. तो पूर्वीचा ब्राह्मण होता. नागसेनाचा व मिलिंदचा जो वादविवाद झाला तो पुस्तक रूपाने जगाला माहीत आहे. त्या पुस्तकाचे नाव' मिलिंद पन्ह' आहे. मिलिंदाने असा प्रश्न विचारला की धर्मास ग्लानी का येते? नागसेनाने त्याचे उत्तर देऊन त्याची तीन कारणे सांगितली.

पहिले कारण हे की एखादा धर्मच कच्चा असतो. त्या धर्माच्या मूळ तत्त्वात गांभीर्य नसते. तो कालिक धर्म बनतो व काळापुरता असा धर्म टिकतो.

दुसरे कारण हे की धर्म प्रचार करणारे विद्वान लोक नसतील तर धर्मग्लानी होते. ज्ञानी माणसांनी धर्मज्ञान सांगितले पाहिजे. विरोधकांशी वादविवाद करण्यास धर्माचे प्रचारक सिद्ध नसतील तर धर्माला ग्लानी येते.

आणि तिसरे कारण हे की धर्म व धर्माची तत्त्वे विद्वानांसाठी असतात. प्राकृत व सामान्य लोकांकरिता मंदिरे–देवळे असतात. ते तेथे जाऊन आपल्या श्रेष्ठ विभूतीचे पूजन करतात.

आपण बौद्ध धंम्म स्वीकारताना ही कारणे लक्षात ठेवली पाहिजेत. बौद्ध धंम्माची तत्त्वे कालिक, काही कालापुरती आहेत असे कोणासही म्हणता यावयाचे नाही. आज दोन हजार पाचशे एकोणसत्तर वर्षानंतरही बुद्धाची सारी तत्त्वे सर्व जग मानते. अमेरिकेमध्ये बुद्धाच्या दोन हजार संस्था आहेत. इंग्लंडमध्ये तीन लाख रुपये खर्च करून बौद्ध विहार बांधण्यात आले आहे. जर्मनीतही तीन, चार हजार बौद्ध संस्था आहेत. बुद्धाची तत्त्वे अजरामर आहेत. तथापि बुद्धानी असा दावा केला नाही की हा धंम्म ईश्वराचा आहे. बुद्धानी सांगितले माझे वडील प्राकृत होते; माझी आई प्राकृत बाई होती. हा धंम्म तुम्हाला वाटेल तर घ्यावा. हा धंम्म जेव्हा तुमच्या बुद्धीला पटेल तेव्हा तो तुम्ही स्वीकारा. एवढी उदारता दुसऱ्या कोणत्याही धर्मात सांगितलेली नाही.

बौद्ध धंम्माचा मूळ पाया काय आहे? इतर धर्मात व बौद्ध धंम्मात फार फरक आहे. इतर धर्मात बदल हा घडून यावयाचा नाही, कारण मनुष्य व ईश्वर यांचा संबंध ते धर्म सांगतात. इतर धर्माचे म्हणणे असे की ईश्वराने सृष्टी निर्माण केली. ईश्वराने आकाश, वायू, चंद्र, सूर्य सर्व काही निर्माण केले. आम्हाला ईश्वराने काहीही करावयाचे शिल्लक ठेवले नाही, म्हणून ईश्वरास भजावे ! खिस्ती धर्माप्रमाणे तर मृत्यूनंतर एक निर्णयाचा दिवस Day of Judgement असतो व त्या निर्णयाप्रमाणे सर्व काही घडते. देव व आत्मा यांना बौद्ध धंम्मात जागा नाही. भगवान बुद्धाने सांगितले, जगात सर्वत्र दुःख आहे: ९० टक्के माणसे दु:खाने पिडलेली आहेत. त्या दु:खातून पिडलेल्या, गरीब माणसांना मुक्त करणे हे बौद्ध धंम्माचे मुख्य कार्य आहे. बुद्धापेक्षा कार्ल मार्क्सने वेगळे काय सांगितले? भगवंतानी जे सांगितले ते वेड्या वाकड्या मार्गाने सांगितले नाही.

बंधुंनो, मला सांगावयाचे होते ते सांगितले. हा धंम्म सर्वतोपरी परिपूर्ण आहे. त्यास लांछन कोठेच नाही. हिंदू धर्माची अशी काही तत्त्वप्रणाली आहे की त्यामधून उत्साहच निर्माण होऊ शकत नाही. हजारो वर्षापासून परवापर्यंत आपल्या समाजामधून एकही मनुष्य ग्रॅज्युएट अगर विद्वान होऊ शकला नाही. मला सांगावयास हरकत नाही की माझ्या शाळेत झाडलोट करणारी एक बाई होती. ती मराठा होती. ती मला शिवत नसे. माझी आई मला सांगत असे की मोठ्या माणसास मामा म्हणत जा. पोस्टमनला मी मामा म्हणत असे. (प्रचंड हंशा) लहानपणी शाळेत असतांना मला तहान लागली होती. मी मास्तरांना तसे सांगितले. मास्तरांनी माझ्या संरक्षणाकरिता चपराशाला दुसरीकडून बोलाविले व याला नळावर ने असे सांगितले. आम्ही नळावर गेलो. चपराशाने मग नळ सुरू केला व मी पाणी प्यालो. मला शाळेत पाणी प्यावयास मिळत नसे. पुढे मला ड्रिस्ट्रिक्ट जज्जाची नोकरी देऊ केली होती. पण ती घोरपड मी गळ्यात बांधून घेतली नाही. माझ्या बांधवांचे कार्य मग कोण करील, असे माझ्यापुढे कोडे होते, म्हणून नोकरीच्या बंधनात अडकलो नाही.

मला वैयक्तिकरित्या या देशातील कोणतीही गोष्ट अशक्य नाही. (टाळ्या) तुमच्या डोक्यावर वैश्य, क्षत्रिय, ब्राह्मण अशी जी उतरंड रचली आहे ती कशी उलटेल व मोडेल हा खरा प्रश्न आहे. म्हणून या धर्माचे ज्ञान सर्वप्रकारे तुम्हाला करून देणे हे माझे कर्तव्य आहे. मी पुस्तके लिहून तुमच्या शंका कुशंका दूर करीन व ज्ञानाच्या पूर्णावस्थेला तुम्हास नेण्याचे सर्व प्रयत्न करीन. आज तरी तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवून वागले पाहिजे.

मात्र तुमचीही जबाबदारी मोठी आहे. तुमच्याबद्दल इतर लोकांना आदर वाटेल, मानसन्मान वाटेल अशी तुम्ही कृती केली पाहिजे. हा धंम्म म्हणजे आपण एक गळ्यात मढे अडकवून घेत आहोत असे मानू नका. बौद्ध धंम्माच्या दृष्टीने भारताची भूमी सध्या शून्यवत आहे. म्हणून आपण उत्तम रीतीने धर्म पाळण्याचा निर्धार केला पाहिजे. नाही तर महार लोकांनी तो निंदाजनक स्थितीस आणला असे होऊ नये म्हणून आपण दृढनिश्चय केला पाहिजे. हे आपल्याला साधले तर आपण आपल्या बरोबर देशाचा, इतकेच नव्हे तर जगाचाही उद्धार करू. कारण बौद्ध धंम्मानेच जगाचा उद्धार होणार आहे. जगात जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत शांतता राहाणार नाही.

हा नवा मार्ग जबाबदारीचा आहे. आपण काही संकल्प केला आहे, काही इच्छिलेले आहे, हे तरुणांनी लक्षात घ्यावे. त्यांनी केवळ पोटाचे पाईक बनू नये. आपल्या प्राप्तीचा निदान २० वा हिस्सा या कामी देईन, असा निश्चय करावा. मला सर्वांना बरोबर न्यावयाचे आहे. प्रथम तथागताने काही व्यक्तींना दीक्षा दिली व त्यांना "या धंम्माचा प्रचार करा" असा आदेश दिला. त्याप्रमाणे पुढे यश व त्याच्या ४० मित्रांनी बौद्ध दीक्षा घेतली. यश हा श्रीमंत घराण्यातील होता. त्यांना भगवंताने सांगितले, हा धंम्म कसा आहे? तर बहुजन हिताय बहुजन सुखाय, लोकानुकंपाय, धम्म आदि कल्याणं. मध्य कल्याणं, पर्यावसान कल्याणं" त्यावेळच्या परिस्थितीप्रमाणे तथागताने आपल्या धंम्माच्या प्रचाराचा मार्ग तयार केला. आता आपणालाही यंत्रणा तयार करावी लागेल. म्हणून समारंभानंतर दरेकाने−दरेकाला दीक्षा द्यावी. दरेक बौद्ध माणसाला दीक्षा देण्याचा अधिकार आहे असे मी जाहीर करतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

नमो बुद्धाय जयभीम

भवतु सब्ब मङ्गलं !!

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 डॉ_बाबासाहेबांनी_अशी_वाचवली_मुंबई! 💎🦚🦚🦚☸☸

प्रा. हरी नरके.

संयुक्त महाराष्ट्र साकार होण्यापुर्वी मुंबई कुणाची?

गुजरातची की महाराष्ट्राची? हा वाद पेटला होता. तमाम बुद्धीजिवी 'मुंबई गुजरातची किंवा स्वतंत्र.' अशी भुमिका मांडत होते. तेव्हा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबई महाराष्ट्राचीच, हे सबळ पुराव्यांनिशी सिद्ध केले. त्यांनी १९४८, १९५३ आणि १९५५ साली या विषयावर संशोधनपर लेखन केले. ते इतके बिनतोड होते की, मुंबईला महाराष्ट्रापासून तोडू पाहणाऱ्या, मुंबईला 'स्वतंत्र राज्य बनवा,' म्हणणाऱ्या मंडळींची बोलतीच बंद झाली.

आज पुन्हा एकदा केंद्रातील काही गुजरात्यांचा मुंबईवर डोळा आहे. अशा वेळेला मुंबईला गिळंकृत करण्यापासून वाचवण्यासाठी आजही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ताकदीचे संशोधन, पुराव्यांचे बळ, साधार−तर्कशुद्ध युक्तिवादच महाराष्ट्राच्या कामी येईल.

मुंबईतील व्यापार, उद्योग आणि आर्थिक विश्व गुजरात्यांच्या ताब्यात असल्याने मुंबई गुजरातची तर मुंबई ना महाराष्ट्राची ना गुजरातची, ती स्वतंत्रच हवी म्हणणारे काय दावा करीत होते, त्यांचा तो दावा बाबासाहेबांनी कसा खोडून काढला ते बघूयात.

बाबासाहेबांनी त्यांच्यासमोर नऊ प्रश्न उभे केले.

१. मुंबई कधीच महाराष्ट्रात नव्हती, याला पुरावा काय आहे?

२. मुंबई मराठा राज्याचा हिस्सा नव्हती, असे कशाच्या आधारावर म्हणता?

३. मराठी भाषकांची लोकसंख्या मुंबईत सर्वाधिक नव्हती, असे कसे म्हणता येईल?

४. काय गुजराती हे मुंबईचे मूळचे रहिवासी आहेत की गुजरातचे?

५. मुंबई हे व्यापारी बेट असल्याने ते एकट्या महारष्ट्राचे नाही तर ते सर्व भारताचे आहे, या म्हणण्यात कितपत तथ्य आहे?

६. मुंबईचा व्यापार–उदीम गुजरात्यांनी उभा केलाय, मराठी लोक हे फक्त हमाल आणि कारकून आहेत, म्हणून मुंबईला महाराष्ट्रात घालू नये, हा दावा किती टिकाऊ आहे?

७. मुंबईच्या कमाईवर, नफ्यावर जगता यावे, आयते खाता यावे, यासाठी गुजरात मुंबईवर दावा करतोय, हे खरे आहे काय?

८. बहुभाषिक राज्य चांगले असते. कारण तिथे अल्पसंख्याक भाषकांना अभय असते, हे बरोबर आहे काय?

९. राज्यांची पुनर्रचना रॅशनल असावी, नॅशनल नको, हा दावा योग्य आहे काय?

याची उत्तरे देताना बाबासाहेबांनी इतिहास आणि भुगोल असे दुहेरी पुरावे समोर ठेवले.

चालुक्य आणि शिलाहार राजांपासूनचे ऐतिहासिक पुरावे सांगतात की, गुजरातवर मराठ्यांनी राज्य केले. गुजरात्यांनी महाराष्ट्रावर राज्य केलेले नाही. अरबी समुद्रालगतचा भुगोल सांगतो की, मुंबई महाराष्ट्राचे अविभाज्य अंग आहे, गुजरातचे नाही. मध्ययुगीन मराठा राजवटी या प्रामुख्याने जमिनीवर राज्य करायच्या, समुद्रावर नाही, म्हणून मुंबई मधला काही काळ (ब्रिटिशकाळ) मराठा साम्राज्यात नसल्याने काहीच बिघडत नाही.

बाबासाहेब पुढे म्हणतात, १९४१ च्या जनगणनेनुसार मुंबईत मराठी भाषकांची लोकसंख्या ५१ टक्के होती. आहे. ब्रिटीशांचे राज्य आल्यापासून साऱ्या भारतातून लोक रोजगार, व्यापार, उदीम यासाठी मुंबईत आले. वसले. त्यांचे मराठी माणसांनी स्वागत केले, हा त्यांचा गुन्हा झाला काय?

बाबासाहेबांनी हे सिद्ध केले की, गुजराती मूळचे मुंबईचे नाहीत, तर गुजरातचे आहेत. जसे पोर्तुगिज, ब्रिटीश, फ्रेंच, डच मुंबईत स्वत:हून आले, तसे गुजराती आलेले नाहीत. तर ब्रिटीशांनी त्यांना 'मध्यस्थ–दलाल' म्हणून काम करण्यासाठी मुंबईला बोलावून घेतले. ब्रिटीशांनी गुजराती व्यापाऱ्यांबरोबर केलेला लेखी करारच बाबासाहेबांनी पुढे मांडला. १६७१ सालचे म्हणजे शिवरायांच्या काळातले हे करारपत्र आहे. शिवाय महाजनसभा आणि ब्रिटीश यांच्यातील पत्रव्यवहार त्यांनी समोर आणला. त्यानुसार गुजरात्यांना राहण्यासाठी, व्यापारासाठी, गोदाम अणि कारखाने काढण्यासाठी फुकट जमिन देण्यात आली. व्यापारात करसवलत देण्यात आली. जहाजे आणि मालमत्तेला संरक्षण पुरवण्यात आले.

तेव्हा कुठे ते गुजरातमधून मुंबईत आले आहेत, याचे लिखित पुरावेच बाबासाहेबांनी विरोधकांच्या तोंडावर मारले. हा प्रहार गुजरात्यांच्या वर्मी लागला.

मुंबईत जसा त्यांनी व्यापार उदीम केला. तसाच तो त्यांनी कलकत्त्याला केलेला आहे. शिवाय बिहारच्या खाणींमध्येही ते मालक आहेत. म्हणून कलकत्ता किंवा खाणींचा भाग असलेला बिहार गुजरातला जोडणार काय?

मुख्य मुद्दा आहे तो मुंबईला पाणी कोण पुरवतो? गुजरात की महाराष्ट्र? ज्या विजेवर हे व्यापार, उदीम, कारखाने चालतात ती वीज कुठून येते महाराष्ट्रातून की गुजरातमधून? कामगार शक्ती कुठली आहे?.. आणि म्हणून वीज, पाणी, कामगार शक्ती महाराष्ट्राची तर मुंबईवर मालकी महाराष्ट्राचीच! अशा रितीने सर्वच्या सर्व नऊ प्रश्नांची उत्तरे फाडफाड तोंडावर फेकून त्यांनी गुजरात्यांची बोलतीच बंद केली. हा सगळा भाग बाबासाहेबांच्या पुस्तकांमधूनच तुम्ही वाचायला हवा.

पुराव्यांचे बळ, संशोधनाची ताकद आणि साधार, तर्कशुद्ध युक्तीवादाची फौज बाबासाहेबांनी महाराष्ट्राच्या बाजूने उभी केली, तेव्हा कुठे मुंबई महाराष्ट्राला मिळाली.

मुंबईसह महाराष्ट्र अस्तित्वात आला. त्यामागे जशी हुतात्म्यांचे, चळवळीतल्या आधी सांगितलेल्या नेत्यांचे योगदान आहे, तितकेच मोठे योगदान या लढाईत दोन मौलिक ग्रंथ लिहिणाऱ्या बाबासाहेबांचेही आहे. त्यांची आठवण महाराष्ट्राने जशी ठेवायला हवी, तशीच आणि तेवढीच ती बाबासाहेबांची सुद्धा ठेवायला हवी :– Prof. Hari Narke, (repost)

🌐🌐🌐🌐🌐🌐🌐🌐

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १५ ऑक्टोबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, अस्सयुजो मासो, मंगळवार, आश्विन माहे.

१५ ऑक्टोबर – रोजी बौद्ध संघ दिवस.

१५ ऑक्टोबर १९०२ – रोजी कर्मवीर दादासाहेब गायकवाड जयंती.

*१५ ऑक्टोबर १९२१ – रोजी जागतिक अंध दिन. १९२१ मध्ये जेम्स बिग हे व्यावसायिक छायाचित्रकार अमेरिकेत कार्यरत होते. दुर्दैवाने एका अपघातात त्यांना आपले डोळे गमवावे लागले. त्यात त्यांना कायमचे अंधत्व आले, पण अंधत्त्वाला न घाबरता सगळीकडे विहार करण्यासाठी पहिल्यांदा पांढऱ्या काठीचा वापर करण्यात आला. सुरुवातीला ही काठी पूर्ण पांढऱ्या रंगाची होती. ती लाकडी व साध्या पद्धतीची होती तसेच तिला पांढरा रंग देण्यात आला होता. १९३१ मध्ये फ्रांसमध्ये गिली हर्बर्ट मॉँट यांनी फ्रान्सच्या तत्कालीन राष्ट्राध्यक्षांसमोर पांढऱ्या काठीचे प्रात्यक्षिक सादर केले.

१९३० मध्ये पिवोरा एलिनॉईज यांनी पांढऱ्या काठीचा कायदा प्रथमतः जगात अमलात आणला. १९६४ मध्ये अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष लिंकन बी. जॉन्सन यांनी १५ ऑक्टोबर हा 'पांढरी काठी दिन' म्हणून साजरा करण्यात येईल, असे घोषित केले. तसेच 'युनो' नेसुद्धा जागतिक पांढरी काठी दिन १५ ऑक्टोबरलाच साजरा केला जाईल असे जाहीर केले.*

१५ ऑक्टोबर १९५६ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना नागपूर महानगपालिकेतर्फे मानपत्र देण्यात आले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 बौध्द संघ स्थापना दिन :

संघ हा बुद्धांच्या शिष्यांचा आध्यात्मिक समाज होय पूर्वी होऊन गेलेला आणि सध्या अस्तित्वात असलेला, भिक्खू–भिक्खूणी आणि उपासक–उपासिकांचा बनवलेला, प्रबुद्ध आणि अप्रबुद्धांचा समावेश असलेला. संघाला अनुसरणे म्हणजे संघातील सदस्यांच्या धांम्मिक मार्गावर पुढे असणाऱ्यांच्या प्रभावास ग्रहण करणे, त्यांच्यै उदाहरणाने उत्साहित होणे आणि त्यांच्या सल्ल्यानुसार आचरणास सिद्ध असणे होय.

गौतम बुद्धांनी आपले विचार लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आपल्या अनुयायांना संघटिन करून बौद्ध संघ स्थापन केला. जे पुरूष अनुयायी या संघात प्रवेश करत त्यांना 'भिक्खू' तर स्त्री अनुयायांना 'भिक्खूणी' असे म्हणत. त्यांना आचरणाचे कडक नियम पाळावे लागतात. बौद्ध संघात सर्व जातींच्या लोकांना व स्त्रियांनाही प्रवेश आहे.

🌐🌐🌐🌐🌐🌐🌐🌐

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १६ ऑक्टोबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, अस्सयुजो मासो, बुधवार, आश्विन माहे.

१६ ऑक्टोबर १९२९ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता समाज संघ आणि भारतीय बहिष्कृत समाजसेवा संघाद्वारे मुंबई प्रांत डिप्रेस क्लासेसच्या सभेमध्ये पार्वती मंदिर सत्याग्रहाला समर्थन दिले. १३ ऑक्टोबरला हा सत्याग्रह सुरू झाला होता.

१६ ऑक्टोबर १९३२ – रोजी येरवडा तुरुंग, पुणे येथे माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मोहनदास करमचंद गांधी यांची भेट झाली.

१६ ऑक्टोबर १९५३ – रोजी शेड्युल्ड कास्टस फेडरेशन तर्फे मराठवाड्यात भूमिहीनांचां सत्याग्रह झाला.

१६ ऑक्टोबर १९५६ – रोजी चंद्रपूर येथे धंम्मचक्र दीक्षा सोहळा संप्पंन्न झाला, ज्यामध्ये माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ३०००० तीन लाख लोकांना बौद्ध धंम्माची दीक्षा दिली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १७ ऑक्टोबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, अस्सयुजो मासो, गुरूवार, आश्विन माहे.

१७ ऑक्टोबर १९३० – रोजी लंडन येथे पहिली गोलमेज परिषद सुरू झाली.

१७ ऑक्टोबर १९४९ – रोजी संविधानाच्या दुसऱ्या वाचनाची चर्चेनंतर समाप्ती झाली.

१७ ऑक्टोबर १९४९ – रोजी १७ ऑक्टोबर १९३३ च्या तथ्यांखेरीज मागासवर्गीयांना जातीय पुरस्कारात Communal Award समाविष्ट केले गेले, ज्यामध्ये त्यांना काही जागा देण्यात आल्या आहेत. म्हणजे, तुम्ही म्हणाल त्याप्रमाणे अल्पसंख्यांक Minorities हे समूदाय असतील ज्यांना सांप्रदायिक पुरस्कारात Communal Award मध्ये समाविष्ट केले गेले आहेत. मी कल्पना करतो की, मागासवर्गीयांचा Backwood Classes देखिल सांप्रदायिक पुरस्कारात Communal Award मध्ये समावेश होईल. भारतीय संविधानात कलम ३७० ची तात्पुरती तरतूद करण्यात आली.

१७ ऑक्टोबर २०२४ – रोजी 'अश्विन पौर्णिमा" (अस्सयुजो मासो पुंन्नमि) वर्षावास समाप्ती.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🔵🔵🔵 "अश्विन पौर्णिमा" (अस्सयुजो मासो पुंन्नमि) वर्षावास समाप्ती 🔵🔵🔵☸☸

१. सम्राट अशोकाची धम्मदीक्षा. २. सर्व अर्हंत भिक्षूंना धम्मप्रचार प्रसारासाठी सारनाथ येथे आदेश दिला. ३. वर्षावास समाप्ती : वर्षावासातील चर्चा दरम्यान तापलेल्या मनाला शांत करण्यासाठी सामुहिकरित्या दुध प्राशन करूने.

अश्विन पौर्णिमेला पाली भाषेत *अस्सयुज मासो* म्हणतात. ही पौर्णिमा साधारणतः ऑक्टोबर महिन्यात येते. या पौर्णिमेला बुद्धाच्या जीवनातील काही महत्वपुर्ण घटना घडल्यात.

१. सम्राट अशोकाची धम्मदीक्षा :

सम्राट अशोकाने राज्यभिषेकाच्या आठव्या वर्षी कलिंगची लढाई जिंकली. याच युद्धाने अशोकाच्या जीवनात मोठी क्रांती घडवून आणली आणि हेच युद्ध अशोकाच्या जीवनातील शेवटचे युद्ध ठरले. या युद्धाने जो विनाश झाला त्याचा अशोकाच्या जीवनावर फार गंभीर परिणाम झाला. युद्धात मारल्या गेलेल्या सैनिकांच्या विधवांच्या रडण्याचे, बालकांच्या अक्रोशाने त्याला खूप पश्चाताप झाला. तो शोकाकुल झाला. त्याचवेळी मोग्गलीपुत्त तिस्स या भिक्खूची भेट झाली. त्याच्या *अप्पमाद–वग्ग* (अप्रमादवग्ग) या उपदेशाने त्यांचे संपूर्ण जीवनच बदलून गेले. भन्ते मोग्गलीपुत्त तिस्स यांस सम्राट अशोकाने आपला धम्म गुरू मानले. ज्या दिवशी भिक्खू मोग्गलीपुत्त तिस्स यांच्या संपर्कात येऊन सम्राटांनी त्यांच्याकडून दीक्षा घेतली. बौद्ध उपासक बनला तो दिवस होता अश्विन शुद्ध दशमी, इ. स. पू. २६६ यासच *अशोक विजयादशमी* किंवा *दसरा* असे म्हणतात.

सम्राट अशोकाने बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि त्यांच्या राज्यात बौद्धधम्माला सर्वोच्च स्थान प्राप्त झाले. त्याचे शासन धम्म शासन असल्याने त्यांचे राज्य *धम्मराज्य* ठरले.

याच अश्विन शुद्ध दशमीलाच डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी २५०० पूर्वीचा बौद्ध धम्माला पुनर्जीवित करून धम्माला गतिशील केले. यालाच आपण धम्मचक्र प्रवर्तन म्हणतो.

२. धम्मप्रचार प्रसारासाठी सारनाथ येथे आदेश दिला :

ह्या पौर्णिमेला भगवान बुद्धांनी धम्मचक्र प्रवर्तन केले आणि विशुद्धी मार्गाचा क्रमशः उपदेश सुरू केला. या उपदेशाला आषाढी पौर्णिमेपासून सुरुवात केली, प्रथम पांच परिव्राजक भिक्षु झाले. त्यानंतर पुन्हा पांच शिष्य मिळाले. यश, गवांपती, सुबाहु, आणि पूर्णजित असे एकूण दहा शिष्य भगवंतांना मिळाले. त्यानंतर पुन्हा वाराणसीच्या प्रदेशातून पन्नास तरुण भगवंताचे शिष्य झाले. एकूण साठ भिक्षूंचा संघ निर्माण झाला.

भगवान तथागतांच्या संघातील साठही भिक्षु अर्हंतपदाला गेले. भगवंतांनी अश्विन पौर्णिमेच्या दिवशी सर्व अर्हंत भिक्षूंना धम्मप्रचार प्रसारासाठी सारनाथ येथे आदेश दिला.

✳चरथ भिक्खवे चारिकं बहुजन हिताय बहुजन सुखाय लोकानुकंपाय, अथाय, सुखाय देवमनुसान, देसेथ भिक्खवे धम्मं आदीकल्याण मजझेकल्याण परियोसान कल्याण साथं संव्यजन, केवल परीपुणण ब्रह्मचर्य पकासेथ !!!✳

हे भिक्षूंनो, बहुजनांच्या हिताकरिता, बहुजनांच्या सुखाकरिता, लोकांवर अनुकंपा करावयाच्या भावनेने, स्वतःच्या तसेच सत्पुरुषांच्या हितासाठी आणि सुखासाठी भिक्षाटन करीत विचरण करा ! हा धम्म सुरुवातीस कल्याणकारी, मध्य कल्याणकारी आणि अंतिम कल्याणकारी असून अर्थ आणि भावाने परिपूर्ण आहे. अशा या धम्माचा ब्रह्मचर्यव्रत राखून प्रसार करा आणि त्याला पूर्ण प्रकाशित करा.

ह्याच अश्विन पौर्णिमेला भगवंतांनी वर्षावासाचा समारोप केला. या दिवसी बौद्ध भिक्षु तीन महिन्यांचा वर्षावास समाप्त करून धम्म प्रचारास निघतात. अश्विन पौर्णिमेला भगवान बुद्धांनी ऋद्धी परिहार्य केले होते. त्याचबरोबर तेव्हापासून बौद्ध जगतात पवरणा उत्सव साजरा केला जातो.

३. वर्षावास समाप्ती :

अश्विन पौर्णिमा ही वर्षावासातील शेवटची पौर्णिमा आहे. वर्षावास काळात ज्यांनी ज्यांनी सहकार्य दिले त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्ती केली जात असे. वर्षावास काळात उपसिकांमध्ये व्यवस्थापिक होण्याचा मान विशाखा मिगारमाता यांना मिळाला. विशाखा मीगारमाता यांनी भगवंतास व भिक्खू संघास जेवणाचे आमंत्रण दिले. भगवान बुद्ध भिक्खूसंघसह घरी आल्यानंतर विशाखेने सर्वाचा आदर सत्कार केला. जेवू घातले व नंतर भगवंतास आठ वर मागितले. आठ वर मागण्याचे कारण सविस्तर समजून घेऊन तिचे आभार मानले व म्हणाले *शिलसपन्न उपसिका श्रध्दायुक्त मनाने आणि निश्वार्थी वृत्तीने जे काही दान देईल ते दान दिव्य, दुःखनाशक आणि सुखकारक ठरेल.

वर्षा संपल्यावर भिक्खूसंघाचा वर्षावासही संपन्न होतो. अश्विनी पौर्णिमेलाच कोजागिरी पौर्णिमाहि म्हणतात. वर्षावासत होणाऱ्या वादविवादीत चर्चामुळे बऱ्याच भिक्खूंचे मत प्रवर्तित व्हायचे तर बऱ्याच भिक्खूंचे मन देखील दुखावली जात होती.

बुध्दांनी या चर्चाचा सकारात्मक दृष्टिकोन ठेवून कोणाच्याही मनात द्वेष भावना न राहावी म्हणून आजच्या दिवशी म्हणजे अश्विनी पौर्णिमा. दुध हे शान्तिप्रिय आहे. त्यातल्यात्यात ते चंद्राच्या शीतल किरणात तापल्यावर त्यात एकप्रकारचे तेज प्राप्त होते.

वर्षावासातील चर्चा दरम्यान तापलेल्या मनाला शांत करण्यासाठी सामुहिकरित्या दुध प्राशन करून दुसऱ्या दिवशी भिक्खू आपआपल्या दिशेने निघत असे कारण बुध्दांचा कटाक्ष होता की कोणतेही दोन भिक्खू एका दिशेने जाणार नाही. एक भिक्खू एकाच दिशेने जाईल. ज्यादिवशी वर्षावास संपतो तो दिवस म्हणजे अश्विनी पौर्णिमा (अस्सयुज मासो) म्हणतात.

ही पौर्णिमा आपण मोठ्या उत्साहाने साजरी केली पाहिजे. बुद्धविहारात जाऊन धम्म ग्रहण करावा.

🌀सर्वांना अश्विन पौर्णिमेच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा.🌀

!!! सर्वांचे मंगलं होवो !!!

🌐🌐🌐🌐🌐🌐🌐🌐

🦚🦚🦚🔵🔵☸☸☸💎 तथागत भगवान बुद्धांनी व्यतीत केलेले ४६ वर्षावास 💎☸☸☸🔵🔵🦚🦚🦚

🔅 सिद्धार्थ गौतम (गोतम) बोधिसत्वाला बोधगया (उरुवेला) येथील निरंजना नदी काठावरील बोधिवृक्षाखाली (पिंपळ).. इ. स. पू. ५२८, वैशाख पौर्णिमेला.. वयाच्या पस्तीसाव्या वर्षी.. सम्यक संबोधी ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर ते महाकारुणीक सम्यक संबुद्ध बुद्ध झालेत.

🔅 त्यांनतर आपल्या धम्माचा उपदेश देण्यासाठी.. याआधी सोडून गेलेले पाच परिव्राजक सहकारी.. कोण्डिण्य, वप्प, भद्दीय (भद्रिक), महानाम आणि अश्वजित (अस्सजी) या श्रावकांना भेटून आपल्या सद्धम्माचा उपदेश करण्यासाठी.. बोधगयाहून (उरुवेला) सारनाथ येथील ऋषीपतन, मृगदायवनात गेले आणि या पंचवर्गीय परिव्राजकांना इ. स. पू. ५२८, आषाढ पौर्णिमेला.. चार आर्यसत्य, विशुद्ध, आर्यअष्टांगिक सदाचार मार्गाचा प्रथमतः उपदेश केला. मानव दुःखमुक्तिची, त्याच्या कल्याणाची.. धम्मचक्कपवत्तन सुत्ताद्वारे आपल्या सद्धम्माची देसना दिली आणि विश्वातील पहिले धम्मचक्रप्रवर्तन आषाढ पौर्णिमेला घडून आले. या पंचवर्गीय भिक्खुंना सद्धम्माचा बोध झाला आणि त्यांनी तथागतांना गुरु मानले, आणि तथागतांचे ते पहिले शिष्य बनले आणि त्याबरोबर बुद्धांचा भिक्षुसंघ तयार झाला. बुद्ध, धम्म आणि संघ या त्रिरत्नाची निर्मिती झाली. त्याबरोबर धंम्मचक्कपवत्तनाची सुरुवात झाली. त्यामुळेच आषाढ पौर्णिमेला "धंम्मचक्कपवत्तन दिन" म्हटले जाते. यावेळी वर्षा ऋतू असतो तर भिक्कुंना धंम्माचा प्रचार करण्यास पावसामुळे अडथळा निर्माण होऊ लागला म्हणून बुद्धांनी "वर्षावास प्रारंभ" म्हणजे धंम्माचे (शुद्ध जीवन जगण्याचे) शिक्षण त्यांना तीन महिने देण्याचे ठरविले. म्हणून "वर्षावास प्रारंभ" असे म्हंटले जाऊ लागले.

🔅 वाराणसीत (सारनाथ) यश नावाचा एक सुसंपन्न कुटुंबातील तरुण कुलपुत्र राहत होता. एकाएकी प्रपंचातुन त्याचे मन उठले. मनं शांततेचा शोध करीत तो पंचवर्गीय भिक्षुं सोबत तथागत भगवान गौतम बुद्ध रहात असलेल्या ऋषीपतनात आला. तथागतांनी धंम्मोपदेश करुन त्याला आपल्या संघात सामील/दाखल करुन घेतले. यशच्या शोधासाठी त्याचे माता-पिता आले. बुद्धाने त्यांना उपदेश केला आणि ते बुद्धाचे पहीले उपासक बनले. यश भिक्षु होऊन बुद्धाच्या संघात दाखल झाला, हे वर्तमान वाराणसीत राहत असलेल्या.. विमल, सुबाहु, पूर्णजित, (पुण्णजी) आणि गवांपति (गवपंति) या त्याच्या चार मित्रांना समजले. आणि त्यांनी ऋषीपतनात येऊन बुद्धोपदेश ऐकला आणि ते देखील बुद्धाच्या संघात सामील/प्रविष्ट झाले. त्या सर्वांचे पन्नास तरुण मित्र होते. त्यांनीही ऋषीपतनात येऊन बुद्धोपदेश ऐकला आणि त्या उपासकांनी देखील आपल्या मित्राप्रमाणे उपसंपदा घेऊन पुढे ते प्रवज्जीत झाले, अर्हत झाले आणि बुद्धाच्या संघात दाखल झाले. अशाप्रकारे तथागत आणि त्यांचा साठ भिक्खुंचा संघ ऋषीपतनात निर्माण झाला. त्यावेळी एकुण एकसष्ट अर्हत होते. (तथागत भगवान गौतम बुद्ध+पंचवर्गिय भिक्खू+यश+यशचे चार मित्र आणि त्यांचे पन्नास मित्र असे एकसष्ट अर्हतांचा भिक्खूसंघ सारनाथच्या ऋषीपतनात निर्माण झाला.)

🔅 तथागत गौतम बुद्धांनी पंचवर्गीय भिक्खूंना प्रथम धम्मदिक्षा दिली तो कालावधी पावसाळ्याचा होता.. म्हणून आपल्या साठ अर्हत भिक्षुंसह (भिक्खूसंघासह) पहिला वर्षावास इ. स. पू. ५२८ मध्ये सारनाथच्या ऋषीपतन मृगदायवनात व्यतीत केला. आणि आपल्या ८० वर्षाच्या आयुष्यात ४५ वर्ष पायी चारिका-भिक्षाटन करत आपल्या सद्धम्माचा प्रसार-प्रचार केला. त्यात एकूण ४६ वर्षावास व्यतीत केले. शेवटचा ४६ वा वर्षावास इ. स. पू. ४८३ मध्ये लिच्छविंची राजधानी वैशालीतील वेलुव ग्राम/वेणुग्राम येथे व्यतीत केला.

🔅 पहिल्या वर्षावासाच्या शेवटी भगवान बुद्ध आपल्या भिक्षुंचा संघास म्हणाले.. "भिक्षुहो! प्रापंचिक आणि स्वर्गीय पाशातुन मी मुक्त झालो आहे आणि तुम्ही देखील या पाशातुन मुक्त झाला आहात. तेव्हा लोकांच्या कल्याणासाठी.. मानवाला हितकारक असा जो सद्धम्म सांगितला आहे, तो लोकांपर्यंत पोहचवा."

• मानवाचे जिवन दु:खमुक्त व्हावे, सुखकारक व्हावे, यासाठी भगवान बुद्धांनी आपल्या भिक्खुसंघाला सद्धम्मच्या प्रचार–प्रसारासाठी आदेश दिला..

"चरथ भिक्खवे चारिकं, बहुजन हिताय,बहुजन सुखाय, लोकानुकम्पाय, अत्थात हिताय,देवमनुस्सानं ।

देसेथ भिक्खवे धम्मं, अदिकल्याणं,मज्झे कल्याणं, परियोसान कल्याणं, सात्थ सब्यञ्जनं ब्रम्हचरियं पकासेथ ॥"

• अर्थात :–

• "भिक्खूहो! बहुजनांच्या हितासाठी, सुखासाठी, लोकांवर अनुकंपा करण्यासाठी, देवांच्या (सत्पुरुषांच्या) आणि मनुष्याच्या कल्याणासाठी, हितासाठी आणि सुखासाठी धम्मोपदेश करण्यास प्रवृत्त (तयार) व्हा.चारिका करा."

"हा धम्म प्रारंभी कल्याणपद, मध्यंतरी कल्याणपद आणि शेवटीही कल्याणपद आहे. अशा या धम्ममार्गाचा लोकांना उपदेश करा."

"धम्माचा प्रचार–प्रसार करा, त्यासाठी एका मार्गाने दोघे जाऊ नका." याप्रमाणे भगवान बुध्दांनी आपल्या पहिल्या साठ भिक्षुंना चार दिशांना धम्मप्रचार, प्रसारासाठी पाठविले.

(संदर्भ – संदिप वाघमारे यांची १४ जुलै २०१८ ची बुद्धिस्ट फ्रेन्ड ग्रुपची पोस्ट.)

त्यानंतर तथागत भगवान गौतम बुद्ध आपल्या ८० वर्षाच्या आयुष्यात ४५ वर्ष धम्मप्रचार–प्रसारासाठी चारिका केली, भ्रमण करत, भिक्षाटन केले होते.. आणि या कालावधीत त्यांनी ४६ वर्षावास व्यतीत करत आपल्या सद्धम्माचा उपदेश केला.

☸ वर्षावास :–

• 'वर्षावास' ज्याला पाली भाषेत 'वस्सावास' म्हटलें जाते.

• वर्षावास :– "वर्षा म्हणजे पाऊस. आणि वास म्हणजे वास्तव्य करणे, मुक्काम करणे, निवास करणे किंवा राहणे."

• पावसाळ्यातील आषाढी पौर्णिमा पासुन अश्विन पौर्णिमा या तीन महिने पर्यंत उपसंपदा झालेल्या भिक्खूंनी कोणत्याही एका ठिकाणी केलेला मुक्काम/निवास म्हणजे वर्षावास."

• वर्षावासाची सुरुवात स्वतः तथागत भगवान गौतम बुद्धांनी केलेली असुन ते आजपर्यंत नित्यनेमाने चालू आहे. विनयपिटकानुसार.. आषाढ पौर्णिमेला वर्षावास आरंभ/सुरु होतो आणि अश्विन पौर्णिमेला संपन्न होतो. नंतरचा एक महिना हा वर्षावास समापन उत्सवाचा असल्याने वर्षावासाचे चार महिने पुर्ण होतात त्यामुळे त्याला चार मास किंवा "चातुर्मास" असेही म्हणतात.

🔅 बौद्ध धंम्मात वर्षावासाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. वर्षावासाच्या कालावधीत एका ठिकाणी राहून भिक्खू धम्मदेसना, धंम्मोपदेश करत.. त्याचबरोबर धम्माचे चिंतन, मनन, अभ्यास करित असत. आध्यात्मिक साधना करीत असत.

• भगवान बुद्धांच्या आदेशानुसार पूर्वी भिक्खु संघ सद्धम्माच्या प्रसार–प्रचारासाठी, धम्म देसनासाठी चारही दिशांना पायी फिरत असत. आणि सद्धम्माची शिकवण देता देता, चारिका करुन, भिक्षा मागून चरितार्थ चालवावा असा बुद्धांचा आदेश होता.

• त्या काळी वर्षा ॠतूत खूप पाऊस खूप पडत असे.

• पावसामुळे पायी फिरणे, चारिका करणे, भिक्षाटन करणे इत्यादी भिक्खु संघाला अशक्य होत असे.

• पावसाच्या काळात भिक्खुनां पिंडपितासाठी जाता येत नसल्याने त्यांची ऊपासमारही होत असे.

• एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी जात असताना नदी नाल्यांना आलेल्या पुरात अनेक भिक्खु वाहून जात त्यामुळे अनेक भिक्खुंना यामध्ये जीव गमवावा लागत असे.

• पावसाळयात अनेक आजारांचा भिक्खु संघाला सामना करावा लागत होता.

• खराब रस्ते, हिंसक प्राणी, साप, विंचू, आणि ईतर विषारी जिवजंतुचा उपद्रव होत असे.

• पावसाळ्यत वातावरण शांत असते, अतिवृष्टीमुळे त्या दिवसात शेतीतील मजुरीची काम करणे शक्य नसे त्यामुळे उपासकांजवळ धम्मश्रवणासाठी पुष्कळ वेळ मिळतो.

• भिक्खूंना अशा शांत–प्रसन्न वातावरणात ध्यान साधना, चिंतन, मनन करणे सोपे, सुलभ असते.

• भिक्खुंच्या चालण्यामुळे पावसाळ्यात शेतातील पिके, वनस्पती तसेच सुक्ष्म जीवांची हानी असे.

..• हे सर्व लक्षात घेऊन भगवान बुद्धांनी भिख्खू संघाला आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा या कालावधीत, कोणत्याही एका ठिकाणी विहारात, चैत्य स्तुपात राहून धम्माचे चिंतन–मनन करत अधिक अभ्यास करावा, आसपासच्या परिसरातील, स्थानिक उपासकांना सद्धम्माचा उपदेश देण्याबाबत सूचना दिल्या.

• वर्षावास काळात श्रध्दावान उपासक विहारात जावून धम्म श्रवण करीत. विहारातील भिख्खूंना श्रध्दाभावनेने भोजनदान करीत तसेच ध्यानधारणा करीत असत.

🔅 विनयपिटकमधील 'वर्षोपनायिका स्कंध' प्रकरणात वर्षावासाच्या दोन महत्वपूर्ण काळ नमूद केलेल्या आहेत :–

• पावसाळ्यात एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करणे भिक्कुना कठीण जात असे. अनेक अडचणींचा सामना करावा लागत असे. त्यामुळे भिक्खूंच्या सांगण्यावरून बुद्धांनी वर्षावास करण्याची अनुमती दिली.

• एकदा बुद्धांना प्रश्न करण्यात आला की, वर्षावास केव्हा केला पाहिजे? तेव्हा बुद्ध म्हणाले "भिक्खूनो मी, तुम्हाला वर्षा ऋतूत वर्षावास करण्याची अनुमती देत आहे!"

पावसाळ्याचे ३ महिने भिक्खुनी एकाच ठिकाणी राहिले पाहिजे.

(१) सर्वसाधारणपणे आषाढ पौर्णिमा ते पुढील तीन महिन्याच्या वर्षावासाला 'पुरीमिकावस्सुनायिका' असे म्हणतात.

(२) आषाढ पौर्णिमेनंतर तीन महिने वर्षावास करणे शक्य नसल्यास भाद्रपद पौर्णिमेनंतर पुढील तीन महिने वर्षावास आपणास करता येऊ शकतो. त्याला 'पच्चिमिका' असे म्हणतात.

• सुरुवातीला वर्षावासाच्या काळात भिक्खूला एक दिवस सुद्धा वर्षावास सोडून जाता येत नसे, जर कोणता भिक्खू वर्षावासात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी गेल्यास त्याला 'दुकट' अपराधाला सामोरे जावे लागत. परंतु बुद्धांनी यामध्ये बदल करून वर्षावासाच्या काळात काही कारणांसाठी भिक्खू सात दिवसांसाठी बाहेर जाऊ शकत होते.

– (संदर्भ – महावग्ग, विनयपिटक..मैत्रेय दिपक यांच्या वॉलवरुन, जागतिक बुद्ध धम्म दिक्षा समिती दिनांक :१२ जुलै २०२२ ची पोस्ट.)

🔅 वर्षावासाच्या वेळी सात धम्म कार्यांसाठी भिक्षु बाहेर जाऊ शकतात...

• भगवान बुद्धाचा शिलससंपन्न उपासक कौशांबीचा राजा उदयन याने भिक्खूसंघासाठी एक भव्य बुद्ध विहार बांधला व तो विहार भिक्खूसंघास समर्पित करण्यासाठी त्याने भिक्खूसंघास संदेश पाठविला की, "भिक्खूसंघाने माझ्या दानाचा स्वीकार करून माझ्या पुण्य कर्मास अनुमोदन द्यावे." पण वर्षावास चालु असल्याने आदरणीय भिक्खूंनी उदयन राजास वर्षावास समाप्त होईपर्यंत वाट पहावी असा संदेश पाठविला. भिक्खूसंघाचा वर्षावास संपेपर्यंत वाट पाहण्याची सुचना मिळताच राजा उदयन प्रचंड दुःखी झाला. राजा उदयन दुःखी झाल्याची गोष्ट जेव्हा भगवान बुद्धांना कळली, तेव्हा त्यांनी वर्षावासाच्या नियमांमध्ये परिवर्तन केले व आदरणीय भिक्खुंना सांगितले की, वर्षावासाच्या काळात सात धम्म कार्यासाठी भिक्खूंना विहार सोडून बाहेर जाण्याची परवानगी आहे..

१) वर्षावासी भिक्खू भिक्खूसंघाच्या कामानिमित्त बाहेर जाऊ शकतात.

२) वर्षावासी भिक्खू भिक्खूणी संघाच्या कामानिमित्त बाहेर जाऊ शकतात.

३) वर्षावासी भिक्खू धम्म जाणनारे माणवक (विद्यार्थी) व त्यांच्या कार्यासाठी बाहेर जाऊ शकतात.

४) वर्षावासी भिक्खू श्रामनेर संघाच्या कार्यासाठी बाहेर जाऊ शकतात.

५) वर्षावासी भिक्खू श्रामनेरी संघाच्या कामानिमित्त बाहेर जाऊ शकतात.

६) वर्षावासी भिक्खू उपासक संघाच्या कामानिमित्त बाहेर जाऊ शकतात.

७) वर्षावासी भिक्खू उपासिका संघाच्या कामानिमित्त बाहेर जाऊ शकतात.

– (संदर्भ :– विनयपिटक, बुध्दशासन बुध्दांचा आदेशानुसार, युवराज मेश्राम यांची ३ जुलै २०२२ "बुद्ध आणि त्यांचा धम्म" फेसबुकवरीलची पोस्ट.)

🔅 भगवान बुध्दांनी त्यांचा पहिला वर्षावास इ. स. पू. ५२८ च्या आषाढ पौर्णिमेला पंचवर्गीय भिक्खूंसह सारनाथ येथील इसिपतन/ऋषीपतनच्या मृगदायवनात व्यतीत केला.. आणि इ. स. पूर्वी ४८३ ला शेवटचा आणि ४६ वा वर्षावास लिच्छविंची राजधानी वैशालीतील वेळुवग्राम/वेणुग्राम येथे व्यतीत केला.

• अशा प्रकारे सद्धम्माचा प्रसार–प्रचार भगवान बुध्दांनी करून समस्त मानवाला धम्मपथाच्या राजमार्गावर आरूढ केले.

• अंगुत्तर निकायची मनोरथपुरणी अट्टकथा आचार्य बुद्धघोषांनी भदन्त जोतिपाल आणि जीवक नावाच्या स्थवीरांच्या विनंतीवरून लिहिली होती.

या अट्टकथेचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील एका कनिपातवण्णात भगवान बुद्धांचे शिष्य, अनेक भिक्खू आणि भिक्खूनीं यांचे चरित्र वर्णन केले आहे. त्याचप्रमाणे भगवान बुद्धांच्या वर्षावासांचे (मधुरत्थविलासिनीसारखे) अतिशय चांगले वर्णनही येथे दिले आहे. त्यानुसार बुद्धत्व प्राप्त झाल्यापासून ते महापरिनिर्वाणाच्या एक वर्ष आधीपर्यंत भगवानांनी ४५ (पंचेचाळीस) वर्षावास कोठे घालवले.. त्यानुसार.. तथागत प्रथम संबोधी प्राप्तीच्या पहिल्या वर्षी सारनाथच्या ऋषीपतन मृगदायवनात धंम्माचे चक्र फिरवून तेथेच पहिला वर्षावास पुर्ण केला. दुसऱ्या वर्षी राजगृहाजवळील वेणुवन येथे, तिसऱ्या व चौथ्या वर्षी पण ते तेथेच राहिले. पाचव्या वर्षी ते वैशाली येथील महावन कुटागारशाळेत राहिले. सहाव्या वर्षी ते मंकुल पर्वत येथे. सातव्या वर्षी त्रायंशीस देवलोक येथे, आठव्या वर्षी भर्गदेश येथील सुंसुमारगिरीच्या भेसकलावन येथे, नवव्या

भारत हा शेतकऱ्यांचा देश आहे. इथला प्रमुख व्यवसाय शेती आहे. ग्रिष्म ऋतूनंतर शेतकरी, शेतावर काम करणारे मजूर हे त्यांच्या पिकांना भाव देतात. तो महिना अश्विन महिना असतो. त्यामुळे शेतकरी व त्यावर अवलंबून असणाऱ्याजवळ मुबलक आर्थिक उत्पन्न यायचे त्यामुळे शेतीवर निर्भर लोक दीप लावून उत्सव साजरा करावयाचे. त्याचेच नाव (दिवाळी) दीप दानोत्सव हे हजारो वर्षांपासून सुरु आहे. भारतातील बहुतेक सण हे Landowner व Landless Labour वर आधारित आहेत. कारण भारत हा शेतकरी आणि मजुरांचा देश आहे. आजही वर्तमान काळातील सण हे शेतीवरच आधारित आहेत. उदा. पोळा, होळी इत्यादी. बुद्ध काळात हा सण प्रज्ञावली (ज्ञानाचा उत्सव/समृद्धी) म्हणून साजरा करावयाचे. प्रज्ञावली हा सण सम्राट अशोकानेही पुढे तसाच सुरु ठेवीला. पुढे पुष्यमित्र शुंगाच्या प्रतिक्रांतीनंतर प्रज्ञावली सण दीपावली आणि शेणाच्या पूजन स्वरूपात सुरु झाला. प्रज्ञावली सण अशोकाने इ. स. पूर्व २५७ ला केला होता.

चतुरासिती सहस्सानी, आरामे कारयामह| एकेकधम्मक्खन्धस, एकेकाराम पूजयं||

बुद्धाने ८४००० वचणे प्रस्तुत केलीत, म्हणून सम्राट अशोकाने ८४००० बौद्ध स्तूप बांधलेत. हेच औचित्य लक्षात घेऊन सम्राट अशोकाने कार्तिक अमावशेला जागोजागी दीपमाळा आणि पुष्पमाळा अलंकृत केल्यात. रस्त्यावर दुतर्फा दिवे लावून सजविण्यात आलेत. ८४००० स्तूपांप्रमाने सम्राट अशोकाने ८४००० दीप प्राजवलीत केलेत. हा पर्व सतत सात दिवस चालला होता. भिक्खू आणि उपासकांना धनाच्या रूपात दान देण्यात आले. तो दिवस दीपावलीचा धनोत्रय दिवस म्हणून साजरा केला गेला. कारण सम्राट अशोकाने आपला संपूर्ण खजिना धम्मासाठी दान केला होता.

यानिमित्ताने प्रत्येक घर आणि विहार स्वच्छ करून वंदना घेण्यात आल्यात. या पर्वाच्या निमित्ताने प्रत्येक घराच्या अंगणात एक छोटे छोटे स्तूप बनविण्यात आलेत. सम्राट अशोकासारखे भव्य ८४००० स्तुपे सामान्य जनतेला बांधता येत नव्हते म्हणून एक छोटे नमुना स्तूप ते अंगणात बांधून आनंद साजरा करू लागले. जे प्रज्ञावलीला आपण शेतकऱ्यांच्या अंगणात पाहतो. आज आपण जे प्रज्ञावलीला वृंदावन, किल्ला, कुंडी हिंदूंच्या अंगणात पाहतो त्याचा इतिहास तोच आहे. या उत्सवाला देश विदेशाची ८०००००००० ऐंशी कोटी जनसंख्या आणि सोबत भिक्खू उपस्थित होते असे प्राचीन दिपवंश या ग्रंथात लिहिल्या गेले आहे.

श्रीलंका येथे आजही बौद्ध संस्कृतीनुसार दीपावली साजरी केली जाते. राजा तिष्यने याच कार्तिक अमावसेच्या दिवसात बौद्ध धम्म दिक्षा घेतली होती आणि श्रीलंकेत आनंदोत्सव साजरा केला होता. त्या प्रित्यर्थ सम्राट अशोकाला त्याने अलंकारित भेट वस्तू सुद्धा पाठविल्या होत्या.

भारताच्या बाहेर जगातील बौद्धराष्ट्र प्रज्ञावलीच्या या दिवसात दिप म्हणून मोठ-मोठे लाखो आकाशदिवे आकाशात रात्रीच्या प्रहरी सोडतात. भारतातून लुप्त झालेला प्रज्ञावली सण विदेशातील बौद्ध लोक मात्र आनंदाने साजरा करतात.

प्रज्ञावलीच्या दिवसी मोग्गलायन यांची हत्या झाली म्हणून त्याचे दुःख माणून पुन्हा दुःखी होण्यात काहीच अर्थ नाही. मोग्गलायनच्या काळाला दोन हजार पाचशे सदुसष्ट वर्षे होऊन गेले आहेत. दोन हजार पाचशे सदुसष्ट वर्षांपूर्वीच्या दुःखद गोष्टीला पुन्हा-पुन्हा हजारो वर्षे कुरवाळत बसण्यात काय अर्थ आहे? माझ्या पंजोबाने चुक केली म्हणून त्याची शिक्षा माझ्या नातवाला देता येणार नाही.

मोग्गलायनची हत्या ही त्याच्या कर्म सिद्धांतानुसार झाली होते. तरुणपणातच त्याने केलेल्या रक्तपाताचा मोबदला त्याला बुद्धाचा धम्म स्वीकारल्यानंतरही स्वतःच्या प्राणाच्या रूपात द्यावा लागला होता. मोग्गलायनच्या हत्येनंतर बुद्धांनी आवर्जून त्यांच्या शिष्यांना कर्म सिद्धानंत सांगितला होता. मोग्गलायनच्या मृत्युचे आम्हा सर्वांपेक्षा तर दुःख बुद्धांना झाले असेल. मग तो दिवस काळा दिवस म्हणून साजरा करा असे तर कुठेच बुद्धांनी सांगितले नाही. कारण बुद्धांची दृष्टी ही सम्यक होती. जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन सुंदरतेचा होता.

बुद्ध म्हणतात, "जीवन सुंदर आहे. त्याला जपा." दुःखाणे विव्हळत बसा असे कुठेच बुद्ध म्हणाले नाही. उलट दुःखावर कशी मात करावी याचेच तत्वज्ञान त्यांनी आयुष्यभर पेरले. मोग्गलायनच दुःख मानत बसलो तर बुद्ध आणि सम्राट अशोकाच्या कार्याला तिलांजली द्यावी लागेल. उलट त्या दिवसी आम्ही दिवे लावून बौद्ध संस्कृती जपून बौद्ध धम्मानुसार प्रज्ञावली उत्सव साजरा करून बुद्धांच्या महान शिष्याला आदरांजली द्यायला हवी, ना की प्रज्ञावलीच्या दिवसी सर्व जग आनंदात मग्न असतांना दरवाजे बंद करून दुःख करण्यात पराक्रम असावा. बुद्ध धम्म मनुष्याला मनुष्यातून उठवून एकट्यात नेत नाही. धम्म निराशा देत नाही तर तो आशावाद जपतो.

मागील पन्नास वर्षाच्या काळात जर १४ एप्रिलला जर एखादी गोष्ट वाईट घटना घडली असती तर आम्ही बाबासाहेबांची जयंती १४ एप्रिलला साजरी न करता तो दिवस काळा दिवस म्हणून मानला असता का? नाही ना! म्हणजेच एखाद्याच्या मृत्युमुळे महान अशा माणसाच्या कार्याला तिलांजली देता येत नाही. बुद्धांचा धम्म हा मनुष्याला पदोपदी सुख, आनंद प्राप्त करून देतो आणि तेच बुद्धांच्या धम्माचे अधिष्ठान आहे. जर प्रज्ञावलीच्या दहा दिवसांत मनुष्य धम्म स्वीकारून दुःखी होत असेल तर अशा धम्माची मनुष्याला गरजच काय?*

बुद्ध हे प्रकाशाचे प्रणेते होते. त्यांना अंधार प्रिय नव्हता. बुद्धांनी कुठेच म्हटले नाही की, लोक दिवे लावून आनंद साजरा करित असेल तेव्हा बुद्धांनी घरात अंधार करून बसावे. प्रज्ञावली प्रकाश देते आणि बुद्धांना प्रकाश प्रिय होता. हजारो वर्षांच्या काल्पनिक कथांना उराशी बाळगून आजचा वर्तमान आणि भविष्य अंधकारमय करण्यात काहीच अर्थ नाही. बुद्धांच्या सिद्धांतानुसार आम्ही नेहमीच परिवर्तनशील असायला हवे. ना की हजारो वर्षांपूर्वी गडलेल्या काल्पनिक गोष्टींची खुन्नस बाळगण्यात आणि बदला घेण्यात अग्रेसर असायला हवे. जे आनंदायक, सुखकारक आहे ते नेहमीच स्वीकारायला हवे. मुळात ज्यांनी बळीराजा, वामन, इंद्र, विष्णू इतरांवर संशोधन केले ते विसरून गेले होते की यांचे महत्व मांडतांना ते बुद्धांवरच प्रतिक्रांती करित आहेत. बौद्धांची दीपावली त्याच प्रतिक्रांतिवादात वाहून गेली.

मित्रांनो मला महामोग्गलायन बद्दल नितांत आदर आहे. त्यामुळे मी मोग्गलायनला आदरांजली दिव्याच्या (मेणबत्ती) रूपात देणार. मी आणि माझे कुटुंब बुद्धांच्या, सम्राट अशोकाच्या महान कार्याचा आनंद दिव्यांच्या रूपात घेणार. मी बुद्धांजवळ दीप लावून सर्वांना सोबत घेऊन वंदना घेणार. मी घरात प्रकाश करणार. अंधार मला प्रिय नाही. हिंदू धर्माच्या दिवाळीशी माझा तिळमात्र संबंध नाही आणि या लेखाचा सुद्धा.

यानिमित्ताने बुद्धाजवळ दीप प्रज्वलीत करणे, वंदना घेणे, धम्म ग्रंथाचे एखादे प्रकरण समजून घेणे आणि समजावून सांगणे. बौद्ध स्थळांना भेटी देणे, पैश्यांचा अपव्यय न करता गरिबांच्या मुलांना शिक्षणाला पैसे देणे, त्यांना भेटवस्तू, कपडे देणे, वृद्धाश्रमाला भेट देऊन आर्थिक सहाय्य करणे, इतरांना मदत करणे हे काम करू शकतो.

जे नुस्ते टिका करण्यात शौर्य दाखवितात त्यांनी फक्त प्रज्ञावली दीप दानोत्सव हा हिंदूंचा कसा सण कसा!! याचे प्रमाणशीर तात्विक विवेचन करून सांगावे.

– हर्षवर्धन ढोके (नागपूर). फेसबुक पेज वरून.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🦚🦚🦚🔵🔵🔵☸☸☸💎 *अपरिहाणीय धंम्म (अ–पतन के नियम)* 💎☸☸☸🔵🔵🔵🦚🦚🦚

(गृधकूट पर्वत पर तथागत बुद्ध की देशना)

मगध साम्राज्य का राजा अजातशत्रु वज्जियों के प्रजातंत्री राज्य वैशाली (लिच्छवी) को हराकर अपने वश में करने का प्रयास करता था। लेकिन लिच्छवी को परास्त नहीं कर सकता था। अजेय वज्जियों के कारणों को जानने के लिए अजातशत्रु ने अपने महाअमात्य वर्षकार को तथागत जहां विहार करते थे, उस गृधकूट पर्वत पर भेजा। वर्षकार ब्राह्मण भगवान के दर्शन के लिए गृधकूट पर्वत पर गया, तथागत की वंदना की और एक ओर बैठकर अजातशत्रु का संदेश बताया–

"भन्ते ! राजा अजातशत्रु वज्जियों पर चढ़ाई करना चाहता है, वह ऐसा कहता है– "मैं इन वैभवशाली वज्जियों को उच्छिन्न करूंगा।" उस समय भन्ते आनंद भगवान के पीछे खडे भगवान को पंखे से हवा मार रहे थें |

तब भगवानने आनंद को संबोधित करते हुये कहा –

"आनंद ! क्या तुमने सुना हैं – १) वज्जी संम्मति के लिये बराबर बैठक करते हैं?"

आनंद – सुना हैं भंते |

तथागत – आनंद ! *वज्जी जब तक बैठक (Meeting) करते रहेंगे, तब तक आनंद ! वज्जियों की वृद्धि ही समझना, हानि नहीं |*

२) "क्या आनंद ! तूने सुना हैं – वज्जी एक हो बैठक करते हैं, एक हो उत्थान करते हैं, वज्जी एक हो कर्तव्य को करते हैं?"

आनंद – सुना हैं भंते |

तथागत – आनंद ! *जब तक वज्जी एक हो बैठक करते हैं, एक हो उत्थान करते हैं, वज्जी एक हो कर्तव्य को करते हैं, तब तक वज्जियों की वृद्धि ही समझना, हानि नहीं |*

३) आनंद ! क्या तूने सुना हैं – वज्जी गैरकानुनी काम नहीं करते हैं, नियमों का भंग नहीं करते हैं, नियमों का पालन करते हैं?

आनंद – सुना हैं भंते |

तथागत – आनंद ! *जबतक वज्जी गैरकानुनी काम नहीं करते हैं, नियमों का भंग नहीं करते हैं, नियमों का पालन करते हैं, तबतक वज्जियों की वृद्धि ही समझना, हानि नहीं|*

४) क्या आनंद ! तूने सुना हैं – वज्जियों वृद्धों का सत्कार करते हैं, उन्हें गुरूकार मानते हैं, पुजते हैं, उनकी बात सूनने योग्य मानते हैं?

आनंद – भंते ! सुना हैं |

तथागत – *जब तक वज्जियों वृद्धों का सत्कार करते हैं, उन्हें गुरूकार मानते हैं, पुजते हैं, उनकी बात सूनने योग्य मानते हैं, तब तक वज्जियों की वृद्धि ही समझना, हानि नहीं|*

५) क्या आनंद सुना हैं – जो कुल–स्त्रियां हैं, कुल–कुमारिकांये हैं, उन्हे वह छिनकर, जबरदस्ती नहीं बसाते हैं?

आनंद – भंते ! सुना हैं |

तथागत – आनंद ! *जब तक वज्जी जो कुल–स्त्रियां हैं, कुल–कुमारिकांये हैं, उन्हे वह छिनकर, जबरदस्ती नहीं बसाते हैं, तब तक वज्जियों की वृद्धि ही समझना, हानि नहीं|*

६) आनंद ! क्या तूने सुना हैं – वज्जियों के नगर के भीतर या बाहर जो चैत्य (वंदनीय स्थल) हैं, वह उनका सत्कार करते हैं, पुजते (अनुसरण) करते हैं | उनके लिये पहले किए गये दान को, पहले की गयी धंम्म परंपराओं का लोप नहीं करते?

आनंद – भंते ! सुना हैं |

तथागत – *जब तक वज्जी नगर के भीतर या बाहर जो चैत्य (वंदनीय स्थल) हैं, वह उनका सत्कार करते हैं, पुजते (अनुसरण) करते हैं | उनके लिये पहले किए गये दान को, पहले की गयी धंम्म परंपराओं का लोप नहीं करते हैं, तब तक वज्जियों की वृद्धि ही समझना, हानि नहीं |*

७) क्या आनंद ! सुना हैं – वज्जी लोंग अर्हंतों, पुज्ज्यों की अच्छि तरह धंम्मानुसार रक्षा करते हैं? किसलिये? भविष्य में अर्हंत राज्य में आयें, आयें हुये अर्हंत राज्य में सुख से विहार करें?

आनंद – भंते ! सुना हैं |

तथागत – *जब तक वज्जी लोंग अर्हंतों, पुज्ज्यों की अच्छि तरह धंम्मानुसार रक्षा करते हैं, भविष्य में अर्हंत राज्य में आयें, आयें हुये अर्हंत राज्य में सुख से विहार करें, ऐसा सोचते हैं तब तक वज्जियों की वृद्धि ही समझना, हानि नहीं |*

वर्षकार ब्राह्मण महाअमात्य तथागत के संबोधन को सून रहा था | तब भगवानने वर्षकार को संबोधित किया –

"ब्राम्हण ! एक समय मैं वैशाली के सारन्दद चैत्य में विहार करता था | वहां मैने वज्जियों को यह सात अपरिहाणिय धंम्म (अ–पतन के नियम) कहे | जब तक यह सात अपरिहाणिय नियम वज्जियों मे रहेंगे, पालन करेंगे, तब तक वज्जियों की वृद्धि ही समझना, हानि नहीं |"

सबका मंगल हो

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐

हर रविवार (आदिच्चवारो) बुद्धविहार बुद्धलेणी जाना ही चाहिये – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐

प्रत्येक रविवारी (आदिच्चवारो) बुद्धविहारात बुद्धलेणीस गेलेच पाहिजे – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐

सब्ब पापस्स अकरणं कुसलस्स उपसंपदा। *सचितपरियोदपनं में एतं बुद्धान सासनं।*

धन्यवाद, सविनय जयभिम, सर्वांचे मंगल हो, Be Happy.

अश्वसेन बौद्ध *सूर्यकांत ढवळे*

☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ६ नोव्हेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, कतिको मासो, बुधवार, कार्तिक माहे.

६ नोव्हेंबर १९३७ – रोजी मुक्काम मसुर जिल्हा सातारा येथे सातारा जिल्हा महार परिषदेचे सातवे अधिवेशन माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "बहुजन समाजावर अत्याचार होणार नाही असे कायदे करवून घेतले पाहिजे."

६ नोव्हेंबर, १९३८ – रोजी ७ नोव्हेंबरचां कामगारांचा १ दिवसाचा सार्वत्रिक संप यशस्वी करण्यासाठी परळच्या कामगार मैदानावर झालेल्या जंगी सभेत माननीय विश्वरत्न, बोधिसत्व प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगारांना मार्गदर्शन व भाषण.

६ नोव्हेंबर, १९४६ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी श्री. चर्चिल यांची भेट घेतली व अस्पृश्य लोकांच्या दुर्दैवी परिस्थितीबद्दल त्यांना माहिती दिली. ब्रिटिश कंझरवेटिव्ह पक्षाचे नेते श्री. विन्स्टन चर्चिल यंच्याकडे पीडित वर्गाचे प्रतिनिधित्त्व करण्यासाठी त्यांनी आपले मत व्यक्त केले.

६ नोव्हेंबर १९५४ – रोजी माननीय विश्वरत्न बोधिसत्व प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुसूचित जातीच्या सदस्यांवर राज्यसभेत भाषण.

६ नोव्हेंबर २००८ – रोजी बी. सी. कांबळे यांचे निर्वाण.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

🌷 *बौद्ध धम्मांतील १९ शाखा*🌷

☸️परिच्छेद २.

पुढील काळात धम्मात अनेक शाखा उपशाखा निर्माण झाल्या. थेरवादात १२ शाखा निर्माण झाल्या तर महासंघीकांत ७ शाखा निर्माण झाल्या त्या शाखा पुढील प्रमाणे.

बुद्ध–धर्म

स्थविरवाद

।

____

। ।

वज्जीपुत्रक ७ महिशासक

(२) ।

३ धर्मोत्तरीय. ८ धर्मगुप्तिक

४ भद्रयाणिक. ९ सर्वास्तिवादी

५ छन्नागारिक १० काश्यपिय

(षण्णागारीक) ११ सांक्रांतिक

६ सम्मितिय १२ सूत्रवादी (सौत्रांतिक)

महासांघिक १३

____

१४ एकव्यवहारिक........ गोकुळीक १५

।

____

१६ प्रज्ञप्तिवादी...........बाहुलिक १७ (बाहुश्रूतिक)

चैत्यवादी १८

थेरवादाची सर्वास्तीवाद ही शाखा प्रमुख झाली. सर्वास्तिवादाचे तत्त्वज्ञान गहन असून लोकांत सर्वास्तिवादाचा प्रसार सर्वत्र झाला. नंतरच्या काळात या सर्व शाखांपैकी केवळ चार शाखा सोडल्या तर बाकीच्या सर्व शाखा लवकरच संपुष्टात आल्या. ज्या शाखा बऱ्याच काळ टिकून होत्या त्या म्हणजे; १. वैभाषिक, २. योगाचार, ३. माध्यमिक, ४. सौत्रांतिक.

_*स्थविरवादि किंवा थेरवादि :–*_

भगवान बुद्धांची शिकवण ही पालीभाषेतील थेरवादि ग्रंथात उपलब्ध आहे. थेरवादाने भगवान बुद्धांना मानवीय स्वरूपात दाखविले आहे. जसे की भगवान बुद्धांनादेखिल शारीरिक त्रासही होत असल्याचे दाखविलेले पाली त्रिपिटकांत सापडतात. थेरवादानुसार भगवान बुद्धांची शिकवण अगदी सहज आहे.

कोणतेही पान (नजरेने कुणाला वाईट बघणे, मनात वैरभाव आणणे) कर्म न करणे, कुशल कर्म करणे आणि आपल्या मनाला पवित्र ठेवणे, ही भगवान बुद्धांची शिकवण होय.

"गागर में सागर" या उक्तीप्रमाणे वरील जातेय संपूर्ण बुद्ध वचनांचे सार सामाविलेले आहे. थेरवादानुसार जगातील सर्व गोष्टींत तीन लक्षणे आहेत. अ. दुःख, ब. अनित्य क. अनात्म.

सर्वच संस्कारातील गोष्टी दोन तत्त्वांनी मिळून तयार होतात एक नाम व दुसरे रूप; त्यांचे पाच स्कंध आहेत. १. रूप, २. वेदना, ३. संज्ञा, ४. संस्कार, ५. विज्ञांन.

ही स्कंधसुद्धा सहा इंद्रिय आणि त्यांची सहा आयतने अशी विभागली आहेत. सहा इंद्रियांचे सहा विज्ञांन असे मिळून अठरा (१८) धातु होतात, अशा प्रकारे हे विश्व अनेक धातूंनी मिळून बनले आहे. आर्य अष्टांगिक मार्गाचे अनुकरण करून दुःख मुक्ती मिळू शकते, व्यक्ति विकार रहित होतो, अर्हंत होतो. त्याचे पुन्हा–पुन्हा जन्म घेणे थांबणे.

_*महिशासक :–*_

महिशासक आणि वज्जीपुत्तक ह्या शाखा थेरवादापासून निर्माण झाल्या. महिशासकांचा थेरवादिप्रमाणे अर्हंत परत मागे जाऊ शकत नाहीत याच्यावर त्यांचा विश्वास होता परंतु श्रोतापंन्न मागे परत जाऊ शकतात असे ते मानत. देव पवित्र जीवन जगु शकत नाहीत, पाखंडी (खोट्या) लोकांना अद्भुत शक्ती मिळू शकत नाही, ह्या जन्मात आणि पुढच्या जन्मात वेळेचे अंतर (अंतर्भाव) असू शकत नाही. संघात बुद्ध आहेत, म्हणून संघाला दिलेले दान केवळ बुद्धांना दिलेल्या दानापेक्षा अधिक पुण्यकारक आहे. आर्य अष्टांगिक मार्गाच्या आठ पायर्यांपैकी संम्यक वाचा, संम्यक कर्मांत आणि संम्यक आजीविका ह्या पायऱ्या खऱ्या नाहीत, कारण ती मानसिक कृती नाहीत म्हणुन ह्यांना आर्य अष्टांगिक मार्गातून काढले पाहिजे असे ते मानित.

_* सर्वास्तिवाद :–*_

संस्कृत भाषा वापरणाऱ्या बौद्ध शाखांतील सर्वास्तिवाद ही शाखा थेरवादाच्या जवळची आहे. सर्वास्तिवादानुसार भविष्यकाळ, भूतकाळ आणि अंतरभावात त्यांचा विश्वास होता. स्कंध, आयतन आणि धातु बिजाच्या रुपात नेहमी असतात असे ते मानित. भारतामधे जेव्हा स्थविरवाद नष्ट होऊ लागला होता तेव्हा महायानाच्या प्रभावाला सर्वास्तिवादाने काही काळ थांबउन ठेवले होते.

आचार्य वसुबंधुं ह्यांनी सर्वास्तिवादाचा प्रख्यात "अभिधर्मकोष" हा ग्रंथ लिहिला. आचार्य वसुबंधुं हे सर्वास्तिवादाचे मोठे समर्थक होते. त्यानंतर त्यांचे भाऊ असंग ह्यांच्या प्रभावामुळे ते महायानाकडे वळले. सम्राट कनिष्क हे सर्वास्तिवादाचे आश्रयदाते होते, त्यांनीच चौथी धंम्मसंगिती भरविली होती. स्थविरवाद आणि सर्वास्तिवाद हे वास्तववादी विचारसरणीचे होते. सर्व गोष्टी केवळ वर्तमानकाळात अस्तित्त्वात नाहीत तर त्या भूतकाळातही होत्या आणि भविष्यकाळातही असतील, वर्तमानकाळात असणे ही त्याच साखळीची एक कडी आहे. सर्वास्तिवादाचा नैरात्म्य म्हणजे शाश्वत असे काही नाही यावर विश्वास होता. अर्हंत परत खालच्या पदाकडे जाऊ शकतात, मनाचा प्रवाह सतत चालणे हीसुद्धा एक समाधि आहे. बुद्धांना आणि बोधिसत्त्वांना लोकोत्तर शक्ती नसतात. त्यांचा अंतरभावात विशास होता. बोधिसत्त्व ही सर्वसाधारण (पृथकजन) स्थिती होती. अर्हंतांना अधिक शिकण्यासारखे आहे अशी त्यांची मान्यता होती.

*हैमवत :–*

"हैमवत" ही शाखा हिमालयाच्या प्रदेशात होती. वसुमित्रानुसार ही शाखा स्थविरवादाचा वारसा घेऊन चालणारी शाखा होती तर भाव्य आणि विनितदेव हे हैमवतले महासंघिकांचीव शाखा मानतात. बोधिसत्त्व हे इतरांपासून वेगळे नाहीत असे ते मानित.

– भिक्खु आनंद सुमनसिरी (कोपरगाँव), अतुल साळवे (गंगाखेड).

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐

हर रविवार (आदिच्चवारो) बुद्धविहार बुद्धलेणी जाना ही चाहिये – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐

प्रत्येक रविवारी (आदिच्चवारो) बुद्धविहारात बुद्धलेणीस गेलेच पाहिजे – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐

सब्ब पापस्स अकरणं कुसलस्स उपसंपदा। *सचितपरियोदपनं में एतं बुद्धान सासनं।*

धन्यवाद, सविनय जयभिम, सर्वांचे मंगल हो, Be Happy.

अश्वसेन बौद्ध *सूर्यकांत ढवळे*

☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ७ नोव्हेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, कतिको मासो, गुरूवार, कार्तिक माहे.

७ नोव्हेंबर १९०० – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील एका सरकारी शाळेत इंग्रजी पहिल्या वर्गासाठी प्रवेश घेतला, ती शाळा आता प्रतापसिंह हायस्कुल, राजवाडा चौक मध्ये आहे. या दिवशी बाबासाहेब आंबेडकर प्रथमच शाळेत गेले. महाराष्ट्र राज्यात हा दिवस 🌸 विद्यार्थी दिवस 🌸 म्हणून साजरा केला जातो.

७ नोव्हेंबर १९३२ – रोजी तिसऱ्या गोलमेज परिषदेसाठी Third Round Table conference माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडनला प्रयाण.

७ नोव्हेंबर १९३७ – रोजी मुक्काम दोंड जिल्हा पुणे येथे माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा संपन्न झाली. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "मनुष्य असूनही भाकरीसाठी स्वाभिमान शून्य होणार काय?"

७ नोव्हेंबर, १९३८ – रोजी स्वतंत्र मजूर पक्ष व गिरणी कामगार युनियन यांचा एक दिवसाचा सार्वत्रिक संप यशस्वीरित्या पार पडल्यानंतर मुंबईतील परळच्या कामगार मैदानावर झालेल्या जंगी सभेत माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "कोणत्याही परिस्थितीत मजुरांच्या प्रतिनिधींना निवडून दिले पाहिजे."

७ नोव्हेंबर, १९३९ – रोजी भदंत सदानंद महास्थविर संघानुशासक अखिल भारतीय भिक्षू संघ (भारत) यांचा जन्मदिन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

🦚🦚🦚🔵🔵🔵☸☸☸💎 *"परिपक्वता" क्या होती है?* 💎☸☸☸🔵🔵🔵🦚🦚🦚

🌷 *Maturity* 🌷

जब मैं अन्य सभी में बदलाव लाने के स्थान पर स्वयं अपने आप में बदलाव लाने के लिए प्रतिबद्ध हो जाऊ, तो इसका अर्थ है कि मुझमें परिपक्वता आ गई है।

जब मैं, जो व्यक्ति जैसा है उसे वैसा ही स्वीकार करने लगु, तो यह मेरे परिपक्वता का परिचायक है।

जब मैं यह समझने लगु कि प्रत्येक व्यक्ति अपने–अपने दृष्टिकोण के अनुसार सही है, तो इसका तात्पर्य यही है कि मेरी सोच परिपक्व हो गई है।

जब मै यह सोचना सिख जाऊ की, "छोडो, जाने दो," तो समझिये की मुझमे परिपक्वता आ गई हैं|

जब मैं किसी रिशते में 'केवल कूछ देना हैं' इसलिये दें और बदले में किसी भी प्रकार की कोई आशा ना रखू, तो इसका अर्थ यही हैं की, मुझमें परिपक्वता प्रवेश कर गई हैं |

जब मुझको यह समझ आ जाये की जो कुच्छ भी मैं कर रहां हुं वह अपने स्वयं के मन की शांति के लिये कर रहा हुं, तो इसका अर्थ यही हैं की अब मैं परिपक्व हो गया हुं |

जब मैं संसार में सबके समक्ष अपनी बुद्धिमत्ता को प्रमाणित करना बंद कर दुं, तो इस्का तात्पर्य यह हैं की मैं परिपक्व हो गया हुं |

जब मैं लोंगों में उनकी सकारात्मकता पर ही केंद्रीत होने लगु, तो इसका अर्थ यह हैं की मैं परिपक्व हो गया हुं |

जब मैं अन्य व्यक्तियों से अपना मुकाबला करना बंद कर दुं, तो इसका अर्थ यह हैं की मैं परिपक्व हो गया हुं |

जब मैं स्वयं अपने आप तक सीमित रहकर भी शांत अनुभव करने लगुं, तो इसका तात्पर्य यही हैं की अब मैं परिपक्व हो गया हुं |

जब मुझे यह समझ आ जायें कि ईच्छाओं और आवश्यकताओं के मध्य क्या अंतर होता हैं और तृष्णाओं का दमन करना सिख लुं, तो इसका मतलब यह हैं कि मैं परिपक्व और समझदार हो गयां हुं |

जब मुझे लगने लगें की भौतिक वस्तुओं का और धन–संपत्ती का मनुष्य की सुख–शांति और खुशियों से कोई संबंध नहीं हैं, तो इसका अभिप्राय हैं की मैं परिपक्व हो गया हुं|

जब मैं सरल और सकारात्मक रहकर स्वच्छंदता का अनुभव करने लगूं और अन्य व्यक्तियों को यही अनुभव करने देता हुं, तो समझे मैं परिपक्व हो गया हुं |

परिपक्व होने के लियें अपने मन को वश में करके निर्मल करना ही होगा | मन को निर्मल करने के लिये एक ही रास्ता हैं (एकायनो मग्गो) – आर्य अष्टांगिक मार्ग |

आए, आर्य अष्टांगिक मार्ग को सिखकर और धंम्म में पककर अपना मंगल साधं लें|

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐

हर रविवार (आदिच्चवारो) बुद्धविहार बुद्धलेणी जाना ही चाहिये – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐

प्रत्येक रविवारी (आदिच्चवारो) बुद्धविहारात बुद्धलेणीस गेलेच पाहिजे – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐

सब्ब पापस्स अकरणं कुसलस्स उपसंपदा। *सचितपरियोदपनं में एतं बुद्धान सासनं।*

धन्यवाद, सविनय जयभिम, सर्वांचे मंगल हो, Be Happy.

अश्वसेन बौद्ध *सूर्यकांत ढवळे*

☸☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ८ नोव्हेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, कतिको मासो, शुक्रवार, कार्तिक माहे.

८ नोव्हेंबर १९३६ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्य समाजातील सर्व साधुसंतांचा धंम्मांतरास पाठिंबा देण्यासाठी नागपूर येथे जाहीर सभा घेतली.

८ नोव्हेंबर, १९३६ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दामोदर हॉल परळ मुंबई येथे समता सैनिक दलाची सभा घेतली. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी एक मोलाचा संदेश दिला, "ज्या वृक्षाच्या छायेखाली गुण्यागोविंदाने बसावयाचे आहे, त्या छायेच्या फांद्या तोडण्याचा दुष्टपणा करू नका."

८ नोव्हेंबर, १९३७ – रोजी माननीय विश्वरत्न बोधिसत्व प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वऱ्हाड, वतन कामगार, महार संघाची वऱ्हाड वडनेरा येथे परिषद घेतली.

८ नोव्हेंबर, १९४२ – रोजी कामगार मैदान परळ मुंबई येथे शेड्युल्ड कास्टस फेडरेशनच्या एन. शिवराज यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या सभेत माननीय विश्वरत्न बोधिसत्व प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी, गांधीने पुकारलेल्या असहकार चळवळीवर टिका करून अस्पृश्यांनी त्यात भाग घेऊ नये असे सुचवले.

८ नोव्हेंबर, १९४३ – रोजी भारत सरकारचे मजूरमंत्री म्हणून माननीय विश्वरत्न बोधिसत्व प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संसदेत 'इंडियन ट्रेड युनियन ॲक्ट' या कायद्यात सुचवणारे विधेयक मांडले. या विधेयकानुसार मजूर संघटनांना मान्यता देण्याची सक्ती करण्यात आली.

८ नोव्हेंबर, १९४५ – रोजी ओरिसा येथील नद्यांच्या विकासाकरिता आयोजित परिषदेत माननीय विश्वरत्न बोधिसत्व प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण.

८ नोव्हेंबर १९५१ – रोजी प्रेस ट्रस्ट ऑफ इंडियालां दिलेल्या डॉक्टर मुलाखतीत माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, "माझा पक्ष केवळ सोशलिस्ट पक्षांबरोबरच नव्हे तर अन्य कोणत्याही पक्षाशी युती करण्याचा प्रयत्न करेल, ज्याचा फेडरेशनलां विरोध नाही. मी माझ्या पक्षासाठी गुलाम राहणार नाही आणि माझा पक्ष सहमत आहे. आम्ही एकत्र काम करतो आणि आम्ही आमच्या मार्गावर कार्य करतो. मी राजकारणात राहत नाही आणि मी राजकारणात जाण्याचा प्रस्तावही देत नाही."

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

🦚🦚🦚🔵🔵🔵☸☸☸💎 🌸 *संविधान म्हणजे भारताचा अनमोल प्राण* 🌸 💎☸☸☸🔵🔵🔵🦚🦚🦚

📖📖📖.....🌷✍

१]📘📖 *विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताचे संविधान ३९५ कलमाचे का लिहले? ३९४ किंवा ३९६ कलमाचे का लिहले नाहीत? तर त्याला कारण महात्मा फुले हे गुरू कारणीभूत आहेत ते कसे?*

२]📘📖 *महात्मा फुले यांनी बहुजन समाजाला शिक्षण ज्या पुण्यातील भिडे वाडयातून दिले, शाळा चालू केले. त्या शाळेचा क्रमांक ३९५ होता. त्याची व आपल्या गुरूविषयी कृतज्ञता म्हणून संविधान ३९५ कलमांचे लिहिले.*

३]📘📖 *संविधानाच्या या मसुदा समितीवर सात लोकांची निवड करण्यात आली होती. त्यापैकी दोघांनी राजीनामा दिला, एकाचा मृत्यू झाला, एक विदेशात गेला, एकाची तब्बेत ठीक नव्हती, एक राजकारणात अडकला.*

४]📘📖 *त्यामुळे मसुदा समिती अध्यक्ष म्हणून संविधान लिहिण्याची सर्वस्वी जबाबदारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर येवून पडलीय व ती त्यांनी समर्थपणे एकट्यानीच पार पाडली. म्हणून बाबासाहेब आंबेडकर हे "संविधानाचे शिल्पकार" आहेत.* 💎

५]📘📖 *संविधानाची सुरुवात कशी करावी? यावरून वाद चालू होता त्यात मौलाना हजरत मोहलि म्हणू लागले की, संविधान "अल्लाह" च्या नावाने सुरू करावे, पंडित मालविय म्हणाले की, "ओम नम शिवाय" या नावाने सूरू करा. एच. पी. कामत म्हणाले की, "ईश्वर" नावाने सुरू करा.*

मग शेवटी बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, "लोक" नावाने सुरू करा मग यावर मतदान झाले.

मग डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ६८ मते पडलीत तर देवाच्या नावाने ४१ मते पडलीत. संविधानाची सुरुवात आम्ही भारताचे लोक या नावाने झाली.

पहिल्याच मतदानात दगडाचे देव हरलेत व माणूस जिंकीला.

६]📘📖 *संविधानाचा कच्चा मसुदा डॉ. बाबासाहेब आंबेडकर घरीच लिहीत बसले होते, त्यावेळी बॅरिस्टर पंजाबराव देशमुख हे बाबासाहेब आंबेडकर यांच्या घरी आले.*

७]📘📖 *यावेळी बाबसाहेब आंबेडकर यांनी त्यांचे स्वागत केले, तसेच संविधानाचा लिहीत असलेला कच्चा मसुदा बॅरिस्टर पंजाबराव देशमुख यांना दाखवून म्हणालेत, "की दादा यावर थोडी नजर मारा व काही सूचना असतील तर सुचवा, मी थोड्यावेळात येतो." असे म्हणून बाबासाहेब बाहेर गेले.*

८]📘📖 *परत आले तर बॅरिस्टर देशमुख यांच्या डोळ्यांत अश्रू पाहून बाबासाहेब म्हणतात की "दादा तुम्ही का रडतात?" यावर देशमुख यांनी सांगितले की "बाबासाहेब माझ्या मराठा कुणबी समाजाच्या आरक्षणाची तरतूद करा," हे सांगण्यासाठी बाबासाहेब मी तुमच्याकडे आलो होतो. पण तुम्ही किती महान आहात की मी येण्याच्या अगोदरच तुम्ही तो मसुदा तयार करून ठेवलाय, यामुळे मला आनंदाश्रू आवरत नाहीत.*

९]📘📖 *महात्मा फुले यांनी असे भाकीत केले होते की, "ज्या वेळी बहुजन समाज मनुवादी धर्मग्रंथ वाचेल त्यादिवसी तो जाळल्याशिवाय राहणार नाही." पाहा बाबासाहेबांनी मनुस्मृती नावाचा विकृत ग्रंथ जाहीरपणे जाळला व फुलेंचा विश्वास खरा केला व फुले यांनी म्हंटले होते की, "दुसरा राज्यग्रंथ निर्माण करील." मग तो राज्यग्रंथ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी _"संविधान लिहून"_ पूर्ण केला.*

१०]📘📖 *अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाने एक अहवाल तयार केला की, त्या कॉलेजमधे शिकुन गेलेल्या २०० वर्षांच्या इतिहासात जगात सर्वांत विद्वान कोण? त्यांनी जाहीर केले होते की जगात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विश्वरत्न विद्वान आहेत, Father of modern India (Independent Nation Declared In August.) is Dr. Ambedkar.*

११]📘📖 *कोलंबिया विद्यापीठाच्या मैदानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ब्राँझ धातूचा पुतळा बनविला आहे व त्या खाली लिहिले आहे की,* _*SYMBOL OF

KNOWLEDGE*_

१२]📘📖 *तेथील कुलगुरूंच्या कार्यालयात बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो (छायाचित्र) आहे व खाली लिहिले आहे की,* _*"आम्हांला गर्व आहे की आमच्या कॉलेजमधे शिकुन गेलेला आमचा विद्यार्थी एका देशाचा संविधान शिल्पकार ठरला."*_

१३]📘📖 *नेल्सन मंडेला म्हणतात की, "भारताकडून घेण्यासारखि एकच गोष्ट, ती म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले संविधान."*

१४]📘📖 *संविधान लिहून पूर्ण झाल्यानंतर एका पत्रकार परिषदेत प्रश्न विचारला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तुम्हाला संविधान लिहितांना काही अडचण येत होती का? यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लगेच उत्तर दिले की, "माझ्या डोळ्यासमोर छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्वराज्य उभे होते म्हणुन मला अडचण आली नाही."*

१५]📘📖 *बाबासाहेब म्हणाले की, "संविधान कितीही चांगले पण राबविणारे हात वाईट असेल तर ते संविधान कुचकामी ठरते." म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हताश मनाचा मानबिंदू म्हणजे संविधान.*

१६]📘📖 *संविधान लिहून झाल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या डोळ्यात अश्रू आले त्यावेळी तेथील पत्रकाराने विचारले की, "बाबासाहेब तुम्ही मनासारखे संविधान लिहून नाराज का आहात?" यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्या पत्रकारांना उत्तर देतांना सांगतात की, "मी बहुजनांच्या कल्याणाचा जाहीरनामा लागू करण्यासाठी ज्यांच्या हातात देत आहे ते लोक माझे बहुजन नाहीत. मला यांच्यावर विश्र्वास बसत नाही की ते संविधान जशाच्या तसे लागू करतील."*

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐

प्रत्येक रविवारी (आदिच्चवारो) बुद्धविहारात बुद्धलेणीस गेलेच पाहिजे – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐

सब्ब पापस्स अकरणं कुसलस्स उपसंपदा। *सचितपरियोदपनं में एतं बुद्धान सासनं।*

धन्यवाद, सविनय जयभिम, सर्वांचे मंगल हो, Be Happy.

अश्वसेन बौद्ध *सूर्यकांत ढवळे*

☸☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ९ नोव्हेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, कतिको मासो, शनिवार, कार्तिक माहे.

९ नोव्हेंबर १९२९ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मातंग हितकारक मंडळाची सभा, पार्वती मंदिर प्रवेशासाठी मोहीम.

९ नोव्हेंबर १९३६ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जरुरीच्या कामाकरीता विलायतेला रवाना झाले.

९ नोव्हेंबर १९४१ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी साहित्य चर्चा मंडळाची नागपूर येथे स्थापना केली.

९ नोव्हेंबर १९४२ – रोजी नभोवणीच्या मुंबई केंद्रावरून दुसऱ्या महायुद्धात मित्र राष्ट्रांना पाठिंबा देण्यासंबंधी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण.

९ नोव्हेंबर १९४३ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी "श्रम योग्य आचरणासाठी शासकीय करारामध्ये 'विधानसभेत प्रवेश' या विषयावर चर्चा केली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

बुद्ध अर्थशास्त्राचे पितामः

अडम स्मिथ यांनी १७७६ मध्ये "राष्ट्राची संपत्ती (Welth is nation)" हा ग्रंथ लिहिला. त्यामुळे त्यांना "आधुनिक अर्थशास्त्राचे जनक" असे म्हणतात. आता एकदा जनक निर्धारित झाला की तो बदलता येत नाही. म्हणून बुद्धाला अर्थशास्त्राचे जनक न म्हणता पितामः म्हणायला हवे.

"बुद्धांच्या विचाराकडे" धार्मिक चसम्यातून पाहिले जात असल्यामुळे बुद्ध हे केवळ एक धम्म संस्थापक होते व तो धम्म आपला नसल्यामुळे त्याचा आपला काही संबंध नाही; अशी "धारणा" झालेली आहे.

नाही तर बुद्ध हे जगातील पहिले शिक्षण तज्ञ, पाहिले अध्यापण शास्त्रज्ञ, पाहिले मानसशास्त्रज्ञ, पहिले अर्थशास्त्रज्ञ,... सर्वच बाबतीत पहिले ठरले असते.

या ठिकाणी आपण बुद्ध जगातील "पहिले अर्थशस्त्रज्ञ" म्हणून विचार करूया.

धार्मिक तत्कज्ञान म्हटले की ते आध्यात्मिक वगैरे असतं, असं समजल्या जात. पण बुद्धाने सर्व प्रकारच्या निराधार, काल्पनिक व तर्कहीन गोष्टींवर वेळ घालवण्याचे टाळले आहे. पारंपारीक दैवी संकल्पना, कर्मकांड इत्यादींचा त्याग करून मानवी मन, इच्छा, चिंता, भावना, आर्थिक प्रक्रिया कशा असतात; यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले आहे.

वस्तूंचे उत्पादन, विनिमय आणि वापर करतांना त्यांनी लाभदायक आणि हानिकारक या दोन्ही बाजूंचा विचार केला आहे. हा विचार त्यांनी त्यांच्या "दु:खमुक्तीचा सिद्धांत" यामध्ये मांडला आहे.

मानवी कल्याण कशात आहे, हे सांगतांना त्यांनी "मध्यम मार्ग" सुचवीला आहे. मानवी जीवनातील सर्व दु:खांचे कारण तृष्णा किंवा लोभ हे असून त्यांनी गरज आणि इच्छा (लोभ) यात फरक केला आहे. आजवर जगातील अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक समस्यांचे विवेचन करतांना अमर्याद गरजा आणि मर्यादीत साधने यावरच लक्ष केंद्रित केले आहे. पण गरज आणि इच्छा यांचा एकाच वेळी विचार करण्याचा प्रयत्न केला गेला नाही.

माणसाला भूक लागली तर त्याला पोट भरण्यासाठी काही तरी अन्न लागते. त्याला खरंच भूक लागली तर तो आपली भूक भागविण्यासाठी जे उपलब्ध मिळेल ते खाऊन आपली भूक भागवतो. त्यावेळी तो माला अमुकच हवं; असा हट्ट करीत नाही. ही गरज आहे. पण असा हट्ट करून वांच्छित पदार्थ खाण्याचा त्याचा हट्ट असेल तर ती त्याची गरज नसून इच्छा असते. तेथून समस्येला सुरुवात होते. यालाच बुद्धाने "तृष्णा" म्हटले आहे.

जगातील अर्थतज्ज्ञांनी "गरजांची संख्या अमर्याद" असल्याचे सांगितले आहे. पण अनंत असणाऱ्या या गरजा नव्हेत; त्या इच्छा आहेत. खर म्हणजे सजीवांच्या नैसर्गिक गरजा मर्यादीतच असतात. ज्या अमर्यादित असतात; त्या इच्छा होत. या अमर्यादित इच्छांना आधुनिक अर्थतंज्ज्ञांनी गरजा म्हटल्यामुळे संपूर्ण अर्थशास्त्राची दिशाच बदलून गेली आहे.

इच्छा अमर्यादित असल्यामुळे त्या पूर्ण करण्यासाठी साधने कमी पडतात; म्हणून आर्थिक समस्या निर्माण होतात. अशा गर्जंचे नव्हे इच्छांचे आर्थिक दृष्टीने वर्गीकरण करण्याची आवश्यकता असते. आवश्यक, कमी आवश्यक आणि चैनीच्या इच्छा; असे तीन प्रकारात गरजांचे वर्गीकरण केले की; मग उपलब्ध असलेल्या मर्यादीत साधनांच्या सहाय्याने त्यांची पूर्तता करण्यासाठी त्यांचा प्राधान्य क्रम लावल्या जातो.

वास्तवात गरजांचे कारण अज्ञात नसते पण इच्छा किंवा तृष्णामुळे माणसाला त्याचे कारण कळत नाही. त्यामुळे तृष्णा हेच अज्ञानाचे व दु:खाचे कारण आहे; असे दिसून येते. विविध प्रकारच्या इच्छांमुळे माणसाच्या गरजा वाढत जातात आणि यातच माणूस गुर्फटून जातो. असा विचार मांडून बुद्धाने मानवी कल्याणाचा आर्थिक सिद्धांत मांडला आहे.

जगातील प्रत्येक गोष्टीमध्ये काही ना काही कारण असते. या तर्काच्या आधारे बुद्ध माणसाला विवेकवादाकडे नेतात. त्यासाठी त्यांनी "प्रतित्य समूत्पाद" हा सिद्धांत मांडला. विश्वातल्या प्रत्येक घटनेमागे कोणते तरी कारण असतेच; हा मुद्दा लक्षात घेऊन बुद्धाने दु:खाचे कारण शोधून काढले व त्यावर उपाय म्हणून आर्य अष्टांगिक मार्ग सुद्धा सांगितला. तो पर्यंत "पूर्व जन्माच्या पापांचा परिणाम" हेच कारण सांगितल्या जात असे.

मानवी गरजा नैसर्गिक असल्या तरी आर्थिक समस्या निर्माण होण्यासाठी कोणते तरी कारण असते; याचा विचार धम्मपदाच्या तेवीसाव्या भागामध्ये आढळतो. भूक किंवा तहान लागली तर ती स्वप्रयत्नाने भगवावी लागते; हा निसर्गाचा नियम आहे. पण माणूस हा सामाजिक प्राणी असल्याने केवळ आपल्या व्यक्तिगत किंवा कौटुंबिक गर्जांचा विचार करून चालत नाही. समाजाचा किंवा देशाचा विचारसुद्धा करावा लागतो. यातूनच अर्थशास्त्राचा जन्म होतो. मानवी इच्छा अमर्याद असल्यामुळे त्यांचे प्राधान्य क्रमाने वर्गीकरण करण्याचे तंत्र बुद्धाने सांगितले. इच्छा वाढत गेल्याने गरजा भागल्या तरी तृष्णा संपत नाही आणि त्यातून संचय करण्याची प्रवृत्ती वाढीस लागते व समस्या निर्माण होतात. त्या सोडविण्याचे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र होय; असी साधी सोपी व्याख्या आहे. असा आर्थिक दृष्टिकोण बुद्धांच्या अर्थशास्त्रात मिळतो.

जेव्हा माणूस समूहाणे राहतो; तेव्हा निर्माण होणाऱ्या समस्या व्यक्तिगत किंवा कौटुंबिक न राहता त्यांचे स्वरूप सामाजिक बनते. म्हणूनच बुद्धांनी व्यक्तिगत समस्येबरोबर समाजाच्या समस्येचा विचार करून संघाची संकल्पना मांडली. संघाची स्थापना करून समूहिक प्रयत्नातून समाजाच्या गरजा व समस्या दूर कराव्यात; असे बुद्धांचे अर्थशास्त्र सांगते. "बुद्धांच्या आर्थिक व्यवस्थेचा विचार मानवी जीवनातील सहकारी आणि सुसंवादी प्रयत्नाच्या विकासाचा पाया आहे. स्वत:चा विकास करून आत्मनिर्भरता प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करण्यास बुद्धांचा विचार उपयुक्त आहे." असा बुद्धांच्या अर्थशास्त्राविषयीचा विचार श्रीलंकेच्या अर्थतज्ज्ञ नेव्हल करुणातिलके मांडतात. इ. स. 1972 पासून भूटानच राजा जिग्मे सिंग्ये वांगचूक आणि त्यांच्या सरकारने बुद्धाच्या तत्वज्ञानावर आधारित "सकळ राष्ट्रीय आनंद निर्देशांक" ही संकल्पणा स्वीकारून त्यांच्या देशाच्या विकासाचा आढावा घेण्यासाठी उपयोग केला. अमेरिकेतील क्लेअर ब्राऊन या अर्थशास्त्राच्या प्राध्यापिकेणे सुद्धा बुद्धांच्या या मानवी विकासाच्या आर्थिक विचारांना अर्थव्यवस्थेच्या चौकटीत बसवून पर्यावरणाचे संरक्षण व उच्च दर्जाचे समाज जीवन कसे असावे; यासाठी बुद्धांच्या मध्यम मार्गाला महत्व दिले. इतकेच नव्हे तर नोबेल पुरस्कार प्राप्त करणारे भारतीय अर्थतज्ज्ञ अमर्त्य सेन यांनी देखील व्यक्तीचा व राष्ट्राचा विकास करण्यासाठी बुद्धांच्या मार्गाचा अवलंब करण्याची आवश्यकता असल्याचे

सांगितले. यावरून बुद्धांचे अर्थशास्त्र हे वैज्ञानिक ज्ञानाच्या चौकटीवर आधारलेले असून वैयक्तिक, समाजिक आणि पर्यावरणीय क्षमतेच्या सामान्य उद्दिष्टापर्यंत पोहोचण्यासाठी बुद्धांचे अर्थशास्त्र मार्गदर्शन करते; असे म्हणता येईल. मानवाच्या आर्थिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी बुद्धांचे अर्थशास्त्र उपयुक्त असून त्याचा आर्थिक दृष्टीने विचार होने गरजेचे आहे. कारण पाश्चात्य आर्थिक विचार भौतिक साधन संपत्तीला अधिक महत्व देते. परंतु भौतिक संपत्ती लालसा व इच्छेला उत्तेजण देते त्यामुळे लोक आपल्या गरजा व इच्छा पूर्ण करण्यासाठी, भरपूर पैसा मिळविण्यासाठी, संपूर्ण जीवनभर धडपडत असतात. परंतु बौद्ध अर्थशास्त्रात यालाच दुःखाचे कारण म्हटले आहे. अन्न, वस्त्र, निवारा आरोग्य व शिक्षण यांसारख्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी इतर भौतिकवादी इच्छा कमी करणे आवश्यक आहे. लोक निरर्थक इच्छेचा पाठपुरावा करतात.

भांडवलवादी आर्थिक विचारांनुसार उद्योजक, व्यापारी, विक्रेता जास्तीत जास्त नफा मिळविण्याचा प्रयत्न करतो. त्यात उपभोक्ता वा ग्राहकाचे हित, कल्याण नसते. परंतु बौद्ध अर्थशास्त्रानुसार अहिंसा या तत्वावर आधारित बाजाराची रचना असावी. यामध्ये व्यापारी, विक्रेत्यांसोबत ग्राहकांचेही हित साधन्यावर भर दिला जातो. म्हणजेच इच्छेची तीव्रता कमी करण्याचा विचार बौद्ध अर्थशास्त्र सांगते.

बुद्धांच्या आर्थिक विचारसर्नीनुसार अधिकाधिक समाधान मिळविण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करतांना कष्टाची तीव्रता वाढत जाते. परंतु इच्छांची तीव्रता कमी असल्यास पर्याप्त समाधान प्राप्त होऊ शकते. आयात-निर्यातिमुळे खुली अर्थव्यवस्था स्वीकारणे हे आजच्या खुल्या अर्थव्यवस्थेचे धोरण आहे. मात्र भौतिक वस्तूंचा उपयोग मर्यादित ठेवला, तर देशातच स्थानिक आवश्यक वस्तु निर्माण करून विदेशी वस्तूंवर अवलंबून राहावे लागणार नाही.

"देशातील संपत्तीचे असमान वितरण" हे सुद्धा बुद्धांच्या आर्थिक विचार प्रणालीत बसत नाही. नैसर्गिक संसाधनांचा अतिरेकी वापर करून मानवाचे आर्थिक शोषण केल्याने माणसात हिंसात्मक प्रवृत्ती निर्माण होते. परिणामता देशाच्या सुरक्षेसाठी संरक्षणावरिल खर्च वाढतो. त्यामुळे नैसर्गिक संसाधनांचा पर्याप्त उपयोग करण्याचा सल्ला बुद्धांच्या अर्थशास्त्रात आहे. आर्य अष्टांगिक मार्गामध्ये आठ सम्यक मार्गांचा उल्लेख आहे. या सम्यक आठ मार्गाने जीवन जगणे म्हणजे; बौद्ध अर्थशास्त्राचा स्वीकार केल्यास संपूर्ण जगातील प्रत्येक देशाचा व प्रत्येक व्यक्तीचा हमखास विकास होऊ शकतो. यात शंका नसावी. याचं दृष्टीने सम्राट अशोकाचे साम्राज्य हे लोक कल्याणकारी समजले जाते. समृद्धी, सौख्य, समाधान नांदत असल्यामुळे या देशाला "सोन्याची चिमणी" असे संबोधले जात होते. या आर्थिक धोरणांतर्गत सार्वजनिक बांधकाम, रुग्णालये, वस्तिगृहे, उद्याने, विश्राम गृहे, व निसर्गाचे जातून केले जात होते. त्यामुळे संपूर्ण जगात जंबुद्विप प्रसिद्ध होता.

व्यक्ती जेव्हा जास्तीत जास्त भौतिक सुखाच्या मागे धावते तेव्हा कधीच पुरेसे समाधान कधीच मिळत नाही. उलट अनेक आर्थिक प्रश्न निर्माण होतात व दुःखाचे प्रमाण वाढते. भौतिक सुखासाठी विविध वस्तूंचा उपयोग घेणे आवश्यक असते. म्हणजेच एक प्रकारे वासनांच्या आहारी जाने होय. अश्या प्रकारे वासनांमधून मिळणारे समाधान हानिकारक असू शकते. त्यामुळे खऱ्या सुख समाधानाचा त्याग करावा लागतो. म्हणून स्वतःच्या गरजा पूर्ण करताना इतर घटकांना (मनुष्य, पशु, पक्षी, सजीव आणि निसर्ग) हानी पोहचणार नाही, हे मूळ तत्व लक्षात घेऊन सम्यक मार्गाने आयुष्य जगणे आवश्यक आहे. यालाच सम्यक आजीविका म्हटले आहे.

संदर्भ: 1. Shumekar E. F., Bauddh Economics, Asia : A Handbook, 1955.

2. Gote Prof. Do. Bhimrao, "Gautam Buddha's Theory for solution of Economics Problems in the world", International Seminar, PGTD Pali-Prakrit, R.T.M. Nagpur University-2014.

3. Brown, Clair, Buddhist Economics : An Enlightened Approach to the Dismal Science, UK, 2017.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १० नोव्हेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, कतिको मासो, रविवार, कार्तिक माहे.

१० नोव्हेंबर १७५० – रोजी शेर-ए-म्हैसूर टीपू सुलतान जयंती.

१० नोव्हेंबर १९१८ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मुंबईतील सिडनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स मध्ये अर्थशास्त्राचे हंगामी प्राध्यापक पदावर एक वर्षासाठी नेमणूक झाली. पुढे त्यांना मुदतवाढ देण्यात आली. वेतन प्रति माह ४५० रुपये.

१० नोव्हेंबर १९३१ – रोजी इन्स्टिट्युट ऑफ इंटरनॅशनल अफेअर्समध्ये माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांच्या राजकीय मागण्यांचे महत्व स्पष्ट केले.

*१० नोव्हेंबर, १९३८ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पी. जे. रोहम यांचेकडून

कुटूंब नियोजनावर मुंबई विधानसभेत प्रस्ताव सादर केला.*

१० नोव्हेंबर १९९९ – रोजी 'शांतता आणि विकासासाठी जागतिक विज्ञान दिन.' विज्ञान हे मानवजातीच्या प्रगतीचे एक महत्त्वाचे साधन आहे आणि त्याच्या मदतीने समाजात शांतता आणि विकास घडवता येऊ शकतो. या दिनानिमित्त प्रत्येक वर्षी ठराविक विषय ठरवला जातो, जी त्या वर्षीच्या विज्ञान दिनाच्या मुख्य मुद्द्याला केंद्रस्थानी ठेवते. जागतिक विज्ञान दिनाचा इतिहास 'शांतता आणि विकासासाठी जागतिक विज्ञान दिन' याची सुरुवात १९९९ मध्ये बुडापेस्ट येथे झालेल्या जागतिक विज्ञान परिषदेच्या अनुषंगाने झाली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

🏵🏵🦚🦚🦚🔵🔵🔵💎 *शेर–ए–म्हैसूर टीपू सुलतान* 💎🔵🔵🔵🦚🦚🦚🏵🏵

जन्म :– १० नोव्हेंबर, १७५०, मृत्यू :– ४ मे, १७९९.

मुळनाव :– फतेहअली टीपू.

"टीपू सुलतान हे उत्कृष्ट अर्थतज्ञ, समाजसुधारक, कवी, कुशल प्रशासक, आधुनिक तंत्राचे पुरस्कर्ते, पराक्रमी सेनानी आणि दूरदृष्टीचे, प्रजाहितदक्श व लोककल्याणकारी सुलतान होते."

टीपू सुलतान यांचे मुळनाव फतेहअली टीपू असे होते. राज्याभिषेक झाल्यावर ते "सुलतान" बनले व पुढे "टीपू सुलतान" या नावाने लोकप्रिय झाले.

टीपू सुलतान हे मुलनिवासी मुस्लिम होते, त्यांची प्रजा मुलनिवासी बहुजन (हिंदू) होती. आपल्या प्रजेवर त्यांनी मनापासून प्रेम केले. सध्या कर्नाटकात कावेरी नदीवर जेथे प्रसिद्ध कृष्णराज सागर धरण आहे त्या जागी टीपूंनी एक छोटे धरण बांधले होते. टीपू सुलतान यांच्या कारकिर्दीत म्हैसूर राज्याचा व्यापार श्रीलंका, अफगाणिस्तान, फ्रान्स, टर्की, रशिया, चीन, इराण इ. देशांशी चालत असे. टीपू सुलतान यांना उर्दू, कन्नड, फारसी, अरेबिक, फ्रेंच या भाषा अवगत होत्या.

१७९१ मध्ये जेव्हा पेशव्यांच्या फौजांनी शृंगेरी मठावर हल्ला करून लूटमार व हत्या केल्या टीपूंना मदतीचे विनंतीपत्र धाडले. टीपूंनी लुटारू पेशव्यांना पळवून लावले व मठाची दुरूस्तीही केली. १७८२ ते १७९९ या दरम्यान टीपू सुलतान यांनी विविध मंदिरांना मदत दिल्याच्या ३४ सनद सध्या उपलब्ध आहेत.

....

टीपू सुलतान हे आपल्या एका फ्रेंच मित्रासह म्हैसूरच्या जंगलात शिकारीला गेलेले असताना हातातील छोट्या खंजरने हिंस्त्र वाघाला ठार केले. तेव्हापासून टीपू हे "शेर–ए–म्हैसूर/म्हैसूरचा वाघ" म्हणून ओळखले जावू लागले. मुळातच त्यांना वाघ या प्राण्याविषयी विशेष आकर्षण होते. त्यांचा ध्वज वाघाच्या रंगाचा, सिंहासन वाघाच्या आकाराचे, सैन्याचा गणवेशही वाघाच्या रंगाचा होता.

टीपूंनी आपल्या कारकिर्दीत नवीन कालगणना, नवी नाणी, नवी वजनमापे व प्रशासनात सात नवी खाती सुरू केली. तसेच, जनतेच्या सोयीसाठी अनेक मंदिरे, मशिदी, रस्ते बांधले, रस्त्यांच्या दुतर्फा झाडे लावली, शेतकऱ्यासाठी विहिरी खोदल्या, कालवे बांधले, जागोजागी छोटी–छोटी धरणे बांधली.

....

टीपू सुलतान यांची प्रसिद्ध विधाने:

१."शेती ही देशाची रक्तवाहिनी आहे."

२. "गिधाडासारखे १०० वर्षे जगण्यापेक्शा वाघासारखे एकच दिवस जगणे मी पसंत करीन."

....

टीपूंची लष्करी सज्जता:

इंग्रजांचा धोका ओळखून त्यांचे शत्रू असलेल्या फ्रेंचांशी चांगले संबंध स्थापित करून टीपूंनी आधुनिक कवायती सैन्य उभारले होते. टीपू सुलतान यांच्या नेतृत्वात म्हैसूर लष्कराने "आधुनिक वैज्ञानिक लष्करी शाळा" भारतात प्रथमच सुरू करून या नव्या क्षेत्राची भारतीय राज्यकर्त्यांना ओळख करून दिली. फ्रेंच सेनानी नेपोलियन बोनापार्ट याच्याशी पत्रव्यवहार करून राजनैतिक संबंध प्रस्थापित केले. नेपोलियनने इजिप्त जिंकल्यानंतर भारतात यावे व इंग्रजांना हाकलून देवून भारत स्वतंत्र करण्यास टीपूंना सहाय्य करावे, अशी ही योजना होती. पण त्याचवेळी फ्रेंच राज्यक्रांतीला सुरूवात झाल्याने ही महत्त्वाकांक्शी योजना बारगळली. इंग्रजांविरूद्ध ऐत्देशीय राजांची आघाडी करण्याचाही प्रयत्न टीपूंनी केला. पण त्यांना कोणाची साथ मिळाली नाही. उलट, पेशवा व निजाम यांनी नेहमी इंग्रजांनाच सहाय्य केले.

➖➖➖➖➖➖➖➖➖➖

क्षेपणास्त्र प्रणेते: टीपू सुलतान

युद्धासाठी आवश्यक अशा अनेक आधुनिक तंत्रांचा व शस्त्रास्त्रांचा टीपूंनी शोध लावला. यातील अत्यंत महत्त्वाचे असे आधुनिक शस्त्र म्हणजे "क्षेपणास्त्र" होय. टीपूंच्या या शोधाचा उल्लेख ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या "अग्निपंख" या आत्मचरित्रातही आहे. म्हणजेच "टीपू सुलतान हे आधुनिक क्षेपणास्त्राचे जनक" होय. टीपूंच्या वीरमरणानंतर यातीलच काही क्षेपणास्त्रांचा वापर करून इंग्रजांनी वॉटर्लूच्या युद्धात नेपोलियनचा पराभव केला. पण अशी क्षेपणास्त्रे बनवणे इंग्रजांना जमले नाही.

....

टीपूंचे वीरमरण :–

टीपू सुलतान यांचा सेनानी मीर सादिक याला इंग्रजांनी म्हैसूरचा सुलतान करण्याचे आश्वासन देवून फितूर केले. या लोभापोटीच त्याने १७९९ च्या श्रीरंगपट्टणच्या चौथ्या युद्धात टीपूंच्या क्षेपणास्त्र साठ्यात पाणी सोडून हजारो क्षेपणास्त्रे निकामी केली. अशा विश्वासघातकी लोकांमुळेच १७९९ च्या युद्धात शेर–ए–म्हैसूर टीपू सुलतान यांना वीरमरण आले. या युद्धात हैदराबादचा निजाम व पुण्याच्या पेशव्यांनी टीपूंविरूद्ध इंग्रजांना मदत केली. टीपू जिवंत होते तोपर्यंत संपूर्ण भारत जिंकण्याचे इंग्रजांचे स्वप्न अपूर्ण होते. यानंतर मात्र इंग्रजांचे हे स्वप्न लवकरच पूर्ण झाले.

▬▬▬▬▬▬▬▬▬▬

"जो लढा था सिपाहीयों की तरह ऐसा बादशहा भारतमें न हुवा,

रूह तो हो चुकी थी तनसे जुदा हाथ तलवारसे जुदा न हुवा."

शेर–ए–म्हैसूर टीपू सुलतान जयंतीच्या सर्व भारतीयांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

☸☸☸☸☸☸☸☸☸☸☸

🦚🦚☸☸☸🔵🔵🔵💎 शांतता आणि विकासासाठी जागतिक विज्ञान दिन १९९९ मध्ये जागतिक विज्ञान परिषदेत सुरू झाला. 💎🔵🔵🔵☸☸☸🦚🦚

दरवर्षी १० नोव्हेंबरला ‘शांतता आणि विकासासाठी जागतिक विज्ञान दिन’ साजरा केला जातो. या दिवसाचा मुख्य उद्देश म्हणजे विज्ञान आणि त्याच्या विकासाशी संबंधित जनजागृती करणे. विज्ञान हे मानवजातीच्या प्रगतीचे एक महत्त्वाचे साधन आहे आणि त्याच्या मदतीने समाजात शांतता आणि विकास घडवता येऊ शकतो. या दिनानिमित्त प्रत्येक वर्षी ठराविक विषय ठरवला जाते, जी त्या वर्षीच्या विज्ञान दिनाच्या मुख्य मुद्द्याला केंद्रस्थानी ठेवते. जागतिक विज्ञान दिनाचा इतिहास ‘शांतता आणि विकासासाठी जागतिक विज्ञान दिन’ याची सुरुवात १९९९ मध्ये बुडापेस्ट येथे झालेल्या जागतिक विज्ञान परिषदेच्या अनुषंगाने झाली. या परिषदेच्या माध्यमातून संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना (UNESCO) ने विज्ञानाच्या महत्त्वाच्या फायद्यांची जनजागृती करण्याचे आवाहन केले. विज्ञानाच्या माध्यमातून जागतिक स्तरावर समाजाच्या समस्यांवर उपाय शोधले जावेत, विज्ञानाच्या संशोधनात गुंतवणूक वाढावी आणि प्रत्येक देशात वैज्ञानिक शोधांचा वापर समाजाच्या हितासाठी केला जावा, अशी त्यामागील भूमिका होती. जागतिक विज्ञान दिनाचे उद्दिष्ट शांतता आणि विकासासाठी समाजातील प्रत्येक घटकाला विज्ञान क्षेत्रातील घडामोडींची माहिती देणे आणि समाजाला विज्ञानाच्या फायद्यांची जाणीव करून देणे. विज्ञान हे केवळ तंत्रज्ञानाचा वापर करण्यापुरते मर्यादित नसून ते एक विचार करण्याची पद्धत आहे, जी समाजाच्या सर्वांगीण विकासाला चालना देते. त्यामुळे विज्ञान आणि त्यातील संशोधकांची भूमिका समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. विज्ञानाद्वारे आपल्या जीवनातील अनेक समस्या सोडवल्या जातात, याची माहिती लोकांना देणे आणि त्यासंबंधी जनजागृती करणे हे या दिनाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ११ नोव्हेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, कतिको मासो, सोमवार, कार्तिक माहे.

११ नोव्हेंबर १९१६ – रोजी बॅरिस्टर Barrister–at–Law अभ्यासक्रमासाठी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ग्रेज इन लंडन Gray's Inn येथे प्रवेश.

११ नोव्हेंबर १९१७ – रोजी सर नारायणराव चंदावरकर यांचे अध्यक्षतेखाली अस्पृश्य वर्गाच्या सभेत भिमारावांनी उच्च शिक्षण घेतल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव संमत केला.

११ नोव्हेंबर १९३२ – रोजी मुंबई उच्च न्यायालयाने नाशिकच्या पवित्र कुंडात स्नान करण्याचा हरिजनांचा हक्क आहे असा निर्णय दिला.

११ नोव्हेंबर १९३६ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जिनेव्हा विलायतेला प्रयाण.

११ नोव्हेंबर १९४७ – रोजी मुंबईचे हरिजन मंत्री तपासे यांचा पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात प्रवेश.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १२ नोव्हेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, कतिको मासो, मंगळवार, कार्तिक माहे.

१२ नोव्हेंबर १९१८ – रोजी सिडनहॅम महाविद्यालय, मुंबई येथे माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले.

१२ नोव्हेंबर १९२७ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ज्येष्ठ बंधू बाळाराम आंबेडकर यांचे एकाएकी हृदयक्रिया बंद पडून निधन झाले. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अमरावती येथील अंबादेवी मंदिर प्रवेश सत्याग्रहाला पाठिंबा देण्यासाठी गेले होते.

१२ नोव्हेंबर १९३० – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीत बादशहा पंचम जॉर्ज यांचे हस्ते लंडन येथे पहिल्या गोलमेज परिषदेचे उद्घाटन झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिहितात की, "गोलमेज परिषदेचे उद्घाटन १२ नोव्हेंबर १९३० रोजी किंग जॉर्ज यांनी केले. भारतीयांच्या दृष्टिकोनातून गोलमेज परिषद ही एक महत्त्वाची घटना होती. अस्पृश्यांसाठी त्यांच्या इतिहासातील मैलाचा दगड होता. गोलमेज परिषदेमधे प्रथमच अस्पृश्यांना त्यांच्या पहिल्या दोन प्रतिनिधींव्दारे स्वतंत्रपणे त्यांचे विचार सादर करण्याची परवानगी दिली गेली. जे मी आणि दिवाण बहादुर आर. श्रीनिवासन होते. याचा अर्थ असा होता की, अस्पृश्यांना केवळ हिंदुपेक्षा वेगळा घटक मानल्या जात असे, आणि त्याबरोबर हेपण महत्त्वपूर्ण आहे की, त्यांना घटनेच्या संविधान वेळी भारतात सल्लामसलत करणे देखील त्यांचा अधिकार होता.

१२ नोव्हेंबर १९५६ – रोजी नेपाळ येथील काठमांडू येथे भरणाऱ्या जागतिक बौद्ध परिषदेत (चौथे अधिवेशन) भाग घेण्यासाठी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर काठमांडूला पोहोचले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १३ नोव्हेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, कतिको मासो, बुधवार, कार्तिक माहे.

१३ नोव्हेंबर १९२७ – रोजी अमरावती येथील इंद्रभुवन थिएटरमध्ये अंबादेवीच्या सत्याग्रहसंबंधी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली वऱ्हाड प्रांतिक परिषदेचे दुसरे अधिवेशन पार पडले.

१३ नोव्हेंबर १९२७ – रोजी नाशिक जिल्हा महार वतनदार परिषद संपन्न झाली.

१३ नोव्हेंबर १९२९ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पार्वती मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह केला.

१३ नोव्हेंबर १९३१ – रोजी दलितांच्या चळवळीला विरोध दर्शविणारे विधान मोहनदास करमचंद गांधीने केले.

१३ नोव्हेंबर १९३७ – रोजी मुक्काम मसूर, जिल्हा सातारा येथे सातारा जिल्हा महार परिषदेचे सातवे अधिवेशन माननीय विश्वरत्न, बोधिसत्व प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. सदर बातमी जनता वृत्तपत्रात प्रकाशित करण्यात आली.

१३ नोव्हेंबर १९४२ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबई आकाशवाणीवर "भारतीय मजूर आणि महायुद्ध" विषयावर भाषण केले.

१३ नोव्हेंबर १९४३ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय व्यापार संघटना दुरुस्ती विधेयक The Indian Tread Unions Amendment Bill विधानसभेच्या वादविवाद केंद्रीय Legisletive Assembly Debates Central मधे चर्चा केली आणि त्याची अंमलबजावणी करण्यावर जोर देण्यात आला. बाबासाहेबांनी या विधेयकाची महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये सांगितली.

१३ नोव्हेंबर १९९७ – रोजी जागतिक दयाळूपणा दिवस. १९९७ मधे जागतिक दयाळूपणाची घोषणा केली, तर १९९८ ला जागतिक दायालुपणा दिवसाचे उद्घाटन झाले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚🔵🔵🔵💎 जागतिक दयाळूपणा दिवस. 💎🔵🔵🔵🦚🦚🦚☸☸

अनोळखी लोकांना मदत करून, समुदायाला परत देऊन किंवा तुमच्या मुलांना छानपणाचे मूल्य शिकवून जागतिक दयाळूपणा दिनानिमित्त सहानुभूतीची यादृच्छिक कृती सामायिक करा.

१३ नोव्हेंबर १९९७ रोजी मानवतावादी गटांचा संग्रह एकत्र आला आणि "दयाळूपणाची घोषणा" केली तेव्हा दया दिवसाचा जन्म झाला. त्याचप्रमाणे, दयाळूपणाच्या दिवशी प्रत्येकाला अशीच घोषणा करण्यास प्रोत्साहित केले जाते. आपल्या स्थानिक समुदायाला पुस्तके, अन्न किंवा कपडे दान करणे हा उत्सव साजरा करण्याचा एक चांगला मार्ग आहे.

तथापि, दयाळूपणाचे फक्त एक कृत्य करण्याचे वचन देणे कमी फायदेशीर नाही: अनोळखी व्यक्तीसाठी दार उघडे ठेवा, आपल्या शेजाऱ्याच्या बागेतील ग्नोम्सच्या संग्रहाबद्दल प्रशंसा करा, आपल्या जोडीदाराला संध्याकाळी टीव्ही रिमोटवर नियंत्रण ठेवू द्या.

जागतिक दयाळूपणा दिनाचा इतिहास

जागतिक दयाळूपणा दिन प्रथम जागतिक दयाळू चळवळीने साजरा करण्याचा दिवस म्हणून सुरू केला. २०१९ मध्ये स्विस कायद्यानुसार अधिकृत एनजीओ म्हणून संस्थेची नोंदणी करण्यात आली. तथापि, गटाचा इतिहास १९९७ मध्ये टोकियो–आधारित अधिवेशनापर्यंत पोहोचला आहे.

या परिषदेत थायलंड, युनायटेड किंगडम, ऑस्ट्रेलिया आणि युनायटेड स्टेट्स यांसारख्या देशांमध्ये आधारित अनेक संघटना आणि संस्था समाजात दयाळूपणाला चालना देण्यासाठी त्यांच्या एकत्रित समर्पणामुळे तयार केल्या गेल्या होत्या. या घटनेच्या परिणामी जागतिक दयाळू चळवळीची प्रारंभिक निर्मिती झाली.

"एक दयाळू आणि अधिक दयाळू जग तयार करण्यासाठी एकत्र सामील होण्याची त्यांची प्रतिज्ञा" सांगणारी त्यांच्या स्थापनेची लिखित घोषणा तयार करण्यात आली होती. या उद्दिष्टाचा पाठपुरावा करण्यासाठी, १९९८ मध्ये, ते उद्घाटन जागतिक दया दिवस सुरू करण्यास मदत करतील.

जागतिक दयाळूपणा दिनाचे कारण जागतिक दयाळू चळवळीने तपशीलवार दिले आहे. "सकारात्मक शक्ती आणि दयाळूपणाच्या समान धाग्यावर लक्ष केंद्रित करून समाजातील चांगल्या कृत्यांवर प्रकाश टाकणे जे आपल्याला बांधतात."

दोन दशकांहून अधिक काळापूर्वी या दिवसाची निर्मिती झाल्यापासून हा दिवस जागतिक स्तरावर ओळखला जातो. या दिवशी होणारे अनेक कार्यक्रम जगभरातील सर्व भागांतील असंख्य सहभागींना आकर्षित करतात. हा दिवस दयाळूपणाने आणि डान्स मॉब्स, मैफिली, दयाळूपणा कार्ड्सचे वितरण आणि दयाळूपणाच्या यादृच्छिक कृतींनी भरलेला आहे जसे की एखाद्याला खरेदीसाठी पैसे देणे किंवा एखाद्याला त्यांच्या बॅगसह मदत करणे.

या क्षणी, हा दिवस एक अनधिकृत दिवस आहे, तरीही संयुक्त राष्ट्रांकडून अधिकृत मान्यता प्राप्त करण्याची जागतिक दया चळवळीची आशा आहे. जर ते हे साध्य करण्यात यशस्वी झाले तर ते सुप्रसिद्ध मानवाधिकार दिन, जागतिक आरोग्य दिन आणि आंतरराष्ट्रीय शांतता दिन या मान्यताप्राप्त दिवसात सामील होतील.

जागतिक दयाळूपणा दिवस टाइमलाइन

१९९७ ला जागतिक दयाळू चळवळ सुरू केली आहे

जपानमधील टोकियो येथे या वर्षीच्या पहिल्या परिषदेचे आयोजन करत, जगभरातील समविचारी दयाळू संस्थांना एकत्र आणण्यासाठी जागतिक दयाळू चळवळ हे

आंतरराष्ट्रीय मंचक म्हणून तयार करण्यात आले आहे.

१९९८ ला जागतिक दयाळूपणा दिनाचे उद्घाटन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १४ नोव्हेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, कतिको मासो, गुरूवार, कार्तिक माहे.

१४ नोव्हेंबर १७९४ – रोजी वस्ताद लहुजी साळवे जयंती.

१४ नोव्हेंबर १८३८ – रोजी सुभेदार रामजी मालोजी आंबेडकर जयंती.

१४ नोव्हेंबर १९२७ – रोजी अमरावती येथील अस्पृश्य विद्यार्थी वर्गाकडून माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानपत्र. मुलांच्या मानपत्राला उत्तर देतांना त्यांनी शिल कसे बनवावे तसेच कुळाला लागलेला अस्पृश्यतेचा डाग धुऊन काढण्यास कशी मदत करावी हे विशद करून सांगितले. त्याच दिवशी मुंबईहून श्री. बाळाराम आंबेडकर यांच्या निधनाची बातमी तारेने येऊन धडकली.

१४ नोव्हेंबर १९३७ – रोजी आर्य द्रविड युवक संघातर्फे माटुंगा येथील बापू हॉल मध्ये माननीय विश्वरत्न, बोधिसत्व प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत मानपत्राच्या उत्तरादाखल भाषण केले.

१४ नोव्हेंबर १९४९ – रोजी पुन्हा तिसऱ्यांदा संविधान सभेची बैठक बोलावण्यात आली. माननीय विश्वरत्न, बोधिसत्व प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, "विधानसभेच्या नियम–३८–आर अंतर्गत समितीने सुधारित केलेल्या भारतीय संविधानाच्या मसुद्यासह मला मसुदा समितीचां अहवाल सादर करावा लागेल.

१४ नोव्हेंबर १९५४ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माईसाहेब आंबेडकर यांचे हैद्राबाद येथील बेगंमपेठ विमानतळावर आगमन झाले. त्यांनी मराठवाडा साहित्य परिषद व मराठी ग्रंथसंग्रहालय संस्थांना भेट दिली. त्यानंतर त्यांनी विविध विषय आणि भाषावार प्रांत रचनेवर बोलताना 'राष्ट्राच्या लष्करी संरक्षणासाठी हैद्राबाद ही भारताची उपराजधानी असणे आवश्यक.' असल्याचे सांगितले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚*सुभेदार रामजी मालोजी सकपाळ (आंबेडकर) यांचा जन्मदिन*🦚🦚🦚☸☸💐

****

जन्म :– १४ नोव्हेंबर १८३८ *मृत्यू :– २ फेब्रुवारी १९१३ (मुंबई)*

सुभेदार मेजर रामजी आंबेडकर यांचा आज १८६ वा जन्मदिन. ते एक महान योद्धा होते. त्यांनी अफगाणिस्तानच्या युद्धात प्रत्यक्ष लढाई केलेली होती.

रामजी बाबा वयाच्या १८ व्या वर्षी ईस्ट इंडिया कंपनीच्या १०६ च्या सॅपर्स अँड मायनर्स विभागात भरती झाले. रामजीबाबांचे लष्करातील कसब पाहून त्यांना सेव्हन पायोनियर बटालीयनमध्ये बढती देण्यात आली. रामजीबाबा हे लष्करात नोकरी करीत असले तरी ते फार कुटुंबवत्सल्य, धर्मभोळे आणि शिस्तप्रिय स्वभावाचे होते. त्यांच्यावर कबीर पंथाचा प्रभाव होता. ठाणे जिल्ह्यातील मुरबाडमधील आंबेटेंबें गावात स्थायिक असलेल्या लष्करातील सुभेदार रामजी मेजर धर्माजी मुरबाडकर यांच्या द्वितीय कन्या भीमाबाई यांच्यासोबत रामजीबाबांचा विवाह झाला. त्यानंतर त्यांना एकूण चौदा (१४) अपत्ये झाली. त्यापैकी १४ एप्रिल १८९१ रोजी जन्माला आलेले भीमराव हे चौदावे रत्न.

रामजीबाबांची प्रखर बुद्धिमत्ता आणि खेळातील प्राविण्य पाहून त्यांच्यातील कुशल शिक्षकाचे गुण ओळखून ब्रिटीश कंपनी सरकारमधील एका इंग्रज अधिकाऱ्याने त्यांना पुण्यातील नॉर्मल स्कूलमध्ये प्रवेश मिळवून दिला. येथे रामजीबाबांनी डी. एड. चे शिक्षण घेतले आणि लष्कराच्या छावणीत शिक्षक आणि कालांतराने मुख्याध्यापक म्हणून १४ वर्षे नोकरी केली. रामजीबाबांचे कर्तुत्व पाहून ईस्ट इंडिया कंपनीने त्यांना 'सुभेदार मेजर' हि पदवी बहाल केली. त्याकाळात त्यांचा महात्मा जोतीराव फुले व सावित्रीमाई

यांच्याशी परिचय झाला. पुढे त्याचे रूपांतर घनिष्ट मैत्रीत झाले.

शूद्र अतिशूद्रांमधून कोणी तरी महापुरूष जन्माला येईल आणि तो या घटकांची गुलामी संपवील असे फुले म्हणत असत. तसे त्यांनी आपल्या पुस्तकात भाकीतही वर्तवलेले आहे. आपल्या १४ व्या अपत्याकडे, भीमाकडे, सुभेदार रामजी त्यादृष्टीने पाहात असत. त्यांना प्रथम पत्नी भीमाबाई पासून झालेल्या १४ मुलांमधली अवघी ६ जगली. बाळाराम, गंगा, तुळसा, मंजुळा, आनंद आणि शेंडेफळ भीमराव.

विवाह झाल्यानंतर रामजीबाबांनि आणि भिमाईने अनेक गंभीर प्रसंगांना तोंड दिले; मात्र त्यांनी एकमेकांना डगमगू दिले नाही. त्यांनी आपल्या पोटची ७ मुले गमावली. तर बाळाराम, गंगा, तुळसा, आनंदराव, मंजुळा, रमाबाई, भीमराव यांचा सांभाळ करतांना खूप कष्ट सोसले. कुटुंबातील आर्थिक चढ–उतार, मुलाबाळांचे संगोपन, भिमाईंचा मस्तकशुळाचा आजार आणि वारंवार होणाऱ्या बदल्यांमुळे रामजीबाबांची कमालीची ओढाताण होत असे, परंतु ते प्रत्येक परिस्थितीला धैर्याने सामोरे गेले. रामजी इंदूरजवळच्या लष्कराच्या छावणीत शिक्षक होते. पुढे ते मुख्याध्यापक झाले. याच 'मिल्ट्री हेडक्वार्टर ऑफ वॉर' म्हणजेच MHOW महू मध्ये भिमरावांचा १४ एप्रिल १८९१ ला जन्म झाला.

रामजी हे रामानंदी पंथाचे असल्याने त्यांच्यावर संत कबीर, संत तुकाराम आणि अन्य संतांच्या विचारांचा खोलवरचा प्रभाव होता. "आपले वडील गुणी शिक्षक होते. त्यांनी बालपणी आपल्यावर उत्तम संस्कार केले. धार्मिक बाबतीत ते रोमन हुकुमशहासारखे वागत असत." असे बाबासाहेबांनी आपल्या शेवटच्या पुस्तकाच्या (बुद्ध आणि त्यांचा धम्म) प्रस्तावनेत नमूद केलेले आहे. १४ ऑक्टोबर १९५६ ला स्वतः बौद्ध धम्माची दिक्षा घेतांना व लक्षावधी बांधवांना दिक्षा देतांना बाबासाहेबांनी नागपूरच्या दीक्षाभूमीवर सर्वप्रथम सुंभेदार रामजींना आदरांजली आदरांजली अर्पण केलेली होती.

त्यांनी आपल्या मुलींना घरीच ईतके उत्तम शिक्षण दिलेले होते. त्या सगळ्याजणी ग्रंथवाचन करीत आणि प्रसंगी धर्मग्रंथावर उत्तम प्रवचनही देत असत असेही बाबासाहेबांनी नमूद केलेले आहे.

सांगितप्रेमी बाळाराम फारसे शिकले नसले तरी त्यांचे इंग्रजीवर प्रभुत्व होते. आनंदरावला कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्यासाठी शिक्षण अर्धवट सोडून नौकरी धरावी लागली. भीमरावला मात्र खूप शिकवायचे अशी रामजीबाबांची महत्वाकांक्षा होती. भिवा १९०७ साली मॅट्रिक झाल्यानंतर त्याला त्यांनी पुढे २ वर्षे महाविद्यालयीन शिक्षण दिले.

भिवा ३ वर्षांचा असताना त्यानंतर काही काळातच इ. स. १८९४ मधे रामजीबाबा ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीच्या लष्करी सेवेतून निवृत्त झाले. दरमहा त्यांना ५० रु. पेन्शन मिळत असे. मात्र तुटपुंज्या पेन्शनमध्ये त्यांच्या कुटुंबाच्या प्राथमिक गर्जाही भागत नव्हत्या. काही काळ दापोलीला राहिल्यावर नोकरीच्या शोधात ते साताऱ्याला गेले. त्यामुळे रामजीबाबांनी सातारा येथील पी. डब्ल्यू. डी. च्या कचेरीत स्टोअरकिपरची नौकरी सुरु केली. नौकरीकरिता ते सहकुटुंब सातारा येथे स्थाईक झाले. येथे सातारा कॅम्प स्कुलमधे भीमराव आणि आनंद यांनी आपल्या शैक्षणिक आयुष्यायची सुरुवात केली.

भिवाचे प्राथमिक शिक्षण सुरु असतांनाच रामजीबाबांची नौकरी गेली. पी. डब्ल्यू. डी. च्या कचेरीतील काम संपल्याने रामजी बाबांना आता कुटुंबाच्या उदरनिर्वाहाकरिता आपले बस्थान हलविणे अनिवार्य झाले. मुलांचे संगोपन आणि शिक्षण याकरिता रामजीबाबांनी थेट मुंबई गाठली. मुंबईत आल्यानंतर रामजीबाबांनी सर्वप्रथम आनंदराव आणि भीमराव यांना परळच्या एल्फिन्स्टण विद्यालयात प्रवेश घेतला, परंतु तुटपुंज्या पेन्शनवर भगत नसल्यामुळे त्यांनी तेथेही नौकरीचे प्रयत्न सुरु केले. आपल्या कुटुंबाच्या हलाखीच्या परिस्थितीला हातभार लावता यावा याकरिता भीमरावांचे वडिलबंधू आनंदराव यांनीही आपल्या शालेय शिक्षणाला पूर्णविराम देत कंपनीमध्ये नौकरी केली. १८९६ मधे भीमाईचे निधन झाले. भीमाईच्या निधनाने रामजीबाबा हताश झाले. परंतु त्यातूनही त्यांनी स्वतःला आपल्या कुटुंबाला सावरले. ते पुन्हा जोमाने उभे राहिले आणि आपल्या ध्येय्याकडे वाटचाल करू लागले.

रामजीबाबांनी आपल्या मुलांच्या उज्ज्वल भवितव्याकरिता त्याला उच्चशिक्षित करण्याचे ध्येय्य शेवटपर्यंत सोडले नाही. भिवा मॅट्रिक उत्तीर्ण व्हावा आणि तेही चांगल्या गुणांनी याकरिता रामजीबाबांनी ज्या हालअपेष्ठा सहन केल्या त्या शब्दात व्यक्त करण्यापलीकडच्या आहेत. स्वतः रात्र–रात्र जागून त्यांनी भिवाच्या मनात वाचनाची, अभ्यासाची, लेखनाची अवीट गोडी निर्माण केली. त्याच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. तुटपुंज्या पगारात कुटुंबाचा गाडा ओढणे अश्यक्य होते, परंतु रामजीबाबांनी कधीही हार मानली नाही. त्यांनी प्रत्येक वेळा स्वतःच्या जीवाचे रान करून भीमरावाची प्रत्येक शैक्षणिक गरज भागविली.

भीमारावाला दर्जेदार शिक्षण मिळावे म्हणून रामजी दापोली आणि सातारा येथे काही वर्षे काढल्यानंतर मुंबईला आले. चाळीच्या एका खोलीत भिवाचा अभ्यास होत नसल्याने स्वतः रामजीबाबा रात्री २ वाजेपर्यंत जागे रहायचे. २ वाजता भिवाला झोपेतून उठवून अभ्यासाला बसवायचे आणि मगच झोपायचे. पुन्हा दिवसभर ते नानाविध नौकऱ्या किंवा अन्य काबाडकष्ट करायचे.

केवळ भिवाच्या अभ्यासासाठी परवडत नसतानाही त्यांनी चाळीतली समोरची खोली घेतली. भिवामधे त्यांनी अभ्यासाची व वाचनाची आवड निर्माण केली. भिवाने मागितलेले प्रत्येक पुस्तक ते त्याला आणून देत असत. स्वताजवळ पैसे नसले तर आपल्या वैवाहित मुलींकडून त्यांचे दागिने उसने आणून ते गहान ठेवून त्यावर ते कर्ज काढीत पण पुस्तक आणून देत.

प्रख्यात सत्यशोधक लेखक कृष्णाजी अर्जुन केळूसकर आणि दा. सा. यंदे यांच्या प्रयत्नातून भीमरावाला सयाजीराव गायकवाड यांची स्कॉलरशिप मिळाली आणि ते पदवीधर झाले. शिश्यवृत्तीच्या अटी आणि शर्तीनुसार बडोद्यात काही वर्षे नौकरी करणे आवश्यक होते.

२३ जानेवारी १९१३ ला भीमरावांची बडोदा सरकारच्या सैन्यात लेफ्टनंट नेमणूक करण्यात आली. त्यानुसार भीमराव नौकरीवर जायला निघाले तेव्हा रामजींनी त्यांना बडोद्याला जायला विरोध केला. सनातण्यांच्या गुजरातेत भिषण जातीयता असल्याने आपल्या मुलाचा छळ होईल अशी साधार भीती त्यांना वाटत होती, ती पुढे खरीही ठरली. भीमरावांनी बडोद्याला जाण्यासाठी घर सोडले त्याच दिवसी मुलाच्या काळजीने हा योद्धा पुरुष आजारी पडला. बडोद्यात भीमरावांना अनेक संकटांना सामोरे जावे लागले. त्यांना राहायला घरही मिळाले नाही. कार्यालयातही त्यांचा पदोपदी अपमान करण्यात आला. सदर नौकरीवर रुजू झाल्यानंतर काही दिवसातच रामजीबाबांची प्रकृती खालवल्याची तार भीमरावांना मिळाली आणि ते तसेच बडोद्यावरून मुंबईला पोहोचले. रामजीबाबा आणि बाबासाहेबांची ती अखेरची भेट ठरली. २ फेब्रुवारी १९१३ रोजी रामजीबाबांचे निर्वाण झाले.

वडील आजारी असल्याची तार मिळताच भीमरावं मुंबईला यायला निघाले. वडिलांची आवडती मिठाई घेण्यासाठी ते सुरत रेल्वे स्टेशनवर उतरले आणि त्यांची ट्रेन सुटली. पुन्हा गाडी २४ तसांनी होती. भीमराव घरी पोहोचले तेव्हा माझा भिवा आला म्हणून रामजींनी दोन आनंदाश्रू ढाळले आणि त्यांचे तात्काळ निधन झाले. जाणू फक्त भिवाला पाहायला, भेटायलाच ते थांबले होते.

"असे होते रामजी म्हणून घडले ग्रंथप्रेमी भीमजी." हे आपण कदीही विसरता कामा नये.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १५ नोव्हेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, कतिको मासो, शुक्रवार, कार्तिक माहे.

१५ नोव्हेंबर – रोजी गुरू नानक जयंती.

१५ नोव्हेंबर १८७५ – रोजी बिरसा मुंडा जयंती.

१५ नोव्हेंबर १९२९ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बहिष्कृत भारतचा शेवटचा अंक प्रसिद्ध. त्यामध्ये त्यांनी भारतीय समाज रचना या विषयाचे भाषण प्रकाशित केले.

१५ नोव्हेंबर १९४८ – रोजी दुसऱ्यांदा ड्राफ्ट संविधानच्या मासुद्यावर (Artical) चर्चा पुन्हा सुरू झाली. माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी एक–एक करून उपखंडांचे तपशीलवार वर्णन केले.

१५ नोव्हेंबर १९५१ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भुसावळ येथे झालेल्या भाषणात सांगितले की, "योजना कोणी केली ते न पाहता ती कशी आहे ते पाहा."

१५ नोव्हेंबर १९५१ – रोजी कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या हस्ते चाळीसगाव तालुक्यातर्फे दलित समाजाने बाबासाहेबांना २००१ रुपयांची थैली अर्पण केली. त्यानंतर माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "फेडरेशनचां जाहीरनामा सर्वोत्कृष्ट असल्याचा जगातील राष्ट्रांचा अभिप्राय दिला आहे."

१५ नोव्हेंबर १९५६ – रोजी भारताचे माजी कायदेमंत्री माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माईसाहेब आंबेडकर यांनी काठमांडू येथे जगातील बौद्ध धंम्मिय लोकांच्या चौथ्या जागतिक परिषदेत भाग घेतला. त्यावेळी त्यांनी केलेल्या भाषणात बौद्ध धंम्माची महती सांगितली.

*१५ नोव्हेंबर २०२४ – रोजी **कार्तिक पौर्णिमा (कतिको मासो पुंन्नमि)** १. काश्यप बंधूंची धम्मदीक्षा. २. सारीपुत्ताची व महामोग्गल्यायन यांची धम्मदीक्षा. ३. सारीपुत्त व भावंडांची धम्मदीक्षा. ४. महामोग्गल्यायन यांची हत्या. ५.आधुनिक मुलगन्धकुटी विहार. ६. महाप्रजापती गौतमीचे चीवर दान.*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 बिरसा मुंडा जिन्होंने २५ साल की उम्र में कर दिए थे अंग्रेज़ों के दांत खट्टे. 💎🦚🦚🦚☸☸

(बीबीसी ने नई साप्ताहिक सिरीज़ शुरू की है 'छोटी उम्र बड़ी ज़िंदगी' जिसमें उन लोगों की कहानी बताई जा रही है जिन्होंने दुनिया में नाम तो बहुत कमाया, लेकिन ४० साल से पहले इस दुनिया को अलविदा कह दिया. तीसरी कड़ी में बिरसा मुंडा की कहानी पढ़िए.)

बात नवंबर, १८९७ की है. बिरसा मुंडा को पूरे २ साल १२ दिन जेल में बिताने के बाद रिहा किया जा रहा था. उनके दो और साथियों–डोंका मुंडा और मझिया मुंडा–को भी छोड़ा जा रहा था.

ये तीनों साथ–साथ जेल के मुख्य गेट की तरफ़ बढ़ रहे थे. जेल के क्लर्क ने रिहाई के कागज़ात के साथ कपड़ों का एक छोटा–सा बंडल भी दिया. बिरसा ने अपने पुराने सामान पर एक नज़र डाली और वो ये देख कर थोड़े परेशान हुए कि उसमें उनकी चप्पल और पगड़ी नहीं थी. जब बिरसा के साथ डोंका ने पूछा कि बिरसा की चप्पल और

पगड़ी कहाँ है, तो जेलर ने जवाब दिया कि कमिश्नर फ़ोर्ब्स के आदेश हैं कि हम आपकी चप्पल और पगड़ी आपको न दें क्योंकि सिर्फ़ ब्राह्मण, ज़मींदारों और साहूकारों को ही चप्पल और पगड़ी पहनने की इजाज़त है.

इससे पहले कि बिरसा के साथी कुछ कहते बिरसा ने अपने हाथ के इशारे से उन्हें चुप रहने को कहा. जब बिरसा और उनके साथी जेल के गेट से बाहर निकले तो क़रीब २५ लोग उनके स्वागत में खड़े थे.

उन्होंने बिरसा को देखते ही नारा लगाया, 'बिरसा भगवान की जय'!

बिरसा ने कहा आप सबको मुझे भगवान नहीं कहना चाहिए. इस लड़ाई में हम सब बराबर हैं.

तब बिरसा के साथी भरमी ने कहा हमने आपको एक दूसरा नाम भी दिया था 'धरती आबा.' अब हम आपको इसी नाम से पुकारेंगे.

• झारखंड के सबसे सम्मानित व्यक्ति :

बिरसा मुंडा ने बहुत कम उम्र में अंग्रेज़ों के खिलाफ़ विद्रोह का बिगुल बजा दिया था. उन्होंने ये लड़ाई तब शुरू की थी जब वो २५ साल के भी नहीं हुए थे. उनका जन्म १५ नवंबर, १८७५ को मुंडा जनजाति में हुआ था.

उन्हें बाँसुरी बजाने का शौक था. अँग्रेज़ों को कड़ी चुनौती देने वाले बिरसा सामान्य कद–काठी के व्यक्ति थे, उनका क़द था केवल ५ फ़ीट ४ इंच.

जॉन हॉफ़मैन ने अपनी किताब 'इनसाइक्लोपीडिया मंडारिका' में लिखा था, "उनकी आँखों में बुद्धिमता की चमक थी और उनका रंग आम आदिवासियों की तुलना में कम काला था. बिरसा एक महिला से शादी करना चाहते थे, लेकिन जब वो जेल चले गए तो वो महिला उनके प्रति ईमानदार नहीं रही, इसलिए बिरसा ने उसे छोड़ दिया."

शुरू में वो बोहोंडा के जंगलों में भेड़ें चराया करते थे. सन १९४० में झारखंड की राजधानी राँची के नज़दीक रामगढ़ में हुए कांग्रेस के सम्मेलन में मुख्य द्वार का नाम बिरसा मुंडा गेट रखा गया था. सन २००० में उनके जन्मदिन की तारीख़ पर ही झारखंड राज्य की स्थापना की गई थी.

• ईसाई धर्म अपनाया और फिर छोड़ा भी :

बिरसा मुंडा की आरंभिक पढ़ाई सालगा में जयपाल नाग की देखरेख में हुई थी. उन्होंने एक जर्मन मिशन स्कूल में दाख़िला लेने के लिए ईसाई धर्म अपना लिया था. लेकिन जब उन्हें लगा कि अंग्रेज़ लोग आदिवासियों का धर्म बदलवाने की मुहिम में लगे हुए हैं तो उन्होंने ईसाई धर्म छोड़ दिया था.

कहानी मशहूर है कि उनके एक ईसाई अध्यापक ने एक बार कक्षा में मुंडा लोगों के लिए अपशब्दों का प्रयोग किया. बिरसा ने विरोध में अपनी कक्षा का बहिष्कार कर दिया. उसके बाद उन्हें कक्षा में वापस नहीं लिया गया और स्कूल से भी निकाल दिया गया.

बाद में उन्होंने ईसाई धर्म का परित्याग कर दिया और अपना नया धर्म 'बिरसैत' शुरू किया. जल्दी ही मुंडा और उराँव जनजाति के लोग उनके धर्म को मानने लगे. जल्दी ही, उन्होंने अंग्रेज़ों की धर्म बदलवाने की नीति को एक तरह की चुनौती के तौर पर लिया.

• बिरसा मुंडा पर ५०० रुपए का इनाम :

बिरसा के संघर्ष की शुरुआत चाईबासा में हुई थी जहाँ उन्होंने १८८६ से १८९० तक चार वर्ष बिताए. वहीं से अंग्रेज़ों के ख़िलाफ़ एक आदिवासी आंदोलन की शुरुआत हुई. इस दौरान उन्होंने एक नारा दिया – "अबूया राज एते जाना/महारानी राज टुडू जाना" (यानी अब मुंडा राज शुरू हो गया है और महारानी का राज ख़त्म हो गया है).

बिरसा मुंडा ने अपने लोगों को आदेश दिया कि वो सरकार को कोई टैक्स न दें. १९ वीं सदी के अंत में अंग्रेज़ों की भूमि नीति ने परंपरागत आदिवासी भूमि व्यवस्था को छिन्न–साहूकारों ने उनकी ज़मीन पर क़ब्ज़ा करना शुरू कर दिया था और आदिवासियों को जंगल के संसाधनों का इस्तेमाल करने से रोक दिया गया था. मुंडा लोगों ने एक आंदोलन की शुरुआत की थी जिसे उन्होंने 'उलगुलान' का नाम दिया था.

उस समय बिरसा मुंडा राज्य की स्थापना के लिए जोशीले भाषण दिया करते थे. केएस सिंह अपनी किताब 'बिरसा मुंडा एंड हिज़ मूवमेंट' में लिखते हैं, "बिरसा अपने में भाषण में कहते थे, डरो मत. मेरा साम्राज्य शुरू हो चुका है. सरकार का राज समाप्त हो चुका है. उनकी बंदूकें लकड़ी में बदल जाएंगी. जो लोग मेरे राज को नुकसान पहुंचाना चाहते हैं उन्हें रास्ते से हटा दो."

उन्होंने पुलिस स्टेशनों और ज़मींदारों की संपत्ति पर हमला करना शुरू कर दिया था. कई जगहों पर ब्रिटिश झंडे यूनियन जैक को उतारकर उसकी जगह सफ़ेद झंडा लगाया जाने लगा जो मुंडा राज का प्रतीक था. अंग्रेज़ सरकार ने उस समय बिरसा पर ५०० रुपए का इनाम रखा था जो उस ज़माने में बड़ी रक़म हुआ करती थी.

बिरसा को पहली बार २४ अगस्त १८९५ को गिरफ़्तार किया गया था. उनको दो साल की सज़ा हुई थी. जब दो साल बाद उन्हें छोड़ा गया था तो वो भूमिगत हो गए थे और अंग्रेज़ों के खिलाफ़ आंदोलन करने के लिए उन्होंने अपने लोगों के साथ गुप्त बैठकें शुरू कर दी थीं.

• सरदार आंदोलन से प्रेरणा :

बिरसा मुंडा से कहीं पहले सन १८५८ से अंग्रेज़ों के ख़िलाफ़ सरदार आंदोलन की शुरुआत हो चुकी थी. उसका उद्देश्य था ज़मीदारों और बँधुआ मज़दूरी को समाप्त करना. उसी दौरान राँची के पास सिलागेन गाँव में बुद्धू भगत ने आदिवासियों को अंग्रेज़ों के ख़िलाफ़ संगठित किया था.

उन्होंने क़रीब ५० आदिवासियों को जमा किया था जिनके हाथ में हमेशा तीर कमान हुआ करते थे. उनका नारा था 'अबुआ दिसोम रे, अबुआ राज' यानी ये हमारा देश है और हम इस पर राज करेंगे. जब भी कोई ज़मींदार या पुलिस अफ़सर लोगों पर ज़्यादती करता पाया जाता था, बुद्धू अपने दल के साथ पहुंच कर उसके घर पर हमला बोल देते थे.

तुहिन सिन्हा और अंकिता वर्मा अपनी किताब 'द लीजेंड ऑफ़ बिरसा मुंडा' में लिखते हैं, "एक बार एक मुहिम पर जाने से पहले बुद्धू और उनके साथियों ने तय किया कि वो शिव मंदिर में पूजा करेंगे. जब वो मंदिर के पास पहुंचे तो वो अंदर से बंद था. वो अभी सोच ही रहे थे कि क्या किया जाए अचानक २० पुलिसवाले मंदिर के अंदर से निकले, इसके बाद मुठभेड़ शुरू हो गई जिसमें बुद्धू समेत १२ आदिवासी मारे गए और बाकी लोगों को बंदी बना लिया गया."

बताया जाता है कि दस गोलियाँ लगने के बावजूद बुद्धू ने मरते–मरते कहा, "आज तुम्हारी जीत हुई है, लेकिन ये तो अभी शुरुआत है. एक दिन हमारा 'उलगुलान' तुम्हें हमारी ज़मीन से बाहर फेंक देगा."

• डोम्बारी पहाड़ पर सैनिकों से मुठभेड़ :

सन १९०० आते–आते बिरसा का संघर्ष छोटानागपुर के ५५० वर्ग किलोमीटर इलाके में फैल चुका था. सन १८९९ में उन्हें अपने संघर्ष को और विस्तार दे दिया था. उसी साल ८९ ज़मीदारों के घरों में आग लगाई गई थी. आदिवासी विद्रोह इतना बढ़ गया था कि राँची के ज़िला कलेक्टर को सेना की मदद माँगने के लिए मजबूर होना पड़ा था.

डोम्बारी पहाड़ी पर सेना और आदिवासियों की भिड़ंत हुई थी. केएस सिंह अपनी किताब में लिखते हैं, "जैसे ही आदिवासियों ने सैनिकों को देखा उन्होंने अपने तीर–कमान और तलवारें लहराना शुरू कर दीं. अंग्रेज़ों ने दुभाषिए के ज़रिए मुंडारी में उनसे हथियार डालने के लिए कहा. पहले तीन राउंड गोली चलाई गई. लेकिन उसका कोई असर नहीं हुआ. आदिवासियों को लगा कि बिरसा की भविष्यवाणी सच साबित हुई है कि अंग्रेज़ों की बंदूकें लकड़ी में और उनकी गोलियाँ पानी में बदल गई हैं."

उन्होंने चिल्ला कर इस गोलीबारी का जवाब दिया. इसके बाद अंग्रेज़ों ने दो राउंड गोली चलाई. इस बार दो 'बिरसैत' मारे गए. तीसरा राउंड चलने पर तीन आदिवासी धराशायी हो गए. उनके गिरते ही अंग्रेज़ सैनिकों ने पहाड़ पर हमला बोल दिया. इससे पहले उन्होंने पहाड़ के दक्षिण में कुछ सैनिक भेज दिए ताकि वहाँ से आदिवासियों को बच निकलने से रोका जाए.

केएस सिंह ने लिखा है, "इस मुठभेड़ में सैकड़ों आदिवासियों की मौत हुई थी और पहाड़ी पर शवों का ढेर लग गया था. गोलीबारी के बाद सुरक्षाबलों ने आदिवासियों के शव खाइयों में फेंक दिए थे और कई घायलों को ज़िंदा गाड़ दिया गया था.

इस गोलीबारी के दौरान बिरसा भी वहां मौजूद थे, लेकिन वो किसी तरह वहाँ से बच निकलने में कामयाब हो गए. कहा जाता है कि इस गोलीबारी में क़रीब ४०० आदिवासी मारे गए थे, लेकिन अंग्रेज़ पुलिस ने सिर्फ़ ११ लोगों के मारे जाने की पुष्टि की थी.

• चक्रधरपुर के पास बिरसा को पकड़ा गया :

तीन मार्च को अंग्रेज़ पुलिस ने चक्रधरपुर के पास एक गाँव को घेर लिया था. बिरसा के नज़दीकी साथियों कोमटा, भरमी और मौएना को गिरफ़्तार कर लिया गया था. लेकिन बिरसा का कहीं अता–पता नहीं था.

तभी एसपी रोश को एक झोंपड़ी दिखाई दी थी. तुहिन सिन्हा और अंकिता वर्मा लिखते हैं, "जब रोश ने अपनी संगीन से उस झोंपड़ी के दरवाज़े को धक्का देकर खोला था तो अंदर का दृश्य देख कर उनके होश उड़ गए थे. बिरसा मुंडा झोंपड़ी के बीचोंबीच पालथी मार कर बैठे हुए थे. उनके चेहरे पर अजीब सी मुस्कान थी. उन्होंने तुरंत खड़े होकर बिना कोई शब्द बोले इशारा किया था कि वो हथकड़ी पहनने के लिए तैयार हैं."

रोश ने अपने सिपाही को बिरसा को हथकड़ी पहनाने का आदेश दिया. ये वो शख़्स था जिसने इस इलाके में अंग्रेज़ सरकार की नींव हिला कर रख दी थी.

बिरसा को दूसरे रास्ते से राँची ले जाया गया ताकि लोगों को पता न चल सके कि उन्हें गिरफ़्तार कर लिया गया है. लेकिन जब बिरसा राँची जेल पहुंचे तो हज़ारों लोग उनकी एक झलक पाने के लिए वहाँ पहले से ही मौजूद थे.

• मुख़बिरी की वजह से हुई थी बिरसा की गिरफ़्तारी :

बिरसा के पकड़े जाने का विवरण सिंहभूम के कमिश्नर ने बंगाल के मुख्य सचिव को भेजा था.

५०० रुपए का इनाम घोषित होने के बाद पास के गाँव मानमारू और जरीकल के सात लोग बिरसा मुंडा की तलाश में जुट गए.

कमिश्नर ने अपनी रिपोर्ट में लिखा, "तीन फ़रवरी को इन लोगों ने सेंतरा के पश्चिम के जंगलों में दूर से धुआँ उठते हुए देखा. जब वो पास गए तो उन्होंने देखा कि बिरसा वहाँ अपनी दो तलवारों और पत्नियों के साथ बैठे हुए थे. थोड़ी देर बाद जब बिरसा सो गए तो इन लोगों ने उसी हालत में बिरसा को पकड़ लिया. उन्हें बंदगाँव में कैंप कर रहे डिप्टी कमिश्नर के पास लाया गया."

बिरसा को पकड़ने वाले लोगों को ५०० रुपए नक़द इनाम के तौर पर दिए गए. कमिश्नर ने आदेश दिया कि बिरसा को चाईबासा न ले जाकर राँची ले जाया जाए.

• बेड़ियों में बाँध कर अदालत लाया गया :

मुकदमे वाले दिन कमिश्नर फ़ोर्ब्स ने तय किया कि बिरसा को बेड़ियों में बाँध कर जेल से अदालत लाया जाएगा ताकि लोग अपनी आंखों से देख सकें कि अंग्रेज़ सरकार से टक्कर लेने का परिणाम क्या होता है.

अदालत के कमरे में कमिश्नर फ़ोर्ब्स डीसीपी ब्राउन के साथ आगे की बेंच पर बैठे हुए थे. उनके चेहरे पर एक विजयी मुस्कान थी. वहां फ़ादर हॉफ़मैन भी अपने एक दर्जन साथियों के साथ मौजूद थे.

तभी बाहर से एक शोर सुनाई दिया. ब्राउन दौड़कर बाहर की तरफ़ भागे. वहाँ भारी भीड़ बिरसा की रिहाई की माँग कर रही थी. उसके साथ क़रीब ४० सशस्त्र पुलिसकर्मी चल रहे थे.

साफ़ दिखाई दे रहा था कि जेल में बिरसा की कोड़ों से काफ़ी पिटाई की गई थी लेकिन ये लग नहीं रहा था कि बिरसा को किसी तरह का कोई दर्द है. ये दृश्य देखते ही ब्राउन को अपनी ग़लती का एहसास हो गया था.

उन्होंने सोचा था कि बिरसा को बेड़ियों में बाँध कर अदालत लाने से संदेश जाएगा कि अंग्रेज़ों के खिलाफ़ बग़ावत का परिणाम कितना बुरा हो सकता है, लेकिन इसका उलटा असर हुआ था. लोग डरने के बजाए बिरसा के समर्थन में उतर आए थे. बिरसा पर लूट, दंगा करने और हत्या के १५ मामलों में आरोप तय किए गए थे.

• जेल में हुई मौत :

जेल में बिरसा को एकांत में रखा गया. तीन महीने तक उन्हें किसी से मिलने नहीं दिया गया. सिर्फ़ एक घंटे के लिए रोज़ उन्हें सूरज की रोशनी पाने के लिए अपनी कोठरी से बाहर निकाला जाता था.

एक दिन बिरसा जब सोकर उठे तो उन्हें तेज़ बुख़ार और पूरे शरीर में भयानक दर्द था. उनका गला भी इतना ख़राब हो चुका था कि उनके लिए एक घूंट पानी पीना भी असंभव हो गया था. कुछ दिनों में उन्हें ख़ून की उल्टियां शुरू हो गई थीं. ९ जून, १९०० को बिरसा ने सुबह ९ बजे दम तोड़ दिया.

बाद में रांची जेल के अधीक्षक कैप्टन एंडरसन ने जांच समिति के सामने दिए बयान में कहा, "जब बिरसा के पार्थिव शरीर को कोठरी के बाहर लाया गया तो जेल में कोहराम मच गया. सभी बिरसैतों को बुलाकर बिरसा के शव को पहचानने के लिए कहा गया. लेकिन उन्होंने डर की वजह से ऐसा करने से इनकार कर दिया.

नौ जून की शाम साढ़े पाँच बजे शरीर का पोस्टमॉर्टम किया गया. उनके शरीर में बड़ी मात्रा में पानी पाया गया. उनकी छोटी आँत पूरी तरह से नष्ट हो चुकी थी. पोस्टमॉर्टम रिपोर्ट में उनकी मौत का कारण हैजा बताया गया.

बिरसा के साथियों का मानना था कि उन्हें ज़हर दिया गया था, आख़िरी समय में जेल प्रशासन ने उन्हें मेडिकल सहायता नहीं दी, इससे इस आशंका को और बल मिला.

अपने अंतिम क्षणों में बिरसा कुछ पलों के लिए होश में आए. उनके मुंह से शब्द निकले, 'मैं सिर्फ़ एक शरीर नहीं हूँ. मैं मर नहीं सकता. उलगुलान (आंदोलन) जारी रहेगा.'

बिरसा की मृत्यु के साथ ही मुंडा आंदोलन शिथिल पड़ गया था, लेकिन उनकी मौत के आठ साल बाद अंग्रेज़ सरकार ने 'छोटानागपुर टेनेंसी एक्ट' पारित किया जिसमें प्रावधान था कि आदिवासियों की भूमि को ग़ैर−आदिवासी नहीं ख़रीद नहीं सकते.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🔵🔵🔵 कार्तिक पौर्णिमा (कतिको मासो पुंन्नमि) 🔵🔵🔵☸☸

१. काश्यप बंधूंची धम्मदीक्षा. २. सारीपुत्ताची व महामोग्गल्यायन यांची धम्मदीक्षा. ३. सारीपुत्त व भावंडांची धम्मदीक्षा. ४. महामोग्गल्यायन यांची हत्या. ५.आधुनिक मुलगन्धकुटी विहार. ६. महाप्रजापती गौतमीचे चीवर दान.

कार्तिक पौर्णिमेला पाली भाषेत *कत्तिक मासो* म्हणतात. ही पौर्णिमा साधारणतः नोव्हेंबर महिन्यात येते. वर्षावासाच्या समाप्तीनंतर धम्मप्रचारार्थ बाहेर पडण्याचा महिना म्हणजे कार्तिक महिना. कार्तिक पौर्णिमेला बुद्धाच्या जीवनात व त्यांच्या निर्वाणानंतरही अनेक महत्वपूर्ण घटना घडल्यात.

१. काश्यप बंधूंची धम्मदीक्षा :

काश्यप बंधू तीन होते, उरुवेला काश्यप, नदी काश्यप आणि गया काश्यप. त्यांचे वास्तव्य वाराणसी मध्ये होते. या तिन्ही बंधूंना जटाधारी काश्यप म्हणून ओळखत असत व त्या प्रत्येकाचे शेकडो शिष्य होते. उरुवेला काश्यपांची कीर्ती ऐकल्यामुळे त्याला उपदेश देण्याचा आणि शक्य झाल्यास धम्माची दीक्षा देण्याचा तथागतांनी विचार केला. काश्यपांची तथागतांनी भेट घेतली व आश्रमात रात्रभर राहू देण्याची विनंती केली. मात्र मुचलींद नावाचा नागराजा अग्निपूजा करणाऱ्यांना रात्री येऊन त्रास देतो म्हणून काश्यपांनी तथागतास आश्रमात राहण्यास नकार दिला. तथागतांच्या आग्रहास्तव काश्यपांनी संमती दिली. तथागतांनी अग्निशाळेत प्रवेश केला व बसले. इकडे काश्यप रात्रभर काळजीने चिंतीत राहिला की तथागताला नागराजाने भस्मसात केले असावे. उजाळल्यावर येऊन बघतात तर नागराजा तथागतांनी पूजा करीत दिसले.

त्यामुळे काश्यप तथागतांनी त्यांचेजवळ राहण्याची विनंती करतो. काश्यप अहंमन्य पुरुष असला तरी तथागत्यांच्या विधानातील सामर्थ्य त्याला जाणवले आणि अतिशय नम्रतेने भगवंताचा सिद्धांत मान्य करून उरुवेला काश्यप बुद्धाचा अनुयायी बनला. काश्यप व त्याच्या अनुयायांना धम्माची दीक्षा देण्यात आली. आपल्या भावाने दीक्षा घेतली म्हणून आपणही दीक्षा घ्यावी म्हणून उरुवेला काश्यप जवळ येतात. बुद्धाने त्यांना सुद्धा प्रवचन दिले. बुद्धाचे प्रवचन एकूण त्या अग्निपूजेचा आदर कमी झाला आणि बुद्धाचे शिष्य होण्याची इच्छा व्यक्त केली. बुद्धाने त्यांना धम्मदीक्षा दिली. तो दिवस होता कार्तिक पौर्णिमेचा. त्या तिघांना मिळून एक हजार शिष्यांनाही तथागतांनी प्रवज्जीत केले. अशा प्रकारे धम्माचा संघ तीव्र गतीने वाढू लागला.

शेवटी उरुवेला काश्यपांना वाटले की की आपला अंतिम समय जवळ आला आहे. तेव्हा त्यांनी तथागतांजवळ निर्वाणाची अनुमती मागीतली. त्याच दिवशी ते निर्वाणपदास प्राप्त झाले. तो दिवस होता कार्तिक पौर्णिमेचा.

२. सारीपुत्त व महामोग्गल्यायन यांची धम्मदीक्षा :

सारीपुत्त व महामोग्गल्यायन हे दोघे मित्र होते. दोघांचीही घरची सांपत्तिक स्थिती असतांनाही ऐन तारुण्यात गृहत्याग करण्याचा निर्णय घेतला. दोघेही संजय बेलठिहीपुत्र यांचे शिष्य होते. परंतु संजयच्या उपदेशाने त्यांचे समाधान झाले नव्हते. त्यापेक्षा चांगल्या तत्वज्ञानाच्या शोधात होते. ऐके दिवशी अश्वजीत चारिकेसाठी रस्त्याने जाताना दिसले. त्यांची शांत मुद्रा, संयमित दृष्टी, खाली नजर, संथ चाल, याचा सारीपुत्तावर एवढा प्रभाव पडला की तो भदंत अश्वजिताकडे ओढला गेला व त्याच्या पाठीमागे जाऊ लागला. अश्वजिताचे भोजन झाल्यानंतर सारीपुत्त विचारतो; "तू तुझ्या शास्ता गुरू कोण?" "तू कोणत्या धर्मास माणतोस?" त्यावर अश्वजीत उत्तर देतो; "तथागत माझा शास्ता आहे व त्याच्या धम्मास मी मानतो."

तथागताचा उपदेश सारांश मध्ये सांगितला. सारीपुत्ताचे समाधान झाले. सारीपुत्त व महामोग्गल्यायन हे सख्खे भाऊ जरी नसले तरी सख्ख्या भावाप्रमाणे राहत असत. त्यांनी एकमेकांस वचन दिले होते की ज्यास सत्य सापडेल त्यांनी दुसऱ्यास सांगावे. सारीपुत्तावर महामोग्गल्यायन यास तथागताचा उपदेश सांगितलं आणि दोघेही २५० शिष्यांसह तथागताकडे निघाले. सर्वांनी धम्म स्वीकारला. तो दिवस होता कार्तिक पौर्णिमा. प्रवज्जा स्वीकारल्यापासून सातव्या दिवशी महामोग्गल्यायन यांनी अर्हत पद प्राप्त केले. मात्र सारीपुत्ताने अर्हत पद प्राप्त करण्यास दोन आठवड्याचा कालावधी लावला. आणि दोघांनीही एवढी म्हणता प्राप्त केली की सर्वजण या दोघांना तथागतांचे उजवे−डावे बाहू मानू लागले.

३. सारीपुत्त भावंडांची धम्मदीक्षा :

सारीपुत्ताचा जन्म अतिशय धनसपन्न परिवारात झाला असला तरी त्याने ऐन तारुण्यात परिवज्जा घेतली. त्याच्या पाठोपाठ त्याचे तीन भाऊ व तीन बहिणींनी सुद्धा परिवज्जा घेतली तो दिवस कार्तिक पौर्णिमेचा होता. सर्व अपत्यांनी परिवज्जा घेतली व गृहत्याग केल्याने त्यांची आई अतिशय व्यथित झाली. आयुष्याच्या शेवटी सारीपुत्ताने आई ला उपदेश केला व त्यानंतर आई सुद्धा दीक्षेनंतर सोतापन्न झाली. तो दिवस होता कार्तिक पौर्णिमेचा.

४. महामोग्गल्यायन यांची हत्या :

असे म्हणतात की महामोग्गल्यायन यांची कांती निळ्या कमळा समान होती. आजही श्रीलंका मध्ये त्यांची प्रतिमा निळ्या रंगाची बनविली जाते. त्यांचा समाजमनावर अतिशय प्रभाव होता. तथागतांच्या हयातीतच ह्या दोन्ही स्थविरांचे निर्वाण झाले. सारीपुत्ताच्या परिनिर्वानंतर पंधरा दिवसानंतर इ. स. पु. ४८४ च्या कार्तिक अमावस्येच्या दिवशी महामोग्गल्यायन यांची निगंठनांनी निर्दयतेने हत्या केली व इतर भिक्खुंनाही मारहाण केली. या घटनेने भिक्खुसंघात फारच चिंतेचे वातावरण पसरले.

तथागतांनी राजगृहमध्ये एक चैत्याची निर्मिती केली त्याच प्रमाणे मध्यप्रदेशातील विदिशाजवळ साचीचा स्तूप आहे त्या परिसरात एक शांतिस्तुप बांधण्यात आला असून त्यात सारीपुत्त व महामोग्गल्यायन यांच्या अस्थी ठेवण्यात आल्या आहेत. दरवर्षी नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या रविवारी त्या अस्थी जनतेसाठी खुल्या असतात. अस्थीच्या दर्शनासाठी जगभरातील बौद्ध उपासक−उपासिका, भिक्खू−भिक्खूनी येतात.

५. आधुनिक मूलगन्धकुटी विहार :

श्रीलंकानिवासी नागरिक धम्मपाल यांनी तक्षशिला येथें प्राप्त झालेल्या भगवंताच्या पवित्र अस्थी भारतात आणून सारनाथ येथे एक विहार बांधून सुरक्षित ठेवलेल्या आहेत. या विहारासच मुलन्धकुटी विहार असे म्हणतात. दरवर्षी कार्तिक पौर्णिमेला तथागताच्या या अस्थी पूजेअर्चेसाठी बाहेर काढतात. संपूर्ण सारनाथमध्ये या अस्थींची मिरवणूक काढून त्या परत विहारात स्थानापन्न केल्या जातात.

६. महाप्रजापती गौतमीचे चीवर दान :

महाप्रजापती गौतमी स्वतः विणलेले दोन शेले घेऊन तथागतांकडे गेल्या. त्या तथागतांना म्हणाल्या, "भंते ! मी स्वतः कातलेले, विणलेले दोन शेले आपणास अर्पित करीत आहे. भगवंतांनी त्याचा कृपा करून स्वीकार करावा."

असे म्हणतात भगवंतांनी महाप्रजापतीला म्हटले, "गौतमी, हे संघाला दे. संघाला दिल्यास मी पुजीत होईल आणि संघ सुद्धा."

शेवटी महाप्रजापती गौतमीने स्वतः तयार केलेले शेले संघाला दान दिले. त्यांनी अत्यंत परिश्रमाने वर्षावासाच्या तीन महिन्याच्या काळात जे तयार केले होते. ज्या दिवशी शेले दान करण्याची इच्छा त्यांनी तथागतांजवळ केली होती ती कार्तिक पौर्णिमा होती. ती पौर्णिमा कठीण चीवर दानासाठी प्रसिद्ध आहे. या दिवशी भिक्खूंना कठीण चिवर दान देण्यात येते.

अशा या कार्तिक पौर्णिमेच्या सर्वांना मंगलमय कामना.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🌿🌿🌿💎 🧿 चीवराचे महत्व 🧿💎🌿🌿🌿☸☸

१) चीवर हे श्रामणेर व भिक्खूंचे वस्त्र आहे काही इतर संन्याशी ही भगवी वस्त्र परिधान करतात. परंतु संन्याशाने विधीवत ते वस्त्र घेतलेले नसते. ते फक्त पोटासाठी भगवे वस्त्र घेतलेले असते.

२) भिक्षु व संन्याशी यांच्यातील फरक लोकांना कळावा म्हणून भगवान बुद्धांनी चीवराची रचना आपल्या धम्माच्या तत्वाप्रमाणे, शीला प्रमाणे केली आहे. ते चीवर भिक्षूंना सहज परिधान करता येईल हे पाहिले आहे.

३) चीवराची निर्मिती इ. स. पूर्वी ५२८ ला पहिला भिक्षु संघ सारनाथ येथे निर्माण झाला. तेव्हा त्यांचे चीवर वस्त्र कसे असावे याचा विचार केला आहे आणि रचना केली आहे.

४) चीवर किंवा जुन्या रस्त्यावर कचऱ्यात पडलेल्या चिंध्यांचे असावे कारण नव्या वस्त्राने तृष्णा निर्माण होते. चीवर हे त्यागाचे प्रतीक आहे, त्यागाची आठवण करून देणारे आहे. म्हणून नवीन कपड्याचे नसावे. त्याग म्हणजे अकुशल कर्माचा, विचारांचा त्याग व सत्याचा स्वीकार कसा असा आहे, पवित्रता व निर्माणाचे स्वीकार आहे.

५) भगवान बुद्ध आणि आनंद एकदा एका शेतातून जात असताना आनंदाला एक कल्पना सुचली आणि त्या शेतातील वाफ्याकडे भगवंताचे लक्ष वेधून आनंद म्हणाले की, भगवान आपल्या अंगावरचे चीवर अत्यंत सरळ आणि साधे आहे. त्याला कसलाच आकार नाही, काही नियम नाही. म्हणून त्याचा कोणीही केव्हाही दुरुपयोग करतील. त्यासाठी आपण आपल्या जीवनाला ठराविक नियम किंवा आकार द्यावा. भगवान बुद्ध आनंदास म्हणाले, तुझ्या कल्पनेप्रमाणे शेताच्या वाफ्याप्रमाणे आकार दिल्यास योग्य होईल. चीवराचा ठराविक आकार, फरक लक्षात आल्यावर कोणीही त्याचा गैरवापर करणार नाही. तेव्हापासून चीवर भिक्षु परिधान करू लागले.

६) चीवराचे तीन प्रकार आहेत.

१) आंतरवासक म्हणजे लुंगी प्रमाणे कमरेला नेसण्याचे वस्त्र.

२) उत्तरासंग पाच हात लांब व चार हात रुंद चादरी प्रमाणे पांघरण्याची वस्त्र.

३) संगाटी म्हणजे उत्तरसंगा प्रमाणे लांबी–रुंदीचे वस्त्र दुहेरी शिवलेले असते, थंडीवाऱ्यापासून बचाव करण्यासाठी हे खांद्यावर घेतात.

! जयभिम !   !! जयभारत !!   !!! नमोबुद्धाय !!!

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १६ नोव्हेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, कतिको मासो, शनिवार, कार्तिक माहे.

१६ नोव्हेंबर १८५२ – रोजी महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले यांच्या गौरवार्थ ब्रिटिश सरकारने मेजर कँडी यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण कर्याबादाल सरकारी विद्या खात्याकडून सत्कार व पुण्यातील विश्राम बाग वाड्यात सभेचे आयोजन केले.

१६ नोव्हेंबर १९५६ – रोजी राष्ट्रीय पत्रकार दिन National Press Day. भारत स्वतंत्र झाल्यानंतर काही वर्षानंतर म्हणजे १९५६ ला प्रेस कमिशनने भारतातील पत्रकारितेचे नैतिकता आणि वृत्तपत्र स्वातंत्र्याचे संरक्षण करण्यासाठी एक समिती स्थापन केली. या समितीतुनच पुढे यांनी १० वर्षांनंतर प्रेस काऊन्सिलची स्थापना केली. प्रेस काऊन्सिल ऑफ इंडिया (PCI) ही संस्था विश्वासार्हता राखण्यासाठी सर्व पत्रकारितेच्या क्रियाकलापांवर अत्यंत लक्ष ठेवते.

१६ नोव्हेंबर १९१५ – रोजी डॉ. बुकर टी. वॉशिंग्टन यांचे निधन.

१६ नोव्हेंबर १९४४ – रोजी विधानसभेत माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वेतन देय दुरुस्ती विधेयक The Payment of Wages Amendment Bill वर चर्चा केली.

१६ नोव्हेंबर १९५२ – रोजी एलफिन्स्टन महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विद्यार्थ्यांना उपदेश केला की, "विद्यापीठ हे ज्ञानाचे केंद्र असले पाहिजे.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚🔵🔵🔵💎 National Press Day काय आहे राष्ट्रीय पत्रकारिता दिवसाचा इतिहास... 💎🔵🔵🔵🦚🦚🦚☸☸

सर्वप्रथम हिकीचे 'बेंगॉल गॅझेट' हे साप्ताहिक इंग्रजी वृत्तपत्र कोलकात्यात १७८० साली सुरू झाले. त्यांनीच भारतात पत्रकारितेची मुहूर्तमेढ रोवली. मराठीत बाळशास्त्री जांभेकर यांनी २१ जून १८३२ मध्ये 'दर्पण' हे वृत्तपत्र सुरू केले. याच काळात हिंदी व अन्य भारतीय भाषांमध्ये अनेक वृत्तपत्रे सुरू झाली. भारतातील स्वतंत्र आणि जबाबदार

पत्रकारितेचे प्रतीक म्हणून दरवर्षी १६ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय पत्रकार दिन साजरा केला जातो. याच दिवशी प्रेस काऊन्सिल ऑफ इंडियाने (PCI) काम करण्यास सुरुवात केली.

राष्ट्रीय पत्रकार दिनाचा इतिहास

भारत स्वतंत्र झाल्यानंतर काही वर्षानंतर म्हणजे १९५६ ला प्रेस कमिशनने भारतातील पत्रकारितेचे नैतिकता आणि वृत्तपत्र स्वातंत्र्याचे संरक्षण करण्यासाठी एक समिती स्थापन केली. या समितीतुनच पुढे यांनी १० वर्षांनंतर प्रेस काऊन्सिलची स्थापना केली. प्रेस काऊन्सिल ऑफ इंडिया (PCI) ही संस्था विश्वासार्हता राखण्यासाठी सर्व पत्रकारितेच्या क्रियाकलापांवर अत्यंत लक्ष ठेवते. देशातील सुदृढ लोकशाही राखण्यासाठी प्रेस काऊन्सिल ऑफ इंडियाची सतत महत्त्वाची भूमिका बजावत असते. सोबतच ही संस्था भारतातील प्रेसवर कोणत्याही बाह्य बाबींचा प्रभाव पडणार नाही याचीही खात्री करुन काळजी घेत असते. भारतीय लोकशाहीमध्ये पत्रकारितेला महत्वाचे स्थान राहिले आहे.

१६ नोव्हेंबर हा दिवस देशातील जबाबदार आणि मुक्त पत्रकारिता दर्शविते. जे लोक त्याची कदर करतात, त्या सर्वांनी हा दिवस साजरा केला. कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर पत्रकारितेतील उत्कृष्टतेसाठी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान आणि स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात येते.

प्रेस काऊन्सिल ऑफ इंडिया या संस्थेचं नेमक काय काम असतं?

प्रेस काऊन्सिल ऑफ इंडिया ही एक वैधानिक संस्था आहे ज्याला प्रिंट मीडियाच्या ऑपरेशनवर देखरेख ठेवण्याचा अधिकार आहे. प्रेस काऊन्सिल ॲक्ट १९७८ द्वारे जनादेशाद्वारे हे अधिकार मिळाले आहेत. याअंतर्गत एक स्पीकर (जे अधिवेशनानुसार, सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश आहेत) आणि इतर २८ सदस्य असतात, ज्यापैकी २० प्रेसचे प्रतिनिधीत्व करतात. पाच संसदेच्या दोन सभागृहांद्वारे नामनिर्देशित केले जातात आणि तीनजण संसदेत प्रतिनिधित्व करतात. सांस्कृतिक, साहित्यिक आणि कायदा विषयातून हे निवडले जातात. ही एक वैधानिक, अर्ध-न्यायिक संस्था आहे जी देखरेखीच्या रुपात काम करते. यामाध्यमातून नैतिकतेचे उल्लंघन आणि पत्रकारिता स्वातंत्र्य उल्लंघनाच्या तक्रारींचे निराकरण केले जाते.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १७ नोव्हेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, कतिको मासो, रविवार, कार्तिक माहे.

१७ नोव्हेंबर – रोजी मातृभाव दिन.

१७ नोव्हेंबर १९३२ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तिसऱ्या गोलमेज परिषदेची Round Table conference मधे पहिल्या बैठकीत सहभाग, मार्गदर्शन व भाषण.

१७ नोव्हेंबर १९३३ – रोजी तुमसर येथे श्री. चोखामेळा नाईट स्कूलमधे ए. बी. मानवटकर यांचे अध्यक्षतेखाली माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अस्पृश्य मंडळींची सभा.

१७ नोव्हेंबर १९४९ – रोजी घटना समितीत घटनेच्या तिसऱ्या वाचनास सुरुवात. घटना समितीने मान्य केल्याप्रमाणे राज्यघटना संम्मत करावी असा ठराव माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडला.

१७ नोव्हेंबर १९५१ – रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी आश्रम या वसतिगृहाचे उद्घाटन माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते झाले.

१७ नोव्हेंबर १९५१ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नाशिक येथे झालेल्या आपल्या भाषणात म्हणाले की, "सत्तेवर येणाऱ्या कोणाही पक्षाला, जनतेच्या सर्वांगीण हितासाठी, महात्मा ज्योतिबा फुलेंचे धोरण आणि लोकशाहीवादी तत्त्वज्ञान घेऊनच पुढे जावे लागेल."

१७ नोव्हेंबर १९५६ – रोजी नेपाळ येथे आयोजित 'विश्व बुद्ध संमेलन' येथे माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "हे समजणे चुकीचे आहे की, बुद्ध हा विष्णूचा अवतार आहे. हा चुकीचा आणि खोडकर प्रचार आहे. या सिद्धांताचा प्रसार करणारे हे ब्राम्हण वादाचे शिष्य आहेत. असमानता आणि परस्पर द्वेषाच्या आधारे समाजावर आपली धारण (स्थिरता बनवून ठेवणे) करणे हा त्यांचा एकमेव उद्देश आहे. माझा विश्वास आहे की माझे लोक भारतात बौद्ध धंम्म स्थापित करण्यासाठी प्रयत्न करीत व त्यासाठी ते प्रत्येक गोष्टीचा त्याग करतील."

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १८ नोव्हेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, कतिको मासो, सोमवार, कार्तिक माहे.

१८ नोव्हेंबर १९१७ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व्हेंटस् ऑफ इंडिया सोसायटीच्या हॉलमधे अस्पृश्यांची दुसरी सभा घेतली.

१८ नोव्हेंबर १९४९ – रोजी घटना सभेत माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयजयकार.

१८ नोव्हेंबर १९५१ – रोजी एसके राय बहादुर यांनी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबरोबरचा एक किस्सा सांगितला, जेव्हा त्यांना १८ नोव्हेंबर १९५१ ला मुंबईमधे आयोजित एका समारोहामधे जागा नाही मिळाली तेव्हा बाबासाहेबांनी त्यांना आपल्या मांडीवर बसवले होते.

१८ नोव्हेंबर १९६२ – रोजी सैनिक गोविंद कांबळे स्मृतिदिन.

१८ नोव्हेंबर १९७१ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्रकार चा. भ. खैरमोडे स्मृतिदिन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १९ नोव्हेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, कतिको मासो, मंगळवार, कार्तिक माहे.

१९ नोव्हेंबर – रोजी नागरिक दिन.

१९ नोव्हेंबर १९३८ – रोजी आंबेडकर विजय समाजचे ज. सेक्रेटरी श्री. यशवंत मोतीराम नेताळे यांनी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संदेश सांगण्यासाठी जाहीर सभा बोलावली.

१९ नोव्हेंबर १९४८ – रोजी घटना समितीच्या संविधान सभेच्या चर्चेत माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुच्छेद २८–३० Article 28–30 वर चर्चा केली.

१९ नोव्हेंबर १९५१ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कायदेमंत्री पदाच्या त्यागपत्रा प्रित्यर्थ शेड्युल्ड कास्टस फेडरेशन तर्फे स्वागत, मुंबई.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २० नोव्हेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, कतिको मासो, बुधवार, कार्तिक माहे.

२० नोव्हेंबर १९३० – रोजी पहिल्या गोलमेज परिषदेत माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या भाषणात म्हणाले की, "दलित वर्गासाठी राजकीय सत्तेची गरज आहे. या परिषदेला संबोधित करण्यामागील माझे उद्दिष्ट म्हणजे सर्वप्रथम दलित वर्गाचा दृष्टिकोन ठेवणे, ज्याला मी आणि माझे सहकारी राव बहादुर श्रीनिवासन यांनी घटनात्मक सुधारणांच्या प्रश्नांबाबत विचारले. हा ४३०००००० लोकांचे किंवा ब्रिटिश भारताच्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास पाचव्या हिस्याच्या लोकांचा एक दृष्टिकोन आहे."

२० नोव्हेंबर १९३७ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचा सत्कार व मानपत्र अर्पण करण्यात आले.

२० नोव्हेंबर १९३७ – रोजी मुक्काम दौंड जिल्हा पुणे येथे माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा संप्पंन्न झाली. ते भाषण जनता वृत्तपत्रात प्रकाशित करण्यात आले.

२० नोव्हेंबर १९४८ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या राज्यघटनेत अस्पृश्यता नष्ट करणे हे १७ वें कलम चर्चेतून पास (स्विकृत) करवून घेतले.

२० नोव्हेंबर १९५५ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संभाजीनगर (औरंगाबाद) येथील महाविद्यालयात प्रा. म. भि. चिटणीस लिखित 'युग यात्रा' या नाटकाचा प्रयोग पाहिला.

२० नोव्हेंबर १९५६ – रोजी बुद्ध आणि कार्ल मार्क्स या विषयावर माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण, चौथी जागतिक बौद्ध धंम्म परिषद, काठमांडू. त्यांच्यासोबत त्यावेळी माईसाहेब आंबेडकर ह्या सुद्धा उपस्थित होत्या.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २१ नोव्हेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, कतिको मासो, गुरूवार, कार्तिक माहे.

२१ नोव्हेंबर १९२० – रोजी चांदुर (रेल्वे) येथे श्री. चोखामेळा वऱ्हाड शिक्षण समाज संस्था स्थापन.

२१ नोव्हेंबर १९२६ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी श्री. चोखामेळा फ्री बोर्डिंग स्कूल उघडले.

*२१ नोव्हेंबर १९५० – रोजी संसदेच्या चर्चेत माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रिक्त मालमत्ता प्रशासन दुरुस्ती

विधेयक Administration of evacuee Property Amendment bill या विधेयकावर चर्चा केली.*

२१ नोव्हेंबर १९५६ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पटणा, बिहारहून बौद्धगया पोहोचले. बौद्धगया येथे बुद्धांना ज्ञान प्राप्त झाले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २२ नोव्हेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, कतिको मासो, शुक्रवार, कार्तिक माहे.

२२ नोव्हेंबर १९३० – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारताच्या भावी राज्यघटनेसंबंधी वाटाघाटी करण्यासाठी लंडन येथे गोलमेज परिषदेत सहभागी झाले.

२२ नोव्हेंबर १९४८ – रोजी संविधान सभेच्या चर्चेत माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुच्छेद ३९ Article 39 वर चर्चा केली. या अनुच्छेद Article मधे बाबासाहेब आंबेडकरांनी समान काम करण्यासाठी महिला आणि पुरुष दोघांनाही समान पगार हा हक्क दिला.

२२ नोव्हेंबर १९५१ – रोजी परळ येथील सेंट झेवियर मैदानावर महा. मुंबई दलित फेडरेशन यांनी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माईसाहेब यांना २५०००/- रुपये निवडणूक निधी अर्पण केला. त्यानंतर त्यांनी प्रचंड समुदायासमोर पहिल्या निवडणूक प्रसाराच्या आपल्या भाषणात सांगितले की, "एकांगी राजकारण कधीही यशस्वी होऊ शकत नाही."

२२ नोव्हेंबर १९५१ – रोजी मुंबई शेड्युल्ड कास्टस फेडरेशन आयोजित परळ येथील भोईवाडा मैदानात माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा स्वागत सोहळा संप्पंन्न झाला. या प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काँग्रेस व नेहरू अस्पृश्यांसाठी काहीच करत नसल्याचा आरोप केला.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २३ नोव्हेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, कतिको मासो, शनिवार, कार्तिक माहे.

२३ नोव्हेंबर १९२७ – रोजी सायमन कमिशनपुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची साक्ष झाली व खलीता सादर केला.

२३ नोव्हेंबर १९४० – रोजी जनता वृत्तपत्राचा प्रसार करण्यासाठी केसरी बाजार भगिनी मंडळाच्या सभासदाची यादी जनता मधे जाहीर.

*२३ नोव्हेंबर १९४८ – रोजी संविधान सभेच्या चर्चेत माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुच्छेद ३२, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८ Article 32, 33, 34, 35, 36, 37, 38 वर चर्चा केली.

२३ नोव्हेंबर १९५६ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आपल्या सहकाऱ्यांसोबत सारनाथलां भेट दिली व तेथे अस्पृश्यांच्या सभेत भाषण पण केले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २४ नोव्हेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, कतिको मासो, रविवार, कार्तिक माहे.

२४ नोव्हेंबर – रोजी बौद्ध संघ दिवस.

२४ नोव्हेंबर १९२० – रोजी सासवड येथे महार लोकांची सभा.

२४ नोव्हेंबर १९३० – रोजी बहिष्कृत भारत Bahishkrut Bharat या वृतपत्राचे नाव बदलवून जनता वृत्तपत्र असे नामकरण केले गेले. आजच्या दिवसाचे महत्त्व म्हणजे माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जनता Janata वृत्तपत्र सुरू करून, जनता वृतपत्राचा पहिला अंक देवराव विष्णू नाईक यांच्या संपादनत्त्वाखाली मुंबईतून प्रकाशित केला.

२४ नोव्हेंबर १९५६ – रोजी "बौद्धांचे आद्यकर्तव्य आहे की, त्यांनी दर रविवारी बौद्ध विहारात जावे व धंम्म चांगल्या प्रकारे समजून घ्यावां." माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सारनाथ येथील बोल.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

बौध्द संघ स्थापना दिन :–

संघ हा बुद्धांच्या शिष्यांचा आध्यात्मिक समाज होय पूर्वी होऊन गेलेला आणि सध्या अस्तित्वात असलेला, भिक्खू–भिक्खूणी आणि उपासक–उपासिकांचा बनवलेला, प्रबुद्ध आणि अप्रबुद्धांचा समावेश असलेला. संघाला अनुसरणे म्हणजे संघातील सदस्यांच्या धांम्मिक मार्गावर पुढे असणाऱ्यांच्या प्रभावास ग्रहण करणे, त्यांच्यै उदाहरणाने उत्साहित होणे आणि त्यांच्या सल्ल्यानुसार आचरणास सिद्ध असणे होय.

गौतम बुद्धांनी आपले विचार लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आपल्या अनुयायांना संघटिन करून बौद्ध संघ स्थापन केला. जे पुरूष अनुयायी या संघात प्रवेश करत त्यांना 'भिक्खू' तर स्त्री अनुयायांना 'भिक्खूणी' असे म्हणत. त्यांना आचरणाचे कडक नियम पाळावे लागतात. बौद्ध संघात सर्व जातींच्या लोकांना व स्त्रियांनाही प्रवेश आहे.

☸☸☸☸☸🔵🔵🔵🔵🔵☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २५ नोव्हेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, कतिको मासो, सोमवार, कार्तिक माहे.

२५ नोव्हेंबर – रोजी महामोग्गलायंन दिन.

२५ नोव्हेंबर १९२१ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रमाईस लंडनहून पत्र लिहतात, "पैशा संबंधाने तजवीज करीत आहे. मी अंन्नास पोरका झालो आहे."

२५ नोव्हेंबर १९३१ – रोजी लंडनमधे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मोहनदास करमचंद गांधी यांची तिसरी भेट झाली.

२५ नोव्हेंबर १९४० – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे घटना समितीत समारोपाचे भाषण.

२५ नोव्हेंबर १९४९ – रोजी संविधान सभेच्या चर्चेत माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, "राज्यघटना कितीही चांगली असो, जर ते वापरणारे लोक चांगले नसतील तर राज्यघटना हे निश्चितच वाईट असल्याचे सिद्ध होईल, आणि राज्यघटना कितीही वाईट का नसेल जर त्याला वापरणारे चांगले लोक असतील तर राज्यघटना ही नेहमी चांगलीच सिद्ध होईल."

२५ नोव्हेंबर १९५१ – रोजी शिवाजी पार्क मुंबई येथे माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सभा व त्यांचे भाषण.

२५ नोव्हेंबर १९५६ – रोजी काशी विद्यापीठात माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २६ नोव्हेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, कतिको मासो, मंगळवार, कार्तिक माहे.

२६ नोव्हेंबर – रोजी गुरू रविदास स्मृतिदिन.

२६ नोव्हेंबर – रोजी ड्रॅगन पॅलेस टेंपल दिन.

२६ नोव्हेंबर १९४९ – रोजी भारतीय संविधान दिन. माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, घटना मासूदा समितीचे अध्यक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संपूर्ण राज्यघटना भारतीय संविधान लिहून पूर्ण केले. संपूर्ण संविधान २ वर्ष ११ महिने १८ दिवसात तयार झाले. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सादर केलेली भारतीय राज्यघटना संविधान मसुदा समितीने स्वीकारली. संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्याकडून घटना निर्मिती कार्याचा मुक्तकंठाने गौरव करण्यात आला.

२६ नोव्हेंबर १९५० – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांना भारताचे संविधान अर्पण केले.

२६ नोव्हेंबर १९५१ – रोजी सर कावसजी जहांगीर हॉलमध्ये माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडणूक प्रसाराचे भाषण.

२६ नोव्हेंबर १९५१ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संसदेत सादर केलेले हिंदू कोड बिल फेटाळले गेले.

२६ नोव्हेंबर १९५६ – रोजी महाबोधी सोसायटी आयोजित सभेला सारनाथ येथील मुलगंध कुटी विहाराच्या आवारात माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚🔵🔵🔵💎 *भारतीय संविधान दिवस* 💎🔵🔵🔵🦚🦚🦚☸☸

२६ नोव्हेंबर, निमीत्त

डॉ.बाबासाहेब अंबेडकर यांचे संविधान सभेतील शेवटचे भाषण.

दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ ला संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांचे समारोपाचे भाषण होऊन त्यादिवशी भारताचे संविधान संमत झाले. त्याच्या एक दिवस आधी म्हणजे २५ नोव्हेंबर १९४९ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारतीय संविधानाचे शिल्पकार या शब्दांनी ज्यांचा सार्थ गौरव होतो, यांचे संविधान सभेत शेवटचे भाषण झाले.

घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांचे डॉ. बाबासाहेबांबद्दलचे गौरवोद्गार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची निवड किती सार्थ होती हे संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान संमत करताना केलेल्या शेवटच्या भाषणात डॉ. आंबेडकरांच्या प्रती ज्या भावना व्यक्त केल्या त्यावरुन दिसून येईल. डॉ. राजेंद्रप्रसाद म्हणतात…

"या खुर्चीत बसून संविधान सभेच्या कार्याचे मी प्रत्येक दिवशी निरीक्षण करत आलो आहे. संविधान सभेच्या मसुदा समितीवरील सभासदांनी किती उत्साहाने, चिकाटीने निनिष्ठेने कार्य पार पाडले याची खरी जाणीव अन्य कोणापेक्षाही मला अधिक आहे. विशेषत: त्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर यांनी आपल्या प्रकृतीची क्षिती न बाळगता ते काम तडीस नेले आहे. मसुदा समितीवर आणि तिच्या अध्यक्षपदी त्यांची निवड करण्याचा जो निर्णय आपण घेतला त्याच्याइतका अचूक निर्णय दुसरा कोणी घेतला नाही. त्यांनी आपल्या निवडीची यथार्थता पटवून दिली. इतकेच नव्हे, तर त्यांनी जे हे कार्य केले त्याला एक प्रकारचा तेजस्वीपणा आणला.

डॉ. राजेंद्र प्रसाद

डॉ.बाबासाहेबांचे संविधान सभेतील शेवटचे भाषण

संविधान कितीही चांगले असो, ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ते जर अप्रामाणिक असतील तर ते वाईट ठरल्याशिवाय राहणार नाही. तसेच संविधान कितीही वाईट असो, ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ते जर प्रामाणिक असतील तर ते चांगले ठरल्याशिवाय राहणार नाही. संविधानाचा अंमल हा संपूर्णत: संविधानाच्या स्वरुपावर अवलंबून नसतो. संविधान हे केवळ राज्याचे काही विभाग–

जसे की कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ, आणि न्यायपालिका निर्माण करुन देते. राज्याच्या या विभागांचे कार्य लोक आणि लोकांनी स्वत:च्या आकांक्षा आणि राजकारणासाठी साधन म्हणून निर्माण केलेले राजकीय पक्ष यावर अवलंबून राहणार आहे.

केवळ बाह्य स्वरुपात नव्हे, तर प्रत्यक्षात लोकशाही अस्तित्वात यावी अशी जर आपली इच्छा असेल, तर त्यासाठी आपण काय करायला हवे? माझ्यामते पहिली गोष्ट जी केलीच पाहिजे ती ती अशी की,

आपल्या सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आपण संवैधानिक मार्गांचीच कास धरली पाहिजे. याच अर्थ हा की, क्रांतीचा रक्तरंजित मार्ग आपण पूर्णत: दूर सारला पाहिजे. याचा अर्थ कायदेभंग, असहकार आणि सत्याग्रह या मार्गांना आपण दूर ठेवले पाहिजे. आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्टपूर्तीसाठी संवैधानिक मार्गासारखा कोणताही मार्ग शिल्लक नव्हता, त्यावेळी असंवैधानिक मार्गाचा अवलंब करण्याचे समर्थन मोठ्या प्रमाणात केले जात होते. परंतु जेव्हा संवैधानिक मार्ग उपलब्ध आहेत तेव्हा या असंवैधानिक मार्गांचे समर्थन होऊ शकत नाही. हे मार्ग इतर काही नसून अराजकतेचे व्याकरण आहे आणि जितक्या लवकर आपण त्यांना दूर सारु तेवढे ते आपल्या हिताचे होईल.

दुसरी महत्वाची गोष्ट, जिचे पालन केले पाहिजे ती अशी की, लोकशाहीच्या संवर्धनात आस्था असणाऱ्या सर्वांना जॉन स्टुअर्ट मिल यांनी दिलेला सावधगिरीचा इशारा लक्षात ठेवावा लागेल. त्यांच्या मते, "लोकांनी आपले स्वातंत्र्य कितीही मोठा माणूस असला तरी त्याच्या चरणी अर्पण करता कामा नये. तसेच त्याच्यावर इतका विश्वास ठेवू नये, की जेणे करुन त्याला प्राप्त अधिकारांचा तो लोकांच्या संस्था उदध्वस्त करण्यासाठी उपयोग करील." संपूर्ण आयुष्य देशसेवेसाठी व्यतित केलेल्या महापुरुषांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात काहीच गैर नाही. परंतु कृतज्ञता व्यक्त करण्यालाही मर्यादा असल्या पाहिजेत. आयरीश देशभक्त डॅनियल ओकॉनेल यांनी समर्पकपणे म्हटल्याप्रमाणे, "कोणताही माणूस स्वाभिमानाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करु शकत नाही, कोणतीही स्त्री स्वत:च्या शीलाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करु शकत नाही आणि कोणताही देश स्वत:च्या स्वातंत्र्याचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करु शकत नाही." इतर देशांच्या तुलनेत भारताला सावधगिरीचा इशारा लक्षात घेणे अधिक गरजेचे आहे, कारण भारतात भक्ती किंवा जिला भक्तीचा मार्ग म्हणता येईल तो किंवा विभूतीपूजा ही जगातील इतर कोणत्याही राजकारणात दिसणार नाही, इतक्या मोठ्या प्रमाणात भारतीय राजकारणात दिसते. धर्मातील भक्ती ही आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग असू शकेल. परंतु राजकारणात भक्ती किंवा व्यक्तिपूजा ही अध:पतन आणि अंतिमत: हुकूमशाहीकडे नेणारा हमखास मार्ग ठरतो.

तिसरी गोष्ट आपण केली पाहिजे की अशी, की केवळ राजकीय लोकशाहीवर आपण समाधान मानता कामा नये. आपल्या राजकीय लोकशाहीचे आपण एका सामाजिक लोकशाहीत सुद्धा परिवर्तन करायलाच हवे. राजकीय लोकशाहीच्या मुळाशी सामाजिक लोकशाहीचा आधार नसेल, तर ती अधिक काळ टिकू शकणार नाही.

*सामाजिक लोकशाही म्हणजे काय? तो एक जीवन मार्ग आहे, जो स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांना जीवनतत्वे म्हणून मान्यता देतो. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ह्या तत्वांचा एका त्रयीची स्वतंत्र अंगे म्हणून विचार करता येणार नाही. ते त्रयीचा एक संघ निर्माण करतात, ते या अर्थाने की, त्यापैकी एकाची दुसऱ्यापासून फारकत करणे म्हणजे लोकशाहीचा मूळ उद्देशच पराभूत करणे होय. समतेपासून स्वातंत्र्य वेगळे करता येत नाही. समतेशिवाय स्वातंत्र्य म्हणजे काही लोकांचे बहुतांश लोकांवर प्रभुत्व निर्माण करणे होय; स्वातंत्र्याशिवाय समता ही वैयक्तिक कर्तृत्वाला मारक ठरेल. बंधुत्वाशिवाय स्वातंत्र्य आणि समता स्वभाविकरित्या आस्तित्वात राहणार नाहीत, त्यांच्या अंमलबजावणीसाठी पोलिस यंत्रणेची गरज भासेल. भारतीय समाजात दोन बाबींचा पूर्णत: अभाव आहे ही वस्तुस्थिती मान्य करुनच आपण सुरुवात केली पाहिजे. त्यापैकी

एक समता आहे. सामाजिक क्षेत्रात आपला समाज हा श्रेणीबद्ध विषमतेच्या तत्वावर आधारित आहे. याचा अर्थ काही लोक वरच्या स्तरावर असतात तर बाकीचे निष्कृष्ट अवस्थेत असतात. आर्थिक क्षेत्रात आपल्या समाजात काहींजवळ गडगंज संपत्ती आहे, तर अनेक लोक घृणास्पद दारिद्र्यात जगतात.*

२६ जानेवारी १९५० ला आपण एका विसंगतीयुक्त जीवनात प्रवेश करणार आहोत, राजकारणात आपल्याकडे समता राहील परंतु सामाजिक आणि आर्थिक जीवनात विषमता राहील. राजकारणात प्रत्येकाला एक मत आणि प्रत्येक मताचे समान मूल्य या तत्त्वाला आपण मान्यता देणार आहोत. आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मात्र, सामाजिक आणि आर्थिक संरचनेमुळे, प्रत्येक माणसाला समान मूल्य हे तत्त्व आपण नाकारत राहणार आहोत. अशा परस्पर विरोधी जीवनात आपण आणखी किती काळ राहणार आहोत? आपण जर ती अधिक काळपर्यंत नाकारत राहिलो, तर आपली राजकीय लोकशाही आपण धोक्यात आणल्याशिवाय राहणार नाही. ही विसंगती शक्य होईल तेवढ्या लवकर आपण दूर केली पाहिजे. अन्यथा ज्यांना विषमतेचे परिणाम भोगावे लागत आहेत ते या सभेने अतिशय परिश्रमाने निर्माण केलेली राजकीय लोकशाही संरचना उदध्वस्त करतील.

आपल्यात उणीव असलेली दुसरी बाब म्हणजे बंधुत्वाचे तत्त्व मान्य करणे होय. बंधुत्व म्हणजे काय? जर भारतीय लोक एक असतील तर सर्व भारतीयांमध्ये बंधुत्वाची समान भावना असणे हे होय. हे तत्व सामाजिक जीवनाला एकता आणि एकजिनसीपणा प्राप्त करुन देते. ही बाब प्राप्त करणे कठीण आहे. ती किती कठीण आहे, हे संयुक्त राष्ट्र अमेरिकेविषयी जेम्स ब्राईसने त्याच्या अमेरिकन कॉमनवेल्थ या खंडात सांगितलेल्या गोष्टीवरुन कळून येईल. ब्राईसच्याच शब्दात मी उद्धृत करु इच्छितो, ती घटना अशी–

"काही वर्षापूर्वी अमेरिकन प्रोटेस्टंट एपिस्कोपल चर्चच्या त्रैवार्षिक अधिवेशनात सामुदायिक प्रार्थनेत फेरबदल करण्याचा प्रसंग आला. प्रार्थना लहान वाक्यांची करुन त्यात सर्व लोकांसाठी असेलल्या प्रार्थनेचा समावेश करणे योग्य होईल असा विचार करण्यात आला आणि न्यू इंग्लंडच्या प्रमुख धर्मोपदेशकाने पुढील शब्द सुचविले, "हे प्रभो, आमच्या राष्ट्राला आशीर्वाद दे." उत्स्फूर्तपणे ते त्या दिवशी मान्य करण्यात आले. या वाक्यावर दुसऱ्या दिवशी पुन्हा विचार करण्यात आला. धर्मोपदेशकांव्यतिरिक्त इतर अनेकांनी 'राष्ट्र' या शब्दावर आक्षेप घेतले. त्यांच्या मते या शब्दामुळे संपूर्ण राष्ट्राचे ऐक्य प्रत्यक्षात नसले तरी स्पष्टपणे सूचित होते. त्यामुळे तो शब्द गाळण्यात आला आणि "हे प्रभो, संयुक्त राज्यांना आशीर्वाद दे." या शब्दांचा स्वीकार करण्यात आला."

ही घटना घडली त्यावेळी अमेरिकेतील लोकांमध्ये एकत्वाची भावना इतकी कमी होती की, आपण एक राष्ट्र आहोत असे अमेरिकेच्या लोकांना वाटत नव्हते. जर अमेरिकेच्या लोकांमध्ये आपण राष्ट्र आहोत ही भावना निर्माण होऊ शकली नाही तर भारतीयांनी आपण एक राष्ट्र आहोत हे समजणे किती कठीण आहे हे कळून येईल. मला ते दिवस आठवतात जेव्हा राजकारणाने प्रेरित लोकांना 'भारतीय लोक' या शब्दाची चीड येत असे. भारतीय राष्ट्र म्हणणे ते पसंत करत असत. मी या मताचा आहे की आपण एक राष्ट्र आहोत यावर विश्वास ठेवणे म्हणजे जे अस्तित्वात नाही ते अस्तित्वात आहे असा समज बाळगण्यासारखे होईल. हजारो जातींमध्ये विभागलेल्या लोकांचे राष्ट्र कसे बनू शकेल? सामाजिक आणि मानसिकदृष्ट्या अजूनही आम्ही एक राष्ट्र नाही याची आम्हाला जेवढ्या लवकर जाणीव होईल तेवढे ते आमच्या हिताचे ठरेल. त्यांनतरच एक राष्ट्र होण्याच्या गरजेचा आम्ही गांभीर्याने विचार करु शकू. या ध्येयाप्रत पोहोचणे अतिशय कठीण आहे. अमेरिकेत जातीची समस्या नाही. भारतात जाती आहेत. जाती या राष्ट्रविरोधी आहेत. पहिली गोष्ट त्या समाज जीवनात विभागणी करतात. त्या राष्ट्रविरोधी आहेत कारण त्या जाती–जातीमध्ये मत्सर व तिरस्काराची भावना निर्माण करतात. आम्हाला वास्तवात जर राष्ट्र व्हायचे असेल तर या सर्व अडथळ्यांवर आम्ही मात केलीच पाहिजे. राष्ट्र निर्मिती नंतरच बंधुत्व वास्तवात पाहावयास मिळेल. बंधुत्वाशिवाय असलेली समता आणि स्वातंत्र्य म्हणजे रंगाच्या वरवरच्या थरांसारखा केवळ बाह्य देखावा असेल.

स्वातंत्र्य ही आनंदाची बाब आहे याबद्दल शंका नाही. परंतु या स्वातंत्र्याने आपल्यावर फार मोठ्या जबाबदाऱ्या टाकलेल्या आहेत याचा आपण विसर पडू देता कामा नये. या स्वातंत्र्यामुळे, कोणत्याही वाईट गोष्टीसाठी आपल्याला आता इंग्रजांवर दोषारोपण करता येणार नाही. यापुढे जर काही वाईट घडले, तर त्यासाठी आपल्याशिवाय इतर कुणालाही दोषी धरता येणार नाही. अनुचित घटना घडण्याचा मोठा धोका आहे. काळ वेगाने बदलतो आहे. आपले लोकसुद्धा, नवनवीन विचारप्रणालींचा मागोवा घेत आहेत. लोकांच्या राज्याचा आता त्यांना कंटाळा येऊ लागला आहे. आता त्यांना लोकांसाठी राज्य हवे आहे आणि राज्य लोकांचे व लोकांनी निवडलेले आहे किंवा नाही याची चिंता ते करणार नाहीत. ज्या संविधानात आपण लोकांचे, लोकांकरिता निवडलेले शासन या तत्त्वाचे जतन केले आहे ते तर आपल्याला सुरक्षित ठेवायचे असेल, तर आपल्या मार्गात कोणते अडथळे येणार आहेत ते आपण ओळखले पाहिजेत, की जेणेकरुन लोकांनी निवडून दिलेल्या सरकारच्या तुलनेत लोकांसाठी असलेल्या सरकारला लोक प्राधान्य देण्याकडे वळतील. यासाठी पुढाकार घेण्यात आपण दुर्बल ठरता कामा नये. देशाची सेवा करण्याचा हाच एकमेव मार्ग आहे. दुसरा अधिक चांगला मार्ग मला माहीत नाही.

……………………

टिपः वरील भाषण संपादित स्वरुपात आहे.

(स्रोत: डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८, भाग ३– १९४६ ते १९५६.)

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐

प्रत्येक रविवारी (आदिच्चवारो) बुद्धविहारात – बुद्धलेणी गेलेच पाहिजे – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐

सब्ब पापस्स अकरणं कुसलस्स उपसंपदा। *सचितपरियोदपनं में एतं बुद्धान सासनं।*

धन्यवाद, सविनय जयभीम *सर्वांचे मंगल हो, सबका मंगल हो, Be Happy*

☸☸☸☸🔵🔵🔵🔵🔵☸☸☸☸☸

भारतिय संविधानाचा इतिहास व त्याची अनिवार्यता :

सर्व मनुष्यप्राणी जन्माने स्वतंत्र, प्रतिष्ठा, आणि हक्क या द्रुष्टीने sam, समसमान आहेत.

दुसऱ्या महायुद्धा नंतर UNO.ची स्थापना २४ ऑक्टोबर, १९४५ न्यूयॉर्क, अमेरिका येथे करण्यात आली, व त्यामध्ये मानवी स्वातंत्र्याचा पवित्र अधिकार अबाधित राहिला पाहिजे, तसेच कोणतेही राष्ट्र एक–दुसऱ्या राष्ट्रावर सत्ता किंवा वर्चस्व स्थापन करणार नाही, तसेच सर्व मनुष्यप्राणी जन्माने स्वन्तंत्र, प्रतिष्ठा आणि हक्क या द्रुष्टीने समसमान आहेत हा महत्वपुर्ण जाहिरनामा UNO मधे पास करण्यात आला.

संविधान अध्ययनाची अनिवार्यता :

मानव हे समाज करुन एकत्र रहात असल्यामुळे त्यांच्या स्वातन्त्र्यावर काही मर्यादा आल्या आहेत, जिविताची व विकासाची हमी, शांतता व सुव्यवस्था असलेले नागरी जिवन, जुल्मी शक्तीच्या अन्याय–अत्याचार व शोषणापासुन स्वरक्षणाची हमी तसेंच निर्णय प्रक्रियेत महत्तम सहभाग, शांततामय सहजिवन प्रदान करने.

प्राचीन भारतिय विधी व्यवस्था :

प्राचीन भारतातील विधीव्यवस्थेवर दोन विचारधारेचा मुख्य प्रभाव होता. १) वैदिक विचारधारा २)अवैदिक विचारधारा.

वैदिक विचारधारा म्हणजे जे धर्म ग्रंथात नमुद केले आहे, राजाचे किंवा राज्य सन्थेचे कार्य धर्माचे पालन करणे, धर्म म्हणजेच कायदा व कायदा म्हणजेच धर्म असी ही सन्कल्पना होती.

अवैदीक विचारसरणी ही लोक तान्त्रीक किंवा गणात्मक राज्यसंस्थेकडे कल दर्शविणारी आहे. लोककल्याण, लोकसहभाग, मानवी समानतेचा पूरस्कार, राजाचे प्रथम कर्त्यव हे लोककल्याण करणे ठरते की, जे सम्राट अशोकानी केले त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी खंड तीन मध्ये कूटदंत सूत्त, अंबथ सुत्त यामध्ये कल्याणकारी राज्य व्यवस्था निर्माण करणे करिता राजाचे कर्तव्य कसे असायला पाहिजे हे नमूद केले आहे.

१६०० ची सनद :

३१ डिसेंबर, १६०० मधे ईस्ट इंडिया कंपनी भारतात आली व महाराणी एलिझाबेथ हिने कपंनिची घटणा, हक्क, आणि विशेषाधिकार बहाल केले. त्याला चार्टर ऑफ़ १६०० असे म्हणतात.

१७७३ चा नियामक कायदा :

या कायद्याद्वारे काही महत्वपुर्ण परिवर्तन करण्यात आले, कंपनीचे अधिकार संपविण्यात आले व त्या ऐवजी कंपनीला ब्रिटिश संसदेप्रति जबाबदेह ठरविण्यात आले.

१७९३ चा सनद कायदा :

या कायद्याने न्यायालयीन पध्दतीत महत्वाचे फेरबद्दल करण्यात आले. न्यायदान व महसूल याकरीता स्वंतत्र यंत्रना उभारण्यात आली कारण ब्रिटिशांना राज्य कारभार करणे करिता निधीची आवश्यकता भासू लागली.

१८१३ सनद कायदा :

या कायद्याद्वारे कर बसविने, जकात वसुली करणे, भारतात साहित्य, संस्कृति, शिक्षण, व विज्ञान विकसित करण्यावर भर देण्यात आला व क्रिस्चियन धर्मप्रचारकाना भारतात धर्म प्रचाराची व प्रसाराची अनुमती देण्यात आली.

१८३३ चा सनद कायदा :

या कायद्याद्वारे गवर्नर जनरल ऑफ इंडिया हे पद निर्माण करण्यात आले, नागरी, आणि सैनिकी प्रशासन तसेच कर निर्धारण, कायदा व सुवव्यस्था अबाधित ठेवण्याकरिता सदस्य नेमण्यात आले, तसेच गुलामी व वेठबिगारप्रथा बेकायदेशीर ठरवून बंद करण्यात आली.

१८५३ चा सनद कायदा :

हा अंतीम सनद कायदा होय, ब्रिटिश संसदेमधे भारताकरिता कायदे करणे, विधी विषयक काम काजाकरिता सदस्य नेमणे.

१८५८ भारत सरकार अधिनियम अक्ट : ईस्ट इंडिया कंपनीचे सर्व अधिकार काढून घेतले व कंपनी बंद करण्यात आली.

१८५८ च्या इंग्रजांविरुद्धच्या उठावानंतर भारतातील संविधानीक कायद्यामधे अमुलाग्र बदल करण्यात आला. या कायद्यानुसार कंपनीच्या ताब्यात जेवढा भूभाग होता, त्याचे ब्रिटिश राजसत्तेने अधीग्रहन केले व भारताच्या प्रशासनाचा प्रत्यक्ष ताबा घेतला व प्रशासकिय प्रमुख म्हणून भारत मंत्री हे पद निर्माण करण्यात आले. यालाच राणीचा जहिरनामा असेही म्हणतात. या घोषणेनुसार भारतिय जनतेला आश्वासन देण्यात आले की, त्यांच्या धार्मिक श्रद्धा आणि रीतिरिवाज यामधे हश्तक्षेप केला जानार नाही, परंतु कायद्यासमोर सर्व समान असतील. (नुकताच सत्यशोधक या सीनेमात एका लहान मुलीचे देवा बरोबर लग्न करण्याकरिता निघालेली वरात व महात्मा ज्योतीराव फुले जेंव्हा यांची तक्रार करणेकरिता व लग्न रद्द करण्याकरिता पोलीस स्टेशनला जातात, तेंव्हा पोलीस ऑफिसर म्हणतो की, हा राणीचा आदेश आहे, धार्मिक रीतीरिवाजात हस्तक्षेप केला जाणार नाही.) परंतु जर कोणी आम्हाला संरक्षण मागितले तर त्यावर कार्यवाही केल्या जाईल, जाती, धर्म आणि वंशाच्या आधारावर भेदभाव केला जाणार नाही.

भारतात उध्योगधंध्याना प्रोत्साहन दिले जाईल, तसेच लोकहिताच्या कार्यांना प्राधान्य देण्यात येईल.

भारतिय परिषद अधीनियम अक्ट १८६१.

या अधिनियमाचे तीन मुख्य ऊद्देश होते.

१. गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळाचा विस्तार करणे.

२. मुंबई प्रेसिंडेसी व मद्रास प्रेसिडेंसी याना कायदे करण्याची शक्ती प्रधान करणे.

३. अन्य प्रांतामधे विधीमंडळे स्थापन करणे.

भारतिय परिषद अधिनियम १८९२.

कायदे करण्याची शक्ती असलेलि विधीमंडळे स्थापन करणे व त्याना अधिकार बहाल करणे या संबधी हा अधिनियम विशेष उल्लेखनीय आहे. बजेटवर चर्चा करण्याची व लोक हिताच्या प्रकरणासंबधी प्रश्न सुद्धा विचारण्याची परवानगी देण्यात आली.

मार्ले मिन्टो सुधारणा १९०६ ते १९०८.

या सुधारणा कायद्यानुसार प्रशासकीय परिषदामधे भारतियाचा समावेश व्हावा, स्थानिक स्वराज्य पध्दतीचा विकास केला जावा, असे ठरविले गेले.

भारतिय परिषद अधिनियम १९०९.

या अधिनियमाद्वारे विधिमंडळाची सदस्य संख्या वाढविण्यात आली. निवडणुकाना मान्यता देण्यात आली. या अधिनियमाने सर्व प्रथम मुसलमानांच्या स्वतंत्र निर्वाचन मंळाळाला मान्यता दिली, प्रांतीक विधीमंडळातिल ब्रिटिश सरकारचा एकाधिकार संपुष्ठात आला होता. शेतकरी, कामकरी, बहूजन, शूद्र व अतिशुद्र सोडून इतर समाज प्रांतीक विधीमंडळात प्रतिनिधित्वा करिता कशोशिने प्रयत्न करीत होते. राजर्शी शाहू महाराज व पेरियार रामास्वामी नायकर यानी मात्र या वंचित लोकांच्या प्रतिनिधीत्वाकरिता कशोषिने प्रयत्न केले.

क्रमिक स्वातंत्र्याची घोषणा :

२० अगस्त, १९१७ रोजी ब्रिटिश सरकारने घोषणा केली की, भारताला क्रमा–क्रमाने स्वातंत्र्य दिले जाईल, परंतु राणीच्या जाहिर नाम्यानुसार धार्मिक व सामाजीक रितीरिवाजानुसार धार्मिक ग्रंथ मनूस्मृति याना आपोआपच मान्यता मिळाली होती. तसेच मुस्लिम, शिख, अंगलोइंडियन व भारतिय क्रिस्चियन याना त्यांच्या धार्मिक सामाजीक आधारार वेगळे निर्वाचन संघ देण्याचे मान्य करण्यात आले, तसेच मद्रास (चेंन्नई) प्रांतात ब्राम्हनेत्तराकरिता व मुंबई प्रांतात मराठ्याकरिता आणि अश्पृश्याकरिता सुद्धा राखीव जागा ठेवण्याच्या सिन्धाताला मान्यता देण्यात आली.

भारत सरकार अधिनियम १९१९ :

या कायद्यानुसार भारतिय विधानपरिषद व भारतिय विधीमंडळ म्हणून ओळखले जाणार होते. गवर्नल जनरल आणि त्याच्या अधिन दोन सभागृह १) राज्यपरिषद (Counsil of State) आणि केंद्रीय विधीमंडळ (Central Legislative Asembly)

२२ मार्च, १९२० मानगाव व नागपुर बहीस्कृत वर्ग परिषद :

भावी कायदे परिषदेत बहिस्कृताचे प्रतिनिधी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात व गरजेच्या प्रमाणात त्यांच्या स्वतन्त्र मतदार संघातून निवडून यावे असी हक्काची मागणी या परिषदेत करण्यात आली. आणि लॉर्ड साउथ बेरो कमीशनला निवेदन दिले तसेच अश्पृश्यानी अपल्या राजकिय हक्काची मागणी ब्रिटिशापुढे ठेवण्यास राजर्शी शाहू महाराज यांना मध्यस्त केले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुढिल शिक्षणाकरिता लंडन येथे गेले व तिथे त्यांनी Montegue Chemsford यांची भेट घेतली. ज्यावेळी सुधारणा विधेयक तयार होत होते, त्यावेळी शेतकरी, कामकरी, अश्पृश्य या समुदायाबद्दल कोणीच चर्चा करित नव्हते, त्या महत्वाचे वेळी अश्पृश्य चळवळ व त्याचे राजकिय हक्क या बदल निवेदन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यानि विध्यार्थी असताना दिले.

३ फेब्रुवारी, १९२८ सायमन कमीशन :

१९१९ च्या भारतिय अधिनियमात तरतुद होती की दर १० वर्षानी भारतातील लोक नियुक्त संस्थाची प्रगतीबाबत एक कमीशन नियुक्त करावे व त्याचा आढावा घ्यावा. याच कमिशनच्या आधारे १९२७ मधे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मुंबई विधीमंडळाचे सदस्य म्हणून नामनियुक्त करण्यात आले होते. ३ फेब्रुवारी, १९२८ ला सायमन कमीशन भारतात आले त्यावर बहिस्कार टाकण्यात आला म्हणून ते परत गेले व पुढे ऑक्टोबर, १९२८ मध्ये भारतात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतिय नागरिकाकरिता सुधारणा विषयक निवेदन दिले.

नेहरु घटना समिती :

फेब्रुवारी, १९२८ ते ऑगस्ट, १९२८ भावी भारतिय संवीधानाचा आराखडा तयार केला. शेतकरी, कामगार आणि अश्पृश्य यांच्या प्रतिनिधींना मात्र बोलाविले नाही.

१२ नोव्हेंबर, १९३० प्रथम गोलमेज परिषद :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दिवान आर श्रिनिवासन यांना अश्पृश्याचे प्रतिनिधीत्व करण्याचा मान मिळाला व प्रथमच हिन्दुपासुन अशपृश्याचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करण्यात आले, एवढेच नव्हे तर संविधान निर्मिती पूर्वी त्यांच्याशी विचार विनिमय करणे बंधनकारक करण्यात आले व त्याला मान्यता देण्यात आली.

१७ ऑगस्ट, १९३२ जातीय निवाडा :

या दिवसी जातीय प्रतिनिधीत्वाच्या प्रश्नावर ब्रिटिश प्रधानमंत्र्यांचा निवाडा प्रसिद्ध झाला, या कायद्यानुसार अश्पृश्याना त्याच्या करिता विशेष राखीव मतदारसंघाच्या माध्यमातून प्रतिनिधित्व दिले जाणार होते व या मतदार संघामधे केवळ तेच मतदान करु शकत होते.

२५ सप्टेंबर, १९३२ पुणे करार :

या कायद्यानुसार राखीव मतदार संघाच्या एवजी संयुक्त मतदार संघाला मान्यता देण्यात आली.

१९३३, स्वेत पत्र :

या स्वेत पत्राच्या आधारे १९३५ चा भारत सरकार अधिनियम पारित करण्यात आला. न्यायालय, रिझर्व बँक, रेल्वे यांची स्थापना केली जाईल असे घोषित करण्यात आले. प्रॉब्लेम आफ द रूपी या अर्थ विषयक ग्रंथाच्या आधारावर रिझर्व बँक ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली.

१९३५ चा भारत सरकार अधिनियम :

सायमन कमीशन, तीन गोलमेज परीषदा या पार्श्वभूमीवर १९३५ चा कायदा अस्तित्वात आला, याच अधिनियमानुसार लोकनियुक्त प्रांतीक सरकारे अस्तित्त्वात येण्याचा मार्ग मोकळा झाला. या अधिनियमाने ब्रिटिशाच्या ताब्यातील प्रांत व राजे रजवाडे यांची संस्थाने मिळुन भारताला संघीय (federal) राष्ट्र असे स्वरुप दिले.

या अधीनियमा नुसार भारता करिता कायदे करण्याकरिता २६० सदस्यांची स्थायी समिती नियुक्त करण्यात आली.

२३ मार्च १९४२ क्रिप्स योजना :

या योजनेत अश्पृश्याच्या राजकिय प्रतिनिधित्वाला स्थान नव्हते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर याना विचारन्यात आले की, स्वतंत्र्य मजुर पक्ष हे अश्पृश्ययांची कसी काय बाजू मांडू शकतात? असा तान्त्रीक प्रश्न निर्माण झाला होता, म्हणून स्वतंत्र्य मजुर पक्ष बरखास्त केला.

१८, १९, २० जुलै, १९४२ नागपूर अधिवेशन :

शेड्युल कास्ट फेडरेशनची स्थापना करण्यात आली, प्रथमच भारतीय घटना निर्माण करण्याविषयी ठराव पास करण्यात आला, क्रिप्स योजना रद्द करण्यात आली, महिलांना घटस्फोट घेण्याच्या ठराव पास करण्यात आला, समाजामध्ये महिला विषयी ज्या वाईट चालीरीती होत्या त्या रद्द करण्यात आल्या, महिलांना बिडी कारखान्यात, रेल्वे, महानगर पालिकेत नियुक्ती करण्याचा ठराव पास करण्यात आला, २१ दिवसाची भरपगारी रजा मंजूर करण्यात आली, काम करतेवेळी जर कामगारांचा मृत्यू झाला तर पाल्याना नोकरीवर ठेवण्याविषयी ठराव पास करण्यात आला व पेन्शन योजना लागू करण्यात आली.

६ मे, १९४५ घटणा कोनी तयार करावी :

भारतिय लोकांनी, भारतिय लोकांसाठी, भारतिय लोकांच्या ईच्छेनुरुप, भारतिय जनतेची अनुमती घेऊन घटना तयार करावी असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यानी जाहिर केले.

घटनेची मुलतत्वे :

१) बहुसंख्याकांचा राज्यकारभार तात्विक दृष्ट्या ग्राह्य नसुन व्यवहारिक दृष्ट्या अन्यायकारक आहे, बहूसंख्य जमातीला प्रतिनीधीत्वाच्या द्रुष्टीने सापेक्ष बहुसन्ख्यत्व देता येणार नाही.

२) जागेची विभागणी अश्या प्रकारे केली पाहिजे की, बहूसंख्य जमात व इतर कोणतेही एक प्रतिष्ठित अल्पसंख्य जमात यांच्या एकजुटीमुळे बहूमत तयार होता कामा नये.

३) जागेची विभागणी अश्या प्रकारे केली पाहिजे की, बहूसंख्याकावर अवलंबून न राहता अल्पसंख्य जमातीने आपली एकजूट केली तर त्याना स्वताचे सरकार प्रस्थापित करता यावे.

४) बहूसंख्य जमाती कडून ज्या जागा काढून घेण्यात आल्या आहेत, त्याची अल्पसंख्यक जमातीमधे व्यस्त प्रमाणात विभागणी केली पाहिजे.

कॅबिनेट मीशन :

भारतात राजकिय पक्षाच्या सहाय्याने व्हाईसरायचे कार्यकारी मंडळ निर्माण करुन घटणा तयार होइपर्यत भारताचा राज्यकारभार त्या मंडळातर्फे चालविणे, ब्रिटिश प्रधानमंत्री एटली नी १५ मार्च, १९४६ ला पार्लमेन्टमध्ये मंत्रिमंडळाची नेमणूक केल्याची घोषणा केली, यालाच Cabinet Mission असे म्हणतात.

अंतरीम सरकार :

२४ ऑगस्ट, १९४६ ला पहील्यां अंतरीम सरकारची स्थापना करण्यात आली. यामधे पण्डित जवाहरलाल नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. राजेंद्र प्रसाद, आशफ अली,

शरत चंद्र बोस, डॉ. जॉन मथाई, सर शफान अहमद खा, जगजिवनराम, सरदार बल्देव सिंग, सय्यद अली जहीर, सी .राजगोपालाचारी आणि डॉ. होमि भाभा हे सदस्य होते.

माउंटबेटन योजना :

३ जुन, १९४७ रोजी लॉर्ड माउंटबेटन यानी घोषणा केली की, विध्यमान संविधान सभेद्वारे तयार करण्यात आलेले संविधान हे अनिच्छूक भागावर लादले जाऊ शकत नाही, जे विभाग आपली वेगळी संविधान सभा तयार करु इच्छीत होते, त्याना त्याची अनुमती दिली जाईल असे ठरवीण्यात आले.

भारतिय स्वतंत्रता अधिनियम १९४७ :

लॉर्ड माउंटबेटन या योजनेच्या आधारे ब्रिटिश संसदेने भारतिय स्वतंत्र्यता अधिनियम १५ अगस्त, १९४७ पास केला व भारत आंणि पाकिस्थानची फाळणी करण्याचे निश्चित केले.आणि भारतावरिल ब्रिटिशांची सत्ता आणि राजे रजवाडे यांच्या संस्थांनावरिल अधिसत्ता संपणार होती. त्याना संविधान निर्माण करण्याचा संपूर्ण अधिकार होता, ब्रिटिश संसद त्यामध्ये हश्तक्षेप करु शकत नव्हती.

संविधान सभा :

संविधान सभेकरीता ज्या निवडणुका घेण्यात आल्या होत्या त्यात शेड्युल कास्ट फेडरेशनचा पराभव झाला, अपवाद फक्त जोगेन्द्रनाथ मंडल हे बंगाल प्रांतातून विजयी झाले होते, परंतु आपल्यापेक्षा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संविधान सभेत जास्त गरज आहे, म्हणून त्यानी राजीनामा दिला व पुन्हा निवडणूक घेण्यात आली व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सर्वात जास्त मताने निवडून आणले.

संविधान सभेने ९ डिसेंबर, १९४६ रोजी स्वतंत्र भारताच्या संविधान निर्मितीच्या कार्याला प्रारंभ केला. एकुण सदस्स्य संख्या २९६ होती परंतु २०७ सदस्स्य ऊपस्थित होते, जे अनुपस्थित होते ते सर्व मुस्लिम लीगचे होते. १७ डिसेंबर, १९४६ ला डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी अचानकपने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना देशाचे संविधान या बद्दल १० मिनिटे भाषण करण्यास सांगितले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संसदेमधे ऐतिहासिक भाषण झाले, त्या भाषणाचा एवढा प्रभाव पढला की, ज्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे करिता संविधान सभेचे सर्व दरवाजे, खिडक्या व तावदाने बंद होत्या, परंतु त्या भाषणामुळे असी परिस्थिती निर्माण झाली की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशिवाय संविधान निर्माण होऊच शकत नाही; असी सर्वांची खात्री झाली, म्हणून डॉ. राजेंद्र प्रसाद यानी मुंबई प्रांताकडे आदेश दिला की काहीपण करा परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर याना संविधान सभेत पाठवा, कारण त्यांचेशिवाय संविधान पुर्ण होउच शकत नाही, त्यांच्या विद्वत्वेची देशाला अत्यंत गरज आहे असे प्रतिपादन केले, कारण भारत पकिस्थानची फाळणी झाल्यामुळे ज्या बंगाल प्रांतातून निवडून आले होते तो भाग पाकिस्थानमधे गेल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान सभेचे सदस्य संपूष्टात आले होते.

जुलै, १९४७ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना संविधान सभेवर केवळ विद्वत्तेच्या आधारे पुनरनिर्वाचित करण्यात आले व २९ अगस्त, १९४७ रोजी संविधान सभेच्या अध्यक्ष पदी नियुक्त करण्यात आले.

गुरुवार दिनांक ४ नोव्हेबर, १९४८ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यानी संविधान सभागृहात संविधानाचा मसुदा विचारार्थ प्रस्तुत केला. त्याला प्रथम वाचन असे संबोधण्यात आले. दूसरा मसुदा १५ नोव्हेंबर, १९४८ ला प्रस्तुत केला व त्यावर चर्चा १७ ऑक्टोबर, १९४९ ला समाप्त झाली, त्याला दुसरे वाचन असे संबोधण्यात आले. तिसरे वाचन करण्याकरिता १४ नोव्हेंबर, १९४९ ला संविधान सभा पुन्हा भरली व २६ नोव्हेंबर, १९४९ ला संपली, त्याला तिसरे वाचन असे संबोधण्यात आले, व त्यानंतर संविधान स्वीकृत झाले असे घोषित करण्यात आले व त्यावर संवीधान सभेच्या अध्यक्षानी तसेच इतर सभासदांनी स्वाक्षरी केली, व याच दिवसी संविधान देशाला अर्पण करण्यात आले, याला भारतीय संविधान दिन किंवा राष्ट्रीय विधी दिन असे संबोधण्यात आले, म्हणून या दिवसी भारतिय राज्य घटनेची ऊद्देशीका यांचे वाचन केले जाते.

भारतीय राज्य घटनेचा अंमल प्रत्यक्ष लागू झाला तो दिवस म्हणजे २६ जानेवारी, १९५० होय, याला प्रजासत्ताक दिन असे संबोधण्यात आले.

७६ व्या संविधान दिनांच्या सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा.

– शामराव सोमकुवर – ९९२०१२०२७४.

– संदर्भ : भारताचे संविधान शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संपादक व प्रकाशक प्रदीप गायकवाड. –

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २७ नोव्हेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, कतिको मासो, बुधवार, कार्तिक माहे.

२७ नोव्हेंबर १९२७ – रोजी महात्मा फुले यांचा महाराष्ट्रात शत सांवत्सरिक उत्सव साजरा.

२७ नोव्हेंबर १९२७ – रोजी सोलापूर येथील सोलापूर जिल्हा वतनदार महार परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनामध्ये 'अस्पृश्योंन्नतिचा आर्थिक पाया' या विषयावर माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विचार मांडले.

२७ नोव्हेंबर १९४२ – रोजी नवी दिल्ली येथे आयोजित भारत कामगार परिषदेच्या ७ सातव्या अधिवेशनात माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कारखान्याचे कामकाजाचा कालावधी १४ तासांवरून कमी करून ८ तासांवर आणला. तेव्हापासून भारतात दररोज काम करण्याचे सुमारे ८ तास असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतातील कामगारांचे मुक्तिदाता आहेत.

२७ नोव्हेंबर १९४४ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबईहून पुण्याला आगमन झाले. पुण्यात गीता, वेद आणि बौद्ध धंम्म यावर विवेचन झाले.

२७ नोव्हेंबर १९४५ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली सातवी हिंदी भारतीय कामगार परिषद संप्पंन्न झाली.

२७ नोव्हेंबर १९५० – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य सत्कार महाराष्ट्र भवन दिल्ली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २८ नोव्हेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, कतिको मासो, गुरूवार, कार्तिक माहे.

२८ नोव्हेंबर १८९० – रोजी समाज क्रांतीचे आद्यप्रवर्तक, सत्यशोधक समाजाचे संस्थापक क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले स्मृतिदिन निमित्त विनम्र अभिवादन.

२८ नोव्हेंबर १८९३ – रोजी सर अलेक्झांडर कनिंगहॅम यांचा स्मृतिदिन.

२८ नोव्हेंबर – रोजी ड्रॅगन पॅलेस मेळावा, कामठी.

२८ नोव्हेंबर १९४७ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, "पाकिस्तानातील अनुसूचित जातीच्या लोकांनी भारतात यावे."

२८ नोव्हेंबर १९४८ – रोजी हिंदू कोडबिल मंजूर करण्यासाठी वचनबद्ध आहोत अशी पंतप्रधान नेहरूंची घोषणा.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚🔵🔵🔵💎 *क्रांतीसुर्य म. ज्योतिबा फुले... यांचे सामाजिक कार्य* 💎🔵🔵🔵🦚🦚🦚☸☸

महात्मा फुले यांचे कार्य हे माणुसकीच्या सुगंधासाठीच होते. ११ मे १८८८ रोजी मुंबईच्या मांडवी येथील कोळीवाडा सभागृहात हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून सामान्य जनतेने ज्योतिरावांना महात्मा ही पदवी दिली. यावरून त्यांचे मोठेपण लक्षात येते.

म. फुले यांच्यावर प्रभाव

थॉमस पेन, संत तुकाराम महाराज यांचे अभंग, संत कबीरांचे दोहे, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या साहित्याचा व कार्याचा त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात प्रभाव होता.

१७४७ ते १७६१ या बारा वर्षाच्या काळात मनुस्मृतीनुसार शासन व्यवस्था पेशव्यांनी लागू केली. त्यामुळे दीर्घकाळ समाज व्यवस्थेवर वाईट परिणाम झाला. वेद ईश्वरनिर्मित सांगून, माणसा–माणसात भेद निर्माण केला. चातुरवर्णी व्यवस्था त्यामुळे बळकट झाली. शुद्रांचे फार हाल झाले. फक्त सेवा करणे त्यांना भाग पडले.

म. फुले म्हणतात, *वेद ईश्वर निर्मित नसून मानवनिर्मित आहेत जो निर्मीक आहे तो भेद करणारच नाही."*

निसर्गात समानता आहे. सूर्य, चंद्र सर्वांनाच प्रकाश देतात हवा सर्वांनाच मिळते. असे ते स्पष्ट करतात.

मनुस्मृतीचा धिक्कार

विषमतेचे मूळ शुद्रांना दुःख, दारिद्र्य देणारा, भेदभाव करणारा ग्रंथ हा मनुस्मृती आहे असे ते म्हणतात.

मनुस्मृति आहे पाखंडाची मुळी!

गिरवनाची तळी पळे!

विद्या शिकणे मग**गप्पा

मनुमत कापा तुम्ही सर्व!!

पक्षपाती मनू नेत्री सलतात कानू!

मांग, महार ,निंदा ठावी नाही व्यथा!

जाळी आले ग्रंथ अग्नीमध्ये!

मानवामध्ये भेद करणारा हा ग्रंथ जाळावा असे ते म्हणतात.

शिक्षण हे समाज सुधारण्याचे प्रवेशद्वार आहे असे म. फुले यांचे शिक्षण विषयी मत होते.

विद्या विना मती गेली! मतीविना नीती गेली! तिथी विना गती गेली! गतीविना वित्त गेले! वित्तविना शुद्र खचले! इतके अनर्थ एका अविद्येने केले!!

शिक्षणाने उद्धार होतो व शिक्षण नसल्याने अधोगती होते म्हणून त्यांनी शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले समाज व्यवस्था विषमतत्त्वावर असल्याने वरिष्ठ जातीलाच अधिकार होते. त्यामुळे धनमान सौख्य हे सहज त्यांना प्राप्त होते. त्यामुळे शूद्रांना वरील गोष्टी मिळवण्यासाठी शिक्षण महत्वाचे होते. म्हणून शुद्रांसाठी शाळा काढल्या. मुलींसाठी शाळा काढल्या.

शूद्र अज्ञानामुळे काबाड–कष्टाने जीवन जगत होते. त्यांचे दारिद्र्य त्यांनी जवळून पाहिले होते. त्यांची परिस्थिती बदलण्यासाठी शिक्षण देणे हे महत्त्वाचे होते. म. फुले दूरदृष्टीचे क्रांतिकारक कर्ते सुधारक होते. त्यांच्या कार्यावरून स्पष्ट होते. शाळा काढताना त्यांना खूप त्रास झाला. उच्चवर्णीयांनी खूप त्रास दिला. स्वतःच्या पत्नीला सावित्रीबाईंना शिक्षण देऊन, शिक्षिका बनविले. पुढे त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात खूप कष्ट केले. *आदर्श मुख्याध्यापिका* झाल्या. त्यांचा भव्य सत्कारही झाला. मुलांना शिक्षण देताना त्यांनाही खूप त्रास झाला. सत्य-असत्य योग्य-अयोग्य, न्याय–अन्याय.. याची शिक्षणामुळे जाणीव होते. म्हणून शिक्षण देणे हे फार गरजेचे आहे असे म. फुले म्हणत.

पुढे महाराष्ट्रात अनेक समाजसुधारकांनी शिक्षण संस्था काढल्या.

म. फुले यांचे समग्र वांग्मय हे केवळ मनोरंजनासाठी नाही.. तर ते परिवर्तनीय साहित्य आहे. अंतर्मनात तळमळ असल्यानेच असे साहित्य निर्माण झाले आहे. विषमता धारण करणाऱ्या ब्राह्मण्यवादावर जरी त्यांनी जळजळीत लेख लिहिले असले तरी, गणेश पटवर्धन, भाऊ दाजी, गंगाधर शास्त्री, लोकहितवादी, गोवंडे, वाळवेकर, भिडे या ब्राह्मण मित्रांचे त्यांना नेहमी सहकार्य मिळत असे. फुले त्यांना धन्यवाद ही देत असत.

म. फुले यांच्या लेखनात निरागसता आहे. दांभिकपणा नाही. सत्यता आहे. म्हणून परखडपणा दिसतो. दूरदृष्टी दिसते. चिंतनशीलता आहे. गरीबी विषयी कनवळा आहे.

छ. शिवाजीराजे यांच्याविषयी पोवाडा.. ब्राह्मणांचे कसब, गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड, तृतीय रत्न (नाटक) त्याचप्रमाणे अखंड हा काव्यप्रकार आणि शेवटी *त्यांच्या मृत्यूनंतर प्रकाशित झालेला १८९१ मधील *सार्वजनिक सत्यधर्म* हा ग्रंथ*... इत्यादी विपुल साहित्य त्यांचे आहे. ते आजही मार्गदर्शक आहे.

म .फुले जरी संशोधक नव्हते, पंडित नव्हते भाषा शास्त्रज्ञ नव्हते, पण मुलगामी विचारवंत होते. कर्ते सुधारक होते. शाळा काढल्या, बालहत्या प्रतिबंधक गृह काढले, विधवा पुनर्विवाह मान्यता दिली, आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन दिले, सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

डॉक्टर बाबासाहेब म्हणतात, लोकहितवादी न्यायमूर्ती रानडे त्यानंतर आगरकर महर्षी कर्वे हे फक्त सुधारक होते. तर फुले *समाज* सुधारक होते.

बाबासाहेब पुढे म्हणतात, फुले यांनी स्त्रियांसाठी अस्पृश्यांसाठी कार्य केले. शेतकऱ्यांचे प्रश्न विचारात घेतले. खेड्यातील दैन्य अवस्था विचारात घेतली. स्त्रियांविषयी वाईट प्रथा दूर केली.*एकंदरीत समाजातील सर्व समस्यांना त्यांनी तोंड फोडले आणि म्हणून खऱ्या अर्थाने भारतातील ते थोर समाज सुधारक होय.

म. फुले यांच्या मृत्यूनंतर डॉक्टर बाबासाहेब एक वर्षांनी जन्मले. त्यांचे कार्य आणि कृतीयुक्त साहित्य त्यांनी वाचले. आणि खूप प्रभावीत झाले. जसे बाबासाहेबांनी बुद्ध,

कबीर यांना गुरु मानले. तसे म .फुले यांनाही गुरुस्थानी मानले. यावरून म. फुले यांची थोरवी अधिक स्पष्ट होते.

🙏🙏🙏🙏🙏

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २९ नोव्हेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, कतिको मासो, शुक्रवार, कार्तिक माहे.

२९ नोव्हेंबर १९४४ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वेदांवर प्रभावी भाषण, पुणे.

२९ नोव्हेंबर १९४५ – रोजी साबरमती नदीच्या काठावर अहमदाबाद येथे बुद्ध नगर मंडपात मुंबई प्रांत शेड्युल्ड कास्टस फेडरेशन (शे. का. फे.) ची पहिली परिषद झाली होती. यावेळी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते.

२९ नोव्हेंबर १९४८ – रोजी घटना समितीने अस्पृश्यता निर्मुलनाचा निर्णय घेतला. अनुच्छेद ११ – अस्पृश्यता निर्मूलन Article 11 – Abolition of Untouchability या अधिनियमाला कलम ११ लां Article 11 ला २५ दिवसानंतर २९ नोव्हेंबर १९४८ रोजी मंजुरी मिळाली. (हे ११ वें कलम नंतर कलम १७ वे झाले.)

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ३० नोव्हेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, कतिको मासो, शनिवार, कार्तिक माहे.

३० नोव्हेंबर १९१९ – रोजी अकोला जिल्ह्यातील अकोट मुक्कामी वतनदार महारांची सभा.

३० नोव्हेंबर १९४३ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे टोकिवाडा येथे पूर्व गोदावरी जिल्हा बोर्डाच्या सभेत भाषण झाले. "सध्याच्या परिस्थितीत अल्पसंख्यांकांना संरक्षणाची आवश्यकता आहे. हे बहुमतवाल्या पक्षाने ध्यानात ठेवले तर जातीय प्रश्न चुटकीसरसा सुटेल." असे उद्गार बाबासाहेबांनी काढले.

३० नोव्हेंबर १९४५ – रोजी अहमदाबाद नगरपालिकेतर्फे माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानपत्र.

३० नोव्हेंबर १९४८ – रोजी संविधान सभा चर्चेत माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुच्छेद–१० Article–10 वर चर्चा केली.

३० नोव्हेंबर १९५६ – रोजी कुशिनगर येथील पुज्य भंते चंद्रमणींच्या आश्रमात माननीय विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना गुरूंनी एक छत्री, मोर पिसांचा पंख, आणि माळ भेट दिली. हीच शेवटची गुरू–शिष्यांची भेट होती.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम*🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🦚🦚🦚☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, कतिको मासो, रविवार, कार्तिक माहे.

१ डिसेंबर – रोजी सीमा सुरक्षा दळ (BSF) स्थापना दिन.

१ डिसेंबर १९३१ – रोजी दुसरी गोलमेज परिषद समाप्त.

१ डिसेंबर १९३१ – रोजी दुसऱ्या गोलमेज परिषदेत विश्वरत्न, बोधिसत्व प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मतदानाची जोरदार मागणी केली.

१ डिसेंबर १९४३ – रोजी मुंबईतील टेक्निकल ट्रेनिंग सेंटरच्या पुनर्बांधणी संदर्भात विश्वरत्न बोधिसत्त्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आगमन.

१ डिसेंबर १९४८ – रोजी सागर येथे महार रेजिमेंट सेंटर स्थापन करण्यात आली.

१ डिसेंबर १९५१ – रोजी कासवजी जहांगीर हॉलमध्ये (गृहामध्ये) विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण.

१ डिसेंबर १९५४ – रोजी रंगून येथे भरणाऱ्या जागतिक बौद्ध परिषदेत भाग घेण्यासाठी विश्वरत्न बोधिसत्त्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रंगून येथे गेले.

१ डिसेंबर १९५६ – रोजी विश्वरत्न बोधिसत्त्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिल्लीत मथुरा रोड (रस्ता) येथे भरलेल्या बुद्धिस्ट आर्ट गॅलरीला भेट दिली.

*१ डिसेंबर १९८८ – रोजी जागतिक एड्स दिन, १९८८ पासून दरवर्षी १ डिसेंबर रोजी नियुक्त केला जातो, हा एक आंतरराष्ट्रीय दिवस आहे जो एचआयव्ही संसर्गाच्या प्रसारामुळे झालेल्या एड्स साथीच्या आजाराविषयी जागरुकता वाढवण्यासाठी आणि या आजाराने मरण पावलेल्या लोकांसाठी शोक व्यक्त करण्यासाठी समर्पित आहे. अधिग्रहित इम्युनोडेफिशियन्सी सिंड्रोम (एड्स) ही मानवी इम्युनोडेफिशियन्सी व्हायरस (एचआयव्ही) मुळे होणारी जीवघेणी स्थिती आहे. एचआयव्ही विषाणू रुग्णाच्या रोगप्रतिकारक शक्तीवर हल्ला करतो आणि इतर रोगांवरील प्रतिकार कमी करतो. सरकारी आणि आरोग्य अधिकारी, गैर–सरकारी संस्था आणि जगभरातील व्यक्ती एड्स प्रतिबंध आणि नियंत्रण या विषयावर शिक्षण घेऊन हा दिवस पाळतात.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 ▬▬▬▬▬▬▬▬▬▬▬💎🦚🦚🦚☸☸

मोजु तरी कशी ऊंची, तुझ्या कर्तृत्वाची |

तु जगाला शिकवली व्याख्या,

माणसातल्या माणुसकीची ||

तु देव नव्हतास, तु देवदूत ही नव्हतास |||

तु मानवतेची पुजा करणारा खरा...

"महामानव" होतास..... !!!

▬▬▬▬▬▬▬▬▬▬▬

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृती दिनाच्या निमित्ताने ..... १ डिसेंबर ते ६ डिसेंबर .....

....

शनिवार दिनांक १ डिसेंबर १९५६ .....

....

डॉ. बाबासाहेब आंबेडकर *दिनांक १ डिसेंबरला* मथुरा रोड वर बुद्धिस्ट आर्टस एक्झिबिशन पाहण्यास गेले होते. तेथे नानकचंद रत्तू आणि सोहनलाल शास्त्री त्यांच्या सोबत होते. एक्झिबिशन (प्रदर्शन) मध्ये वेगवेगळ्या चेहर्याचे आकार असलेल्या बुद्ध मुर्ती कडे पाहून सोहन शास्त्रींनी बाबासाहेबांना विचारले *"बाबासाहेब बुद्धाच्या वेगवेगळ्या चेहरा असलेल्या मूर्ती कशा?* हे मला पडलेले कोडे आहे !!

तेव्हा डॉ. बाबासाहेब यावर काय बोलणार म्हणून नानकचंद रतू आणि सोहनलाल शास्त्री हे दोघे डॉ. बाबासाहेबांच्या तोंडाकडे उत्सुकतेने पाहू लागले, तेवढ्यात बाबासाहेबांनी स्मितहस्से करून सोहन शाश्त्रीच्या शंकेचे समाधान करताना बाबासाहेब म्हणतात की, *तथागत बुद्धाच्या महापरिनिर्वाना नंतर सुमारे सहासे वर्षांनी बुद्धाचे चित्र व पुतळे बनविण्याची प्रथा सुरु झाली.*

महापुरुषांच्या अवयवांची जी वर्णने आहेत, त्यात मोठ्या आकाराचे कान, मोठे डोळे ,भव्य कपाळ, अजानबाहू, गोल चेहरा, कुरळे केस, भरपूर उंची, इत्यादी अवयवांचा समावेश होतो. ही वर्णने परंपरेने हे लोक ऐकत आले आहेत. जर भारतीय शिल्पकार बुद्धांची मूर्ती निर्मिती करत असेल तर तो त्याला आवडणाऱ्या बुद्धिमान व श्रेठतम भारतीय पुरुषांची कल्पना साकारेल पण वरील बुद्धांच्या वर्णनांचा आंतरभाव त्यात केलेला असेल....

चिनी, जपानी, सिलोन, तिबेट या देशांच्या शिल्पकारांनी त्यांच्या–त्यांच्या देशातील श्रेष्ठतम पुरुषाचे अवयव बुद्धांना दिले आहेत. त्यामुळे बुद्धांचे चित्र व पुतळे यात अवयवांचे निराळेपण दिसून येतात. असे स्पष्टिकरण अरुण त्यांनी महत्वाचा उपदेश केला, *"की आपण बुद्धांचे चित्र किंवा पुतळ्याकडे लक्ष न देता त्यांची तत्वे व शिकवण याकडे आपले लक्ष असावे."* अशा उत्तराने दोघांचेही समाधान झाले, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्थापत्य कलेतील ज्ञान किती प्रभावी होते हेही त्यांच्या लक्षात आले.

डॉक्टर बाबासाहेबांनी श्रेष्ठतम पुरुष महामानवाचे वर्णन करीत असतांना नानकचंद रत्तू आणि सोहनलाल शास्त्री यांनी त्यांच्या समोर एक महापुरुष दुसऱ्या महापुरुषांची लक्षणे सांगतो आहे, याची त्यांना साक्ष मिळाली. कारण ते सर्व वर्णन हुबेहूब डॉ. बाबासाहेबांना देखील लागू पडत होते.

नानकचंद रत्तुंना सोबत घेऊन बाबासाहेब आपल्या मोटारीने कॅनॉट प्लेस रोडवरील एका पुस्तकांच्या दुकानातून काही ग्रंथ खरेदी करून बंगल्यावर परतले. डॉ. बाबासाहेबांचा १ डिसेंबरचा दिवस अगदी उत्साहात व आनंदात गेला.

*तात्पर्य :– १ डिसेंबरला बाबासाहेब चालत फिरत होते, अर्थात आजारी असले तरीही त्यांची तब्बेत चांगली होती. म्हंणजे ते बिछान्यावर खिळून नव्हते. (संदर्भ :– डॉ. भीमराव रामजी आंबेडकर खंड १२ पान क्रमांक १०७–१०८.)

आता आपण जाणून घेणार आहोत की, Reminiscence and Rememberance of Do. B. R. Ambedkar (डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुभव आणि आठवणी) ह्या पुस्तकात *नानकचंद रत्तु* हे १९४० ते ०६ डिसेंबर १९५६ असे १६ वर्षे बाबासाहेब आंबेडकरांचे खाजगी सचिव होते.

बाबासाहेबांचे अनुभव आणि आठवणी यांच्या संदर्भात नानकचंद रत्तु यांनी लिहिलेल्या सदर पुस्तकाची संहिता आधीपासूनच तयार होती परंतु मुद्रण खर्च या कारणामुळे ते प्रकाशित होऊ शकले नाही हे खेदजनक आहे. जून १९९३ मध्ये परदेशात कार्यरत आंबेडकरी विचारधारेच्या संस्था व प्रतिनिधींनी आयोजित केलेल्या डॉ. आंबेडकर जयंती कार्यक्रमात मा. रत्तु यांना निमंत्रित केले होते. त्यानंतर त्यांचे सदर साहित्य परदेशात वास्तव्य करणाऱ्या आंबेडकरी कार्यकर्त्यांची इच्छा व सहकार्याने प्रकाशात येऊ शकले, असे मा. रत्तु यांनी नमूद केले आहे. आमच्या माहितीनुसार साधारण १९९५ च्या दरम्यान हे पुस्तक इंग्रजी भाषेत उपलब्ध झाले. त्यानंतर मराठी, हिंदी इत्यादी भारतीय भाषांमध्ये हे साहित्य भाषांतरीत झालेले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मनःस्थिती, मनातील क्लेशकारक वेदना आणि मनस्ताप ह्यांचे वर्णन करतांना लिहितात....

दहा (१०) वर्षांहून ही अधिक काळ बाबासाहेबांची तब्बेत बरी नव्हती. पददलितांसाठी सोसलेले क्लेश, सतत केलेले वाचन–लेखन, विश्रांतीचा अभाव या सर्व गोष्टींचा प्रतिकूल परिणाम त्यांच्या तब्बेतिवर दिसू लागला. *जे सहकारी आपला पक्ष नीट चालवीत आणि आपले काम आपल्या मार्गे जोमाने पुढे नेतील असे त्यांना वाटले त्या सहकार्याने केलेला विश्वासघात, नेतृत्वासाठी आणि सत्तेसाठी त्यांच्यात सुरू असलेली भांडणे बाबासाहेबांना मनस्ताप देत होती.*

ज्या तरुणांना बाबासाहेबांच्या परिश्रमाने उच्च शिक्षणाचा लाभ झाला, वरिष्ठ पदाच्या नोकऱ्या लागल्या त्यांनी समाजाची केलेली बेइमानी पाहून बाबासाहेबांच्या तब्बेतीवर दीर्घ परिणाम झाला.

सतत एक–दीड वर्षे डॉ. बाबासाहेबांना अशा दुःखी मनःस्थितीत आणि अनेकदा रडतानाही पाहण्याचा खूप ताण माझ्या मनावर पडायचा.

मी त्याच्या मागच्या कारणांचा शोध घेऊ पाहात होतो. त्यांना विचारण्याची मनाची तयारी करून मी जायचो, पण ज्वाळामुखीच्या स्फोटाप्रमाणे असलेल्या त्यांच्या रागाची भीती वाटायची आणि मी मागे सरायचो. पण एकदा मी हिंम्मत केलीच सायंकाळी साडेसहाच्या सुमारास त्यांच्या खोलीत गेलो. अंथरुणावर पडल्यापडल्याच त्यांनी माझ्याकडे पाहिले. त्यांचा तो दुर्मिळ मुड पाहून त्यांचे पाय चेपित मी नम्रपणे विचारले....

"सर अलीकडे तुम्ही एवढे दुःखी, चिंताक्रांत आणि खिन्न का दिसता, आणि कधीकधी डोळ्यांतून पाणीही का गाळतात?" त्यांनी करड्या नजरेने माझ्याकडे पाहिले आणि ते म्हणाले, *"जा आणि आपलं टायपिंगचं काम कर. मला त्रास देऊ नकोस."* मी शब्दही बोलू शकलो नाही. त्या कान उघाडणीने मी भेदरूनच गेलो. मी हळूच दरवाजा बंद

करून बाहेर पडलो. पण मी निर्धार केला की, काय वाटेल ते होऊ देत मी सत्य काय आहे ते काढीनच आणि त्यांचा कितीही रोष ओढविला तरी मी मागे सरणार नाही. (पान क्रमांक २२६.)

(पान क्रमांक २२७.) वर लिहितात की, बाबासाहेब आंबेडकरांचे दुःखी राहणे, चिंताग्रस्त होणं, आणि खिन्नता वाढत आहे हे पाहून मी पुन्हा, *"सर, अलीकडे आपण एवढे दुःखी आणि अधूनमधुन तुमच्या चेहऱ्यावर चिंता, खिन्नता का दिसते?* मी असे तुम्हाला हे विचारल्याबद्दल सर, आपण मला क्षमा करा. पण मला आज या प्रश्नाचे उत्तर द्याच." या प्रश्नांवर काही क्षण एकदम शांततेत गेले... बाबासाहेबांचा गळा भावनेने भरून आला...

ते म्हणाले, *"मला कशाचा त्रास होत आहे आणि कशाचे दुःख होत आहे हे तुम्हा लोकांना माहीत नाही."* *"माझी पहिली खंत ही आहे की, मी माझे जीवनकार्य पूर्ण करू शकलेलो नाही."* *"माझे लोक इतर समाजांशी बरोबरिपूर्वक राजकीय सत्तेचे वाटेकरी होऊन सत्ताधारक वर्ग बनलेले हे पाहण्याची माझी इच्छा होती."*

"जे काही मी मिळवू शकलो त्याचा फायदा मूठभर सुशिक्षितांनी घेतला आहे. पण त्यांचे सुशिक्षित वर्गाचे विश्वासघातकी वागणे, समाजाप्रती त्यांची अनास्था पाहिल्यावर ते फारच नालायक निघाले असेच म्हणावे लागते, ते माझ्या कल्पना शक्तीच्या पलीकडे गेले आहेत. ते फक्त स्वतःसाठी व त्यांच्या व्यक्तिगत फायद्यासाठीच जगतात. त्यांच्यापैकी एकही जण सामाजिक कार्य करायला तयार नसतो. ते आत्मघाताच्या वाटेने निघाले आहेत."

"मला आता माझे लक्ष खेड्यातल्या हजारो-लाखो निरक्षर लोकांकडे वळवायचे होते. ते अजूनही हाल अपेष्टा भोगत आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिती मुळीच बदललेली नाही. पण आता आयुष्य फार थोडे शिल्लक राहिले आहे."

"मला असेही वाटले होते की, माझी सगळी पुस्तके माझ्या हयातीतच प्रकाशित व्हावीत. बुद्ध अँड कार्ल मार्क्स, रेव्होल्यूशन अँड काऊंटर रेव्होल्यूशन इन एंशियंट इंडिया, रिडल्स इन हिंदुईजम, ही माझी यादगार पुस्तके प्रकाशित करण्यात मी असमर्थ व असहाय्य ठरत आहे ही नुसती कल्पनासुद्धा मला भयंकर क्लेशकारक होते. कारण माझ्या मृत्यूनंतर दुसरे कुणीच ही पुस्तके प्रकाशित करू शकणार नाहीत."

"कुणीतरी शोषित वर्गामधून माझ्या हयातीतच पुढे येईल आणि माझ्या पश्चात ही चळवळ पुढे चालविण्याची अवघड जबाबदारी पत्करिल अशीही माझी अपेक्षा होती. पण हे आव्हाहन पेलू शकेल असा कुणीच माझ्या डोळ्यांसमोर येत नाही."

"माझ्या ज्या सहकार्याबद्दल ते ही चळवळ चालवतील असा माझा विश्वास आणि भरवसा होता ते आज नेतृत्वासाठी आणि सत्तेसाठी एकमेकांत भांडत आहेत. त्यांच्या शिरावर येवू घातलेली जबाबदारी किती मोठी आहे हे त्यांच्या ध्यानीमनीही असल्याचे दिसत नाही."

"हा माझा देश आणि येथील लोक ह्यांची मला आणखी काळ सेवा करण्याची संधीही मला हवी होती. ज्या देशातील लोक एवढे जातिग्रस्त आणि पूर्वग्रहपीडित आहेत, तेथे जन्माला येणे हे घातक आहे. विद्यमान चौकटीत या देशाच्या कारभारात आपलं अस्तित्व टिकवून ठेवणे अत्यंत अवघड होवून बसले आहे, किती गाळात चाललाय हा देश !!!"

हे सांगतांना बाबासाहेबांच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते. डबडबलेल्या डोळ्यांनी त्यांनी माझ्याकडे पाहिले. मी ही अश्रू ओसंडणाऱ्या डोळ्यांनी त्यांच्याकडे पाहण्याशिवाय दुसरे काहीच करू शकत नव्हतो.

मी उभा राहिलो आणि त्यांचे पाय धरले. त्यांनी मला उठवलं ते पुटपुटले... *"धीर धरा. खचून जाऊ नका, हे आयुष्य आज ना उद्या संपणारच आहे."*

(डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुभव आणि आठवणी - नानकचंद रत्तु - भाषांतर - भास्कर लक्ष्मण भोळे - पान क्रमांक २२६-२२९.) संग्रहित - एम. एन. सोनावणे, पुणे.

☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚🔵🔵🔵💎 जागतिक एड्स दिन 💎🔵🔵🔵🦚🦚🦚☸☸

लाल रिबन हे एचआयव्ही पॉझिटिव्ह लोक आणि एड्स ग्रस्त लोकांसोबत एकतेचे जागतिक प्रतीक आहे.

१९८८ : ३६ वर्षांपूर्वी जागतिक एड्स दिन हा जागतिक आरोग्य दिन, जागतिक रक्तदाता दिन, जागतिक लसीकरण सप्ताह, जागतिक क्षयरोग दिन, जागतिक तंबाखू विरोधी दिन, जागतिक मलेरिया दिन यासह जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) चिन्हांकित केलेल्या अकरा अधिकृत जागतिक सार्वजनिक आरोग्य मोहिमांपैकी एक आहे. जागतिक हिपॅटायटीस दिवस, जागतिक प्रतिजैविक जागरूकता सप्ताह, जागतिक रुग्ण सुरक्षा दिवस आणि जागतिक चागस रोग दिवस.

२०२० पर्यंत, एड्सने जगभरात २७.२ दशलक्ष ते ४७.८ दशलक्ष लोकांचा बळी घेतला आहे आणि अंदाजे ३७.७ दशलक्ष लोक एचआयव्हीसह जगत आहेत, नोंदवलेल्या इतिहासातील जागतिक सार्वजनिक आरोग्य समस्यांपैकी ही एक महत्त्वाची आहे. जगाच्या अनेक क्षेत्रांमध्ये अँटीरेट्रोव्हायरल उपचारांच्या अलीकडील सुधारित प्रवेशामुळे धन्यवाद, एड्सच्या साथीच्या मृत्यूचे प्रमाण २००४ मध्ये त्याच्या उच्चांकापासून ६४% कमी झाले आहे (२०२० मध्ये ६८० ००० च्या तुलनेत २००४ मध्ये १.९ दशलक्ष).

इतिहास :

जागतिक एड्स दिनाची संकल्पना प्रथम ऑगस्ट १९८७ मध्ये जेम्स डब्ल्यू. बन आणि थॉमस नेटर या दोन सार्वजनिक माहिती अधिकारी यांनी स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे जागतिक आरोग्य संघटनेच्या एड्सवरील जागतिक कार्यक्रमासाठी मांडली होती. बन आणि नेटर यांनी त्यांची कल्पना डॉ. जोनाथन मान, एड्सवरील जागतिक कार्यक्रमाचे संचालक (आता UNAIDS म्हणून ओळखली जाते) यांच्याकडे दिली. मान यांना ही संकल्पना आवडली, ती मंजूर झाली आणि त्यांनी जागतिक एड्स दिन १ डिसेंबर १९८८ रोजी साजरा केला जावा या शिफारशीशी सहमती दर्शविली. सॅन फ्रान्सिस्को येथील माजी दूरचित्रवाणी पत्रकार बन्न यांनी १ डिसेंबर ही तारीख देण्याची शिफारस केली होती. पाश्चात्य वृत्त माध्यमांद्वारे जागतिक एड्स दिनाचे जास्तीत जास्त कव्हरेज होईल, असा विश्वास आहे, यूएस निवडणुकीनंतर पुरेसा लांब आहे परंतु ख्रिसमसच्या सुट्ट्यांपूर्वी.

पहिल्या दोन वर्षांत, जागतिक एड्स दिनाची थीम मुले आणि तरुण लोकांवर केंद्रित होती. सर्व वयोगटातील लोकांना HIV ची लागण होऊ शकते या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष केल्याबद्दल या थीमच्या निवडीवर त्या वेळी काहींनी टीका केली होती, तेव्हा या थीमने रोगाभोवती असलेले काही कलंक दूर करण्यात आणि कौटुंबिक आजार म्हणून समस्येची ओळख वाढविण्यात मदत केली.

एचआयव्ही/एड्स (UNAIDS) वरील संयुक्त संयुक्त राष्ट्र कार्यक्रम १९९६ मध्ये कार्यान्वित झाला आणि त्याने जागतिक एड्स दिनाचे नियोजन आणि प्रचार हाती घेतला. एका दिवसावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी, वर्षभर संप्रेषण, प्रतिबंध आणि शिक्षण यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी UNAIDS ने १९९७ मध्ये जागतिक एड्स मोहीम तयार केली. २००४ मध्ये, जागतिक एड्स मोहीम ही एक स्वतंत्र संस्था बनली.

१९८८ पासून दरवर्षी पोप जागतिक एड्स दिनानिमित्त रुग्ण आणि डॉक्टरांसाठी शुभेच्छा संदेश जारी करतात. २०१६ मध्ये, एचआयव्ही, रेबीज, कोविड आणि इतर श्वसन विषाणूंचा संग्रह एनजीओने (पॅनेजिया ग्लोबल एड्स आणि दक्षिण आफ्रिकेसाठी एड्स आणि राइट्स अलायन्ससह) एक मोहीम सुरू केली जागतिक एड्स दिनाचे नाव बदलून जागतिक एचआयव्ही दिवस ठेवा. त्यांचा दावा आहे की हा बदल सामाजिक न्यायाच्या समस्यांवर आणि प्री-एक्सपोजर प्रोफिलॅक्सिससारख्या उपचारांच्या प्रगतीवर भर देईल.

यूएस मध्ये, व्हाईट हाऊसने २००७ मध्ये इमारतीच्या नॉर्थ पोर्टिकोवर २८ फूट (८.५ मीटर) एड्स रिबनच्या प्रतिष्ठित प्रदर्शनासह जागतिक एड्स दिन साजरा करण्यास सुरुवात केली. राष्ट्राध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू. बुश यांच्या प्रशासनात, जागतिक एड्सशी लढा देण्याच्या युनायटेड स्टेट्सच्या वचनबद्धतेचे प्रतीक म्हणून प्रदर्शन प्रस्तावित केले. त्याच्या ऐतिहासिक PEPFAR कार्यक्रमाद्वारे महामारी. व्हाईट हाऊसचे प्रदर्शन, जे आता चार राष्ट्रपतींच्या प्रशासनातील वार्षिक परंपरा आहे, त्वरीत लक्ष वेधून घेतले, कारण ते अब्राहम लिंकन प्रशासनानंतर व्हाईट हाऊसमधून ठळकपणे लटकवलेले पहिले बॅनर, चिन्ह किंवा चिन्ह होते.

१९९३ पासून, युनायटेड स्टेट्सच्या राष्ट्राध्यक्षांनी जागतिक एड्स दिनासाठी अधिकृत घोषणा केली आहे (त्या घोषणांच्या प्रतींसाठी जागतिक एड्स दिनासाठी #US प्रेसिडेंशियल प्रोक्लेमेशन्स विभाग पहा). ३० नोव्हेंबर २०१७ रोजी, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्थानिक सामुदायिक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह १ डिसेंबर हा जागतिक एड्स दिन घोषित केला.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम*🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🦚🦚🦚☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, मग्गसिरो मासो, सोमवार, मार्गशिस माहे.

२ डिसेंबर १९४८ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्व प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभा चर्चेत कलम १४ (Article 14) वर चर्चा केली. कलम १४ ने कायद्यापुढे समानता आणि कायद्याचे समान संरक्षण दिले आहे. न्यायाधीश, वकील, नेते, मंत्री किंवा सामान्य लोक सर्वांना समान कायद्याचे समान संरक्षण देण्यात आले आहे.

२ डिसेंबर १९५६ – रोजी बुद्धगया येथील होणाऱ्या २५०० व्या बुद्ध जयंती व महापरिनिर्वाण समारंभात भाग घेण्यासाठी आलेल्या दलाई लामांच्या सन्मानार्थ आयोजित मेहरोली, दिल्ली येथील समारंभात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दलाई लामा यांनी #बोधिसत्त्व# असा गौरव केला. अशोक विहार मध्ये दलाई लामाच्या सन्मानार्थ झालेल्या समारंभाला विश्वरत्न, बोधिसत्व प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित, – अशोक विहार नवी दिल्ली.

२ डिसेंबर १९८४ – रोजी भोपाळ गॅस दुर्घटनेत मरण पावलेल्या लोकांच्या स्मरणार्थ जागतिक प्रदूषण नियंत्रण दिन साजरा केला जातो.

२ डिसेंबर २००१ – रोजी जागतिक संगणक साक्षरता दिवस. जागतिक संगणक साक्षरता दिवस भारतीय संगणक कंपनी NIIT ने २००१ मध्ये २० व्या वर्धापन दिनानिमित्त सुरू केला होता, ज्या संशोधनाला प्रतिसाद म्हणून जगभरातील बहुसंख्य संगणक वापरकर्ते पुरुष आहेत. हे दरवर्षी २ डिसेंबर रोजी होते, आणि विशेषतः भारतातील मुले आणि महिलांमध्ये तांत्रिक कौशल्यांच्या विकासास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आहे. त्याच्या स्वतःच्या शब्दात, "जगभरातील सेवा नसलेल्या समुदायांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि डिजिटल साक्षरता वाढवणे." हे त्याचे उद्दिष्ट आहे. त्याची स्थापना मूलत: NIIT द्वारे केली गेली होती. या दिवसाचा उद्देश माहिती तंत्रज्ञानाच्या शिक्षणात सुधारणा करण्यासाठी, आणि सामान्यतः, "संगणकांचा उत्सव" आहे.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎*२ डिसेंबर १९५६ :– डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि दलाई लामा*💎🦚🦚🦚☸☸

२ डिसेंबर १९५६ वार रविवार नानकचंद सकाळी नेहमीप्रमाणे सव्वासातला आले, तेव्हा बाबासाहेब बिछान्यात पडून राहिले होते. त्याला पाहताच बाबासाहेब म्हणाले, ”आलास वेळेवर… आज आपल्याला खूप काम करायाचे आहे” ते बिछान्यातून उठले, चहा घेतला व कार्ल मार्क्सचे ‘दास कॅपिटल’ या ग्रंथातील संदर्भित मजकूर परत

डोळ्यांखालून घालून 'बुद्ध अँड कार्ल मार्क्स' या आपल्या ग्रंथाच्या लेखनासाठी बसले. लिहिलेल्या मजकुराची पाने ते नानकचंदला टाईप करायला देत होते. अकरानंतर स्नान, जेवण व थोडी विश्रांती यांत तीन तास घालवून परत लिहावयास बसले व लिहलेला मजकूर टाईप करवून घेत होते. संध्याकाळ पर्यंत हे काम चालले होते.

संध्याकाळी तिबेटचे दलाई लामा यांच्या सत्काराचे त्यांना आमंत्रण होते. दिल्ली नागरिकांतर्फे हा सत्कार समारंभ अशोकविहार महरौली येथे नानकचंद यांच्यासोबत पोहचले. या समारंभास मोठ्या प्रमाणात अस्पृश्य लोक उपस्थित होते. बाबासाहेबांनी नुकतेच म्हणजे १४ ऑक्टोबर रोजी धंम्मांतर (मुळ जीवनाचा मार्ग स्विकारला) केले होते. त्यात तिबेटचे दलाई लामा यांचा सत्कार करण्याचा योग आला.

त्यावेळी दलाई लामा यांचे वय फक्त २१ वर्षांचे होते. १९५६ साली देशात भगवान बुद्धांची २५०० वी जयंती साजरी करण्याचा निर्णय भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी घेतला होता. त्यामुळे दिल्ली येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांसाठी दलाई लामा भारतात आले होते.

दलाई लामा यांनी यावेळी डॉ. बाबासाहेबांना उद्देशून बोलताना "बोधिसत्व" असे संबोधले आणि प्रबुद्ध भारत बनवण्याच्या आपल्या वचनबद्धतेची बाबासाहेबांना आठवण करून दिली. भारतातील बौद्ध धंम्माच्या (जीवन जगण्याचा मार्ग) पुनरुज्जीवनासाठी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचे आभार मानले. मात्र दलाई लामा आणि बाबासाहेबांची ही भेट अखेरची ठरली, चार (४) दिवसांनी महामानवाचे परिनिर्वाण झाले.

संग्राहक – मिलिंद आशा तानाजी धावारे, लातूर.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

👉२ डिसेंबर १९५६ रोजी दिवसभर त्यांनी 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाचे लेखन केले. त्यामुळे दुपारचे जेवण उशिराच घेतले. संध्याकाळी दलाई लामांच्या सत्कार कार्यक्रमात उपस्थित राहिले. यावेळी त्यांनी भारतात बुद्ध धम्माचा प्रचार–प्रसार कसा करता येईल याची चर्चा केली, रात्री परत ग्रंथाचे लेखन केले. यावेळीच ते नानकचंद रत्तुना म्हणाले की, पुस्तके माझ्या हयातीत प्रकाशित होतील काय? बौद्ध धम्माचा भारतभर मी प्रचार करू शकेन काय? त्यावर नानकचंद रत्तू 'हाँ साहब' एवढेच म्हणाले. पण बाबासाहेब आज थोडे थकलेले होते म्हणून रात्री १०.३० वाजताच झोपले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🙏 महानायकाच्या महापरीनिर्वाणापूर्वीचे पाच दिवस...🙏

🙏६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाचे प्रचंड वादळ शांत झाले. भारतीय राजकारणातील आयुष्यभर उन्हात उभे राहून तमाम दलितांना (वंचितांना) मायेची सावली देणारी कोट्यवधी दलितांची (वंचितांचे) माऊली पोरके करून निघून गेली. पण जाताना भारताला राज्यघटना आणि अशोकचक्राची देणगी देऊन गेली. धर्म नसलेल्या माणसाला धम्म देऊनगेली. आयुष्यभर संघर्ष करून मिळवून दिलेल्या अधिकाराचे जतन करण्यासाठी रिपब्लिकन पक्षाची मांडणी करून गेली. 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ऐतिहासिक ग्रंथाला पूर्णत्व देऊनच आपल्या ऐहिक जीवनाची समाप्ती केली. गुरुवार, दि. ६ डिसेंबर १९५६ रोजी सकाळी सहा वाजता एक पाय उशीवर, डोक्याजवळ हस्तलिखित कागद काही महत्त्वपूर्ण ग्रंथ, चष्मा एक इंजेक्शन सिरिज, एक औषधाची बाटली या अवस्थेत माईसाहेबांनी बाबासाहेबांना पाहिले. निद्रावस्थेत बाबांचे देहावसान झाले होते. हे कळल्यावर सात कोटी दलितांच्या (वंचितांच्या) अनभिषिक्त राजाच्या अंतिम क्षणी कुणीही नसावे असे म्हणून जगजीवनराम बाबासाहेबांचे पाय धरून ओक्साबोक्सी रडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शेवटच्या पाच दिवसांचा प्रवास अतिशय व्यस्त आणि भावनिक होता.

🙏महामानवाचे शेवटचे पाच दिवस –

१ डिसेंबर १९५६ रोजी बाबासाहेबांनी दिल्लीतील मथुरा रोडवरील बुद्धिष्ट आर्ट एक्झिबिशन पाहिले त्यातील विविध देशांतील बुद्धाचे पुतळे पाहिले, त्यानंतर परत निघताना कॅनाट प्लेस रोडवरील बुक डेपोत जाऊन ७ पुस्तके विकत घेतले व रात्री उशिरापर्यंत हेच पुस्तके चाळीत राहिले.

👉२ डिसेंबर १९५६ रोजी दिवसभर त्यांनी 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाचे लेखन केले. त्यामुळे दुपारचे जेवण उशिराच घेतले. संध्याकाळी दलाई लामांच्या सत्कार कार्यक्रमात उपस्थित राहिले. यावेळी त्यांनी भारतात बुद्ध धम्माचा प्रचार–प्रसार कसा करता येईल याची चर्चा केली, रात्री परत ग्रंथाचे लेखन केले. यावेळीच ते नानकचंद रत्तुना म्हणाले की, पुस्तके माझ्या हयातीत प्रकाशित होतील काय? बौद्ध धम्माचा भारतभर मी प्रचार करू शकेन काय? त्यावर नानकचंद रत्तू 'हाँ साहब' एवढेच म्हणाले. पण बाबासाहेब आज थोडे थकलेले होते म्हणून रात्री १०.३० वाजताच झोपले.

👉३ डिसेंबर १९५६ रोजी बाबासाहेबआंबेडकरांनी १६ डिसेंबर रोजी मुंबईत बौद्ध धम्मदीक्षा समारंभ कार्यक्रम आखला तसे मुंबईच्या कार्यकर्त्यांना कळविले. नानकचंद रत्तूना रेल्वेची फस्ट क्लासची चार तिकिटे बुक करण्यास सांगितली. पण तिकिटे बुक झाली नाहीत तेव्हा बाबासाहेबांनी १४ डिसेंबरची विमानांची तिकिटे बुक केली.

१४ ते १८ डिसेंबरपर्यंत बाबासाहेब मुंबईत कुमारसेन समर्थ यांच्याकडे थांबणार होते.

👉४ डिसेंबर १९५६ रोजी रात्रीच्या जागरणामुळे बाबासाहेब उशिरा उठले. पण खूपच थकलेले वाटत होते. ११ वाजता जैन धर्मीय अधिवेशनासंबंधी चर्चा केली. त्यानंतर त्यांनी रिपब्लिकन पक्षाच्या अनुषंगाने थोर समाजवादी नेते एस. एम. जोशी व प्र. के. अत्रे यांना पत्र लिहिली त्याचप्रमाणे भारतात बौद्ध धम्माचा प्रसार करण्यासाठी आर्थिकसाह्य मिळावे म्हणून ब्रह्मदेशाच्या सरकारला एक पत्र लिहिले.

👉५ डिसेंबर १९५६ रोजी बाबासाहेब मुंबईत होणारा धंम्मांतर (मुळ जीवन मार्ग) सोहळा, भारतात धंम्माचा प्रचार या चिंतेत होते. दिवसभर उर्वरित ग्रंथाचे लेखन केले हे ग्रंथ आपल्या हयातीत प्रकाशित व्हावेत, अशी त्यांची तळमळ होती. रात्री त्यांना अस्वस्थ वाटत होते. अशा अवस्थेतही बुद्ध आणि धम्म ग्रंथाची प्रस्तावना लिहिली. अत्रे, जोशी यांना लिहिलेली पत्रे डोळ्यांखालून घातली. झोपेचे इंजेक्शन घेऊन झोप येत नव्हती. हे सारे जवळून नानकचंद पाहात होते. या अनुषंगाने ते म्हणतात मला बाबासाहेबांचा

चेहरा थकलेला दिसत होता. अशा अवस्थेतही त्यांनी मुंबईच्या तिकिटाची कार्यक्रमाची चौकशी केली. तेवढ्यात स्वयंपाकी सुदाम बाबांनी जेवणास बोलावले. डायनिंग हॉलचा मार्ग ड्रॉईंग रूममधूनच होता. या हॉलच्या दोन्ही बाजूंनी ग्रंथाची खचून भरलेली कपाटे होती ते पाहातच बाबासाहेब डायनिंग हॉलकडे गेले. इच्छा नसतानाही दोन खास खाल्ले. ड्रॉईंग हॉलमध्ये आल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर डोळे मिटून थोडा वेळ स्तब्ध झाले. एक दीर्घश्वास सोडला त्यांनी त्रिसरण म्हटले त्यानंतर नानकचंद कडून मालिश करून घेतली. मसाज झाल्यानंतर काठीच्या आधाराने उठले व उठतानाच 'चल उचल कबिरा तेरा भवसागर डेरा' असे म्हणाले नानकचंदाना बुद्ध गीताची रेकॉर्ड लावण्यास सांगितली. त्यांना चिंता होती दलितांच्या (वंचितांच्या) भविष्याची, रात्री ११.१५ वा. नानकचंद रत्तू घरी जाण्यास निघाले पण परत बाबासाहेबांनी बोलावून घेतले. त्यांनी लिहिलेली पत्र जवळ ठेवण्यास सांगितले. ११.३५ वा. नानकचंदांनी बाबासाहेबांची परवानगी घेतली, रत्तूनी बाबासाहेबांचे जवळून शेवटचे दर्शन घेतले.

👉अखेरचा प्रवास ६ डिसेंबर १९५६ रोजी सकाळीच बाबासाहेब निघून गेल्याची बातमी स्वयंपाकी सुदामबाबांनी दिली. नानकचंदांनी दिल्लीच्या प्रसारमाध्यमांना ही बातमी दिली. ११.५५ वा. मुंबईच्या पी. ई सोसायटीच्या ऑफिसमध्ये फोन केला घनशाम तळवटकर यांना प्रथम बातमी दिली. त्यानंतर औरंगाबादला फोन करून बळवंतराव वराळे यांना ही दु:खद बातमी सांगितली. त्यानंतर वाऱ्यासारखी ही बातमी सर्वत्र पसरली. दिल्लीच्या निवासस्थानी तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू इतर मंत्री यांनी भेट दिली. सायंकाळी ४.३० वा. बाबासाहेबांचा पार्थिव देह ट्रकने दिल्ली विमानतळावर आणला. बाबासाहेबांच्या अंतिम प्रवासाची सुरुवात झाली. रात्री ९.०० वा. हे विमान नागपूरला उतरण्यात आले. ज्या ठिकाणी दीक्षा समारंभ झाला, त्या ठिकाणी त्यांचा देह अंतिम दर्शनासाठी ९ ते १२ वा. पर्यंत ठेवण्यात आला.१२ वा. हे विमान नागपूरहून निघाले व रात्री १.५० वा. मुंबईच्या सांताक्रुझ विमानतळावर पोहोचले. त्या ठिकाणी लाखोंचा जनसमुदाय जमलेला होता. त्या ठिकाणाहून बाबासाहेबांना राजगृहावर आणण्यात आले. त्या ठिकाणी प्रचंड आक्रोश सुरू होता. अंत्यसंस्काराला जागा दिला नाही बाबासाहेबांच्या अंतिम संस्काराची व्यवस्था सुरू करण्याची वेळ येऊन ठेपली. हिंदू कॉलनीच्या हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करू न देण्याची हळूच चर्चा सवर्णात असल्याची जाणीव झाली. तेव्हा कार्यकर्ते अस्वस्थ झाले पण त्यांनी निर्णय घेतला. मी हिंदू म्हणून मरणार नाही. अशी प्रतिज्ञा करणाऱ्या बाबासाहेबांचा अंतिम संस्कार हिंदूच्या स्मशानभूमीत कशाला? व प्रचंड गर्दी लक्षात घेता त्यांचा अंतिम संस्कार शिवाजी पार्कवर करण्यावर एकमत झाले. पण तत्कालीन म्युनिसिपल कमिशनर पी. आर. नायक यांनी विरोध केला व परवानगी नाकारली. त्यानंतर सध्या मुंबईत असलेल्या आंबेडकर महाविद्यालयाच्या ठिकाणी मोकळे मैदान होते तेथे अंत्यसंस्कार करण्याचे ठरले. पण ती जागा देण्यासाठी काँग्रेसने विरोध केला तेव्हा बाबासाहेबांच्या जवळचे कार्यकर्ते सी. के. बोले यांच्या मालकीची जमीन होती. त्या जमिनीवर अंत्यसंस्कार करण्यास सांगितले व त्या ठिकाणी बौद्ध धम्म विधिनुसार भिक्खू एच धंम्मानंद यांच्या उपस्थितीत भदन्त आनंद कौशल्य यांच्या हस्ते हा अंत्यसंस्कार पार पडला...

🙏ज्ञानाच्या अथांग महासागराला विनम्र अभिवादन व कोटी कोटी प्रणाम.....💐

! जय भीम ! !! जय भारत !! !!! नमो बुद्धाय !!!

☸☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम*🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🦚🦚🦚☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ३ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, मग्गसिरो मासो, मंगळवार, मार्गशिस माहे.

३ डिसेंबर – संत रोहिदास पुण्यतिथी.

३ डिसेंबर १८८४ – रोजी वकिलांचा दिवस. भारताचे पहिले राष्ट्रपती आणि स्वतः एक प्रख्यात वकील डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या जयंतीनिमित्त ३ डिसेंबर रोजी वकील समुदायातर्फे भारतात वकिलांचा दिवस साजरा केला जातो. वकिलांचा दिवस कामगार अधिकारी, कामगार प्रतिनिधी, सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्राचे व्यवस्थापक, व्यवस्थापन प्रतिनिधी आणि कामगार संबंध तटस्थांना राज्ये आणि प्रदेशांमधून एकत्र आणतो आणि दिवसाच्या प्रमुख समस्यांवर लक्ष केंद्रित करणारे राष्ट्रीय आणि प्रादेशिक वक्ते ऐकतात. डॉ. राजेंद्र प्रसाद (डिसेंबर ३, १८८४–फेब्रुवारी २८, १९६३) हे स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती होते. ते एक स्वातंत्र्य कार्यकर्ते होते आणि काँग्रेस पक्षाचे नेते म्हणून त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत प्रमुख भूमिका बजावली. १९४८ ते १९५० या काळात प्रजासत्ताक राज्यघटनेचा मसुदा तयार करणाऱ्या संविधान सभेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले. स्वतंत्र भारताच्या पहिल्या सरकारमध्ये त्यांनी कॅबिनेट मंत्री म्हणूनही काम केले.

३ डिसेंबर १९३३ – रोजी यवतमाळ तालुका अस्पृश्य परिषद, कालेगाव येथे.

३ डिसेंबर १९३८ – रोजी मुंबई येथील स्वतंत्र मजूर पक्षाच्या सभेत विश्वरत्न बोधिसत्त्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित.

३ डिसेंबर १९४८ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेच्या चर्चेत कलम १६, १७, १८ वर चर्चा केली. अनुच्छेद १६ – सार्वजनिक रोजगाराच्या बाबतीत संधीची समानता, अनुच्छेद १७ – अस्पृश्यतेचा शेवट, अनुच्छेद १८ – पदव्यांचा अंत.

३ डिसेंबर १९५४ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे रंगून येथील तिसऱ्या आंतरराष्ट्रीय बौद्ध धम्म अधिवेशनात भाषण.

*३ डिसेंबर १९५६ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मेहुणे बाळू कबीर यांनी आंबेडकर पती–पत्नीची छायाचित्रे

घेतली. त्यावेळी त्यांचे सासरे कृष्णराव कबीर आणि डॉ. माधवराव मालवणकर उपस्थित होते.*

३ डिसेंबर १९५६ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मार्क्सचां डास कॅपिटॉल हा ग्रंथ घेऊन बुद्ध आणि कार्ल मार्क्स या ग्रंथाचे शेवटचे प्रकरण लिहून टंकलेखनासाठी दिले.

*३ डिसेंबर १९९२ – रोजी जागतिक अपंग दिन. हा दिवस दरवर्षी ३ डिसेंबर १९९२ पासून जगभरात साजरा केला जातो. अपंग लोकांना त्यांच्या हक्कांविषयी सांगणे आणि इतर लोकांना त्याची जाणीव करून देणे हा त्याचा उद्देश आहे.

सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनातील प्रत्येक पैलूमध्ये अपंग व्यक्तींना भेडसावणाऱ्या समस्यांबद्दल जागरूकता वाढवण्याच्या उद्देशाने १९९२ मध्ये युनायटेड नेशन्स जनरल असेंब्लीच्या ठराव ४७/३ मतांनी मंजूर झाला आणि दरवर्षी ३ डिसेंबरला आंतराष्ट्रीय दिव्यांग दिवस साजरा केला जाऊ लागला.*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

👉३ डिसेंबर १९५६ रोजी बाबासाहेबआंबेडकरांनी १६ डिसेंबर रोजी मुंबईत बौद्ध धम्मदीक्षा समारंभ कार्यक्रम आखला तसे मुंबईच्या कार्यकर्त्यांना कळविले. नानकचंद रत्तूना रेल्वेची फस्ट क्लासची चार तिकिटे बुक करण्यास सांगितली. पण तिकिटे बुक झाली नाहीत तेव्हा बाबासाहेबांनी १४ डिसेंबरची विमानांची तिकिटे बुक केली.

१४ ते १८ डिसेंबरपर्यंत बाबासाहेब मुंबईत कुमारसेन समर्थ यांच्याकडे थांबणार होते.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम*🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🦚🦚🦚☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ४ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, मग्गसिरो मासो, बुधवार, मार्गशिस माहे.

४ डिसेंबर १९२५ – रोजी बहिष्कृत हित्कारिणी सभेच्या विद्यमाने विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सोलापूर येथे अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी पाहिले मोफत वस्तिगृह सुरू केले.

४ डिसेंबर १९३० – रोजी प्रांतविषयक उपसमितीत विश्वरत्न, बोधिसत्व प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण.

४ डिसेंबर १९३८ – रोजी सोलापूर नगरपालिकेतर्फे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मानपत्र प्रदान.

४ डिसेंबर १९४४ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, पं. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुंबई सेंट्रलहून फ्रंटीयर मेलने दिल्लीस रवाना झाले.

४ डिसेंबर १९५० – रोजी विश्वरत्न, बोधिसत्व प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय दर सुची (चौथी सुधारणा) Indian tariff (Fourth amendment) bill विधेयक संसदेच्या चर्चेत भारतीय दर सुचीबाबत चर्चा करतांना म्हंटले की, कायदा हा कायदाच असतो, तो कधी छोटा किंवा मोठा नसतो.

४ डिसेंबर १९५४ – रोजी महात्मा ज्योतिराव फुले यांच्यावरील बोलपटाच्या मुहूर्ताप्रसंगी विश्वरत्न बोधिसत्त्व प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते.

४ डिसेंबर १९५६ – रोजी राज्यसभेत उपस्थित एस. एम. जोशी व आचार्य अत्रे यांनी रिपब्लिकन पक्षात येण्याबद्दल विश्वरत्न, बोधिसत्व प. पु., भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पत्र लिहिली त्याचप्रमाणे भारतात बौद्ध धम्माचा प्रसार करण्यासाठी आर्थिकसाह्य मिळावे म्हणून ब्रह्मदेशाच्या सरकारला एक पत्र लिहिले.

४ डिसेंबर १९७१ – रोजी भारतीय नौदळ दिन. भारतीय नौदलाच्या कामगिरीची आणि देशासाठीची भूमिका ओळखण्यासाठी दरवर्षी ४ डिसेंबर रोजी भारतात नौदल दिन साजरा केला जातो. १९७१ मध्ये ४ डिसेंबर हा दिवस निवडला गेला, ऑपरेशन ट्रायडेंट दरम्यान, भारतीय नौदलाने पाकिस्तानी नौदलाचा पराभव करत पीएनएस खैबरसह चार पाकिस्तानी जहाजे बुडवली. या दिवशी १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धात शहीद झालेल्यांचेही स्मरण केले जाते.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

👉४ डिसेंबर १९५६ रोजी रात्रीच्या जागरणामुळे बाबासाहेब उशिरा उठले. पण खूपच थकलेले वाटत होते. ११ वाजता जैन धर्मीय अधिवेशनासंबंधी चर्चा केली. त्यानंतर त्यांनी रिपब्लिकन पक्षाच्या अनुषंगाने थोर समाजवादी नेते एस. एम. जोशी व प्र. के. अत्रे यांना पत्र लिहिली त्याचप्रमाणे भारतात बौद्ध धम्माचा प्रसार करण्यासाठी आर्थिकसाह्य मिळावे म्हणून ब्रह्मदेशाच्या सरकारला एक पत्र लिहिले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम*🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🦚🦚🦚☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ५ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, मग्गसिरो मासो, गुरूवार, मार्गशिस माहे.

५ डिसेंबर १९१७ – रोजी भिंमरावांनी सिडनहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापकाच्या जागेसाठी अर्ज केला.

५ डिसेंबर १९५६ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जैन प्रतिनिधी मंडळाने बौद्ध धंम्म आणि जैन धर्म यावर भेट घेऊन चर्चा केली.

५ डिसेंबर १९५६ – रोजी दि बुद्धा अँड हिज धंम्मा या आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेवर शेवटचा हात फिरउन काही दुरुस्त्या करून या ग्रंथाचे लिखाण विश्वरत्न, बोधिसत्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पूर्ण केले.

५ डिसेंबर २०१३ – जागतिक मृदा दिन. मानवाच्या बदलत्या जीवनशैलीचा परिणाम, पर्यावरणाचा ऱ्हास, आणि अशा प्रकारच्या इतर अनेक कारणांमुळे मृदेची झीज मोठ्या प्रमाणावर होते. यासंदर्भात जागरूकता करण्याच्या दृष्टीने २०१३ साली संयुक्त राष्ट्राच्या महासभेत ५ डिसेंबर हा जागतिक मृदा दिवस साजरा करण्याचा संकल्प करण्यात आला. परंतु मृदा वाचविण्याची गरज का आहे? हेदेखील महत्त्वाचे असते. प्रदूषण व कीटनाशकांच्या अतिवापरामुळे दरवर्षी मातीची गुणवत्ता ही कमी होत जाते.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

५ डिसेंबर १९५६ रोजी बाबासाहेब मुंबईत होणारा धंम्मांतर (मुळ जीवन मार्ग) सोहळा, भारतात धंम्माचा प्रचार या चिंतेत होते. दिवसभर उर्वरित ग्रंथाचे लेखन केले हे ग्रंथ आपल्या हयातीत प्रकाशित व्हावेत, अशी त्यांची तळमळ होती. रात्री त्यांना अस्वस्थ वाटत होते. अशा अवस्थेतही बुद्ध आणि धम्म ग्रंथाची प्रस्तावना लिहिली. अत्रे, जोशी यांना लिहिलेली पत्रे डोळ्यांखालून घातली. झोपेचे इंजेक्शन घेऊन झोप येत नव्हती. हे सारे जवळून नानकचंद पाहात होते. या अनुषंगाने ते म्हणतात मला बाबासाहेबांचा चेहरा थकलेला दिसत होता. अशा अवस्थेतही त्यांनी मुंबईच्या तिकिटाची कार्यक्रमाची चौकशी केली. तेवढ्यात स्वयंपाकी सुदाम बाबांनी जेवणास बोलावले. डायनिंग हॉलचा मार्ग ड्रॉईंग रूममधूनच होता. या हॉलच्या दोन्ही बाजूंनी ग्रंथाची खचून भरलेली कपाटे होती ते पाहातच बाबासाहेब डायनिंग हॉलकडे गेले. इच्छा नसतानाही दोन खास खाल्ले. ड्रॉईंग हॉलमध्ये आल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर डोळे मिटून थोडा वेळ स्तब्ध झाले. एक दीर्घश्वास सोडला त्यांनी त्रिसरण म्हटले त्यानंतर नानकचंद कडून मालिश करून घेतली. मसाज झाल्यानंतर काठीच्या आधाराने उठले व उठतानाच 'चल उचल कबिरा तेरा भवसागर डेरा' असे म्हणाले नानकचंदाना बुद्ध गीताची रेकॉर्ड लावण्यास सांगितली. त्यांना चिंता होती दलितांच्या (वंचितांच्या) भविष्याची, रात्री ११.१५ वा. नानकचंद रत्तू घरी जाण्यास निघाले पण परत बाबासाहेबांनी बोलावून घेतले. त्यांनी लिहिलेली पत्र जवळ ठेवण्यास सांगितले. ११.३५ वा. नानकचंदांनी बाबासाहेबांची परवानगी घेतली, रत्तूनी बाबासाहेबांचे जवळून शेवटचे दर्शन घेतले.

☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम*🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🦚🦚🦚☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ६ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, मग्गसिरो मासो, शुक्रवार, मार्गशिस माहे.

६ डिसेंबर १९४५ – रोजी सेक्रेटरिएट मध्ये लेबर, प्राध्यापक, कमिशनर, सल्लागार व इतर अधिकारी यांच्या परिषदेचे मुंबईत विश्वरत्न, बोधिसत्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

६ डिसेंबर १९५६ – रोजी विश्वरत्न, महामानव, बोधिसत्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दिल्ली स्थित अलिपुर रोडवरील निवासस्थानी महापरिनर्वाण (अखेरचा श्वास/पुण्यतिथी).

६ डिसेंबर १९६४ – रोजी दादासाहेब गायकवाड यांचे नेतृत्त्वाखाली भूमिहीनांचा देशव्यापी सत्याग्रह, बामसेफ स्थापना.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

–"महामानवाचे महापरिनिर्वाण"–

रविवार, २ डिसेंबरला नानकचंद रत्तू सकाळी नेहमीप्रमाणे सव्वासातला आले, तेव्हा बाबासाहेब बिछान्यात पडून राहिले होते. त्याला पाहताच बाबासाहेब म्हणाले, "आलास वेळेवर ! आज आपल्याला खूप काम करायचे आहे." ते बिछान्यातून उठले, चहा घेतला व 'कार्ल मार्क्सचे ' 'दास कॅपिटल ' या ग्रंथातील मजकूर परत डोळ्यांखालून घालून 'buddha & his dhamma' या ग्रंथाच्या लेखनासाठी बसले. आणि नानकचंद ला टाईप करायला देत होते. हे काम संध्याकाळपर्यंत चालले. दिनांक ४ डिसेंबर ला बाबासाहेब सुमारे ८–४५ ला उठले. सकाळी सुमारे ११ वाजता बाबासाहेबांना भेटायला जैन धर्माचे काही लोक आले. त्यांनी याबाबतीत विचारविनिमय करावा अशी विनंती केली. बाबासाहेब त्यांना म्हणाले, 'यासंबंधी आपण उद्या रात्री ८–३० च्या नंतर चर्चा करू.

दिनांक ५ डिसेंबर १९५६ ला नानकचंद ऑफिस सुटल्याबरोबर बाबासाहेबांच्या बंगल्यावर आले. तसा बाबासाहेबांचा नोकर सुदाम याने त्यांना फोन केला होता. बाबासाहेबांना झोप लागत नव्हती. ते अस्वस्थ होते. अशा परिस्थितीतही बाबासाहेब मधूनमधून 'buddha & his dhamma' या ग्रंथांचा मजकूर लिहित होते ३–४ कागद लिहून झाले होते. तेव्हा नानकचंद संध्याकाळी ५–३० ला आले त्यावेळी बाबासाहेबांचा चेहरा म्लान झालेला व अस्वस्थ असलेले त्याला दिसले. त्यांनी नानकचंदला लिहिलेले कागद टाईप करण्यास दिले. त्यानंतर काही वेळ गेल्यावर संध्याकाळी बाबासाहेब डोळे मिटून हळू आवाजात 'बुद्धं शरणं गच्छामि' त्रिशरण म्हणू लागले. नंतर त्यांनी नानकचंदला 'बुद्ध भक्तिगीते' हि रेकॉर्ड लावायला सांगितली व त्या गीतांबरोबर आपणही गुणगुणू लागले नोकराने जेवण आणले तेव्हा बाबासाहेब म्हणाले 'जेवणाची इच्छा नाही' परंतु नानकचंद ने आग्रहाणे जेवावयास उठवले डायनिंग हॉलच्या दोन्ही बाजूंना भिंतींच्या कडेने ग्रंथांची कपाटे ओळीने लावलेली होती. त्या ग्रंथांच्या कपाटांना पाहत–पाहत बाबासाहेबांनी एक दीर्घ निःश्वास सोडला. आणि हळूहळू चालत डायनिंग टेबलापाशी गेले. इच्छा नसतांना दोन घास खाल्ले. नंतर नानकचंदला डोकीला तेल लावून मसाज करायला सांगितले. मसाज संपल्यावर ते काठीच्या साहाय्याने उभे राहिले आणि एकदम मोठ्यांदा म्हणाले, "चल उचल कबीरा तेरा भवसागर डेरा."

त्यावेळी ते फार थकलेले दिसत होते, चेहराही एकदम निस्तेज झाला होता. त्यांना झोप येऊ लागली तेव्हा नानकचंदने जाण्याची परवानगी मागितली. ते म्हणाले "जा आता. पण उद्या सकाळी लवकर ये. लिहिलेला मजकूर टाईप करावयाचा आहे."

नानकचंद निघाले तेव्हा रात्रीचे ११–१५ झाले होते.

दिनांक ६ डिसेंबर ला नानाकचंद सकाळी नेहमीपेक्षा उशीराच उठेल. ते सायकल बाहेर काढतात तोपर्यंत तर दारावर सुदाम उभा राहिला म्हणाला 'माईसाहेबांनी तुम्हांला लागलीच बोलावले आहे. नानाकचंद तसेच निघाले त्यांनी सुदामला विचारले एवढ्या घाईने का बोलावले आहे? आणि बंगल्यावर पोहचल्यावर ते बाबासाहेबांच्या बिछान्याजवळ गेले आणि म्हणाले "बाबासाहेब मी आलोय !" असे भांबवून मोठयांदा ओरडले. साहेबांच्या अंगाला हात लावला त्यांना ते गरम असल्याचा भास झाला म्हणून ते छातीचा मसाज करू लागले ऑक्सिजन देण्याचा प्रयत्न केला हे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले, तेव्हा कळून चुकले कि, बाबासाहेबांच्या जीवनाचा प्रचंड ग्रंथ आटोपलेला आहे.

बाबा गेल्याचे पाहून नानकचंद मोठ्यांदा रडू लागले. बंगल्यातील सर्व जण गोळा झाले माळ्याने तर बाबासाहेबांच्या पायावर लोळण घेतली आणि तोही रडू लागला.

पुढची व्यवस्था करायची म्हणून नानकचंद यांनी ९ वाजता फोन करण्यास सुरवात केली व सर्वांना हि बातमी कळविली आणि बाबासाहेबांचा पार्थिव देह मुंबईस राजगृह येथे विमानाने आणण्यात येणार आहे हि बातमी मुंबईतील लोकांना कळली तेव्हा लोकांचे थवेच्याथवे विमानतळाकडे जाऊ लागले. दिल्लीहून बाबासाहेबांचा पार्थिव देह घेऊन विमान निघाले सांताक्रूझ विमानतळावर रात्री उतरले. तिथे आधीच सगळी व्यवस्था करण्यात आली होती. अँबुलन्स (रुग्णवाहिका) विमानतळावरून राजगृहाकडे जाण्यास निघाली. हजारो लोक थंडीत कुडकुडत रस्त्याच्या दोन्ही बाजूंना हातात हार घेऊन व डोळ्यातून अश्रूंना वाट करून देत उभे होते. वंदना घेत घेत अँबुलन्स (रुग्णवाहिका) हळूहळू चालत राजगृहाला आली. तेव्हा राजगृहापुढे जमलेल्या लाखो लोकांच्या तोंडून एकच आर्त स्वर निघाला. 'बाबा !' आणि ते रडू लागले.

स्त्रियांचा आक्रोश तर विचारायलाच नको ! मातांनी आपली मुले बाबांच्या चरणावर घातली. काहींनी भिंतीवर डोकी आपटली, कित्येकजणी मुर्च्छित पडल्या.

हिंदू कॉलनीतील सवर्ण हिंदूंना बाबासाहेबांच्या पार्थिव देहाचे दर्शन घेण्यासाठी रांगेत तीन–चार तास उभे राहावे लागले. हिंदू कॉलनीतील लोकांनी, 'आमच्या वस्तीतील ज्ञानियांचा राजा गेला ! आमच्या हिंदू कॉलनीचे भूषण हरवले !' असे उद्गार काढले.

एवढी जरी गर्दी तेथे जमली होती तरी लोक अत्यंत शिस्तीने अत्यंदर्शनासाठी उभे होते.

बाबांचा पार्थिव देह राजगृहात आणल्यानंतर बौद्ध भिक्षूंनी धार्मिक विधी पार पाडला हा विधी अत्यंत साधा होता. नंतर बाबासाहेबांच्या पार्थिव देहावर पावित्र्यनिदर्शक अशी

शुभ्र वस्त्रे चढविण्यात आली पार्थिव देहाजवळ असंख्य मेणबत्त्या लावण्यात आल्या होत्या. त्यांच्या उशाला बुद्धांची एक मूर्ती होती. दुपारी एक वाजेपर्यंत सुमारे दोन लक्ष (लाख) लोकांनी अंत्यदर्शन घेतले. बाबासाहेबांच्या दुःखद निधनामुळे सुमारे दोन लक्ष कामगारांनी हरताळ पाळला. त्यामुळे पंचवीस कापड गिरण्या पूर्णपणे बंद होत्या. अनेकांनी आपली दुकाने बंद केली होती. शाळा कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी देखील हरताळात भाग घेतला होता.

एका शृंगाररलेल्या ट्रकवर बाबासाहेबांचा पार्थिव देह ठेवण्यात आला. त्या मागे बुद्धांची मूर्ती ठेवण्यात आली होती. त्यांच्याशेजारीच पुत्र यशवंतराव (उर्फ भय्यासाहेब आंबेडकर) व पुतणे मुकुंदराव बसले होते. मिरवणुकीची लांबी सुमारे दीड ते दोन मैल होती. किमान दहा लाख लोकांनी भारताच्या या बंडखोर सुपुत्राचे अंतिम दर्शन घेण्यासाठी मार्गावर दुतर्फा गर्दी केली होती. एवढी मोठी प्रचंड गर्दी ! पण बेशिस्त वर्तनाचा एकही प्रकार कुठेही घडला नाही. अशाप्रकारे डॉ. बाबासाहेबांची अंत्ययात्रा निघाली परळ नाक्यापासून मिरवणूक एल्फिन्स्टनरोडकडे निघाली तेव्हा जिकडे तिकडे माणसांशिवाय दुसरे काहीच दिसत नव्हते. बरोबर दिनांक ७ डिसेंबर ५ वाजता महायात्रा दादरच्या चौपाटीवर आली. डॉ. बाबासाहेबांच्या शवाला अग्नी देण्यासाठी भागेश्वर स्मशानभूमीतच समुद्राच्या बाजूच्या भिंतीलगत एक वाळूचा प्रचंड चौथरा तयार करण्यात आला होता. बाबांचे शव ट्रकच्या खाली उतरविण्यात आले मेणबत्यांचे तबके घेतलेले चार भिक्षु पुढ होते. बाबासाहेबांचे शव सर्वांना दिसेल अशाप्रकारे एका उंच मंचकावर ठेवण्यात आले. मुंबई सरकारतर्फे बाबासाहेबांच्या पार्थिव देहाला पुष्पहार अर्पण करण्यात आला. मुंबईतील व बाहेरगावची अनेक प्रमुख मंडळी उपस्थित होती. भिक्षूंनी धार्मिक विधीस प्रारंभ केला ते करूण दृश्य पाहतांना अनेकांच्या डोळ्यातून अश्रू वाहत होते. त्यांचा हा विधी आनंद कौसल्यायन यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. यानंतर बाबासाहेबांचे शव चंदनाच्या चितेवर चढविले आणि डॉ. बाबासाहेबांच्या पार्थिव शवाला सशत्र पोलीस दलाने त्रिसर बंदुकीने बार काढून मानवंदना दिली व बिगुलाच्या गंभीर स्वरात त्यांच्या देहाला पुत्र यशवंतराव यांच्या हस्ते संध्याकाळी ७-१५ वाजता अग्नी देण्यात आला बाबासाहेबांच्या शवाला अग्नी देताच यांचे आप्तस्वकीय यांना संयम आवरता आला नाही ते चीतेकडे धावले ओक्साबोक्शी रडू लागले व त्यांनी पुन्हा 'बाबांचे' शेवटचे दर्शन घेतले. आणि काही क्षणात बाबासाहेबांचा पार्थिव देह कायमचा अनंतात विलीन झाला.

रविवार दिनांक ९ ला सकाळी ८ वाजता दादर चौपाटीवर विस्तीर्ण वाळूच्या पटांगणात जाहीर शोकसभा झाली अध्यक्ष भदंत कौसल्यायन हे होते. आणि अनेक वक्ते उपस्थितीत होते. अनेकांची भाषणे झाली श्रीमती रेणू चक्रवर्ती यांनी भाषणात हे उद्गार काढले 'आम्हा तरुण सभासदांना डॉ. आंबेडकर यांच्या सान्निध्यात राहण्याचा अगर त्यांच्यबरोबर काम करण्याचा सुयोग मिळाला नाही. डॉ. आंबेडकर यांनी राज्यघटना व हिंदू कायद्याची संहिता जी मुळ तयार केली होती, ती उकृष्ट होती. आणि जोपर्यंत या दोन कृती भारतात अस्तीत्वात राहतील तोपर्यंत आंबेडकरांच्या अद्वितीय बुद्धीमत्तेचा व कर्तुत्वाचा स्मृतीदीप भारतात तेवत राहील .हिंदू समाजातील पिडीत व दलित लोकांना त्यांनी ज्ञानाची संजीवनी पाजून जिवंत केले आणि आपल्या मानवी हक्कांसाठी लढण्यास उभे केले. त्याचप्रमाणे त्यांनी पददलितांबद्दलची वरिष्ठ वर्गाची दृष्टी बदलून टाकली हे त्यांचे अनुपम थोर राष्ट्रकार्य होय.'

त्यानंतर आचार्य अत्रे यांनी सुद्धा भाषण केले ते म्हणाले 'या महान नेत्याच्या मृत्युच्या मृत्यूने मृत्यूचीच कीव वाटू लागली आहे. मरणानेच आज आपले हसू करून घेतले आहे. मृत्यूला काय दुसरी माणसे दिसली नाहीत? मग त्याने इतिहास निर्माण करण्याऱ्या एका महान जीवनाच्या या ग्रंथावर, इतिहासाच्या एका पर्वावरच का झडप घातली? भारताला महापुरुषांची वाण कधी पडली नाही. परंतु असा युगपुरुष शतकाशतकात तरी होणार नाही. झंझावाताला मागे सारणारा, महासागराच्या लाटांसारखा त्यांचा अवखळ स्वभाव होता. जन्मभर त्यांनी बंड केले. आंबेडकर म्हणजे बंड असा बंडखोर शूरवीर, बहाद्दर पुरुष आज मृत्युच्या चिरनिद्रेच्या मांडीवर कायमचा विसावा घेत आहे. त्यांचे वर्णन करण्यास शब्द नाहीत.'

महामानवास माझे त्रिवार अभिवादन.... व कोटी कोटी प्रणाम......

! जयभीम ! !! नमो बुद्धाय !! !!! जय भारत !!!

☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🦚🦚🦚☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ७ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, मग्गसिरो मासो, शनिवार, मार्गशिस माहे.

७ डिसेंबर १९४० – रोजी चंदनवाडी मुंबई येथे विश्वरत्न, बोधिसत्त्व परमपूज्य भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली इमारत फंडाची जाहीर सभेत त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "भेदभाव कराल तर अधोगतीला जाल." (सदर भाषण जनता वृतपत्रात १४ डिसेंबर १९४६ रोजी प्रकाशित झाले.)

*७ डिसेंबर १९४४ – रोजी आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक उड्डाण दिन.

८० वर्षांपासून, आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक संघटना (ICAO) ही जागतिक विमान वाहतुकीच्या सुरक्षित, सुरक्षित आणि शाश्वत विकासामागील प्रेरक शक्ती आहे. १९४४ पासून, ICAO ने सामाजिक-आर्थिक प्रगती, स्त्री-पुरुष समानता आणि नावीन्यपूर्ण संस्कृतीला चॅम्पियन करताना उद्योगाची भरभराट होण्यास सक्षम केलेले मानके सेट केले आहेत. आम्ही हा मैलाचा दगड साजरा करत असताना, २०५० पर्यंत निव्वळ-शून्य कार्बन उत्सर्जन साध्य करण्याच्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टासह, ICAO ने विमानचालनाचा कार्बन फूटप्रिंट कमी करण्याच्या आपल्या अटूट वचनबद्धतेची पुष्टी केली.

७ डिसेंबर १९९४ पासून आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक संघटना (ICAO) द्वारे हा दिवस साजरा केला जात आहे, आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक करारावर स्वाक्षरी

केल्याच्या ५० व्या वर्धापन दिनानिमित्त. जगाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी विमानचालनाचे, विशेषत: आंतरराष्ट्रीय हवाई प्रवासाचे महत्त्व ओळखणे हा या दिवसाचा उद्देश आहे. १९९६ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने ७ डिसेंबर हा आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण दिन म्हणून घोषित केला.*

७ डिसेंबर १९४९ – रोजी भारतीय सशस्त्र सेना ध्वज दिन. सशस्त्र सेना ध्वज दिन किंवा भारताचा ध्वज दिन हा भारताच्या सशस्त्र दलातील सैनिक आणि दिग्गजांचा सन्मान करण्यासाठी समर्पित दिवस आहे. १९४९ पासून भारतात दरवर्षी ७ डिसेंबर रोजी साजरा केला जातो.

७ डिसेंबर १९५६ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पार्थिव देह खास विमानाने मुंबईत आणून राजगृह या मुंबईतील निवासस्थानी दर्शनार्थ ठेवला. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पार्थिवावर चैत्यभूमी दादर येथे बौद्ध धंम्म पद्धतीने अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पूर्वी शासनातर्फे त्यांच्या सन्मानार्थ पोलीस मानवंदना देण्यात आली. अंत्यसंस्काराच्या दिवसी, दादर, मुंबईच्या चैत्यभुमी येथे सुमारे पाच लाख (५०००००) लोकांचा समूह जमा झाला.

७ डिसेंबर १९५६ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मुंबई येथे अंत्ययात्रा व २५००००० पंचवीस लाख अनुयायांची बौद्ध धंम्म दीक्षा, मुंबई.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸💐💐💐🔵🔵🔵💎 भारतीय सशस्त्र सेना ध्वज दिन. 💎🔵🔵🔵💐💐💐☸☸

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेचच, सरकारने आपल्या संरक्षण कर्मचाऱ्यांच्या कल्याणाचे व्यवस्थापन करण्याची गरज निर्माण झाली. २८ ऑगस्ट १९४९ रोजी संरक्षण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीने दरवर्षी ७ डिसेंबर रोजी ध्वज दिन पाळण्याचा निर्णय घेतला. ध्वज दिन पाळण्यामागील संकल्पना सामान्य जनतेला लहान ध्वजांचे वाटप करणे आणि त्या बदल्यात देणग्या गोळा करणे ही होती. देशासाठी लढणाऱ्या सशस्त्र दलातील जवानांच्या कुटुंबांची आणि आश्रितांची काळजी घेणे ही भारतातील नागरिकांची जबाबदारी आहे असे मानल्यामुळे ध्वज दिनाला अधिक महत्त्व प्राप्त होते.

जवाहरलाल नेहरू, जे तत्कालीन भारताचे पंतप्रधान होते, ७ डिसेंबर १९५४ रोजी म्हणाले :–

काही आठवड्यांपूर्वी, मी भारत–चीनला भेट दिली आणि तेथील आंतरराष्ट्रीय आयोगाशी संबंधित आमचे अधिकारी आणि माणसे पाहिली. त्यांचे स्मार्ट बेअरिंग आणि त्या दूरच्या देशात ते करत असलेले चांगले काम पाहून मला एक रोमांच मिळाला. मला अजून आनंद झाला तो म्हणजे तिथल्या लोकांमध्ये त्यांची सामान्य लोकप्रियता. त्यांच्या कार्यक्षमतेने तसेच त्यांच्या मित्रत्वाने त्यांनी भारताची प्रतिष्ठा वाढवली. त्यात भारताच्या सर्व भागांतील लोक होते. त्यांनी आपापसात कोणतेही प्रांतिक किंवा इतर मतभेद पाहिले नाहीत. मला खात्री आहे की माझ्या देशबांधवांना त्यांच्याबद्दल शिकून आनंद होईल आणि ते आपल्या देशाची इथे आणि इतरत्रही चांगल्या प्रकारे सेवा करणाऱ्या या तरुणांबद्दल त्यांचे कौतुक दर्शवू इच्छितो. प्रशंसा दर्शविण्याचा एक मार्ग म्हणजे ध्वज दिन निधीमध्ये योगदान देणे.

भारतीय सशस्त्र दलाचा ध्वज युनायटेड किंगडमच्या संरक्षण मंत्रालयासारखाच आहे, जो पहिल्यांदा १९५६ मध्ये वापरला गेला होता, आणि ब्रिटीश–संरेखित प्रदेशांमध्ये सामान्य रंगसंगती आहे, ज्याचा वापर सायप्रस, केनियासह सहकारी राष्ट्रकुल राष्ट्रांद्वारे केला जातो. आणि नायजेरिया.

☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸💐💐💐💎 *सविनय जयभीम* 🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎💐💐💐☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ८ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, मग्गसिरो मासो, रविवार, मार्गशिस माहे.

८ डिसेंबर १९२८ – रोजी श्रीक्षेत्र निर्मल जिल्हा येथे विश्वरत्न, बोधिसत्त्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली ठाणे जिल्ह्यातील अस्पृश्यांची (वंचितांची) सभा संपंन्न झाली.

८ डिसेंबर १९३३ – रोजी अरोला वर्णाश्रम स्वराज्य संघाचे मंत्री श्री. ग. द. जोशी यांनी मंदिर प्रवेश बिलाला विरोध करणारे पत्रक प्रसिद्ध केले.

८ डिसेंबर १९३५ – रोजी फोरास रस्ता मुंबई येथे विश्वरत्न, बोधिसत्त्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धंम्मांतरासंबंधी पहिले भाषण, मुंबई.

८ डिसेंबर १९४३ – डॉ. एम. एन. रॉय स्थापित हिंदी कामगार फेडरेशनच्या (इंडीयन फेड्रेशन ऑफ लेबर) वार्षिक अधिवेशनाचे विश्वरत्न, बोधिसत्त्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते मुंबईतील वरळी जेल जवळील मैदानात उद्घाटन झाले.

८ डिसेंबर १९५५ – "मुंबई महाराष्ट्राचीच आहे व राहील." असे विश्वरत्न, बोधिसत्त्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी औरंगाबादमधील सभेत सांगितले.

८ डिसेंबर १९५६ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुत्र यशवंत उर्फ भैय्यासाहेब यांनी बाबासाहेबांच्या पवित्र अस्थि मुंबईच्या चैत्यभूमी येथून गोळा केल्या. त्यांच्या सोबत लोकशाही (रिपब्लिकन) पक्ष भारतचे कोषाध्यक्ष असलेले दहिवेळकर बुवाजी होते.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम*🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🦚🦚🦚☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ९ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, मग्गसिरो मासो, सोमवार, मार्गशिस माहे.

९ डिसेंबर १७६१ – रोजी महाराणी ताराबाई यांना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन. छत्रपती शिवरायांनी निर्मिलेल्या स्वराज्याचे प्राणपणाने रक्षण करणार्या स्वराज्य रक्षिका.

९ डिसेंबर १९३३ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लंडनहून जनता वर्तमान पत्रासाठी पत्र पाठविले.

९ डिसेंबर १९४३ – रोजी भारत सरकारचे मजूर मंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बिहार मधील धनबाद येथील भुलन बरारी कोळसा खाणींची ४०" फूट खाणीत उतरून प्रत्यक्ष पाहणी केली. मजुरांना भेटून त्यांचे प्रश्न समजून घेतले. कामगारांच्या वसाहतीला भेट देऊन त्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या.

९ डिसेंबर १९४५ – रोजी मनमाड येथील अस्पृश्य विद्यार्थी बोर्डिंगच्या इमारतीची कोनशिला विश्वरत्न, बोधिसत्त्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हस्ते बसविण्यात आली.

९ डिसेंबर १९४६ – रोजी संविधान समितीची पहिली बैठक सच्चिदानंद सिंन्हा यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे पार पडली.

९ डिसेंबर १९४९ – कोल्हापूर बिंदू चौक येथे सामाजिक कार्यकर्ते भाई माधवराव बागल यांच्या पुढाकाराने विश्वरत्न, बोधिसत्त्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पहिला पुतळा ते हयात असतानाच उभारण्यात आला.

*९ डिसेंबर २००३ – रोजी आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन.

भ्रष्टाचारविरोधी जनजागृती करण्यासाठी ३१ ऑक्टोबर २००३ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या भ्रष्टाचाराविरुद्धचा करार मंजूर झाल्यापासून दरवर्षी ९ डिसेंबर रोजी आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन पाळला जातो.*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚🔵🔵🔵💎 मराठा साम्राज्याच्या छत्रपती, महाराणी. 💎🔵🔵🔵🦚🦚🦚☸☸

छत्रपती महाराणी ताराबाई भोसले (१६७५–१७६१) ह्या छत्रपती राजाराम महाराज यांच्या पत्नी होत्या. या छत्रपती शिवाजी महाराज यांचे सरसेनापती हंबीरराव मोहिते यांची कन्या होती. ताराबाईंचे लग्न छत्रपती राजाराम महाराजांशी १६८७ च्या सुमारास झाले. २५ मार्च १६८९ रोजी मोगलांनी रायगडास वेढा घातला असता त्या छत्रपती राजाराम यांच्यासह रायगडावरून निसटून गेल्या. छत्रपती राजाराम जिंजीला गेल्यानंतर महाराणी ताराबाई, राजसबाई व अंबिकाबाई या विशाळगड येथे राहिल्या. रामचंद्रपंत अमात्य यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी विशाळगड येथे लष्करी व मुलकी व्यवहाराची माहिती घेतली. १६९४ साली त्या तिघी जिंजीला पोहचल्या. ९ जून १६९६ रोजी महाराणी ताराबाईंना शिवाजी द्वितीय हा पुत्र झाला.

राजाराम महाराजांच्या निधनानंतर राज्यकारभाराची सर्व सूत्रे हाती घेउन ताराबाईंनी मोगली फौजांना मागे सारण्यासाठी आक्रमक भूमिका घेतली. त्यांनी मराठेशाहीतील मुत्सद्यांना काळाचे गांभीर्य समजावून देऊन शेवटपर्यंत या सगळ्यांबरोबर एकजुटीने राहून शत्रू थोपवून धरला. त्या स्वतः लष्करापुढे येउन लष्कराचा आत्मविश्वास वाढवित. मराठ्यांची खालावलेली आर्थिक परिस्थिती उंचावण्यासाठी त्यांनी मोगली मुलुखावर स्वाऱ्या करून चौथाई आणि सरदेशमुखी गोळा करून आर्थिक बळ वाढवले.

ताराबाईंनी करवीर राज्याची म्हणजे कोल्हापूरच्या राजगादीची त्यांनी स्थापना केली. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्यामागे त्यांनी समर्थपणे राज्याची धुरा सांभाळली. सरसेनापती संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांना बरोबर घेऊन त्यांनी मोगलांना सळो की पळो करून सोडले.

"दिल्ली झाली दीनवाणी| दिल्लीशाचे गेले पाणी |

ताराबाई रामराणी | भद्रकाली कोपली ||

ताराबाईच्या बखते | दिल्लीपतीची तखते |

खचो लागली तेवि मते | कुराणेही खंडली ||

रामराणी भद्रकाली | रणरंगी कृद्ध झाली |

प्रलयाची वेळ आली | मुगलहो सांभाळा ||"

असे तत्कालीन कवि गोविंद यांनी ताराबाईचे वर्णन केले आहे.

ताराबाई औरंगजेबाच्या प्रचंड मुघल सैन्याविरुद्ध उभ्या ठाकल्या असताना केवळ २४ ते २५ वर्षांच्या होत्या. त्यांनी औरंगजेबासारख्या मुत्सदी, नृशंस व कपटी सम्राटाशी सलग साडेसात वर्षे लढा दिला.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 #९ डिंसेबर १९५० 🙏💎🦚🦚🦚☸☸

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जगातील पहिला पुतळा; स्वतः बाबासाहेबांनी पाहिलेला 'हा' एकमेव पुतळा.

भाई माधवराव बागल यांच्या पुढाकाराने जगातील पहिला पुतळा कोल्हापुरात :–

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा जोतिराव फुले यांचे कार्य आणि विचार सर्वांपर्यंत पोहोचले पाहिजेत, ही भावना ठेवून थोर समाजसुधारक माधवराव बागल यांनी कोल्हापुरात दोघांचेही पुतळे उभारण्याचे प्रयत्न सुरू केले. त्यासाठी डॉ. आंबेडकर पुतळा प्रतिमा समिती सुद्धा बनविण्यात आली. या समितीचे माधवराव बागल अध्यक्ष होते. #९ डिसेंबर १९५० साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा जोतीराव फुले यांचे ब्रॉन्झमधील दोन पुतळे उभारण्यात आले. कोल्हापुरातील ऐतिहासिक बिंदू चौक येथे हे पुतळे उभारण्यात आले. विशेष म्हणजे बाबासाहेब आंबेडकर यांच्या हयातीमध्येच त्यांनी हा पुतळा उभारला होता. त्यामुळे बाबासाहेबांचा हा जगातील पहिलाच पुतळा ठरला. स्वतः बाबासाहेब आंबेडकर एकदा कोल्हापूर दौऱ्यावर आले असता त्यांनी याठिकाणी भेट देऊन पुतळा पाहिला होता, अशी माहिती इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांनी 'ईटीव्ही भारत' शी बोलताना दिली. माधवराव बागल यांनी बाबासाहेबांचा हा पुतळा प्रसिद्ध शिल्पकार श्री. बाळ चव्हाण यांच्याकडून बनवून घेतला होता.

पुतळा अनावरण सर्वसामान्य जनतेच्या हस्ते :–

कोल्हापुरातील ऐतिहासिक बिंदू चौकात उभारण्यात आलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा जोतीराव फुले यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी भव्य असा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाला माधवराव बागल यांनी कोणत्याही मोठ्या व्यक्तीला बोलावले नाही. समितीच्या बैठकीत करवीरमधील जनतेच्या हस्तेच पुतळ्यांचे अनावरण करण्याचे ठरले. त्यानुसार बागल यांनी ९ डिसेंबर १९५० रोजी करवीर म्हणजेच कोल्हापुरातील बिंदू चौक येथे आयोजित कार्यक्रमस्थळी आलेल्या काही सामान्य नागरिकांच्या हस्तेच या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. शिवाय तत्कालीन नगराध्यक्ष द. मा. साळोखे यांच्या प्रमुख उपस्थितीत समितीकडून नगरपालिकेस तो प्रदान करण्यात आला. करवीर नगरातील तरुणांना आंबेडकर यांच्याकडून सतत स्फूर्ती मिळावी या हेतूने बनविलेले दोन्ही पुतळे सर्वांना प्रेरणा तर देत आहेतच शिवाय अनेक आंबेडकरवादी नागरिकांसाठी हे आदराचे स्थान बनलेले आहे.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम*🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🦚🦚🦚☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १० डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, मग्गसिरो मासो, मंगळवार, मार्गशिस माहे.

१० डिसेंबर १८८२ – रोजी महात्त्मा ज्योतिराव फुले यांचे "भारतीय शेतकऱ्यांच्या दुराव्यवस्था" या विषयावर मुंबई येथे भाषण.

१० डिसेंबर १९३८ – रोजी बिडी कामगार युनियनला स्वतंत्र मजूर पक्षाशी संलग्न करण्याविषयी ठराव नागपूर येथे मंजूर.

१० डिसेंबर १९४३ – रोजी बिहार मधील राणीगंज खाणींना भेट देऊन मजूर मंत्री विश्वरत्न, बोधिसत्त्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी खाणीतील मजुरांची सुरक्षितता, प्रसाधन व्यवस्था, आरोग्य सुविधा आदींची तसेच मजुरांच्या वसाहतीची पाहणी केली.

१० डिसेंबर १९४५ – रोजी अकोला येथे वऱ्हाड प्रांतिक शेड्युल्ड कास्टस फेडरेशनच्या पहिल्या परिषदेत भारत सरकारचे मजूर मंत्री, विश्वरत्न, बोधिसत्त्व, परमपूज्य, भारतीय घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "आपण अभ्यासाचा प्रतिबंध केला नाही तर आपला उद्धार होणे शक्य तरी आहे काय?" (सदर भाषण जनता वृत्तपत्रात २२ डिसेंबर १९४५ रोजी प्रकाशित झाले.)

*१० डिसेंबर १९४८ – रोजी जागतिक मानवी हक्क दिन.

१० डिसेंबर १९४८ रोजी युनायटेड नेशन्स जनरल असेंब्लीच्या दत्तक आणि घोषणेचा सन्मान करण्यासाठी ही तारीख निवडण्यात आली, मानवी हक्कांच्या सार्वभौमिक घोषणा (UDHR), मानवी हक्कांची पहिली जागतिक घोषणा आणि नवीन क्षेत्रातील पहिल्या मोठ्या यशांपैकी एक. युनायटेड नेशन्स. मानवाधिकार दिनाची औपचारिक स्थापना ४ डिसेंबर १९५० रोजी सर्वसाधारण सभेच्या ३१७ व्या पूर्ण सभेत झाली, जेव्हा महासभेने ठराव ४२३(V) घोषित केला, सर्व सदस्य राज्यांना आणि इतर कोणत्याही इच्छुक संस्थांना त्यांना योग्य वाटेल तसा दिवस साजरा करण्यासाठी आमंत्रित केले.*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚🔵🔵🔵💎 *१० डिसेंबर १९४८ – रोजी जागतिक मानवी हक्क दिन.* 💎🔵🔵🔵🦚🦚🦚☸☸

१० डिसेंबर १९४८ रोजी युनायटेड नेशन्स जनरल असेंब्लीच्या दत्तक आणि घोषणेचा सन्मान करण्यासाठी ही तारीख निवडण्यात आली, मानवी हक्कांच्या सार्वभौमिक घोषणा (UDHR), मानवी हक्कांची पहिली जागतिक घोषणा आणि नवीन क्षेत्रातील पहिल्या मोठ्या यशांपैकी एक. युनायटेड नेशन्स. मानवाधिकार दिनाची औपचारिक स्थापना ४ डिसेंबर १९५० रोजी सर्वसाधारण सभेच्या ३१७ व्या पूर्ण सभेत झाली, जेव्हा महासभेने ठराव ४२३(V) घोषित केला, सर्व सदस्य राज्यांना आणि इतर कोणत्याही इच्छुक संस्थांना त्यांना योग्य वाटेल तसा दिवस साजरा करण्यासाठी आमंत्रित केले.

हा दिवस सामान्यतः उच्च–स्तरीय राजकीय परिषदा आणि बैठका आणि मानवी हक्कांच्या समस्यांशी संबंधित सांस्कृतिक कार्यक्रम आणि प्रदर्शनांद्वारे चिन्हांकित केला जातो. याशिवाय, पारंपारिकपणे १० डिसेंबर रोजी मानवी हक्क क्षेत्रातील संयुक्त राष्ट्र पुरस्कार आणि नोबेल शांतता पुरस्कार प्रदान केला जातो. मानवी हक्क क्षेत्रात सक्रिय असलेल्या अनेक सरकारी आणि गैर–सरकारी संस्था देखील अनेक नागरी आणि सामाजिक-कारण संस्थांप्रमाणेच या दिवसाच्या स्मरणार्थ विशेष कार्यक्रमांचे वेळापत्रक आखतात.

इतिहास :–

मानवी हक्क दिन हा १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने मानवी हक्कांचा सार्वत्रिक जाहीरनामा स्वीकारला तो दिवस.

मानवाधिकार दिनाची औपचारिक सुरुवात १९५० पासून झाली, जेव्हा असेंब्लीने ठराव ४२३(V) संमत करून सर्व राज्ये आणि इच्छुक संस्थांना प्रत्येक वर्षी १० डिसेंबर हा मानवाधिकार दिन म्हणून स्वीकारण्याचे आमंत्रण दिले. या दिवसाची लोकप्रियता या वस्तुस्थितीवरून दर्शविली जाऊ शकते की १९५२ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या पोस्टल प्रशासनाद्वारे जारी करण्यात आलेल्या स्मरणार्थ मानवी हक्क दिनाच्या स्टॅम्पला अंदाजे २००,००० आगाऊ ऑर्डर प्राप्त झाले.

जेव्हा सर्वसाधारण सभेने घोषणा स्वीकारली, ४८ राज्यांच्या बाजूने आणि आठ गैरहजर राहिल्या, तेव्हा ते "सर्व लोकांसाठी आणि सर्व राष्ट्रांसाठी एक सामान्य मानक उपलब्धी" म्हणून घोषित केले गेले, ज्याच्या दिशेने व्यक्ती आणि समाजांनी "प्रगतीशील उपायांनी प्रयत्न केले पाहिजेत, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय, त्यांची सार्वत्रिक आणि प्रभावी ओळख आणि पालन सुरक्षित करण्यासाठी. वकिल आणि समीक्षक दोघांनीही हे उपाय "कायद्यांपेक्षा अधिक घोषणात्मक, बंधनकारक करण्यापेक्षा अधिक सूचक" म्हणून प्राप्त केले.

राजकीय, नागरी, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अधिकारांच्या विस्तृत श्रेणीसह घोषणापत्र बंधनकारक नसले तरी, त्याने ६० पेक्षा जास्त मानवाधिकार साधनांना प्रेरित केले जे एकत्रितपणे मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीय मानक बनवतात. आज जाहीरनाम्यात नमूद केलेल्या मूलभूत मानवी हक्कांवर सर्व संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य राष्ट्रांची सर्वसाधारण संमती ते आणखी मजबूत करते आणि मानवी हक्कांच्या प्रासंगिकतेवर जोर देते. दैनंदिन जीवन. कोणाच्या मते?

मानवाधिकार उच्चायुक्त, मुख्य संयुक्त राष्ट्र अधिकार अधिकारी म्हणून आणि त्यांचे कार्यालय मानवी हक्क दिनाच्या वार्षिक निरीक्षणासाठी प्रयत्नांना समन्वयित करण्यात प्रमुख भूमिका बजावते:

आज, गरिबी हे जगातील सर्वात गंभीर मानवी हक्कांचे आव्हान आहे. गरिबी, वंचितता आणि बहिष्कारांशी मुकाबला करणे ही धर्मादाय बाब नाही आणि देश किती श्रीमंत आहे यावर ते अवलंबून नाही. मानवी हक्कांच्या बंधनाचा मुद्दा म्हणून गरिबीचा सामना करून, जगाला आपल्या जीवनकाळात ही अरिष्ट दूर करण्याची अधिक चांगली संधी मिळेल... गरिबी निर्मूलन हे एक साध्य करण्यायोग्य ध्येय आहे.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🦚🦚🦚☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ११ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, मग्गसिरो मासो, बुधवार, मार्गशिस माहे.

११ डिसेंबर १९२७ – रोजी बारा पाखाडी, पाली, दांडा रोड, वांद्रे, मुंबई येथील मंडळींच्या विद्यमाने महामानव, विश्वरत्न, बोधिसत्त्व, परमपूज्य भारतीय घटनेचे शिल्पकार, मजूर मंत्री, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली महाड सत्याग्रहाच्या मदतिकरिता झालेल्या जाहीर सभेत त्यांनी महाड सत्याग्रहात भाग घेण्यासाठी आवाहन केले.

११ डिसेंबर १९३० – रोजी महामानव, विश्वरत्न, बोधिसत्त्व, परमपूज्य भारतीय घटनेचे शिल्पकार, मजूर मंत्री, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रणखांबे यांना लंडनहून पाठविलेल्या पत्रात इंग्रजीचे महत्त्व नमूद केले.

११ डिसेंबर १९३८ – रोजी श्रीरामपूर जिल्हा नगर येथे महार परिषदेत महामानव, विश्वरत्न, बोधिसत्त्व, परमपूज्य भारतीय घटनेचे शिल्पकार, मजूर मंत्री, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अध्यक्षीय भाषण केले.

११ डिसेंबर १९५५ – रोजी महामानव, विश्वरत्न, बोधिसत्त्व, परमपूज्य भारतीय घटनेचे शिल्पकार, मजूर मंत्री, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे रिपब्लिकन पक्ष घटना मासुद्यासंबंधी नाशिक येथे कार्यकारी समिती समोर मार्गदर्शन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम*🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🦚🦚🦚☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १२ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, मग्गसिरो मासो, गुरूवार, मार्गशिस माहे.

१२ डिसेंबर १९१२ – रोजी भीमराव व रमाबाई आंबेडकर दांपत्याला पुत्ररत्न झाले. त्याचे नाव यशवंत ठेवण्यात आले. बाबासाहेबांच्या पश्चात यशवंतराव भैय्यासाहेब म्हणून ओळखिले गेले.

१२ डिसेंबर १९२७ – रोजी महाड येथील चवदार तळे हे खाजगी मालकीचे असल्यामुळे अस्पृश्यांना पाणी पिण्यास मज्जाव करावा असा दावा सवर्ण गावकऱ्यांनी दाखल केला.

१२ डिसेंबर १९३८ – रोजी मुंबई येथे अस्पृश्य विद्यार्थ्यांतर्फे विद्यार्थी संमेलन.

१२ डिसेंबर १९४५ – रोजी मध्यप्रांत वऱ्हाड शेड्युल्ड कास्टस फेडरेशन, अभ्यंकर रोड, सीताबर्डी, नागपूर यांच्या विद्यमाने झाले जाहीर व्याख्यान.

१२ डिसेंबर १९५५ – रोजी महामानव, विश्वरत्न, बोधिसत्त्व, परमपूज्य भारतीय घटनेचे शिल्पकार, मजूर मंत्री, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संभाजीनगर (औरंगाबाद) येथील महाविद्यालयाचे मिलिंद महाविद्यालय असे नामकरण केले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

🌷 *१२ डिसेंबर १९१२, सूर्यपुत्र यशवंत उर्फ भैय्यासाहेब आंबेडकर जयंती.* 🌷

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जिवित एकुलते एक सुपुत्र यशवंत उर्फ भैय्यासासाहेब आंबेडकर यांचा जन्म दिवस १२ डिसेंबर १९१२ असुन त्यांच्या उपेक्षित जिवनपटाचा संक्षिप्त अहवाल, माहीती. *दि. १२–१२–१९१२ बि. आय. टि. चाळ 1/50, मुंबई, येथे जन्म.* *दि. २७–५–१९३५ आई रमाई यांचे निधन.* *१९४२ – जनता पत्राचे संपादकत्व* *१९५२ – प्रबुद्ध भारताचे संपादकत्व* *१९५२ – मानगांव (रायगड) मतदार संघातुन विधानसभेची निवडणुक लढविली.* *दि. १९–४–१९५३ – विठ्ठल महादेव साळवी यांच्या मिरा या मुलीशी मंगल परिणय विवाह.* *दि. २८–४–१९५४ – डॉ. बाबासाहेब आंबेडकर हिरक महोत्सवी समितीचे खजिनदार (समितीने बाबासाहेबांना एक लाखाची थैली अर्पण केली.)* *दि. ५–५–१९५५ – पत्रकार संमेलन संपन्न.* *दि. ६–१२–१९५६ – पित्याचे (डॉ. बाबासाहेब आंबेडकर) यांचे छत्र हरपले.* *दि. ६–१२–१९५६ – भारतीय बौद्ध महासभेच्या अध्यक्षपदी निवड करण्याबाबत प्रमुख कार्यकर्त्यांत बहुमत.* *दि. २०–३–१९५७ – डॉ. बाबासाहेबांच्या

स्मारकासाठी मुंबई महानगरपालिकेकडे पत्रव्यवहार.* *१९५८ ते १९६० – बौद्धजन पंचायत समितीचे कार्याध्यक्ष.* *दि. २–४–१९५८ – डॉ. बाबासाहेबांच्या पहिल्या (डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, पंचायत भोईवडा) स्मारकाचे भूमिपूजन.* *१९५७ ते १९६३ धम्मदिक्षेचे देशभर कार्यक्रम.* *दि. २२–६–१९५८ – पहिल्या स्मारकाचे अनावरण.* *दि. १४–७–१९५८ ते दि. ३०–१२–१९५८ रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्याचा पहिला यशस्वी प्रयोग.* *१९५९ – भूमिहीनांचा सत्याग्रह.* *१९६१ ते १९६६ विधान परिषदेचे सदस्य.* *१९६२ – मुळगाव आंबडवेला प्रथम भेट.* *१९६३ – म्यूनिसिपल कामगार संघाचे अध्यक्ष.* *दि. १०–२–१९६४ ते दि. १७–२–१९६४ – स्मारकनिधी संकलन प्रचार सप्ताह.* *१९६४ – रिपब्लिकन पक्षाच्या मुंबई प्रदेशाचे अध्यक्ष.* *दि. ३–१–१९६५ – वरळी, मुंबई येथे आव्हान सभा.* *दि. १४–४–१९६६ – भिमज्योत (महू–मुंबईची) सांगता.* *दि. १४–१२–१९६६ – पन्नाशी निमित्त दयानंद बांदोडकर यांच्या हस्ते सत्कार.* *१९६७ – १० दिवसीय श्रामनेरची दिक्षा–नाव 'पंडित काश्यप'.* *दि. २३–११–१९६८ – मुंबईत बौद्धधम्म परिषद संपन्न, प्रमुख पाहुणे दलाई लामा.* *दि. ५–७–१९७० – पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या गव्हर्निंग बॉडीचे सदस्य.* *दि. १८–४–१९७१ – जगन्नाथरावं भातणकर मार्गाचे उदघाटण.* *१९७१ ते १९७५ – मुंबई विद्यापीठाच्या सिनेटचे सदस्य.* *दि. २२–५–१९७२ – श्रीलंका येथे दहाव्या जागतिक बौद्ध परिषदेला भारतीय बौद्धांचे प्रतिनिधित्व केले.* *दि. ९–१०–१९७२ – लंडनला भेट.* *दि. २६–१–१९७४ – रिपब्लिकन ऐक्याचा तिसरा प्रयोग.* *दि. २३–२–१९७४ – रिपब्लिकन पक्षाच्या वतीने मंत्रालयावरील मोर्चाचे नेतृत्व.* *दि. १–११–१९७४ – तिसऱ्या आशियाई बौद्ध परिषदेला दिल्ली येथे उपस्थित.* *दि. ९–३–१९७५ – बौद्धजन पंचायत समितीच्या प्रथम परिषदेचे उदघाटण.* *दि. ५–३–१९७६ – शेड्युल्ड कास्ट इंप्रुव्हमेंट ट्रस्टच्या विश्वस्तपदी नियुक्ती.* *दि. ३–४–१९७६ – एकशस्टी निमित्त सत्कार.* *१९७७ – ईशान्य मुंबई, मतदार संघातून लोकसभेची निवडणूक लढविली.* *दि. १०–१–१९७७ – लोखंडाचे चणे पचविणारी चळवळ या विषयावर भाषण.* *दि. १–५–१९७७ – महाड येथे क्रांतिस्तंभाचे उदघाटण.* *दि. १९–५–१९७७ – बौद्ध महासभेची पुणरबांधणी.* *दि. २३–५–१९७७ – मोरारजी देसाई समोर मुंबई येथे सवलती संदर्भात निदर्शने.* *दि. १७–८–१९७७ – बौद्धांच्या सवलती संदर्भात दिल्ली येथे मोरारजी देसाई यांच्या सोबत भेट.* *१९७७ – तुम्हाला बौद्ध व्हायला कोणी सांगितले ही पुस्तिका प्रकाशित.* *दि. १७–९–१९७७ – मुंबईच्या के. इ. एम. रुग्णालयात निधन.* *दि. २–१०–१९७७ – चैत्यभूमीवर शोकसभा.*

☸☸🦚🦚🦚💎 🔹 यशवंत भीमराव आंबेडकर 🔹 💎🦚🦚🦚☸☸

🔸 यशवंत उर्फ भैय्यासाहेब (जन्म : १२ डिसेंबर इ. स. १९१२ – मृत्यू १७ सप्टेंबर इ. स. १९७७) 🔸

संघटना : भारतीय बौद्ध महासभा (द्वितीय अध्यक्ष)

प्रमुख स्मारक : चैत्यभूमी.

वडील : डॉ. बाबासाहेब आंबेडकर आई रमाई भीमराव आंबेडकर.

पत्नी : मीराबाई यशवंत आंबेडकर.

अपत्ये : प्रकाश आंबेडकर, रमाबाई तेलतुंबडे, आनंदराज आंबेडकर, भीमराव आंबेडकर.

*यशवंत (भैय्यासाहेब) यांचा अल्प परिचय*

यशवंतरावांना लहानपणापासूनच न्यूमॅनेटिक आणि पायाच्या पोलियोसारख्या आजाराने ग्रासले होते. गावठी औषधांच्या उपचाराने त्यांना बरे करण्यात आले. त्यांचे शिक्षण मॅट्रिकपर्यंतच झाले. त्यांचे लग्न (विवाह) १९ एप्रिल १९५३ रोजी मीराबाई सोबत झाले. भय्यासाहेबांनी कधीही बाबासाहेबांच्या नावाचा फायदा घेतला नाही. त्यांनी स्वत:चे आयुष्य स्वत:च घडविले, त्यांनी सिमेंटचा कारखाना काढला. त्यानंतर मुंबई विमानतळाच्या परिसरात बांधकाम करणे हा नवीन उद्योग सुरु केला आणि त्यात त्यांनी कोणालाच वाटेकरी घेतले नाही. हा व्यवसाय सुरळीतपणे चालला होता.

यशवंतरावांनी नंतर बाबासाहेबांच्या चळवळीत भाग घेण्यास सुरुवात केली. त्यांनी भारतभूषण प्रिंटिंग प्रेस हा छापखाना सुरू केला. पुढे ह्या प्रेसचे बुद्धभूषण प्रिंटिंग प्रेस असे नाव झाले. १९४४ पासून बाबासाहेबांच्या 'जनता', 'प्रबुद्ध भारत' या मुखपत्रांचे व्यवस्थापन तेच पाहत होते. बुद्धभूषण प्रिंटिंग प्रेसमध्ये बाबासाहेबांचा Thoughts on Pakistan हा इंग्रजी ग्रंथ भय्यासाहेबांनीच छापला. बाबासाहेबांनी हा ग्रंथ भय्यासाहेब व मुकुंदराव यांना अर्पण केलेला आहे. बाबासाहेबांचे Federation versus Freedom आणि Thoughts on Linguistic States हे ग्रंथही भैय्यासाहेबांनी छापले. त्यानंतर बाबासाहेबांच्या आदेशानुसार आणि भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने त्यांनी वा. गो. आपटेलिखित 'बौद्धपर्व' हा ग्रंथही आपल्या छापखान्यात छापून प्रसिद्ध केला.

भैय्यासाहेबांचे लिखाण तर्कशुद्ध आणि विचारगर्भ असे. त्यांच्या लिखाणातील व भाषणातील विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे म्हणी आणि वाक्यप्रचार यांचा मोठया प्रमाणावर वापर.

भैय्यासाहेबांनी बाबासाहेबांची अनेक स्मारके उभारली. १ ले स्मारक त्यांनी मुंबई येथे बांधले. या डॉ. आंबेडकर सभागृहाचे भूमिपूजन दि. २–४–१९५८ ला व उद्घाटन २२–६–१९५८ ला झाले. मुंबई नागरिकांच्या वतीने कफ परेड येथे बाबासाहेबांचा पुतळा बसविण्याचे ठरले. भैय्यायासाहेबांनी आग्रह धरला की २६ जानेवारी १९६२ रोजीच पुतळ्याचे अनावरण झाले पाहिजे. म्हणून शेवटच्या क्षणी कमी पडत असलेली रक्कम महापौरांना दिली व ठरल्याप्रमाणे २६ जानेवारी १९६२ रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल प्रकाश यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण झाले. चवदार तळे क्रांतीचे स्मारक म्हणून जेथे मनुस्मृतीचे दहन करण्यात आले. त्या जागेवर अशोक स्तंभाच्या धर्तीवर क्रांतिस्तंभ उभारण्यासाठीही यशवंतरावांनी पुढाकार घेतला. चैत्यभूमीच्या रूपाने बाबासाहेबांचे स्मारक व्हावे म्हणून भारतीय बौद्ध महासभेने दि. २०–३–१९५७ रोजी BMS(?) कडे ४० बाय ४० ची जागा मागितली BMS ने ८ बाय ८ ची जागा मंजूर केली. परंतु मागणीपेक्षा एक इंचही कमी जागा घेणार नाही असा पवित्रा भैय्यासाहेबांनी घेतला. अखेर BMS improvement committee ने ४० बाय ४० ची जागा मान्य केली. जोपर्यंत शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन (शेकाफे) आणि भारतीय रिपब्लिकन पक्ष (RPI) हे एकसंघ होते तोपर्यंत या स्मारकांना गती येत होती. जनताही आपला पै पैसा देत होती. जनता स्टेट बँकेसमोर रांगा लावून पैसे भरत होती. स्टेट बँकेत भरणा करावा म्हणून भय्यासाहेब कुलाबा ते दहिसर व कल्याण पर्यंत फिरफिर फिरले १९६६ साली डॉ. बाबासाहेबांचा ७५ वा वाढदिवस येत असल्यामुळे हा जन्मदिवस 'अमृत महोत्सव' म्हणून भव्य प्रमाणात साजरा करण्याचे भय्यासाहेबांनी ठरविले. या अमृत महोत्सव प्रसंगी डॉ. बाबासाहेबांचे जीवन कार्याचे प्रतीक म्हणून एक 'भीमज्योत' महूहून मुंबईला आणण्याचे ठरविले. २७–३–१९६६ रोजी ही भीम–ज्योत भारताचे तत्कालीन मजूर मंत्री जगजीवनराम यांच्या हस्ते प्रज्वलित करण्यात आली. ह्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार दादासाहेब गायकवाड होते. भीम–ज्योत महूहून इंदूर, भोपाळ, हुशंगाबाद, बैतूल, नागपूर, पुलगाव, औरंगाबाद, येवला, नाशिक, हरेगावनगर(?), संगमनेर, देहूरोड, पुणे, सातारा,

वणी(?), पाचगणी, महाबळेश्वर, खेड, मंडणगड, दापोली, महाड, पेण, पनवेल, कल्याण, ठाणे, मुलुंड, राजगृहवरून दादरच्या चैत्यभूमीला आली. ह्या भीमज्योतीदरम्यान मिळालेल्या धम्मदानातून चैत्यभूमी स्मारक उभारण्यात आले.

🔹 _*संदेश कार्य : धम्म कार्यसंपादन करा*_

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर भय्यासाहेब भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष झाले. 'भारत बौद्धमय करीन' हा बाबासाहेबांचा संकल्प उराशी घेऊन भय्यासाहेबांनी काम सुरु केले. त्यांनी धम्मदीक्षेचे अनेक कार्यक्रम घेतले, धम्म परिषदा भरविल्या, धम्म मेळावे सर्वत्र होत होते. प्रचार सर्वत्र जोरात सुरू केला भय्यासाहेब आमदार असतांना त्यांनी विधानपरिषदेत नवबौद्धांच्या हक्कांबद्दल हिरीरीने बाजू मांडली तसेच या नवीन बौद्धांच्या सवलतीविषयी ते पंतप्रधान मोरारजी देसाईंना भेटले होते. भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी श्रीलंका, थायलंड, म्यानमार, सारनाथ व दिल्ली येथे झालेल्या जागतिक बौद्ध परिषदांमध्ये भारतीय बौद्धांच्या समस्या मांडल्या. खेड्यापाड्यातील बौद्ध विहारांचे उद्‌घाटन केले. १९६८ साली मुंबई येथे धम्म परिषद भरविण्यात आली व प्रमुख पाहुणे म्हणून दलाई लामा यांना बोलविण्यात आले. ह्या धम्म परिषदेमध्ये अनेक महत्त्वाचे ठराव पारित करण्यात आले. त्यात संस्कार विषयक आचार संहिता सर्वानुमते मान्य करण्यात आली. 'बौद्ध जीवन संस्कार पाठ' या नावाचे पुस्तक तयार करण्यात आले. धम्म प्रसार कार्याचा एक भाग म्हणून १९६७ मध्ये ११ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनी भय्यासाहेबांनी स्वतः श्रामणेरची दीक्षा घेतली व त्या काळावधीत ते चैत्यभूमीतच राहत होते. त्यांचे नाव 'महापंडित काश्यप' असे ठेवण्यात आले होते. १९५९ मध्ये महास्थविर संघरक्षित लंडनहून आले होते. त्यांनी भय्यासाहेबांची भेट घेतली होती. महापुरुषाच्या पोटी जन्म घेऊन स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी किती कठोर परिस्थितीचा सामना करावा लागतो याचा प्रत्यय भैय्यासाहेब आंबेडकरांना निश्चितच आला होता. नव्हे संपूर्ण आयुष्यात ते ओझे घेऊन जगावे लागले असावे. जगाने ज्या महानावाच्या क्रांतीचा, विचारांचा आणि बुद्धीचा गौरव केला ते महामानव व्यक्तिमत्त्वाच्या पडताळणीचा आधार बनत असेल. अश्या परिस्थितीत स्वतंत्र व्यक्तिमत्त्व कसे उभारायचे याचे दडपण निश्चितच भैय्यासाहेबांना होते. मोठ्या वृक्षाखाली पालव्या कोमेजून जातात तशीच परिस्थिती भैय्यासाहेबांवर ओढवली असेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वारस म्हणून किती दडपणाचा सामना भैय्यासाहेबांना करावा लागला. याचा विचार करून भैय्यासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वाकडे बघितले गेले नाही.

🔹 डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आदर्श व्यक्तिमत्त्व होते. सामाजिक जाणीवेने त्यांच्या व्यक्तिमत्त्वात निर्माण केलेला वैचारिक हिमालय सामाजिक विषमता आणि अन्यायावर तुटून पडताना सहजच त्यांच्या स्वभावात काही वैशिष्ट्ये निर्माण होत गेली. त्यांचा स्वभाव तापट होता. पण तितकाच तो मृदूही होता. निश्चितच बाबासाहेबांना आपल्या मुलाकडूनही काही अपेक्षा होत्या. त्या लादलेल्या नसल्या तरी व्यावहारिकतेच्या परिप्रेक्षात परीस्थितिजन्य बदलाच्या होत्या. या अपेक्षांच्या दडपणामुळे बाबासाहेबांच्या तापटपणाचा सामना भैय्यासाहेबांना करावा लागला असेल हे निश्चितच. त्यामुळे भैय्यासाहेबांच्या व्यक्तीमत्त्वावर त्याचाही प्रभाव जाणवायचा. भैय्यासाहेब कधीही प्रखर नव्हते. भैय्यासाहेबांचा स्वभाव शांत होता. शिवाय शारीरिक व्याधीमुळेसुद्धा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव टाकला होता. संधिवाताचा सामना करतांना सोसावे लागलेले दुःख त्यांनी कधी सामाजिक जीवनात उतरू दिले नाही. परंतु काही समाजकंटकांनी त्यांच्या या आजाराचे भांडवल करून भैय्यासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाला बदनाम करण्याचा प्रयत्न केला.

🔹 हजारो शोषित–पिडीत–मागास वर्गाच्या उत्थानासाठी जगतांना बाबासाहेबांनी कधी मुलांच्या आजाराकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे बाबासाहेबांनी समाजासाठी दिलेल्या या बलिदानाचे बळी त्यांची इतर मुलेही ठरली. भैय्यासाहेब हे बाबासाहेबांचे एकमेव वारस होते जे जगले. हे दडपण पेलून धरतांना भैय्यासाहेबांनी एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व निर्माण केले. कदाचित ते असामान्य नसेलही परंतु शांत, चिंतनशील, सहनशील, वैचारिक असे गुणवैशिष्ट्य त्यांच्या व्यक्तिमत्त्वात निश्चितच होते. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पडतांना त्यांच्या शांत व्यक्तिमत्त्वाचा निश्चितच लाभ झाला. ज्यामुळे भारतीय बौद्ध महासभेचा त्यांच्या कार्यकाळात अनेक राज्यांमध्ये व्याप वाढू लागला. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर भैय्यासाहेब आंबेडकरांनी यासाठी कधी हट्ट धरला नाही. किंवा कुठलेही पद घेतले नाही. बाबासाहेबांचा राजकीय वारस म्हणून स्वतःला कधी समोर केले नाही. सदैव इतरांना पुढे करून त्यांना समर्थन देऊन स्वतः मात्र आयुष्यभर धम्माचे काम करीत राहिले. धम्म कार्यात स्वतःला वाहून घेतले. आजच्या आधुनिक पिढीला आणि जे स्वतःला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी म्हणवून घेतात त्यांच्यासाठी भैय्यासाहेबांचे व्यक्तिमत्व आदर्श ठरावे असेच होते.

🔹 भैय्यासाहेबांनी राजकीय स्वार्थाचा त्याग केला. धम्मकार्य केले तरीही काहींनी त्यांना बदनाम करण्याचे सोडले नाही. आज भारतात बौद्धांची संख्या वाढलेली आहे. ती भैय्यासाहेबांनी केलेल्या प्रयत्नांचाच परिपाक आहे. १९६२ ला भैय्यासाहेबांचा ५० वा वाढदिवस साजरा केला गेला होता. तेव्हा त्यांच्या सन्मानार्थ दादासाहेब गायकवाडांनी काढलेले गौरवोद्गार अतिशय बोलके आहे. दादासाहेब गायकवाड म्हणाले होते, 'भैय्यासाहेब माझ्यासारख्या आंधळ्यांची काठी आहेत.' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वारसत्व लाभलेले भैय्यासाहेब चळवळीत इतरांचे काठी बनले. चळवळीत इतरांना सहकार्य केले. चळवळीला दिशा देण्याचे काम केले. पण कधीही स्वतःचे नेतृत्व समाजावर लादले नाही. नेतृत्व संघर्षापासून सदैव स्वतःला अलिप्त ठेवले. भैय्यासाहेब हे दादासाहेब गायकवाडांच्या खांद्याला खांदा लावून सदैव त्यांच्या पाठीशी राहिले.

🔹 भैय्यासाहेब आंबेडकर हे बाबासाहेबानंतरचे एकमेव नेते होते, जे समाजासाठी व धम्मकार्यासाठी जगले. ज्यांनी स्वतःचा स्वार्थ कधीच बघितला नाही. राजकीय लालसा कधी बाळगली नाही. सत्तेच्या मोहजाळातून अलिप्त राहिले. टीकाकारांना उत्तरे न देता शांत राहून अप्रत्यक्ष उत्तरे देत राहिले. कुणाच्याही विरुद्ध भूमिका न घेता, कुणावर टीका करीत न बसता भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून धम्माची जबाबदारी पार पाडत राहिले. भैय्यासाहेबांनी स्वतःसोबत मीराताई आंबेडकरांनाही धम्मकार्यात वाहून घेतले. इतकेच नाही तर भैय्यासाहेबांनी त्यांच्या मुलांवर केलेल्या संस्काराचाच परिणाम म्हणून आजही त्यांची मुले बाळासाहेब उर्फ प्रकाश आंबेडकर, भीमराव आंबेडकर व आनंदराज आंबेडकर स्वतःच्या कर्तृत्वाने या समाजात स्वतःचे स्थान निर्माण करीत आहेत. पण कधीही त्यांनी बाबासाहेबांचे वारस म्हणून संपूर्ण समाजाचे आम्हीच नेते असा आव आणला नाही. हा भैय्यासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या मुलांवर केलेल्या संस्काराचाच परिणाम म्हणावा लागेल. भैय्यासाहेब हे समाजासाठी, आंबेडकरी चळवळीसाठी केलेले त्यागाचे प्रतीक आहेत.

बौद्धचार्याचे जनक, चैत्यभूमीचे शिल्पकार, सुर्यपूत्र यशवंत (भैय्यासाहेब) आंबेडकर यांच्या जयंतीदिनी १२ डिसेंबर विनम्र अभिवादन !!!

🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏

🏵🏵🏵🏵🏵🏵🏵🏵🏵🏵🏵🏵🏵🏵

! जयभीम ! !! जयभारत !! !!! नमोबुद्धाय !!!

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🌿🌿🌿💎 *सविनय जयभीम*🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🌿🌿🌿☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १३ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, मग्गसिरो मासो, शुक्रवार, मार्गशिस माहे.

*१३ डिसेंबर १५५५ – रोजी जागतिक व्हायोलिन दिवस.

इतिहासातील सर्वात जुने फिडलर्स आतील आशियातील घोडेस्वार होते, विशेषत: तुर्किक आणि मंगोलियन जमाती. त्यांनी घोड्याचे केस बांधलेल्या दोन तारांसह सरळ व्हायोलिनवर सादरीकरण केले. ते घोड्याच्या केसांच्या धनुष्याने देखील खेळत असत आणि त्यांच्या मानेचे टोक वारंवार घोड्याच्या कोरीव प्रतिमेने सुशोभित केलेले असत. भटक्या लोकांनी आज आपण वाजवलेल्या व्हायोलिन, व्हायोला आणि सेलोस मागे सोडले, त्या सर्वांमध्ये अजूनही घोड्याचे केस आहेत. आधुनिक व्हायोलिन प्रमाणेच, १५५५ मध्ये प्रथम ज्ञात चार–स्ट्रिंग व्हायोलिन तयार करण्याचे श्रेय अँड्रिया आमटी यांना जाते.*

१३ डिसेंबर १९३२ – रोजी वणी तालुका बहिष्कृत परिषदेचे अधिवेशन कवडास, ता. वणी येथे संपंन्न.

१३ डिसेंबर १९३५ – याच दिवसी नागपूर परिषदेत पहिली वेळ बाबु हरदास एल. एन यांनी जय भीमचा नारा दिला होता, आपण सर्वांना जय भीम.

१३ डिसेंबर १९४५ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार, कामगार नेते, महामानव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नागपूर येथे झालेल्या जाहीर सभेत गुरू घंटाळची गोष्ट सांगून काँग्रेस गुरू घंटाळची भूमिका बजावित असल्याचे सांगितले.

१३ डिसेंबर १९४६ – रोजी घटना समितीचे उद्देश व साध्य स्पष्ट करणारा ठराव पंडित जवाहरलाल नेहरूंनी घटना समितीत मांडला.

१३ डिसेंबर १९४८ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार, कामगार नेते, महामानव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेमध्ये कलम ४३, ४४, ४५, ४६ Article 43, 44, 45, 46 वर चर्चा केली. कलम ४५ – मुलांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूद. कलम ४६ – अनुसूचित जाती, जमाती आणि इतर दुर्बळ घटकांचे शिक्षण तसेच आर्थिक हितसंबंध वाढविणे.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🌿🌿🌿🔵🔵🔵💎 *१३ डिसेंबर १५५५ – रोजी जागतिक व्हायोलिन दिवस.* 💎🔵🔵🔵🌿🌿🌿☸☸

व्हायोलिन हे चार तारांचे लाकडी वाद्य आहे जे गळ्यात धरून त्याच्या तारांवर धनुष्य वळवून वाजवले जाते. व्हायोलिन हे भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, विज्ञान आणि गणित यांचा अद्भुत मिलाफ आहे. हे उत्कृष्ट मोटर कौशल्ये, स्नायू सक्रियकरण आणि स्नायूंच्या स्मरणशक्तीला देखील प्रोत्साहन देते. १३ डिसेंबर रोजी, आपण व्हायोलिनचा सन्मान करतो, ज्याचे जगभरात कौतुक केले जाते, आणि त्याचे सांस्कृतिक योगदान आणि प्रभाव मान्य करतो.

व्हायोलिन हे नि:संशयपणे उपलब्ध सर्वात अष्टपैलू साधनांपैकी एक आहे, जे अत्यंत नाजूक आणि उत्कट संगीत दोन्हीसाठी अनुमती देते. व्हायोलिन डे वर, आपण व्हायोलिन वादकांचा सन्मान करतो आणि त्यांना व्हायोलिन–आधारित संगीत ऐकण्यासाठी आमंत्रित करतो.

व्हायोलिनचा इतिहास – इतिहासातील सर्वात जुने फिडलर्स आतील आशियातील घोडेस्वार होते, विशेषत: तुर्किक आणि मंगोलियन जमाती. त्यांनी घोड्याचे केस बांधलेल्या दोन तारांसह सरळ व्हायोलिनवर सादरीकरण केले. ते घोड्याच्या केसांच्या धनुष्याने देखील खेळत असत आणि त्यांच्या मानेचे टोक वारंवार घोड्याच्या कोरीव प्रतिमेने सुशोभित केलेले असत. भटक्या लोकांनी आज आपण वाजवलेल्या व्हायोलिन, व्हायोला आणि सेलोस मागे सोडले, त्या सर्वांमध्ये अजूनही घोड्याचे केस आहेत. आधुनिक व्हायोलिन प्रमाणेच, १५५५ मध्ये प्रथम ज्ञात चार–स्ट्रिंग व्हायोलिन तयार करण्याचे श्रेय अँड्रिया आमटी यांना जाते.

२० जून २०११ रोजी जेव्हा "लेडी ब्लंट" विक्रीसाठी ठेवण्यात आले, तेव्हा त्याने विक्रमी रक्कम आणली. Stradivari ने बनवलेले व्हायोलिन $15.9 दशलक्षला विकले जाते. इतर कोणत्याही कारागिरापेक्षा, स्ट्रॅडिव्हरी व्हायोलिन हे संग्राहक आणि संगीतकार सारखेच शोधतात.

लॅटिन शब्द "विटुला", ज्याचा अर्थ मध्ययुगीन काळातील "तंतुवाद्य" असा होतो, तेथून "व्हायोलिन" नावाचा उगम झाला. स्ट्रिंग कुटुंबातील सर्वात लहान आणि सर्वात उंच वाद्य म्हणजे व्हायोलिन. हे उत्तर आफ्रिकन वाद्य रीबॅब या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सारखेच आहे, जे तीन–तार असलेले वाद्य आहे जे स्ट्रिंगवर ओढलेल्या धनुष्याने देखील वाजवले जाते. गाणे आणि नृत्य याला व्हायोलिनची साथ फार पूर्वीपासून आहे.

याव्यतिरिक्त, हे शास्त्रीय संगीतातील एक महत्त्वाचे एकल वाद्य आहे आणि ऑर्केस्ट्रामध्ये केंद्रस्थानी आहे. वाजवताना, व्हायोलिन हनुवटीच्या खाली धरले जाते आणि स्ट्रिंग उपटली आहे की वाकली आहे यावर अवलंबून, डाव्या हाताची बोटे वेगवेगळ्या पिच तयार करण्यासाठी वाद्याच्या मानेवरील तारांवर दाबतात. याउलट, धनुष्य उजव्या हातात धरले जाते जेव्हा ते स्ट्रिंगसच्या ओलांडून एका कोनात खेचले जाते आणि आवाज निर्माण करते.

महत्त्व – व्हायोलिन हे इतिहासातील सर्वात महत्त्वाचे वाद्य मानले जाते, कदाचित ऑर्केस्ट्रामध्ये त्याचे महत्त्वपूर्ण कार्य किंवा प्रेरणा आणि भावना श्रोत्यामध्ये जेव्हा ते तीव्र रोमँटिक आवाज ऐकतात तेव्हा ते जागृत होते. व्हायोलिन डे साजरा करण्याचा एक उत्तम मार्ग म्हणजे स्वतः व्हायोलिन वाजवणे. जर तुम्ही व्हायोलिन वाजवण्यात निपुण नसाल, तर तुम्ही या दिवसाचा उपयोग इतरांना त्या दिवसाबद्दल शिकवून आणि काही व्हायोलिन संगीताचा आनंद घेऊन आणि इतरांसोबत शेअर करून आयुष्यभराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी करू शकता.

भारतीय व्हायोलिनचा देव – भारतातील सर्वात सुप्रसिद्ध व्हायोलिन वादक डॉ. एल. सुब्रमण्यम यांनी UCLA च्या फॉलर म्युझियममध्ये एक मैफिली दिली. डॉ. एल सुब्रमण्यम हे पाश्चात्य आणि कर्नाटक शास्त्रीय संगीत परंपरांचे प्रशिक्षण घेतलेले निपुण संगीतकार आहेत. त्यांच्या कारकिर्दीच्या सुरुवातीपासून, त्यांनी केलेली प्रत्येक रचना स्वतःसाठी एक कला आहे.

तो ठराविक व्हायोलिनवादक नाही; त्याऐवजी, त्याने नवीन पद्धती आणि दृष्टिकोन विकसित करून साधनामध्ये क्रांती केली. भारत सरकारने १९९८ मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले आणि २०२१ मध्ये त्यांना पद्मभूषण पुरस्कार मिळाला.

त्यांचा समीक्षकांनी प्रशंसनीय अल्बम "ग्लोबल फ्यूजन" मध्ये पाच खंडातील संगीतकारांचा समावेश आहे, ज्यात डॉ. एल. सुब्रमण्यम यांची मुलगी बिंदू सुब्रमण्यम आणि चित्रपट उद्योगातील सर्वात प्रसिद्ध आणि यशस्वी गायिका कविता कृष्णमूर्ती यांचा समावेश आहे, ज्यांच्याशी त्यांनी नोव्हेंबर १९९९ मध्ये लग्न केले.

या जिवंत आख्यायिकेच्या मैफिली हे आश्चर्यकारक खुणा आहेत जे खरोखरच गर्दीला प्रेरित करतात. त्यांचे ऑर्केस्ट्रल वर्क फॅन्टसी ऑन वैदिक चँट्स आणि अल्बम कॉन्व्हर्सेशन हे लँडमार्क बनले आहेत आणि फ्यूजनच्या कल्पनेचा प्रयोग करणाऱ्या कोणत्याही संगीतकारासाठी ते संदर्भ आणि दिग्दर्शनाचे स्रोत आहेत. हे जवळजवळ अविश्वसनीय आहे की असे कौशल्य आणि अर्थपूर्ण खेळणे शक्य आहे.

आतापर्यंतचे सर्वोत्कृष्ट भारतीय व्हायोलिन वादक :–

कुन्नाकुडी वैद्यनाथन – भारतीय शास्त्रीय व्हायोलिन वादक कुन्नाकुडी विद्यानाथन हे संगीतकार होते. त्यांचा जन्म २ मार्च १९३५ रोजी झाला आणि ८ सप्टेंबर २००८ रोजी त्यांचे निधन झाले. सर कृष्णन यांना १९७४ मध्ये संगीत नाटक अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २००६ मध्ये अकादमीने त्यांना संगीत नाटक अकादमी फेलोशिप देखील प्रदान केली. याव्यतिरिक्त, त्यांना दोन सन्मान मिळाले: १९९२ मध्ये पद्मभूषण आणि १९७३ मध्ये पद्मश्री.

अभिजित पीएस नायर – भारतीय वंशाचे अभिजित नायर हे अरेंजर, संगीतकार आणि व्हायोलिन वादक आहेत. १८ ऑक्टोबर १९९१ रोजी केरळच्या वैकोम शहरात त्यांचा जन्म झाला. अभिजितची वाद्य व्हिडीओ निर्मिती खूप प्रसिद्ध आहे. त्यांनी भारतात आणि परदेशात असंख्य फ्लॅश मॉब आणि संगीत कार्यक्रमांमध्ये भाग घेतला आहे.

अंबी सुब्रमण्यम – अंबी सुब्रमण्यम हे भारतीय संगीतकार, शिक्षक आणि व्हायोलिनवर संगीतकार आहेत. त्यांचा जन्म युनायटेड स्टेट्समध्ये लॉस एंजेलिस, कॅलिफोर्निया येथे ५ ऑगस्ट १९९१ रोजी झाला. अंबीचे आयुष्य कौतुकाने भरले होते. त्यांच्या सन्मानांमध्ये एक BiMA, दोन जागतिक भारतीय संगीत पुरस्कार (गेम), रिट्झ आयकॉन ऑफ द इयर पुरस्कार आणि रोटरी युवा पुरस्कार यांचा समावेश आहे. ते तीन वेळा फिलोमिना थंबोचेट्टी पुरस्कार विजेते होते. वयाच्या १८ व्या वर्षी श्री जयेंद्र सरस्वती यांनी त्यांना सुवर्ण व्हायोलिनही दिले.

अरोल कोरेली – एस. आरुल मुरुगन हे संगीताचे भारतीय संगीतकार आहेत आणि अरोल कोरेली हे त्यांचे रंगमंचाचे नाव आहे. त्यांचा जन्म ३ ऑक्टोबर १९८५ रोजी झाला. त्यांनी २०१४ मध्ये भारतीय संगीतकार म्हणून व्यावसायिक पदार्पण केले. पिसासू चित्रपटाच्या दिग्दर्शकाने त्याला पहिले काम दिले. पिसासूसाठी साउंडट्रॅक तयार करण्यासाठी त्याला दिग्दर्शक मायस्किन यांनी नियुक्त केले होते. अरुलने पिसासू चित्रपटासाठी साउंडट्रॅक तयार केला आणि "नाथी पोगम कूझंगल पायसम" मध्ये व्हायोलिनवर सादरीकरण केले, गाण्याच्या थीमपैकी एक.

अवनीश्वरम एसआर विनू – भारतीय कर्नाटक व्हायोलिन वादक अवनीश्वरम एसआर विनू व्यावसायिक पूर्णवेळ संगीतकार म्हणून काम करतात. त्यांचा जन्म १० जून १९७३ रोजी झाला. ऑल इंडिया रेडिओने त्यांना "ए" ग्रेड कलाकार म्हणून रेट केले. याव्यतिरिक्त, एकलवादक आणि साथीदार म्हणून त्यांची चांगली प्रतिष्ठा आहे. राग भावाचा वापर करून त्यांचे मधुर सूर वाढवून ते प्रेक्षकांची मने जिंकू शकले. गायन आणि वाद्य शैलींमध्ये त्याच्या सहज संक्रमणामुळे त्याच्या पद्धती वेगळ्या आणि एक प्रकारची आहेत.

बालाभास्कर चंद्रन – बालाभास्कर चंद्रन हे भारतीय संगीतकार होते. त्याने रेकॉर्ड तयार केले, संगीत लिहिले आणि व्हायोलिन वाजवले. बालाभास्कर, ज्यांचा जन्म १० जुलै १९७८ रोजी झाला होता, त्यांचे २ ऑक्टोबर २०१८ रोजी दुःखद निधन झाले. त्यांची पहिली संगीत रचना मल्याळम चित्रपट मांगल्य पल्लकमध्ये दिसली. मल्याळम संगीत उद्योगात, तो सर्वात तरुण संगीत दिग्दर्शक बनला. २००८ मध्ये, केंद्र संगीत नाटक अकादमीने बालाभास्कर यांना त्यांच्या व्हायोलिन वाद्य रचनांसाठी बिस्मिल्ला खान युवा संगीत पुरस्कार प्रदान केला.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚🔵🔵🔵💎 हरदास लक्ष्मणराव नगराळे उर्फ बाबू हरदास एल. एन. "जय भीम चे जनक" 💎🔵🔵🔵🦚🦚🦚☸☸

हरदास लक्ष्मणराव नगराळे उपाख्य बाबू हरदास "जय भीम चे जनक" (६ जानेवारी १९०४ - १२ जानेवारी १९३९) हे स्वातंत्र्यपूर्व भारतातील एक वंचित पुढारी, राजकारणी व समाजसुधारक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कट्टर अनुयायी असलेल्या बाबू हरदास यांना "जय भीम" या अभिवादनाचे जनक मानले जाते. ते कामगारांचे नेते म्हणूनही प्रसिद्ध होते. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र मजूर पक्षाचे मध्य प्रांताचे सरचिटणीस होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जगभरात साजरी होणारी जयंती असो की, चैत्यभूमीवर लाखो भीम अनुयायांच्या उपस्थितीत महापरिनिर्वाणदिन असो, नाही तर नागपुरातील दीक्षाभूमीवरील धम्म सोहळा असो या सर्व ठिकाणी आंबेडकरी समाजाच्या मुखातून एकच आवाज निनादला जातो तो म्हणजे `जय भीम’. हिंदू धर्मातून बाहेर पडल्यानंतर बौद्ध धम्माची स्वतंत्र वाटचाल अंगिकारल्यानंतर बौद्धांना नवी ओळख प्राप्त व्हावी यासाठी `जय भीम’ हा शब्द मोठय़ा आदरभावाने संबोधला जातो.

आंबेडकरी समाजातील राजकारणात अनेक गट–तट असो किंवा आंबेडकरी समाजातील नेते इतर पक्षात स्थिरावलेले असो त्यांच्या मुखातून वेळोवेळी आपसूकपणे `जय भीम’ हे शब्द बाहेर पडतात. मात्र, कोणत्याही आंबेडकरी नेत्यांना `जय भीम’ चे जनक बाबू हरदास यांची जयंती साजरी करावी असे वाटले नाही किंबहूना समाजही त्यांच्याबाबतीत अज्ञानी असल्याने बाबू हरदास अद्यापही दुर्लक्षितच राहिले असल्याचे दिसत आहे.

हरदास लक्ष्मणराव नगराळे उर्फ बाबू हरदास यांचा जन्म ६ जानेवारी १९०४ रोजी नागपुरातील कामठी येथे एका गरीब वंचित कुटूंबात झाला. त्यांचे वडील लक्ष्मणराव नगराळे हे रेल्वे खात्यामध्ये कारकून म्हणून कार्यरत होते. बाबू हरदास यांचे मॅट्रीकपर्यंतचे (१० वी) शिक्षण नागपुरातील पटवर्धन हायस्कूलमध्ये झाले. त्यांचा संस्कृतवरही मोठा प्रभाव होता. अवघ्या १७ व्या वर्षी `महारथ’ नावाचे साप्ताहिक सुरू करून त्यांनी सामाजिक चळवळीत भाग घेतला. १९२७ला त्यांनी दलित समाजातील मुला–मुलीसाठी कामठी येथे रात्र शाळाही चालवली. त्यात ८६ मुले आणि २२ मुली शिकून बाहेर पडल्या. संत चोखामेळा यांचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता.

१९२८ साली हरदास आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पहिली भेट झाली. देशात दलितांचा नेता कोण? असा प्रश्न विचारला जात होता त्यावेळी बाबू हरदास यांनी १९३०–३१ साली दुसरी गोलमेज परिषद भरली त्या सुमारास रॅमसे मॅक्डोनाल्ड यांना यासंबंधी पत्रव्यवहार करून स्पष्ट शब्दांत सांगितले होते की, देशात एकमेव दलित नेते म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत. त्यांनी यासंबंधी मॅकडोनाल्ड यांच्याशी जवळपास ३२ वेळा पत्रव्यवहार केला होता. `ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस फेडरेशन’ च्या पदावर संयुक्त सचिव आणि अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले. १९२४ साली त्यांनी `मंडल महात्मे’ हा ग्रंथ लिहिला. `वीर बालक’ नावाचे नाटकही त्यांनी लिहिले. बाबासाहेबांच्या `जनता’ वृत्तपत्रातही त्यांनी लेखन केले.

बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या सचिवपदीही त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. १९३७ साली नागपूर–कामठी या मतदारसंघातून ते निवडून आले होते. बाबू हरदास यांचे दलित चळवळीत खूप मोठे योगदान असून त्यांनी दिलेला `जय भीम’ शब्द हा अजरामर असाच आहे. म्हणूनच आज ते `जय भीम’ चे जनक म्हणून ओळखले जातात.

बाबू हरदास यांचे १२ जानेवारी १९३९ साली अवघ्या ३५ व्या वर्षी निधन झाले. दलित समाजात राहून चळवळीला योगदान देणारे बाबू हरदास हे आज दुर्लक्षितच राहिले आहे. आंबेडकरी समाजाला स्वतंत्र बाण्याचा `जय भीम’ सारखा शब्द देऊनही त्यांची फारशी कुणी दखल घेतल्याचे जाणवत नाही. त्यांची जयंती साजरी झाल्याचेही दृष्टीक्षेपात दिसत नाही.

आज निवडणुकीच्या रणधुमाळीत आंबेडकरी समाजाची मते मिळविण्यासाठी गल्ली–बोळात, वाडय़ा–तांडय़ावर, शहरा–शहरात दलित नेत्यांसह इतर नेतेही `जय भीम’ चा जयघोष करताना दिसतील. पण ६ जानेवारी रोजी `जय भीम’ चे जनक बाबू हरदास यांची जयंती आहे, याची आठवण किती जणांना राहील ही शंकाच आहे. त्यांच्या जयंती दिनाचे महत्वही या निवडणुकीच्या भाऊगर्दीत दरवर्षीप्रमाणे हरवून जाईल असे म्हटले तर नक्कीच चुकीचे ठरणार नाही.

म्हणूनच समता सैनिक दलातर्फे बाबू हरदास याना दरवर्षी मानवंदना देण्यात येते.

१ ते १५ जाने हरदास पंधरवडा म्हणून साजरा करण्यात येतो आणि समता सैनिक दलाच्या वेगवेगळ्या शाखेमध्ये तो राबविण्यात येतो.

तसेच त्यांच्या स्मृतीस व कार्याला श्रद्धांजली देण्याकरिता समता सैनिक दलाचे प्रशिक्षण शिबीर हरदास घाट कन्हान येथे १२ ते १६ जाने या वेळेस राबविण्यात येते व भीमसैनिक तयार करण्यात येतो.

हरदास लक्ष्मणराव नगराळे उर्फ बाबू हरदास यांच्या कार्याला मुजरा आणि मानाचा जय भीम !!!!!

मित्र–मैत्रिणीनो आपणही समता सैनिक दलासोबत त्यांना मानवंदना द्यावी...!!!!!

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम*🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🦚🦚🦚☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १४ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, मग्गसिरो मासो, शनिवार, मार्गशिस माहे.

१४ डिसेंबर १९१० – रोजी मा. शी. जा. कांबळे यांनी भारत मंत्री अर्ल ऑफ क्यु यांच्याकडे अस्पृश्यांच्या न्याय हक्कासाठी मागणी केली.

१४ डिसेंबर १९२७ – रोजी अस्पृश्यांना चवदार तळ्यावर पाणी भरण्यास तात्पुरता मनाई हुकूम काढावा या खटल्याचा निर्णय मुंसफ श्री. जी. व्ही. वैद्य नामक न्यायाधीशांनी केला.

१४ डिसेंबर १९५० – रोजी संविधान सभा चर्चेत विश्वरत्न, बोधिसत्त्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुन्हा एकदा हिंदू संहिता (हिंदू कोड बिल) यावर चर्चा केली, या विधेयकानुसार पुरुषांनी एकापेक्षा जास्त लग्न (विवाह) करण्यास बंदी घातली होती, स्त्रियांना घटस्फोटाचा (काडीमोड) याचा अधिकार देण्यात आला होता आणि स्त्रियांना वडिलांच्या संपत्तीचा अधिकार देण्यात आला होता म्हणजे वडिलांच्या मालमत्तेत स्त्रियांना मुलांप्रमाणे समान अधिकार आदि... काही चर्चेनंतर काही कलम मान्य केले. काही सदस्यांच्या योजनांनी वैतागून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २७ ऑक्टोबर १९५१ रोजी राजीनामा दिला.

१४ डिसेंबर १९९१ – रोजी राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन. ऊर्जेचे संवर्धन म्हणजे वसुंधरेचे संवर्धन. १४ डिसेंबर १९९१ मध्ये प्रथमच पुरस्कार प्रदान करण्यात आले, जो देशभरात "राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन" म्हणून साजरा केला जातो. दरवर्षी १४ डिसेंबर रोजी, हे पुरस्कार भारत सरकारच्या अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींद्वारे देशातील ऊर्जा संवर्धनावरील अनुकरणीय प्रयत्नांना ओळखण्यासाठी दिले जातात.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

🏵🏵🦚🦚🦚🔵🔵🔵💎 National Energy Conservation Day : 'राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन.' 💎🔵🔵🔵🦚🦚🦚🏵🏵

१४ डिसेंबर (14th December) रोजी 'राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन' (National Energy Conservation Day) साजरा केल्या जातो. अक्षय ऊर्जेचा वापर करुन, संपुष्टात येणाऱ्या ऊर्जेचे स्त्रोत हे जपुन वापरायला हवेत, असा संदेश या दिवसाच्या माध्यमातुन (significance of this day) दिला जातो.

दरवर्षी १४ डिसेंबर (14th December) रोजी संपूर्ण भारतातील लोक 'राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन' (National Energy Conservation Day) साजरा करतात. ब्युरो ऑफ एनर्जी इफिशियन्सी (BEE) द्वारे २००१ मध्ये भारतातील ऊर्जा संरक्षण कायदा अंमलात आणला गेला (स्थापना). ब्युरो ऑफ एनर्जी इफिशियन्सी ही एक घटनात्मक संस्था आहे. जी भारत सरकारच्या अंतर्गत येते आणि ऊर्जा वापर कमी करण्यासाठी धोरणे आणि योजना विकसित करण्यात मदत करते. भारतातील ऊर्जा संवर्धन कायद्याचे उद्दिष्ट ऊर्जा कार्यक्षमता प्रकल्प राबविण्यासाठी व्यावसायिक, पात्र आणि उत्साही व्यवस्थापक तसेच ऊर्जा, प्रकल्प, धोरण विश्लेषण, वित्त व्यवस्थापन या विषयातील तज्ञ असलेल्या लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे हा आहे. अक्षय ऊर्जेचा वापर करुन, संपुष्टात येणाऱ्या ऊर्जेचे स्त्रोत हे जपुन वापरायला हवेत, असा संदेश या दिवसाच्या माध्यमातुन (significance of this day) दिला जातो.

ऊर्जा संवर्धन म्हणजे काय? :– भारतातील राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिनाचे उद्दिष्ट लोकांना उर्जेचे महत्त्व तसेच बचत आणि ऊर्जा बचतीद्वारे संवर्धनाची जाणीव करून देणे आहे. उर्जेचा अनावश्यक वापर कमी करून, कमी उर्जेचा वापर करून उर्जेची बचत करणे हा ऊर्जा संवर्धनाचा खरा अर्थ आहे. भविष्यातील वापरासाठी उर्जेची बचत करण्यासाठी कार्यक्षमतेने वापरणे अत्यंत आवश्यक आहे. ऊर्जा संवर्धन नियोजनाच्या दिशेने अधिक परिणामकारक परिणाम मिळविण्यासाठी, प्रत्येक मानवी वर्तनाची गांभीर्याने काळजी घेऊन ऊर्जा वाचवता येते, दैनंदिन वापरातील अनेक विद्युत उपकरणे जसे की पंखे, बल्ब वापराविना चालू ठेवणे, समरव्हिल्स, बंद करणे हीटर इत्यादी ऊर्जा संवर्धन मोहिमेमध्ये सर्वात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या अतिवापराची ऊर्जा वाचवण्याचा हा सर्वात प्रभावी मार्ग आहे.

ऊर्जा संवर्धन काळाची गरज :– जीवाश्म इंधन, कच्चे तेल, कोळसा, नैसर्गिक वायू इत्यादी दैनंदिन जीवनात वापरण्यासाठी पुरेशी ऊर्जा निर्माण करतात, परंतु त्यांची दिवसेंदिवस वाढणारी मागणी नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास होण्याची भीती निर्माण करते. नूतनीकरणीय स्त्रोतांसह उर्जेच्या अपारंपरिक स्त्रोतांना पुनर्स्थित करण्याचा ऊर्जा संवर्धन हा एकमेव मार्ग आहे.

कार्यक्षम ऊर्जा बचत :– ऊर्जा वापरकर्त्यांना कार्यक्षम ऊर्जा बचत तसेच कमी ऊर्जा वापरण्याची जाणीव करून देण्याच्या उद्देशाने, विविध देशांच्या सरकारांनी ऊर्जा आणि कार्बनच्या वापरावर कर लादले आहेत. उच्च उर्जा वापरावरील कर ग्राहकांना उर्जेचा वापर कमी करताना एका मर्यादेत ऊर्जा वापरण्यास प्रोत्साहित करतात.

तरुण पिढीची भूमिका :– भारतातील प्रत्येक नागरिकाला ऊर्जा कार्यक्षमतेने वापरण्याचे आणि भविष्यासाठी उर्जेची बचत करण्याचे अनेक मार्ग माहित आहेत. ते ऊर्जा कार्यक्षमतेला समर्थन देण्यासाठी भारत सरकारने लागू केलेल्या सर्व नियम, अटी आणि धोरणांचे पालन करतात. ११ व्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत उर्जेचा वापर कमी करण्याच्या मोहिमेत भारतीय नागरिक थेट योगदान देत आहेत. देशात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी आणि आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी मुले ही सर्वात मोठी आशा आहेत.

५ श्रेणींचा समावेश असलेले १७ क्षेत्र – उद्योग, इमारती, वाहतूक, संस्था आणि उपकरणे पुरस्कारांमध्ये समाविष्ट आहेत.

विद्युत उर्जेची बचत ऊर्जा बचत प्रकल्पांच्या अंमलबजावणीद्वारे सहभागी युनिट्सद्वारे प्रति वर्ष समतुल्य टाळलेल्या क्षमतेच्या (mw) नुसार केली जाते.

२०२१ च्या सुरुवातीस, दोन श्रेणींमध्ये ऊर्जा कार्यक्षमता इनोव्हेशन अवॉर्ड्स (NEEIA) – श्रेणी A – इमारती, वाहतूक आणि उद्योग आणि श्रेणी B – विद्यार्थी आणि संशोधन विद्वान जोडले गेले.

राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन पुरस्कार (NECA) भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांतील ऊर्जा–केंद्रित युनिट्सना विशिष्ट ऊर्जा वापर कमी करण्यासाठी त्यांच्या अपवादात्मक कामगिरीसाठी दिले जात आहेत. तर NEEIA ची संकल्पना नाविन्यपूर्ण उपायांद्वारे ऊर्जा कार्यक्षमता वाढवण्यासाठी आहे. उद्योग आणि क्षेत्रांमध्ये त्यांच्या सुविधांमध्ये नवनवीन ऊर्जा कार्यक्षमतेचे उपाय विकसित करण्यासाठी स्पर्धेची भावना निर्माण करणे आणि या तंत्रज्ञानाचा प्रसार आणि इतर क्षेत्रांमध्ये त्यांची बहुलता आणि अनुकूलन सुनिश्चित करणे हा या पुरस्काराचे संस्थात्मक स्वरूप देण्याचा उद्देश आहे.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम*🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🦚🦚🦚☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १५ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, मग्गसिरो मासो, रविवार, मार्गशिस माहे.

१५ डिसेंबर १९२५ – रोजी भारताच्या चलनपद्धतीत योग्य त्या सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने शिफारशी करण्यासाठी ब्रिटिश सरकारने "रॉयल कमिशन ऑन इंडीयन करंसी अँड फायनान्स" हे कमिशन सर एडमंड हील्टन यंग यांच्या अध्यक्षतेखाली नेमले होते. विश्वरत्न, बोधिसत्त्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रॉयल कमिशन ऑफ प्रुफ हिल्टन यंग कमिशन यांना भारतीय चलन आणि वित्त या विषयावर साक्ष (पुरावे) सादर केले. या कमिशनने आंबेडकरांसह एकूण अर्थ तज्ञांच्या साक्षी घेतल्या. त्यावेळी कमिशनच्या प्रत्येक सदस्यांच्या हाती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या "इव्हल्यूशण ऑफ प्रोव्हिंशियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया" या ग्रंथाची प्रत होती.

१५ डिसेंबर १९२७ – रोजी नाशिक येथे प्राध्यापक सबनीस यांच्या घरी सहभोजनास डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित.

१५ डिसेंबर १९३५ – रोजी मदर ता. वणी येथे जाहीर सभा, पतितपावनदास अध्यक्ष.

१५ डिसेंबर १९५२ – रोजी एल्फिन्स्टन कॉलेज मुंबई येथे विश्वरत्न, बोधिसत्त्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण.

१५ डिसेंबर २०२४ – रोजी मार्गशीर्ष पौर्णिमा (मग्गसिरो मासो पुंन्नमि)

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🔵🔵🔵 मार्गशीर्ष पौर्णिमा (मग्गसिरो मासो पुंन्नमि) 🔵🔵🔵☸☸

🔹 **पहिलि महत्वाची घटना :** राजा बिंबिसार व सिध्दार्थची प्रथम भेट. 🔹 **दुसरी महत्वाची घटना :** देवदत्तचा भगवान बुद्धांना मारण्याचा प्रयत्न. 🔹 **तिसरी महत्वाची घटना :** नालागिरी हत्तीवर विजय.

🔹 **पहिलि महत्वाची घटना :** राजा बिंबिसार व सिध्दार्थची प्रथम भेट.

सिध्दार्थने कपिलवस्तू सोडल्यावर तो मगध देशाची राजधानी राजगृह येथे आला. सिध्दार्थ गौतम मिळेल ती भिक्षा स्वीकारून तो पर्वताच्या एका निवांत कोपऱ्यात जाऊन बसला.

इसवी सन पूर्व ५४४ ते ४१९ या कालावधीत होऊन गेलेला मगध देशाचा राजा बिम्बिसार हा बौद्ध धम्माचा पहिला आश्रयदाता होता. त्यांच्या महान आश्रयाने बौद्ध धम्माचा मोठा विकास होऊ शकला. गौतम बुद्धाचे वडील राजा शुद्धोदन यांच्याशी राजा बिम्बिसार यांचे मैत्रीपूर्ण संबंध होते. गौतम बुद्ध यांच्यापेक्षा ते ५ वर्षांनी मोठे होते. कोलिय आणि शाक्य यांच्यात रोहिणी नदीच्या पाण्याच्या वाटपावरून युद्ध होऊ नये यासाठी सिद्धार्थ यांनी गृहत्याग व राज्यत्याग करून परीव्रज्या स्वीकारली होती. त्या त्यागाची माहिती राजा बिम्बिसार यांना होती. ज्याठिकाणी सिध्दार्थ गौतम आसनस्थ झाला होता त्याठिकाणी राजा बिंबिसार गेला. त्याच्या शेजारी बसून त्याच्या शरीर स्वास्थ्यविषयी विचारपूस केली. आणि म्हणाला, "बाळ, तुझ्या कुटुंबाशी माझी दृढ मैत्री आहे. ती वंशपरंपरागत असून तिची दृढता चांगली सिध्द झालेली आहे. म्हणून तुला काही सांगावे अशी इच्छा माझ्या मनात निर्माण झाली आहे. माझ्या प्रेमाचे शब्द तु ऐक, धनुष्याची दोरी खेचण्यास लायक असलेले तुझे बलवान दोन बाहू निरूपयोगी राहू देऊ नकोस. ते ही पृथ्वी काय पण त्रैलोक्य जिंकण्यास अधिक सक्षम आहेत. याचकांचे जीवन जगू इच्छिणाऱ्या गौतमा, नामवंत अशा तुझ्या वंशाला शोभणारे तुझे सौंदर्य वार्धक्य येऊन नष्ट होण्यापूर्वी वेळ अजूनही आलेली नाही तोपर्यंत, आत्ताच सर्व सुखाचा उपभोग घे."

अशाप्रकारे, राजा बिंबिसाराने सिध्दार्थला समजवण्याचा खूप प्रयत्न केला. तेव्हा सिध्दार्थने आपल्या शांत आणि स्नेहपूर्ण चेहऱ्यात बदल न करता खंबीर शब्दाने व खणखणीत आवाजात अनेक उदाहरणे देऊन उत्तर दिले. आणि म्हणाला, "आपण जे मला सांगितले ते आपले चारित्र्य, आपला जीवनमार्ग आणि आपल्या कुळाला शोभेल असे आहे. आणि माझा निश्चय पार पाडणे हे देखील माझे चारित्र्य, माझा जीवनमार्ग आणि माझ्या कुळाला शोभेल असेच आहे."

शेवटी राजा बिंबिसार म्हणाला, "तुझी इच्छा तू पूर्ण करण्यास माझी हरकत नाही. तुला जे काही करावयाचे आहे ते सिद्धीस गेल्यानंतर मला भेटण्याची कृपा कर." स्वतः राजाने आपले दोन हात जोडून उत्तर दिले. आणि पुन्हा भेटण्याचे आश्वासन गौतमाकडून घेतल्यावर राजा आपल्या सेवकांन सह राजवाड्यात परतला.

तो दिवस म्हणजे इसपूर्व ५३४ मागसिर मासो मार्गशीर्ष पौर्णिमा होय.

ज्ञानप्राप्ती झाल्यावर गौतम बुद्ध त्यांच्या शिष्यांसह राजगृह येथे आल्यावर राजा बिम्बिसार आपल्या प्रजेसह त्यांच्या स्वागतासाठी नगरच्या प्रवेशद्वारी गेले होते. त्यांनी बुद्धाचे शिष्यत्व पत्करले व बुद्धाच्या मार्गदर्शनाखाली अर्हत प्राप्तीतील सोतापन्न हे पद प्राप्त केले. कृतज्ञतेच्या भावनेतून त्यांनी बुद्ध व त्यांचे शिष्य यांना वसतीसाठी करन-वेणू–वन नावाचे बांबूचे वन दिले होते. त्यानंतर राजा बिम्बिसार यांनी बुद्धाच्या विचारांच्या प्रसारासाठी आयुष्यभर योगदान दिले.

🔹 **दुसरी महत्वाची घटना :** देवदत्तचा भगवान बुद्धांना मारण्याचा प्रयत्न.

देवदत्त हा तथागतांचा आतेभाऊ. त्याने भिक्खू संघात प्रवेश मिळवला होता. देवदत्ताने भिक्खूंसाठी स्वतःचे वेगळेच नियम बनवले होते व ते लागू करावेत यासाठी तो आग्रही होता. त्याला संघाचे प्रमुख पद हवे होते. परंतु त्याची ती योग्यता नसल्याने बुद्धांनी ते ते पद महामोग्गलायन आणि सारीपुत्त यांच्याकडे दिले. त्यामुळे तो द्वेष, मत्सर व क्रोध यांनी वेडा झाला आणि त्याने गौतम बुद्ध यांचा खून करायचा निर्धार केला.*

गौतम बुद्ध गृधकुट पर्वताच्या पायथ्याजवळून जात असताना पर्वताच्या उंच भागावरून त्याने काही लोकांच्या मदतीने मोठा दगड बुद्धाच्या अंगावर खाली लोटला. परंतु तो दगड मध्यंतरी लटकला आणि त्याचा लहानसा तुकडा गौतम बुद्धांच्या पायाला लागला व तेथे लहानशी जखम झाली. अशा प्रकारे पहिला प्रयत्न फसला. नंतर त्याने राजा अजातशत्रू याच्याशी संधान बांधून गौतम बुद्धाची हत्या करण्यासाठी मारेकरी पाठवले. पण पहिला मारेकरी बुद्धाची करूणा, मैत्रीभावना आणि तेज पाहून हिम्मत हरला. बुद्धाला मारण्याऐवजी तो त्यांचा शिष्य बनला. याप्रकारे देवदत्त याचा दुसरा प्रयत्न सुद्धा फसला.

🔹 **तिसरी महत्वाची घटना :** नालागिरी हत्तीवर विजय.

त्यानंतर देवदत्ताने अजातशत्रूच्या हत्तीशाळेतील एका माहुताला फितवले. तो प्रारंभी तयार न झाल्याने त्याला कामावरून काढून टाकण्याची धमकी दिली. शेवटी दबावामुळे नाईलाजाने तो हत्येच्या कटास कबूल झाला. त्यांनी तेथील मदमस्त, धिप्पाड व क्रूर अशा नालागिरी नावाच्या हत्तीला भरपूर दारू पाजली. सकाळी गौतम बुद्ध नगरात चारिका करीत असताना त्या हत्तीला त्यांच्यावर सोडून देण्यात आले. त्याला पाहून रस्त्यावरचे लोक जीवाच्या आकांताने सैरावैरा पळू लागले. गौतम बुद्ध मात्र तेथे शांतपणे उभे राहिले. उदात्त व अथांग करूणा आणि मैत्रीभावना यांच्या साह्याने ते निर्भय व शांत होते. बुद्धांनी त्याला मायेने व प्रेमाने “नालागिरी” म्हणून हाक मारली. तुफान वेगाने येणारा तो नालागिरी हत्ती बुद्धांच्या त्या प्रभावाने व भूमिकेने वरमला. तो शांत तर झालाच शिवाय त्याने पुढचे गुढगे टेकले आणि बुद्धांना अभिवादन केले, बुद्ध त्याला आपुलकीने गोंजारू लागले. याप्रकारे बुद्धाची हत्या करण्याचा देवदात्तचा तिसरा भयंकर उपाय सुद्धा कुचकामी ठरला. तो दिवस होता मार्गशीर्ष पौर्णिमेचा. करूणा, मैत्रीभावना, प्रेम, आपुलकी आणि निर्भयता यांचा उत्कट अविष्कार त्या दिवशी झाला होता. तथागत गौतम बुद्ध यांचा तो महान विजय होता.

मार्गशीर्ष पौर्णिमेचे महत्त्व जयमंगल अठ्ठ गाथेतील तिसऱ्या गाथेत दिसून येते, ते असे...

नालागिरी गजवरं अतिमत्तभुतं *दावाग्गि चक्कमसनीव* *सुदारूणन्तं।*

मेत्तम्बुसेक विधिना जितवा मुनिन्दो *तं तेजसा भवतु ते जयमङ्गलानि॥*

अर्थः- ज्या मुनीन्द्राने, दावाग्निचक्र आणि वीजेप्रमाणे अत्यंत भयानक आणि मदोन्मत्त अशा नालागिरी हत्तीला आपल्या मैत्रीरूपी पावसाने जिंकले, त्या भगवान बुद्धाच्या प्रतापाने तुझे कल्याण होवो.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम*🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🦚🦚🦚☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १६ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, मग्गसिरो मासो, सोमवार, मार्गशिस माहे.

१६ डिसेंबर १९३९ – बॉबें सरकारने महार वेतन पगारावर जादा कर लावला. विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे १९२७ पासून या समस्येवर झगडत आहेत. त्यानंतर १६ डिसेंबर १९३९ रोजी, २०,००० महार समाज, मांग समाज आणि वागी समाज यांच्या परिषदेत बोलतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आश्वासन दिले की, त्यांच्या तक्रारिंमधे आपण सरकारचे प्रतिनिधित्व करू, यानंतर सरकारला अतिरिक्त सर्व कर काढून टाकावे लागले.

१६ डिसेंबर, १९३९ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्व प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखली हरेगाव, जि. अहमदनगर, येथे वतनि (वतनदार) महारांची सभा व मार्गदर्शन.

१६ डिसेंबर १९५२ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्व प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे एल्फिन्स्टन महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेह संमेलनाच्या वेळेस विद्यार्थ्यांपुढे भाषण.

१६ डिसेंबर १९५६ – रोजी मुंबईमधे सामुदायिक धंम्मदिक्षेचा कार्यक्रम ठरला होता तो दि. ७ रोजीच दादासाहेब गायकवाडांनी घडविला.

१६ डिसेंबर १९७१ – रोजी भारताने पाकिस्तान बारोबरील युद्धात विजय मिळवून पाकिस्तानचे दोन २ तुकडे केले आणि बांग्लादेशाला स्वतंत्र केले. म्हणूनच हा दिवस "विजय दिन" म्हणून साजरा केला जातो.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

🌷*प्राचीन भारतीय ज्ञानपिठे*🌷

अखंड भाताच्या कानाकोपऱ्यांत शिक्षणाची असंख्य केंद्रे वसलेली होती. अगदी लहान–लहान विद्याकेंद्रे तर किती होती, त्याची गिणतीच नाही. यातील बहुतांशी विद्याकेंद्रे आसुरी वृत्तीच्या तत्कालीन मुसलमान आक्रमकांनी उध्वस्थ करून टाकली. ज्ञान केंद्रांच्या या अपरिमित हानीचे दुष्परिणाम आपण आजही पदोपदी भोगत आहोत. प्राचीन भारत (जंबुद्विप) हा शिक्षण क्षेत्रात अग्रेसर होता. भारतीय शिक्षणपद्धत जगमान्य होती. आजसारखी तरुण पिढी तेव्हा उच्च शिक्षण घेण्यास विदेशात तर जात नव्हतीच, उलट विदेशातून असंख्य जिज्ञासू ज्ञानार्जन करण्यासाठी भारतीय विद्यापीठांत येत. या सर्वांविषयींच्या गौरवशाली इतिहासाचे सोनेरी क्षण प्रस्तुत लेखाद्वारे जाणून घेऊयात.

जगातील सर्वांत प्राचीन आणि जगद्विख्यात तक्षशिला विद्यापीठाचे अवशेष ! या विद्यापीठाणे तब्बल १२०० वर्षे ज्ञानदानाचे प्रचंड मोठे कार्य केले.

१. तक्षशिला विद्यापीठ : भारताची बौद्धिक राजधानी !

'तक्षशिला' हे जगातील पहिले विश्वाविद्यालय (विद्यापीठ) मानले जाते. आजच्या पाकिस्तानात (रावळपिंडीपासून १८ मैल उत्तरेकडे) असलेले हे विद्यापीठ इ. स. च्या ७०० वर्षे पूर्वी स्थापन करण्यात आले आहे. पुढे इ. स. ४५५ मधे पूर्व युरोपच्या आक्रमकांनी अर्थात हुनांनी ते नष्ट केले. जागतिक स्तरावर ख्याती असलेल्या या विद्यापीठाणे अनुमाने १२०० वर्षे ज्ञानदानाचे प्रचंड मोठे कार्ये केले. श्रेष्ठ आचार्यांची परंपरा निर्माण केली. अनेक जगप्रसिद्ध विद्यार्थी दिले. तक्षशिला विद्यापीठ बंद पडल्यानंतर काही वर्षांतच मगध राज्यात (आजच्या बिहारमध्ये) नालंदा विद्यापीठ स्थापन झाले. ही दोन्हीही नामांकित विद्यापीठें एकाच वेळी कधीही कार्यरत नव्हती.

असे म्हणतात की, तक्षशिला या नगरीची स्थापना भरताने त्याच्या मुलाच्या म्हणजे तक्षाच्या नावावर केली. पुढे येथेच विद्यापीठ स्थापन झाले. जातक कथांमध्ये तक्षशिला विद्यापीठाविषयी बरीच माहिती मिळते. या कथांमध्ये १०५ ठिकाणी तक्षशिला विद्यापीठाचे संदर्भ मिळतात. त्या काळात म्हणजे अनुमाने १ सहस्त्र वर्षे तक्षशिला ही संपूर्ण भरतखंडाची बौद्धिक राजाधानी होती. तिची ही ख्याती ऐकूनच चाण्यक्यासारखी व्यक्ती मगध (बिहार) येथून इतक्या दूर तक्षशिलेला आली. बौद्ध ग्रंथ 'सुमिमजातक' आणि 'तेलपत्त' मधे तक्षशिलेचे अंतर काशीपासून २ सहस्त्र कोस इतके सांगितले आहे.

१ अ. तक्षशिला विद्यापीठातील चिकित्सा शास्त्राचे प्रगत केंद्र ! इ. स. च्या ५०० वर्षांपूर्वी, जेव्हा चिकित्सा शास्त्राचे नावही जगात कुठेच नव्हते, तेव्हा तक्षशिला विद्यापीठ हे चिकित्सा शास्त्राचे फार मोठे केंद्र मानले जात होते. येथे ६० हून अधिक विषय शिकविले जात होते. एकाच वेळी १० सहस्त्र ५०० विद्यार्थ्यांना शिकण्याची सोय होती.

१ आ. तक्षशिला विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची उज्ज्वल परंपरा.

१ आ २. या विद्यापीठाच्या स्थापनेनंतर म्हणजेच इसवी सनापूर्वी ७०० वर्षे, येथून शिकून गेलेला पहिला जगप्रसिद्ध विद्यार्थी म्हणजे पाणिनी ! त्यांनी पुढे संस्कृत भाषेचे व्याकरण सिद्ध केले !

१ आ २. इसवी सनापूर्वी ६ व्या शतकात चिकित्सा शास्त्र शिकलेला जिवक (किंवा जिबाका), पुढे जाऊन मगध राजवंशाचा राजवैद्य झाला. त्याने अनेक ग्रंथ लिहिले.

२ आ ३. इसवी सनापूर्वी ४ थ्या शतकातिल अर्थशास्त्राचा विद्यार्थी चाणक्य, जो पुढे 'कौटील्य' नावाने प्रसिद्ध झाला.

१ इ. वाढत्या आक्रमणांमुळे आचार्यांची विद्यापीठाकडे पाठ !

चिनी यात्री आणि विद्यार्थी 'फाह्यान' हा वर्षे ४०५ मधे तक्षशिला विद्यापीठात आला. हा काळ ह्या विद्यापीठाचा पडता काळ होता. पश्चिमेकडून होणाऱ्या आक्रमकांच्या संख्येत वाढ झाली. अनेक आचार्य विद्यापीठ सोडून गेले. अर्थात फाह्यानला तेथे फार काही ज्ञानाचा लाभ झाला नाही. त्याने तसे लिहून ठेवले आहे. पुढे ७ व्या शतकात तक्षशिला विद्यापीठाची महती एकूण आणखी एक चिनी यात्री युवान च्वांग तेथे गेला. त्यावेळी त्याला विद्याभ्यासाची कसलीही खून तेथे आढळली नाही.

अनुमाने ७०० वर्षे जगातील सर्वोत्कृष्ठ विद्यापीठ म्हणून ख्याती असलेल्या नालंदा विद्यापीठाचे अवशेष ! येथे अनेक दुर्लभ आणि दुर्मिळ ग्रंथांचा प्रचंड मोठा संग्रह होता.

३. अनेक दुर्लभ आणि दुर्मिळ ग्रंथांचा प्रचंड मोठा संग्रह असणारे नालंदा विद्यापीठ !

हुण आक्रमकांनी ज्या काळात तक्षशिला विद्यापीठ उद्धवस्थ केले, जवळपास त्याच काळात मगध साम्राज्यात नालंदा विद्यापीठाची मुहूर्तमेढ रोवली जात होती. मगधचे महाराज शकादित्य (म्हणजेच गुप्त वंशीय सम्राट कुमार गुप्त वर्षे ४१५ ते ४५५) यांनी त्यांच्या अल्पकाळात नालंदा येथील जागा विद्यापीठाच्या रूपात विकसित केली. या विद्यापीठाचे आरंभीचे नाव होते, 'नलविहार'! नालंदा विद्यापीठ हे अनेक इमारतींचे एक फार मोठे संकुल होते. यातील प्रमुख भवणे होती – रत्नसागर, रत्नोदधी आणि रत्नरंजक ! 'मान मंदिर' हे सर्वांत उंच प्रशासकीय भवन होते. पुढे इ. स. ११९७ मधे बख्तियार खिलजीने हे विद्यापीठ जाळून टाकले. तोपर्यंत अनुमाने ७०० वर्षे नालंदा विद्यापीठ हे जगातील सर्वोत्कृष्ठ विद्यापीठ होते.

या विद्यापीठात प्रवेशासाठी कठोर परीक्षा द्यावी लागत असे. येथे अनेक दुर्लभ आणि दुर्मिळ ग्रंथ यांचा प्रचंड मोठा संग्रह होता. चिनी यात्री ह्यूएन त्सांग हा येथे १० वर्षे

अध्ययन करत होता. त्याचे गुरु शिलभद्र हे आसामचे होते. ह्यूएन त्सांगने या विद्यापीठाविषयीं भरभरून आणि खूप चांगले लिहून ठेवले आहे.

बौद्ध धम्मातील 'वज्रयान' संप्रदायाच्या अभ्यासाचे अधिकृत केंद्र असलेल्या विक्रमशिला विद्यापीठाचे अवशेष !

३. विक्रमशिला विद्यापीठ, बिहार.

८ व्या शतकातील बांगालचा पाल वंशीय राजा धम्मपाल याने या विद्यापीठाची स्थापना आजच्या बिहार येथे केली होती. या विद्यापीठाच्या अंतर्गत ६ विद्यालये होती. प्रत्येक विद्यालयात १०८ शिक्षक होते. १० व्या शतकातील प्रसिद्ध तिबेटी लेखक तारानाथ यांनी या विद्यापीठाचे विस्तृत वर्णन केलेले आहे. या विद्यापीठात प्रत्येक दाराला एकेक प्रमुख आचार्य नियुक्त होते. नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आचार्य परीक्षा घ्यायचे. त्यांच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाच विद्यापीठात प्रवेश मिळत असे. हे आचार्य होते – पूर्व द्वार–पं. रत्नाकर शास्त्री, पश्चिम द्वार–वर्गाश्वर कीर्ती, उत्तर द्वार–नारोपंत आणि दक्षिण द्वार–प्रज्ञाकर मित्रा. यातील नारोपंत हे महाराष्ट्रातून आले होते. आचार्य दीपक हे विक्रमशिला विद्यापीठाचे सर्वाधिक प्रसिद्ध आचार्य झालेले आहेत.

१२ व्या षत्कात येथे ३ सहस्त्र विद्यार्थी शिकत होत्र. हा या विद्यापीठाचा पडता काळ होता. पूर्वेत आणि दक्षिणेत मुसलमान आक्रमक पोहोचत होते अन दिसतील ती ज्ञानाची साधने आणि स्थाने उध्वस्थ करीत होते. म्हणूनच उत्खननात जे अवशेष सापडले आहेत, त्यावरून असे लक्षात येते की, या विद्यापीठाच्या मोठ्या सभागृहात तब्बल ८ सहस्त्र लोकांची बसायची व्यवस्था होती! या विद्यापीठात विदेशी विद्यार्थ्यांमधे तिबेटी विद्यार्थ्यांची संख्या सर्वाधिक होती. त्याचें एक कारण म्हणजे बौद्ध धम्माच्या 'वज्रयान' संप्रदायाच्या अभ्यासाचे हे महत्वाचे आणि अधिकृत केंद्र होते.

नालंदा विद्यापीठ उद्धवस्थ झाल्यानंतर अनुमाने ६ वर्षांनी म्हणजेच वर्ष १२०३ मधे नालंदा जाळणाऱ्या बख्तियार खिलजीने हेही विद्यापीठ जाळून टाकले !

सोमपूर महाविहार विद्यापीठात चिन, तिबेट, मलेशिया, जावा आणि सुमात्रा येथील विद्यार्थी शिकण्यासाठी येत असत.

४. उड्डयंतपूर विद्यापीठ, बिहार.

पाल वंशाची स्थापना करणारे राजा गोपाळ यांनी उड्डयंतपूर विद्यापीठाचि स्थापना बौद्ध विहाराच्या रूपात केली होती. त्याच्या विशाल भवनांना बघून बख्तियार खिलजीला वाटले की, हा एखादा किल्लाच आहे. म्हणून त्याने यावर आक्रमन केले. वेळेंवर सैनिकी सहाय्य मिळू शकले नाही. केवळ विद्यार्थी आणि आचार्यांनीच शार्थीने झुंज दिली; पण सर्वच्या सर्व मारले गेले.

५. सुलोटगी विद्यापीठ, कर्नाटक.

कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील हे महत्वाचे विद्यापीठ ११ व्या शतकाच्या शेवटी उभे राहिले. राष्ट्रकुटांचे शासन असतांना कृष्ण (तृतीय) या राजसाजे मंत्री नारायण यांनी सुलोटगी विद्यापीठ बांधले. मात्र विद्यापीठ म्हणून काही करून दाखविण्याच्या आतच त्यावर मुसलमानांनी आक्रमन करून ते उध्वस्थ केले.

येथील पविट्टागे हे संस्कृत महाविद्यालय अल्पावधीतच संस्कृत शिक्षणासाठी चर्चेत आले होते. देशभरातील निवडक २०० विद्यार्थ्यांना भोजन आणि निवासासह शिक्षण देणारे हे विद्यापीठ वैशिष्ट्यपूर्ण होते.

६. सोमपूर महाविहार, बांगलादेश.

बांगलादेशाच्या नवगाव जिल्ह्यात बादलगाझी तालुक्यातील पहाडपूर गावात महाविहार म्हणून स्थापन झालेले सोमपूर महाविहार हे शैक्षणिक केंद्र पुढे विद्यापीठ म्हणून नावारूपाला आले. पाल वंशाचे दुसरे राजा धम्मपाल देव यांनी ८ व्या शतकाच्या शेवटी हा महाविहार निर्मिला. जगातील सर्वांत मोठे बौद्ध विहार म्हणता येईल, अशी याची रचना होती. चिन, तिबेट, मलेशिया, जावा आणि सुमात्रा येथील विद्यार्थी येथे शिकण्यासाठी येत होते. १० व्या शतकातील प्रसिद्ध विद्वान अतिश दीपशंकर श्रिज्ञान हे याचं विद्यापीठाचे आचार्य होते.

७. रत्नागिरी विद्यापीठ, ओडिसा.

६ व्या शतकात बौद्ध विहाराच्या रूपात स्थापन झालेले हे स्थान पुढे शिक्षणाचे मोठे केंद्र बनले. तिबेटमधील अनेक विद्यार्थी येथून शिकून गेले. तिबेटीयन इतिहासात या विद्यापीठाचा उल्लेख 'कालचक्र तंत्राचा विकास करणारे विद्यापीठ', असा केला गेला आहे; कारण येथे खगोलशास्त्राचा अभ्यास होत असे.

८. गोलकी मठ अर्थात विद्यापीठ, मध्यप्रदेश.

जबलपूर (मध्यप्रदेश) येथील भेडाघाट येथे ६४ योगिनींचे मंदिर आहे. त्याला 'गोलकी मठ' असेही म्हणतात. या 'गोलकी मठाचा' उल्लेख 'मलकापूर पिलर' म्हणून प्रसिद्ध असलेल्या खोदकामातही आढळतो. 'मटमायूर वंश' हा कलचुरी वंशापैकीच एक आहे. या वंशाचे युवराजदेव (प्रथम) यांनी या मठाची स्थापना केली. मुळात हे तांत्रिक आणि इतर विषयांचे विद्यापीठ होते. या गोलकी मठाच्या अर्थात विद्यापीठाच्या अधीन अनेक विद्यालयेही आंध्रप्रदेशात होती.

९. भारतात असंख्य ज्ञानमंदिरे !

बंगालमधील जगद्दल, आंध्रप्रदेशातील नागार्जुनकोंडा, काश्मीरमधील शारदापीठ, तामिळनाडूमधील कांचीपूरम, ओडिसामधील पुष्पगिरी, उत्तरप्रदेशातील वाराणसि अशी किती नावे घ्यावीत...? ही सर्व ज्ञानमंदिरे होती, ज्ञानपिथे होती. अगदी वणवासी अन (आजच्या भाषेत) मागास भागांतही आवश्यक ते शिक्षण सर्वांना मिळत होते.

श्री. प्रशांत पोळ. (संदर्भ: मासिक एकता).

☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम*🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🦚🦚🦚☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १७ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, मग्गसिरो मासो, मंगळवार, मार्गशिस माहे.

१७ डिसेंबर १९०७ – भूतान हा बौद्ध देश आशियातील सर्वांत आनंदी व जगातील आठव्या (८) क्रमांकाचा आनंदी देशाचा राष्ट्रीय दिन आहे.

१७ डिसेंबर १९३३ – रोजी तेरावे (१३) दलाई लामा थुब्तेन ग्यात्सो यांचा स्मृती दिन.

१७ डिसेंबर १९४६ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्व प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राज्यसभेत घटनेसंबंधी पहिले भाषण. ह्या भाषणात त्यांनी राष्ट्रीय अखंडतेवर भर देणाऱ्या संविधान सभेच्या सर्व सदस्यांना आश्चर्यचकित केले.

१७ डिसेंबर १९४७ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्व प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान सभेत पहिले भाषण.

१७ डिसेंबर १९८२ – रोजी पेंशनर्स डेच्या सर्व निवृत्तीवेतन धारकांना हार्दिक शुभेच्छा. १९८२ च्या सुप्रिम कोर्टाच्या निकालानंतर आजपर्यंत म्हणजे २०२४ सालापर्यंत पेन्शनर लोकांच्या अडचणीत काही विशेष फरक असा पडलेला नाही. त्यामुळे या सर्व पेन्शनरांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी व दाद मागण्यासाठी म्हणून १७ डिसेंबर हा दिवस पेन्शनर दिन म्हणून साजरा होतो.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚🔵🔵🔵💎 भारतात १७ डिसेंबर या दिवशी साजरा केला जातो पेन्शनधारकांचा दिवस. 💎🔵🔵🔵🦚🦚🦚☸☸

जेव्हा लोकांचे नियमित उत्पन्नाचे साधन नसते तेव्हा पेन्शन योजना वृद्धापकाळात आर्थिक सुरक्षा आणि स्थिरता प्रदान करतात. सेवानिवृत्तीचे नियोजन हे सुनिश्चित करते की पुढच्या काही वर्षांमध्ये लोक अभिमानाने आणि त्यांच्या राहणीमानात कोणतीही तडजोड न करता जगतील.

नवी दिल्ली – सेवानिवृत्तीचे उत्पन्न मिळावे या उद्देशाने नॅशनल पेन्शन प्रणाली म्हणजेच एनपीएस १ जानेवारी २००४ रोजी सुरू करण्यात आली. पेन्शन सुधारणांची स्थापना करणे आणि नागरिकांमध्ये सेवानिवृत्तीसाठी बचत करण्याच्या सवयीला प्रोत्साहन देणे हे आहे. • केंद्र, राज्य सेवा आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या सर्व पेन्शनधारकांसाठी १७ डिसेंबर हा दिवस महत्वाचा दिवस आहे. • नकेरा प्रकरणात भारतीय सर्वोच्च न्यायालयाने १७ डिसेंबर १९८२ रोजी एक महत्त्वपूर्ण निकाल दिला. • सुनावणी करताना सरन्यायाधीशांनी ठामपणे सांगितले की, पेन्शन हे सरकारी बक्षीस नसून कर्मचाऱ्यांचा हक्क आहे. निवृत्तीच्या तारखेच्या आधारावर निवृत्तीवेतनाचे फायदे वाढवण्यात कोणताही भेदभाव केला जाऊ शकत नाही. • पेंशनधारकांचे अधीक्षण पत्र म्हणूनही हा निर्णय मानला जातो. यामुळे १७ डिसेंबर राष्ट्रीय पेन्शन योजना म्हणून साजरा केला जातो. एका दृष्टीक्षेपात प्रकरण नाकारले- • या प्रकरणात संरक्षण मंत्रालयाचे अधिकारी डी. एस. नकारा यांची मुख्य भूमिका होती. • त्यांनी २५ मे १९७९ रोजी भारत सरकारच्या आदेशाविरुद्ध लढा दिला. त्यानंतरच उदार पेन्शन योजना सुरू करण्यात आली. • या योजनेंतर्गत ३१ मार्च १९७४ पूर्वी सेवानिवृत्तीनंतरचा लाभ नाकारला गेला. नकारा सुद्दा या कार्यक्षेत्रात आले होते. ज्यामुळे त्यांनी खटला दाखल केला. • एचडी शौरी यांनी नकारा यांना पीआयएल दाखल करण्यास मदत केली. या याचिकेत पेन्शनशी संबंधित मूलभूत मुद्दे उपस्थित करण्यात आले होते. ज्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने पेन्शनबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यास भाग पाडले. • हे प्रकरण इतके महत्त्वाचे होते की भारतातील न्यायालयीन सक्रियतेच्या पाच मान्यवर न्यायाधीशांनी हा निर्णय दिला. या प्रकरणात न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड, तत्कालीन सरन्यायाधीश, न्यायमूर्ती डी. ए. देसाई, न्यायमूर्ती ओ चिन्नाप्पा रेड्डी, न्यायमूर्ती व्ही. डी. तुळसपूरकर आणि न्यायमूर्ती बहरुल इस्लाम हे प्रमुख होते. भारतीय पेन्शन प्रणाली – या अंतर्गत कामगार कर्मचारी निवृत्तीवेतन योजना आणि कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संस्था (ईपीएफओ) कव्हर दिले जाते. १ जानेवारी २००४ रोजी किंवा त्यानंतर केंद्रीय सेवेत रुजू झालेले कर्मचारी नवीन पेन्शन सिस्टम (एनपीएस) अंतर्गत येतात.

पात्रता अटी – • कर्मचारी निवृत्तीवेतन योजनेचा लाभ घेण्यासाठी निवृत्तीवेतनाचे वय किमान दहा वर्षांच्या योगदानासह ५८ वर्षे आहे. त्याच वेळी, उत्पन्नाशी संबंधित कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजनेसाठी निवृत्तीवेतनाचे वय ५५ वर्षे आहे. • २०११ च्या जनगणनेनुसार, सुमारे १२% कामगार (किंवा सुमारे ५८ मिलियन लोक) विविध पेन्शन सिस्टम अंतर्गत येतात. पेन्शनद्वारे संरक्षित कर्मचारी सरकारी, सरकारी उपक्रम, सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील उद्योजक नियुक्त करतात, ज्यांचे कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेद्वारे (ईपीएफओ) मूलत: संरक्षण केले जाते.

• २० किंवा त्यापेक्षा जास्त कर्मचारी ईपीएफओ कव्हर केले जातात. उर्वरित ८८% कार्यबल मुख्यत: असंघटित क्षेत्रांतर्गत (स्वयंरोजगार, रोजंदारीचे मजूर, शेतकरी इ.) आणि काही संघटित क्षेत्रातील आहेत, परंतु या ईपीएफओने समाविष्ट केलेले नाहीत. • सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी (पीपीएफ) आणि पोस्टल सेव्हिंग योजना पारंपारिकरित्या मुख्य दीर्घकालीन बचत योजना असतात, परंतु केवळ थोड्या लोकांपुरतीच मर्यादित असतात.

कर्मचारी भविष्य निर्वाह योजना (ईपीएफ) – • दरमहा १५,००० किंवा त्याहून कमी मूलभूत पगाराचे कर्मचारी मासिक पगाराच्या १२% आणि नियोक्ताचे योगदान ३.६७% आहे. हे एकत्रित १५.६७% एकरकमी म्हणून जमा केले गेले आहे. • तर दरमहा १५,००० पेक्षा जास्त पगाराचे कर्मचारी मासिक पगाराच्या १२% आणि नियोक्ता देखील १२% वाटा देतात. ही २४% ची संयुक्त ठेव आहे. • ५५ वर्षे वयाची किंवा निवृत्तीनंतर पूर्ण रक्कम जमा केली जाते.

भारतीय पेन्शन प्रणालीची समस्या – • आयुर्मानात सुधारणा आणि प्रजनन दरामध्ये घट यामुळे लोकसंख्या वयाच्या रचनेत लक्षणीय बदल घडून येतो. वृद्धांचे प्रमाण (वय ६० वर्षे किंवा त्याहून अधिक.) १९५१ मध्ये सुमारे १९.८ मिलियनपासून वाढून १९९१ मध्ये ५६.७ मिलिनवर पोहोचले, परिणामी वृद्धांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ५.५ ते ६.९ टक्क्यांपर्यंत वाढले. • जागतिक बँकेच्या अंदाजानुसार (१९९४) वृद्ध लोकांची टक्केवारी २०२० पर्यंत १०.३% पर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. • १९९६ ते २०१६ पर्यंत वृद्ध नागरिकांची संख्या ६२.३ मिलियन ते ११२.९ मिलियन अशी वाढण्याची शक्यता आहे. • भारतातील सध्याच्या निवृत्तीवेतन योजनांमध्ये प्रामुख्याने संघटित क्षेत्रातील कामगारांचा समावेश आहे, जे एकूण कामगारांच्या दहा टक्क्यांच्या आसपास आहेत. • म्हणूनच असंघटित क्षेत्रात काम करणार्या बहुतांश कामगारांना वगळणे ही सध्याच्या व्यवस्थेची गंभीर समस्या आहे.

सामाजिक सुरक्षा – जेव्हा लोकांचे नियमित उत्पन्नाचे साधन नसते तेव्हा पेन्शन योजना वृद्धापकाळात आर्थिक सुरक्षा आणि स्थिरता प्रदान करतात. सेवानिवृत्तीचे नियोजन हे सुनिश्चित करते की पुढच्या काही वर्षांमध्ये लोक अभिमानाने आणि त्यांच्या राहणीमानात कोणतीही तडजोड न करता जगतील.संयुक्त राष्ट्रांच्या लोकसंख्या विभागाच्या म्हणण्यानुसार, २०५० पर्यंत जगाचे जीवनमान सध्याच्या ६५ वर्षांच्या पातळीवरून ७५ वर्षे जाण्याची शक्यता आहे. भारतातील आरोग्य आणि आरोग्याच्या चांगल्या स्थितीमुळे आयुष्यमान वाढले आहे. परिणामी, निवृत्तीनंतरच्या वर्षांची संख्या वाढते. अशाप्रकारे जगण्याची वाढती किंमत, महागाई आणि आयुर्मान निवृत्तीचे नियोजन करणे हे आजच्या जीवनाचा एक अनिवार्य भाग बनले आहे. जास्तीत जास्त नागरिकांना सामाजिक सुरक्षा देण्यासाठी भारत सरकारने कामगारांच्या सर्व क्षेत्रातील पेन्शन योजनांमधील सुधारणांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे.

पेन्शनर दिवस १७ डिसेंबर

Pensioners Day 17 December

सर्वसाधारणपणे पेन्शनर म्हटले की साठी पार केलेला वृध्द डोळ्यासमोर येतो. *अंधुक झालेली दृष्टी, अर्धवट ऐकू येणारे कान, अर्धे दात तर आधीच रजेवर गेलेले, बसकी गालफडे आणि तुरळक कोठे केस रूपेरी डोईस टक्कल छान अशी अवस्था. पुरूष मंडळीना दाढी करताना ब्लेड लागू नये म्हणून गाल फुगवून फुगवून करावी लागण्याची अवस्था.* वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यामुळे नोकरीतून सेवानिवृत्ती त्यामुळे दरमहा येणारा पगारही नाही त्यामुळे अर्थातच आर्थिक चणचण पण वृध्दापकाळात सरकारी नोकरांची हलाखीची परिस्थिती होऊ नये म्हणून सेवावृत्तीनंतर त्यांना पेन्शन योजना लागू करण्यात आली.

तत्कालीन ब्रिटिश सरकारने भारतातील सरकारी कर्मचाऱ्यांना १८५७ साली पेन्शन योजना लागू केली. ही योजना पूर्णपणे ब्रिटिश सरकारच्या नियमानुसार होती. पण ब्रिटिश राजवटीत गव्हर्नर आणि व्हाईसरॉय यांना पेंशन लागू करण्याचे अधिकार दिले होते त्यामुळे त्यांच्या मर्जीनुसार ही पेन्शन प्रणाली चालत होती. त्यानंतर १९२२ साली त्या प्रणालीत थोडेसे कायदेशीर बदल करण्यात आले.

स्वातंत्र्योत्तर काळात तत्कालीन संरक्षण मंत्रालयातील वित्त अधिकारी डि. एस. नाकारे १९७२ साली सेवानिवृत्त झाले पण त्यांची पेन्शन मंजूर झालीच नाही त्यामुळे त्यांनी सुप्रिमकोर्टात दाद मागितली आणि शेवटी १७ डिसेंबर २९८२ रोजी सुप्रिमकोर्टाने श्री. नाकारे यांच्या बाजूने निकाल दिला. त्यामुळे सगळ्या पेन्शनरनी १७ डिसेंबर हा दिवस पेन्शनर दिवस म्हणून साजरा करण्याचे निश्चित केले आणि त्यानुसार भारतात १७ डिसेंबर १९८३ रोजी प्रथम पेन्शनर दिन साजरा करण्यात आला.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या जनसंख्या प्रभागाच्या एका निरिक्षणाद्वारे भारतीयांचे सरासरी आयुर्मान ६५ वर्षे होते पण आता २०५० पर्यंत ते ७५ वर्षेपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

भारतात सरकारी कर्मचाऱ्यांसाठी ८ प्रकारच्या पेन्शन योजना (निवृत्ती वेतन) आहेत.

नियत वयोमान निवृत्ती वेतन.

पूर्ण सेवा निवृत्ती वेतन.

रूग्णता निवृत्ती वेतन.

भरपाई निवृत्ती वेतन.

जखम किंवा इजा निवृत्ती वेतन.

अनुकंपा निवृत्ती वेतन.

कुटुंब निवृत्ती वेतन.

असाधरण निवृत्ती वेतन.

१९८२ च्या सुप्रिम कोर्टाच्या निकालानंतर आजपर्यंत म्हणजे २०२४ सालापर्यंत पेन्शनर लोकांच्या अडचणीत काही विशेष फरक असा पडलेला नाही. त्यामुळे या सर्व पेन्शनरांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी व दाद मागण्यासाठी म्हणून १७ डिसेंबर हा दिवस पेन्शनर दिन म्हणून साजरा होतो.

आजची सामाजिक परिस्थिती पाहता प्रत्येकाला पेन्शन असणे आवश्यक आहे कारण वृध्दापकाळात थोडे आर्थिक स्थैर्य लाभते. घरात थोडा मान मिळतो. सुनबाई चहा आणताना विचारते साखर किती घालू? पत्नी सटरफटर कामे सांगताना विचार करते. मुलेबाळे तुमचा आदर करतात कारण तुम्हाला पेन्शन आहे. नातवंडानी एखादी वस्तू तुमच्याकडे हट्टाने मागावी आणि क्षणात तुम्ही ती त्याला द्यावी या सारखे दुसरे सुख नाही मित्रानो. म्हणून प्रत्येकाला पेन्शन असेल तर बरे होईल असे वाटते.

सर्व पेन्शनर्सना पेन्शनर दिवसांच्या शुभेच्छा

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🦚🦚🦚☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १८ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, मग्गसिरो मासो, बुधवार, मार्गशिस माहे.

१८ डिसेंबर १७५६ – रोजी गुरू घासिदास जयंती.

१८ डिसेंबर १९१६ – रोजी लंडन विद्यापीठाच्या सिनेटने डॉ. भीमराव आंबेडकरांच्या अर्जावर चर्चा करून सरळ एम. एससी. च्या (M.Sc) पदवी परीक्षेला बसण्याची परवानगी देणारा ठराव संम्मत केला.

१८ डिसेंबर १९४७ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार, कामगार नेते, महामानव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पंडित जवाहरलाल नेहरू यांना पत्र.

१८ डिसेंबर १९४८ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार, कामगार नेते, महामानव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबई येथील शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या (शे.का.फे.) मेळाव्यात भाषण.

१८ डिसेंबर १९९० – रोजी आंतरराष्ट्रीय स्थलांतरित दिवस. १८ डिसेंबर १९९० रोजी, सर्वसाधारण सभेने सर्व स्थलांतरित कामगार आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या हक्कांच्या संरक्षणावरील आंतरराष्ट्रीय अधिवेशनावर ठराव मंजूर केला.

१८ डिसेंबर १९९२ – रोजी अल्पसंख्यांक हक्क दिन. अल्पअंख्यांकही आहेत भाग समाजाचा करूया आदर त्यांच्या हक्कांचा.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚🔵🔵🔵💎 *१८ डिसेंबर १९९० – रोजी आंतरराष्ट्रीय स्थलांतरित दिवस.* 💎🔵🔵🔵🦚🦚🦚☸☸

१८ डिसेंबर १९९० रोजी, सर्वसाधारण सभेने सर्व स्थलांतरित कामगार आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या हक्कांच्या संरक्षणावरील आंतरराष्ट्रीय अधिवेशनावर ठराव मंजूर केला.

प्रत्येक वर्षी १८ डिसेंबर रोजी, संयुक्त राष्ट्र, UN–संबंधित एजन्सी इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर मायग्रेशन (IOM) मार्फत, ४१ दशलक्षाहून अधिक अंतर्गत विस्थापित व्यक्तींसह, अंदाजे २७२ दशलक्ष स्थलांतरितांनी केलेले योगदान हायलाइट करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्थलांतरित दिनाचा वापर करते. आणि त्यांच्यासमोरील आव्हाने.

IOM ची जवळपास ५०० देश कार्यालये आणि उप–कार्यालये तसेच सरकारी, आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत नागरी समाज भागीदारांद्वारे आयोजित केलेल्या कार्यक्रमांद्वारे समर्थित हा जागतिक कार्यक्रम स्थलांतरित विषयांची विस्तृत श्रेणी, सामाजिक एकसंधता, सन्मान, शोषण, स्थलांतरासाठी समर्थन करण्यासाठी एकता यांचे परीक्षण करतो. मानवी आणि व्यवस्थित स्थलांतरामुळे स्थलांतरितांना आणि समाजाला फायदा होतो या तत्त्वानुसार.

१९९७ मध्ये, फिलिपिनो आणि इतर आशियाई स्थलांतरित संस्थांनी १८ डिसेंबर हा स्थलांतरितांसोबत आंतरराष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा आणि प्रचार करण्यास सुरुवात केली. ही तारीख निवडण्यात आली कारण १८ डिसेंबर १९९० रोजी यूएनने सर्व स्थलांतरित कामगार आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या हक्कांच्या संरक्षणावरील आंतरराष्ट्रीय अधिवेशन स्वीकारले. या उपक्रमाच्या आधारे, १८ डिसेंबर रोजी स्थलांतरित हक्क इंटरनॅशनल आणि स्टीयरिंग कमिटी फॉर द ग्लोबल कॅम्पेन फॉर द इंटरनॅशनल कन्व्हेन्शन ऑफ मायग्रंट्स राइट्स आणि इतर अनेक संस्थांच्या समर्थनासह – १९९९ च्या उत्तरार्धात आंतरराष्ट्रीय स्थलांतरितांच्या अधिकृत यूएन पदनामासाठी ऑनलाइन मोहीम सुरू केली दिवस, जो शेवटी ४ डिसेंबर २००० रोजी घोषित करण्यात आला.

आंतरराष्ट्रीय स्थलांतरित दिवसाची संयुक्त राष्ट्रांची घोषणा ही एक महत्त्वाची पायरी आहे, जी स्थलांतरितांच्या संरक्षणाशी संबंधित असलेल्या सर्वांसाठी एक रॅलींग पॉइंट ऑफर करते. UN ने सर्व UN सदस्य देशांना, आंतरसरकारी आणि गैर–सरकारी संस्थांना मानवी हक्क आणि स्थलांतरितांच्या मूलभूत स्वातंत्र्याविषयी माहिती प्रसारित करून, अनुभव सामायिक करून आणि स्थलांतरितांचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी कृती करून हा दिवस पाळण्यासाठी आमंत्रित केले आहे.

आंतरराष्ट्रीय स्थलांतरित दिन हा लाखो स्थलांतरितांनी त्यांच्या यजमान आणि मूळ देशांच्या अर्थव्यवस्थेत त्यांच्या मूलभूत मानवी हक्कांचा आदर करण्यासाठी केलेले योगदान ओळखण्याची संधी म्हणून पाहिले जाते.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 अल्पसंख्यांक हक्क दिवस का साजरा केला जातो? 💎🦚🦚🦚☸☸

संयुक्त राष्ट्र संघटनेने १८ डिसेंबर, १९९२ रोजी राष्ट्रीय, वांशिक, धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्यांकांच्या हक्काचा जाहीरनामा स्विकृत करून प्रस्तुत केला.

त्यानुसार अल्पसंख्यांक नागरिकांना त्यांची संस्कृती, भाषा, धर्म, परंपरा इत्यादींचे संवर्धन करता यावे यासाठी जगभरात अल्पसंख्यांक हक्क दिन साजरा केला जातो.

अल्पसंख्यांक हक्क दिनाचा उद्देश :–

जगभरात धर्म व भाषा यावर आधारित अल्पसंख्यांक समाज आहे. धर्म व भाषेनुसार यात भेदाभेद न करता सर्वांनी एकसंघ होऊन कार्येरत राहावे. देशात अखंडितता राखण्यासाठी परंपरा, संस्कृती, भाषा व धर्म एका समुदायाने दुसऱ्या समुदायावर लादू नये. घटना व कायद्यानुसार प्रत्येकाला आपला हक्क दिलेला आहे. यासाठी हा दिवस दरवर्षी १८ डिसेंबर रोजी साजरा करण्यात येत असतो.

देशातील वांशिक अल्पसंख्यांकांना स्वातंत्र्याचा अधिकार तसेच समान संधी मिळवून देण्यासाठी त्याचबरोबर अल्पसंख्यांकांचा सन्मान आणि प्रतिष्टेबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी सदर दिवस साजरा केला जातो.

समाजातील सर्व अल्पसंख्यांक वर्गांचे उत्थान करणे आणि त्यांचे मत मांडण्यासाठी समर्थन करणे हे 'राष्ट्रीय अल्पसंख्यांक हक्क दिनाचे' मुख्य उद्दिष्ट आहे.

भारतीय राज्यघटनेच्या राचणाकारांनी बहुसंख्यांक समाजातील अल्पसंख्यांकांच्या हक्कांचे संरक्षण करण्याचे महत्त्व ओळखले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यघटनेचे मुख्य शिल्पकार यांनी संविधानात दिलेले मूलभूत हक्क सर्व नागरिकांना त्यांचा अल्पसंख्यांक दर्जा असला तरी त्यांचा विस्तार करण्यात यावा यासाठी मोलाची भूमिका बजावली.

☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम*🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🦚🦚🦚☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १९ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, मग्गसिरो मासो, गुरूवार, मार्गशिस माहे.

१९ डिसेंबर १९२७ – रोजी महाड जिल्ह्यातील सरकार व सनातनी लोक चवदार तळ्याभोवती कडे धरून महाड सत्याग्रह हाणून पाडण्यासाठी संग्रामात सिद्ध झाले.

१९ डिसेंबर १९३० – रोजी विश्वरत्न, बोधिसत्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार, कामगार नेते, महामानव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, "माझ्या आयुष्यातील सर्वांत चांगला मित्र, हे माझे काही वर्गमित्र आहेत आणि माझे महान प्रोफेसर कोलंबियामधे आहेत." १. जॉन डेवी, २. जेम्स शोटवेल, ३. एडविन सेलिगमैन, ४. जेम्स हार्वे रॉबिन्सन.

१९ डिसेंबर १९३४ – रोजी ब्रिटिश लोकसभेत भारतीय राज्यघटनेचे विधेयक विचारांसाठी मांडण्यात आले.

१९ डिसेंबर १९४९ – रोजी पंतप्रधान पंडित नेहरू यांनी हिंदू कोडबील संम्मत करण्याचा कटीबद्धतेचा पुनरुच्चार केला.

१९ डिसेंबर १९५१ – रोजी मुंबईच्या शिवडी लेबर (कामगार) कँप महिला मंडळातर्फे जुन्या सिद्धार्थ कॉलेज येथे विश्वरत्न, बोधिसत्व प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निवासस्थानी त्यांना ५०१ रूपयांची थैली माईसाहेब आंबेडकर यांचे हस्ते अर्पण करण्यात आली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम*🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🦚🦚🦚☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २० डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, मगसिरो मासो, शुक्रवार, मार्गशिस माहे.

२० डिसेंबर १८९६ – रोजी माता भीमाई आंबेडकर यांच्या स्मृतीदिनी त्यांना त्रिवार अभिवादन.

२० डिसेंबर १९२७ – रोजी महाड सत्याग्रह चवदार तलावाभोवती २० डिसेंबर पासून पोलिस तैनात केले होते, लोक महाडमधे जमा होऊ लागले.

२० डिसेंबर १९४१ – या दिवसापासून स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर सप्रेम जय भीम असे लिहू लागले.

२० डिसेंबर १९४९ – रोजी विश्वरत्न बोधिसत्त्व प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी (औरंगाबाद) संभाजी नगर येथे आमखास आत्ताचे शिवाजी मैदान येथे जाहीर सभेत भाषण केले.

२० डिसेंबर १९५६ – थोर समाज सुधारक, स्वच्छतेचे जनक डेबुजी झिंगराजी जानोरकर उर्फ संत गाडगे बाबा यांचे आजच्या दिवशी निधन झाले. त्यांना विनम्र अभिवादन.

२० डिसेंबर २००० – रोजी आंतरराष्ट्रीय मानवी एकता दिवस. २० डिसेंबर रोजी आंतरराष्ट्रीय मानवी एकता दिवस साजरा केला जातो. त्याच्या पायावर २००० मध्ये UN मिलेनियम समिटमध्ये स्वाक्षरी करण्यात आली. जागतिक नेत्यांच्या नेतृत्वाखालील हा ऐतिहासिक दस्तऐवज, २१ व्या शतकासाठी "एकता" हा पाया आणि प्रोत्साहन म्हणून समजला. सामायिक जबाबदारीच्या कल्पनेचा परिणाम म्हणून २००२ मध्ये जागतिक एकता निधीची स्थापना करण्यात आली, ज्यामुळे अखेरीस २००५ मध्ये आंतरराष्ट्रीय मानवी एकता दिवसाची अधिकृत घोषणा करण्यात आली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚भिमाबाई रामजी आंबेडकर 🦚🦚🦚☸☸

जन्म :– १४ फेब्रुवारी १८५४; आंबेटेंभे, ता. मुरबाड. मृत्यू :– २० डिसेंबर १८९६.

भिमाबाई रामजि आंबेडकर या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या यांच्या आई व रामजी आंबेडकर यांच्या पत्नी होत्या. त्यांचे वडील लक्ष्मन मुरबाडकर हे आधी मराठा पलटणीत व नंतर १०६ सॅपर्स अँड मायनर्स मधे सुभेदार होते.

इ. स. १८६७ मधे वयाच्या १३ व्या वर्षी भीमाबाईचा विवाह १९ वर्षीय रामजी आंबेडकर यांच्याशी ठाणे जिल्ह्यातील मुरबाड येथे झाला.

इ. स. १८६६ च्या सुमारास रामजी इंग्रजी सैन्याच्या १०६ सॅपर्स अँड मायनर्स तुकडीत शिपाई म्हणून भरती झाले. भीमाबाईंचे वडील मुरबाडचे राहणारे होते व ते इंग्रजी सैन्यात सुभेदार या पदावर होते.

रामजी व भीमाबाई या दामपत्यांना १८९१ पर्यंत चौदा अपत्य झाली होती. त्यापैकी गंगा, रमा, मंजुळा व तुळसा या चार मुली जिवंत राहिल्या होत्या. मुलांपैकी बाळाराम, आनंदराव व भीमराव ही तीन मुले जिवंत होती. भीमराव सर्वात लहान व चौदावे अपत्य होते. रामजी ज्या पलटणीत होते ती पलटण इ. स. १८८८ मधे मध्य प्रदेशातील महू येथे लष्करी तळावर आली होती. येथे सुभेदार रामजींना नॉर्मल स्कुलचे मुख्याध्यापक पद मिळाले होते. या काळात रामजी व भीमाबाईंच्या पोटी डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी महू या लष्करी छावणी असलेल्या गावी झाला. भीमराव हे रामजी आंबेडकर व भीमाबाई यांचे १४ वे व अंतिम अपत्य होते. बाळाचे नव 'भिवा' असे ठेवण्यात आले, तसेच त्यांची भीम, भीमा व भीमराव ही नावेही प्रचलित झाली. आंबेडकरांचे कुटुंब हे त्याकाळी अस्पृश्य गणल्या गेलेल्या महार जातीचे होते आणि महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्याच्या मंडणगड तालुक्यातील आंबडवे या गावचे होते. अस्पृश्य असल्यामुळे त्यांच्यासोबत नेहमी सामाजिक, आर्थिक भेदभाव केला गेला. इ. स. १८९४ मधे सुभेदार रामजी आंबेडकर इंग्रजी सैन्यातील मुख्याध्यापक पदाच्या नौकरी वरून निवृत्त झाले आणि महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील आपल्या मूळ गावाजवळील दापोली या गावातील 'कॅम्प दापोली' वस्तीत परिवारासह राहू लागले.

इ. स. १८९६ मधे रामजींनी आपल्या कुटुंबासह दापोली सोडली व सातारा येथे राहिले. या वर्षी त्यांनी कबीर पंथाची दिक्षा घेतली. २० डिसेंबर इ. स. १८९६ मधे मस्तकशूळ या आजाराने भीमाबाईचे निधन झाले. त्यावेळी भीमराव ५ वर्षांचे होते.

भीमाबाईंच्या सन्मानार्थ मातोश्री भीमाबाई आंबेडकर पुरस्कार दिला जातो.

🎉🎉 माता भीमाई आंबेडकर यांच्या स्मृतीदिनी त्यांना त्रिवार अभिवादन.🎉🎉💐

☸☸🦚🦚🦚*गाडगे महाराज आणि बाबासाहेब....!* 🦚🦚🦚☸☸

गाडगेबाबांनी चोखामेळा धर्मशाळा बंसहेबांकडे सुपूर्द केली :–

१९२० साली पंढरपूर येथे कर्मयोगी संत गाडगेबाबांनी चोखामेळा धर्मशाळा बांधली होती. त्यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी १९४८–४९ दरम्यान प्रत्यक्ष परिचय झाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संत गाडगेबाबा यांचा स्नेह होता व दोघांना एकमेकांबद्दल आदर होता. गाडगेबाबा आपल्या कीर्तनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा व त्यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करीत असत.

गाडगेबाबांनी चोखामेळा धर्मशाळा, पंढरपूर १४ जुलै १९४९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीकडे सुपूर्द केली. यावेळी त्यांच्या समवेत भाऊराव गायकवाड, रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील, आणि रावसाहेब जगताप उपस्थित होते.

गाडगेबाबा आणि बाबासाहेबांची अशी झाली होती अविस्मरणीय भेट :–

१४ जुलै १९५१ ला गाडगेबाबांची प्रकृती ठीक नव्हती. महानंदसामी नावाच्या त्यांच्या चाहत्याने मुंबईत आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना गाडगे बाबांची खबर दिली. बाबासाहेब तेव्हा भारताचे कायदेमंत्री होते. त्यांना संध्याकाळच्या ट्रेनने दिल्लीला रवाना व्हायचे होते. गाडगेबाबांचा निरोप मिळताच त्यांनी सर्व कामे बाजूला ठेवली, २ घोंगड्या विकत घेऊन ते महानंदसामीसह रुग्णालयात गेले.

कोणाकडून काही न घेणाऱ्या गाडगेबाबांनी बाबासाहेबांकडून दोन घोंगड्या स्वीकारल्या, पण म्हणाले, ‘डॉक्टर तुम्ही कशाला आले? मी एक फकीर, तुमचे एकेक मिनिट महत्त्वाचे आहे. तुमचा किती मोठा अधिकार आहे.' तेव्हा बाबासाहेब म्हणाले, ‘बाबा माझा अधिकार दोन दिवसाचा. उद्या खुर्ची गेल्यावर मला कोणी विचारणार नाही. तुमचा अधिकार मोठा आहे.’ यावेळी बाबासाहेब आंबेडकरांच्या डोळ्यांत अश्रू तरळले होते... कारण असा प्रसंग पुन्हा जीवनात येणार नाही याची दोघांनाही जाणिव होती....!

डॉ. बाबासाहेब यांच्या कार्यावर तर ते खूपच आनंदी होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्यावर ते लोकांना मदतीचे आवाहन करायचे. बाबासाहेब माझे गुरू होऊ शकतात असे बोलायचे. मी न शिकलेला माणूस, रस्त्यावर उतरून लोकांना चांगलं सांगणारा पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे लोकांच्या कल्याणासाठी कायद्याचा आधार देणारा माणूस अशी पोहोच पावती ते द्यायचे.

संत गाडगे बाबां एकदा रात्री कीर्तन करत होते.. काही लोकं आले त्यांनी गाडगेबाबा यांना सांगितले तुमचा मुलगा मरण पावला.. बाबांचा हा एकुलता एक मुलगा होता, तरी गाडगे बाबांच्या डोळ्यातुन अश्रुंचा एक थेंब सुद्धा आला नाही व यावर ते म्हणतात, "ऐसे किती गेले कोट्याने, का रडु ऐकासाठी?"

पण ६ डिसेंबर १९५६ रोजी जेंव्हा बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वान झाले तेंव्हा गाडगे बाबा सतत १४ दिवस रडत राहीले, त्यांनी अन्न पाणी त्यागलं आणि १५ व्या दिवशी म्हणजेच २० डिसेंबर १९५६ रोजी त्यांचेही महापरिनिर्वान झाले..

गाडगे महाराजांसारखा संत आता पुन्हा होणे नाही.. महापरिनिर्वाणदिनी त्याना विनम्र अभिवादन !!!

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚🔵🔵🔵💎 *आंतरराष्ट्रीय मानवी एकता दिवस. विसरून सारे हेवेदावे एकत्र एऊया वसुंधरेला आपुल्या प्रसंन्न बनवूया.* 💎🔵🔵🔵🦚🦚🦚☸☸

जागतिक समृद्धीला पाठिंबा देण्यासाठी दरवर्षी जागतिक स्तरावर देश आंतरराष्ट्रीय मानवी एकता दिनाला एकत्र येतात. या दिवशी लोक उपासमार, गरिबी आणि रोगराई नष्ट करण्याची शपथ घेतात

आंतरराष्ट्रीय मानव एकता दिवस दरवर्षी २० डिसेंबर रोजी साजरा केला जातो. हा दिवस राज्यांना आंतरराष्ट्रीय करारांप्रती त्यांच्या वचनबद्धतेची पुष्टी करण्यास प्रेरित करतो. हे शांतता, सामाजिक न्याय आणि शाश्वत विकासाच्या समान उद्दिष्टांसाठी एकत्र काम करण्यासाठी कृतीचे आवाहन करते.

हा दिवस आपल्याला समुदाय, व्यक्ती आणि राष्ट्रांच्या वचनबद्धतेसह जगभरातील अडचणींना तोंड देण्याची परवानगी देतो. आपण सर्वांनी एकत्र येऊन हा दिवस साजरा केला पाहिजे आणि आपल्या जबाबदाऱ्या समजून घेतल्या पाहिजेत. आपण सुसंवाद आणि शांतता वाढवली पाहिजे.

युनायटेड नेशन्स जनरल असेंब्ली (UNGA) ने २० डिसेंबर २००५ रोजी आंतरराष्ट्रीय मानव एकता दिवस घोषित केला. दरवर्षी हा दिवस नागरिकांमध्ये सहकार्य आणि एकतेच्या तत्त्वांना प्रोत्साहन देण्यासाठी पाळला जातो. आपण सर्वांनी या दिवसाचे कौतुक केले पाहिजे आणि त्याबद्दल जनजागृती केली पाहिजे. हे एकाच तारखेला, सातत्याने, जगभरात पाहिले जाते.

आंतरराष्ट्रीय मानवी एकता दिवस: इतिहास आणि महत्त्व

२० डिसेंबर रोजी आंतरराष्ट्रीय मानवी एकता दिवस साजरा केला जातो. त्याच्या पायावर २००० मध्ये UN मिलेनियम समिटमध्ये स्वाक्षरी करण्यात आली. जागतिक नेत्यांच्या नेतृत्वाखालील हा ऐतिहासिक दस्तऐवज, २१ व्या शतकासाठी "एकता" हा पाया आणि प्रोत्साहन म्हणून समजला. याने ओळखले की जागतिकीकरणाने संधी उपलब्ध करून दिली असताना, त्याचे फायदे आणि वजन असमानपणे विखुरले गेले आणि मोठ्या संख्येने सोडून दिले.

म्हणून, घोषणापत्राने एकत्रित जागतिक प्रयत्नांच्या आवश्यकतेवर जोर दिला, जिथे ज्या लोकांना सर्वात जास्त फायदा होतो अशा व्यक्तींकडून मदतीला पात्र आहेत किंवा कमीत कमी मदत करतात.

या सामायिक जबाबदारीच्या कल्पनेचा परिणाम म्हणून २००२ मध्ये जागतिक एकता निधीची स्थापना करण्यात आली, ज्यामुळे अखेरीस २००५ मध्ये आंतरराष्ट्रीय मानवी एकता दिवसाची अधिकृत घोषणा करण्यात आली. हे वार्षिक स्मरणपत्र म्हणून भरते की आमचे परस्पर जोडलेले जग उचलण्याच्या एकूण वचनबद्धतेवर अवलंबून आहे. एकमेकांना, वैयक्तिक यश, तरीही संपूर्ण मानवी कुटुंबाची समृद्धी.

अशा प्रकारे, जेव्हा आपण २० डिसेंबर रोजी हात धरतो, तेव्हा आपण केवळ उत्सव साजरा करत नाही; आपण सहस्राब्दी घोषणेकडे प्रकाश टाकत आहोत, सर्वांसाठी अधिक आणि न्याय्य भविष्याकडे प्रगती करत आहोत.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम*🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🦚🦚🦚☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २१ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, मग्गसिरो मासो, शनिवार, मार्गशिस माहे.

२१ डिसेंबर १९५० – रोजी लोकप्रतिनिधी दुरुस्ती विधेयक संसदेच्या चर्चेत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकप्रतिनिधी दुरुस्ती विधेयकावर Representation of the people Amendment Bill वर चर्चा केली. हे विधेयक भारताचे पहिले कायदे मंत्री डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी मांडले.

२१ डिसेंबर १९५१ – रोजी मुंबई येथील मोहंम्मद अली रोड (रस्ता), बेग महंमद बाग येथे झालेल्या मुस्लिम सभेत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या महत्त्वपूर्ण भाषणात सांगितले की, "अल्पसंख्यांक जमातीचे मूलभूत हक्क शाबीत राहिले पाहिजे." (सदर भाषण जनता वृत्तपत्रात २२ डिसेंबर १९५१ रोजी प्रकाशित झाले.)

२१ डिसेंबर १९५५ – रोजी औरंगाबाद (आता संभाजीनगर) मधील मिलिंद महाविद्यालय येथे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम*🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🦚🦚🦚☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २२ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, मग्गसिरो मासो, रविवार, मार्गशिस माहे.

२२ डिसेंबर १९३९ – रोजी मुस्लिम मुक्तिदिन सोहळ्यात विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मुंबई येथे भाषण.

२२ डिसेंबर १९४८ – रोजी मुंबई येथील आर. एम. भट हायस्कूलमधे शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या सोहळ्यात विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माईसाहेब आंबेडकर यांचा सहभाग. त्यावेळेस त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "ज्यांना काम करण्याची आवड आहे, त्यांना संधी द्या आपापसात भांडणे नकोत.

२२ डिसेंबर १९५१ – रोजी वरळी येथील बौद्ध विहारात विश्र्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धंम्मावर (चांगले जीवन जगण्याचा मार्ग) यावर भाषण केले.

२२ डिसेंबर १९५२ – रोजी विश्र्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हस्ते पुणे जिल्हा Law Library विधी वाचनालयाच्या नवीन विभागाचे उद्घाटन करण्यात आले.

२२ डिसेंबर १९५२ – रोजी पुणे येथील विधी ग्रंथालयाच्या सभागृहात 'लोकशाहीसाठी आवश्यक अटी' या विषयावर विश्र्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम*🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🦚🦚🦚☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २३ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, मग्गसिरो मासो, सोमवार, मार्गशिस माहे.

२३ डिसेंबर – रोजी जागतिक कृषी दिन. मातीतून सोनं उगविणाऱ्या सर्व शेतकरी बांधवांना राष्ट्रीय शेतकरी दिनाच्या मंगलमय सस्नेह हार्दिक शुभेच्छा.

२३ डिसेंबर १९४५ – रोजी विश्र्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर पी. एन. राजभोग यांच्या समवेत मद्रास (चैन्नई) एक्स्प्रेसने मद्रास (चैन्नई) प्रांताच्या दौर्यावर.

२३ डिसेंबर १९५१ – रोजी समाजवादी पक्ष व शेड्युल्ड कास्ट फेडरेशन (शे. का. फे.) यांच्या वतीने आयोजित मुंबई येथील झालेल्या सभेत विश्र्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण.

२३ डिसेंबर १९५५ – रोजी विश्र्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या "भाष्यांवरील राज्यांवर विचार Thoughts on Linguistic States" या प्रबांधाचे पुस्तक रुपाने प्रकाशित केले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम*🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🦚🦚🦚☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २४ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, मग्गसिरो मासो, मंगळवार, मार्गशिस माहे.

२४ डिसेंबर १९२७ – रोजी विश्र्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर व २००–२५० दोनशे–अडीचशे मंडळी पद्मावती बोटीने सत्याग्रहासाठी महाडला प्रयाण केले.

२४ डिसेंबर १९३२ – रोजी तिसऱ्या गोलमेज परिषदेचा समारोप झाला.

*२४ डिसेंबर १९३४ – रोजी विश्र्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या कार्यकर्त्यांसमवेत वेरूळ येथील लेण्यांस भेट दिली.

२४ डिसेंबर १९३९ – रोजी अंकलखोप येथे सातारा जिल्हा अस्पृश्य युवक परिषदेत विश्र्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण.

२४ डिसेंबर १९५१ – शेड्युल्ड कास्टस फेडरेशन व समाजवादी पक्षातर्फे मुंबईतील चौपाटीवर निवडणूक प्रचार सभेत विश्र्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रभावी विरोधी पक्षाची आवश्यकता असल्याचे सांगून केवळ काँग्रेसला विरोध करण्यासाठी समाजवादी पक्षासी युती केली असल्याचे सांगितले.

२४ डिसेंबर १९५२ – रोजी विश्र्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कोल्हापूर येथील राजाराम महाविद्यालय येथील वार्षिक स्नेह संमेलनात आपल्या भाषणात सांगितले की, "ज्ञान हाच मनुष्याच्या जीवनाचा पाया आहे. विद्यार्थ्यांनी बौद्धिक शक्तीचे संवर्धन करण्यासाठी आणि आपल्या बुद्धिला चालना देण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले पाहिजे." त्यानंतर डॉ. सौ. सविताबाई आंबेडकर यांनी बक्षिसांचे वितरण केले.

२४ डिसेंबर १९७३ – रोजी ई. व्ही. रामास्वामी नायकर (पेरियार) यांचा स्मृतिदिन.

*२४ डिसेंबर १९८६ – रोजी भारतीय ग्राहक दिन. राष्ट्रीय ग्राहक दिन हा दरवर्षी २४ डिसेंबर रोजी भारतात साजरा केला जातो. इ. स. १९८६ साली २४ डिसेंबर या दिवशी ग्राहक हक्क कायद्याला भारताच्या राष्ट्रपतींनी मंजूरी दिली होती. तेव्हापासून २४ डिसेंबर हा दिवस राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून साजरा केला जातो. हा कायदा अस्तित्वात यावा यासाठी अनेक संस्था आणि कार्यकर्त्यांना प्रयत्न करावे लागले होते. ग्राहक संरक्षण कायद्यानुसार प्रत्येक भारतीय ग्राहकाला सहा हक्क मिळाले आहेत.

सुरक्षेचा हक्क, माहितीचा हक्क, निवड करण्याचा अधिकार, म्हणणे मांडण्याचा हक्क, तक्रार व निवारण करून घेण्याचा हक्क, ग्राहक हक्कांच्या शिक्षणाचा अधिकार.*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम*🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🦚🦚🦚☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २५ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, मग्गसिरो मासो, बुधवार, मार्गशिस माहे.

२५ डिसेंबर १९२७ – मनुस्मृति दहन दिन/स्त्रि हक्क दिन देहुरोड मेळावा.

२५ डिसेंबर १९२७ – रोजी विश्र्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथे वंचित शोशित समाजाची परिषद भरविली, या परिषदेमधे मनुस्मृतिचे दहन करण्यात आले. मनुस्मृतिने स्त्रियांवरच नव्हे तर अस्पृश्यांनाही अमानुष वागणूक दिली व त्याचा प्रचार केला.

२५ डिसेंबर १९३९ – रोजी "सर्व मागासवर्गीयांनी एकजुटीने वागावे." बॅरिस्टर मोहंम्मद अली जिंन्ना यांच्या जन्मदिनी विश्र्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या भाषणातील विधान, बेळगाव.

२५ डिसेंबर १९४५ – रोजी विश्र्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मद्रास (चेन्नई) प्रांताचा निवडणूक प्रचार दौरा केला.

२५ डिसेंबर १९५२ – रोजी "स्त्रियांनी आपल्या हक्कांसाठी मनोदौर्बल्य टाकून कंबर कसून पुढे आले पाहिजे." असे उद्गार विश्र्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी काढले. ज्यावेळी त्यांना कोल्हापूर येथील महिला संघटणांच्या वतीने मानपत्र मिळाले होते.

२५ डिसेंबर १९५३ – रोजी निपाणी (बेळगाव) येथे विश्र्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण झाले. या सभेत बोलतांना निवडणुकीच्या पराभवाने निराश न होता चळवळ जिवंत ठेवण्याचा संदेश त्यांनी अनुयायांना दिला.

२५ डिसेंबर १९५४ – रोजी पुणे जिल्ह्यातील देहुरोड विहारामधे महात्मा भगवान बुद्धांच्या मूर्तीची विश्र्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हस्ते स्थापना करण्यात आली. बुद्ध मूर्तीच्या स्थापनेखेरीज या बुद्ध विहाराचे उद्घाटनसुद्धा बाबासाहेबांनी केले होते. आपल्या भाषणामधे पंढरपूरच्या विठ्ठलाची मूर्ती ही बुद्धांचीच मूर्ती असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🌿🌿🌿💎 *बाबासाहेबांनी मनुस्मृती का जाळली? या पुस्तकात कोणते कायदे होते?* 💎🌿🌿🌿☸☸

या देशातल्या काही घटकांना विषमतेचा पुरस्कार करणारी मनुस्मृती ही श्रेष्ठ वाटते, देशाच्या लोकशाहीवादी घटनेपेक्षा अधिक महत्त्वाची वाटते, हे उघड आहे. ती त्यांना तशी वाटते म्हणूनच या देशात विषमतेवर आधारित चातुर्वर्ण्य व्यवस्था शतकानुशतकं टिकुन राहिली. २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे बाबासाहेबांनी "मनुस्मृति" या कलंकित पुस्तकाचे दहन केले व स्त्रिया आणि शुद्रांवर वर्षानुवर्षे लादलेली गुलामी नाकारण्याची वाट मोकळी करून दिली.

मनुस्मृति मधे नेमके काय होते ज्याने स्त्रि व शूद्रांना अमानविय वागणूक दिली?

१) नारी मग ती पुत्री, पत्नी, माता, किंवा कंन्या, युवा, वृद्धा कोणत्याही स्वरुपात असो ती कधीच स्वतंत्र राहायला नको. (मनुस्मृति अध्याय–९ श्लोक–२ ते ६ पर्यंत.)

२) पति पत्नीचा केंव्हाही त्याग करू शकतो, तिला गहाण ठेवू शकतो, विकू शकतो, परंतु स्त्रिला या प्रकारचा कोणताही अधिकार नाही. कोणत्याही स्थितीमधे विवाहानंतर पत्नी सदैव पत्नीचं राहत असते. (मनुस्मृति अध्याय–९ श्लोक–४५.)

३) संप्पत्ती आणि मिळकतीवर अधिकार किंवा दावा करण्याचा अधिकार नाही, शुद्रांच्या स्त्रियासुद्धा "दास" आहेत, स्त्रिला संप्पत्ती ठेवण्याचा अधिकार नाही, स्त्रिच्या संप्पत्तिचा मालक तिचा पति, पुत्र, किंवा पिता असेल. (मनुस्मृति अध्याय–९ श्लोक–४१६.)

४) ढोर, गवार (अशिक्षित), शूद्र आणि नारी हे सर्व ताडन करण्यास योग्य आहेत. म्हणजे स्त्रियांना ढोरासारखे मारता येऊ शकते. (मनुस्मृति अध्याय–८ श्लोक–२९९.)

५) असत्य ज्याप्रकारे अपवित्र असते, त्याचप्रकारे स्त्रियांसुद्धा अपवित्र असतात. शिकायचा, शिकवायचा, वेद–मंत्र म्हणायचा व उपनयन करण्याचा स्त्रियांना अधिकार नाही. (मनुस्मृति अध्याय–२ श्लोक–६६ आणि अध्याय–९ श्लोक–१८.)

६) स्त्रियां शेवटी नरकातच जाणाऱ्या असल्यामुळे त्यांना यज्ञकार्य किंवा दैनिक अग्निहोत्रसुद्धा करण्याचा अधिकार नाही. यामुळे म्हटल्या जाते – "नर्काचे द्वार." (मनुस्मृति अध्याय–११ श्लोक–३६ आणि ३७.)

७) यज्ञकार्य करणाऱ्या किंवा वेदमंत्र बोलणाऱ्या स्त्रियांच्या हातचे भोजन ब्राम्हणांनी वर्ज्य मानावे, स्त्रियांनी केलेले सर्व यज्ञकार्य अशुभ असल्याने देवांना स्विकार्य नाहीत. (मनुस्मृति अध्याय–४ श्लोक–२०५ आणि २०६.)

८) मनुस्मृति प्रमाणे, स्त्रि पुरुषांना मोहित करणारी असते. (मनुस्मृति अध्याय–२ श्लोक–२१४.)

९) स्त्रि पुरुषांना दास बनवून पदभ्रष्ट करणारी असते. (मनुस्मृति अध्याय–२ श्लोक–२१४.)

१०) स्त्रि एकांताचा दुरुपयोग करणारी असते. (मनुस्मृति अध्याय–२ श्लोक–२१५.)

११) स्त्रि संभोगाप्रिया असते त्यासाठी ती वय किंवा कुरूपतासुद्धा बघत नसते. (मनुस्मृति अध्याय–९ श्लोक–११४.)

१२) स्त्रि चंचल आणि हृदयहिन, पतिशी एकनिष्ठ न राहणारी असते. (मनुस्मृति अध्याय–२ श्लोक–११५.)

१३) स्त्रि केवळ शैय्या, आभूषण आणि वस्त्र यावरच प्रेम करणारी, वासनायुक्त, बेईमान, इर्षाखोर, दुराचारी असते. (मनुस्मृति अध्याय–९ श्लोक–१७.)

१४) सुखी संसारासाठी स्त्रियांसोबत कसे राहावे यासाठी हा मनु सांगतो – १. स्त्रियांनी जीवनभर आपल्या पतिच्या आज्ञेचे पालन करायला पाहिजे. (मनुस्मृति अध्याय–५ श्लोक–११५.)

२. पति दुराचारी असो, इतर स्त्रियांवर आसक्त असो, दुर्गुणांचे भांडार असो, नपुंसक असो, कसाही असला तरीही स्त्रिने पतिव्रता होऊन देवासारखी त्याची पूजाच करायला पाहिजे. (मनुस्मृति अध्याय–५ श्लोक–१५४.)

अशा या जुलुमी मनुस्मृतिला आग लावून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण भारतातील शोषित, पीडित शुद्रांवर आणि सर्व जाती जमातीमधील स्त्रियांवर अनंत उपकार केले आहेत. म्हणून हा खऱ्या अर्थाने "स्त्रि मुक्ति दिन" मानल्या जातो.

☸☸🌿🌿🌿💎 ७० वा ऐतिहासिक धंम्मभूमि डेहुरोड वर्धापन दिन २५ डिसेंबर १९५४. 💎🌿🌿🌿☸☸

देहु रोड (रस्ता) जि. पुणे येथे संत चोखोबाराय मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यासाठी मंदिर समिती सदस्यांनी ८ मे १९५४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लोणावळा येथे भेट घेतली असता त्यांना बाबासाहेब म्हणाले, _*"तुम्हीं चोखोबारायांचे मंदिर बांधले आहे. ज्या चोखोबांची मूर्ती आपल्या नजरेसमोर नाही किंवा पाहिलेली नाही, किंबहुना त्या काळात चोखोबाला आपल्या जीवनात काही करता आले नाही, त्या चोखोबांबद्दल आपण आस्था बाळगणे हितावह नाही. आता यापुढे आपणास अन्य भावनेने किंवा हेतूने पुढील कार्याची आखणी करावयास पाहिजे. म्हणून मला तुम्हाला असा सल्ला द्यावासा वाटतो की, तुम्ही बांधलेल्या देवळात बुद्धांच्या मूर्तीची प्रिष्ठापना करा."*_

देहूरोड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना म्यानमार (ब्रह्मदेश) देशातील रंगून (यांगुन) येथील जागतिक परिषदेमध्ये भेट म्हणून मिळालेल्या भगवान गौतम बुद्धांच्या मूर्तीची स्थापना त्यांनी २५ डिसेंबर १९५४ रोजी केली होती.

देहूरोड जि. पुणे या ठिकाणी २५ डिसेंबर १९५४ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धंम्मदिक्षा पहिली बुद्ध मूर्ती बसविली होती. जी त्यांना म्यानमार (ब्रम्हदेश) मधिल रंगून (यांगून) येथे झालेल्या बौद्धधंम्मा परिषदेमधे भेट मिळाली होती. म्हणून या ठिकाणची ओळख धंम्मभूमि अशी आहे. या समारंभाप्रसंगी हजारोंच्या संख्येने जनसमुदाय जमला होता. उपस्थित बांधवांना बाबासाहेब म्हणाले की, _*"बुद्धांच्या मूर्तीची १२०० (बाराशे) वर्षानंतर स्थापना करण्याचा पहिला मान आपल्याला मिळाला आहे, ही फार महत्त्वाची घटना आहे. आणि त्याची इतिहासामध्ये नि:संशय नोंद होईल. या लहान बुद्ध विहारापासूनच धंम्मक्रांतीला सुरुवात होणार आहे."*_

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम*🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🦚🦚🦚☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २६ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, मग्गसिरो मासो, गुरूवार, मार्गशिस माहे.

२६ डिसेंबर १९२७ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली महाड सत्याग्रहाबद्दल चर्चा झाली.

२६ डिसेंबर १९३७ – रोजी खेड रत्नागिरी येथे चर्मकार परिषद संपंन्न झाली.

*२६ डिसेंबर १९४५ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मद्रास (चेन्नई) प्रांताचा निवडणूक प्रचार दौरा केला. (२३ ते २७ डिसेंबर).

२६ डिसेंबर १९५० – रोजी "महिलांनी सामाजिक प्रगति घडवून आणणे हेच हिंदू कोड बिलाचे उद्दिष्ट होते." असे शेड्युल्ड कास्ट फेडरेशन बेळगाव, कर्नाटक येथील भाषणात विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विचार मांडले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम*🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷💎🦚🦚🦚☸☸

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २७ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, मग्गसिरो मासो, शुक्रवार, मार्गशिस माहे.

२७ डिसेंबर १८९८ – रोजी पंजाबराव देशमुख जयंती.

२७ डिसेंबर १९२७ – रोजी महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह स्थगित झाला, तसेच महाड येथे महिलांना उद्देशून विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ऐतिहासिक भाषण झाले. ते म्हणाले, "तुम्ही एक शूर लोक आहात. जे लोक आपल्या न्यायाच्या अधिकारासाठी बलिदान देण्यास तयार आहेत. आपला संघर्ष जातीय हिंदूंच्या गटाविरुद्ध आहे आणि सहाजिकच आपल्याला फारच कमी पाठिंबा आहे. माझ्या बंधुंनो, तुम्ही मला खात्री दिली आहे की चवदार सरोवरामधिल हा संघर्ष पुढे ढकलण्यात आला याचा अर्थ असा नाही की आपण संघर्ष संपविला पाहिजे. जोपर्यंत आपण या चवदार तलावावर आपला दावा स्थापित करीत नाहीत तोपर्यंत लढा सुरूच राहील.

२७ डिसेंबर १९३९ – रोजी बेळगाव म्युंसिपलच्या वतीने विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानपत्र देण्यात आले.

*२७ डिसेंबर १९४५ – रोजी कोइंबतूर येथे झालेल्या अस्पृश्यांच्या अफाट जनसमुदायासमोर विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पु. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "आपले ध्येय्य साकार करण्यासाठी फेडरेशनला अपूर्व विजय मिळवून द्या." (सदर भाषण जनता वृत्तपत्रात २९ डिसेंबर १९४५ रोजी प्रकाशित झाले.)

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २८ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, मग्गसिरो मासो, शनिवार, मार्गशिस माहे.

२८ डिसेंबर १८८१ – रोजी सर सयाजीराव गायकवाड बडोदरा यांचा राज्यरोहण कार्यक्रम.

२८ डिसेंबर १९२९ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली बहिष्कृत वर्गाची पहिली परिषद धारवाड येथे किल्ल्याच्या वेशी नजीकच्या विस्तीर्ण पटांगणात झाली. तेथील भाषणात त्यांनी सांगितले की, "केवळ शिक्षणाने योग्यता येते असे नाही. तसेच माझा इंग्रज सरकारवर विश्वास नाही. आपला उद्धार आपणच करून घेतला पाहिजे."

२८ डिसेंबर १९२९ – रोजी बहिष्कृत भारतचा शेवटचा अंक प्रकाशित झाला.

२८ डिसेंबर १९३१ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्व प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुंबईला परतले. भारतातील वंचितांसाठीच्या दुसऱ्या फेरीच्या टेबल कॉन्फरन्समधील त्यांच्या कामाचे पूर्ण समाधान झाले.

२८ डिसेंबर १९३१ – रोजी महात्मा गांधीजींच्या गोलमेज परिषदेहून आगमन प्रसंगी मुंबई येथील मोल बंदरावर स्पृश्य आणि अस्पृश्य यांच्यात दंगल झाली.

२८ डिसेंबर १९३२ – रोजी मद्रास (चेन्नई) येथे विश्वरत्न, बोधिसत्व प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मोठ्या थाटात स्वागत झाले.

२८ डिसेंबर १९४० – रोजी विश्वरत्न, बोधिसत्व प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा "थॉट्स ऑन पाकिस्तान" हा महत्त्वपूर्ण ग्रंथ रमाई यांच्या पवित्र स्मृतिस अर्पण करून प्रकाशित झाला.

२८ डिसेंबर १९४१ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्व प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अहमदाबाद, गुजरात येथे भाषण.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

🌳 *गौतम बुध्दांच्या वास्तव्याशी निगडित मानव निर्मित वने* 🌳

भगवान गौतम बुध्दांचे वास्तव्य हे प्रामुख्याने निसर्गाच्या सानिध्यात गेले. त्यांचे मुख्यत्वे वास्तव्य हे आम्रवन/आवळा वन किंवा पाण्याचे तळे या ठिकाणी केलेले आढळते.

गौतम बुध्दांच्या काळात *झाडे लावणे व त्याचे संवर्धन या संकल्पनेचा सुवर्णकाळच म्हणावा लागेल* कारण याकाळात अनेक बागबगिचांची निर्मिती केलेली आढळते. त्रिपिटक, अट्ठगाथा व जातक कथा यांमध्ये मध्यदेशामध्ये *61 प्रकारची वने असलेल्याचा उल्लेख आढळतो. नालंदाविद्यापीठ व तक्षशिला विद्यापीठात आंतरराष्ट्रीयदर्जाच्या बागा प्रसिद्ध होत्या*. बुध्द धम्माच्या रिवाजाप्रमाणे बुद्धविहार व स्तुप यांच्या भोवती वन, बाग व पाण्याचे तळे असणे अनिवार्य होते. आजही उत्खननं करतांना ह्याचे पुरावे मिळतात. (आज मात्र केवळ सिमेंटचे बुद्धविहार पाहायला मिळते.)

मध्यप्रदेशामध्ये गौतम बुद्धांच्या काळातील सुप्रसिद्ध काही मानवनिर्मित वनांची नावे....

1) 🌳आनंदवन व अंजनवन (श्रावस्ती) 2) 🌳कांतकिवन (साकेत) 3) 🌳केतकीवन (नालकापन) 4) 🌳महावन (कपिलवस्तू व वैशाली) 5) 🌳लुंबिनिवन (शाक्य) 6) 🌳सालवन (कुशीनगर) 7) 🌳वेशकालवन (वज्जी) 8) 🌳परिलेक्यवन (छेदी) 9) 🌳आंबटकवन (काशी) 10) 🌳शिषिपवन (कौसंबी) 11) 🌳वेळुवन (राजगृह व किंबील) 12) 🌳पिपंळवन (मोरिय) 13) 🌳नागवन (वज्जीय)

भगवान गौतम बुद्धांनी संपूर्ण आयुष्य निसर्ग सानिध्यात घालविले. निसर्ग व बौद्धधम्म यांचे अतूट नाते गौतम बुद्धांच्या विविध ठिकाणी केलेल्या वास्तव्यावरून लक्षात येते.

राजीव शिंदे (पर्यावरणशास्त्र व पुरातत्वशास्त्र आभासक)

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २९ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, मग्गसिरो मासो, रविवार, मार्गशिस माहे.

२९ डिसेंबर १९२७ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या सहकार्यांसमवेत रायगडावर मुक्काम केला.

२९ डिसेंबर १९३४ – रोजी दलित परिषदेचे दुसरे अधिवेशन भोर संस्थान येथे संपंन्न झाले.

२९ डिसेंबर १९५५ – रोजी "थॉट्स ऑन लिंगविस्टिक स्टेटस्" हा ग्रंथ विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा प्रकाशित झाला.

२९ डिसेंबर १९७१ – रोजी कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्मृतिदिन (मृत्यू).

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ३० डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, मग्गसिरो मासो, सोमवार, मार्गशिस माहे.

३० डिसेंबर १९३७ – रोजी पंढरपूर येथे अस्पृश्य समाजाची परिषद. "अस्पृश्य समाजात एकी नाही याचे कारण जातिभेद हेच आहे." असे उद्गार सोलापूर दौऱ्यावरील जाहीर सभेत (कुर्डुवाडी, सोलापूर) येथे विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी काढले.

३० डिसेंबर १९३८ – रोजी मक्रांनपुर (चाळीसगाव) येथे औरंगाबाद (आता संभाजी नगर) जिल्हा दलित परिषदेचे पहिले अधिवेशन संपंन्न झाले.

३० डिसेंबर १९३९ – रोजी बॅरिस्टर जीना यांनी मुक्तता दिन पाळण्याबाबत मुंबई येथील महंमद अली रोडवर (रस्त्यावर) झालेल्या कार्यक्रमास विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या इंग्रजी भाषणात _"लोकसत्ताक राज्यपद्धतीचे हिंदू समाजात वावळे का?"*_ असे बोलले.*

३० डिसेंबर १९४४ – रोजी कानपूर येथे एन. शिवराज यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या समता सैनिक दळाच्या दुसऱ्या अधिवेशनामध्ये बोलतांना विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, _"अस्पृश्य तरुणांनी शेड्यूल्ड कास्टस फेडरेशनच्या पाठीमागे आपली ताकत उभी केली पाहिजे. असे झाल्यास कोणालाही अस्पृश्यांच्या न्याय्य हक्कांकडे दुर्लक्ष करण्याची हिंमत होणार नाही.*_

३० डिसेंबर १९४८ – रोजी (अनुच्छेद – ६० – राष्ट्रपतींकडून शपथ वा निश्चय [Article – 60 – Oath or affirmation by the President]) संविधान सभेच्या चर्चेत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुच्छेद ६० किंवा राष्ट्रपतींनी शपथ घेण्याबाबत चर्चा केली होती. राष्ट्रपतींची शपथ किंवा कबुलिकरण :– मी परमात्म्याच्या नावाने शपथ घेतो की, मी अखंडपणे कार्यभार सांभाळतो. मी राष्ट्रपती किंवा राष्ट्रपती यांच्या कार्याच्या कार्यपद्धतीची काटेकोरपणे पुष्टी करेन आणि माझी क्षमता राखून ठेवेन, मी राज्यघटना व कायद्याचे संरक्षण व सक्षमीकरण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेन, मी स्वतः लोकांच्या सेवा आणि कल्याणासाठी समर्पित होईल.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

🦚🦚🦚दिनांक ३० डिसेंबर १९३० रोजी इंग्लंडवरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रमाई यांना लिहिलेले पत्र आजही काळजाला पिळून टाकतं... 🦚🦚🦚

रमा !

कशी आहेस रमा तु? तुझी, यशवंताची आज माला खूप आठवण आली. तुमच्या आठवणीनं मन खूपच हळवं झालं आहे आज. मागच्या काही दिवसातली माझी भाषणे फारच गाजली. परिषदेतील सर्वोत्कृष्ठ भाषणे, प्रभावी वक्तृत्वाचा सर्वोत्कृष्ट नमुना असे माझ्या भाषणांबद्दल इकडच्या वर्तमाणपत्रांमधून लिहून आले आहे. या पहिल्या गोलमेज परिषदेतील माझ्या भूमिकेचा विचार मी करीत होतो आणि डोळ्यापुढे आपल्या देशातील सर्व पीडितांचे संसार माझ्या डोळ्यासमोर उभे राहिले.

दुःखांच्या डोंगराखाली ही माणसे हजारो वर्षे गाडली गेली आहेत. या गाडलेपणाला पर्याय नाही हिच त्यांची समजूत आहे. मी हैराण होतो आहे रमा! पण मी झुंज देतो आहे. माझी बौद्धिक शक्ती परमवीर झाली होती जणू! खूप भावना मनात दाटुन आल्या आहेत. खूपच हळवे झाले आहे मन. खूपच व्याकुळ झाले आहे मन! आणि घरातल्या तुम्हा सर्वांची आठवण आली. तुझी आठवण आली. यशवंताची आठवण आली.

मला तु बोटीवर पोहोचवायला आली होतीस. मी नको म्हणत होतो तरी तुझे मन तुला धरवले नाही. तु मला पोहोचवायला आली होतीस. मी गोलमेज परिषदेला जात होतो. माझा सर्वत्र जयजयकार सुरु होता. तु पाहत होतीस. तुझं मन गदगदुन आलं होत. कृतार्थतेन तु ओथंबून आली होतीस. तु शब्दांनी बोलत नव्हतीस; पण तुझे डोळे जे शब्दांना सांगता येत नसते तेही सांगत होते. तुझं मौन शब्दांहून अधिक बोलक झालं होत. तुझ्या गळ्यातील आवढा तुझ्या ओठापर्यंत येऊन थडकत होता. ओठातील शब्दांच्या भाषेपेक्षा डोळ्यातील आस्वांचीच भाषा त्यावेळी तुझ्या मदतीला धावली होती.

आणि आता इथे लंडनमधे या सऱ्याच गोष्टी मनात उभ्या राहिल्या आहेत. मन नाजूक झाले आहे. जीवात कालवाकालव होत आहे. कशी आहेस रमा तु! आपला यशवंत कसा आहे? माझी आठवण काढतो तो? त्याचे संधिवाताचे दुखणे कसे आहे? त्याला जप रमा! *आपली चार मुल आपल्याला सोडून गेलीत. आता आहे फक्त यशवंत. तोच तुझ्या मातृत्वाचा आधार आहे आता. त्याला आपण जपलं पाहिजे. यशवंताची काळजी घे रमा!* यशवंताला खूप अभ्यास करायला लाव. त्याला रात्री अभ्यासाला उठवीत जा. माझे बाबा मला अभ्यासासाठी रात्री उठवीत असत. तोवर ते जागे राहत. मला ती शिस्तच त्यांनी लावली. मी उठलो, अभ्यास सुरु केला की ते झोपत असत. अगदी प्रारंभी मला, रात्री अभ्यासाला उठण्याचा कंटाळा येई. त्यावेळी अभ्यासापेक्षा झोप महत्वाची वाटे. पुढे तर, *आयुष्यभरासाठी झोपेपेक्षा अभ्यासाचं मोलाचा वाटत राहिला. याचं सर्वात जास्त श्रेय माझ्या बाबांना आहे. माझ्या अभ्यासाची वाट तेवत राहावी म्हणून माझे बाबा तेलासारखे जळत राहत. त्यांनी रात्रीचा दिवस केला. अंधाराचा उजेड केला. माझ्या बाबांच्या कष्टांना आता फळे आली.* फारफार आनंद वाटतो रमा आज. रमा यशवंताच्या मनाला असाच अभ्यासाचा छंद लावला पाहिजे. ग्रंथाचा ग्याने ध्यास घेतला पाहिजे.

रमा वैभव, श्रीमंती या गोष्टी निरर्थक आहेत. तु अवतीभोवती पाहते आहेसच. माणस अश्याच गोष्टींच्या सारखी मागे लागलेली असतात. त्यांची जीवणं जिथून सुरु होतात तिथंच थांबलेली असतात. या लोकांची आयुष्य जागा बदलत नाहीत. *आपल्याला असं जगून चालायचं नाही रमा. आपल्याजवळ दुःखाशिवाय दुसरं काहीच नाही. दारिद्रय, गरिबी यांच्याशिवाय आपल्याला सोबत नाही. अडचणी आणि संकटे आपल्याला सोडीत नाहीत. अपमान, छळ, अव्हेलना या गोष्टी आपल्याला सावलीसारख्या जखडलेल्या आहेत.*

मागे अंधारच आहे, दुःखाचे समुद्रच आहेत. आपला सूर्योदय आपणच झाले पाहिजे रमा. आपणच आपला मार्ग झाले पाहिजे. त्या मार्गांवर दिव्यांची ओळ आपणच झाले पाहिजे. त्या मार्गांवर जिद्दीचा प्रवास आपणच झाले पाहिजे.

आपल्याला दुनिया नाही. आपली दुनिया आपणच निर्माण केली पाहिजे. आपण असे आहोत रमा. म्हणून म्हणतो यशवंताला खूप अभ्यास करायला लाव रमा. त्याच्या कपड्यांची काळजी घे. त्याची समजूत घाल. त्याच्यात जिद्द जागव. मला तुझी सारखी आठवण येते. यशवंताची आठवण येते.

मला कळत नाही असं नाही रमा. मला कळत की, तु दुःखांच्या या वणव्यात स्वतः करपून जात आहेस. पणे गळत जावीत आणि जीव सुकत जावा त्याप्रमाणे तु होते आहेस. पण रमा मी तरी काय करू! एका बाजूने हात धुवून पाठीशी लागलेले दारिद्र्य. दुसऱ्या बाजूने माझ्या जिद्दीने घेतलेला वसा. वसा ज्ञानाचा!

मी ज्ञानाचा सागर उपसतो आहे. मला इतर कशाचजे यावेळी भान नाही; पण ही शक्ती मला मिळविण्यात तुझाही वाटा आहे. तु इथे, *माझा संसार शिवत बसली आहेस. आस्वांचे पाणी घालून माझे मनोबळ वाढवीत आहेस.* म्हणून मी बेभान मनान ज्ञानाच्या तळगर्भाचा वेध घेतो आहे.

खरं सांगू रमा, मी निर्दय नाही. पण जिद्दीचे पंख पसरून आकाशात उडणाऱ्या मला कोणी सादही घातली, तरी यातना होतात. माझ्या मनाला खरचटत आणि माझ्या रागाचा भडका उठतो. मलाही हृदय आहे रमा! मी कळवळतो, पण *मी बांधलो गेलो आहे क्रांतीशी! म्हणून मला माझ्या स्वतःच्या भावना चितेवर चढवाव्या लागतात. त्याचा तुला, उशवंतालाही कधी झळा पोचतात. हे खरं आहे.* पण यावेळी रमा मी हे उजव्या हाताने लिहितो आहे आणि डाव्या हाताने अनावर झालेली आसवे पुसतो आहे. सुडक्याला सांभाळ रमा. त्याला मारू नको. मी त्याला असे मारले होते. त्याची आठवणहि कधी करून देऊ नको. तोच आता तुझ्या काळजाचा एकुलता एक घड आहे.

माणसांच्या धार्मिक गुलामगिरीचा, आर्थिक आणि सामाजिक उचणीचतेचा आणि मानसिक गुलामगिरीचा पत्ता मला शोधायचा आहे. माणसाच्या जिबणात या गोष्टी ठाण मांडून बसलेल्या आहेत. त्यांना पर जाळून पुरून-टाकता आल्या पाहिजे. समाजाच्या स्मर्नातून आणि संस्कारातूनही या गोष्टी नाहीस्या झाल्या पाहिजेत.

रमा! तु हे वाचते आहेस आणि तुझ्या डोळ्यात आसावे आलीत. कंठ दाटला आहे. तुझं काळीज थरथरायला लागलं आहे. ओठ कापू लागले आहेत. मनात उभे राहिलेले शब्द ओठापर्यंत चालतही येऊ शकत नाहीत. इतकी तु व्याकुळ झाली आहेस.

रमा, तु माझ्या आयुष्यात आली नसतीस तर? तु मजसाथी मिळाली नसतीस तर? तर काय झालं असतं? केवळ संसारसुखाला ध्येय समजणारी स्त्री मला सोडून गेली असती. अर्धपोटी राहणे, गवऱ्या वेचायला जाने वा शेण वेचून त्याच्या गोवऱ्या थापने किंवा गोवऱ्या थापायच्या कामावर जाणे कोणाला आवडेल? स्वयंपाकासाठी इंधन गोळा करायला जाणे, मुंबईत कोण पसंत करेल. घराला ठिगळे लावणे, वस्त्रांना शिवत राहणे, एवढ्याच कड्याच्या पेटीत महिना भरला (निभला) पाहिजे, एवढेच धान्य, एवढेच टेलमीठ पुरले पाहिजे, हे माझ्या मुखातून बाहेर पडलेले गरिबीचे आदेश तुला गोड वाटले नसते तर? तर माझे मन फाटून गेले असते. माझ्या जिद्दीला तडे गेले असते. मला भरती येत गेली असती आणि तिला त्या त्या वेळी लगेच ओहोटीही लागली असती. माझ्या स्वप्नांचा खेळच पार विस्कटून गेला असता रमा! माझ्या जीवनाचा सगळा सुरच बेसूर झाला असता, सगळीच मोडतोड झाली असती. सगळाच मनस्ताप झाला असता. मी कदाचित खूरटी वनस्पतीच झालो असतो. जप स्वतःला जसी जपतेस मला. लवकरच यायला निघेन. काळजी करू नकोस.

सर्वांस कुशल सांग.

कळावे तुझा,

भीमराव, लंडन. ३० डिसेंबर १९३०. नमो बुध्दाय.

☸☸☸☸☸☸☸☸☸☸☸

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ३१ डिसेंबर २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, फुस्स मासो, मंगळवार, पौष माहे.

३१ डिसेंबर १९३१ – रोजी चिपळूण येथे रत्नागिरी जिल्हा बहिष्कृत परिषदेचे तिसरे अधिवेशन संपंन्न झाले.

३१ डिसेंबर १९३७ – रोजी पंढरपूर येथे सोलापूर जिल्हा अस्पृश्य राजकीय परिषद संपंन्न झाली.

*३१ डिसेंबर १९३७ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सोलापूर जिल्हा कर्कम (कुर्डुवाडी) मुक्कामी येथे मातंग समाजाने उभारलेल्या भव्य मंडपात त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "अस्पृश्य समाजात एकी नाही याचे कारण जातिभेद हेच आहे." (सदर भाषण जनता वृत्तपत्रात ८ जानेवारी १९३८ रोजी प्रकाशित झाले.)

३१ डिसेंबर १९३९ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कोल्हापूरहून सातारा येथे जात असताना वाटेत नेरे मुक्कामी त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. त्यावेळी त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "माझ्या मागे तुमचे ऐक्य अभेद्य ठेवा."

३१ डिसेंबर १९५५ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बीबीसी मुलाखतीमधे गांधींना उघड केले (गांधींचा पर्दा उघड केला.) ते कधी महात्मा नव्हते, मी त्यांना महात्मा म्हणण्यास नकार देतो, मी त्यांना (मिस्टर) श्रीमान म्हणेन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

–

१) चन्दवारो	मंडे (Monday)	सोमवार
२) कुंजवारो	चुसडे (Tuesday)	मंगळवार
३) बुधवारो	वेणसडे (Wednesday)	बुधवार
४) गरुवारो	थर्सडे (Thursday)	गुरुवार

५) सुक्कवारो	फ्रायडे (Friday)	शुक्रवार
६) सनिवारो	सॅटरडे (Saturday)	शनिवार
७) आदिच्चवारो	संडे (Sunday)	रविवार –